पदांचे व्यवहार व इतिहास

शं. ग. खांडेकर,
एम्. ए. एल्. टी.

पेढीचे व्यवहार व इतिहास

लेखक

शंकर गणेश खांडेकर

'भारतीय चलनपद्धति' या पुस्तकाचे कर्ते

मुद्रक व प्रकाशक

दत्तात्रय गणेश खांडेकर,

लॉ प्रिंटिंग प्रेस, ५३० शनवार, पुणें शहर.

१९२२

किंमत रुपये २ऽ८

शुद्धिपत्र.

वाचकांनीं पुस्तक वाचण्यापूर्वी ह्या शुद्धीपत्राचा उपयोग करावा अशी त्यांना विनंति आहे.

पान.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
अ० पत्रिका शे० ओळ		ग्रंथकता	ग्रंथकर्ता
प्रस्तावना	६	पेठी	पेढी
२९	२४	हीमध्यें	हिच्यामध्यें
४२	५	१९०	१००
४३	२५	देशांतला	देशाला
६०	२४	पुनर्गहाणावर तारण समजून कर्ज पेढीचा	पुनर्गहाण तारण समजून कर्ज-फेडीचा
१४५	१०	पेढीलाच नेहमीं कांहीं	पेढीला नेहमींच कांहीं
१५८	१३	सान्याचा	सोन्याचा
१५९	२८	२५·२२१५:	२५·२२१५
१९४	१३	लाकांना	लोकांना
२१४	२६	मागांत	भागांत
२४३	३	सम हक्कांच्या	समान हक्कांच्या
२४५	२	ठेवींच्या, ज्यांच्याबद्दल	ठेवींच्या व ज्यांच्याबद्दल
२५२	१९	निपूण	निपुण
२७१	७	जरूर नाहीं	जरूर नाहीं)
२९८	२६	हेतु सभसदांना साध्य होण्यास	हेतु साध्य होण्यास
२९८	२८	त्यांना मिळालेलें कर्ज त्यांना	त्यांना मिळालेलें कर्ज त्यांनीं
३०२	31	अशा प्रकारच्या सुचना	अशा प्रकारच्या सूचना

३०७	१३	१९१७-१८	१९२०-२१
३०७	२१	११$\frac{3}{4}$	१५$\frac{1}{4}$
३०९	१०	व्हायात	व्हाव्यात
३१०	१२	लोकांची...इष्ट आहे	लोकांचीच पहाणी असणें सर्वथैव इष्ट आहे.
३१०	१४	कबूल केलें नाहीं	कबूल केलें
३१०	१७	रजिस्टरकडेंच	रजिस्ट्रारकडेच
३१८	११	ज्या वेळीं ती पेढी इम्पेरिअल बँकेला	ज्या वेळीं इम्पेरिअल बँकेला
३१८	१२	ज्याज देऊं करून लोकांकडून	व्याज देऊं करून ती पेढी लोकांकडून
३१८	१४	अर्थातच एतदेशीय	अर्थातच ती पेढी आपला दर कमी करते. एतद्देशीय
३२२	११	गतयो भिन्न पथाहि	गतयो भिन्नपथा हि
३२४	३	अशी भेसळ न करावी	अशी भेसळ करावी
३२४	९	असें अनेक वेळां	पूर्वीं अनेक वेळां

पान २४० " सरकारी खजिन्यांत ठेवण्यांत आली " ह्यानंतर खालीं दिलेला मजकूर वाचणें:—

ह्या **स**फोक पेढीच्या पद्धतीमुळें अमेरिकेच्या सरकारास असा अनुभव आला कीं,—

नंतर (२), (३), (४) ह्यांच्याऐवजीं (१), (२), (३) असे आंकडे वाचणें.

कोष्टकें.

पान ३१२ वर असलेल्या कोष्टकांत १९१५-१६ व १९१६-१७ ह्या रकान्यांत ७१६८५८ व ७८४२५२ ह्या आंकड्यांकरितां * ही खूण समजावी व ८५७६०७ ह्याकरितां $ ही खूण समजून तिचा संबंध त्याच पानावरील दुसऱ्या टिपेशीं आहे असें मानावें. तसेंच ३१३ पानावरील कोष्टकांत १९१०-१५ ह्या रकान्यांत १९३४२ ह्या आंकड्याकरितां खालीं दिलेली टीप समजावी.

अर्पणपत्रिका

नागपूरचे सुप्रसिद्ध पुढारी

सर गंगाधरराव चिटनवीस, के. सी. आय्. ई.,

प्रेसिडेंट, लेजिस्लेटिव्ह कौंसिल, नागपूर

ह्यांस

त्यांचा विद्याव्यासंग, सदभिरुचि, परहितरति,
सार्वजनिक काम करण्याची हौस
इत्यादि गुणांवर लुब्ध होऊन

ग्रंथकर्त्यानें

हा ग्रंथ

प्रेमपुरःसर अर्पण केला आहे.

ग्रंथकर्ता.

प्रस्तावना

गत वर्षी आम्हीं **"भारतीय चलनपद्धति"** नांवाचें एक पुस्तक छापून प्रसिद्ध केलें. त्या पुस्तकावर **"केसरी"** सारख्या वृत्तपत्रांनीं व **"विविधज्ञान-विस्तार,"** **"उद्यम"** सारख्या मासिकांनीं अनुकूल टीका करून व महाराष्ट्रांतील रसिक वाचकांनीं त्याचें स्वागत करून आम्हांस जें प्रोत्साहन दिलें त्यामुळें अर्थशास्त्रीय विषयांवर नवीन नवीन पुस्तकें लिहिण्यास आम्हांस उमेद येऊन ह्या वर्षी आम्हीं **पेढी** ह्या विषयावर हें पुस्तक लिहून प्रसिद्ध करीत आहोंत.

हल्लीं सर्व हिंदुस्थानभर देशी भाषांतून शिक्षण देण्याकडे सरकारची व देशांतील पुढारी लोकांची प्रवृत्ति होत चालली आहे; पण हा हेतु साध्य होण्यास देशी भाषेंतील ग्रंथभांडार सर्वांगसुंदर झालें पाहिजे हें उघड आहे. ह्याच हेतूनें आम्हीं आजपर्यंत कोणी हातीं न घेतलेल्या पण देशाची सांपत्तिक स्थिति सुधारण्यास अतिशय जरूर अशा विषयाचें ज्ञान सर्वसामान्य जनतेस करून देण्याकरितां पेढी ह्या विषयावर हा ग्रंथ लिहिला आहे. ह्या विषयाचे पेढीचे व्यवहार व तिचा इतिहास असे दोन भाग केलेले आहेत. पहिल्या भागांत पेढीच्या व्यवहारांच्या मूलतत्त्वांची सविस्तर चर्चा केली असून दुसऱ्या भागांत जगांतील प्रमुख राष्ट्रांतील पेढयांचा सविस्तर इतिहास देऊन हिंदुस्थानांतील पेढयांचें विस्तृत वर्णन दिलें आहे व पुढें कोणत्या दिशेनें पेढयांची वाढ येथें व्हावी त्या दिशेची रूपरेषा आम्हीं दाखविली आहे. हें पुस्तक वाचल्यावर सामान्य वाचकांस पेढयांचे व्यवहार कसें चालतात त्यांचें सम्यग्ज्ञान होईल अशी आमची खात्री आहे.

हें पुस्तक लिहून झाल्यावर आमचे परम मित्र श्रीयुत **लिमये**, बी. कॉम्., इन्कम्‌टॉक्स इन्स्पेक्टर, **नागपूर**, श्रीयुत **वेचलेकर** बी. कॉम्. व श्रीयुत **भोसले**, बी. कॉम्. प्रॉव्हिन्शिअल **बँक**, **नागपूर** ह्यांनीं आपला अमोलिक वेळ खर्चून तें काळजीपूर्वक वाचून कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या. तसेंच पुणें येथील इम्पेरिअल बँकेंतील उत्साही व विद्वान् गृहस्थ श्रीयुत **दिवाकर विष्णु फडके** यांनींही आम्हांस हें पुस्तक लिहितांना फारच मदत केली. रा. फडके ह्यांचा ह्य

विषयावरील व्यासंग फार दांडगा असून त्यांचें साहाय्य आम्हांस फार झालें हें सांगण्यास आम्हांस फार आनंद वाटतो.

आमच्या पहिल्या पुस्तकास श्रीयुत **नामदार प्रो. काळे** ह्यांनीं मार्मिक प्रस्तावना देऊन जसें आम्हांस कायमचें ऋणी करून ठेवलें आहे त्याचप्रमाणें ह्या दुसऱ्या पुस्तकास इंदुरचे सुप्रसिद्ध सरदार **रायबहादूर माधवराव किबे** ह्यांनीं महत्वाची प्रस्तावना लिहून दिली व आम्हांस उपकृत करून ठेवलें, तेव्हां त्यांचे आभार कसे मानावेत हेंच आम्हांस समजत नाहीं. पेढीचा धंदा सरदारसाहेबांच्या घराण्यांत वंशपरंपरा चालत असल्यामुळें ह्या विषयावर अधिकारयुक्त वाणीनें बोलण्यास ते सर्वस्वीं लायक आहेत. अशा अधिकारी माणसाचा संबंध आमच्या पुस्तकाशीं जोडला गेला हें आम्ही आमचें भाग्य समजतों. सरतेशेवटीं नागपूरचे सुप्रसिद्ध पुढारी श्रीमंत **सर गंगाधरराव चिटनवीस**, प्रेसिडेंट लेजिस्लेटिव्ह, कौन्सिल, नागपूर ह्यांनीं आमचें पुस्तक स्वतःस अर्पण करण्यास परवानगी दिली ह्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें आमचें कर्तव्य आहे असें आम्ही समजतों.

हें पुस्तक वाचून कोणास कांहीं सूचना करावयाच्या असल्यास त्यांनीं त्या जरूर कराव्या अशी विनंति करून ही प्रस्तावना आम्ही संपवितों.

पुणें,
ता. २२।६।२२

शं. ग. खांडेकर.

उपोद्घात.

व्यवहारांत चलनी नाणें व त्यांचा सांठा या दोन गोष्टी अवश्य लागतात. रा. रा. **शंकरराव खांडेकर** यांनीं पूर्वोक्त विषयावर **भारतीय चलनपद्धति** या नांवाचें एक सुंदर पुस्तक यापूर्वींच लिहून प्रसिद्ध केलें आहे व दुसऱ्या विषयावर प्रस्तुत पुस्तक आहे या दोन्ही पुस्तकांनीं नित्य व्यवहाराच्या या दोन मुख्य गोष्टींविषयीं मराठींत उपयुक्त व परिपूर्ण माहिती संग्रहीत केली आहे.

जी वस्तु आपल्याजवळ प्रस्तुत अधिक आहे पण पुढें लागेल, ती संग्रह करण्याची बुद्धि सर्व समजदार प्राण्यांत असते; किंबहुना जितकी समज अधिक तितकी तरतूद करण्याची बुद्धि अधिक स्पष्ट असते. याच्यापुढील पायरी म्हटली म्हणजे प्रत्येकानें वेगवेगळा संग्रह न करतां समायिक संग्रह करणें ही होय. ज्याप्रमाणें समायिक संग्रह करावयाचा, त्याप्रमाणेंच त्याचा गरजेप्रमाणें व्यक्तिशः उपयोग होऊं द्यावयाचा. या व्यवहारास पेढी असें म्हणतात.

तिचे अनेक प्रकार आहेत. जसें, व्यक्तीच्या किंवा समुदायाच्या मालकीची पेढी. तसेंच सार्वत्रिक उपयोगाची किंवा तिच्या घटकांच्याच उपयोगी पडणारी पेढी. आणखी विशिष्ट कार्याकरितां अस्तित्वांत आलेली अथवा कोणत्या गरजा भागवावयाच्या आहेत यांकडे लक्ष न देतां फक्त मागणीप्रमाणें त्या भागविणारी पेढी. यांप्रमाणें पेढीचे अनेक प्रकार आहेत

या सर्व प्रकारांची निदान सर्वसाधारण माहिती तरी व्यवहारोपयोगी ज्ञानाचें एक महत्त्वाचें अंग आहे. हें ज्ञान नसलें तर व्यवहारांतील पुष्कळ गोष्टींचा उलगडा होत नाहीं व नऱ्याच गैरसमजुती प्रचलित होतात. कित्येक व्यावहारिक परिवर्तनांचें गूढ उकलत नाहीं व मन बुचकळ्यांत पडतें.

या विषयाचें हें सार्वजनिक स्वरूप सोडून दिलें तरी व्यक्तीच्याही सुखदुःखाशीं या माहितीचा निकट संबंध पोंहचतो. तिच्या अभावीं मनुष्याची कित्येक वेळा आर्थिक हानि होते व त्यास निष्कारण अनेक उपाधी सहन कराव्या लागतात. एवढेंच नव्हे तर त्याची व पर्यायानें समाजाची प्रगति खुंटते. व्यापाराचा फायदा

दुसरे उपटतात. या व्यवहाराविषयीं अज्ञानी असलेल्या माणसांस त्याचा फक्त चोथा मिळतो.

हीच स्थिति आज हिंदुस्थानची झाली आहे. भारी व्याजाच्या दराखालीं या देशांतील संख्येनें सर्वांत अधिक असा जो शेतकरी वर्ग तो दमून गेला आहे. देशांतील सर्वांत मोठा उद्योग जो शेतकी, तो दिवसेंदिवस अनुत्पादक होत आहे. ठरीव उत्पन्नाचा व नोकरपेशा वर्ग खर्चाच्या भयंकर वाढीमुळें खालावत आहे. व्यापारी म्हणविणाऱ्या वर्गाची उडी दलालीपलीकडे जात नाहीं.

राज्यकर्ते परदेशांतून पैसे आणून आपली गरज भागवीत आहेत. परदेशी लोक आपल्या पेढया या देशांत काढून आपले पैसे त्यांत गुंतवून या देशाचा सर्व निर्गत व आयातीचा व्यापार आपल्या कबजांत ठेवीत आहेत. या देशांतील लोकांची मालाची किंवा माणसांची सुद्धां नेआण करणारीं जहाजें नसल्यानें या देशावर वाहतुकीच्या खर्चाचा एक मोठा बोजाच पडत आहे. किंबहुना देशांतील प्रधान वाहतुकीचीं साधनेंसुद्धां परकीय भांडवलवाल्यांच्या हातीं आहेत.

अद्यापिही या देशवासीयांची राहणी साधीच असल्यानें इकडील मालाचा मोबदला पुष्कळसा मौल्यवान् धातूंच्या रूपानेंच मिळत आहे. मध्यंतरीं पाश्चात्य जगांत अशी ओरड झाली होती कीं, मौल्यवान् धातूंचा हिंदुस्थान हा एक खाडाच होत आहे, म्हणजे इकडील लोकसंख्येच्या विस्ताराचा विचार न करतां नुसते आयात होणाऱ्या मौल्यवान धातूंच्या वतनाचे आंकडे पाहिले तरीसुद्धां पूर्वीच्या कांहीं वर्षांत या देशांत त्यांची बरीच मोठी आयात झाली आहे असें वाटावयास लागतें; पण ती सर्व संग्रहीत केली गेली व तिचा देशाच्या उन्नतीस विशेष उपयोग झाला नाहीं.

या देशांत जीं कित्येक शतकें राजकीय अस्वस्थता होती तिचा एक समाजावर असा परिणाम झाला कीं, लोकांत संग्राहकता वळविली; पण तिच्यांत उत्पादकपणा आणण्याचें जमलें नाहीं. व्यक्तिशः असे प्रयत्न केले गेले; पण त्याच्यांत स्वार्थपरायणतेकडे विशेष लक्ष राहिलें. व्यवहारांत पेढीशिवाय चालणें शक्य नसल्यानें तिचें बीज देशांत राहिलें; परंतु त्याची वृद्धि झाली नाहीं.

या विवेचनावरून पेढीसंबंधीं विषयांची उपयुक्तता व व्यापकता सहज लक्षांत येण्यासारखी आहे. त्याची विविधताही इतकी आहे कीं, पेढीच्या निर-

निराळ्या अंगांविषयीं मोठमोठे स्वतंत्र ग्रंथ लिहिले गेले पाहिजेत. तेव्हां त्यांचें सांगोपांग विवेचन होऊं शकतें. पाश्चात्य देशांतील प्रमुख भाषांतून यासंबंधीं मोठें साहित्य आहे व तें नित्य वृद्धिंगत होत आहे असें म्हटलें तरी चालेल.

प्रस्तुत ग्रंथांत पेढीच्या मुख्य अंगांचें तात्त्विक व व्यावहारिक विवेचन माहितीपूर्वक व विस्तृतपणें करण्यांत आलें आहे. त्याचा अभ्यास केल्यानें या विषयाची बरीच चांगली माहिती कळेल. हा लहानसा ग्रंथ वाचून एखाद्यास एक-दम पेढीचा व्यवहार करतां येईल अशी अपेक्षा ग्रंथकर्त्याची असणें साहजिकच नाहीं; पण याच्या अध्ययनापासून या विषयाचा प्रत्यक्ष व्यवहारांत पडून अभ्यास करणें सुलभ होईल हें निःसंशय आहे.

शिवाय या पुस्तकाच्या वाचनानें निव्वळ देशभाषा जाणणाऱ्यांचा, जो खेडोपाडींही व्यावहारिक लोकांचा वर्ग आहे त्यांत त्यांच्या व्यवहारांचा, संकुचित-पणा, संघशक्तीचे फायदे व हल्लींच्या तीक्ष्ण जीवनार्थकलहाच्या कालांतील परि-स्थितीस टक्कर देण्याचें तिचें सामर्थ्य, देशाची निकृष्ट सांपत्तिक स्थिति व ती सुधारण्याचे उपाय या गोष्टींचें पर्यायानेंही ज्ञान झाल्यास मोठाच फायदा होणार आहे व तें ज्ञान प्राप्त करून देण्याचें सामर्थ्य या पुस्तकांत आहे

पेढीचे जे निरनिराळे प्रकार आहेत—जसें देशांतील वैयक्तिक पेढी, सामु-दायिक भांडवलाची व मालकीची पेढी, सदरहूप्रमाणेंच परंतु भागीदारीची जबाब-दारी नियमित केलेली पेढी, चलनी नाण्याचा बटवडा करणाऱ्या व्यवहाराची पेढी, सहकारी पेढी व तिचे पोटभेद—त्यांसंबंधीं प्रस्तुत पुस्तकाप्रमाणेंच उपयुक्त पुस्तकें मराठींत प्रसिद्ध होण्याची देशाच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें अत्यंत आव-श्यकता आहे. प्रस्तुत ग्रंथकर्त्यांनीं या विषयाचा अभ्यास काळजीपूर्वक केला अस-ल्याचें त्यांच्या पूर्वी उल्लेख केलेल्या व प्रस्तुत पुस्तकावरून दिसत आहे. त्याचा ते आपल्या देशबांधवांस अधिकाधिक उपयोग करून देतील व त्यांस योग्य लोका-श्रय मिळून तसें करण्यास उत्साह वाटेल अशी आशा आहे.

पुणें,
जेष्ठ वद्य ९ शके १८४३.

मा. वि. किबे.

अनुक्रमणिका

भाग १ ला

प्रकरण १ लें

पेढी व तिच्यापासून होणारे फायदे

प्रकरण २ रें

पेढ्यांचीं कर्तव्यें

(अ) बँक नोटा.

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(आ) लोकांच्या ठेवी

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(इ) मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविणें वगैरे

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(ई) पेढ्यांचीं इतर कामें वगैरे

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(उ) पेढीनें कोणत्या तारणांवर कर्ज द्यावें

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(ऊ) पेढीनें द्यावयाचें कर्ज

प्रकरण ३ रें

नगदी रोकड

प्रकरण ४ थें

पत

प्रकरण ९ वें

राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारी कर्जफेडीची पद्धत.

प्रकरण १० वें

पेढीचा धंदा करणाऱ्या माणसाला लागणारी माहिती.

प्रकरण ११ वें

पेढीच्या कारकुनानें संपादन करण्याचे गुण.

पेढीचा इतिहास

भाग २ रा

प्रकरण १ लें.

प्राक्कालीन पेढ्या.

प्रकरण २ रें

इंग्लंडमधील पेढ्या.

प्रकरण ३ रें

प्रकरण ४ थें

जर्मनींतील पेढ्या.

प्रकरण ५ वें

अमेरिकेंतील पेढ्यांचा इतिहास.

प्रकरण ६ वें

हिंदुस्थानांतील पेढया.

पेढीचे व्यवहार

भाग पहिला

प्रकरण १ लें

पेढी व तिच्यापासून होणारे फायदे

(१) **पेढीची व्याख्याः**—पेढीची व्याख्या अमेरिकेंतल्या कॉंग्रे-सनें अशी केली आहेः—पेढी म्हणजे लोकांचा पैसा (मग तो सोन्याचांदीच्या रूपानें असो किंवा ह्या धातूंच्या नाण्याच्या रूपानें असो) त्यांनीं हुंड्या, चेक किंवा चिठ्ठी पाठविली असतांना परत दिला जाईल ह्या अटीवर ठेव म्हणून स्वीकारून किंवा एकत्र गोळा करून पतीचा व्यवहार सुरू करण्याचें किंवा एखाद्या कंपनीचे विकत घेतलेले रोखे (Stocks) कर्जरोखे (Bonds), सोन्यांचांदीच्या लगडी, हुंड्या किंवा वचनचिठ्ठ्या ह्यांच्यावर पैसा उसना देण्याचें, किंवा मिति कापून वटविण्याकरितां किंवा विकण्याकरितां त्या हुंड्या, कर्जरोखे, कंपनीचे रोखे, प्रॉमिसरी नोटा व लगडी स्वीकारण्याचें, काम करण्याकरितां दुकान असलेला एखादा गृहस्थ किंवा फर्म किंवा कंपनी होय." ही व्याख्या रेलवेच्या मालगाडीप्रमाणें जरा लांबलचक आहे ही गोष्ट खरी; पण ह्या व्याख्येनें पेढीचें खरें स्वरूप चटकन् लक्ष्यांत येतें म्हणून ही व्याख्या आम्हीं येथें दिलेली आहे.

मॅक्लिऑडचे मतानें "नवीन कर्जे. निर्माण करून आहेत तीं कर्जे किंवा पैसा, विकत घेणाऱ्या व्यापाऱ्याचें काम करण्याची जागा म्हणजे पेढी" अशी पेढीची व्याख्या होते; पण ही व्याख्या जरा दुर्बोध आहे. साइक्सनें "पेढीचें

व्यवहार व चलन " ह्या आपल्या पुस्तकांत हीच व्याख्या स्वीकारली आहे. डॉक्टर हार्टच्या मतानें पेढी म्हणजे आपल्या नित्याच्या व्यवहारांत लोकांचे चालू खात्यांवर पैसे स्वीकारणारी व गिन्हाइकांनीं आपणावर काढलेल्या हुंड्या (cheques) बद्दल पैसे देऊन त्या स्वीकारणारी एखादी संस्था होय.

स्थूलमानानें पेढ्यांचे खाजगी पेढ्या व सार्वजनिक पेढ्या असे दोन भाग करितां येतात. ज्या पेढीमध्यें थोडे भागीदार असून तेच तिची व्यवस्था पाहत असतात ती पेढी खाजगी होय. ज्या पेढीमध्यें अनेक भागीदार असून त्यांच्यातून निवडलेले भागीदार—ह्यांना डायरेक्टर अशी संज्ञा आहे—हेच त्या पेढीची व्यवस्था पहात असतात ती पेढी सार्वजनिक होय. समवायिक भांडवलाची पेढी ही दुसऱ्या स्वरूपाची असते. पेढ्यांचें मुख्य काम म्हणजे लोकांकडून कांहीं व्याजावर किंवा व्याज न देतांसुद्धां ठेवी स्वीकारणें, मिति कापून हुंड्या वटविणें किंवा चालू खात्यावर कर्ज देणें व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसा पाठविणें हें होय.

(२) **पेढ्यापासून होणारे फायदेः—(अ) पैसा सुरक्षित ठेवण्याची उत्कृष्ट सोयः—**ज्या देशांत पेढ्या असतात त्या देशांना ह्या पेढ्यांपासून होणारा पहिला फायदा म्हणजे लोकांना आपला पैसा सुरक्षितपणें ठेवण्याची उत्कृष्ट सोय होते. पैशाला मुख्य भय म्हणजे चोरीचें होय; व लोक जर खेडेगांवांत रहात असले व त्यांचीं घरें सुरक्षित नसलीं म्हणजे अर्थातच त्यांना हा पैसा कोठेंतरी सुरक्षित ठेवावा असें वाटतें. अशा लोकांना जर कोणीं सांगितलें कीं, आम्ही तुमच्या पैशाबद्दल जबाबदारी घेतों; इतकेंच नव्हे तर आम्ही तुम्हांला तुमच्या पैशाबद्दल थोडेंबहुत व्याजही देतों, तर त्या लोकांना दुधांत साखर पडल्यासारखें वाटेल ह्यांत संशय नाहीं. अशा रीतीनें लोकांचा पैसा सुरक्षित राहून उलट त्यांना थोडाबहुत आर्थिक फायदाही होतो ही गोष्ट पेढी असल्यानेंच शक्य आहे.

(आ) **एका ठिकाणाहून दुसरीकडे पैसा पाठवितां येणें:—**वर सांगितल्याप्रमाणें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसा पाठविणें ही गोष्ट देशांत पेढी असल्यानें फारच सोयीची होते. आपण अशी कल्पना करूं कीं, एका पेढीचें मुख्य ठिकाण मुंबईमध्यें आहे व त्या पेढीच्या शाखा मुंबई इला

ण्यांत जिल्ह्याच्या मुख्य मुख्य ठिकाणीं आहेत. तेव्हां एखादा मनुष्य पुण्यास असला व त्यानें मुंबईच्या पेढीच्या पुण्यांत असलेल्या शाखेंत पैसे भरले म्हणजे, त्यास जर हे पैसे आपल्या मित्रास मुंबई येथें मिळावे असें वाटत असेल तर ते त्या मुंबईच्या मित्रास सहज मिळूं शकतील. अशा रीतीनें थोड्या खर्चांत बिनधोक्यानें पैसे पाठविण्याची व्यवस्था ह्या पेढीमुळें माणसास करतां येते. विशेषतः तो माणूस जर फिरता व्यापारी असेल तर आपले जमलेले पैसे ठिकठिकाणीं असलेल्या पेढ्यांमध्यें त्याला सहज ठेवतां येतात व आपल्या-वरची जबाबदारी त्यास टाळतां येते.

(इ) वाटेल त्या किंमतीच्या नोटा व नगद सहज मिळूं शकणें:—पेढी स्थापन होण्यापासून तिसरा फायदा म्हटला म्हणजे लोकांना वाटेल त्या किंमतीच्या नोटा बदलून सहज मिळूं शकतात व हवी असल्यास नगदही मिळूं शकते. आपण अशी कल्पना करूं कीं, एखाद्या शहरीं पेढी नाहीं. अशा शहरांत एखादा व्यापारी मोठ्या किंमतीच्या नोटा घेऊन गेला; नंतर त्याला जर लहान किंमतीच्या नोटांची गरज लागली तर त्याची मोठीच गैरसोय होणार. पण ह्याच शहरांत जर एखादी पेढी असली तर ज्या किंमतीच्या नोटा त्या व्यापाऱ्याला हव्या असतील त्या नोटा ती पेढी त्याला सहज देऊं शकेल.

(ई) पैशाचे व्यवहार अल्प मुदतींत करितां येणें:— चवथा फायदा म्हटला म्हणजे पेढी स्थापन केल्यानें पैशाचे व्यवहार फार थोड्या वेळांत करितां येतात. एखाद्या माणसाकडून पांच हजार रुपये घ्यावयाचे असले किंवा त्याला ते रुपये द्यावयाचे असले म्हणजे प्रत्येक रुपया मोजून, तो खरा आहे किंवा खोटा आहे हें जोखून, मग तो द्यावा घ्यावा लागतो. पेढीच्या नोटांनीं आपण ज्यावेळीं व्यवहार करतों त्यावेळीं हे व्यवहार फार जलद व बिनत्रासानें होत असतात.

(उ) हुंड्या वटविण्याचा त्रास चुकवितां येणें:—ज्या-वेळीं एखादा व्यापारी आपला देण्याघेण्याचा संबंध एखाद्या पेढीशीं ठेवतो त्यावेळीं लोकांनीं त्याच्यावर काढलेल्या हुंड्या किंवा त्यांनीं लोकांवर काढलेल्या हुंड्या वटविण्याचा त्याचा त्रास चुकतो; कारण हें काम पेढ्या सहज करूं शकतात. हल्लीं प्रत्येक राष्ट्र व्यापाराच्या बाबतींत फारच पुढें गेल्यानें त्या राष्ट्रांतील मालाची

आयात निर्गत ही व्यापाऱ्यांनीं एकमेकांवर काढिलेल्या हुंड्यांनींच होत असते. प्रत्यक्ष रोखीनें व्यवहार फारच थोडा होत असतो., व हाही फायदा पेढ्यामुळेंच होत असतो. तेव्हां ह्या हुंडयांची मुदत पुरी झाल्यावर त्या हुंडया व्यापाऱ्यांकडे घेऊन त्यांवर रुपये, आणे, पै बरोबर मांडून साक्षीदार बोलावून हुंड्या वटविणें फार त्रासदायक असतें. हें काम पेढ्या करीत असल्यानें लोकांचा आयताच त्रास चुकतो.

(ऊ) **सांपत्तिक स्थितीचें सम्यग्ज्ञान करून देणें**:-एखाद्या माणसाचा किंवा व्यापारी कंपनीचा जर एखाद्या प्रसिद्ध पेढीशीं संबंध असला तर सांपत्तिक दृष्ट्या आपली स्थिति काय आहे हें त्या माणसाला किंवा कंपनीला इतर लोकांना चटकन् सांगता येतें व लोकांनाही त्या पेढीजवळ चवकशी करून आपली खात्री करून घेतां येते. अशा रीतीनें त्या माणसाला किंवा कंपनीला आपली पत ह्या पेढीच्या जोरावर वाढवितां येते व त्या पतीमुळें आपला धंदाही मोठ्या प्रमाणांत वाढवितां येतो.

एखाद्या माणसाची अशी चाल असली कीं, आपल्याला जो कांहीं पैसा लोकांकडून येत असेल तो सर्व पैसा एखाद्या पेढीजवळ ठेवावयाचा व आपल्याला जो पैसा खर्चावयास लागत असेल त्या पैशाबद्दल त्या पेढीवर चेक द्यावयाचे, तर वर्षांतून आपली प्राप्ति किती व खर्च किती ह्याचा निर्णय त्यास सहज करतां येईल, त्यामुळें त्याला काटकसरीनें राहण्याची आपोआप संवय लागेल; व प्रत्येक व्यवराहाची पेढीजवळ नोंद होत असल्यानें पुढेंमागें संशय उत्पन्न होऊन जर सरकारदरबार करण्याचा प्रसंग आला तर त्या पेढीजवळ असलेल्या हिशेबाचे जोरावर त्या माणसाला आपलें म्हणणें सिद्ध करणें सोपें जाईल. पेढी ही संस्था मनुष्याला पुष्कळ तऱ्हेनें उपयोगी पडणारी आहे. एखाद्या माणसाजवळ जर कांहीं महत्वाचे कागद, गहाणखत, किंवा विम्याच्या पॉलिसी वगैरे असल्या व त्या जवळ ठेवणें जर त्यास धोक्याचें वाटत असलें तर त्याला हे कागद ह्या पेढीजवळ निर्धास्तपणें ठेवतां येतात. त्याचप्रमाणें आपले हिशेब कसे ठेवावे, हुंड्या कशा वटवावयाच्या, परदेशीं आपला पैसा थोड्या खर्चांत कसा पाठवावयाचा, इतर देश पाहण्याकरितां आपला देश सोडल्यावर आपणास जर पैसा लागला तर तो कसा मिळेल वगैरे गोष्टींची उपयुक्त माहिती पेढ्यांकडेच चवकशी केली असतांना सहज मिळूं शकते.

(ऋ) **समाजाच्या नीतिमत्तेची वाढः**—पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे ह्या पेढ्यांमुळें समाजाची नीतिमत्ता वाढते. लोकांमध्यें प्रामाणिकपणा व वक्तशीर पैसे परत करणें ह्या सद्गुणांची वाढ होत असते. पेढ्यांचा असा सामान्य नियम असतो कीं, ज्या माणसाशीं त्यांना व्यवहार करावयाचा असतो त्या माणसाची दानत कशी आहे, ह्याची शहानिशा करून मग त्या माणसाशीं किंवा कंपनीशीं व्यवहार करावयाचा. अर्थात् ज्या माणसाला आपला संबंध पेढ्यांशीं ठेवावयाचा असेल त्याला आपली अब्रू चांगली ठेवलीच पाहिजे; व ज्याअर्थी पेढ्यांशीं संबंध ठेवल्यानें फार फायदे होतात त्याअर्थी पुष्कळ माणसें त्यांच्याशी संबंध ठेवण्याची इच्छा करतील व आपले व्यवहार सचोटीनें करणें त्यांना भागच पडेल. ह्याचा एकंदर परिणाम असा होईल कीं, समाजामध्यें नीतिमत्तेची आपोआप वाढ होत जाईल.

(ॠ) **देशांतील उद्योगधंद्यांची वाढः**—सरतेशेवटीं एका अत्यंत महत्त्वाच्या फायद्याचा उल्लेख करून हें प्रकरण पुरें करूं. कोठल्याही देशाची आर्थिक उन्नति होण्याकरितां त्या देशांतील शेतीची व कच्चया मालाला पक्का बनविणाऱ्या कारखान्यांची भरभराट झाली पाहिजे. ही भरभराट न होण्यास मुख्य अडचण म्हणजे पुरेसा पैसा न मिळणें ही होय; पण देशांत पेढ्या जर पुष्कळ प्रमाणांत असल्या तर त्या ही अडचण सहज दूर करूं शकतात. कारण वर सांगितलेल्या उद्योगधंद्यांना भांडवल पुरवून त्यांची पत वाढविणें हें काम ह्याच पेढ्या करीत असतात. महायुद्धापूर्वी व हल्लींही जर्मनीनें औद्योगिक बाबतींत जगामध्यें जें अग्रस्थान पटकाविलें आहे त्याचें कारण त्या देशांत पेढ्यांची अतिशय वाढ झालेली आहे हें होय. इतकेंच नव्हे तर ह्या पेढ्यांचा व जर्मनींतील उद्योगधंद्यांचा अतिशय निकट संबंध आहे. ह्या पेढ्यांचे प्रतिनिधि निरनिराळ्या कारखानदारांच्या बोर्डमध्यें असतात व ज्या धंद्यांना त्या पेढ्यांनीं मदत केली असेल, त्यांच्यावर त्या बारीक नजर ठेवतात. सांगण्याचा मुद्दा हा आहे कीं, पेढ्या जुन्या नव्या उद्योगधंद्यांना द्रव्यदृष्ट्या मदत करून देशाची सांपत्तिक स्थिति सुधारतात.

पेढ्यांना ही आर्थिक मदत उद्योगधंदा करणाऱ्या माणसांना देतां येते, ह्याचें कारण असें आहे कीं, लोक आपले पैसे ह्या पेढ्यांजवळ आणून देतात व हे पैसे त्या पेढ्या त्या लोकांना उसने देऊन त्यांना लागणारें भांडवलच एक प्रकारानें पुर-

वीत असतात. अशा रीतीनें पैसे पुरविल्यानें पेढ्या देशांत नवीनच भांडवल निर्माण करतात किंवा काय ह्या प्रश्नाची चर्चा करण्याचें हें स्थल नव्हे; पण अशी मदत केल्यानें देशांतील उद्योगधंद्यांची वाढ उत्कृष्टपणें होते ही गोष्ट मात्र खरी आहे. हल्लीं सुधारलेल्या सर्व देशांत दोन तऱ्हेच्या पेढ्या दिसून येतात. त्या पेढ्या म्हणजे संचयोत्तेजक (Savings) व व्यापारी पेढ्या ह्या होत. हल्लीं हिंदुस्थानांत सुद्धां ज्या पेढ्या आहेत त्यांचेंसुद्धां संचयोत्तेजक पेढी नांवाचें एक खातें असतें. त्याशिवाय खुद्द सरकारनें काढिलेल्या संचयोत्तेजक पेढ्या (Postal Savings Banks) लोकांची संचित रक्कम जवळ ठेवून त्या रकमेवर व्याजही देत असतात. असो; देशांत पेढ्या असल्यानें लोकांना आपले पैसे जमिनींत न पुरतां किंवा दागदागिन्यांत न खर्च करतां पेढ्यांजवळ व्याजीं लावतां येतात व त्यांनाही त्या पैशाच्या जोरावर देशांतील उद्योगधंद्यांना पैशाची मदत करतां येते.

पण पेढ्या ही आर्थिक मदत करीत असतांना सर्वस्वीं लोकांनीं सांठवून आणून दिलेल्या पैशावरच अवलंबून रहात नाहींत तर त्या स्वतः नवीन ठेवी निर्माण करून व आपण स्थापित केलेल्या पतीवर नवीन नोटा काढून व्यापारी लोकांस पैशाचें साहाय्य करीत असतात.अशा दृष्टीनें विचार केला म्हणजे व्यापार-वृद्धि करतां स्थापन झालेल्या पेढ्यांची आवश्यकता समाजाला किती आहे हें वाचकांस स्पष्टपणें दिसून येईल. ह्या व्यापारी पेढ्यांचें मुख्य काम म्हणजे उद्योग-धंद्याची वाढ अविच्छिन्नपणें सुरू ठेवणें हें असतें. एखादा कापडासारखा माल तयार होत असतांना तो कांहीं लागलींच विकला जाऊन उत्पन्न करणाऱ्याचे हातांत त्याचे पैसे पडत नाहींत. कोठलाही माल विक्रीच्या अवस्थेला जाऊन पोंचण्यापूर्वी अगोदरच्या अनेक अवस्थांतून त्याला जावें लागतें, व प्रत्येक वेळीं एका अवस्थेंतून दुसऱ्या अवस्थेंत जात असतांना पैशाची जरूर लागत असते. आणि ह्या व्यापारी पेढ्यांचा समाजाला जो कांहीं उपयोग होतो तो हाच कीं, माल पूर्णपणें तयार होऊन तो विकला जाऊन त्याचे पैसे तो माल उत्पन्न कर-णाऱ्या कारखानदाराच्या हातांत पडण्याच्या अगोदरच वेळीं अवेळीं लागतील तेव्हां त्या पेढ्या पैसे पुरवीत असतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यापाऱ्यानें तयार केलेला माल मागणी करणाऱ्या गिऱ्हाईकाकडे पाठवून दिल्यावर तो त्या माणसा-वर व्यापारी हुंडी काढीत असतो व ह्या व्यापारी पेढ्या त्या विकत घेऊन त्या

व्यापाऱ्यास अगोदरच पैसे देतात व आपण सावकाश त्या हुंडीचे पैसे त्या गिऱ्हाईकाकडून वसूल करीत असतात.

असो; एकंदरींत पाहतां ह्या व्यापारी पेढ्यांचा उद्योगधंद्याच्या बावतींत समाजाला फारच फायदा असतो. ह्या पेढ्यांचें एक धोरण असें असतें कीं, जे व्यापारी लोक आपले पैसे उत्पादक धंद्यांत घालून राष्ट्राच्या संपत्तींत भर घालतील त्यांनांच आपला पैसा कर्जानें द्यावयाचा. अर्थात् ही भर तो कशी घालतो व तशी भर घालून व स्वतःही अधिक श्रीमंत बनून तो समाजाचें सर्व तऱ्हेनें कल्याणच करतो किंवा काय ह्या गोष्टींचा विचार करण्याचें पेढ्यांचें काम नव्हे; पण एवढी गोष्ट खरी कीं, ज्या माणसाच्या अंगांत व्यापारी कसब आहे तो केवळ द्रव्याभावीं मागें पडून राहील हें देशांत व्यापारी पेढ्या हयात असतांना हल्लींच्या काळीं शक्य नाहीं.

प्रकरण २ रें

पेढ्यांचीं कर्तव्यें

(अ) बँक नोटा

पैशाची अदलाबदल करणें, पैसा कर्जाऊ देणें, पैसा कर्ज म्हणून घेणें व पैसा पाठवून देणें हीं मुख्य कामें पेढ्यांना करावीं लागतात.—**गिलबर्ट.**

पेढ्या व लोकांच्या ठेवी:—पेढ्यांचा जन्म हल्लीं व्यापार वृद्धीकरितां झालेला आहे. हल्लीं पाश्चिमात्य देशांत लोकांस लागणारें व्यापारी भांडवल ह्या पेढ्याच पुरवीत असतात. ह्या पेढ्यांना अनेक तऱ्हेचीं कामें करावयाचीं असतात. त्यांपैकीं मुख्य कामें दोन प्रकारचीं आहेत. पहिला प्रकार म्हटला म्हणजे लोकांनीं सांठविलेले पैसे गोळा करणें व ते कोठें तरी सुरक्षितपणें व्यापा-

यांत घालण्याची व्यवस्था करणें हा होय. दुसरा प्रकार म्हटला म्हणजे बँक नोटा काढून लोकांमध्यें त्यांचा प्रसार करणें व चलन वाढविणें हा होय. हीं दोन्हीं कामें जरी पेढीसारखी एकच संस्था करीत असली तरी वस्तुतः तीं अगदीं स्वतंत्र आहेत. जी बँक लोकांच्या सांठविलेल्या रकमा स्वीकारीत असते तीच बँक फक्त त्या रकमा व्यापारांत कशा गुंतवावयाच्या ह्याबद्दल विचार करील; पण तिला नोटांचा प्रसार करून अगोदरच असलेल्या चलनी नोटांत भर घालण्याचें काम करावयाचें नसतें. हीच स्थिति जर्मनी, आस्ट्रिया-हंगेरीसारख्या देशांत असलेल्या पेढ्यांमध्यें दिसून येते. ह्या पेढीचें काम लोकांच्या ठेवी स्वीकारणें व त्या परत करण्याचें वचन देणें हें असतें. हें वचन कांहीं अटींवर दिलेलें असतें. उदाहरणार्थ, ठेवी ठेवणाऱ्या मनुष्यानें कांहीं दिवसांची अगाऊ सूचना देऊन मग ती ठेव परत मागितल्यास आपण ती परत करूं अशा अटीवर पेढी वचन देत असते. सामान्यतः मनुष्य पेढीजवळ ठेव ठेवीत असतांना त्याची अशी कल्पना असते कीं, ती ठेव तिच्याजवळ ठेवून त्या ठेवीचा तावा कांहीं दिवस सोडल्याबद्दल आपणांस कांहीं व्याज ह्या पेढीकडून मिळेल. ह्याचा न कळत असा परिणाम होतो कीं, देशांमध्यें भांडवल उत्पन्न होत असतें. पेढ्या लोकांच्या ठेवी, जे लोक धंदे उभारतील, वखारी स्थापन करतील किंवा मोठमोठीं घरें बांधतील, अशा लोकांनाच देत असतात. एकदां ह्या ठेवी उद्योगधंद्यांत पडणाऱ्या लोकांच्या हातीं गेल्या म्हणजे त्यांचा आपोआप प्रचार होऊन देशांत असलेल्या मूळच्या भांडवलांत भर पडत असते. पुष्कळ वेळां ह्या पेढ्या लोकांचे तारणरोखे विकत घेण्यांत आपल्याजवळ असलेल्या ठेवींचा उपयोग करीत असतात, व पैसे वांचविणारे व भांडवल उत्पन्न करणारे ह्यांचा संबंध अप्रत्यक्ष रीतीनें घडवून आणतात. पेढ्या करीत असलेलें हें काम पोष्टामधील सेव्हिंग्ज बँकाही करीत असतात. फरक इतकाच कीं, ह्या बँकांत ठेवलेल्या लोकांच्या रकमेचा विनियोग इतर सामान्य लोकांचे तारणरोखे खरेदी करण्यांत न होतां सरकारी तारणरोखे घेण्यांत होतो. पण ह्यामुळें देशांत अगोदरच असलेल्या भांडवलांत खरोखर किती भर पडते हें सांगणें कठिणच आहे.

पेढ्या व औद्योगिक उत्कर्ष.—बहुतेक पेढ्यांचें काम—मग त्या सार्वजनिक असोत किंवा खाजगी असोत—अशा तऱ्हेचें असतें. ह्या पेढ्या म्हणजे

श्रीमंत लोकांचे तारणरोखे खरेदी करण्याचे बाबतींत मध्यस्थच होत. मध्यवर्ती युरोपमध्यें असलेल्या जर्मनी, फ्रान्स, आस्ट्रियासारख्या देशांत ज्या पेढ्या आहेत त्या पेढ्या पद्धतशीर रीतीनें मोठमोठ्या प्रमाणांत व्यापारांत पैसा गुंतविण्याचा व्यवहार करीत असतात. लोकांच्या लहान मोठ्या ठेवी स्वीकारून व्यापारांत पैसे गुंतविणाऱ्या माणसाला प्रत्यक्ष तारणरोखे विकणें किंवा त्याला ठराविक व्याजानें रकमा कर्जाऊ देणें हें काम ह्या पेढ्या करीत असतात. ह्याचा असा परिणाम होतो कीं, नवीन नवीन धंद्यांना उत्तेजन मिळून ज्या लोकांचें अंगांत व्यापारी धाडस असतें त्यांना आपली करामत दाखवितां येते व एकंदरींत देशाचा अपरिमित फायदा होतो. प्रथम प्रथम होतकरू धाडशी व्यापाऱ्यांना ह्या पेढ्या स्वतःचा पैसा पुरवितात व एकदां ह्या व्यापाऱ्यांचा जम बसला व व्यवस्थित रीतीनें व निश्चितपणें नफ्याचें प्रमाण ठरलें गेलें म्हणजे ह्या धाडशी उद्योगधंद्याच्याच पतीवर काढलेले तारणरोखे ह्या पेढ्या धंद्यांत पैसे घालूं इच्छिणाऱ्या श्रीमंत लोकांना विकतात. अशा रीतीनें ह्या पेढ्या व त्यांचीं गिऱ्हाइकें व हितचिंतक ह्यांच्यामध्यें परस्पर विश्वास व स्नेह वाढत जातो.

पण आपण ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ह्या पेढ्यांना प्रत्यक्ष पैशासंबंधानें असलेल्या प्रश्नांचा फारसा विचार करावयाचा नसतो. ज्या पेढ्या व्यापारी असतात व ज्या प्रत्यक्ष व्यापारांत पडलेल्या लोकांना थोड्या मुदतीनें कर्जाऊ रकमा देतात त्याच पेढ्यांचा संबंध ह्या द्रव्यविषयक प्रश्नांशीं येतो. ह्या पेढ्यांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे लोकांच्या अनामत ठेवी स्वीकारणें व ते लोक मागतील तेव्हां त्यांच्या ठेवी त्यांना परत करण्याचें वचन देणें व त्याचप्रमाणें आपण काढिलेल्या नोटांचा प्रचार करणें हें होय. ह्या नोटा काढिल्या म्हणजे देशांत असलेल्या वस्तुविनिमयसाधनावर त्याचा मोठा परिणाम होत असतो. तेव्हां ह्या नोटा कशा स्वरूपाच्या असतात तें आतां आपण पाहूं.

बँक नोटीची व्याख्याः—प्रथमतः आपण ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, नोटा प्रचलित करणें हें कांहीं पेढीचें मुख्य काम नव्हे. लोकांनीं तिच्याकडे आपल्या ठेवी आणून ठेवल्यावर त्या कांहीं काळानें त्यांनीं मागितल्या असतांना ती पेढी प्रत्यक्ष ठेवीच न देतां नोटा देऊन त्यांचें काम भागविते व त्या लोकांचाहि तिच्यावर विश्वास असल्यामुळें ते ह्या नोटा स्वीकारतात.

आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, लोकांच्या ठेवी स्वीकारणें व नोटा प्रचलित करणें त्यांपैकीं पेढ्या कोणचें काम अगोदर सुरू करतात? फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड येथील पेढ्यांचा इतिहास पाहिला तर आपणांस असें आढळून येईल कीं, पेढी प्रथम नोटा सुरू करते व नंतर लोक तिच्याजवळ ठेवी ठेवतात. ह्याचें कारण असें आहे कीं नोटा सुरू करणें हें पेढीला प्रथम सुलभ असतें. लोकांनीं कर्ज मागितलें असतांना त्यांना आपल्या नोटांत पेढीला तें देतां येतें आणि लोकांचा विश्वास एकदां पेढीवर बसूं लागला म्हणजे मग ते आपल्या ठेवी तिच्याजवळ आणून देतात; म्हणून आपण प्रथम बँक नोटेचा विचार करूं.

* बँक नोटांबद्दलची चर्चा आम्ही तात्विक दृष्ट्याच ह्या भागांत करणार आहोंत. वाचकांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, हिंदुस्थानांत कोठल्याही पेढीला हल्लीं नोटा प्रचलित करण्याचा हक्क नाहीं.

बँक नोट म्हणजे ती नोट आणून देणाऱ्या माणसानें मागणी केली असतां त्या नोटीवर लिहिलेली रक्कम बँकेनें परत देण्याचें वचनपत्र होय. ती नोट एका गृहस्थानें जर दुसऱ्यास दिली व दुसऱ्यानें तिसऱ्यास दिली तर पहिल्या माणसाला ती नोट जवळ असल्यानें जे कांहीं हक्क किंवा फायदे मिळावयाचे तेच हक्क किंवा फायदे दुसऱ्याला व तिसऱ्यालाहि मिळत असतात. म्हणजे तो मनुष्य त्या नोटीचा सर्वस्वीं मालक बनतो. नोटा प्रचारांत आणणारी पेढी जर लोकांच्या विश्वासास पात्र असली तर ह्या नोटा इतर धातूंच्या नाण्यांप्रमाणेंच किंवा कागदी नोटांप्रमाणेंच लोक बिनदिक्कत वापरीत असतात. कारण सरकारनें सुरू केलेलें नाणें—मग तें हिंदुस्थानांतील रुपयाप्रमाणें कृत्रिम का असेना—लोक स्वीकारतात, ह्याचें कारण हेंच असतें कीं, लोकांचा सरकारावर पूर्ण विश्वास असतो. हाच विश्वास जर एखाद्या सचोटीनें व्यवहार करणाऱ्या पेढीनें संपादन केला तर त्या पेढीनें काढिलेल्या नोटा वापरण्यास लोकांची कांहीं हरकत नसते. इतकेंच नव्हे तर कांहीं बाबतींत सरकारच्या चलनी नोटांपेक्षां पेढ्यांनीं काढिलेल्या नोटा जास्त चांगल्या असतात. उदाहरणार्थ, बँक नोट जर पुनः बँकेंत परत आली तर तत्वतः तरी त्या बँकेला नोटीबद्दल रुपये देणें भाग आहे; पण सरकारनें काढिलेल्या नोटांबद्दल रुपये देण्यास सरकार बांधलेलें नाहीं. तसेंच पेढ्यांना नोटांबद्दल रुपये देण्याची जबाबदारी अंगावर असल्यामुळें व्यापारी गरजापुरत्याच

नोटा पेढ्या काढींत असतात; पण सरकार सत्ताधीश असल्यामुळें आपण काढिलेल्या नोटा, त्यांबद्दल नाणें देण्याची जबाबदारी जर त्या सरकारवर नसेल तर, लोकांवर लादूं शकतें व ह्या नोटा काढण्यास फारसा खर्च येत नसल्यामुळें त्या नोटा किती काढाव्या लागतील ह्याचा सुमार सरकारास नसतो. तेव्हां एखादी नोट एखाद्या खासगी पेढीनें काढिली म्हणून तिचा लोक अनादर करतील हें संभवत नाहीं. जर ती नोट सुरूं करणाऱ्या पेढीवर लोकांचा पूर्ण विश्वास असेल तर त्या नोटीचा सरकारनें काढिलेल्या नाण्याप्रमाणें लोकांमध्यें सहज प्रचार होईल.

बँक नोट व तिची नाण्यांत परिवर्तन होण्याची क्षमता— पण पेढ्यांनीं सुरू केलेल्या नोटा लोकांनीं बिनबोभाट स्वीकाराव्या असें जर त्यांस वाटत असेल तर त्यांनीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे; ती ही कीं, जी नोट लोक परत आणून देतील तिजबद्दल त्यांना रोख नाणें देण्याची व्यवस्था त्या पेढ्यांनीं केली पाहिजे. प्रत्येक पेढीनें आपण ज्या नोटा लोकांत प्रचलित करतों त्यांबद्दल कांहीं सोनें बाजूला काढून ठेवलें पाहिजे. जितक्या किंमतीच्या नोटा काढिल्या असतील तितक्याच किंमतीचें सोनें जर बाजूला काढून ठेविलें असेल तर अशा नोटा प्रचलित केल्यापासून पेढयांस अर्थातच कांहीं फायदा होणार नाहीं; पण तितक्याच किंमतीचें सोनें काढून न ठेवतां जर थोडें सोनेंच काढून ठेवलें असेल तर साहजिकच पेढ्यांना फायदा होण्याचा संभव आहे. म्हणून प्रत्येक पेढी जास्तींत जास्त नोटा प्रचलित करून त्या नोटांबद्दल कमींत कमी सोनें अलग काढून ठेवण्याचा प्रयत्न करीत असते.

बँकनोट व सरकारी नियंत्रणः—आतां असा प्रश्न येथें उद्भवतो कीं, समाजांत पेढया जेव्हां नोटा प्रचलित करीत असतात तेव्हां पेढ्यांवर सरकारचा अधिकार असावा किंवा नाहीं. नोटा किती काढावयाच्या व त्यांबद्दल किती सोनें बाजूला काढून ठेवावयाचें ह्या बाबतींत सरकारनें पेढ्यांना कांहीं नियम घालून द्यावेत, का पेढयांनीं ह्या बाबतींत ' मनःपूतं समाचरेत् ' असें आपलें वर्तन ठेवावें ? एकंदरींत सर्व गोष्टींचा विचार करितां आम्हांस असें वाटतें कीं, पेढ्यांना कांहीं सरकारीबंधन लोकहिताच्या दृष्टीनें असणें सर्वथैव इष्ट आहे. ह्या नोटा जर लोक नाणीं म्हणून स्वीकारणार तर त्या नोटांचा फाजील प्रमाणांत प्रचार होऊन

त्याची किंमत उतरूं नये व त्या नोटा परत केल्या असतां त्याबद्दल रोख नाणें मिळेल अशी लोकांची खात्री पटावी, एतदर्थ पेढयांना नोटांबद्दल कांहीं प्रमाणांत सोनें बाजूला काढून ठेवण्याची व ठराविक रकमेपर्यंतच नोटा प्रचलित करण्याची सक्ती सरकाराकडून झाली पाहिजे. आतां जितक्या नोटा लोक परत आणून देतील तितक्या नोटांबद्दल आम्ही रोख नाणें देण्याची हमी घेतों असें पेढयांनीं कबूल केल्यावर नोटा व सोनें ह्यांमध्यें काय प्रमाण असावें हें पेढयांवर सोंपविलें तरी चालेल; पण कांहीं तरी नियम हे पाहिजेत. प्रत्येक देशाचा आजपर्यंतचा असा अनुभव आहे कीं, असे नियम जर सरकारानें पेढयांना घालून न दिले तर त्या पेढयांना फाजील प्रमाणांत नोटा प्रचलित करून लोकांना फसवून स्वतःचा तळीराम गार करण्याचा मोह आवरत नाहीं.

सरकारी नियंत्रणाबद्दल दोन पक्षः—सरकारचा ताबा पेढ्यांवर नोटा प्रचलित करण्याचे बाबतींत असावा किंवा नाहीं ह्या मुद्यावर आजपर्यंत बरीच भवति न भवति झालेली आहे, व अजूनसुद्धां हा वाद संपला आहे असें म्हणतां येत नाहीं. एका पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, नोटा सुरू करण्याचे बाबतींत पेढयांना सरकारी नियंत्रण असण्याची बिलकूल आवश्यकता नाहीं; कारण ह्या नोटांचा अतिरेक होईल ही भीति निराधार आहे. कशी ती पहा. पेढया ज्या नोटा काढीत असतात त्या लोकांना हव्या असतात म्हणूनच त्या काढीत असतात. जितक्या हुंडया व्यापारी लोक रोख रकम घेण्याकरितां पेढया-कडे घेऊन येतील तितक्याच किंमतीच्या नोटा ह्या पेढया त्या लोकांना देणार व व्यापारी लोक किती हुंडया घेऊन येणार हें सर्वस्वीं व्यापारावर अवलंबून राहील. तेव्हां नोटांचा प्रचार करणें ही गोष्ट पेढयांच्या खुषीवर अवलंबून नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, पेढयांनीं काढिलेल्या नोटांचें आयुर्मान थोडें असतें. एखाद्या पेढीनें जर एखादी नोट प्रचलित केली तर ती नोट फार तर तीन महिनेपर्यंत लोकांत वावरूं शकते. आपण घटकाभर असेंही समजूं कीं, पेढया वाजवीपेक्षां जास्त नोटा लोकांत सुरू करतील; पण आपण असें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, ह्या सुरूं केलेल्या नोटा लोकांत तशाच प्रचारांत ठेवण्याचें सामर्थ्य ह्या पेढयांना नसतें. कारण नोटांचा सुळसुळाट थोडासा होऊं लागला कीं, ताबडतोब त्यांची किंमत उतरून लोक त्या नोटा पेढयांकडे परत आणून देतील व त्या नोटांबद्दल रोख रुपये मागूं लागतील. तेव्हां नोटा फाजील प्रमाणांत सुरू करण्यानें आपण

आपलें मरण जवळ आणीत आहोंत ही जाणीव पेढयांना असल्यानें त्या प्रथम-पासूनच सावध रहातील हें उघड आहे. तेव्हां प्रत्येक पेढीनें आपण सुरू केलेल्या नोटा लोकांनीं परत आणून दिल्यावर त्यांस रोख नाणें दिलेंच पाहिजे व शहाजोग हुंडी असेल तरच ती स्वीकारून तिच्याबद्दल नोट द्यावी असा नियम केला म्हणजे निराळें सरकारी नियंत्रण असण्याची जरूरी नाहीं.

दुसऱ्या पक्षाचें असें मत आहे कीं, ज्याअर्थी प्रचारांत असलेल्या सोन्या-चांदीवर अवलंबून न रहातां नोटा कमीजास्त प्रचारांत राहूं शकतात व पेढयांना देशांत असलेल्या धातूंच्या नाण्याहून जास्त किंमतीच्या नोटा प्रचलित करतां येतात व त्यामुळें किंमत उतरलेल्या नोटांची जिनसा विकत घेण्याची शक्ती व धातूच्या नाण्याची वस्तू विकत घेण्याची शक्ती ह्यांत फरक पडावयास लागून व्यापारधंद्याला अनिश्चितपणा येऊं लागतो त्याअर्थी जितक्या नोटा प्रचलित करावयाच्या तितक्याच किंमतीच्या सोन्याचांदीचीं नाणीं किंवा लगडी जवळ ठेवल्या-शिवाय पेढयांनीं नोटा लोकांत प्रचलित करूं नयेत. पेढयांना नोटा काढण्याचे बाबतींत पूर्ण मुभा दिली तर व्यापारी आणीबाणीचे वेळीं तरी निदान अनर्थ ओढवल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच लोकांना लागतील तेवढयाच नोटा पेढ्या प्रचलित करतात हें म्हणणें तत्वतः खरें असलें तरी व्यवहारांत एखाद्या लफंग्या पेढीनें आपला कटमित्तीचा दर कमी करून इतर सचोटीच्या पेढयांशीं चढाओढ करून जर जास्त प्रमाणांत नोटा काढण्याचें मनांत आणिलें तर तें अगदींच अशक्य आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. तसेंच नोटा फाजील प्रमाणांत काढल्या तर त्याची किंमत उतरून त्या आपल्याकडे भराभर येतील व आपणांस सर्व नोटा घेऊन येणाऱ्या लोकांना रोख रुपये न देतां आल्यामुळें आपलें दिवाळें निघेल ह्या भितीनें पेढया नोटा फाजील प्रमाणांत काढणार नाहींत ह्या म्हणण्यांतही कांहीं राम नाहीं; कारण एक तर नोटा जास्त झाल्याबरोबर त्याची किंमत ताबडतोब उतरतें असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. नोटा फाजील काढिल्यानें पेढया रसातळास जातील हें खरें आहे; पण त्यामुळें लोकांचें नुकसान होईल त्याची वाट काय! भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें "ते के न जानीमहे" ह्या कोटीतल्या, आपलें नुकसान झालें तरी पुरवलें पण लोकांना आपणाबरोबर बुडवावयाचें. अशा प्रवृत्तीच्या, पेढयांना तुम्ही काय शिक्षा करणार? तेव्हां पेढयांना सरकारी नियंत्रण असणें सर्वथैव इष्ट आहे.

सरकारी नियंत्रणाचे चार प्रकार (१) नोटा काढण्याची कमालीची मर्यादा ठरविणें:— हें तत्त्व मान्य केल्यावर हें नियंत्रण कसें असावें असा साहजिकच प्रश्न उभा राहतो. पाश्चिमात्य देशांत हें नियंत्रण चार प्रकारचें असतें.

पहिला प्रकार म्हणजे ठराविक मर्यादेपर्यंत पेढयांना नोटा काढावयास परवानगी देणें. व्यापारी वर्गाला नेहमीं पैशाची जरूर भासत असते. ही पैशाची रकम कोणत्याही चलनाच्या रूपानें असो, तिचें महत्व सोन्याइतकेंच असणार व तिची किंमत बाजारांत कधींही उतरणार नाहीं. कारण ही पैशाची रकम लोकांना हवी असते. ही रकम जरी चलनी नोटांचे रूपानें असली तरी लोक ती आनंदानें स्वीकारतील व ह्या नोटांबद्दल ते सोन्याची मागणी फारशा प्रमाणांत करणार नाहींत. ह्या धोरणावर ही नोटांची रकम ठरविली असते व इतक्या रकमेपर्यंत नोटा काढण्यास सरकार पेढ्यांस परवानगी देते. ही पद्धत **फ्रान्स**मध्यें असलेल्या बँक आफ् **फ्रान्स** ह्या पेढीमध्यें दिसून येते. ह्या प्रकारांत असा दोष आहे कीं, व्यापारी वर्गाला नेहमीं लागणाऱ्या पैशाचा ह्या पद्धतीमुळें पुरवठा होत नाहीं.

(२) किमान नगद अलग काढून ठेवण्याचा प्रकार:— दुसरा प्रकार म्हणजे नोटा किती किंमतीपर्यंत पेढ्यांनीं काढाव्या हें कायद्यानें न ठरवितां त्यांनीं काढलेल्या नोटांबद्दल ठराविक नाणें नगदी रोकड म्हणून काढून ठेवावे. किंवा जितक्या नोटा त्यांनीं प्रचलित केल्या असतील तितक्याच किंमतीचे किंवा त्या नोटांच्या किंमतीच्या कांहीं प्रमाणांत नाणें काढून ठेवावें, असा कायद्यानें नियम करणें हा होय. तसेंच रोख नाण्याच्याऐवजीं तितक्याच किंमतीचे तारण रोखे, शेअर वगैरे जरी पेढ्यांनीं ठेवले तरी कायद्याची हरकत नसते; पण हा प्रकार कसा सदोष आहे हें आपण पाहूं. ह्यांतील मुख्य मुद्दा म्हणजे नोटा कितीही किंमतीच्या प्रचारांत असोत, किमान म्हणून कांहीं ठराविक रकमेचें नाणें नेहमीं बाजूला काढून ठेवणें, हा होय. हें नाणें काढून ठेवण्याचा हेतु लोकांनीं नोटा परत आणून देऊन नाण्याची मागणी केली असतां तें नाणें देण्याची पेढ्यांस अडचण पडूं नये व लोकांस अडचणीच्या वेळीं नोटाबद्दल नाणीं मिळून त्यांची सोय व्हावी हा होय. ह्या व्यवस्थेनें पेढीच्या व्यवहाराला अडथळा होत असतो व कधीं कधीं पेढ्यांना नाणें देण्याचीसुद्धां पंचाईत पडते. तुम्ही अमूक एक रकमेपर्यंत नाणें

कायमची शिल्लक म्हणून बाजूला काढून ठेवा, असें पेढ्यांना सांगणें म्हणजे अमुक एक शिलकेच्या मर्यादेपर्यंत तुम्ही नोटा आणणाऱ्या लोकांस नाणें देण्याची हमी घ्या व ती मर्यादा एकदा ओलांडली गेली म्हणजे तुम्ही त्यांस नोटांबद्दल नाणीं देण्यास तयार होऊं नका असें त्या पेढ्यांस सांगण्यासारखेंच आहे. आतां कोणी असें म्हणेल कीं, पेढ्यांनीं ठेवण्याची किमान् नगदी रोकडसुद्धां इतकी असावी कीं, लोकांच्या सर्व मागण्या त्या रोकडीचा जोरावर त्यांना पुरवितां याव्या; पण आमचा मुख्य कटाक्ष पेढ्यांनीं ठराविक किंमतीची नगदी रोकड ठेवण्यांवरच आहे. एकदां ही ठरलेली मर्यादा येऊन पोचल्यावर लोकांनीं नोटांबद्दल मागणी केली असतांना त्यांचे पैसे देण्याची जबाबदारी पेढ्यांवर रहात नाहीं, हा ह्या प्रकारांत दोष आहे. ज्या वेळीं कांहीं कारणानें पैशाची मागणी वाढून पेढीच्या शिलकेंवर ताण पडूं लागतो व त्यामुळें कायद्यानें ठरविलेल्या रकमेइतकीच शिल्लक तिजजवळ आहे असें लोकांस समजतें, त्या वेळीं ज्याला त्याला अशी भिती वाटूं लागते कीं, आपण जर नोटा घेऊन नाणी मागण्यास विलंब केला तर आपल्या-अगोदर जे नोटा घेऊन गेले असतील त्यांस नाणीं मिळून कायद्यानें ठरविलेली शिलकेची मर्यादा होऊन गेल्यामुळें आपणांस पैसे मिळणार नाहींत. ह्या काल्पनिक भीतीचा असा परिणाम होईल कीं, सर्वच पेढीचे गिऱ्हाईक एकदम पेढीवर जोराची पैशाची मागणी करून विनाकारण त्या पेढीचें दिवाळें वाजवितील.

ह्या प्रकारात दुसरा असा दोष आहे कीं, एकदां जितक्या किंमतीच्या नोटा काढाव याच्या तितक्यांच किंमतीचें नाणें काढून ठेवावयाचें असा नियम केला म्हणजे प्रत्येक नोट ही ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेची पावती होऊन बसते; पण पेढ्या ज्या नोटा काढीत असतात, त्या काढतांना त्यांचा एवढाच कांहीं उद्देश नसतो. देशांत कोणाचेंही नुकसान न होतां मूळ असलेल्या संपत्तींत भर पडावी असाही ह्या पेढ्यांचा हेतु असतो. तो हेतु ह्या पद्धतींत साध्य होणें शक्य नाहीं. शिवाय पेढ्यांजवळ त्यांनीं काढिलेल्या नोटांच्या किंमतीइतकी रोख शिल्लक आहे असें एखाद्या जुलमी सरकारला समजलें म्हणजे त्या शिलकेवर नजर ठेवून ती लांबविण्याचा मोह त्या सरकारास आवरत नाहीं असें इतिहास आपणांस सांगत आहे. तेव्हां हा प्रकारही शास्त्रशुद्ध नाहीं. ह्या प्रकाराचा असाही एक विशेष आहे कीं, जितक्या किंमतीच्या नोटा, पेढ्यांनीं काढल्या असतील तितक्याच किंमतीचें नाणें न काढून ठेवतां कांहीं ठराविक प्रमाणांत हें नाणें पेढ्यांनीं अलग काढून ठेवावें. पण ही पद्धतीही सदोषच

आहे. आपण अशी कल्पना करूं कीं, लंडनमधल्या एका पेढीच्या ६ लाख पौंडांच्या किंमतीच्या नोटा प्रचारांत आहेत व कायद्याप्रमाणें पेढीजवळ २ लाख पौंड अलग काढून ठेवलेले आहेत; म्हणजे नोटा व शिलकीची रक्कम ह्यांत ३:१ हें प्रमाण आहे. आतां आपण असें समजूं कीं, पेढीनें १½ लाख पौंड किंमतीच्या नोटा लोकांपासून घेऊन त्यांना तितकेच पौंड पटवून दिले. अर्थात् पेढीजवळ आतां ५०,००० पौंडच शिल्लक आहेत व नोटा पाहिल्या तर त्या ४½ लाख पौंड किंमतीच्या असून प्रचारांत आहेत, म्हणजे ३:१ हें प्रमाण आतां नाहींसें झालें व जर एखादा गृहस्थ आपल्या नोटा घेऊन पेढीकडे गेला तर त्याला आतां नोटांबद्दल पौंड मिळणें कायद्याप्रमाणेंच शक्य नाहीं. तेव्हां ठराविक प्रमाणांत रोख रक्कम ठेवूनही लोकांस पौंड मिळण्याची खात्री राहणार नाहीं.

अर्धवट अनामत ठेवीची पद्धत व बँक ऑफ इंग्लंड व जर्मनीमधील इम्पेरिअल बँक ह्यांमध्यें असलेल्या पद्धतींची तुलना:- आतांपर्यंत आपण दुसऱ्या प्रकाराची चर्चा केली. आतां इंग्लंडमध्यें असलेल्या बँक ऑफ इंग्लंडमध्यें जी नोटा प्रचलित करण्याची पद्धत आहे तिचा विचार करून तिसऱ्या प्रकाराकडे आपण वळूं. ही पद्धत म्हणजे अर्धवट अनामत ठेवीची पद्धत होय. ह्या पद्धतीप्रमाणें नोटांचा कांहीं भाग, स्टॉक, बॉंड व ह्यांसारखे इतर रोखे ह्यांच्या आधारावर काढिलेला असतो व बाकीच्या नोटांबद्दल तितक्याच किंमतीचें नाणें बाजूला काढून मग त्या प्रचारांत आणलेल्या असतात. बँक ऑफ् इंग्लंडला सरकारी तारण रोख्यांवर १ कोटि ८४ लक्ष पौंड किंमतीच्या नोटा काढण्याचा अधिकार १९०३ सालीं मिळालेला होता. बाकीच्या जितक्या किंमतीच्या नोटा ही बँक काढील तितक्याच किंमतीचें नाणें किंवा सोनें व चांदी ती अलग काढून ठेवते. ह्या पद्धतीचा फायदा असा आहे कीं, ठराविक रकमेनंतर जितक्या नोटा काढिल्या जातात तितक्याच किंमतीचें नाणें जवळ असल्यानें पेढीला आपलें दिवाळें निघण्याचें भय रहात नाहीं; पण ह्या पद्धतीचा दोष असा आहे कीं, पेढ्यांनीं काढावयाच्या नोटांत व्यापारी गरजाप्रमाणें कमीजास्त होण्याचा जो गुण असावयाचा तो ह्या पद्धतीमुळें राहूं शकत नाहीं. शिवाय आपण असें पहातों कीं, आणीबाणीच्या वेळीं बँक ऑफ इंग्लंडला कायदा धाब्यावर बसवून ठराविक रकमेपेक्षां जास्त किंमतीच्या नोटा काढाव्या लागल्या आहेत; पण मजा ही कीं, अशा जास्त नोटा काढतांना बँकेला सरकारची परवानगी घ्यावी लागली आहे. व

जी गोष्ट बँकेला स्वतः सहज गाजावजा न करतां करितां आली असती तीच गोष्ट तिला लोकांना घाबरवून सरकारच्या परवानगीनें करावी लागत आहे.

ह्यापेक्षां जर्मनीमध्यें असलेली पद्धत अधिक चांगली दिसते. ही पद्धतसुद्धां जर्मनीनें इंग्लंडपासूनच उचललेली आहे; पण त्यांत थोडी सुधारणा केलेली आहे. ह्या पद्धतीनें प्रचारांत असलेल्या नोटा व सोनें व त्यांचीं नाणीं त्यांत एक प्रमाण ठरलेलें आहे व तें प्रमाण ३:१ असें आहे. जर्मनीमध्यें जी इंपेरियल बँक आहे तिला व पूर्वी ज्या पेढया नोटा काढीत असत त्यांनाच फक्त नोटा काढण्याचा हक्क दिलेला आहे. एकंदर नोटा किती काढाव्या ह्याची मर्यादा ठरलेली नाहीं; पण ३८ कोटि ५० लाख मार्क (एक मार्क म्हणजे जवळ जवळ $\frac{1}{20}$ पौंड) पर्यंत किंमतीच्या नोटा प्रत्यक्ष जर्मन नाणें, सोनें किंवा तिजोरीवर काढलेल्या नोटा वगैरे अलग काढून न ठेवतां प्रचारांत आणण्याची परवानगी सरकारनें पेढयांना दिलेली आहे; पण ह्या रकमेहून जास्त किंमतीच्या नोटा जर ह्या पेढयांना काढावयाच्या असतील व त्याबद्दल नाणें वगैरे काढून ठेवाव्याचें नसेल तर त्या पेढयांनीं सरकारास दरसाल दर शेंकडा ५ टक्के व्याज दिलें पाहिजे. हा कायदा पास करण्यांत सरकारचा असा हेतु होता कीं, एका अनुभवसिद्ध ठराविक मर्यादेनंतर नाणें वगैरे अलग काढून न ठेवतां आपण जर जास्त नोटा काढून प्रचलित केल्या तर आपणांस कर द्यावा लागेल ह्या भीतीनें पेढयांनीं जास्त नोटा काढूंच नयेत; पण लोकांना किंवा पेढयांना नोटांची खरोखरच जर जरूर असली तर त्यांना हा कर देऊन त्या काढण्याची सवलत कायद्यानें दिली आहे. अशा दृष्टीनें विचार केला असतांना इंग्लंडमध्यें असलेल्या पद्धतीपेक्षां जर्मनपद्धत जास्त लवचिक आहे. ह्या सरकारी सवलतीचा पेढयांना असा फायदा होतो कीं, गाजावजा न करितां व सरकारी कायद्याची मदत न घेतां पेढयांना नोटा जास्त प्रमाणांत व्यापारी सोयीकरतां काढतां येतात.

(३) नोटा प्रचलित करतांना सरकारी बॉंड खरेदी करणें:—आतां आपण तिसऱ्या प्रकाराचा विचार करू. हा प्रकार अमेरिकेंतल्या पेढयांमध्यें दिसून येतो. अमेरिकेंत अशी चाल आहे कीं, प्रत्येक पेढीनें अमेरिकन सरकारनें काढिलेल्या बॉंडांची खरेदी करून ते बॉंड वाशिंग्टन येथें खजिनदाराजवळ ठेविले पाहिजेत. हे बॉंड सरकारजवळ ठेवल्याबद्दल पेढयांना त्या बॉंडांच्या किंमतीइतक्याच नोटा परत मिळत असतात व त्याच नोटा अमेरिकेंत पेढयांना

प्रचलित करण्याचा अधिकार आहे. ह्याशिवाय पेढ्यांना इतरही निर्बंध आहेत. उदाहरणार्थ, पेढ्यांना आपल्या भांडवलाच्या रकमेपेक्षां जास्त किंमतीच्या नोटा काढतां येत नाहींत; पण हे निर्बंध येथें सांगण्याचें फारसें कारण नाहीं.

ह्या प्रकारांतही बरेच दोष आहेत. पहिला दोष असा कीं, पेढ्यांनीं सरकारी बाँड घेतले म्हणजे नोटा घेऊन येणाऱ्या लोकांना त्यांना रोख नाणें तावडतोब देतां येईलच असें खात्रीनें म्हणतां येत नाहीं. ह्या नोटांना सरकारी बाँडांचें तारण असल्यामुळें जोंपर्यंत सरकारनें काखा वर केल्या नाहींत तोंपर्यंत ह्या नोटांना भय नाहीं हें खरें; पण ह्यांत पेढ्यांची शिताफी ती कोणती ? लोकांनीं जर नोटांबद्दल सोन्याच्या नाण्याची मागणी पेढ्यांकडे केली तर पेढ्यांना हे बाँड विकून सोनें उत्पन्न करावें लागणार व एकदम बाँड जर विकावयास काढले तर त्यांची किंमत उतरणार व सोन्याची किंमत विनाकारण चढणार; व ती अशा वेळीं चढणार कीं, ज्या वेळीं त्या सोन्याची फारच जरूरी असणार. ह्या प्रकारांत दुसरा मोठा दोष असा आहे कीं, पेढ्यांना आपला पैसा किफायतशीर रीतीनें व्यापारी हुंड्या कटमितीनें विकत घेण्यांत खर्च करतां येणार नाहीं. कारण त्यांना आपला पैसा सरकारी बाँड घेण्यांतच खर्च करावा लागणार व निष्कारण पैसे अडकवावे लागणार. इतकेंच नव्हे तर ह्या पेढ्या असे बाँड विकत घेऊं लागल्या म्हणजे विनाकारण कायमचें राष्ट्रीय कर्ज आवश्यक होऊन बसतें; कारण सरकारनें पेढ्यांकडून रकम घेऊन त्याबद्दल नुसत्या कागदी नोटा देणें म्हणजे एक प्रकारचें कर्जच करणें होय; व ज्याअर्थी सरकार म्हणजेच राष्ट्र, त्या अर्थी सरकारनें काढिलेलें कर्ज हें राष्ट्रीय कर्जच होय; व त्यामुळें विनाकारण राष्ट्रावर ह्या कर्जाचा बोजा बसतो. अशा रीतीनें हा प्रकार एकंदरींत सदोषच आहे.

नोटांना कर्जाप्रमाणें लेखणें.—आतां राहिला शेवटला चवथा प्रकार. हा प्रकार असा. पेढ्या ज्या नोटा काढीत असतात त्यांच्याबद्दल खात्रीनें नाणें दिलें जाईल अशी हमी पटविण्याकरतां निराळी व्यवस्था न करतां त्यांनीं जितक्या नोटा काढिलेल्या असतील तितक्या नोटा लोकांचें देणें म्हणून समजाव्या व त्यांना तारण म्हणून त्यांची सर्व मिळकत व लोकांत असलेली पत ही लावून द्यावी. ह्या पद्धतीनें पेढ्यांना लोकांनीं ठेवलेल्या ठेवी व आपण काढिलेल्या नोटा ह्यांना सारखेंच लोकांचें देणें म्हणून महत्व द्यावें लागतें; व दोघांची फेड

करण्यांकरितां सारखीच व्यवस्था करावी लागते. पेढ्यांचा कारभार जर चांगला चालला असेल तर ही पद्धत शास्त्रशुद्ध होय ह्यांत शंका नाहीं; व पेढयांनीं काढिलेल्या नोटांचें कर्ज हें त्यांनीं आपल्या मिळकतींतून प्रथम फेडलें पाहिजे अशी जर आपण सक्ती केली तर ही पद्धत जास्तच फायदेशीर आहे. पण एकच गोष्ट आपणांस नडते, ती ही कीं, पेढीवाले हे नेहमींच शहाणपणानें व सचोटीनें वागतात असें नाहीं. हे पेढीवाले एकदां लबाडीनें किंवा सट्टेबाजीच्या मोहाला बळी पडून आपला कारभार करूं लागले म्हणजे त्यांना कर्ज मोठ्या प्रमाणांत काढावें लागतें व अशा वेळीं त्यांच्या एकंदर मालमत्तेवर किती विश्वास ठेवावा हा लोकांपुढें मोठा प्रश्न असतो.

वरील चारी प्रकारांवर सामान्य चर्चा.— तेव्हां कोठलाही प्रकार घेतला तरी त्यांत दोष हे आहेतच. पेढयांनीं काढिलेल्या नोटांबद्दल लोकांना ज्या पद्धतीनें खात्रीनें त्यांच्यापासून रोख नाणें मिळेल अशी निर्दोष पद्धति एकही नाहीं. कोठली ही निर्दोष पद्धति आपण काढली तर त्यांत दोन मुख्य हेतु साध्य झाले पाहिजेत. पहिला हेतु म्हणजे समाज आपल्या नित्यांतल्या गरजा सोन्याशिवाय इतर मार्गांनीं भागवूं लागल्यामुळें जी सोन्याची शिल्लक मागें टाकून पेढयांजवळ ठेवतो ती शिल्लक नेहमीं सुरक्षित असली पाहिजे व समाज मागेल तेव्हां त्याला पेढयांकडून ती मिळाली पाहिजे. दुसरा हेतू म्हणजे जास्त नोटा प्रचारांत आल्यामुळें होणारा सुळसुळाट व त्यामुळें त्यांची उतरूं लागणारी किंमत हे दोन्ही दोष टाळतां आले पाहिजेत. हे दोन्ही हेतू निसर्गभिन्नास्पद असल्यामुळें ते एका वेळीं साधणें अशक्य आहे. तेव्हां ज्या पद्धतीमुळें नोटांपासून होणारें नुकसान शक्य तितकें टाळून त्यांच्यापासून होणारा फायदा शक्य तितका घेतां येईल अशा पद्धतीचा अवलंब आपण केला पाहिजे. ही पद्धत स्वीकारतांना जरी आपणांस थोडाच फायदा घेतां आला तरी हरकत नाहीं. कारण एखाद्या पेढीनें नोटांऐवजीं नाणें देण्याचें नाकारलें म्हणजे गरीब लोकांचें नाहक नुकसान अतिशय मोठ्या प्रमाणांत होतें. तेव्हां जास्त धाडस करून, जास्त नोटा काढून, नोटांपासून होणारा फायदा जास्त प्रमाणांत न घेतां, लोकांचें नुकसान टाळून नोटांचा प्रसार बेतानें केल्यानें होणारा फायदा जर एखाद्या सरकारी नियंत्रणपद्धतीनें घेतां आला तर तो कां घेऊं नये ?

अशा रीतीनें विचार केला तर पेढयांवर योग्य प्रमाणांत नोटा काढण्याची सक्ती करणें किंवा त्यांना पुरेशी सोन्याची शिल्लक ठेवण्यास भाग पाडणें ह्या गोष्टी

लोकांच्या दृष्टीनें आवश्यक आहेत; पण त्याजबरोबर सरकारनें हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, जितक्या नोटा पेढया काढतील तितक्या किंमतीचें सोनें त्यांनीं काढून ठेवलें पाहिजे अशी सक्ती करणें बरोबर होणार नाहीं. कारण त्यामुळें नोटांमध्यें व्यापारी गरजांप्रमाणें कमीजास्त होण्याचा गुण नाहींसा होतो. अगदीं बिनधोक नोटा असणेंसुद्धां इष्ट नाहीं.

संरक्षणनिधि पद्धत—शेवटीं एका पद्धतीचा उल्लेख करून हें प्रकरण पुरें करूं. ह्या पद्धतीला संरक्षणनिधि असें नांव आहे. ह्या पद्धतीचें तत्त्व असें आहे कीं, नोटा प्रचलित करणाऱ्या जेवढया पेढया असतील त्या सर्वांनीं एक रोख नाण्याचा सर्व सामान्य निधी निर्माण करावयाचा व सरकारी अधिकाऱ्याजवळ ठेवून ह्या निधींत प्रत्येक पेढीनें प्रत्येक नोटेवर एक लहानसा कर देऊन भर घालावयाची; व एखादी पेढी बुडावयाची पाळी आली असतांना जे लोक नोटा घेऊन येतील त्यांना ह्या निधींतून नाणें द्यावयाचें, आणि जेवढें नाणें लोकांना दिल्यामुळें कमी झालें असेल तेवढें त्या पेढीची मालमत्ता विकून भरून काढावयाचें. ही पद्धति जर अमलांत आणली तर त्यापासून पुष्कळ फायदे होण्याचा संभव आहे. ह्या पद्धतीनें पेढयांना व्यापारी गरजेप्रमाणें नोटा काढतां येतील व आपलें भांडवल सरकारी रोखे घेण्यांत न गुंतवितां पेढीचा व्यवहार वाढविण्यांत गुंतवितां येईल व नोटांबद्दल नाणें मिळण्याची खात्री असल्यामुळें प्रचलित असलेल्या चलनांत सहज भर घालतां येईल.

नोटा कोणीं काढाव्यात ? आपण आतांपर्यंत असें गृहीत धरून चाललों आहोंत कीं, आपल्या नोटा काढण्याचा प्रत्येक पेढीस हक्क आहे. पण तात्विक दृष्टया असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, नोटा सरकारनें सुरू केलेल्या बऱ्या, किंवा पेढयांनीं सुरू केलेल्या बऱ्या ? वर आपण पेढयांनीं सुरू केलेल्या नोटांपासून होणारे फायदे पाहिलेच आहेत; तरीपण ह्या प्रश्नाला दुसरीहि बाजू आहे हें आपण विसरतां कामा नये. सरकारनें सुरू केलेल्या नोटा दोन प्रकारच्या असतात. कांहीं नोटांबद्दल त्या परत खजिन्यांत आल्या असतां नाणें देण्याची हमी सरकार घेत असतें. हा एक प्रकार झाला; व ज्या नोटा परत खजिन्यांत आल्या असतां लोकांना नाणें देण्यास सरकार बांधलेलें नसतें अशा प्रकारच्या नोटा हा दुसरा प्रकार होय. आतां बँक नोटा व पहिल्या प्रकारच्या नोटा ह्यांमध्यें जर

आपण तुलना केली तर आपणांस असें दिसून येईल कीं, सरकारनें काढिलेल्या नोटा ह्या बँकांच्या नोटांपेक्षां कांहीं बाबतींत सरस असतात; कारण सरकारी नोटा ह्या एकाच तऱ्हेच्या असल्यामुळें त्या चटकन् ओळखूं येतात व एकरूपता हा जो गुण चलनी नाण्यांत असावा लागतो तो गुण निरनिराळ्या पेढ्यांनीं काढिलेल्या नोटांपेक्षां सरकारनें काढिलेल्या नोटांत सहज उत्पन्न होतो. तसेंच इंग्लंड किंवा जर्मनीसारख्या व्यापारी राष्ट्रांच्या सरकारनें जर नोटा काढिल्या तर त्या नोटांबद्दल ताबडतोब किंवा कालांतरानें नाणीं पुरविण्याबद्दल तें सरकार सहज जबाबदार राहूं शकतें. ताबडतोब नाणीं देणें हें पेढ्यांपेक्षां सरकारास जास्त परवडतें. कारण सरकारला नोटा काढण्यापासून फायदा करून घेण्याची फारशी अपेक्षा नसते; * व ताबडतोब नाहीं तरी कालांतरानें आपणांस नाणीं मिळतील असा जो भरंवसा लोकांस सरकारी नोटांबद्दल असतो त्याचें कारण असें असतें कीं, सर्व राष्ट्र ह्या नोटांबद्दल जबावदार असतें. तेव्हां पेढ्यांनीं काढिलेल्या नोटांपेक्षां सरकारी नोटाच जास्त विश्वासार्ह असतात. दुसरें असें कीं, नोटा सुरू करण्यांत—मग त्या पेढ्यांनीं सुरू केलेल्या असोत किंवा सरकारनें सुरू केलेल्या असोत—आपणांस कांहीं फायदा व्हावा अशी दोघांची इच्छा असते व हा फायदा कांहीं विशिष्ट संस्थांनीं घेण्यापेक्षां सर्व राष्ट्रानें घेणें केव्हांहि जास्त फायदेशीर होणार हें उघड आहे. बरें, नोटा काढण्याचा मक्ता सरकारनें आपणाकडे घेतला म्हणजे पेढ्यांची वाढच खुंटते असाहि आपला अनुभव नाहीं. इंग्लंडमध्यें अशा पुष्कळ पेढ्या आहेत कीं, त्या जरी आपल्या नोटा लोकांत प्रचलित करीत नसल्या तरी त्यांची भरभराटच होत आहे; कारण नोटांचा प्रचार करणें हें पेढ्यांचें मुख्य काम नव्हे. असो; एकंदर तात्पर्य एवढेंच आहे कीं, सरकारी नोटा (मात्र ह्या नोटांबद्दल नाणें देण्याची हमी सरकारनें घेतली पाहिजे) ह्या बँक नोटांपेक्षां अधिक चांगल्या असतात. पण ह्यावरून कोणी जर असें अनुमान काढील कीं, पेढ्यांनीं नोटा काढूंच नयेत, तर तें चुकीचें होईल. पेढ्यांनीं नोटा काढण्यास आमचे मतें हरकत नाहीं. मात्र ह्या नोटा काढण्याचे बाबतींत कांहीं

* वाचकांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी कीं, आम्ही ज्या नोटांबद्दल नाणीं देण्याची सरकार हमी घेते अशा नोटा व पेढ्यांनी काढिलेल्या नोटां ह्यांच्यामध्यें तुलना करीत आहोंत.

सरकारी नियंत्रण पाहिजे. तसेंच ज्या नोटा काढावयाच्या त्या अगदींच कमी किंमतीच्या असणें इष्ट नाहीं; कारण त्या अगदीं कमी किंमतीच्या असल्यामुळें तशाच प्रकारच्या खोट्या नोटा काढण्याकडे लोकांची प्रवृत्ति होते व ह्या नोटा गरीब लोकांच्या हातांत वावरत असल्यामुळें त्यांचा जर ह्या नोटांवरील विश्वास उडाला तर त्या नोटांना कोणी विचारीत नाहीं.

नोटा व नाणीं:—लोकांचा जितका जास्त विश्वास पेढ्यांनीं काढिलेल्या नोटांवर असतो तितकी जास्त प्रमाणांत प्रवृत्ति ह्या नोटा जवळ बाळगण्याकडे होत असते; व अशा तऱ्हेनें ह्या नोटा नाण्याच्याऐवजीं म्हणून उपयोगांत आणण्यांत येत असतात व नाण्यांची जरूरी नाहींशी होऊन तीं अदृश्य होऊं लागतात. तथापि देशांतून ह्या नोटांमुळें नाण्यांची अजीबात हकालपट्टी होणें शक्य नाहीं; कारण नोटा प्रचलित केल्याबरोबर थोडें तरी सोनें किंवा त्याचें नाणें बाजूला काढून ठेवणें पेढ्यांस भाग पडतें. हल्लीं पाश्चिमात्य देशांत अगदीं लहान किंमतीच्या नोटा काढण्यास प्रतिबंध असल्यामुळें पेढयांच्या नोटांच्या प्रसाराचे योगानें सोन्यारुप्यांचीं नाणीं अदृश्य होतील हें भय बाळगण्याचें कारण नाहीं. कारण नोटा मोठ्या किंमतीच्या–उदाहरणार्थ इंग्लंडमध्यें ५ पौंडांवरच्या किंमतीच्या नोटा असाव्या असा कायदा आहे—असल्यामुळें नित्य व्यवहारांत चिल्हर खर्चाकरितां नाणीं असणें आवश्यक होऊन बसतें व त्यामुळें तीं प्रचारांतून जाणें शक्य नाहीं.

पेढीनें काढिलेल्या नोटा व तिनें ठेवून घेतलेल्या ठेवी:— जगांतल्या सर्व पेढयांचा जर आपण कारभार पाहिला तर आपणांस असें दिसून येईल कीं, प्रत्येक देशांतील सरकार पेढयांनीं नोटा काढण्यांत काय धोरण ठेवावें ह्याबद्दल कायदे करीत असतें; कारण सरकारला असें वाटत असतें कीं, पेढयांनीं नोटा सुरू केल्यामुळें लोकांचें नाहक नुकसान होऊं नये. पण ज्या वेळीं पेढया लोकांच्या ठेवी स्वीकारतात त्या वेळीं त्या ठेवींच्या व्यवस्थेबद्दल सरकार कायदे करूं इच्छित नाहीं. ह्या सरकारी धोरणाचा असा अर्थ होतो कीं, पेढीच्या नोटा स्वीकारणाऱ्या माणसाबद्दल सरकारास जितकी आस्था वाटते तितकी पेढीजवळ ठेव ठेवणाऱ्या माणसाची आस्था त्यास वाटत नाहीं. फक्त अमेरिकेमध्यें पेढीनें किती गंगाजळी राखून ठेवावी अशा बाबींबद्दल सरकारनें कांहीं कायदे करून

दिलेले आहेत; तथापि तेथेंसुद्धां सरकार पेढयांच्या नोटा स्वीकारणाऱ्या माणसाबद्दल जितकी काळजी वाहते तितकी ठेवी ठेवणाऱ्या माणसाबद्दल तें करीत नाहीं.

आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, सरकार असा पक्षपात कां करितें ? ह्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण असें दिसतें कीं, पेढयांनीं काढिलेल्या नोटांना जसें देशांतील पैसा असें मानण्यांत येतें; त्याचप्रमाणें त्यांच्याजवळ असलेल्या ठेवींना लोक किंवा सरकार समजत नाहीं. नोटांचा प्रचार लोकांच्या हातांत जसा सुलभतेनें होतो तसा हुंड्या किंवा चेक ह्यांचा होत नाहीं. कारण हुंड्या किंवा चेक बाजारांत लोकांच्या हातांतून जात असतांना त्यांच्यावर त्या स्वीकार करणाऱ्या लोकांच्या सह्या व शेरे होत असतात. ह्यामुळें पेढयांनीं काढिलेल्या नोटा लोक त्या पेढ्यांकडे पैसे मागण्याकरितां म्हणून क्वचितच घेऊन येतात. कारण त्यांचा पेढयांवर विश्वास असतो. लोकांच्या ह्या विश्वासाचा फायदा घेऊन पेढयांना आपल्या शिलकीच्या मानानें जास्त नोटा काढण्याचा मोह होत असल्यामुळें सरकारला नोटा काढण्याच्या बाबतींत ह्यांना कांहीं नियंत्रण घालणें आवश्यक वाटतें. सरकारचें हें धोरण सर्वस्वीं चुकीचें आहे असें मानतां येत नाहीं; कारण नोटांचा लोकांत प्रचार व्हावा असें जर आपणांस वाटत असेल तर त्या पेढ्यांकडे आणून दिल्या असतांना त्यांबद्दल पैसे मिळतील अशी लोकांची खात्री त्यांनीं केलीच पाहिजे असें सरकारला वाटणें साहजिकच आहे. आतां वास्तविक पाहिलें तर नोटा व ठेवी ह्यांत असा फरक नसलेला बरा; कारण दोघांचाहि उपयोग विनिमयचलन म्हणून व्यवहारांत होत असतो.

दुसरें कारण असें आहे कीं, नोटांचा उपयोग गरीब व श्रीमंत सर्वच लोक करीत असतात; पण पेढीच्या ठेवी श्रीमंत लोकच ठेवीत असतात. त्यामुळें ह्या ठेवी बुडाल्यानें श्रीमंतांचें थोडेंबहुत जरी नुकसान झालें तरी त्यांना त्यांची फारशी फिकीर वाटत नाहीं. पण ही विचारसरणी अशास्त्रीय आहे. सरकारला पैशाचे बाबतींत सर्वच लोक सारखे असावयास पाहिजेत आणि निष्कारण नुकसान—मग तें कोणाचेंही असो—एकंदरींत वाईटच.

तिसरें कारण म्हणजे ठेवी ठेवणारा मनुष्य स्वखुषीनें एखाद्या पेढीजवळ रकम ठेवीत असतो व एखाद्या शहरांत जर चार पांच पेढ्या असल्या तर कोणत्या पेढींत

आपली रकम ठेवावी हें तो जाणूनबुजून ठरवीत असतो. तेव्हां अशा पेढीनें जर ती रकम बुडविली तर थोडाबहुत दोष किंवा मूर्खपणा त्या पेढीची निवड करणाऱ्या माणसाकडे येतो; पण नोट स्वीकारणाऱ्या माणसाची तशी गोष्ट नाहीं. नोटा जेव्हां व्यवहारांत खेळत असतात तेव्हां लोकांना स्वतःच्या खुषीविरुद्ध व न कळत ह्या नोटा स्वीकाराव्या लागतात, व अशा तऱ्हेनें ते पेढीचे सावकार बनतात. ठेवी ठेवणारे व नोटा स्वीकारणारे ह्यांच्यामध्यें असा फरक असल्यानें सरकार नोटा स्वीकारणाऱ्या लोकांची विशेष काळजी घेत असतें. तात्विक दृष्ट्या ही स्थिति अनिष्ट आहे. ठेवी ठेवणारे लोक व नोटा स्वीकारणारे लोक ह्यांत भेदभाव न ठेवतां दोघांचेंही नुकसान पेढ्यांच्या बेताल कारभारानें होऊं नये अशी सरकारनें व्यवस्था केली पाहिजे. प्रत्येक पेढीनें एखाद्या सार्वजनिक किंवा लोकांची पहाणी असलेल्या हमी घेणाऱ्या संस्थेकडे कांहीं तरी रकम भरलीच पाहिजे असा कायदा असणें इष्ट आहे. ज्या बँकेचें दिवाळें निघण्याचा संभव आहे तिच्या ठेवी ठेवणाऱ्या गिऱ्हाइकांना ह्या रकमेंतून पैसे मिळण्याची सोय झाली म्हणजे लोकांचा जीव खालीं पडेल. कांहीं लोकांचे मतानें असा कायदा झाला तर पेढ्या जास्त बेतालपणें आपला कारभार चालवतील. कारण आपले पैसे पेढी बुडाली तरी मिळणारे आहेत म्हणून कोणीही ठेवी ठेवणारा गृहस्थ त्यांच्याकडे केव्हांही मागणी करणार नाहीं व त्यामुळें पेढ्या जास्त जास्तच निर्धास्त राहतील. पण ह्या आक्षेपांत फारसा अर्थ आहे असें आम्हांस वाटत नाहीं. कारण असा कायदा नसूनही हल्लीं पेढ्यांवर किती लोकांचें लक्ष्य असतें? शिवाय आपले पैसे पेढी बुडाली तरी सुरक्षित आहेत अशी जरी खात्री ठेवी ठेवणारांची असली तरी ती पेढी नादारींत निघाल्यावर तिच्यांत पैसे पुष्कळ कालपर्यंत विनाकारण अडकवून ठेवणें पुष्कळांस आवडणार नाहीं व त्यामुळें लोक त्या पेढ्यांवर नजर ठेवतीलच.

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(आ) लोकांच्या ठेवी.

लोकांच्या ठेवींबद्दल सामान्य चर्चा:-अगदीं प्रथम सांगण्यांत आलेलेंच आहे कीं, पेढयांचीं प्रमुख कामें दोन तऱ्हेचीं असतात; एक काम म्हणजे लोकांच्या ठेवी स्वीकारणें व दुसरें काम म्हणजे नोटांचा प्रचार सुरू करणें. आतांपर्यंत आपण नोटांविषयीं विचार केला. आतां ठेवीबद्दल चर्चा करावयाची. ह्या विषयावर सुरवातीला थोडेसे प्रस्तावनेदाखल विचार प्रगट केलेलेच आहेत. त्याच विषयाची आतां खुलासेवार चर्चा करूं.

पेढीचें आद्यकर्तव्य म्हटलें म्हणजे लोकांच्या ठेवी किंवा पैसा स्वीकारून तो दुसऱ्या गरजू लोकांना व्याजानें देणें हें होय. अर्थात् पेढीला आपल्या स्वतःच्या जमविलेल्या भांडवलांवर लोकांस उसने रुपये देतां येतील; पण स्वतःचें असें भांडवल पेढीचा व्यवहार करतांना पेढीवाल्यांना कितीसें पुरणार व त्यामुळें लोकांना व खुद्द पेढीवाल्यांना कितीसा नफा होणार? हल्लींच्या व्यापारी युगांत काढलेल्या पेढीला स्वतःच्या भांडवलावर हा धंदा करणें शक्य नाहीं. तेव्हां पेढीला लोकांचें कर्ज हें काढावें लागणारच. 'पैसा दुसऱ्याचा, धंदा स्वतःचा' ही म्हण पेढीच्या बाबतींत अक्षरशः खरी आहे. वर सांगितल्याप्रमाणें पेढीनें स्वीकारलेल्या ठेवी ह्या एक प्रकारचें कर्जच होत. पण ठेवी व नेहमीचें कर्ज ह्यांमध्यें फरक आहे. एखादा मनुष्य सावकाराकडे कर्ज मागावयाला जेव्हां जात असतो तेव्हां त्या माणसाला त्या रकमेची जरूर असते व ती रक्कम आपणास बरेच दिवसपर्यंत वापरावयास मिळावी अशी त्याची अपेक्षा असते. पण ठेवींचा प्रकार निराळा असतो. पेढीमध्यें आपण होऊन लोक रकमा ठेवीत असतात आणि त्या ठेवी जर ठराविक मुदतीच्या नसतील तर वाटेल तेव्हां परत मागण्याचा अधिकार ते बजावीत असतात. तेव्हां ह्या ठेवी पेढ्यांजवळ ठेवण्यांत लोकांचा हेतू एवढाच असतो कीं, कांहीं काल त्या सुरक्षित रहाव्या.

पण हें कर्ज पेढ्यांना मिळण्यास त्यांची पत सामान्य लोकांत असली पाहिजे. ही पत जितकी जास्त असेल त्या मानानें लोक आपल्याजवळची रकम ह्या पेढ्यांजवळ ठेवतील व पेढ्याही ह्या रकमेबद्दल कमी व्याज देतील. जितकें व्याज जास्त, तितका कुळापासून सावकाराला धोका जास्त हा अनुभव येथेंही उपयोगी पडतो. तेव्हां पेढयांनीं पहिली कोणती गोष्ट साध्य करून घ्यावयाची असेल तर आपली पत लोकांत सपाटून वाढविणें ही होय. अशी पत वाढल्यापर पेढयांना हवा तेवढा पैसा थोड्या व्याजानें वापरावयास मिळतो; पण पेढयांना बऱ्याच मोठ्या मुदतीचें कर्ज लोकांकडून नको असतें. त्यांची इच्छा अशी असते कीं, लोकांजवळ खर्च वगैरे भागून जो खेळतां पैसा रहात असतो तो जवळ ठेवल्यास चोरीची भीति असते म्हणून तो कोठें तरी सुरक्षित ठेवला जावा अशी ज्यांची इच्छा असते अशा लोकांनीं तो पैसा थोड्या मुदतीच्या बोलीनें आपल्याजवळ ठेवावा. अर्थात् अशा रकमेबद्दल थोडेंबहुत व्याज देण्याची ह्या पेढयांची तयारी असते. कधीं कधीं ह्या पेढयांना अशा रकमा कर्जाऊ घेतल्याबद्दल व्याजही द्यावें लागत नाहीं. उदाहरणार्थ, बँक आफ् इंग्लंडमध्यें लोक ज्या रकमा ठेवतात त्यांबद्दल त्यांना कांहीं व्याज मिळत नाहीं; कारण ह्या पेढीवर लोकांचा अतिशय विश्वास आहे. तरीपण हल्लीं सामान्यपणें प्रत्येक पेढी थोडेंबहुत व्याज देत असते व लोक जर आपल्या रकमा कांहीं दीर्घ कालपर्यंत म्हणजे एक वर्ष किंवा तीन वर्षेपर्यंत परत मागणार नाहींत तर त्यांना थोडें जास्त व्याज पेढया देऊं शकतात.

ठेवीसंबंधानें कांहीं भ्रामक समजुतीः—ह्या ठिकाणीं ठेवीसंबंधानें लोकांच्या ज्या कांहीं भ्रामक कल्पना आहेत त्यांचा निरास केला पाहिजे. कांहीं लोकांची अशी एक समजूत आहे कीं, पेढयाजवळ ज्या ठेवी येतात त्या रोख नाण्याच्या रूपानें येतात व त्यांच्याजवळ वापरावयास जी रकम असते ती नाण्याच्या रूपानेंच असते. पण ह्या समजुतीस आधार बिलकूल नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, पेढयांजवळ ज्या ठेवी असतात त्यांपैकीं फारच थोड्या ठेवी रोख नाण्यांत असतात व त्यांच्याजवळ फारच थोडीं रोख नाणीं शिल्लक असतात. ह्याचें कारण असें कीं, सर्व लोक एकाच वेळीं आपले पैसे परत मागणार नाहींत अशी पेढयांची खात्री असते. पण असा प्रसंग आला तर मात्र लोकांची मागणी पुरी करण्याची पेढयांना धमक असली पाहिजे. एरवींच्या प्रसंगीं अनुभवावरून किती

नाणें अलग काढून ठेविलें पाहिजे हें निश्चित असल्यावर तेवढी रकम बाजूला काढून ठेवून पेढ्या आपला व्यवहार नोटांवरच करीत असतात.

पण ह्यावरून कोणी जर असें अनुमान करील कीं, ज्याअर्थी पेढ्याजवळ असलेला पैसा कागदाच्या रूपानें असतो त्याअर्थी हा पैसा वाटेल त्या प्रमाणांत वाढवितां येईल, तर तें अनुमान चुकीचें होईल. कारण पेढ्या जेव्हां लोकांना आपल्या नोटा देत असतात तेव्हां त्या नोटा परत आल्यास त्यांबद्दल रोख नाणें देण्याची त्यांची तयारी पाहिजे; त्याचप्रमाणें लोकसुद्धां पेढ्यांकडून रकमा मागण्याचा हक्क जेव्हां संपादन करतात तेव्हां त्यांना त्या पेढ्यांजवळ अगोदर आपला माल विकून गिऱ्हाइकांवर काढिलेल्या हुंड्या, किंवा कोठल्या तरी कंपनीचे घेतलेले शेअर हे ठेवावे लागतात. ह्या हुंड्या किंवा हे शेअर प्रथम आपण जेव्हां कांहीं माल विकूं किंवा एखाद्या कंपनीला रोख रुपये देऊं, तेव्हांच आपणास मिळतील. तेव्हां सांगावयाचें तात्पर्य एवढेंच आहे कीं, पेढ्याजवळ कागदाचे रूपानें असलेला पैसा हा कल्पनेचा खेळ नसतो तर अगोदर पैशाची किंवा मालाची उलाढाल व्हावी लागते; नंतर हा कागदी पैसा उत्पन्न होत असतो.

ठेवी कशा निर्माण होतातः—वर आपण पाहिलेंच आहे कीं, लोक पेढ्यांवर विश्वास ठेवून आपण होऊन आपल्याजवळची शिल्लक ठेव म्हणून त्यांचे-जवळ ठेवीत असतात; पण हल्लीं व्यापारी पेढ्यांजवळ ज्या ठेवी असतात त्यांपैकीं बऱ्याच ठेवी लोकांकडून आलेल्या नसून त्यांचा जन्म ह्या व्यापारी पेढ्यांपासूनच झालेला असतो. वर आपण पेढीनें सुरू केलेल्या नोटींची उत्पत्ति पाहिलीच आहे. पेढीचें आद्य कर्तव्य लोकांना कर्ज देणें हें असतें; पण हें कर्ज ती पेढी पैशाच्या किंवा स्वतःच्या भांडवलाच्या रूपानें देत नसते, तर आपल्या पतीच्या रूपानें देत असते. ह्याचाच अर्थ ती पेढी आपल्या पतीच्या जोरावर नोटा सुरू करते असा होतो. ज्या वेळीं पेढी लोकांना ठेवीच्या रूपानें कर्ज देत असते, त्या वेळीं सुद्धां हाच प्रकार घडत असतो. एखादा कर्ज काढणारा गृहस्थ एखाद्या पेढीकडे आपली ‘ परमेश्वरी ’ नोट (प्रॉमिसरी नोट) घेऊन जातो. ही नोट शहाजोग आहे अशी खात्री पटल्यावर कांहीं व्याज कापून त्या नोट आणणाऱ्याच्या नांवें त्या नोटीवर लिहिलेली रकम ‘ठेव’ म्हणून पेढी जमा करते. अशी रकम एकदां जमा झाली म्हणजे त्या माणसाला त्याच्या इच्छेप्रमाणें रोख रकम मागण्याचा किंवा

त्या पेढीवर तितक्या किंमतीचा चेक देण्याचा अधिकार प्राप्त होतो. अशा रीतीनें पेढी व ठेव ठेवणारा गृहस्थ ह्यांमध्यें परस्परसंबंध घडत असतात.

पण आपण ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ठेव ठेवणारा मनुष्य जेव्हां पेढीजवळ कांहीं रकम वगैरे ठेवून देतो तेव्हां ती रकम ताबडतोब परत मागण्याची त्याची मनीषा नसते. विशेषतः ज्या पेढया व्यापारी आहेत त्या अशाच लोकांच्या ठेवी स्वीकारीत असतात. इतकेंच नव्हे तर त्यांचें गिऱ्हाईकसुद्धां ठरलेलें असतें व ह्या गिऱ्हाईकांत एकच व्यक्ति पेढीची ऋणको व धनको असते, म्हणजे त्या व्यक्तीचें देणें व घेणें ह्या पेढयांशीं असते. सामान्यपणें एखादा गृहस्थ जितकी रकम ठेव म्हणून ठेवील त्याहून कमीच रकम पेढीपासून कर्ज म्हणून काढील. कारण त्याची अशीच इच्छा राहणार कीं, आणीबाणीचे वेळीं उपयोगी पडण्याकरतां म्हणून थोडी तरी आपली शिल्लक पेढीजवळ रहावी; पण कधीं कधीं पेढीच्या खात्यांत आपल्या नांवें असलेल्या जमेपेक्षां मनुष्य जास्त रकम उसनवार घेत असतो; पण अशी स्थिति थोडा वेळ टिकते. कारण तो मनुष्य व्यापारी असल्यामुळें त्याला इतर लोकांकडून बरेंच घेणें असतें व तें घेणें वसूल झाल्यावर पुनः आपल्या नांवें ती रकम पेढीवर जमा करून आपल्या नांवाची जमेकडील बाजू खर्चाच्या बाजूपेक्षां जास्त दाखवितो व आपली पत पेढीजवळ जास्त वाढवितो.

पण एवढयानेंच हा प्रकार थांबत नाहीं. पुनः तो मनुष्य पेढीकडून कर्ज काढून त्या कर्जाचा विनियोग व्यापारांत किंवा उद्योगधंद्यांत करीत असतो व इतरही धंदेवाईक माणसें ह्याच मार्गाचा अवलंब करीत असतात. अशा रीतीनें पेढीचे शेंकडों गिऱ्हाईक पेढीजवळ रकमा जमा करीत असतात व कर्जाऊ मागत असतात. कांहीं लोक ठेवलेल्या रकमेपेक्षां जास्त रकमा कर्ज काढीत असतात, तर इतर लोक कर्ज काढिलेल्या रकमेपेक्षां जास्त रकमा ठेव म्हणून ठेवीत असतात. अशा रीतीनें ह्या पेढयांपासून हजारों ठेवींचा जन्म होत असतो. कधीं कधीं त्या पेढयांजवळ उद्योगधंद्याशीं संबंध नसलेल्या लोकांच्या ठेवी असतात व कधीं कधीं त्या पेढया स्वतंत्रपणें स्वतःची रकम ठेव म्हणून न ठेवणाऱ्या माणसांनासुद्धां कर्जाऊ रकमा देत असतात.

पेढीवर काढिलेल्या चिठ्या (चेक):—देशांत पेढयांचा उत्कर्ष होत आहे हें ओळखण्याचें साधन म्हटलें म्हणजे पेढयांवर लोकांचा पूर्ण विश्वास

बसून त्यांना लोकांना देण्याकरितां फारच थोडें नाणें जवळ ठेवावें लागतें ही स्थिति होय. लोकांचा एकदां पूर्ण विश्वास बसला म्हणजे लोक नाणीं न मागतां पेढयांनीं काढिलेल्या नोटाच घेण्यास कबूल असतात; इतकेंच नव्हे तर त्या पेढयांकडून चेक पुस्तकें घेऊन जेव्हां जेव्हां त्यांना दुसऱ्या लोकांना पैसे द्यावयाचे असतात तेव्हां तेव्हां ते त्या त्या लोकांना पेढयांवर चेक देत असतात. हे चेक ते लोक पेढयांकडे घेऊन जातात व त्यांना त्या पेढया रोख रकम देत असतात. पण हा चेक घेऊन जाणाऱ्या माणसांचा जर त्याच पेढयांशीं देण्याघेण्याचा संबंध असला तर त्या पेढया रोख रकमा न देतां चेक देणाऱ्या माणसाच्या नांवावर चेकमध्यें लिहिलेली रकम मांडून, चेक घेऊन येणाऱ्या माणसाच्या खात्यावर ती रकम जमा म्हणून मांडतात. अशा रीतीनें देशांत जर एकच पेढी असली व लोकांचा त्याच पेढीशीं संबंध असला तर प्रत्येक व्यवहार नाण्याशिवाय करतां येईल व पेढयांना थोडें नाणें जवळ ठेवून बाहेर आपला पैसा व्यापारांत गुंतवितां येईल.

वरील विवेचनावरून वाचकांस कळलेंच असेल कीं, पेढयांनीं काढिलेलीं चेक पुस्तकें हीं एक प्रकारच्या ठेवीच होत व ह्या चेकांचा उपयोग इतर चलनी नाण्यांप्रमाणेंच होत असतो. सामान्यपणें व्यापारांत पडलेल्या लोकांकडूनच हे चेक पेढयावर पाठविले जात असल्याकारणानें हे चेक सोन्याच्या नाण्यांपेक्षां अधिक प्रचारांत असतात. हल्लीं आपण सुधारलेल्या देशांतील लोकांच्या पैशाच्या व्यवहाराकडे जर नजर टाकली तर आपणांस असें दिसून येईल कीं, लोकांचा बहुतेक व्यवहार ह्या चेकनींच होत असतो. लोकांनीं असा व्यवहार करावा अशी कोणीं कायद्यानें सक्ती केलेली नाहीं किंवा ही चेक वापरण्याची पद्धत कोणी जाणून बुजून सुरू केलेली नाहीं. तर ह्या पद्धतीचा प्रचार सहज पडत चालला हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. हल्लीं ही पद्धत दृढमूल झालेली आपण पहातों त्याचें कारण हीमध्यें बरेच फायदे आहेत हें होय. चेक हे नेहमीं सुरक्षित असून वापरण्यास फार सोयीचे असतात. सुरक्षित म्हणण्याचें असें कारण आहे कीं, हे चेक ठराविक माणसानेंच आणले तर पेढया त्याला पैसे देईल. अलबत्या गलबत्या माणसाला जर पैसे दिले गेले तर त्याबद्दल पेढयांना भूर्दंड भरावा लागतो. सोयीचें म्हणण्याचें असें कारण आहे कीं, एका टांकाच्या फटकाऱ्याबरोबर वाटेल तेवढी रकम पैन्‌पै मिळण्याची सोय त्या चेकमुळें होते.

पण ही चेकची पद्धत पूर्णपणें अमलांत येण्यास पेढयांनीं लोकांचा विश्वास पूर्णपणें संपादन केला पाहिजे. आपण आपले पैसे एकदां ठेवले तर पुनः जरूर लागल्यावर आपण जेव्हां पेढीवर चेक पाठवितों तेव्हां आपला चेक पटून आपणांस पैसे मिळतील अशी लोकांची खात्री पेढया पटवितील तेव्हांच ही चेकची पद्धत सार्वत्रिक होईल. तसेंच चेकचा उपयोग नाण्यासारखा चलनाचें साधन म्हणून जर व्हावयाचा असेल तर जो मनुष्य दुसऱ्या माणसास एखाद्या पेढीवर चेक देतो त्या माणसाला पेढीपासून खरोखरच पैसे घ्यावयाचे आहेत व त्या पेढीवर त्याची पत आहे अशी त्या दुसऱ्या माणसाला खातरी पाहिजे. तात्पर्य, ह्या चेकच्या मुळाशीं विश्वास आहे हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

चेकांचा पैशाच्या प्रचारावर व पेढ्यांच्या नोटांवर होणारा परिणामः—एखाद्या पेढीनें चेकची पद्धत सुरू केली म्हणजे आपण लोकांचें देणें आहोंत ही जाणीव जितकी त्या पेढीला तिच्यावर काढिल्या जाणाऱ्या चेकांनीं होते तितकी तिनें सुरू केलेल्या नोटांनीं होत नाहीं. वास्तविक दोन्हीही पेढयांकडे आले असतांना तिला रोख नाणें देणें भाग आहे. पण दोघांत फरक असण्याचें असें कारण आहे कीं, एकदां नोट प्रचलित झाली कीं ती पुष्कळ काळपर्यंत लोकांचे हातांत खेळत असते; पण पेढीच्या धनकोनें एकदां पेढीवर चेक दिला, कीं लवकरच त्या चेकची व पेढीची गांठ पडत असते. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, नोटाप्रमाणेंच चेकसुद्धां त्याच्या पाठीवर अनेक वेळां सह्या होऊन किंवा ' हा चेक घेऊन येणारास पैसे देणें ' हे शब्द त्याच्यावर लिहिले असतां लोकांत बरेच दिवस खेळत असतात. तरीपण असे चेक एकंदरींत थोडेच असतात; कारण चेकवर लिहिलेली तितकीच रकम प्रत्येक वेळीं निरनिराळ्या माणसांस लागेल असा नियम नसतो. सामान्य नियम म्हटला म्हणजे एकदां चेक निघाला म्हणजे तो लवकरच पेढीवर येतो व त्यामुळें पेढीला चेक पटविण्याची नेहमीं तयारी ठेवावी लागते. पण पेढी जर पुष्कळ दिवसांची नांव मिळविलेली असेल तर तिच्याजवळ लोकांनीं आणून दिलेले पैसे नेहमीं खेळत असतात; त्यामुळें हे चेक पटविणें तिला फारसें कठिण जात नाहीं. तरी पण पेढीजवळ रोकड म्हणजे पेढीच्या नोटा, सरकारी नोटा, नाणें हीं चांगल्या प्रमाणांत पाहिजेत; कारण व्यापारी लोकांना, पुष्कळ नोकर कामावर ठेवणाऱ्या मालकांना त्यांना पगार वाटण्याकरितां म्हणून, व चिल्लर खर्चाकरितां म्हणून सर्व साधारण लोकांना ह्या रोकडीची नेहमीं जरूर असते.

पूर्वी जेव्हां पेढयांनीं काढिलेल्या नोटा एवढयाच चलन म्हणून प्रचारांत असत, तेव्हां त्या पुष्कळ दिवसपर्यंत लोकांमध्यें वापरल्या जात व त्या प्रथम नोटा सुरू करणाऱ्या पेढयांकडे एकाएकी परत येत नसत; पण ज्याअर्थी ह्या नोटांच्या जोडीला चेक येऊन बसले आहेत व दोहोंचाही प्रचार लोकांत जारीनें सुरू आहे त्याअर्थी ह्या नोटा कोणत्या ना कोणत्या तरी पेढीकडे नित्य व्यवहारांत येत असतात. ज्या पेढीकडे ह्या नोटा येत असतील त्या पेढीनें एक तर नोटा घेऊन येणाऱ्या माणसाला रोख पैसे दिले पाहिजेत; किंवा ज्या पेढीनें ह्या नोटा काढिल्या असतील त्या पेढीकडे त्या आपण ज्याप्रमाणें एखाद्या पेढी-वर पैसे मिळण्याकरितां चेक देतों त्याप्रमाणें पाठविल्या पाहिजेत. ज्या वेळीं पेढीकडे आलेली नोट शहाजोग असून चांगल्या प्रसिद्ध पेढीनें सुरू केलेली असते त्या वेळीं ती पेढी पहिला मार्ग स्वीकारील व ज्या वेळीं त्या पेढीलाही स्वतःच्या नोटा सुरू करण्याचा अधिकार असतो त्या वेळीं ती पेढी दुसरा मार्ग स्वीकारील. कारण आपण काढिलेल्या नोटीबद्दल तेवढी रोख रकम देण्याची जबाबदारी आपण अंगावर घ्यावी अशी प्रत्येक पेढीची इच्छा असणार. अलीकडे पेढयांची प्रवृत्ति नोटांना चेकाप्रमाणें न लेखतां नेहमींच्या रोकडीप्रमाणें मानण्याची आहे; व ह्या नोटा काढण्याबद्दल सरकारनें कांहीं कायद्याचें बंधनही घालून दिलें आहे; त्यामुळें पेढया व इतर लोकसुद्धां ह्या नोटांबद्दल रोख पैसे देण्यास कुरकुरत नाहींत.

पेढ्यांनीं ठेवीवर व्याज द्यावें काय ? लोकांच्या ठेवी स्वीका-रून व त्याची मागणी आल्यावर त्या परत करूं अशा रीतीनें बांधून घेतल्यावर पेढयांनीं त्या ठेवींबद्दल लोकांना व्याज देणें हें कितपत इष्ट आहे हा मोठाच प्रश्न आहे. मनुष्य पेढीजवळ ठेव ठेवतो, ह्याचा असा अर्थ आहे कीं, त्याला ती रकम एखाद्या धंद्यांत कायमची गुंतविण्याची इच्छा नसून जरूर पडेल तेव्हां त्याला ती चटकन् मिळावी. वास्तविक ही रकम त्यानें आपल्याजवळच ठेवावयास पाहिजे; पण जवळ ठेवणें सुरक्षित नसल्यामुळें ती रकम तो पेढीजवळ ठेवीत असतो. पण हीच रकम पेढयांनीं स्वीकारल्यावर तिचा आपणांस दीर्घकालपर्यंत उप-योग करतां येईल अशा समजूतीनें जर त्यांनीं ती कोठें तरी गुंतविली तर ती परत मागण्यास लोक आले असतांना त्या पेढयांना ती परत देणें केव्हांही कठीणच जाणार; कारण एकदां ती रकम व्यापारांत खेळूं लागली म्हणजे ती

देशांतल्या देशांतच न राहतां अन्य देशांतही गुंतण्याचा संभव असतो. पेढया एकदां लोकांच्या ठेवींवर व्याज देऊं लागल्या म्हणजे त्या ठेवी स्टॉक, बॉंडसारखे रोखे विकत घेऊन बराच वेळपर्यंत गुंतविण्याचा त्यांना मोह आवरत नाहीं; व पेढया आपणांस थोड्या मुदतीच्या ठेवींवर व्याज देऊं शकतात व तें व्याज कांहीं थोडें नसतें असें लोकांना कळल्यावर ते आपल्या ठेवी भराभर त्यांच्याकडे आणूं लागतात. विशेषतः सट्टेबाजी मोठ्या प्रमाणांत सुरू झाली म्हणजे पेढया व लोक ह्या दोघांनाही एक प्रकारचें अवसान येतें. हे सट्टेवाले लोक आपला धंदा जोरांत सुरु करूं लागले म्हणजे स्टॉकची व जिनसाची किंमत फाजील वाढूं लागते व एकदां बोजवारा उडाला म्हणजे सट्टेवाले, पेढ्या व लोक हे एकदम पैशाची मागणी करूं लागतात, व अशा वेळीं बिचारे गरीब लोक व पेढया ह्या तोंड-घशीं पडतात. तेव्हां पेढयांनीं नेहमीं थोड्या मुदतीच्या ठेवीवर कधीं व्याज देऊं नये हा उत्तम नियम होय.

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(इ) मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविणें व परराष्ट्रीय हुंड्याची खरेदीविक्री करणें.

ठेवी व हुंड्याः—आतांपर्यंत आपण पेढयांच्या दोन कामांचा विचार केला. ह्याशिवाय पेढया इतरही बरींच कामें करीत असतात त्यांचाहि येथें सविस्तर विचार करूं.

वर आपण पाहिलेंच आहे कीं, लोकांच्या ठेवी स्वीकारणें हें पेढयांचें काम आहे. पण हा ठेवींचा पैसा त्याची पूजा करण्याकरितां म्हणन पेढया जवळ ठेवीत नाहींत, तर तो पैसा व्याजीं लावून त्यापासून नफा मिळविणें हें त्या पेढयाचें ध्येय असतें. आपण वर पाहिलेंच आहे कीं, पुष्कळ मुदतीच्या बोलीनें कोणास गहाण ठेवून रकम कर्जाऊ देणें हें पेढयांस परवडत नाहीं. कारण त्यांचें भांडवल लोकांकडून घेतलें असल्यामुळें व लोक आपले पैसे परत केव्हां मागतील हें

निश्चित ठाऊक नसल्यामुळें ह्या पेढयांना नेहमीं आपली रकम तयार ठेवावी लागते. तेव्हां पेढयांनीं जर कर्जाऊ रकमा द्यावयाच्या असतील तर त्या थोड्या मुदतींनेंच दिल्या पाहिजेत व आपण दिलेली कर्जाऊ रकम कशी उपयोगांत आणली जात आहे हेंहि त्या पेढयांस पाहतां आलें पाहिजे.

ह्या सर्व गोष्टी साध्य होण्यास एकच मार्ग आहे, तो असा. एखादा व्यापारी आपला माल दुसऱ्या एका व्यापाऱ्यास विकतो. हे दोघे व्यापारी एकाच गांवांत असले तर माल विकत घेणारा व्यापारी, माल विकणाऱ्या व्यापाऱ्यास तो माल हातीं पडल्यामुळें तावडतोब पैसे चुकते करील. पण अशी कल्पना करा कीं, माल विकणारा व्यापारी विलायतेमध्यें आहे व माल खरेदी करणारा व्यापारी हिंदुस्थानांत आहे. अशा वेळीं हिंदुस्थानाचा व्यापारी आपल्या हातीं माल सुरक्षित पडण्यापूर्वी विलायतच्या व्यापाऱ्यास पैसे पाठविण्यास अर्थातच कुरकुर करील. कारण विलायतेहून माल निघून ह्या देशांत हातीं पडण्यास व त्या मालाची विक्री होऊन पदरांत पैसे पडण्यास एक दोन महिन्यांचा कालावधि लागणार. बरें, विलायतेच्या व्यापाऱ्यानें एकदां लंडनहून माल पाठविल्यावर मग पैसे मिळण्याची वाट कां पहावी ? ह्या अडचणींतून बाहेर पडण्यास हल्लीं व्यापाराची वाढ झाल्यामुळें एक युक्ती लोकांस सुचलेली आहे. ती अशी कीं, विलायतेचा व्यापारी आपला माल पाठविल्यानंतर आपल्या गिऱ्हाईकावर एक हुंडी काढतो. ही हुंडी अर्थातच कांहीं मुदतीची असते. ही हुंडी घेऊन तो व्यापारी आपल्या पेढीकडे जातो व त्या हुंडीच्या शहाजोगीबद्दल पेढीची खात्री पटवितो. नंतर ती पेढी हुंडीच्यामागें आपली सही करून व त्या हुंडीबरोबरच माल पाठविल्याबद्दलचे कागद आपल्या हिंदुस्थानांतील शाखेकडे पाठविते. हे कागद हातीं पडल्यानंतरचें ह्या शाखेचें काम म्हणजे ज्या व्यापाऱ्यावर विलायतेच्या व्यापाऱ्यानें हुंडी काढिलेली असते, त्याकडे ती हुंडी घेऊन जाणें हें होय. त्या हुंडीचा स्वीकार त्या व्यापाऱ्यानें केल्यावर विलायतेच्या व्यापाऱ्याला तेथील पेढी त्या हुंडीवरील लिहिलेल्या रकमेचें कटमितीनें व्याज कापून बाकीची रकम तावडतोब देत असते. कधींकधीं पेढीचा पूर्ण विश्वास जर हुंडी घेऊन येणाऱ्या माणसावर असेल तर इतकी वाट न पाहतां तावडतोब ती पेढी त्या माणसास रकम चुकती करीत असते. असो. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यावर काढिलेल्या हुंडीची मुदत पुरी झाल्यावर विलायतेच्या पेढीची शाखा

त्या हुंडीचे पैसे वसूल करते. पेढीलाही कटमितीनें हुंड्या वटविणें फायदेशीर असतें. कारण आपले पैसे परत मागणाऱ्या लोकांची रास्त मागणी पुरविण्याकरितां लागणारा पैसा तिला थोड्या मुदतीच्या हुंड्या विकून चटकन् निर्माण करितां येतो. पेढीच्या ह्या व्यवहाराला **कटमितीनें पैसे देणें** हें नांव आहे. अशा रीतीनें पैसे देणें काय किंवा एखाद्यास कर्ज देणें काय, दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. फक्त दोघांत फरक इतकाच असतो कीं, कर्ज बऱ्याच मुदतीचें असूं शकेल व कटमितीनें पैसे देणें हें फार तर तीन महिन्यांच्या बोलीनें असतें व त्यामुळें ठेवी ठेवणाऱ्या माणसांना वाटेल तेव्हां त्यांच्या ठेवी परत करण्याची त्यांची तयारी असते.

अशा तऱ्हेनें थोड्या मुदतीनें कर्ज देण्यांत दुसरा असा एक फायदा असतो कीं, ह्यामध्यें धोका बिलकूल असत नाहीं; कारण ह्या हुंडीवर ती काढणारा व स्वीकारणारा ह्या दोघांची तरी निदान सही असते, व जितक्या लोकांच्या हातांतून ती जाते तितक्या लोकांची सही तिच्यावर असल्यामुळें त्या हुंडीला जास्तच सुरक्षितता येते.

पण पेढ्या नुसतें कटमितीनें उसने पैसे देण्याचें काम करीत नाहींत, तर कधीं कधीं शहाजोग तारणावरही अगाऊ रकमा त्या देत असतात. अर्थात् ह्या तारणांची किंमत व कर्जाऊ रकमेची किंमत ह्यांमध्यें अंतर ठेवूनच पेढ्यांना कर्ज द्यावें लागतें. ह्या तारणावर कर्ज देण्याशिवाय कधीं कधीं आपल्या कुळांना त्यांनीं ठेवलेल्या रकमेपेक्षां जास्त रकम ह्या पेढ्या कर्जानें देत असतात; पण असें करण्यांत बराच धोका असतो. कुळ जर शहाजोग असेल व तें जर पेढीजवळ नेहमीं पैसे ठेवीत असेल तर तिनें असे जास्त पैसे देण्यास फारशी हरकत नाहीं; पण बँक ऑफ् फ्रान्स ही पेढी असा व्यवहार कधींही करीत नाहीं.

परराष्ट्रीय हुंड्याः—आतांपर्यंत पेढीचेंही तीन प्रकारचें काम आपण पाहिलें. पण एवढें सांगितल्यानें तिच्या कामाची याद संपत नाहीं. हल्लीं जगांतील सर्व राष्ट्रांचा परस्पर व्यापारी संबंध निकट येत असल्यामुळें एका देशच्या व्यापाऱ्यानें दुसऱ्या देशच्या व्यापाऱ्यावर काढिलेल्या हुंड्यांचा व्यापार करणें हें एक पेढ्यांचें मोठें काम होऊन बसलें आहे. हल्लीं अमेरिका किंवा इंग्लंडसारख्या देशांत असलेल्या पेढ्यांचीं जुगदानें जर आपण तपासून पाहिलीं तर आपणांस असें

दिसून येईल कीं, त्यांमध्यें निरनिराळ्या देशांवर काढिलेल्या कोडो रुपयांच्या हुंड्या ठेविलेल्या असतात. अर्थात् ह्या हुंड्यांचा व्यापार करणारे पेढीवाले हे नुसते अडत्ये असतात. ह्यांचें काम म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें स्वदेशांतल्या व्यापाऱ्यानें परदेशी व्यापाऱ्यावर माल विकल्यावर काढिलेल्या हुंड्या विकत घेणें व परदेशी व्यापाऱ्यापासून माल विकत घेतल्यावर त्यानें काढिलेल्या हुंडीचे पैसे भरूं इच्छिणाऱ्या त्या स्वदेशी व्यापाऱ्याला त्या हुंड्या विकत देणें हें असतें. ह्या पेढ्यांचें जर अस्तित्व नसतें तर दोन देशांमध्यें असलेल्या ह्या व्यापाऱ्यांना रोख रुपये किंवा पौंड एकमेकांना पाठवावे लागले असते व विनाकारण पैसे पाठविण्याबद्दल त्रास व भाडें द्यावें लागलें असतें. शिवाय असे पैसे पाठविण्यांत दुसऱ्याही अडचणी आल्या असत्या. उदाहरणार्थ, एखाद्या देशांतल्या व्यापाऱ्याला मालाच्या किंमतीबद्दल देशांत सोन्याचें नाणें नसल्यामुळें रुपयेच पाठविणें शक्य आहे; पण ज्या देशच्या व्यापाऱ्याला पैसे पाठवावयाचे तेथें रुपये चालत नसले—कारण तेथें सोन्याचें नाणें चालू आहे—तर अशा प्रसंगीं त्या व्यापाऱ्यानें सोन्याचें नाणें कोठून पैदा करावें ? ही अडचण टाळण्यास ह्या हुंड्यांनीं पैशाचा व्यवहार करणें हा एकच मार्ग आहे.

हुंडणावळीचा दरः—आतां कोणाची अशी कल्पना होईल कीं, ह्या हुंड्यांवर जितकी किंमत लिहिलेली असते तितकेच रुपये किंवा पौंड ती हुंडी विकल्यावर व्यापाऱ्यास मिळूं शकतात; पण खरी स्थिति अशी नसते. कारण ह्या हुंडीची किंमत ती काढणाऱ्या माणसाच्या पतीवर व तिच्या मुदतीवर अवलंबून राहील; पण हीं जरी सामान्य कारणें सोडलीं तरी तिसरें एक महत्वाचें कारण ह्या हुंडीची किंमत ठरवितें. तें कारण म्हणजे ह्या हुंडीवर असलेली मागणी व तिचा पुरवठा हें होय.

आपण अशी कल्पना करूं कीं, हिंदुस्थानचा निर्गत माल तीनशें कोट रुपयांचा आहे व इतके रुपये ह्या देशाला इतर परराष्ट्रांपासून घ्यावयाचे आहेत. त्याचप्रमाणें ह्या देशाचा आयात माल ४०० कोटींचा असून त्या मालाबद्दल त्या परराष्ट्रांना तितके रुपये त्याला द्यावे लागणार आहेत. अशा प्रसंगीं जितक्या हुंड्या पैसे पाठविणारांना पाहिजे आहेत तितक्या सर्वांना मिळणें शक्य नाहीं. कारण हिंदुस्थानला घेण्यापेक्षां देणेंच जास्ती आहे. तेव्हां ज्यांना हुंड्या हव्या असतील,

त्यांच्यामध्यें चढाओढ होऊन परराष्ट्रावर काढिल्या जाणाऱ्या हुंड्याचा भाव जरूर वाढेल. उदाहरणार्थ, लंडन येथें पटविली जाणारी हुंडी जर एक हजार रुपयांची असली, तर ती हुंडी त्या शहरीं १,००५ रुपयांस विकली जाईल. हेंच विधान पारिभाषिक शब्दांत करावयाचें म्हणजे ती हुंडी अधिकोत्तर आहे; (Above Par). ह्याच्या उलट हिंदुस्तानचा निर्गत माल ४०० कोटींचा झाला असें आपण समजूं व आयात माल ३०० कोटींचा झाला असें गृहीत धरूं. ह्या वेळीं हुंड्या जास्त काढल्या जाऊन त्यांना मागणी फारशी रहाणार नाहीं व दुसरीकडे पटविल्या जाव्या म्हणून त्यांना पेढ्या बाहेर पाठवून देऊं लागतील; म्हणजे लंडनवर काढिलेली १,००० रुपयांची हुंडी येथें पटविली गेली तर तिजबद्दल ९९५ रुपये मिळूं लागतील; म्हणजे ती हुंडी नीचोत्तर आहे (Below Par) असें समजावें. तेव्हां एकाद्या देशांत परदेशी पटविली जाणारी हुंडी अधिकोत्तर आहे असें जर कोणीं म्हटलें तर तेथें हुंडणावळीचा भाव प्रतिकूल आहे असें समजण्यांत येतें; पण प्रतिकूल म्हणजे कोणाला ? तो जर हुंड्या विकत घेणारांना प्रतिकूल असेल तर त्या हुंड्या विकणारांना तो खास अनुकूल असूं शकेल. तेव्हां प्रतिकूल दर ह्याचा इतकाच अर्थ घ्यावयाचा कीं, त्या देशाला परराष्ट्रापासून जितकें घेणें आहे त्यापेक्षां त्या राष्ट्राचें देणें जास्त आहे; अतएव बाकी पूज्य राहण्याकरितां त्या देशाला परदेशी कांहीं रकम पाठविली पाहिजे. तेव्हां हुंडणावळीचा दर चढूं लागणें ही देशांतून पैसा बाहेर जाण्याची खूण आहे असें आपण समजावें. ह्याच्याउलट हा भाव उतरूं लागला म्हणजे देशांत बाहेरून पैसा येऊं लागणार असें मानण्यास हरकत नाहीं.

वरील विवेचनावरून आपणांस असें वाटूं लागेल कीं, हुंडणावळीचा भाव प्रतिकूल असणें हें एक मोठें देशास संकटच आहे; त्याचप्रमाणें तो अनुकूल असून उतरणें हें मोठें फायद्याचें आहे. पण ही कल्पना वास्तविक चुकीची आहे; कारण हुंडणावळीचा भाव चढून किंवा उतरून नाणें देशांतून बाहेर जाणें किंवा देशांत येणें हें तात्पुरतें असतें व हुंडणावळीचा दर लवकरच स्थिर होऊं लागतो. पण असें जरी असलें तरी पेढ्यांच्या दृष्टीनें देशांतून पैसा कांहीं वेळ का होईना बाहेर जाणें ही बाब महत्वाची असते; कारण पैसा बाहेर पाठवावयाचा म्हणून लोक तावडतोब पेढ्यांवर मागणी करूं लागतात. तेव्हां बाहेर पैसा जाऊं लागणार हें

ज्या गोष्टींमुळें कळतें त्या सर्वांवर ह्या पेढ्यांची नेहमीं टेहळणी असते व हुंडणावळीचा भाव काय आहे हें त्या पेढ्या नेहमीं डोळ्यांत तेल घालून पहात असतात.

हुंडणावळीचा दर स्थिर रहाण्याचीं कारणें; (१) सुवर्ण-मर्यादा—पण आपण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, हुंड्यांच्या भावांत फारशी चलबिचल होत नसते व जरी ती चलबिचल झाली तरी तिचें क्षेत्र बरेंच मर्यादित असतें. एक दोन अपवादाचे प्रसंग वगळले तर सामान्य प्रसंगीं हा भाव स्थिर असतो; ह्याचें कारण असें आहे कीं, व्यापारी लोक हुंड्या विकण्याची किंवा विकत घेण्याची जी इच्छा करतात त्याचें कारण नेहमींच्या सीध्या मार्गानें म्हणजे पोस्टानें पैसे पाठविण्यापेक्षां हुंड्या विकत घेणं व विकणें हें त्यांना कमी खर्चाचें अतएव किफायतशीर असतें. पण हें हुंड्या विकत घेणें किंवा विकणें पैसे पाठविण्यापेक्षां जर जास्त फायदेशीर न होईल तर ते व्यापारी पैसेच पाठवूं लागतील' हुंड्या विकत घेणार नाहींत. अशाच प्रसंगाला इंग्रजीमध्यें Gold point हें नांव आहे. पेढ्यांना अशी स्थिति येणें इष्ट नसतें म्हणून ते हुंड्यांचा भाव फारसा चढवीत नाहींत.

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, देशांत बाहेरून सोनें येण्याच्या व देशांतून बाहेर सोनें जाण्याच्या मर्यादा प्रत्यक्ष व्यवहारांत स्पष्टपणें दिसून येत नाहींत; म्हणजे एखाद्या देशाला हुंडणावळीचा दर प्रतिकूल असूनही तो आपलें सोनें दुसऱ्या देशांत पाठवीत नाहीं. उदाहरणार्थ, जर्मनी व इंग्लंड ह्या दोन देशांत व्यापार मोठ्या प्रमाणांत चालत असतो व कित्येक वेळां जर्मनीच्या व्यापाऱ्यांना लंडन येथील व्यापाऱ्यांवर काढलेल्या हुंड्या विकत घेण्यापेक्षां प्रत्यक्ष सोनेंच पाठविणें अधिक किफायतशीर वाटत असतें; पण जर्मनींतली इम्पेरिअल बँक व तेथील साम्राज्यसरकार त्यांना देशांतून सोनें बाहेर जाणें इष्ट वाटत नसल्यामुळें, त्यांच्या कारवाईमुळें तेथील व्यापाऱ्यांना लंडनला सोनें पाठवितांच येत नाहीं. तेव्हां सोन्याच्या आयात-निर्गतीच्या मर्यादा दग्गोचर होण्यास इतर देशांत सोन्याच्या हालचालीवर कसलाही निर्बंध असतां कामा नये हें उघड आहे. पण ज्या वेळीं लंडन येथील व्यापाऱ्यांना दुसऱ्या देशांवर काढलेल्या हुंड्या विकत घेण्यापेक्षां सोनें पाठविणेंच श्रेयस्कर

वाटतें त्या वेळीं प्रत्यक्ष असा अनुभव येतो कीं, ही मर्यादा प्राप्त होण्याच्यापूर्वींच लंडन येथील सोनें बाहेर जात असतें. ह्याचें कारण असें आहे कीं, ही मर्यादा केव्हां सुरू होते–म्हणजे अन्य राष्ट्रांवर काढलेल्या हुंड्या विकत घेण्यापेक्षां सोनेंच प्रत्यक्ष बाहेर पाठविणें हें केव्हां फायदेशीर होऊं लागतें–हें निश्चित करणेंच तज्ज्ञांना-सुद्धां कठिण जातें. तेव्हां देशांतून सोनें बाहेर जाणें किंवा तें देशांत येणें ह्याबद्दलचें आम्हीं केलेलें विधान सामान्यपणें खरें असतें असेंच वाचकांनीं समजलें पाहिजे. सरते शेवटीं एका गोष्टीचा उल्लेख करणें आवश्यक आहे. कांहीं आगंतुक कारणांनीं देशांतून पैसा बाहेर जाऊं लागला म्हणजे कांहीं लोकांना देशावर आपत्ति कोसळली असें वाटत असतें; पण वास्तविक तशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. व्यापार चालू असताना देशांतून नाणें बाहेर जाणें किंवा तें बाहेरून आंत येणें ह्या गोष्टीचें फारसें महत्व नाहीं. इंग्लंडमधून दर वर्षीं मोठ्या प्रमाणांत सोनें बाहेर जात असतें; पण त्यामुळें इंग्लंडची स्थिति आर्थिक व व्यापारी दृष्ट्या खालावली आहे असें कोणी समजत नाहीं. शिवाय आपण हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, देशांतून सोनें बाहेर जाऊं लागलें म्हणजे तें जाण्यास प्रतिबंधक अशी अनुकूल परिस्थिति लवकरच उत्पन्न होते. कारण देशांतून पैसा बाहेर जाऊं लागला म्हणजे त्याच देशांत तो दुर्मिळ होऊं लागतो, व तसा तो झाला म्हणजे अर्थातच वस्तूंच्या किंमती उतरूं लागतात. आणि देशांत किंमत कमी येऊं लागल्यामुळें माल परदेशांत जास्त किंमत देईल ह्या आशेनें बाहेर पाठविण्याची प्रवृत्ति व्यापाऱ्यांत दिसून येते. ह्याच्या उलट ज्या देशांत सोनें बाहेरून येऊं लागतें तेथें पैसा फार झाल्यामुळें किंमती वाढूं लागतात व त्यामुळें बाहेरून (म्हणजे ज्या देशांत वर सांगितलेल्या कारणांनीं किंमती उतरलेल्या असतात तेथून) जास्त प्रमाणांत माल येऊं लागतो. ह्याचा असा परिणाम होतो कीं, दोन्ही देशांत पुनः किंमती स्थिरावूं लागतात. तेव्हां आपण असें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं, जितक्या जास्त प्रमाणांत व जितक्या जास्त वेळ हें सोनें बाहेर जात राहील तितक्या लवकर व खात्रीनें तें सोनें बाहेर जाण्याचें थांबेल. तेव्हां एकंदरींत कांहीं वेळ सोनें देशांतून बाहेर गेल्यानें देशाचें नुकसान होत नाहीं. तुम्हीं भगीरथ प्रयत्न केलेत तरी कांहीं सोनें देशांतून बाहेर जाणारच. कटमितीचा दर वाढविणें ह्यासारख्या *युक्त्या अमलांत आणून सोनें बाहेर पाठविण्याची प्रवृत्ति सर्वस्वीं थांबविणें केव्हांही

* ह्या मुद्याचा सविस्तर विचार पुढें करण्यांत येणारच आहे. 'कटमितीचा व्याजाचा दर व तो पाठविल्यानें होणारे परिणाम' हें सदर पहा.

शक्य नाहीं. एखादा देश दुसऱ्या देशास सारखा माल पाठवीत राहिला व तितक्याच किंमतीचा माल त्या दुसऱ्या राष्ट्रापासून घेत नसला व ही स्थिति बरीच वर्षें टिकली तर त्या देशांत सोनें आलेंच पाहिजे. हिंदुस्थानचा विलायतेस पाठविला जाणारा माल तिकडून ह्या देशांत येणाऱ्या मालापेक्षां नेहमीं जास्त असतो व वाटेल ते लपंडाव करून विलायत सरकार व स्टेट सेक्रेटरी ह्यांनीं जंगजंग पछाडले तरी थोडेंबहुत सोनें ह्या देशांत येत असतेंच असा आपला अनुभव आहे. तेव्हां जी गोष्ट अवश्यंभावि आहे तिच्याबद्दल कुरकुरून काय फायदा ? शिवाय वर सांगितल्याप्रमाणें सोन्याच्या हालचालीमुळें एकंदरींत फायदाच झालेला आहे; कारण त्यामुळें जिनसांच्या किंमती स्थिरावतात हेंसुद्धां आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

२. **व्यापारी परिस्थिति**:—पण सुवर्णमर्यादेशिवाय हुंड्यांचा भाव स्थिर रहाण्यास दुसरेंही एक कारण आहे. आपण अशी कल्पना करूं कीं, येथील व्यापाऱ्यानें पॅरिसवर १ हजार फ्रँकांची हुंडी काढली व त्या हुंडीबद्दल त्याला नेहमीं १०१० फ्रँक मिळतात; पण ह्या विशिष्ट प्रसंगीं त्याला १०११ फ्रँक मिळूं लागले म्हणजे आजपर्यंत तटस्थ असलेल्या व्यापाऱ्यांचे तोंडास पाणी सुटून तेसुद्धां अशा हुंड्या विकूं लागतील. अशा रीतीनें हुंडणावळीचा भाव चढूं लागला म्हणजे हिंदुस्थानच्या निर्गत मालास उठाव मिळतो व पॅरिस येथील व्यापाऱ्यानें आपला १,००० फ्रँक किंमतीचा माल जर हिंदुस्थानांत विकला तर त्याला ९९० फ्रँकच मिळत असल्या कारणानें तेथील माल बाहेर न पाठविण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. ह्याचा एकंदर परिणाम असा होतो कीं, निर्गत मालाची विक्री वाढत चालली असतांना ह्या मालाबद्दल काढिलेल्या हुंड्यांची संख्या वाढूं लागते व त्यामुळें त्यांची किंमत उतरूं लागून ती मूळपदावर येऊं लागते. तसेंच हुंड्यांची किंमत जर उतरूं लागली तर त्यामुळें ज्या व्यापाऱ्यांनीं आपला माल परदेशांत विकला असेल त्या व्यापाऱ्यांचें नुकसान व्हावयास लागून ते आपला माल बाहेर पाठविणार नाहींत, व त्यामुळें फारशा हुंड्या परदेशावर काढल्या जाणार नाहींत, आणि त्यामुळें त्यांची किंमत चढूं लागून ती पूर्ण पदावर येऊं लागेल. अशा रीतीनें हुंडणावळीच्या भावाचें कमीजास्त होण्याचें प्रमाण फारसें न वाढतां तो भाव सरासा राहील.

हुंडणावळीचा दर केव्हां स्थिर नसतो.:—वर आम्हीं असें विधान केलें आहे कीं, एक दोन अपवादांचे प्रसंग वगळले असतां इतर प्रसंगीं हुंडणावळीचा भाव स्थिर असतो. ते प्रसंग असेः—

ज्या ठिकाणावर एखाद्या व्यापाऱ्यानें आपला माल विकून हुंडी काढली असेल तें ठिकाण जर फार दूर असेल व तेथें दळणवळणाचे मार्ग नसतील व त्याला तेथें रोख पैसे पाठविणें फार कठीण व खर्चाचें होईल तर त्या व्यापाऱ्यानें काढिलेली हुंडी विकत घेण्यास फारसे लोक येणार नाहींत; त्यामुळें तो आपली हुंडी शेंकडा १० किंवा १२ टक्के नुकसान सोसूनही विकण्यास तयार होईल. अशा प्रसंगीं हुंडणावळीचा भाव नेहमीं चंचल असतो.

त्याचप्रमाणें ज्या देशावर हुंडी काढलेली असेल त्या देशांत जर नाण्याची किंवा नोटांची किंमत उतरली असेल तर त्या हुंडीचा भाव कधींही स्थिर रहाणार नाहीं. तसेंच एखाद्या देशाला दुसऱ्या राष्ट्राचें कर्ज असल्यामुळें त्या राष्ट्राला पुरेसें सोनें मिळत नाहीं किंवा त्या राष्ट्राची पत बेताचीच आहे वगैरे अडचणी आहेत; अशा वेळीं हुंडणावळीचा भाव बराच चढलेला असतो व तो लवकर स्थिरावत नाहीं.

कटमितीच्या व्याजाचा दर व तो वाढविल्यानें होणारे परिणामः— अर्वाचीन पेढ्यांच्या कारभारांत सर्वांत विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे कटमितीच्या व्याजाचा दर ही होय.

कटमितीचा दर जेव्हां पेढ्या वाढवीत असतात तेव्हां पेढीवाल्यांचा त्यामुळें फायदा होत असतो असाच त्याचा अर्थ आपण समजला पाहिजे. पण हा कांहीं आर्थिकदृष्ट्या महत्वाचा मुद्दा नव्हे. ज्या वेळीं ह्या दरांत वाढ होऊं लागते त्यावेळीं आपण असें खास समजावें कीं, उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कर्जाची मागणी पेढ्याकडे कमी प्रमाणांत होऊं लागते व सराफकट्टयावर होणाऱ्या व्यवहारांत सट्टेबाजी कमी प्रमाणांत होऊं लागते; तसेंच परदेशाच्या व्यापारांत देण्याकरितां लागणाऱ्या कर्जाच्या रकमेची मागणी कमी प्रमाणांत होऊन व त्यामुळें परदेशीं सोनें न जातां देशांतल्या देशांत पैसा राहून उद्योगधंद्याला चांगली मदत होत असते. इतकेंच नव्हे तर बाहेरून पैसा देशांत येऊं लागतो. ह्या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, पेढ्यांनीं काढिलेल्या नोटा व सरकारनें काढिलेलीं नाणीं ह्याच प्रमाण

असावें तसें असतें व नोटांचा व्यवहार नाणें भरपूर असल्यामुळें कमी प्रमाणांत होऊं लागतो. ह्याच मुद्याचें आपण जरा सविस्तर विवरण करूं.

वर सांगितलेंच आहे कीं, हा कटमितीचा दर वाढविल्यानें व्यापारी वर्गाकडून पेढ्यांवर कर्जाची मागणी फारशी होत नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, हा कटमितीचा दर वाढला म्हणजे व्यापारी लोकांना पेढ्यांकडून ह्या वाढलेल्या दरानें कर्ज काढणें फायदेशीर होत नाहीं. कारण ह्यांचे धंदे मोठ्या प्रमाणांत चालत असल्यामुळें अगोदरच त्यांना मोठ्या प्रमाणांत नफा मिळत नाहीं व पेढीचा दर वाढूं लागला म्हणजे ह्या नफ्याचें मान कमी होऊं लागतें. अर्थात् पेढ्यांकडे व्यापारी लोक हुंड्या नेत नाहींत व त्यामुळें नाण्याची फारशी जरूरी लागत नाहीं व थोड्या नाण्याच्या जोरावर जास्त नोटा काढण्याची जी पेढ्यांची प्रवृत्ति दिसून येत्ये तिला आळा बसूं लागतो. पण हा दर वाढल्यानें व्यापारी वर्गावर जो परिणाम होत असतो त्यापेक्षां सराफकट्टयावर सट्टेबाजी करणाऱ्या दलालांवर होणारा परिणाम जास्त असतो. व्यापारी लोकांना लागणारें कर्ज निदान नेहमींच्या चालू असलेल्या उद्योगधंद्याकरितां तरी असतें व देशांत कांहीं कारणानें पैशाची फार मागणी होऊन त्याबरोबरच उद्योगधंदा खरोखरच मंदावला असल्याशिवाय ह्या व्यापारी लोकांकडून होणारी कर्जाची मागणी कमी होत नाहीं. सराफकट्टयावर रोख्यांचे दलाल जे सट्टे करीत असतात त्यांत त्यांना नफा फारच थोडया प्रमणांत होत असल्यामुळें व रोखे विकत घेणें व विकणें हा धंदा इतर धंद्याच्या मानानें अधिक चंचल असल्यामुळें पेढ्यांनीं जरा हा दर वाढविला, कीं हे दलाल तावडतोब आपला धंदा आवरतां घेतात त्यामुळें त्यांची पेढ्यांवर होणारी कर्जाची मागणी कमी प्रमाणांत होऊं लागते व पेढ्यांना मग नोटाही फारशा काढाव्या लागत नाहींत.

वरील विवेचनावरून वाचकांस दिसून येईल कीं, सराफकट्टा व कटमितीचा दर ह्यांत निकट संबंध आहे. सराफकट्टयावर सरकारी रोखे किंवा स्टॉक व *शेअर ह्यांची खरेदी किंवा विक्री नेहमीं चाललेली असते. पुष्कळ वेळां पेढ्या परदेशांत आप-

* स्टॉक व शेअर हे शब्द व्यापारामध्यें नेहमीं येत असतात. दोन्ही शब्दांचा स्थूलमानानें भाग असा अर्थ होतो; पण ह्या दोन शब्दांनीं जरा भिन्न अर्थ व्यक्त केला जातो. एखादें सरकार राष्ट्रीय कर्ज काढीत असतें किंवा एखादी कंपनी

णांसद्यावयाचें कर्ज ह्या रोख्यांच्या रूपानें फेडीत असतात; कारण व्यापारी हुंड्या विकून पैसे वसूल करणें हें कांहीं कांहीं प्रसंगीं फायदेशीर नसतें. तेव्हां देशांतील पेढ्यांनीं आपला कटमितीचा दर वाढविला म्हणजे साहजिकच त्या रोख्यांची किंमत उतरूं लागते. उदाहरणार्थ, आपण अशी कल्पना करूं कीं, कटमितीचा दर वाढण्यापूर्वी एखाद्या १९० पौंडांचा रोखा जर शेंकडा ३ ह्या मनोतीच्या दरानें ९७ पौंडांस मिळत असला तर तो मनोतीचा दर ६ पर्यंत वाढल्याबरोबर आतां तोच रोखा ९४ पौंडांस मिळूं लागेल. म्हणजे ह्याचा असा परिणाम होऊं लागेल कीं, इतर देशांतील दलाल व पेढ्या ह्या देशांत आपल्याजवळचें सोनें पाठवून ते रोखे विकत घेऊं लागतील व देशांतील पैसा बाहेर न जातां उलट बाहेरचाच पैसा देशांत येऊं लागेल.

तेव्हां एखाद्या देशांत आपला पैसा बाहेर जाऊं न देतां अन्य देशांतील सोनें आपल्याकडे आणावयाचें असेल तर सर्वांत सोपी युक्ति म्हटली म्हणजे देशांतील कटमित्तीचा दर वाढविणें ही होय. देशांतून बाहेर पैसा जाण्याला अनेक कारणें असतात. उदाहरणार्थ, एखाद्या देशानें दुसऱ्या देशाला जितका माल पाठविला असेल त्यापेक्षां त्याच्याकडे त्या दुसऱ्या देशांतून जास्त माल आला म्हणजे अर्थातच पहिल्या देशांतून दुसऱ्या देशांत पैसा गेलाच पाहिजे. आपण अशी कल्पना करूं कीं, हिंदुस्थानमध्यें दुष्काळ पडल्यामुळें कानडा देशांतून त्याला गहूं आणावा लागला. दोन देशांतील सर्व जिनसांच्या आयातनिर्गतीचा एकंदर हिशेब करतांना आपणांस असें आढळून आलें कीं, १५ कोट रुपयांचा गहू ह्या देशांत जास्त आलेला आहे. ही रकम पाठवावयाची म्हणजे लोकांनीं पेढ्यांतून आपले पैसे काढून घेतले पाहिजेत. ही रकम साहजिकच सोन्याच्या रूपानें बाहेर गेली

आपलें भांडवल विकावयास काढीत असतें. ज्या माणसाला तें घ्यावयाचें असेल त्याला त्याच्या इच्छेप्रमाणें त्याचे विभाग करून घेतां येतात. उदाहरणार्थ, एखाद्या कंपनीचें भांडवल १,००,००० रुपयांचें असलें तर त्या माणसाला १ रुपयापासून वाटेल तितक्या रकमेपर्यंत तें घेतां येईल; पण शेअरची अशी स्थिति नसते. एखादी कंपनी आपले शेअर जितक्या रुपयांचे ठरवील तितके रुपये देऊनच त्याला ते शेअर विकत घ्यावे लागतील. उदाहरणार्थ, तो शेअर १०० रुपयांचा असला तर तेवढे रुपये देऊनच त्याला तो शेअर विकत घ्यावा लागेल.

पाहिजे.कागदी नोटांच्या रूपानें ती पाठविली तर ती कानडामध्यें कोणीही स्वीकारणार नाहीं; कारण हिंदुस्थानच्या कागदी नोटांना कानडा येथील सरकार भिन्न असल्यामुळें कोणीहीं विचारणार नाहीं. इतकी मोठी रकम देशांतून सोन्याचे रूपानें जाणें मोठें आर्थिक संकटच होय. हें संकट टाळावयाचें असल्यास पेढ्यांनीं कटमित्तीचा दर वाढविला पाहिजे. असा दर वाढविला म्हणजे देशामध्यें एकदम बाहेरून पैसा येऊं लागतो. निदान देशांतला पैसा बाहेर जाण्याचें थांबतें ही गोष्ट खास. कारण कटमित्तीचा दर वाढला गेल्या कारणानें व्यापारी हुंड्या, सराफकट्ट्यावरील रोखे ह्यांची किंमत उतरूं लागते; म्हणजे हा दर चढण्यापूर्वी एखाद्या १०० रुपये हुंडीची किंमत शेंकडा तीन ह्या कटमित्तीच्या दरानें जर ९७ रुपये असली तर तो दर ४ रुपयांनीं वाढल्यानें आतां त्या हुंडीची किंमत ९३ रुपये यावयास लागेल व परदेशचे व्यापाऱ्यांना ह्या स्वस्त दरानें विकल्या जाणाऱ्या हुंड्या विकत घेण्याकरितां आपले पैसे पाठवावे असें वाटूं लागून ते आपले पैसे ह्या देशांत पाठवितील. ह्या हुंड्यांची किंमत उतरण्याचा दुसराही एक असा परिणाम होऊं लागतो कीं, व्यापाऱ्यांना आपल्याजवळच्या हुंड्या विकणें न परवडल्यामुळें ते आपल्या मालाची किंमत कमी करतात व ह्या स्वस्त मालास बाहेरून मागणी येऊं लागल्यामुळें बाहेरून पैसा अधिक अधिक येऊं लागतो.

पण अशा रीतीनें देशांत बाहेरून खात्रीनें पैसा यावा अशी जर आपली इच्छा असेल तर देशांतील मध्यवर्ति पेढीनें आपला कटमित्तीचा दर वाढविल्याबरोबर व असा दर चटकन् वाढविणें तिलाच शक्य व सुलभ आहे—इतर पेढ्या व हुंड्यांदलाल ह्यांनींही पण एकसमवयावच्छेदेंकरून आपला दर वाढविला पाहिजे. पुष्कळ वेळां असा अनुभव आपणास येत असतो कीं, कटमित्तीचा दर कमी असणें हेंच देशांतील मध्यवर्ति पेढी वगळून इतर पेढ्यांस व हुंड्यादलालांस फायदेशीर असते. कारण असा कटमित्तीचा दर कमी असल्यानें त्यांना परदेशच्या पुष्कळ शहाजोग हुंड्या विकत घेतां येतात; पण अशा करण्यानें आपण आपल्या देशांतला ऋणको करून ठेवीत असतों ह्याची त्यांना अणुमात्रही कल्पना नसते. पेढ्या किंवा दलाल ह्यांना हुंड्या मनोतीनें पैसे कापून वटविण्याचा मोह अनावर होण्याचें मुख्य कारण म्हणजे देशांत पैसा भरपूर असतो व थोड्या दरानें मिळत असतो हें होय.

हा मोह कमी करण्यास उत्तम मार्ग म्हणजे देशांतला हा फाजील पैसा मध्यवर्ति पेढीनें स्वतःकरितां कर्ज म्हणून पेढ्या व दलाल ह्यांचेकडून घेऊन त्यांना

जास्त दरानें दिला पाहिजे. एकदां हा दर वाढला गेला म्हणजे देशांत हुंड्या विकत घेण्याचें थांबतें; एवढेंच नव्हे तर येथील हुंड्यांची किंमत उतरल्यामुळें बाहेरील लोकांना आपला पैसा ह्या देशांत पाठवून येथील किंमत उतरलेल्या हुंड्या विकत घेणें फायदेशीर वाटूं लागतें व अशा तऱ्हेनें देशांत पैसा येऊं लागतो. असो. मध्यवर्ति पेढीनें आपला कटमित्तीचा दर वाढविल्यावर इतर पेढ्यांनीं तो खुशीनें वाढविला तर ठीक आहे; पण तसा तो त्यांनीं न वाढविला तर आपण स्वतः कर्ज काढून त्यांना तो वाढविण्यास मध्यवर्ति पेढीनें भाग पाडिलें पाहिजे. इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांत ह्याच मार्गाचा अवलंब करून तेथील मध्यवर्ति पेढ्यांना आपल्याजवळची शिल्लक कमी होण्याचा संभव दिसल्यास ती वाढवावी लागलेली आहे. विशेषतः बँक ऑफ इंग्लंडला सर्व जगांतील व्यापाऱ्यांना त्यांनीं मागणी केली असतांना सोनें पुरविण्याची जबाबदारी अंगावर घ्यावी लागत असल्यामुळें जेव्हां जेव्हां इतर पेढ्या व दलाल ह्यांच्या लोभमूलक धोरणामुळें इंग्लंडमधील सोनें फाजील प्रमाणांत जाऊं लागतें, तेव्हां आपला कटमित्तीचा दर वाढवून आपल्याजवळचा सुवर्णसंचय तिला वाढवावा किंवा कायम तरी करावा लागला आहे.

कटमित्तीचा दर वाढविण्याच्या धोरणाबद्दल चर्चाः—असा दर वाढवून देशांत नाणें आणणें कृत्रिम स्वरूपाचें आहे अशी शंका कांहीं लोक काढीत असतात; पण जरा सूक्ष्म विचार केला म्हणजे आपणांस असें दिसून येईल कीं, असें करण्यामध्यें कृत्रिम असें कांहींच नाहीं. मागणी व पुरवठा हा नियमच ह्या नाण्याच्या हालचालीच्या मुळाशीं आहे. कांहीं कारण नसतांना लहरीखातर जर पेढ्यांनीं नफ्याच्या आशेवर हा दर वाढविला तर व्यापारावर त्याचा अनिष्ट परिणाम होईल ही गोष्ट कबूल आहे; पण देशांत नोटा जास्त झाल्यामुळें ज्या वेळीं विनाकारण किंमती वाढत असतात त्या वेळीं हा कागदी डोलारा जरा उतरून किंमती स्थिर करण्याकरितां जर कोणी पेढ्यांनीं कटमितीचा दर वाढविला तर तें देशहिताच्या दृष्टीनें इष्टच आहे. शिवाय हा दर वाढविल्यानें उद्योगधंद्यावर होणारा परिणाम जितका कांहीं लोकांस भयंकर वाटतो तितका तो होत नाहीं. प्रथम आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्यांचा पेढ्यांशीं व्यवहार नेहमीं चाललेला असतो, अशा लोकांकरितां हा दर वाढलेला नसतो, तर तो बाहेरच्या व्यापारी लोकांकरितां असतो. त्याचप्रमाणें हा वाढलेला दर कांहीं थोड्या वेळापुरतां असतो,

व ह्या वेळांत ज्या हुंड्या पेढ्यांकडे येतील त्या हुंड्यापुरतांच तो असतो. इतकेंच नव्हे तर एखादी हुंडी तीन महिन्यांनीं लागू व्हावयाची असली व कमिटीचा वाढलेला हा दर एक महिन्यापुरतांच असेल तर त्या वेळेपुरताच पेढ्या जास्त दर आकारतात. तेव्हां पेढ्या केवळ किंमती वाढल्यामुळें कृत्रिम रीतीनें वाढलेला व्यापार कमी करण्याकरितांच हा दर वाढवीत असतात. असा दर वाढला म्हणजे बाजारांत पैशाची चणचण आहे व त्यामुळें लोकांना भांडवलाकरितां लागणारा पैसा पूर्वीच्या स्वस्त दरानें मिळणें शक्य नाहीं असें लोकांनीं खुशाल समजावें.

देशांतून नाणें बाहेर जाऊं न देण्यास बँक ऑफ् फ्रान्सनें स्वीकारलेला मार्गः—पण देशांत नोटा जास्त झाल्यामुळें जिनसांच्या किंमती वाढून नाणें बाहेर जात असतांना तें थांबविण्याकरितां कटमितीचा दर वाढविणें हा एकच राजमार्ग नव्हे. फ्रान्समध्यें जी मध्यवर्ती पेढी आहे, तिला आपले दर वाढविण्याचे फारसे प्रसंग आलेले नाहींत ह्याचें कारण ती पेढी देशांतून सोनें जात असतांना स्वतःच्या खर्चानें सोनें खरेदी करते व जे कोणी सोनें बाहेर पाठविण्याकरितां मागतील त्यांना जास्त किंमत आकारून तें विकते हें होय. अशा रीतीनें ती पेढी आपला सुवर्णनिधि वाढवून आपलें सामर्थ्य वाढवीत असते. ही पद्धत सर्वस्वीं निर्दोष आहे असें नाहीं, व ज्या वेळीं व्यापारी आणीबाणीची वेळ असते त्यावेळीं ती फारशी उपयोगी पडत नाहीं; कारण रोखे दलालांच्या सट्टेबाजीला आळा घालणें किंवा बाहेरून देशांत नाणें आणणें ह्या गोष्टी ह्या पद्धतीनें साध्य होत नाहींत. तरीपण ज्या वेळीं नोटांचा फाजील प्रचार झालेला नसतो, पण दुष्काळ पडल्यामुळें बाहेरून धान्य वगैरे आणिलें गेल्यानें देशांतून सोनें बाहेर जाणें आवश्यक असतें, अशा प्रसंगीं, किंवा मालाच्या आयातीमुळें नव्हे तर इतर कारणांमुळें दुसऱ्या राष्ट्राचें कर्ज फेडण्याकरितां सोनें बाहेर पाठविणें जरूर असतें, तेव्हां ही फ्रेंच पद्धत उपयोगी पडत असते. तरीपण ही फ्रेंच पद्धत लोकप्रिय होण्याचें असें एक कारण आहे कीं, तिजमुळें देशाच्या व्यापाराला निष्कारण भूर्दंड बसत नाहीं. देशांत नोटा फाजील झाल्यामुळें नाणें बाहेर जाऊं लागतें व तें नाणें मागण्यास लोक पेढ्यांकडे येतात, अशा वेळीं आपणाजवळ पुरेसें नाणें असावें अशी इच्छा असल्यामुळें पेढ्या हा कटमितीचा दर वाढवीत असतात. तेव्हां हा दर न वाढवितां जर मध्यवर्ती पेढीला आपल्या जवळचा संग्रह वाढवितां आला तर व्यापाराचें नुकसान न होतां त्या पेढीचें काम

होईल. असो. कटमितीचा दर वाढविणें व सुवर्णनिधि वाढविणें ह्या दोघांतही नफेतोटे आहेत. तेव्हां कोण त्या वेळीं कोणच्या युक्तीचा आश्रय करावा हें पेढीनें शहाणपणानें ठरविलेलें बरें असें आम्हांस वाटतें.

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(ई) पेढ्यांचीं इतर कामें व त्यांनीं लोकांस कर्ज देतांना सांभाळावयाचें धोरण

सरकारास व लोकांस कर्ज देणें:—आतांपर्यंत पेढ्यांनीं करावयाचीं महत्वाचीं कामें आम्हीं सांगितलीं. आतां किरकोळ कामांचा विचार करूं.

पेढ्यांचें काम वर सांगितल्याप्रमाणें लोकांजवळ असलेले पैसे गोळा करून जास्त व्याजानें कर्जानें देणें हें असतें. हें कर्ज पेढ्या कधीं खाजगी व्यक्तींना देतात; किंवा लढाई उपस्थित झाली असतांना किंवा इतर प्रसंगीं खुद्द सरकारास ह्या पेढ्या कर्ज म्हणून मोठमोठ्या रकमा देत असतात, व अडचणीच्या वेळीं सरकारास पैसे पुरवीत असतात. तिसऱ्या वुइल्यमच्या कारकीर्दींत कांहीं लोकांनीं सरकारला १२ लाख पौंड द्यावयाचे कबूल केल्यावर बँक आफ् इंग्लंडचा जन्म झाला हें सर्वांस ठाऊकच आहे. हल्लीं अमेरिकेंतसुद्धां एखादी नवीन पेढी अस्तित्वांत येते त्यावेळीं तिला सरकारला आपलें भांडवल उसनें द्यावें लागतें. इटालीमध्यें अर्वाचीन काळीं ज्या पेढ्या जन्माला आल्या त्याचें मूळ कारण तेथील सरकारास आर्थिक मदत करणें हें होतें.

देशांतील कर्जफेड करणें:— ह्या वर सांगितलेल्या कामांशिवाय देशांतील कर्जफेड करणें हेंहि पेढ्यांचें एक काम आहे. प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत सर्व काळीं मोठ्या प्रमाणांत राष्ट्रीय कर्ज उत्पन्न होत असतें व त्याची फेड करावी लागते. हें कर्ज एकत्र करून त्याची फेड करणें किंवा कर्ज घेणाऱ्या माणसाकडे जाऊन त्याला पैशाची मागणी करणें व मागणीप्रमाणें पैसे न मिळाले

तर पुनः वाट पाहणें किंवा सरकार दरबार करणें ह्या गोष्टी मोठ्या त्रासाच्या असतात; व त्या करण्यास खर्च फार लागतो. हें काम करण्यास एखादी पेढी जर तयार झाली तर लोकांचा फार फायदा होईल म्हणून पेढ्या हें काम करीत असतात. एखाद्या मोठ्या शहरांत जर पेढ्या बऱ्याच असल्या व त्या पेढ्यांना त्यांच्या कुळानिमित्तानें एकमेकांचें बरेंच कर्ज असलें तर हें कर्ज फेडण्याकरितां व हुंड्यांची अदलाबदल करून हिशेब चुकता करण्याकरितां एखादी जागा त्या शहरांत निर्माण केलेली असते. ह्या ठिकाणीं पेढ्यांवर दिलेले चेक व हुंड्या ह्यांची अदलाबदल मोठ्या प्रमाणांत होत असते. ह्या पद्धतीमुळें पेढ्यांना बरेच फायदे होतात. पहिला फायदा असा होत असतो कीं, पेढयांनीं द्यावयाच्या मोठमोठ्या रकमा फारच थोड्या वेळांत, अतिशय थोड्या त्रासानें व नाण्याचा प्रत्यक्ष उपयोग न करतां देतां येतात. एखाद्या पेढीवर दिलेला चेक जोपर्यंत लोकांत खेळत आहे तोंपर्यंत ज्या धातूच्या नाण्याचे मोबदला तो चेक असतो तें नाणें पेढीच्या सेफमध्यें पडून असतें; इतकेंच नव्हे तर त्याची जरूर न लागल्यामुळें तें लोकांना कर्ज म्हणून दिलेलें असतें किंवा परदेशीं पाठविलें जातें. प्रत्येक कर्ज नाण्यानेंच फेडावयाचें अशी जर सक्ती केली तर किती नाणें लागेल ह्याचा अंदाज करणें कठीण जाईल.

पण ह्या हुंड्यांची अदलाबदल करून हिशेब चुकता करण्याचा सर्वांत मोठा फायदा म्हटला म्हणजे ह्या पद्धतींत बिलकूल धोका असत नाहीं. आपण जर एकमेकांना नाणीं पाठवूं लागलों व आपलें देणें घेणें जर मोठया प्रमाणांत असेल तर हें नाणें लांबविण्याचा चोरांस मोठा मोह उत्पन्न होईल; पण आडव्या किंवा उभ्या रेघा मारिलेले चेक किंवा व्यापारी हुंड्या ह्यांची अदलाबदल होत असतांना ह्या चोरीचें तितकें भय रहात नाहीं व वाटेल तेवढ्या रकमांची उलाढाल करतां येते; कारण ह्या हुंड्या किंवा हे चेक चोरून कोणास फायदा होत नाहीं. असो. ह्या मुद्यावर पुढें विस्तृत विवेचन येणार असल्यामुळें ह्या ठिकाणीं जास्त चर्चा आम्ही करीत नाहीं.

किरकोळ कामें:—ह्या वर सांगितलेल्या कामांशिवाय इतरही किरकोळ कामें पेढ्यांस करावयाचीं असतात. उदाहरणार्थ, आपल्या गिऱ्हाइकांचा जवाहीर, सोन्याचांदीचीं भांडीं, तारणरोख वगैरे मूल्यवान् माल अनामत

म्हणून ठेवून घेणें; त्यांच्याकरितां सराफकट्यावर तारणेराखे विकणें व विकत घेणें; त्यांच्याकरितां त्यांचे विम्याचे हप्ते, मासिक वर्गण्या वगैरे भरणें हीं कामें कांहीं मोबदला घेऊन ह्या पेढ्या करीत असतात. पण हीं कामें विशेष महत्वाचीं नसल्यामुळें त्यांचा सविस्तर विचार आपणांस कर्तव्य नाहीं.

पेढ्यांच्या ऋणकोंचे प्रकार व त्यांच्याशीं ठेवण्याचें धोरण.

पेढीनें कर्ज कोणास द्यावें:— ह्या प्रश्नाचें उत्तर देणें जरा कठीणच आहे. कर्ज कोणास द्यावें हें व्यवहारांत पडणाऱ्या माणसाला जितकें समजतें, तितकें कोणालाच नुसते तात्विक नियम पाठ करून समजणार नाहीं, तथापि पेढीच्या व्यवहारांची माहिती सांगतांना ह्या विषयासंबंधानें कांहीं अनुभवसिद्ध माहिती जर सांगितली तर ती माहिती ह्या विषयाचा अभ्यास करणाऱ्या माणसास उपयोगी पडेल अशा बुद्धीनें ह्या विषयाचा खल आम्ही येथें करीत आहोंत.

कोणीही मनुष्य दुसऱ्या माणसाला कर्ज देतांना त्याच्यासमोर दोन प्रश्न उभे राहतात. पहिला प्रश्न म्हणजे त्या माणसाला कर्ज देण्याइतकी त्याची पत आहे कीं नाहीं; म्हणजे तो कर्ज परत करण्याइतका प्रामाणिक आहे किंवा नाहीं; व दुसरा प्रश्न म्हणजे किती रकमेपर्यंत त्याला बिनधोकपणें कर्ज देतां येईल. हे दोन्ही प्रश्न सोडवितांना कर्ज देणाऱ्या माणसानें किंवा पेढीनें ज्याला कर्ज द्यावयाचें त्याच्या सांपत्तिक स्थितीची माहिती लोकांच्या बातम्यांवरुन काढावी. अर्थात् ह्या बातम्या म्हणजे गटारयंत्रावरील रिकामपणाच्या गप्पा असल्यामुळें त्यांना तादृश महत्व नसतें; पण ह्या बातम्यांवरून धनकोला, म्हणजे पेढीला, स्थूलमानानें अंदाज करतां येतो. एखाद्या माणसाची मालमत्ता वीस हजारपर्यंत आहे अशी गप्प पेढीच्या कानांवर आली असतां त्याच्या मालमत्तेची किंमत निदान ५,००० रुपये धरण्यास व तिच्यावर दोन हजारपर्यंत कर्ज देण्यास हरकत नाहीं. हा अंदाज एखाद्या नवीन माणसाला कर्ज देण्याचे वेळीं पेढीनें करावयाचा असतो; पण पेढीला आपल्या अगोदरपासून असलेल्या गिऱ्हाईकाच्या सांपत्तिक स्थितीचा अंदाज जर करावयाचा असेल तर त्याच्या खात्यावर असलेल्या जमा व नांवें ह्या बाजू पडताळून पाहिल्या म्हणजे तिला अंदाज करतां येईल. अर्थात् हा अंदाज कांहीं खरा नव्हे. कारण त्या माणसाचे अन्यत्रही व्यवहार असतील. पण पेढीच्या हिताच्या दृष्टीनें हा अंदाज कांहीं फारसा चुकणार नाहीं. ह्या अंदाजावरून एखादे

वेळीं गिऱ्हाइकाच्या खात्यावर जमेकडील बाजू जास्त असेल; पण तेवढ्यावरूनच पेढीनें हुरळून जातां कामा नये; कारण तो लोकांच्या हुंड्या सचकारूनच पैसे चुकते करीत असेल व रोख पैसे देण्याचें नांवही काढीत नसेल. अशा वेळीं पेढीनें असें खास अनुमान काढावें कीं, ही जमेच्या बाजूची जास्त रकम म्हणजे नुसती भूल असून वस्तुतः ती दुसऱ्या लोकांना दिलेली तारणवजा आहे.

पेढ्यांकडून कोण लोक कर्ज काढीत असतात हें जर आपण पाहिलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, हे लोक म्हणजे व्यापारांत न पडणारे व खाजगी कामाकरितां कर्ज काढणारे लोक किंवा व्यापारांत पडणारे लोक किंवा त्यांनीं काढिलेल्या मंडळ्या किंवा कंपनीच्या कायद्यान्वयें नोंदलेल्या कंपन्या असतात. ह्यांशिवाय म्युनिसिपालिट्या व शाळा ह्यासुद्धां कधीं कधीं कर्ज काढीत असतात; पण आपण पहिल्या तीन लोकांविषयींच विचार करूं.

व्यापारांत न पडणाऱ्या लोकांसंबंधानें पेढीचें धोरण असें असावें कीं, होतां होईल तों ह्या लोकांनीं काढिलेल्या हुंडया, त्या व्यापारी कामाकरितां काढिलेल्या नसल्यामुळें, व खाजगी कर्जाची फेड हुंड्याच्या द्वारें होत नसल्यामुळें, तिनें कधींही स्वीकारूं नये. कधीं कधीं ह्या हुंडया पैशाच्या सोयीकरितां तिऱ्हाइतानें हमी दिलेल्या हुंडयांपैकीं असतात आणि ह्या हुंड्यांची मुदत भरल्यावर त्यांबद्दल पैसे मिळतीलच अशी हमी देतां येत नाहीं. ह्या व्यापारांत न पडणाऱ्या लोकांना पेढ्यांनीं कर्ज न देण्याचें दुसरें असें एक कारण आहे कीं, ते लोक जों-पर्यंत हयात आहेत तोंपर्यंत त्यांचा धंदा-उदाहरणार्थ वैद्यकी, किंवा वकिली किंवा नोकरी इत्यादि जोरांत चालतो, व ह्या त्यांच्या वरवर दिसणाऱ्या भरभराटीला व श्रीमंतीला भुलून पेढीला कर्ज देण्याचा मोह होतो; पण अंदरकी बात अगदीं निराळी असून ते कदाचित् कर्जबाजारीही असतील, व हे लोक मेले म्हणजे पेढीला आपल्या कुळांच्या नांवानें शंख करायाची पाळी येते. तेव्हां सामान्य नियम म्हणजे व्यापारांत न पडणाऱ्या लोकांना पेढीनें कर्ज न देणें हेंच बरें.

पण जे लोक व्यापारांत पडलेले असतात त्यांना कर्ज देतांना पेढीला निराळ्याच तऱ्हेनें विचार करावा लागतो. व्यापारी माणसाला आपल्या धंद्यांत एकाएकीं पैशाची निकड लागते, व अशा वेळीं त्या माणसाची बाजारांत जर चांगली पत असेल तर पेढीलाही तारण न मागतां तात्पुरतें कर्ज द्यावें लागतें.

अशा वेळीं कर्ज मागणाऱ्या माणसाची धंद्यांतील उलाढालीची रकम किती आहे व तो धंदा कोणत्या प्रकारचा करतो, हें पाहून पेढीला किती कर्ज द्यावें व हा इसम कर्ज कां मागत आहे ह्याची अटकळ करितां येईल. पण ह्या उलाढालीवरून पेढीची होणारी अटकळ बरोबरच असेल असें म्हणतां येत नाहीं. कारण तो मनुष्य आपल्या पतीवर बराच माल आणून रोख किंमतीला आपला माल विकत असेल व त्यामुळें वसूल होणारी रकम खलास होऊन लोकांचें कर्ज कायमच राहात असेल किंवा तो सट्टेबाजीही करीत असेल.

ताळेबंद पाहून कर्ज देणें:—कधीं कधीं असा व्यापारी मनुष्य पैसे मागावयाला आला म्हणजे पेढी त्याला आपला ताळेबंद खाजगी रीतीनें दाखवावयास सांगते व तो नीटपणें पाहिल्यावर मग त्याला ती पेढी कर्ज देते. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, ह्या ताळेबंदावरून पेढीला त्या माणसाच्या धंद्याची यथार्थ कल्पना करितां येणार नाहीं; कारण ताळेबंद करणारा माणूस व कर्ज मागणारा माणूस हे एकच व्यक्ती असल्यामुळें ताळेबंदावर विश्वास ठेवणें अंधळेपणाचें होईल. ही गोष्ट सर्वस्वीं खोटी नाहीं. पण ज्या माणसाच्या धंद्याचा ताळेबंद पाहण्याची पेढीची इच्छा असेल तो माणूस किती सचोटीचा आहे हें पाहूनच ती पेढी तो ताळेबंद पहाण्याचें ठरवील हें उघड आहे. शिवाय ह्या ताळेबंदावर तो खरा असल्याबद्दल त्याची सही असल्यामुळें तो पुढेंमागें लबाडीचा आहे असें सिद्ध झालें तर त्याच्यावर विश्वासघाताची फिर्याद पेढीस करतां येते. ह्यामुळें ताळेबंदाच्या आधारावर जो कोणी कर्ज मागण्यास येईल तो नैतिक पापास जरी भीत नसला तरी सरकारी कायद्यास भिऊन सहसा लबाडीचा ताळेबंद तयार करण्यास प्रवृत्त होणार नाहीं. तथापि पेढीनें ताळेबंदांत वर्णन केलेली स्थिति सगळीच खरी आहे असें समजू नये हें बरें.

ताळेबंदांतल्या बाबी—ताळेबंद नीट तपासून पाहतांना पेढीनें कांहीं गोष्टी लक्ष्यांत ठेवल्या पाहिजेत. प्रथम तो ताळेबंद हिशेब-तपासनिसानें पास केला आहे किंवा नाहीं हें तिनें पाहिलें पाहिजे. आतां हें खरें आहे कीं, एखाद्यानें मनांतच आणलें तर तो हिशेबतपासनिसाच्याही डोळ्यांत धूळ टाकूं शकेल. तथापि सामान्य माणसानें ताळेबंद तपासणें व हिशेबतपासनिसानें तो तपासणें ह्यांत बराच फरक आहे.

कंपन्या जेव्हां आपला ताळेबंद तयार करीत असतात तेव्हां त्यांचें सामान्यपणें आंखलेलें धोरण म्हणजे आपली जी मालमत्ता जास्त वेळ टिकेल व जिचे पैसे वसूल होण्यास जास्त वेळ लागेल ती मालमत्ता प्रथम लिहावयाची. पण कांहीं कंपन्या हें धोरण न स्वीकारतां जिची किंमत चटकन् वसूल होईल तीच अगोदर लिहिण्याची पद्धत अमलांत आणतात. पण पद्धत कोठलीही स्वीकारलेली असो, प्रत्येक कंपनीचें किंवा धंदा करणारी एकच व्यक्ति असती तर त्या व्यक्तीचें धोरण असें असतें कीं, आपल्या मिळकतीची (Assets) किंमत जास्त धरावयाची व आपल्याला जें लोकांचें देणें आहे त्याची किंमत होतां होईल तों कमी धरावयाची. तेव्हां ताळेबंद तपासतांना पेढीनें ही नैसर्गिक प्रवृत्ति हिशेबांत घेऊन मग किती रकम कर्जानें द्यावयाची तें ठरवावें. तसेंच पेढीनें लक्ष्यांत ठेवण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे ज्या मालमत्तेची किंमत चटकन वसूल होण्यासारखी नसते ती जर अडचणीचे वेळीं विकण्याचा प्रसंग आला तर तिच्यापासून हटकून नुकसान होण्याचा संभव असतो; म्हणजे अंदाजापेक्षां बरीच कमी किंमत येऊं लागते. अशा दृष्टीनें ज्या कंपनीला कर्ज द्यावयाचें तिच्याजवळच्या हुंड्या जितक्या असतील तितक्या पेढीच्या दृष्टीनें चांगल्या असतात. कारण कंपनीच्या इमारती किंवा तिचीं यंत्रें हीं विकावयास काढलीं असतांना त्यापासून जितका तोटा होतो तितक्या हुंड्या विकण्यानें होत नसतो. तेव्हां एखाद्या कंपनीस कर्ज देतांना तिचे ताळेबंदांत कायमच्या स्वरूपांत किती रकम गुंतलेली आहे व जिचे पैसे चटकन् वसूल होतात अशी मालमत्ता (Liquid Assets) किती आहे हें पेढीनें पाहून मग कर्जानें रकम द्यावी. कांहीं ताळेबंदांत * गुड वुईल म्हणून एक बाब असते; पण पेढीच्या दृष्टीनें दुकानाचें दिवाळें निघालें असतांना

---

* ही गुड वुईल म्हणजे एकदां धरलेलें व स्थायिक झालेलें दुकान न सोडतां त्याच ठिकाणीं आपलें खातें गिऱ्हाईक चालू ठेवील अशी अटकळ करून दुकान विकत घेऊं इच्छिणाऱ्या माणसानें तें विकत घेणाऱ्या माणसास दुकानांतील मालाच्या किंमतींतून जास्त दिलेली किंमत होय. एखादें दुकान जर विकावयाचें असलें तर विकत घेणाऱ्या माणसाला गिऱ्हाइकांच्या ह्या इच्छेबद्दल कांहीं किंमत द्यावी लागते व आपलें गिऱ्हाईक पुष्कळ आहे व आपण आपलें दुकान विकावयास काढलें तर त्या गुड वुईलबद्दल आपणास बरेच पैसे मिळतील असें समजून त्या वुईलची किंमत दुकानदार किंवा कंपनी बरीच ठरवीत असते.

ह्या बाबीची प्रतिष्ठा नसते. तेव्हां मुख्य बाब म्हणजे ज्याला कर्ज द्यावयाचें त्यानें आपल्या ताळेबंदांत आपल्याला असलेल्या लोकांच्या देण्याचे मानानें वर सांगितलेली चटकन् पैसे वसूल होणारी मालमत्ता किती किंमतीची लिहिलेली आहे हे पेढीनें पाहणें होय. ह्या मालमत्तेमध्यें रोकड, लोकांना दिलेलें रोकड कर्ज व ज्या हुंड्याचे पैसे मिळावयाचे त्या हुंड्या वगैरे येतात. तसेंच त्या गृहस्थानें कांहीं रकम तारणरोखे विकत घेण्यांत गुंतविली आहे असें जर त्याच्या ताळेबंदावरून पेढीला आढळून आलें तर तारणरोख्यांच्या किंमतीचा चढउतार होत असतांना त्याबद्दल कांहीं रकम काढून ठेवलेली आहे किंवा नाहीं हें तिनें पाहिलें पाहिजे.

धंद्याला लागणाऱ्या आवश्यक वस्तुः-(Stock-in-trade) ही एक बाब पेढीला भ्रमांत पाडणारी असते. कधीं कधीं कांहीं आगंतुक कारणांमुळें एखाद्या कंपनीच्या ह्या वस्तूंची किंमत चढलेली किंवा उतरलेली असते; पण पेढीनें असें धोरण ठेवावें कीं, ज्या वेळेला ती किंमत चढलेली असते त्या वेळीं मुळ किंमतच तिनें हिशोबांत घ्यावी व ती जर उतरलेली असेल तर बाजारांत असलेल्या किंमतीइतकी त्या वस्तुची किंमत तिनें गृहीत धरावी. प्रत्येक धंद्यांत तयार होणाऱ्या वस्तू एकाच तऱ्हेच्या नसतात. एखादी कंपनी कापड तयार करीत असली तर हा माल कालांतरानें सडत नाहीं व त्यामुळें अशा मालाच्या किंमतींत फारसा फरक पडत नाहीं. ह्यानंतर ‘ नाना तऱ्हेचे कंपनीचे देणेदार ’ ह्या नांवावर ताळेबंदांत कांहीं रकम मांडलेली असते. ह्या बाबतींत पेढीला कांहीं अंशीं ज्याला कर्ज द्यावयाचें त्याच्यावर विसंबून रहावें लागतें. पण एक मुद्याची गोष्ट मात्र पेढीनें लक्षांत ठेवावी. ह्या देणेदार लोकांपैकीं मोठमोठ्या रकमा कर्ज काढलेले थोडे लोक आहेत किंवा लहान लहान रकमा कर्जानें घेणारेच पुष्कळ लोक आहेत हें तिनें मुद्दाम पाहिलें पाहिजे. लहान लहान रकमा वसूल करणें पेढीस त्रासदायक असते ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं; पण मोठाली रकम कर्जानें घेणाऱ्या एखाद्या माणसानेंही काखा वर केल्या तरी पेढीचें मोठेंच नुकसान होतें. अशा दृष्टीनें विचार केला तर लहान रकमेचा ऋणकोच पेढीस फायदेशीर असतो. असो. ताळेबंदांत बुडीत कर्जाबद्दल कांहीं रकम निराळी काढून ठेवलेली आहे किंवा नाहीं हें पाहण्याचें पेढीनें विसरूं नये.

आतांपर्यंत ताळेबंदांतील मालमत्तेच्या म्हणजे एखाद्या माणसाला किंवा कंपनीला जी घेण्याची बाजू असते तिचा विचार झाला. आतां दुसऱ्या म्हणजे देण्याच्या बाजूचा विचार करावयाचा. ह्या बाबतींत आपण लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें ही बाजू कधींही फुगवून दाखविलेली नसते व लोकांचें जें देणें असतें, त्याबद्दल त्या माणसाला किंवा कंपनीला कांहीं तरी व्यवस्था करावीच लागते. कांहीं कर्ज, वटविलेल्या किंवा मुदत न भरलेल्या हुंड्यांच्या जामिनकीवर, दिलेलें असतें. असें कर्ज पेढीकडे उसने पैसे मागणारा गृहस्थ ताळेबंदांत चुकून किंवा जाणूनबुजून लिहिलेलें दाखवीत नाहीं म्हणून त्याबद्दलही पेढीनें चवकशी करावी. तसेंच कर्ज देतांना किती कर्ज तावडतोब वारलें पाहिजे व त्याबद्दल तावडतोब वसूल होणाऱ्या रकमेची किती मालमत्ता आहे, ह्याबद्दलही पेढीनें विचारपूस करून मग कोणासही कर्ज द्यावें.

कंपनीच्या व्यावहारिक स्थितीचें व उद्देशाचें पत्रक पाहून कर्ज देणें:--पेढ्यांना जेव्हां नोंदल्या गेलेल्या कंपन्यांना कर्ज देण्याची पाळी येते, तेव्हां त्यांनीं त्या कंपन्यांनीं छापलेलें स्वतःच्या व्यावहारिक स्थितीचें व उद्देशाचें पत्रक (Memorandum of Association) वाचून पहावें. कारण कंपन्यांनीं कर्ज काढावें किंवा न काढावें हें पत्रकांत कायद्यानें ठरविलेलें असतें. हें पत्रक न वाचतां कंपनीस कर्ज काढण्याचा अधिकार नसतांना जर पेढीनें कर्ज दिलें तर तें बुडालेंच म्हणून समजावें. ह्या कंपन्यांना कर्ज देतांना पेढ्यांना असा विचार करावा लागतो कीं, कर्ज मागणारी कंपनी नियमित जबाबदारीची (Of Limited Liability) आहे किंवा अनियमित जबाबदारीची (Of Unlimited Liability) आहे. ती जर नियमित जबाबदारीची असेल तर कंपनीचा प्रत्येक भागीदार हा आपल्या भागाच्या किंमतीइतकाच पेढीच्या कर्जाबद्दल जबाबदार असतो. शिवाय ह्या कर्ज घेतलेल्या कंपनीनें जर सार्वजनिक कर्जरोखे विकण्याकरितां काढले असतील व ही कंपनी जर बुडण्याच्या पंथाला लागली असेल तर कंपनीपासून चोपून पैसे घेण्याचा प्रथम हक्क ह्या सार्वजनिक रोखे विकत घेणारांना असतो व ह्या लोकांचें कर्ज फिटल्यावर जर कंपनीजवळ पैसे शिल्लक असले तर पेढीच्या कर्जाची फेड होणार. तेव्हां अशा नियमित जबाबदारीच्या कंपन्यांना कांहीं भरपूर तारण घेतल्याशिवाय पेढीनें कधींही पैसे उसने देऊं नयेत. त्याचप्रमाणें नुकत्याच नोंदल्या गेलेल्या कंपनीलाही कर्ज

देतांना पेढीनें सावधगिरी ठेवून व्यवहार करावा. कारण कंपनी नुकतीच नोंदली जात असतांना जे कायदेशीर विधी करावे लागतात ते सर्व कंपनीनें केले आहेत किंवा नाहीं हें कळणें कठिण असतें.

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(उ) पेढीनें कोणत्या तारणावर कर्ज द्यावें

तारणाचे प्रकार:—खाजगी व्यवहारांत कोणाचें सावकार होऊं नये किंवा कोणाचें ऋणकोही होऊं नये; पण पेढीच्या व्यवहारांना हा नियम लागूं शकत नाहीं. कारण कर्ज काढणें व कर्ज देणें, हे व्यवहार पेढ्यांना पदोपदीं करावे लागतात. लोकांच्या ठेवी स्वीकारणें म्हणजे कर्ज काढणें व लोकांना पैसे उसने देणें म्हणजे सावकारी करणेंच होय. तेव्हां देवघेव हा पेढीचा आत्माच आहे. पेढीवाला कधीं कधीं शहाजोग गिऱ्हाईकाला विनतारणावर कर्ज देतो; पण हा अपवाद होय. पेढांचा सामान्य नियम असा आहे कीं, कांहीं तारण मागितल्याशिवाय कोणास कर्ज देऊं नये.

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हा नियम प्रत्येक पेढीनें पाळावा किंवा काय व जगांत प्रत्येक मनुष्य लबाडच आहे काय. व्यापारी वर्गांत आपण जर हिंडलों फिरलों तर आपणास असा अनुभव येतो कीं, त्या लोकांचे बरेच व्यवहार नुसत्या बोलीवर होत असतात. एकदा ' जबान ' तोंडांतून गेल्यावर पुनः ती बदलणें हें मोठें पाप आहे अशी पुष्कळ लोकांची समजूत असते. अलीकडेच जास्त कायदे झाल्यामुळें मनुष्य जास्त लबाड होत चालला आहे. असो. सांगावयाचें तात्पर्य हें आहे कीं, प्रत्येक वेळीं तारण घेऊनच पेढीनें कर्ज द्यावें असा नियम घालून देणें श्रेयस्कर नाहीं. ज्या वेळीं पेढीला आपलें दिलेलें कर्ज परत मिळण्याची खात्री नसते त्याच वेळीं तिनें तारण मागावें.

वरील विचारसरणींत अगदींच तथ्य नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं; पण पैशाचा व्यवहार करतांना मनुष्य आपण दिलेलें वचन इमानेंइतबारें पाळीलच

अशी खात्री नसते. ज्या वेळीं मनुष्य आपलाच पैसा दुसऱ्यास देतो त्यावेळीं एक वेळ बिनतारणावर एखाद्या शहाजोग माणसाला कर्ज दिलं तरी चालेल; पण लोकांचा पैसा आपल्या ताब्यांत असतांना त्याची विशेष काळजी घेतली गेली पाहिजे हें उघड आहे. शिवाय आपणास नेहमीं असा अनुभव येतो कीं, मनुष्य मूळचा अप्रामाणिक नसला तरी आपत्काळीं केवळ नाइलाज म्हणून तो लबाड बनूं लागतो. एखादा गृहस्थ आपला जिवलग मित्र असल्यामुळें त्याला आपण त्याच्या खाजगी कामाकरितां म्हणा, किंवा धंद्याकरितां म्हणा, उसने पैसे त्याच्या वचनावर देत असतों. ते पैसे आपण खास परत करू व ज्यानें आपल्यावर विश्वास ठेवला त्यास कधींही दगा देणार नाहीं अशी त्याची खात्री असते; पण परिस्थिति प्रतिकूल होत चालल्यामुळें व धंद्यांत बूड आल्यामुळें त्याला पैसे परत करतां येत नाहींत. आपण अशी कल्पना करूं कीं, ह्या माणसानें कर्ज घेतांना एक प्रॉमिसरी नोट लिहून दिलेली आहे. ह्या नोटीची मुदत तीन वर्षांची असते हें सर्वांस ठाऊक आहे. त्या नोटीची मुदत संपेपर्यंत कर्ज देणाऱ्या माणसानें आपली रक्कम मागितली नाहीं. मुदत भरल्यावर सावकार मित्रानें कर्ज मागण्यास सुरुवात केल्यावर ऋणको मित्रास पैसे द्यावयाची इच्छा असूनही जवळ कांहींएक देण्यास नसल्यामुळें तुमच्या प्रॉमिसरी नोटीची मुदत संपल्यामुळें तुम्हांस पैसे मी देण्याचें कारण नाहीं, असें सांगण्याचा मोह त्यास होतो व पुष्कळ लोक तसें सांगतातही. तसेंच कर्ज काढणारा मनुष्य शहाजोग असूनही तो एकाएकीं मेला तर त्यास बिनतारणावर दिलेलें कर्ज त्याचे आप्तेष्ट आपण होऊन देतीलच असें कोणीं निश्चित सांगावें ?

कांहीं माणसें दिसण्यांत खूब संभावीत दिसतात, त्यांचे पेढ्यांशीं होणारे व्यवहार नेहमीं सचोटीचे असतात व शिल्लकीपेक्षां जास्त रकम पेढीकडून मागण्याची वेळ आली असतांना ते त्या रकमेबद्दल कांहीं तारणही तिच्याकडे ठेवीत असतात; तरीपण त्यांचे इतरत्र घडणारे व्यवहार--उदाहरणार्थ, कंपनीच्या शेअरचे किंवा बाजारांत आलेल्या मालाचे वगैरे सट्टे करणें--धोक्याचें असल्यामुळें ते डबघाईला येतात व अशा रीतीनें पेढ्यांनाही त्यांच्या बुडण्यामुळें धक्का बसतो. आतां ह्या गोष्टी विरळा घडतात ही गोष्ट खोटी नाहीं; पण विरळा घडतात म्हणून त्यांची हयगय करणें पेढ्यांना केव्हांही इष्ट होणार नाहीं. नऊ माणसें बिनतारणावर दिलेलें कर्ज मुकाट्यानें परत करतात म्हणून दहाव्या माणसाला तसेंच दिलेलें कर्ज बुडालें तरी चालेल हें म्हणणें शहाणपणाचें होईल काय ? पेढ्यांचे व्यवहार

मोठमोठ्या रकमांचे असल्यामुळें एखाद्या वेळीं एखाद्या गिऱ्हाइकानें त्यांना दगा दिला तरी इतर गिऱ्हाइकांपासून होणारा नफा ह्या एका गिऱ्हाइकामुळें होणाऱ्या नुकसानींत गडप होऊन जातो. तेव्हां पेढीनें स्नेही, सोबती, सगेसोयरे, शत्रु-मित्र असा भेदभाव न ठेवतां सर्वांपासूनच तारण घेऊन त्यांना कर्ज देण्याचा प्रघात ठेवावा हें चांगलें. सरकार कायदे करते ते नीतीनें चालणाऱ्या माणसांकरितां केव्हांही नसतात, तर गुन्हे करणाऱ्या माणसांकरितां असतात. तीच गोष्ट तारणाची आहे. ज्याला पैसे परत करावयाचे आहेत त्यानें पेढीजवळ तारण म्हणून कांहीं मूल्यवान वस्तू ठेविली म्हणून काय बिघडलें ? ती रकम परत करावयाचे वेळीं ती पेढी तुम्हास तुमचें तारण परत करणारच आहे; पण कर्ज काढणाऱ्याच्या मनांत पुढेंमागें पाप आलें तर आपलें नुकसान होऊं नये म्हणून पेढीनें जर अगोदरच काळजी घेतली तर त्यांत नांवें ठेवण्यासारखें कांहीं नाहीं.

तारण म्हणजे दुसऱ्यास तारणारें. अर्थातच जी वस्तू आपण तारण म्हणून स्वीकारतों ती वस्तू स्वतःच सुरक्षित व विश्वासार्ह असली पाहिजे. हें तारण अनेक प्रकारचें असतें. सर्वांत उत्तम तारण म्हटलें म्हणजे सरकारी रोखे, मुंबईच्या म्युनिसिपालिटीसारख्या संस्थांनीं काढिलेले सार्वजनिक रोखे व रेल्वेचे शेअरसारखे रोखे होत. तारण ह्या दृष्टीनें रेल्वेचे शेअर फारच उत्कृष्ट असतात. कारण ह्या तारणावर पैसे देणारास व त्यावर आपला हक्क लवकर स्थापितां येतो. हा शेअर दुसऱ्यास थोड्या खर्चांत व वेळांत देतां किंवा विकतां येतो व ह्याची किंमतही साधारणपणें स्थिर रहाते. हे रोखे जवळ असले व एखादे वेळीं कर्ज काढणाऱ्या माणसानें जर पैसे देण्याचें नाकारलें तर पेढीला हे रोखे विकण्याचा पूर्ण हक्क असतो. मात्र पेढीनें कर्ज देतांना एवढें पाहण्याची काळजी घ्यावी कीं, हे रोखे त्या गिऱ्हाइकाचेच असून आपल्या नांवावर आहेत.

पण एखादे वेळीं नोंदलेल्या कंपनीचे भागांवर कर्ज देण्याचा पेढीस प्रसंग येतो. अशा वेळीं पेढीनें हे भाग कंपनीकडून आपल्या नांवानें करून घेतले पाहिजेत व तसें केल्याबद्दल कंपनीच्या पुस्तकांमध्यें नोंद झाली पाहिजे; तरच ह्या भागांवर पेढीचा कायदेशीर हक्क राहील;पण ह्याच भागांचे सर्व पैसे जर पेढीच्या गिऱ्हाइकानें दिले नसले तर असले भाग पेढीनें तारण म्हणून स्वीकारूं नयेत व स्वीकारणें भागच पडलें तर निदान ते आपल्या नांवावर तरी करून घेऊं नयेत. कारण

कंपनीचें दिवाळें निघाल्यास पेढीला भागांच्या राहिलेल्या किंमतीबद्दल पदरचे पैसे भरावे लागतील.

ह्यानंतरचा तारणाचा प्रकार म्हणजे जमीनजुमल्याच्या मालकीच्या हक्काचे कागदपत्र होत. हें तारण कांहीं वाईट नाहीं; पण ह्यांत दोष एवढाच आहे कीं, हा जमीनजुमला ताबडतोब विकतां येत नाहीं व त्याची निश्चित किंमत ठरविली आणि ती विकावयाची पाळी आली तर त्याची किंमत बरीच कमी येते. कारण लोकांना ठाऊक असतें कीं, हा जमीनजुमला पेढी विकावयाला काढीत आहे व त्याच्यावर ती खूब नफा मिळविणार आहे. ह्याचा असा परिणाम होतो कीं, लोक जास्त किंमतीचा लिलांवच पुकारत नाहींत; म्हणून किंमत अर्थातच कमी येते. हे कागदपत्र तारण म्हणून स्वीकारतांना पेढीनें कांहीं गोष्टी लक्षांत ठेवावयाच्या असतात. उदाहरणार्थ, हे कागदपत्र हातीं आले म्हणजे ते बिनचूक व खरे आहेत किंवा नाहींत व ज्यानें जामीन म्हणून ठेवलें आहेत, त्याच्याच नांवाचे ते आहेत किंवा दुसऱ्याच्या नांवाचे आहेत ह्याची चौकशी वकिलामार्फत ताबडतोब पेढीनें करावी. त्याचप्रमाणें ज्या मिळकतीच्या हक्काचे हे कागदपत्र असतील त्या मिळकतीची किंमत वारंवार तज्ज्ञांकडून ठरवावी व तिचा विमा उतरवून घ्यावा व ही मिळकत जर दुसऱ्यांदा गहाण पडली असेल तर तिजवर कधींही कर्ज देऊं नये.

ह्यानंतरचा तारणाचा प्रकार म्हटला म्हणजे विम्याची पॉलिसी होय. पण पूर्वी म्हटल्याप्रमाणें ह्या पॉलिसीची जी सोड रक्कम (Surrender Value) असेल तिच्यावरच पेढीनें कर्ज द्यावें. त्याजप्रमाणें ही पॉलिसी ऋणकोनें स्वतःच्या फायद्याकरितां घेतली आहे किंवा दुसऱ्याकरितां घेतली आहे हेंही पेढीनें निश्चित करून घ्यावें. कधीं कधीं पेढीला पेचांत आणण्याकरितां विमा उतरविणारा मनुष्य तिचे हप्तेच भरीत नाहीं. अशा वेळीं पेढीनें ती पॉलिसी (जेवढ्या रकमेचे हप्ते भरलेले असतील तेवढी रक्कम विमा उतरणाऱ्या कंपनीकडून घेऊन) त्या ऋणकोकडून सोडून देण्याचें कबूल करून घ्यावें. पण कांहीं लोकांच्या मतानें विम्याच्या तारणावर दिलेले पैसे अनेक वर्षांनीं मिळण्यासारखे असल्यामुळें हें दीर्घ मुदतीचें तारण पेढ्यांनीं न स्वीकारलेलें बरें.

ह्यानंतरचा तारणाचा प्रकार म्हणजे तिऱ्हाईत माणसानें दिलेली लेखी हमी होय. पण ह्यांत मुख्य दोष म्हणजे हमी देणारा मनुष्य कितपत विश्वासार्ह

आहे हें नक्की ठरविणें कठिण असतें. शिवाय जातमुचलका हा फारसा सुरक्षित जामीन नाहीं. पुष्कळ वेळां मनुष्य ' जामीन कोणा होऊं नये ' ह्या तत्त्वाच्या विरुद्ध वागत असतो. ह्याचें कारण ज्या माणसाकरितां जामीन रहावयाचें त्या माणसाचें व ह्याचें कांहीं नातेंगोतें किंवा निकट परिचय असतो; त्यामुळें जामीन रहातांना सदसद्विवेकबुद्धीपेक्षां प्रेम, परोपकारबुद्धि अशा प्रबळ मनोविकारांचाच पगडा जास्त प्रमाणांत त्याच्या मनावर असतो. शिवाय जातमुचलका देणाऱ्या माणसाच्या पतीवरच आपण अवलंबून असतों; पण ही पत त्याची नेहमीं कायमच राहील याची काय खातरी आहे? आज जो मनुष्य ५० हजारांचा मालक आहे तो उद्यां अन्नालाही मोताद होईल व हें स्थित्यंतर कोणाला न कळतही होईल. तेव्हां पेढ्यांनीं कर्ज देतांना जातमुचलका फारसा स्वीकारूं नये व विशेषतः तो जातमुचलका देणारी जर स्त्री असेल तर तसली हमी त्यांनीं कधींही स्वीकारूं नये. हा हमी देणारा मनुष्य जर एकाएकीं वारला किंवा इतःपर त्यानें जामीन राहण्याचें नाकबूल केलें तर पेढ्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांशीं मागचा व्यवहार बंद करून पुढें कर्जानें रकमा देण्याचें बंद करावें.

ह्यानंतरचें शेवटलें तारण म्हणजे गलबतावरील किंवा अशाच प्रकारचें दुसरें एखादें भरितपत्र (Bill of Lading) हें होय. हें भरितपत्र जहाजाच्या कप्तानानें दिलेलें एक प्रकारचें सर्टिफिकीट असतें व त्याचा असा अर्थ असतो कीं, त्या कप्तानानें कांहीं माल ताब्यांत घेतलेला आहे व तो माल त्या पत्रांत नमूद केलेल्या अटीप्रमाणें जहाजाचा प्रवास संपल्यावर त्याचेकडून परत मिळेल. जोंपर्यंत तो माल जहाजांत असतो तोंपर्यंत त्या जहाजाच्या कप्तानाची त्या मालावर मालकी असते व ही मालकी तें पत्र देत असतांना एकाकडून दुसऱ्याकडे जाऊं शकते. ह्या भरितपत्रांत मालाच्याइतक्या पेट्या किंवा गांठीं आहेत एवढेंच लिहिलेलें असतें; पण तो माल कोणत्या योग्यतेचा आहे व तो खरा किंवा खोटा आहे हें कांहींच त्या पत्रावरून समजत नाहीं व त्या मालाच्या योग्यतेबद्दल जहाजाच्या मालकाला जबाबदारही धरतां येत नाहीं. शिवाय ह्या भरितपत्राचा दुसरा असा दोष आहे कीं, ज्या गिऱ्हाइकाला ह्या भरितपत्राच्या तारणावर पेढीनें पैसे दिले असतील त्या गिऱ्हाइकाला त्या पत्रांत नमूद केलेला माल गहाण टाकतां येत नाहीं असें सिद्ध झालें तर पेढीला मनगटें चोळण्याचा प्रसंग येतो.

निषिद्ध तारणाचे प्रकारः—आतांपर्यंत पेढीनें कोणत्या तारणांवर कर्ज द्यावें ह्याचा विचार आपण केला. आतां कोणत्या तारणांवर पेढ्यांनीं कर्ज देऊं नये ह्याचा विचार करावयाचा. ह्याबद्दल प्रसंगोपात कांहीं विचार आम्हीं पूर्वीच प्रकट केलेले आहेत त्यांची द्विरुक्ति येथें करण्याची जरूरी नाहीं.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, पेढीनें होतां होईल तों जमीन गहाण म्हणून स्वीकारूं नये; कारण जमिनीची किंमत स्थिर नसते, तिच्यावर आपली मालकी सिद्ध करणें फार कठिण जातें व तिचे पैसे हातीं पडणें फार त्रासाचें व खर्चाचें असतें. त्याचप्रमाणें जी जमीन अन्यभोगोत्तर प्राप्य असते, म्हणजे दुसऱ्यांनीं त्या जमिनीचा उपभोग घेतल्यावर मग ती मूळ मालकाच्या वारसाकडे वहिवाटीला येते, अशी जमीन कधींहीं पेढीनें तारण म्हणून घेऊं नये; कारण त्या जमिनीची किंमत जरी रास्त असली व तिच्यावरचा हक्क कायद्याच्या दृष्टीनें बरोबर असला तरी त्या जमिनीचे पैसे दीर्घकालानें मिळत असतात.

विक्रीचें करारपत्रः—एखाद्या मनुष्यानें दुसऱ्या इसमापासून कर्ज काढलें असतांना त्याला तो आपली जिनगी—ह्या जिनगींत तो जर धंदेवाला असला तर त्याच्या धंद्याला लागणाऱ्या आवश्यक वस्तू, व त्याचीं हत्यारें, त्याचीं गुरेंढोरें व त्याचें घरगुती सामान ह्यांचा समावेश होऊं शकतो—लिहून देतो व मुदतींत कर्ज परत न केल्यास या विक्रीच्या करारपत्रानें गहाणवट जिनगी विकण्याचा त्याला हक्क प्राप्त होतो. खरें पाहिलें असतांना विक्रीचें करारपत्र हें कांहीं वस्तुतः चांगल्या प्रकारचें तारण नाहीं. कारण गुरेंढोरें, धंद्याला लागणाऱ्या आवश्यक वस्तू किंवा ज्या वस्तू आपणास न समजतां हलवितां येतात, नेतां येतात, व अदलाबदल करतां येतात अशा वस्तू. ह्यावर अवलंबून असणारें तारण हें तारणच नव्हे. तेव्हां विक्रीचें करारपत्र हें कांहीं फारसें सोयीचें तारणपत्र नव्हे.

कांहीं पेढ्या इमारतीला योग्य अशा जमीनी तारण म्हणून स्वीकारतात. कारण त्यांची त्यावेळीं अशी कल्पना असते कीं, त्या जमिनीवर घरें झालीं म्हणजे तेथें नवीन लोक येऊन लोकवस्ती वाढेल, व्यापारवृद्धि होईल व एकंदरींत पुढें त्या जागेला बरेंच महत्व येऊन तिची किंमतही खूबच वाढेल; पण हें शेख महमदी मनोराज्य लवकरच ढासळून पडतें. कारण ह्या जागेवर इमारती बांधण्यास ज्या माणसास किंवा कंपनीस पेढीनें कर्ज दिलेलें असतें तिचें किंवा त्याचें कदाचित्

दिवाळें निघण्याचा संभव असतो व त्यामुळें इमारतीचें काम अर्धवटच शिल्लक रहातें; बरें, पेढीनें अर्धवट राहिलेलें इमारतीचें काम हातीं घ्यावें, तर तिचें वास्तविक तें काम नव्हे; आणि तें काम पुरें होऊन जर पेढीला फायदा झाला तर ठीक आहे; पण जर का हें काम पुरें होऊन पुरी व भरपूर किंमत न आल्यामुळें पेढीला चाट बसली तर मग तिच्या फजीतीस पारावार नसतो. कधीं कधीं पेढी एखादी जमीन फारच स्वस्त किंमतीला तारण म्हणून घेण्याच्या मोहांत पडते. त्यावेळीं पेढीला असें वाटतें कीं, तीस किंवा चाळीस वर्षांनीं जमिनीच्या बाजूला गांव वाढलें म्हणजे तिची किंमत खूब वाढेल व आपला चांगलाच फायदा होईल; पण अनुभवाअंतीं ही कल्पना खोटी ठरते व ती जमीन म्हणजे गांवांतला कचरा टाकण्याचें उत्कृष्ट ठिकाण बनते. तेव्हां लागवडीची जमीन व इमारती वगैरेकरतां असलेली जमीन पेढीनें सहसा तारण म्हणून स्वीकारूं नये. कारण त्या जमिनीला योग्य गिऱ्हाईक मिळालें तरच तिची रास्त किंमत होणार आणि जमीन कालांतरानें जास्त किंमतीला विकली जाणार अशा समजूतीनें ती सध्यां एखादी तारण म्हणून स्वीकारणें म्हणजे सट्टेबाजीचाच प्रकार होय.

ह्यानंतर तारणाचा निषिद्ध प्रकार म्हणजे एखाद्या चालत्या कंपनीच्या इमारती व तिचीं यंत्रें वगैरे होत. ह्या तारणांतील दोष असा आहे कीं, कंपनीचा धंदा जोंपर्यंत चालतो तोंपर्यंत ठीक असतें; पण एकदां तो धंदा आंतबट्ट्याचा होऊं लागला म्हणजे ती इमारत व तीं यंत्रें मातीमोल होतात. बरें, त्या इमारतीवर व यंत्रावर जर कोणीं अगोदरच कर्ज दिलें असलें म्हणजे पेढीला आपलें कर्ज वसूल करितांना फारच त्रास होतो. तात्पर्य, लोखंडासारख्या धातू गाळण्याच्या भट्ट्या, गिरण्या किंवा कायद्यानें गहाण टाकतां येत नाहीं अशी यंत्रसामुग्री, स्थायिक सामानसुमान किंवा हत्यारें हीं पेढीनें कधींही तारण म्हणून स्वीकारूं नयेत.

आणखी एका अनिष्ट तारणाचा उल्लेख करून ह्या निषिद्ध तारणपुराणाची समाप्ति करूं. कधीं कधीं पेढ्या पुनर्गहाणावर तारण समजून कर्जपेढीचा संतोष मानीत असतात. पण हें पुनर्गहाण स्वीकारण्यांत पेढ्यांस बराच धोका असतो. आपण अशी कल्पना करूं कीं, एका इमारतीची किंमत १०,००० रुपये आहे व तिच्या मालकाला पैशाची अडचण असल्यामुळें त्यानें एक सावकार गांठून त्याच्याकडे ६,००० रुपयांना ती गहाण टाकली. ह्याचा असा अर्थ होतो कीं,

त्या घराची किंमत गहाण स्वीकारणाऱ्या माणसाच्या मतानें ६,००० वर होऊं शकत नाहीं. अशी स्थिति असतांना तेंच घर पेढीकडे दुसऱ्या खेपेला गहाण म्हणून आलें व पेढीनें २,००० रुपयांना तें घेतलें तर तें रास्त होईल काय? त्या इमारतीची किंमत ८,००० रुपये असती तर पहिल्या सावकारानेंच तेवढ्या रकमेवर गहाण म्हणून ती आपल्याकडे ठेवली असती. शिवाय १०,००० रुपये ही जी किंमत ठरलेली असते ती सोन्याचांदीच्या किंमतीप्रमाणें सर्व लोकसंमत अशी असते काय? ती किंमत म्हणजे एका सवलतीनें किंमत ठरविणाऱ्या माणसाचा अंदाज होय. एकदां जी इमारत विकावयाला काढली व तिची किंमत अंदाजापेक्षां कमी आली म्हणजे पहिला सावकार आपली रकम खर्चव्याजसुद्धां चोपून वसूल करणार व खालीं जी रकम राहील तिच्यावर पेढीचा हक्क राहणार व ही किंमत बरीच कमी आली म्हणजे पेढीला शंख करण्याची पाळी येणार. तेव्हां पुनर्गहाण हें तारण धोक्याचें म्हणून पेढीनें वर्ज्य करावें.

ह्या सर्व विवेचनावरून कोणतीं तारणें पेढीनें त्याज्य समजावीं व कोणचीं स्वीकारावीं ह्याची स्थूल कल्पना वाचकांस येईल; पण कांहीं झालें तरी हे नियम म्हणजे वेदवाक्य नव्हेत. वर सांगितलेले नियम सर्वसामान्य होत; पण हे सर्व नियम बाजूला सारून एखादा चलाख पेढीवाला आपल्या पेढीचें कल्याण करूं शकेल. कोठलेंही तारण असो, तें स्वीकारावें किंवा न स्वीकारावें हें ठरवितांना प्रत्येक पेढीच्या मॅनेजरनें स्वतःच्या निर्णयबुद्धीचा, हुशारीचा व आपल्याला असलेल्या माहितीचा पूर्ण उपयोग करून घेतला पाहिजे व हें सर्व फक्त विलक्षण बुद्धीच्या माणसालाच साधत असतें.

लोकांस कर्ज देण्याबद्दल कांहीं सामान्य तत्त्वें:—शेवटीं कर्ज देण्याच्या बाबतींत कांहीं सामान्य तत्त्वें सांगून हा विषय पुरा करूं. कर्ज देतांना पेढ्यांनीं तारणाची किंमत व कर्ज देण्याची रकम ह्यांत बरेंच अंतर ठेवावें. कारण तारणाची किंमत पुढें मागें उतरण्याचा संभव असतो. त्याचप्रमाणें आपल्या गिऱ्हाइकाबद्दल पेढीच्या मॅनेजरला जर एकदम संशय आला व त्याच्या शिलकेहून जास्त जर त्यानें रकम पेढीकडून कर्जानें काढली तरी त्याचा चेक एकदम नाकारूं नये. अर्थात् ठराविक रकमेपर्यंत आपल्या कुळाला रकम देण्याचें जर पेढीनें ठरविलें असलें व त्या रकमेची मर्यादा ओलांडण्याचा जर प्रसंग आला

तर मात्र चेक परत करावा, तोंपर्यंत करूं नये. तसेंच पेढीनें सहसा दीर्घकाल मुदतीचें कर्ज कोणाला देऊं नये; त्याचप्रमाणें एकाच माणसाला बरेंच कर्ज देण्यापेक्षां थोडें थोडें कर्ज बऱ्याच लोकांना तिनें द्यावें; कारण एखाद्यानें दगा दिलाच तर तिचें थोडेंच नुकसान होईल.

पेढीनें एखाद्या माणसास कर्ज देतांना नेहमीं लक्ष्यांत ठेवावें कीं, ज्याला आपण कर्ज देत आहों त्या माणसाला योग्य कर्ज फेडण्याचीं साधनें उपलब्ध असतील किंवा नाहीं. तो जर मिळालेल्या कर्जाचा उपयोग तितक्याच किंमतीचा माल खरेदी करण्याचे कामीं करीत असेल तर ठीकच आहे. तसा विनियोग जर होण्याचा संभव नसेल तर पेढीला आपले पैसे परत मिळणें फार मुष्किलीचें होईल.

पेढीनें सहसा एखाद्या सार्वजनिक संस्थेच्या—उदाहरणार्थ, एखादी शाळा किंवा देवालय वगैरे–चालकांना पैसे देऊं नयेत. हे लोक इमारत बांधण्यास सुरुवात करितात; पुढें मध्येंच पैशाच्या अभावीं काम बंद पडण्याच्या बेतांत आलें म्हणजे हे लोक आम्हांस लोकांकडून देणग्यांचीं अशीं अशीं आश्वासनें मिळालीं आहेत, आमच्या संस्थेचें उत्पन्न अशा तऱ्हेनें वाढणार आहे, अशा गोष्टी पेढीस सांगून तिच्याकडून कर्ज काढण्याचा प्रयत्न करितात; पण पेढीनें अशा वेळीं फार धोरणानें वागून हें कर्ज टाळण्याचें करावें. कारण सार्वजनिक संस्था उभारतांना पुष्कळ लोक उत्साहाचे भरांत वर्गणीचे मोठमोठे आंकडे टाकतात; पण कालांतरानें ह्या उत्साहास ओहटी लागून वर्गणी वसूल होत नाहीं व संस्था उभारण्याचें काम अर्धवटच रहातें. तेव्हां ज्या कर्जाची जिमेदारी पुष्कळ लोकांच्या औदार्यावर अवलंबून असल्यानें अनिश्चित स्वरूपाची असते, असलें कर्ज पेढीनें देऊंच नये हा उत्तम मार्ग होय.

कांहीं लोक असे हरीचे लाल असतात कीं, त्यांना पेढीचा पैसा म्हणजे फुकटचा पैसा वाटतो. ह्यांची अशी कल्पना असते कीं, जोंपर्यंत पेढीला व्याज मिळत आहे तोंपर्यंत आपल्या पैशाचा विनियोग कसा होतो आहे किंवा तो किती दिवसांनीं परत मिळेल ह्याची चवकशी करण्याचें तिचें काम नाहीं. तिचें काम म्हणजे लोकांना नुसतें वाटेल तेवढें कर्ज द्यावयाचें. अशा लोकांना पेढीनें दुरून नमस्कार करावा हेंच चांगलें.

कधीं कधीं पेढीच्या मॅनेजरला आपले नियम बाजूला ठेवून तारतम्यबुद्धीनें व्यवहार करावा लागतो. एखाद्या वजनदार व अब्रूच्या माणसानें कर्ज काढलें व त्या कर्जाची मुदत भरली असूनही त्यानें तें परत केलें नाहीं, तर अशा वेळीं पेढीनें कडकपणा धारण करून भागत नाहीं. कारण त्या माणसाचे आप्तेष्ट पेढीचे गिऱ्हाईक असले तर तो मनुष्य चिडून त्यांना बिथरवावयाचा व पेढीचें निष्कारण नुकसान व्हावयाचें. पेढीला ' लोकापवादो बलवान् मतो मे ' हें श्रीरामचंद्राचें धोरण विसरून चालणें शक्य नाहीं. कारण तिचे सर्वच व्यवहार लोकाश्रयावर चाललेले असतात; पण पेढीनें ह्या सवंग लोकप्रीतीच्या नादीं लागून नेहमीं ढिलेपणा चालूं दिला तर पेढीला पश्चात्ताप करण्याचा लवकरच प्रसंग येईल. कधीं कधीं पेढीला भूतदयेनें प्रेरित होऊन एखादा सचोटीचा गृहस्थ जर विपन्नावस्थेप्रत गेला तर त्या माणसाला कर्जाची माफीही द्यावी लागते. निव्वळ शायलॉकगिरी करूनही पेढीचा निभाव लागणार नाहीं. तेव्हां तारतम्यभावानेंच पेढीनें आपले व्यवहार केले पाहिजेत हें उघड आहे.

केव्हां केव्हां पेढीला आपल्या भागीदारांनाच कर्ज देण्याचा प्रसंग येतो. पेढीनें असें कर्ज देणें चांगलें किंवा वाईट हें निश्चयानें सांगणें कठिण आहे. तात्त्विक दृष्ट्याच विचार केला तर जो मनुष्य पेढीचे भाग विकत घेतल्यावर त्या भागांची सर्व रकम देण्यास समर्थ नसतो, तो मनुष्य भागीदार होण्यासच नालायक होतो व अशा माणसाला कर्ज देणें धोक्याचें असतें. तेव्हां अशा भागीदारांना कर्ज देण्याचा प्रसंगच आला तर पेढीनें त्यांच्याकडून चांगलें तारण—त्यांच्या भागांवरच अवलंबून न राहतां—घेऊन मग त्यांना कर्ज द्यावें. बाजारांत भागांची किंमत कांहींही असो, पेढीच्या दृष्टीनें त्यांची किंमत तिच्याजवळ असलेल्या वसूल झालेल्या भांडवलाची रकम व गंगाजळींतली रकम ह्यांनीं तिचे भाग विभागून येणाऱ्या किंमतीइतकीच असते व इतकीच किंमत हिशेबांत घेऊन व चांगलें तारण घेऊन मग पेढीनें भागीदारांस कर्जानें रकम द्यावी. अशा भागीदारांपैकीं कांहींचें जर दिवाळें निघालें तर पेढीनें त्यांचे भाग तावडतोब विकून टाकावे. तसें जोंपर्यंत ते विकले जात नाहींत तोंपर्यंत पेढीचे त्या किंमतीचें भांडवल बाद म्हणून मानण्यास हरकत नाहीं.

प्रकरण २ रें (पुढें चालू)

(ऊ) पेढीनें द्यावयाचें कर्ज.

पेढीनें अगाऊ द्यावयाचे पैसे किंवा शिलकीपेक्षां जास्त दिलेले पैसेः—पेढ्या पुष्कळ वेळां आपल्या गिऱ्हाइकांना त्यांच्या धंद्यांत त्यांना मदत करण्याकरितां अगाऊ रकमा कर्ज म्हणून देत असतात. अशा रकमा देत असतांना गिऱ्हाइकांनीं कायमचें भांडवल म्हणून त्यांचा उपयोग करू नये व अशा प्रकारें तें दीर्घ मुदतीचें होऊं नये असा संकेत त्या दोघांमध्यें असतो. इतकेंच नव्हे, तर मागणी करतांच ही अगाऊ दिलेली रकम परत आली पाहिजे अशा अटीवर ती पेढ्यांकडून गिऱ्हाईकांस देण्यांत येते. ही अट पेढीनें घालण्याचें कारण ज्या बाजूला काढून ठेवलेल्या निधींतून ही रकम देण्यांत आलेली असते त्या निधींतले पैसे पेढीनें तिचे गिऱ्हाईक मागणी करतील तेव्हां परत करावयाचे असतात हें होय. तेव्हां अगाऊ रकम घेणाऱ्या माणसाला पेढी मागणी करील तेव्हां किंवा थोड्या मुदतींत पैसे परत करण्याची अट जर पाळावयाची असेल तर त्यानें ती रकम तात्पुरती अडचण भागविण्याकरितां म्हणून घेतली पाहिजे. नवीन यंत्रसामुग्री घेण्याकरितां किंवा धंद्याच्या इमारती वाढविण्याकरितां म्हणून तो जर ही रकम घेईल तर त्याला ती रकम तावडतोब परत करणें जड जाईल.

अगाऊ रकम देतांना आपण अमुक दिवसांत पैसे परत मागूं असें पेढीनें गिऱ्हाइकांशीं ठरविलें असतांना तिनें जर योग्य सूचना न देतां एकदम पैशाची मागणी केली तर गिऱ्हाईक ह्या मागणीनें बांधला जात नाहीं. आतां योग्य म्हणजे किती दिवसांची सूचना पेढीनें दिली पाहिजे हें परिस्थितीवर अवलंबून राहील.

पेढीला आपल्या गिऱ्हाइकाला दोन प्रकारांनीं कर्ज देतां येतें. पहिला प्रकार म्हणजे चालू खात्यावर त्याला त्याच्या शिलकीपेक्षां जास्त रकम कर्ज म्हणून देणें व दुसरा प्रकार म्हणजे निराळ्याच खात्यावर कर्ज म्हणून देणें. पहिल्या प्रकारांत त्याच्या रोजच्या नांवें बाकीवर जेवढी रकम असेल तेवढ्या रकमेवर तिमाही किंवा

सहामाही व्याज त्याच्या नांवें लिहिलें जातें; पण दुसऱ्या प्रकारांत सर्वच कर्जाऊ रक्कम त्याच्या खात्यावर नांवें लिहिली जाऊन त्याच्या चालू खात्यावर एकदम जमा म्हणून मांडली जाते. अर्थात् ह्या प्रकारांतसुद्धां सर्व रकमेवर किंवा त्याच्या खात्यावर नांवें असलेल्या रकमेवर तिमाही किंवा सहामाही व्याज आकारलें जातें. गिऱ्हाइक.च्या दृष्टीनें ह्या दोन प्रकारांपैकीं पहिला प्रकार त्याला फायदेशीर आहे; पण पेढी त्याला हा फायदा पूर्णपणें पदरांत पडूं देत नाहीं. कारण चालू खात्यांत शिलकीपेक्षां जास्त काढलेल्या रकमेचा हिशेब ठेवण्याबद्दल कांहीं कमिशन ती गिऱ्हाइकांकडून उपटीत असते. पेढीनें सामान्यपणें शिलकीपेक्षां जास्त रक्कम सहसा देऊं नये व ती द्यावीच लागल्यास फार तर थोड्या म्हणजे चार आठ दिवसांच्या बोलीनें द्यावी.

पेढीनें शिलकीपेक्षां जास्त रक्कम सहसा कोणास देऊं नये.ह्याचें कारण असें आहे कीं,पेढीवर एक मोठी जबाबदारी असते. ती जबाबदारी म्हणजे पेढीकडे आपली ठेव मागण्यास गिऱ्हाईक आलें असतांना त्याला ती ठेव, आकाशपाताळ एक करून का होईना, तिनें परत केलीच पाहिजे.ही जबाबदारी पार पाडण्यास पेढीनें लोकांना त्यांच्या शिलकेपेक्षां जास्त रक्कम कधींही देऊं नये.कांहीं लोकांच्या मतानें अशी रक्कम ती जर सांगितल्या वेळीं खात्रीनें परत मिळेल तर पेढीनें देण्यास हरकत नाहीं; पण व्यवहारांतला आपला अनुभव असा आहे कीं, लोकांच्या हातीं गेलेला आपला पैसा आपणांस ठराविक वेळीं मिळतोच असा भरंवसा नसतो. पेढीवर जर एकदम मागणी आली व लोकांना दिलेला पैसा त्यांनीं जर त्या वेळीं ठरलें असूनही दिला नाहीं, तर पेढीला 'राम' म्हणण्याचीच पाळी येणार हें उघड आहे. ज्या लोकांना त्यांच्या शिलकीहून जास्त रक्कम कर्जानें दिलेली असते, त्या लोकांनीं आपल्या कर्जाऊ पैशाचा उपयोग तात्पुरती गरज भागविण्यांत न करतां जर इमारत, यंत्रें वगैरे घेण्यांत केला असेल तर त्यांनाही पैसा परत करणें कठिण जातें. तेव्हां पेढीनें असल्या भानगडींत न पडलेलें बरें. शिवाय शिलकापेक्षां जास्त रक्कम कर्जानें देण्यांत असा धोका असतो कीं, एकालाच ती रकम दीर्घ कालपर्यंत दिली व ती विनाकारण अडकून राहिली म्हणजे इतर थोडी गरज असलेल्या माणसांना पेढीला मदत करतां येत नाहीं व त्यामुळें गरिबांचें नुकसान होतें. इतकेंच नव्हे, तर ज्याला ती रक्कम शिलकेपेक्षां जास्त असूनही उसनी दिलेली असते, त्याच्याच नुकसानीला ती कारणीभूत होते. कारण पेढीकडून घेतलेली रक्कम तो

माणूस कायमच्या भांडवलांत गुंतवितो व ठराविक वेळीं त्याची फेड करण्याची तरतूद तो करून ठेवीत नाहीं. पुढेंमागें धंदा आंतबट्ट्याचा होऊं लागला व पेढी-कडून पैशाची मागणी होऊं लागली म्हणजे त्या माणसाला मोठाच पेंच पडतो. अशा वेळीं आपला माल स्वस्त दरानें विकून व इतर कांहीं लटपटी करून तो कशी तरी वेळ मारून नेतो; पण शेवटीं त्याला खड्ड्यांत पडावें लागतें व त्याच्या-बरोबर ' इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा ' ह्या न्यायानें पेढीलाही बुडावें लागतें.

पेढीनें एक गोष्ट नेहमीं लक्ष्यांत ठेवावी कीं, शिलकीपेक्षां जास्त रक्कम मागणारा, मनुष्य असो किंवा नेहमींचें कर्ज काढणारा मनुष्य असो, त्याची बुद्धी कर्ज काढलेली रक्कम व्यवस्थितपणें खर्च करण्याकडे नसते. कांहीं लोक तर अशा मताचे असतात कीं, एखाद्या सावकाराचें कर्ज व पेढींचें कर्ज ह्यांत बराच फरक असतो. कारण पेढी ही पुष्कळ लोकांची संस्था असून ती गबर असते; पण साव-कार हा एकच व्यक्ति असल्यामुळें त्याचें कर्ज न बुडविलें म्हणजे झालें. अशा लोकांकडून आपले पैसे परत मिळणें पेढीला शक्य तरी आहे काय ? तेव्हां अशा माणसांशीं पेढीनें संबंध न ठेवलेला बरा.

पेढीनें आपल्या वसूल झालेल्या भांडवलाच्या रकमेपैकीं व लोकांनीं ठेव म्हणून ठेवलेल्या रकमांपैकीं किती रक्कम कर्ज देण्यांत गुंतवावी ?--हा प्रश्न पेढीनें किती रक्कम गंगाजळी म्हणून काढून ठेवावी ह्या प्रश्नासारखाच अवघड आहे. एखादी पेढी जर एखाद्या राजधानीच्या शहरापासून किंवा मुंबईसारख्या व्यापारी शहरापासून बऱ्याच दूर अंतरावर अस-लेल्या गांवीं असली व त्या पेढीचे ठेवीवाले लोक जर आपला पैसा व्यापारांत गुंतविणारे नसले तर पेढीला असा अनुभव येतो कीं, तिच्याजवळ असलेल्या ठेवी सामान्यपणें लोक परत मागत नाहींत. अशा पेढीनें आपल्या भांडवलाचा व ठेवींचा बराच भाग जर लोकांना कर्ज देण्यांत गुंतविला तर तिला फायदाच होईल. तथापि ह्या पेढीनेंही कर्ज देण्यांत कांहीं धोरण राखिलें पाहिजे. तिचें कांहीं कर्ज कायम स्वरूपाचें असलें तरी चालेल; कारण विवक्षित मर्यादेंत हें कायम स्वरूपाचें कर्ज असलें म्हणजे तें अतिशय किफायतशीर रीतीनें पेढीला गुंतवितां येतें; पण तिचें कांहीं कर्ज अल्पकाल मुदतीचें असून तें चांगल्या स्थि-तींत असलेल्या रेलवेच्या शेअरवर किंवा अशाच प्रकारच्या शहाजोग तारणांवर

दिलेलें असलें पाहिजे. सर्वांत खात्रीची बाब म्हणजे शहाजोग व्यापाऱ्यानें दुसऱ्या एखाद्या शहाजोग व्यापाऱ्यावर काढिलेल्या हुंड्या ही होय. त्या हुंड्या पेढीजवळ असल्या म्हणजे त्या चटकन् तिला विकतां येतात व लोकांना त्यांच्या ठेवी परत करण्याचे कामीं त्यांची मदत होते.

पण हीच पेढी जर मुंबईसारख्या व्यापारी शहरांत असली तर तिच्या ठेवी नेहमीं कमीजास्त होत असतात. अशा पेढीनें लोकांना चिरकाल मुदतीचें कर्ज देण्यांत आपली रक्कम फारशी गुंतवूं नये; त्याचप्रमाणें शिलकीपेक्षां जास्त रक्कमही देण्याच्या भानगडींत पडूं नये. अशी रक्कम जास्त व्याजाच्या आशेनें देण्यांत जो फायदा असतो त्याचा वचपा त्या रकमा वाटेल तेव्हां परत होणाऱ्या नसल्यामुळें ठेवीवाल्यांनीं आपल्या रकमा परत मागितल्या असतांना त्या देण्यांत उडणाऱ्या पेढीच्या तारंबळीनें निघून येतो. तेव्हां सामान्यपणें पेढीनें आपल्या भांडवलाच्या व ठेवींच्या रकमेचा $\frac{1}{2}$ भाग कर्ज देण्यांत गुंतवावा असें म्हणण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं.

पेढीनें शिलकेपेक्षां जास्त रकमेवरील आकारावयाचें व्याजः--एखाद्या पेढीनें एखाद्या माणसास तिच्याजवळ असलेल्या शिलकेपेक्षां ५,००० रुपये जास्त कर्ज म्हणून दिले असतांना त्या रकमेवर ती पेढी जें व्याज आकारील तें व्याज आणि तितकीच रक्कम त्या पेढीनें एखादी हुंडी मिती कापून घेऊन वटविण्यांत गुंतविली असतांना ती जें व्याज आकारील तें व्याज ह्यांमध्यें बराच फरक असला पाहिजे. कारण पेढीचे हे दोन व्यवहार अगदीं निराळ्या प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारांत पेढी आपल्या गिऱ्हाइकास ५,००० रुपयांपर्यंत कायमच्या स्वरूपाचें कर्ज देत असते व त्याच्या शिलकेपेक्षां जितकी बाकी गिऱ्हाईकाचे नांवावर दररोज काढली जाते तेवढ्या बाकीवरच पेढी व्याज आकारील. अर्थात् हा व्याजाचा दर व्यापारी परिस्थितीवर व सराफकट्ट्यावर आढकून येणाऱ्या दरावर फारसा अवलंबून असत नाहीं. पण मनोती कापून घेऊन हुंड्या वटवितांना पेढी जो दर आकारते तो दर व्यापारी परिस्थितीवर बराच अवलंबून असतो. पेढीचें दुसरें असें एक सामान्य धोरण असतें कीं, व्यापारी हुंड्या काय किंवा शिलकीपेक्षां जास्त दिलेली कर्जाऊ रक्कम काय, ह्यांच्यावर ती पेढी एकच दर आकारूं इच्छित नाहीं. ज्याप्रमाणें उत्कृष्ट शहाजोग हुंड्या वट-

विण्याचा दर निराळा व हलक्या हुंड्या वटविण्याचा दर निराळा त्याचप्रमाणें गिन्हाईक जर आपल्या शिलकीपेक्षां जास्त उचललेली रक्कम पेढीला वारंवार परत आणून पुनः नेत असेल तर त्या पेढीलाही अर्थात् कमी दर आकारावा लागतो. कारण अशी रक्कम पेढीकडे वारंवार आल्यानें तिला त्या रकमेचा इतरत्र उपयोग करितां येतो; पण गिन्हाइकानें शिलकेपेक्षां जास्त रक्कम एकदां पेढीकडून उचलली व त्यांतली कांहीं रक्कम परत करण्याचें केव्हांही नांवच काढिलें नाहीं म्हणजे पेढीच्या दृष्टीनें हें कर्ज जवळ जवळ बुडीत होऊन बसतें. अशा वेळीं त्या पेढीला आपला व्याजाचा दर भारीच ठेवावा लागतो. कारण पेढीच्या मनांतून गिन्हाइकाला तें शहाजोग असल्यामुळें ती रक्कम परत करण्याची निकड प्रत्यक्ष लावण्याची इच्छा नसते; पण ती रक्कम तशीच पडून रहावी असेंही तिला वाटत नसतें. तेव्हां भारी व्याज द्यावें लागत असल्यामुळें तरी निदान गिन्हाईक त्या रकमेपैकीं कांहीं भाग परत करील अशा कल्पनेनें पेढी भारी दर आकारीत असते.

प्रकरण ३ रें

नगदी रोकड

पेढीची मालमत्ता व तिची सांपत्तिक स्थिति अजमावण्याचें साधनः—पेढीनें छापलेल्या ताळेबंदांत तिला असलेलें लोकांचें देणें अपणारें आहे किंवा नाहीं हें ताळेबंदांत असलेल्या पेढीच्या मालमत्तेच्या यादीवरूनच ठरवावयाचें असतें हें आपण विसरतां कामा नये. त्याचप्रमाणें लोकांच्या स्वीकारलेल्या ठेवींसंबंधानें हाच नियम लागू पडतो. कधीं कधीं पेढीजवळ असलेल्या ठेवीपेक्षां तिजजवळ असलेली रोकड मिळकत कमी असते. पण ह्यावरून पेढीला लोकांना देण्यास रोख पैसे नाहींत असें अनुमान आपण करणें चुकीचें होईल. कारण रोख नाणें जरी पेढीजवळ नसलें तरी त्या नाण्याच्या किंमतीची स्थावर मिळकत तिजजवळ असतेच. ज्या दिवशीं पेढीचें कर्ज तिच्या मालमत्तेहून जास्त होईल त्या दिवशीं ती नादार झाली असें आपण खास समजावें.

पेढीची मालमत्ता अनेक तऱ्हेची असूं शकते. पण मुख्यत्वेंकरून ती व्यापाऱ्यांनीं काढलेल्या हुंड्यांचीच असते. ही मालमत्ता जर स्थावर व रोकड असती तर कांहींच भानगड नव्हती; पण पेढ्या नेहमीं लोकांपासून अनामत ठेव म्हणून धान्य किंवा यंत्रें वगैरे न स्वीकारतां म्युनिसिपालिट्यांसारख्या संस्थांनीं काढिलेल्या किंवा खाजगी व्यक्तींच्या हुंड्याच जास्त पसंत करतात. एखादे वेळीं पेढीला तिच्या रोकड मालमत्तेपेक्षां जास्त देणें असलें तरी एकंदर सर्व मालमत्ता–रोकड व कागदी हुंड्याच्या रूपानें असलेली–ही तिला असलेल्या देण्याइतकीच असते.

वर सांगितल्याप्रमाणें पेढीची सांपत्तिक स्थिति ओळखण्याचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे तिचें देणें तत्काल फिटण्यासारखें असलें पाहिजे. पेढीचें मुख्य काम म्हणजे लोकांकडून कांहीं मुदतीचें कर्ज घेऊन ती मुदत भरली असतांना तें तत्काल फेडणें हें होय. अर्थात् हें कर्ज फेडण्यास तिजजवळ भरपूर रोकड पाहिजे. पण सर्वच रोकड जवळ ठेवली तर मग पेढीनें धंदा तो काय करावयाचा? तेव्हां पेढी आपला व्यवहार करीत असतांना तिनें नादारी व अपुरी रोकड ठेवल्यानें येणारी आपत्ति हीं दोन्हीं संकटें टाळलीं पाहिजेत. ज्या वेळीं अपुऱ्या भांडवलावर पेढी जास्त कर्ज काढीत असते त्यावेळीं ती नादार होण्याचें भय असतें व ज्यावेळीं अपुरी रोकड ठेवून ती जास्त कर्ज काढते त्यावेळीं तिला दुसऱ्या प्रकारचें संकट उत्पन्न होतें. तेव्हां प्रत्येक पेढीनें बरेंच भांडवल व बरीच रोकड रक्कम ठेवणें अगत्याचें असतें. नादारीची आपत्ति कोठलाही धंदा करणाऱ्या कंपनीला येऊं शकते; पण अपुरी रोकड असल्यामुळें येणारी आपत्ति फक्त नोटांबद्दल रोकड रुपये देण्याचे वेळीं किंवा ठेवी परत करण्याचे वेळीं पेढ्यांसच येऊं शकते. ही आपत्ति टाळण्यास प्रत्येक पेढीनें कर्ज काढणें व नोटा काढणें हें अशा बेतानें करावें कीं, वाटेल त्या वेळीं तिला पुरेशी रोकड ठेवतां आली पाहिजे. रोकडीच्या मानानें पेढीनें जर जास्त कर्ज काढलें तर तिला फायदा होईल; पण त्यांत धोकाही बराच आहे. तसेंच तिजजवळ असलेल्या रोकडीच्या मानानें तिचें कर्ज बरेंच थोडें असलें तर तिला आपला व्याजाचा दर कमी करावा लागतो; पण तिनें काढलेलें ठेवींच्या रूपाचें कर्ज फार असलें व बरेच लोक आपले पैसे परत मागणार असें तिला दिसून आलें, तर तिला व्याजाचा दर वाढवून आपलें कर्ज कमी करावें लागेल. अशा रीतीनें व्याजाचा दर आळीपाळीनें कमीजास्त करून पेढीला आपण काढलेल्या कर्जांत व रोकड शिलकेंत योग्य प्रमाण ठेवावें लागतें.

पेढीची नगदी रोकड कमीजास्त करण्याचे मार्गः—प्रत्येक पेढीजवळ नेहमीं कांहीं नगदी रोकड शिल्लक असतेच. ही रोकड कधीं कधीं व्यापारी परिस्थितीमुळें पेढीला वाढवावी लागते व कमी करावी लागते. ज्यावेळीं लोकांची मागणी तिच्याकडे जोरानें सुरू होते त्यावेळीं तिला आपली नगदी रोकड वाढविण्याकरितां निरनिराळ्या युक्त्या योजव्या लागतात. पहिली युक्ती म्हणजे लोकांच्या ठेवी जास्त प्रमाणांत स्वीकारणें ही होय. लोकांना आपल्या ठेवी वाढविण्यास प्रवृत्त करण्याकरितां पेढीला अर्थातच आपला व्याजाचा दर वाढवावा लागतो. ह्या ठेवींचे तीन प्रकार असतात. ते प्रकार म्हणजे मुदतीच्या ठेवी, चालू खात्यावरील ठेवी व संचयोत्तेजक खात्यांतील ठेवी हे होत.

दुसरा मार्ग म्हणजे सरकार किंवा इतर पेढ्या–मग त्या तिच्या शाखा असोत किंवा स्वतंत्र पेढ्या असोत–त्यांचेकडून पैसा मागविणें हा होय. हा मार्ग पेढ्यांस व्यापारी परिस्थिति चिंताजनक नसेल तेव्हांच उपयोगी पडतो. आणीबाणीच्या वेळीं सर्वच पेढ्यांना पैशाची गरज भासूं लागल्यास त्या एकमेकांना मदत करूं शकणार नाहींत हें उघड आहे. सरकारसुद्धां पेढ्यांची स्थिति सांपत्तिक दृष्ट्या ठीक असेल तरच मदत करील. एखादी पेढी आपले कारभार अशास्त्रीय रीतीनें चालवीत असतांना जर पेंचांत आली तर तिला सरकारनेंसुद्धां मदत करणें कितपत इष्ट आहे हा प्रश्नच आहे.

तिसरा मार्ग म्हणजे पेढी ज्या ठिकाणीं असेल तेथील व्यापाऱ्यांवर बाहेरच्या व्यापारी लोकांनीं काढलेल्या हुंड्या गोळा करून त्यांचे पैसे वसूल करणें हा होय. हल्लींच्या काळीं पेढ्यांचें मुख्य काम हुंड्यांची खरेदीविक्री करणें हें असल्यामुळें असल्या हुंड्या गोळा करून त्यांचे पैसे वसूल करणें हा शिष्टसंमत मार्ग होऊन बसलेला आहे.

चवथा मार्ग म्हणजे पैशाची फारच गरज भासल्यास एक पेढी दुसऱ्या पेढीवर—मग ती दुसरी पेढी मध्यवर्ती पेढी असो किंवा दुसरी एखादी पेढी (Correspondent) असो—हुंड्या काढीत असते. ह्या हुंड्यांत ज्याचें नांव लिहिलें असेल त्याला किंवा तो सांगेल त्या माणसाला पैसे मिळावयाचे असतात. ह्या हुंड्या किंवा ज्या हुंड्यांचे पैसे तारेनें मिळण्यासारखे असतात, त्या हुंड्या (Telegraphic Transfers) विकून पेढ्या पैसे उत्पन्न करून आपली नगदी रोकड वाढवीत असतात.

आतांपर्यंत नगदी रोकड वाढविण्याच्या मार्गांचा विचार झाला; पण कधीं कधीं पेढ्यांना आपल्याजवळची जास्त झालेली नगदी रोकड गुंतविण्याचीही पाळी येते. ही रोकड अनेक मार्गांनीं पेढ्या गुंतवीत असतात. पहिला मार्ग म्हणजे व्यापाऱ्यांनीं दुसऱ्या व्यापाऱ्यांवर काढलेल्या हुंड्या मनोतीनें पैसे कापून वटविणें हा होय. ह्या हुंड्यांचे अनेक प्रकार असतात. कांहीं हुंड्या देशी असतात, म्हणजे देशांतल्या देशांत एका व्यापाऱ्यानें दुसऱ्या व्यापाऱ्यावर काढिलेल्या असतात. कांहीं ह्याच्याउलट परदेशच्या व्यापाऱ्यांवर काढलेल्या, अतएव परदेशी असतात. कांहीं हुंड्या दर्शनी असतात, तर दुसऱ्या हुंड्या मुदतीच्या असतात. ज्या हुंड्यांची मुदत दहा दिवसांच्या आंतील असते, त्यांना अल्पकाल मुदतीच्या हुंड्या म्हणतात व ज्यांची मुदत तीन, चार किंवा सहा महिन्यांची असते, त्यांना दीर्घकाल मुदतीच्या हुंड्या अशी संज्ञा आहे. ह्या हुंड्या खरेदी करण्यांत पैसा अडकविणें पेढ्यांना नेहमीं सुरक्षित असतें.

दुसरा मार्ग म्हणजे लोकांना कांहीं ठराविक मुदतीचें कर्ज देणें किंवा ठराविक मर्यादेपर्यंत अब्रूदार लोकांना तारण वगैरे न मागतां रोख पैसे उचलूं देणें हा होय. हा मार्गही पेढ्यांना हितकर असतो. मात्र कोणाला किती कर्ज द्यावयाचें ह्याचा तारतम्य विचार करूनच मग त्यांनीं व्यवहार करावा.

तिसरा मार्ग म्हणजे आपल्याजवळची फुगलेली शिल्लक मध्यवर्ति पेढीकडे किंवा इतर पेढ्यांकडे त्यांना जरूर असल्यास पाठवून देणें. मध्यवर्ति पेढीच्या शाखा सर्वत्र असतात व कधीं कधीं मुख्य पेढीलाच कांहीं कारणांनीं पैशाची गरज असते. अशा वेळीं जास्त शिल्लक असलेल्या पेढीनें मुख्य पेढीकडे पैसे पाठविण्यास हरकत नसते.

चवथा मार्ग म्हणजे दर्शनी हुंड्या विकत घेणें किंवा इतर पेढ्यांनीं आपणांवर काढलेल्या तारेच्या हुंड्यांचे पैसे भरणें हा होय. अशा प्रकारांनीं पेढ्या आपल्याजवळील फाजील शिलकेचा विनियोग करीत असतात व नगदी रोकड कमी करतात.

पेढीचें कर्ज व तिची नगदी रोकड ह्यांमधील प्रमाणः— ह्या रोकडीसंबंधानें प्रत्येक पेढीनें एक सामान्य नियम असा लक्षांत ठेवावा कीं, तिला असलेल्या एकंदर देण्यांपैकीं लोकांच्या ठेवी जर बऱ्याच असल्या तर त्या

मानानें रोकड जास्त ठेवलेली असावी. कारण ठेवी ठेवणारे लोक आपल्या रकमा जर एकदम मागूं लागले तर त्या नगदी रोकडीला लवकरच ओहोटी लागणार. तसेंच लोकांच्या ठेवीच जर थोड्या मुदतीच्या असल्या किंवा त्या ठेवी हुंडी–दलाला-सारख्यांनीं ठेवल्या जाणाऱ्या, अतएव नेहमीं कमी जास्त होणाऱ्या असल्या, तरी-सुद्धां ही रोकड मोठ्या प्रमाणांत पाहिजे. पेढी जर एखाद्या मोठ्या शहरांत असेल तर तिच्याजवळ येणाऱ्या लोकांच्या पैशाच्या मानानें तिला लागणारी रोकड ही ती खेडेगांवांत असतांना लागणाऱ्या रोकडीपेक्षां केव्हांही जास्तच असली पाहिजे. तेव्हां प्रत्येक पेढीनें आपल्याला असलेल्या कर्जाच्या मानानें आपण किती रोकड ठेवावी हें अनुभवानेंच ठरविलें पाहिजे. एखादा निश्चित नियम सांगणें केव्हांही शक्य होणार नाहीं.

रोकड कमी ठेवल्यानें होणारे दुष्परिणामः—तरीपण नगदी रोकड कशा प्रमाणांत असावी, ह्याबद्दल अनुभवानें कांहीं नियम ठरले आहेत. कांहीं अनुभविक पेढीवाल्यांच्या मतानें पेढीला एकंदरींत जेवढें कर्ज असतें त्याच्या $\frac{1}{3}$ गंगाजळी राखून ठेवली असतां पेढ्यांना आपले व्यवहार बिनधोकपणें चालवितां येतील. कांहींच्या मतानें ही रक्कम जास्त आहे व इतकी रक्कम विना-कारण अडकवून ठेवण्याचें कारण नाहीं. $\frac{1}{3}$ गंगाजळीच्याऐवजीं $\frac{1}{5}$ रक्कम जरी अलग काढून ठेवली तरी पेढ्यांचें काम भागण्यासारखें आहे; पण अनुभवानें असें ठरलें आहे कीं, ज्या पेढ्या आपली रोकड एकंदर कर्जाच्या $\frac{1}{5}$ इतकी ठेवतात त्यांना मागितल्याबरोबर परत मिळणाऱ्या किंवा अगदीं थोड्या मुदतीच्या कर्जाच्या रक-मेवर अवलंबून रहावें लागून ती रक्कम फस्त झाल्यावर मग जवळ असलेले सर-कारी रोखे विकण्याची पाळी येते व ही बातमी फुटल्यावर अर्थातूच लोकांना पेढीच्या सांपत्तिक स्थितीबद्दल संशय येऊं लागतो व एकंदर परिणाम असा होतो कीं, लोक जास्तच पैशाची मागणी करूं लागतात. कधीं कधीं पेढ्यांनीं आपल्या-जवळचे रोखे विकावयास न काढले तर जवळ असलेल्या व्यापारी हुंड्याच मनो-तीनें पुनः वटविण्यास त्या आरंभ करतात किंवा एखाद्या गिऱ्हाइकास त्याच्या शिलकी-पेक्षां जास्त रक्कम कर्जानें दिली असतांना ती रक्कम परत मागूं लागतात व एका-एकीं हुंड्या पुनः वटविण्यास किंवा रकमा परत मागण्यास त्यांनीं सुरु-वात केली म्हणजे लोकांचा संशय दुणावतो. त्यांचा एकदां विश्वास उडाला म्हणजे मग आहेत त्या ठेवी ते लोक परत मागतात व पुनः त्या ठेवी त्याच पेढ्यां-

मध्यें ते ठेवूं इच्छित नाहींत व एकंदरींत पेढ्यांच्या व्यवहारास धक्का बसतो. ही सर्व आपत्ति टळण्यास एकंदर कर्जाच्या $\frac{१}{३}$ इतकी रक्कम काढून ठेवणेंच इष्ट आहे. नगदी रोकड थोडीशी जास्त असल्यानें एक मोठा फायदा असा असतो कीं, आपल्याजवळची शिल्लक संपत आली असतांना कोणत्या व्यापाऱ्याच्या हुंड्या पुनः मनोतीनें व्याज कापून वटवाव्या किंवा कोणत्या गिऱ्हाइकाला त्याची शिल्लक नसतांना अधीक दिलेलें कर्ज परत करण्यास सांगावें ह्याबद्दल चांगला विचार करून मग पेढ्यांस वागतां येतें.

रोकड व सरकारची सक्तिः—पण कांहीं झालें तरी सर्व पेढ्यांनीं सर्वकाळीं एक ठराविक रक्कम नगद म्हणून काढून ठेवावी असा सरकारनें नियम करणें कव्हांही शक्य नाहीं. पेढ्यांना लागणारी रोकड ही त्यांच्या गरजांप्रमाणें निरनिराळ्या ऋतूंत बदलत असते. शरदृतूंत मजूर लोकांना मजुरी म्हणून पैसे देण्याकरितां मोठमोठ्या जमिनीची लागवड करणाऱ्या लोकांना ज्या वेळीं रोख नाण्याची जरूर असते त्या वेळीं अर्थातच ते पेढ्यांकडे एकदम मागणी करतात. तसेंच शेतांत धान्य तयार होऊन तें व्यापारी लोक मोठ्या प्रमाणांत जेव्हां विकत घेतात तेव्हां पेढ्यांच्या शिलकेवर खूब ताण पडतो. ह्या वेळा ओळखून त्या वेळीं किती गंगाजळी राखून ठेवावी हें अनुभवानेंच पेढ्यांनीं ठरविलें पाहिजे.

गंगाजळी किती ठेवावयाची हें ठेवी ठेवणारे लोक कोणत्या धंद्याचे आहेत, ह्यावरसुद्धां अवलंबून राहील. ठेवी ठेवणारे लोक शेतकीच्या मुलुखांत राहणारे असले तर ते आपल्या ठेवी सहसा काढीत नाहींत व पेढ्यांनीं जरी आपली शिल्लक थोड्या प्रमाणांत ठेवली तरी हरकत नाहीं; पण तेच ठेवीवाले लोक उद्योगधंदा, व्यापार वगैरे जेथें जोरांत चालतो अशा मुलुखांतले असले म्हणजे ते आपल्या ठेवी वारंवार काढून घेत असतात; म्हणून येथील पेढ्यांनींही आपली शिल्लक जास्त प्रमाणांत ठेवली पाहिजे. त्याचप्रमाणें लोक जर आपले व्यवहार पेढ्यांवर काढलेल्या चेकांनीं न करतां रोख नाण्यांतच करीत असले तर पेढ्यांनाही शिल्लक जास्तच ठेवावी लागणार. तव्हां सांगावयाचें तात्पर्य हें आहे कीं, पेढ्यांनीं अमुकच शिल्लक राखून ठेविली पाहिजे अशी सक्ति असणें इष्ट नाहीं व अशी सक्ति अमेरिकेखेरीज इतर दे ांत नाहींही. अमेरिकेंत पूर्वी शहरापासून दूर असलेल्या ठिकाणीं असलेल्या पेढ्यांनीं जितक्या रकमेच्या ठेवी असतील त्या रकमेच्या १५ टक्के गंगाजळी

काढून ठेवावी व ह्या रकमेचा $\frac{२}{५}$ रोख नाणीं व बाकीची रक्कम ' रिझर्व्ह ' शहरांत असलेल्या व सरकारनें पसंत केलेल्या पेढ्यांमध्यें ठेव म्हणून ठेवावी असा एक कायदा असे. त्याचप्रमाणें ह्या ' रिझर्व्ह ' शहरांतल्या पेढयांनीं ठेवींच्या २५ टक्के अलग काढावी व ह्या रकमेचा अर्धा भाग रोकड म्हणून व बाकीचा अर्धा भाग मध्यवर्ति ' रिझर्व्ह ' शहरांत ठेवावा असा हा एक कायदा असे. हल्लींही अशा तऱ्हेचे कायदे अमेरिकेंतल्या इतर संस्थानांत आहेत. असे कायदे असल्यानें पेढयांचे हातपाय जखडले जाऊन कायद्यानें ठरलेल्या मर्यादेपर्यंत शिल्लक येऊन पोंचली कीं, त्यांना आपले व्यवहार बंदच ठेवावे लागतात. शिवाय ह्या सरकारी कायद्याशिवाय पेढयांचें अगदीं अडतें व ठेवीवाले लोक व्यापारी आणीबाणीच्या वेळीं हटकून बुडतातच असेंही नाहीं. इतर सर्व देशांत पेढया आपल्या गरजेप्रमाणें नगदी रोकड बाजूला काढून ठेवून आपला व्यवहार शास्त्रशुद्ध रीतीनें करीत असलेला आपण पहातोंच आहोंत. तेव्हां नगदी रोकडीच्या बाबतींत सरकारी नियंत्रण नसलेलें बरें.

नगदी रोकड स्वतःजवळच असणें श्रेयस्कर आहे:—कधीं कधीं पेढ्या आपल्याजवळील गंगाजळी ठेवींत रोख नाणें न ठेवतां दुसऱ्या पेढ्याजवळ आपली ठेव ठेवतात व त्यांना जर रकमेची जरूर लागली तर त्या ह्या दुसऱ्या पेढ्यांकडे तावडतोब मागणी करतात; पण ह्यांत जरा धोका आहे. कारण आपल्याजवळची शिल्लक वाढवितांना ज्या वेळीं एखादी पेढी दुसऱ्या पेढीकडे मागणी करते त्या वेळीं एका पेढीवर आलेलें संकट दुसऱ्या पेढीवर ओढवतें एवढाच ह्याचा परिणाम होतो. सर्व समाजाच्या दृष्टीनें ह्या पेढ्यांच्या ठेवीपासून आणीबाणीच्या वेळीं फारसा फायदा होत नाहीं. त्याचप्रमाणें दुसऱ्या पेढ्यांनीं काढलेल्या नोटा एखाद्या पेढीनें आयत्या वेळीं उपयोगी पडाव्या म्हणून जर आपल्या गंगाजळींत ठेवल्या, तरीसुद्धां हाच दोष दिसून येतो. कारण जोंपर्यंत ही दुसरी पेढी सांपत्तिक दृष्ट्या चांगल्या स्थितींत आहे तोंपर्यंतच तिच्या नोटांना किंमत आहे. शिवाय वर सांगितल्याप्रमाणें एका पेढीनें आपल्या नोटांबद्दल लोक पैसे मागण्याकरितां आले असतांना दुसऱ्या पेढीकडे पैशाची मागणी केली म्हणजे तिची शिल्लकही कमी होणारच व तिला जर आपल्या नोटांबद्दल पैसे देण्याची पाळी आली तर तिची अडचणच होणार.

कधीं कधीं पेढ्या मागितल्याबरोबर ज्या कर्जाचे पैसे परत मिळतील अशा प्रकारचें लोकांना दिलेलें कर्ज हिशेबांत धरून त्याची नगदी रोकडींत गणना कर-

तात; पण ह्या कर्जावर पेढ्यांनीं फारशी भिस्त ठेवूं नये; कारण पेढीला जरूर लागली असतांना तिनें जर ह्या कर्जाच्या फेडीची मागणी आपल्या गिऱ्हाइकाकडे केली तर ते लोक इतर पेढ्यांकडे जास्त व्याज देऊन कर्ज काढूं लागतील किंवा आपली मालमत्ता विकून पुनः त्याच पेढीकडे नवीन कर्ज म्हणून पैसे मागूं लागतील; म्हणजे पुनः पेढीलाच पैसे पुरविण्याची पाळी येते. तेव्हां हा मार्गही फारसा श्रेयस्कर नाहीं.

प्रकरण ४ थें.

पत.

पत म्हणजे काय ?--पत ही उद्योगधंद्यांना अतिशय महत्वाची बाब आहे, किंबहुना त्यांचा ती पायाच आहे. शरीरास जसा आत्मा, तशी पेढ्यांना पत होय. लोकांचा विश्वास संपादन करून आपली पत वाढविल्याशिवाय पेढयांना आपला धंदा वाढवितां येणेंच शक्य नाहीं. त्याचप्रमाणें जोंपर्यंत लोकांचा विश्वास पेढीवर आहे व तिची पत त्यांच्यामध्यें आहे तोंपर्यंतच आपल्या ठेवी तिजजवळ ते ठेऊं इच्छितील. एकदां का ही पत गेली म्हणजे पेढीचे बाराच वाजले असें समजण्यास बिलकूल हरकत नाहीं. पेढीचा धंदा यशस्वी रीतीनें चालवून त्यांत पुष्कळ नफा मिळवावा अशी प्रत्येक पेढीवाल्याची इच्छा असते. पण ती इच्छा सफल होण्यास मुख्य गोष्ट म्हणजे पेढीनें आपली पत आपल्या पचोटीच्या व शास्त्रशुद्ध वर्तनानें लोकांत पूर्णपणें प्रस्थापित केली पाहिजे. अशी पत एकदा स्थापन झाली व पेढीचे व्यवहार सरळ असले म्हणजे तिचें अस्तित्व पिढयांनुपिढया टिकतें व नवीन कर्ज काढून, नवीन ग्नातीं निर्माण करून व आपली छाप गिऱ्हाइकांवर ठेवून तिला चांगला नफा मिळवितां येतो; इतकेंच नव्हें तर नवीन नवीन निघणाऱ्या पेढयांशीं चांगली टक्कर देऊन आपलें श्रेष्ठत्व स्थापन करितां येतें. हिंदुस्थानांतल्या कांहीं कांहीं पेढया ह्याच गोष्टीची खात्री पटवितात. पण ह्या सर्व गोष्टींच्या मुळाशीं पत आहे ही गोष्ट आपण विसरतां कामा नये.

अशी ही पत म्हणजे आहे तरी काय ? 'पत' ह्या शब्दाची व्याख्या अनेक तऱ्हांनीं करतां येईल. पत ही फक्त पेढ्यापुरतीच असते अशांतला भाग नाहीं. पत ही अशी एक चीज आहे कीं, ती मनुष्य असो, किंवा एखादी संस्था असो, किंवा एखादें राष्ट्र असो, त्या सर्वांना तिची जरूर असते. आपण अशी कल्पना करूं कीं, अ हा गृहस्थ बाजारांत आपल्याजवळ असलेलें धान्य घेऊन गेला. त्या बाजारांत त्याची व ब ह्या गृहस्थाची गांठ पडली. ह्या नवीन गृहस्थाला धान्य तर हवें आहे; पण जवळ पैसा नाहीं. अशा स्थितींत अ व ब मध्यें सवदा होणें शक्य आहे किंवा नाहीं ? होय, सवदा होणें शक्य आहे; मात्र बनें अला कांहीं काळानें त्या धान्याच्या किंमतीची वस्तु मोबदला देण्याचें कबूल केलें पाहिजे. पण अनें बला असें करूं देण्यास बची अजवळ चांगली पत पाहिजे. कधीं कधीं एक माणूस दुसऱ्या माणसाला एकादी जिन्नस उसनी देतो, कांहीं काळानें तो दुसरा मनुष्य ती जिन्नस परत करितो. ह्या व्यवहारांत प्रत्येक वेळीं एकदा उसनी दिलेली जिन्नस तशीच परत येते अशांतला भाग नाहीं. एखादे वेळीं त्या जिनसेच्या किंमतीची दुसरी जिन्नसही परत घेण्यास पहिला मनुष्य तयार होतो. हा व्यवहार वर सांगितलेल्या व्यवहाराहून भिन्न आहे. पहिल्या व्यवहारांत एका गृहस्थाकडून दुसरा गृहस्थ एक जिन्नस प्रत्यक्ष विकत घेत आहे; दुसऱ्या व्यवहारांत तो गृहस्थ कर्ज म्हणून ती जिन्नस घेत आहे. दोन्ही व्यवहारांत पतीवरच व्यवहारांची घडामोड होत आहे.

पत कशावर अवलंबून असते ?—हें विवेचन जर वाचकांस बरोबर कळलें असेल तर त्यांस समजून येईल कीं, पतीवर होणाऱ्या प्रत्येक व्यवहारांत दोन गोष्टी नेहमीं घडत असतात. त्या गोष्टी म्हणजे वस्तूंची अदलाबदल व भविष्यकाळीं होणारी पैशाची फेड ह्या होत. आपला नेहमींचा अनुभव असा आहे कीं, सवदा होत असतांना पैशाची उधारी ठेवणें कोणास फारसें आवडत नाहीं. 'पैसा रोख माल चोख' किंवा 'आज नगद उधार उद्यां' ह्या व्यापारांतील प्रचलित म्हणी तरी हेंच तत्त्व आपणांस सांगतात. तेव्हां मनुष्य ज्या वेळीं एखादी वस्तु विकल्यावर कालांतरानें त्याची किंमत घेण्यास तयार होतो त्या वेळीं त्याची प्रगति व्यापारांत बरीच झाली आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

हल्लीं सुधारलेल्या देशांत बहुतेक व्यवहार उधारीवरच होत असतो व ह्या उधारीच्या मुळाशीं व्यापारी पत असते. पतीवर मनुष्य मोठमोठ्या रकमा उसन-

वार घेत असतो व त्या रकमा व्यापारांत घालून जास्त पैसा उत्पन्न करीत असतो. ज्या देशांत पतीनें व्यवहार करण्याच्या पद्धतीची वाढ झालेली आहे त्याच देशांत भांडवलास जोराची मागणी असून उद्योगधंद्याची वाढ जोरांत होते. एखाद्या माणसानें किंवा राष्ट्रानें आपले सर्व व्यवहार रोखीनेंच करूं म्हटलें तर त्याचा धंदा फारसा जोरांत चालणार नाहीं; पण त्याच माणसानें आपली पत वाढवून जर आपल्या धंद्यास सुरुवात केली तर त्याचेकडून जास्त मालाची अदलाबदल होऊन जास्त मालाची निपज होईल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जगांतील सर्व खाणी गोळा करून त्यांत सांपडणाऱ्या धातूंनीं हें जग जितकें श्रीमंत झालें आहे त्यापेक्षां हजार पटींनीं जास्त श्रीमंत तें नुसत्या पतीनें झालें आहे असें जे वेबस्टर म्हणतो तें अक्षरशः खरें आहे. वर सांगितल्याप्रमाणें पत ही पेढीचा आत्मा आहे. ही पत जशी पेढीस संभाळावी लागते तशी पेढीच्या गिऱ्हाइकास-सुद्धां ती संभाळावी लागते. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, पेढी आपल्या गिऱ्हाइकाची पत कोणत्या आधारावर ठरवीत असते? ह्याचा जर सूक्ष्मपणें विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, पेढी प्रथम त्या माणसाचें नांव लोकांमध्यें कसें आहे ह्यांची चवकशी करील. एखादा मनुष्य अगदीं सज्जन असून-सुद्धां धंदेवाईक लोकांत त्याचें नांव वाईट असेल व हें नांव वाईट असण्याचें कारण त्याला व्यापारी शील नसेल. नैतिक शील व व्यापारी शील भिन्न असूं शकतात. एखादा मनुष्य अट्टल दारुबाज असून सुद्धां व्यापारी लोकांत त्याचें चांगलें नांव असूं शकेल. कारण त्याचे व्यापारी व्यवहार पूर्ण सचोटीचे असूं शकतील. तेव्हां पेढीच्या गिऱ्हाइकानें आपली पत तिच्याजवळ उत्तम प्रकारानें वाढविली पाहिजे. ही पत त्यास जर कायम ठेवावयाची असेल तर त्यानें काढिलेलें पेढीचें कर्ज वाटेल तेव्हां फेडण्याची त्याच्या अंगांत धमक पाहिजे.

पत व विश्वासः—पण पतीच्या मुळाशीं केव्हांही विश्वास असतो ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. पेढी असो किंवा एखादा गृहस्थ असो, तो जेव्हां लोकांजवळ पैसे मागतो तेव्हां हे पैसे आपणांस परत—नुसते परतच नव्हे तर थोड्याबहुत व्याजासहित—मिळतील असा भरंवसा तो गृहस्थ किंवा ती पेढी लोकांमध्यें उत्पन्न करील तेव्हांच ते आपला पैसा त्या माणसाला किंवा पेढीला देतील. कधीं कधीं माणसाच्या नुसत्या शब्दावर कर्ज देणाऱ्याचा विश्वास नसतो

म्हणूनच तो त्या माणसाकडून कांहीं तारणादाखल मागत असतो. असें मागण्यांत तरी त्या सावकाराचा असा विश्वास असतो कीं, कर्ज घेणाऱ्या माणसानें जरी दगा दिला तरी त्या तारणाच्या आधारावर आपणांस आपले पैसे वसूल करतां येतील. विशेषत: पेढी जेव्हां एखाद्या माणसास कर्ज देते तेव्हां सरकारी रोखे, कंपन्यांचे शेअर, घरदार अशा प्रकारच्या तारणावरच ती व्यवहार करीत असते. असो; तर पत म्हणजे लोकांवरील विश्वास होय. जोंपर्यंत आपला विश्वास एखाद्या माणसावर चांगला असतो तोंपर्यंत त्याची पत आपणाजवळ पुष्कळ असते. पण तो विश्वास एकदां उडत चालला म्हणजे त्याची पतही नाहींशी होते.

पतीचे प्रकार:—पत मुख्यत्वेंकरून दोन प्रकारची असूं शकते; वैयक्तिक पत व व्यापारी पत, असे तिचे दोन प्रकार आहेत. एखाद्या माणसावर विश्वास ठेऊन जेव्हां आपण त्याला कर्ज देतों तेव्हां ती वैयक्तिक पत होते; अशा वेळीं त्याची इस्टेट किती आहे वगैरे गोष्टींची आपण चवकशी करीत नाहीं. कधीं कधीं एखाद्या माणसाकडून कसलाही जामीन न मागतां आपण त्याला कर्ज देत असतों. ह्यावेळीं त्याचें मासिक किंवा वार्षिक उत्पन्न किती आहे ह्याचाच आपण विचार करतों.

पतीचा दुसरा प्रकार म्हणजे व्यापारी पत हा होय. ह्या प्रकारांत व्यक्तीच्या सांपत्तिक स्थितीचा विचार न करितां सबंध कंपनीच्या स्थितीचा विचार करूनच तिची पत ठरवावी लागते. तरीपण ही व्यापारी पत ठरवितांना वैयक्तिक पतीप्रमाणेंच प्रामाणिकपणा, व्यापारी शहाणपण व पूर्व चरित ह्या गोष्टी हिशोबांत घ्याव्या लागतातच. तेव्हां व्यापारी पतींतसुद्धां वैयक्तिक पतीचा अंतर्भाव होत असतो; व ही वैयक्तिक पत सर्व पतीच्या उलाढालींच्या मुळाशीं असते.

पेढीची पत व व्यापारी पत:—ह्या दोघांचा संबंध फार निकट आहे. वर सांगितल्याप्रमाणें पेढीचे सर्व व्यवहार तिनें लोकांत उत्पन्न केलेल्या पतीवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ, पेढीनें काढिलेल्या नोटा किंवा तिचे चेक हे तिच्या पतीवर अवलंबून असतात. त्याचप्रमाणें लोकांना कर्ज देणें वगैरेसुद्धां त्यांच्या पतीवरच अवलंबून राहील. पण पेढीचे हे सर्व व्यवहार जगांत व्यापार व

उद्योगधंदा चालतो व पतीची जरूर असते म्हणूनच चालत असतात. उदाहरणार्थ, पेढी नोटा काढते किंवा ठेवी स्वीकारते, त्या व्यापारधंद्यांत जे व्यवहार घडतात त्यांच्यामुळेंच असतात. जगांत जर व्यापार नसता व व्यापाऱ्यांनीं एकमेकांवर जर हुंडया काढल्या नसत्या तर पेढ्यांना त्या मनोतीनें पैसे कापून वटविण्याची जरूरच पडली नसती. व्यापारांत जीं देणींघेणीं उत्पन्न होत असतात त्यांचीच विल्हेवाट लावणें पेढ्यांचें काम असतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पेढीचे सर्व व्यवहार व्यापारामुळेंच उत्पन्न होतात व जोंपर्यंत व्यापारी लोकांचे व्यवहार सचोटीचे असतात तोंपर्यंत पेढीला फारसें भय नसतें.

प्रत्येक व्यापाऱ्याची एखाद्या पेढीजवळ आपली पत वाढविण्याची खटपट चालू असते. जेव्हां तो व्यापारी आपली नोट घेऊन त्या पेढीकडे जातो त्यावेळीं ती वटविल्यावर तो त्या पेढीकडे नाणें मागत नाहीं; तर आपली जमेकडील बाजू जास्त दिसावी व आपली पत जास्त वाढावी अशी त्याची इच्छा असते व पेढीही ह्या नोटीच्या आधारावर त्याला आपल्यावर चेक पाठविण्यास परवानगी देते. जोंपर्यंत व्यापाऱ्यानें आणलेली नोट विश्वसनीय आहे तोंपर्यंत पेढीनें व्यापाऱ्यांस चेक स्वीकारून दिलेले पैसे सुरक्षित आहेत असें मानण्यास बिलकूल हरकत नाहीं. अशा तऱ्हेनें व्यापारी पत व पेढीची पत ह्यांचा अन्योन्यसंबंध आहे.

तात्विकदृष्ट्या विचार केला तर ज्या जिनसांच्या पैदासीमुळें समाजामध्यें नवीन पैसा उत्पन्न होत असतो, अशा जिनसांची खरेदीविक्री पेढीनें सुलभ करण्याकरितांच व्यापाऱ्यांस पतीवर कर्ज द्यावें. पेढी जेव्हां कर्ज देते तेव्हां तिची अशी अपेक्षा असते कीं, आपला पैसा आपण मागूं तेव्हां परत मिळाला पाहिजे. पेढीची ही अपेक्षा तिनें आपले पैसे उत्पादक धंद्यांत पडलेल्या व्यापाऱ्यांस दिले असले तरच सफल होणार. व्यापारी पेढ्यांचा जन्म धंदेवाल्या लोकांची तात्पुरती गरज भागवून त्यांच्याकडून आपण दिलेले पैसे थोड्याच दिवसांनीं परत घेऊन पुनः दुसऱ्या व्यापाऱ्यांना त्यांच्या सोयीकरितां देणें ह्याकरितांच असतो. कधीं कधीं व्यापारी लोक माल विकत घेतात व तो तसाच जवळ ठेवून देतात. हेतु हा कीं, मालाची किंमत वाढली कीं, मग हा माल विकावयास काढावा. अशा व्यापाऱ्यांस पेढीनें सहसा कर्ज देऊं नये. कारण अशा व्यापारांत बरीच सट्टेबाजी असते.

पत व भांडवलः—आपण आपल्या पतीवर पेढ्यांकडून किंवा लोकांकडून पैसे उसनवार घेऊं शकतों व हल्लीं मोठमोठे उद्योगधंदे पतीवरच चालले आहेत. ह्यावरून कांहीं लोकांस असें वाटतें कीं, पत ही एक प्रकारचें भांडवलच आहे व त्या पतीवर पुष्कळ माल उत्पन्न करितां येईल; पण ही विचारसरणी बरोबर नाहीं. अर्थशास्त्रज्ञांनीं जिन्नस उत्पन्न करण्याचीं तीन साधनें निश्चित केलीं आहेत. तीं साधनें म्हणजे जमीन, मजूर व भांडवल हीं होत. कांहींच्या मतानें जमिनीचा अंतर्भाव भांडवलांतच करावा; पण ह्या वादांत शिरण्याचें आपणांस कारण नाहीं. जिन्नस उत्पन्न करण्याच्या कामीं ह्या तीन साधनांखेरीज आणखी एक साधन म्हणून पतीचा अंतर्भाव करावा किंवा काय हा प्रश्न आहे. आमच्यामतें पतीला जिन्नस निर्माण करण्याचें साधन म्हणून निराळें महत्व देण्याचें कारण नाहीं. कारण पतीमुळें एका माणसाजवळचा पैसा दुसऱ्या माणसाकडे जातो. पण ह्यामुळें देशांत नवीन पैसा किंवा भांडवल कांहीं निर्माण होत नाहीं. एकाद्या माणसाचें प्रतिबिंब आरशांत पडलें म्हणजे ज्याप्रमाणें दोन माणसें आहेत असें कोणी मानीत नाहीं, त्याचप्रमाणें एका माणसाकडून दुसऱ्या माणसाकडे पैसा गेला म्हणजे नवीन पैसा निर्माण होतो असें म्हणतां येत नाहीं. फार तर इतकेंच म्हणतां येईल कीं, ज्या माणसाकडे तो पैसा गेला असेल त्याला तो भांडवलाप्रमाणें उपयोगी पडतो; पण सबंध राष्ट्राच्या दृष्टीनें विचार केला तर अशा पैशाला नवीन उत्पन्न झालेलें भांडवल असें म्हणतां येत नाहीं.

पतीवर चालणारे दस्तऐवजः—आतांपर्यंत पतीचा व्यापाराचे कामीं कसा उपयोग होतो, पत ही चीज काय आहे वगैरे मुद्यांचा तात्विकदृष्ट्या आपण विचार केला. आतां पेढ्या किंवा इतर लोक ज्या निरनिराळ्या प्रकारांनीं आपली पत व्यक्त करीत असतात त्या प्रकारांचा विचार करावयाचा. सर्वांत पहिला प्रकार म्हटला म्हणजे चालू खातें हा होय. प्रत्येक पेढी आपल्या गिऱ्हाइकाच्या नांवावर खातें सुरु करून तो जेवढे पैसे आणून देईल व घेऊन जाईल तेवढ्या पैशाची नोंद त्याच्या जमा किंवा नांवें मांडीत असते.

ह्यानंतरचा दुसरा प्रकार म्हणजे '**परमेश्वरी** नोट' होय. प्रॉमिसरी नोटीची व्याख्या 'बेचनीय दस्तऐवजांच्या' कायद्यांत (Negotiable Instruments Act) अशी केली आहे. प्रॉमिसरी नोट हा एक लेखी वेचनीय दस्तऐवज आहे.

(पण तो बँक नोट किंवा चलनी नोट नव्हे) व त्यामध्यें तो दस्तऐवज लिहून देणारा इसम त्यामध्यें नांव लिहिलेल्या माणसाला किंवा तो सांगेल त्या माणसाला किंवा तो दस्तऐवज घेऊन येणाऱ्या माणसाला कांहीं ठराविक रकम बिनशर्त देण्याचें कबूल करीत असतो. प्रॉमिसरी नोट ही बेचनीय दस्तऐवजाचे जे अनेक प्रकार आहेत, त्यांपैकीं अगदीं साधा प्रकार आहे. ज्या वेळीं एखादा मनुष्य दुसऱ्या माणसाकडून कांहीं रकम कर्जानें घेत असतो, तेव्हां तो अशा प्रकारचा दस्तऐवज लिहून देत असतो. हा दस्तऐवज ज्या स्वरूपांत लिहिला जातो तें स्वरूप खालीं लिहिल्याप्रमाणें असतें:—

Wardha, 13th August 1921.

STAMP.

On demand (or at three months after date) I promise to pay Mr. A. the sum of Rupees One Hundred only. Value received.

Rs. 100-0-0 (Sd.) B.

ह्यां प्रॉमिसरी नोटीचा असा फायदा असतो कीं, जो कर्ज देतो त्याजजवळ ही नोट म्हणजे एक प्रकारचा दस्तऐवजच राहतो व त्याला जर पैशाची गरज लागली तर हा दस्तऐवज एखाद्या पेढीकडे घेऊन मनोतीनें पैसे कापून देऊन त्यापासून त्याला सहज पैसे मिळतात; कारण त्या पेढीला मुदत भरल्यावर सहजच त्या दस्तऐवजाचे पैसे मिळतात.

एखाद्या माणसानें कर्ज काढतांना आपल्या धनकोस प्रॉमिसरी नोट लिहून दिली व तिजमध्यें अमुक वेळीं मी तुमचे पैसे परत करीन असें लिहून दिलें, तर त्याच वेळीं धनकोनें तो जेथें आपलें कामकाज करीत असेल तेथें त्याच्या कामाच्या वेळीं ती नोट त्याला नेऊन दिली पाहिजे. तसें जर तो धनको न करील तर त्याचे पैसे बुडाल्यास कोणीही जबाबदार नाहीं.

एखादे वेळीं प्रॉमिसरी नोटींत आपण पैसे ठराविक मुदतींत हप्त्याहप्त्यांनीं देऊं अशी अट ऋणको लिहीत असतो. अशा वेळीं धनकोनें ही नोट हप्ते भरावयाच्या दिवसापासून तिसऱ्या दिवशीं ऋणकोकडे नेलीच पाहिजे. नाहींतर त्याला पैसे मागण्याचा अधिकार रहात नाहीं. कधीं कधीं मी तुमचे पैसे अमुक स्थळीं

देईन असें ऋणको जेव्हां धनकोस लिहून देतो त्या वेळीं धनकोनें त्याची गांठ त्याच ठिकाणीं घेतली पाहिजे. जेव्हां स्थलाचा नामनिर्देश केलेला नसतो तेव्हां तो ज्या ठिकाणीं उद्योगधंदा करीत असेल त्या ठिकाणीं किंवा त्याच्या रहात्या घरीं किंवा हीं दोन्ही ठाऊक नसतील तर तो जेथें भेटेल तेथें त्याजकडून पैसे वसूल करण्यास त्यास हरकत नाहीं.

व्यापारी हुंडी:—पतीचा तिसरा प्रकार म्हणजे व्यापारी हुंडी होय. व्यापारी हुंडीची व्याख्या 'वेचनीय दस्तऐवजांच्या' कायद्यांत अशी केली आहे:— " व्यापारी हुंडी ही **लेखी** दस्तऐवज असून त्यामध्यें ती हुंडी काढणारा मनुष्य एकाद्या माणसाला किंवा तो सांगेल त्या माणसाला किंवा ती हुंडी घेऊन येणाऱ्या माणसाला कांहीं **ठराविक रक्कमच** देण्याचा **बिनशर्त** हुकूम देत असतो.

ह्या व्याख्येमध्यें कांहीं महत्वाचे मुद्दे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. पहिला मुद्दा असा कीं, व्यापारी हुंडी लेखी असली पाहिजे; नुसती तोंडी असून भागत नाहीं. त्याचप्रमाणें त्या हुंडींत दिलेला हुकूम बिनशर्त पाहिजे. 'बिनशर्त' हा शब्द जरा संदिग्ध असल्यामुळें तो स्पष्ट केला पाहिजे. एखाद्या हुंडीमध्यें जर असें विधान केलें कीं, ह्या हुंडीचे पैसे **क्ष**ला मुलगा झाल्यावर मिळतील, तर हें विधान शर्तीवर केलें आहे असें मानण्यास हरकत नाहीं. कारण **क्ष** लग्न करून त्याला मुलगाच होईल ह्या गोष्टी तितक्या खात्रीच्या नाहींत; पण **क्ष** मेल्यावर ह्या हुंडीचे पैसे मिळतील असें विधान जर त्या हुंडींत असलें तर तें बिनशर्त मानतां येईल. कारण मरणें ही गोष्ट निश्चित असल्यामुळें ही अट जरी अनिश्चित असली तरी ती ह्या हुंडीला बाधक होऊं शकत नाहीं.

वर दोन सांगितलेल्या मुद्यांशिवाय इतरही मुद्दे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. प्रत्येक हुंडी दर्शनी किंवा ठराविक मुदतीची असली पाहिजे, म्हणजे तिचे पैसे हुंडी पाहतांच किंवा कांहीं ठराविक मुदतीनें मिळण्यासारखे पाहिजेत. त्याचप्रमाणें त्या हुंडीबद्दल किती रक्कम द्यावयाची ह्याचा स्पष्ट उल्लेख पाहिजे. मग ह्या रकमेंत जरी पुढचें व्याज आकारलें किंवा ठराविक हुंडणावळीच्या दरानें किंवा परदेशी हुंडणावळीच्या दरानें (Course of Exchange) पैसे लावले असले तरी ती रक्कम अनिश्चित मानली जात नाहीं. शेवटला मुद्दा म्हणजे ह्या व्यापारी हुंडींत ज्या माणसाला पैसे मिळावयाचे त्याचें नांव लिहिलेलें पाहिजे. जरी एखादे वेळीं

त्याच्या नांवाच्याऐवजीं दुसरें चुकून नांव आलें किंवा त्या माणसाचें वर्णन आलें तरी हरकत नाहीं, अशीही कायद्यानें सवलत दिलेली आहे. त्याचप्रमाणें व्यापारी हुंडी घेऊन येणाऱ्या (Bearer) माणसालासुद्धां तिचे पैसे मिळूं शकतात, अशीही सवलत कायद्यानें मिळाली आहे.

हुंड्यांचा पूर्वेतिहासः—व्यापारी हुंड्यांचा जन्म अलीकडलाच म्हणजे सुमारें तेराव्या शतकांतला आहे. फ्लारेन्स व व्हेनिस ह्या शहरांतील व्यापारी प्रथम ह्या हुंड्या काढूं लागले. प्रथम प्रथम ह्या हुंड्यांना संपत्तीचें साधन म्हणून फारसें महत्त्व नव्हतें. कारण त्यांना कागदाच्या चिटोऱ्यापलीकडे फारसें महत्त्व नव्हतें. ह्या हुंड्या—मग त्या प्रॉमिसरी नोटा असोत किंवा व्यापारी हुंड्या असोत--म्हणजे धनको व ऋणको ह्यांमधील एक प्रकारचा वैयक्तिक करारनामा अशी लोकांची ठाम समजूत असे. एखादे वेळीं हा करारनामा ऋणकोनें मोडला तर धनकोला त्या माणसाच्या सामानाला हात लावतां येत नसे. फार तर तो त्या माणसाच्या शरीराचा कबजा घेईल; त्याचे तुकडे तुकडे करील; पण त्याला आपले पैसे अन्य मार्गांनीं वसूल करणें शक्य नसे. अशा परिस्थितींत ह्या हुंड्या किंवा नोटा वेचनीय होणें शक्यच नव्हतें.

पण लवकरच रोमन कायदे पंडितांच्या चातुर्यानें ह्या दस्तऐवजांना पैशाचें स्वरूप येऊन ते वेचनीय होऊं लागले. अर्थात् इतर मालाची अदलाबदल आपण जशी सहज करतों, त्याप्रमाणें ह्या कागदी पैशाची होणें कठिण होतें व हल्लींही फ्रान्समध्यें ह्या दस्तऐवज बेचन करणें कायद्याच्या दृष्टीनें भानगडीचें आहे. तथापि हुंड्या काढणें व त्यांचा प्रसार होणें व्यापाराच्या वाढीस इतकें आवश्यक होतें कीं, ह्या कायद्याच्या भानगडीची पर्वा न करतां हे दस्तऐवज नुसती पाठीमागें सही करून व्यापारी लोकांनीं प्रचारांत आणले आहेत व हल्लीं तर ह्या हुंड्या म्हणजे व्यापाराचा नुसता प्राण आहे; पण कायदेशीर रीत्या हुंड्यांच्यामागें सह्या करणें जरी इष्ट असलें—कारण त्यामुळें त्या हुंड्यांवर सही करणाऱ्या माणसावर त्यांत निर्दिष्ट केलेली रक्कम देण्याची कायदेशीर जबाबदारी येऊन पडते--तरी अशी अट घातल्यानें हुंड्यांचा प्रचार होण्यास प्रतिबंध होत असतो. हल्लीं राष्ट्रांमध्यें व्यापाराची वाढ भयंकर झाल्यामुळें व पतही वाढली असल्यामुळें ही सही करण्याची चाल कमी होत चालली आहे व ह्या हुंड्या धातूच्या नाण्याप्रमाणें व्यापारी लोकांत खेळूं लागल्या

आहेत व देशामध्यें अतिशय मोठ्या प्रमाणांत, काल्पनिक नव्हे, तर भावी संपत्तीची भर हल्लीं प्रचारांत असलेल्या संपत्तींत वारंवार पडत आहे.

ह्या हुंड्या प्रचारांत आल्यानें व्यापाऱ्यांस अनेक तऱ्हांनीं फायदा होत असतो. पूर्वी सांगितल्याप्रमाणें ह्या हुंड्यांमुळें आपला माल विकणाऱ्या माणसाला विकलेल्या मालावर हुंडी काढून ती एखाद्या पेढीकडे नेऊन रोख पैसे ताबडतोब घेतां येतात व ज्यानें तो माल विकत घेतला असेल त्यालाही ह्या हुंड्या सामान्यपणें कांहीं मुदतीच्या काढल्या गेल्या कारणानें तो माल विकल्यावर त्याचे पैसे देण्यास सांपडतात. बरें, ज्या पेढीनें ही मुदतीची हुंडी स्वीकारली असेल त्या पेढीला कालांतरानें मिळणारे पैसे ताबडतोब हवे असतील तर तिलाही ही हुंडी दुसऱ्या माणसाकडे पाठवून पैसे घेतां येतात. ह्या हुंडीपासून दुसरेही अनेक फायदे आहेत. ह्या हुंड्यांचा उपयोग आंतरराष्ट्रीय व्यापारांत फार होत असल्यामुळें राष्ट्राराष्ट्रांत प्रेम, एकोपा व शांतता वृद्धिंगत करण्याचे कामीं फार होत असतो. युद्ध व व्यापार ह्यांचें उपजत वैर असल्यामुळें जगांत कोठेंही युद्ध नसावें असें प्रत्येक व्यापारी राष्ट्रास वाटत असतें. कारण युद्ध सुरू झाल्यामुळें युद्धमान् राष्ट्रांत ह्या हुंड्या जर नाकारल्या गेल्या तर व्यापाऱ्यांचें अतोनात नुकसान होण्याचा संभव असतो. ह्या हुंड्यांमुळें एका राष्ट्रांतील व्यापाऱ्यांना दुसऱ्या राष्ट्रांतील व्यापाऱ्यांस फारच थोड्या खर्चांत व थोड्या वेळांत मोठमोठ्या रकमा सहज पाठवितां येतात; पण ह्याहूनही मोठा फायदा म्हणजे व्यापारी पेढ्यांना आपल्याजवळची रक्कम ह्या हुंड्या खरेदी करून सुरक्षितपणें गुंतवितां येऊन व्याज मिळवितां येतें व जरूर लागेल त्या वेळीं त्या विकून पुनः आपली रक्कम तयार करतां येते.

वर सांगितलेंच आहे कीं, हुंड्यांचा प्रारंभ फ्लारेन्स व व्हेनिस शहरीं सुमारें १३ व्या शतकांत झाला. तेथें त्या बऱ्याच प्रचलित झाल्यावर नंतर फ्रान्समध्यें त्यांचा प्रवेश झाला व नंतर हळू हळू इंग्लंडमध्यें त्यांचा प्रसार झाला. इंग्लंडचा व्यापार दांडगा असल्यामुळें ह्या हुंड्या बऱ्याच मोठ्या प्रमाणांत लवकरच प्रचारांत आल्या असल्या पाहिजेत; तरीपण ह्या देशांत पहिल्या जेम्सच्या कारकीर्दींतच हुंडीच्या मागें आपली सही करून ती वेचनीय करतां येते ह्याचें लोकांना ज्ञान होऊं लागलें. प्रथम प्रथम ह्या व्यापारी हुंड्या इंग्लंडमध्यें असलेले व्यापारी व परदेशीय व्यापारी ह्यांच्यामध्यें असत; पण पुढें पुढें देशांतल्या देशांतच एका ठिकाणचे व्यापारी दुसऱ्या शहरच्या व्यापाऱ्यांवर त्या हुंड्या काढूं लागले.

अशा तऱ्हेनें हुंड्यांचे एक देशी (Domestic) हुंड्या व दुसऱ्या परदेशी (Foreign) हुंड्या असे दोन भाग करतां येतील.

देशी हुंडीचा नमुना.

Calcutta 15-8-21

STAMP.

One month after date pay to me or my order the sum of Rupees one thousand and Seven Hundred only for value received.

Rs. 1700-0-0 (Sd.) Gopal

To

Mr. Keshav

ह्या हुंडीचा जेव्हां **केशव** हा गृहस्थ स्वीकार करील तेव्हां स्वीकारली असे शब्द लिहून तो आपली खालीं सही करील व नांवाखालीं तारीख लिहील.

ही हुंडी एखाद्या पेढीकडे आल्यावर ती सप्टेंबर १८ तारखेपर्यंत वाट पाहील. कारण व्यापारी लोकांचा असा प्रघात आहे कीं, हुंडीची मुदत भरल्यावर तिची फेड करण्याकरितां तीन दिवसांची सवलत द्यावयाची. त्या तारखेला तिला **केशव** ह्या गृहस्थाकडून पैसे मिळालेच पाहिजेत. मध्यंतरीं तिला पैशाची जर विशेष गरज लागली तर त्या हुंडीच्या मागें ती पेढी सही करून दुसऱ्या एखाद्या पेढीकडून ती हुंडी विकूं शकते व अशा रीतीनें ती हुंडी वेचनीय बनते.

परदेशी हुंडीचा नमुना.

Paris 23-8-21

Sixty days after sight of this First of Exchange (second and third of the same tenor and date unpaid) pay to the order of Messrs. King, King & Co., Calcutta, the sum of Rupees Eight Hundred only. Value received.

(Sd.) King, King & Co.

To

Messrs. Peer Mahmud & Co., Calcutta.

ह्या परदेशी हुंड्यांचा विशेष असा आहे कीं, त्या तिहेरी (Triplicate) मिळून पाठविल्या जातात; हेतु हा कीं, एक हुंडी हरवली तर दुसरी किंवा निदान तिसरी तरी सुरक्षितपणें हुंडी स्वीकारणाऱ्या माणसास मिळावी. अर्थात एका हुंडीचे पैसे मिळाले म्हणजे बाकीच्या दोन रद्द समजल्या जातात. परदेशी हुंड्या ज्या ठिकाणीं काढल्या जातात, त्या ठिकाणच्या कायद्याप्रमाणें, त्यांच्याबद्दलची जबाबदारी त्या काढणाऱ्यावर असते; पण त्या स्वीकारल्यावर किंवा त्यांच्या पाठीमागें सही झाल्यावर, त्याबद्दलची जबाबदारी जेथें त्या स्वीकारल्या जातील तेथल्या कायद्याप्रमाणेंच, स्वीकार किंवा सही करणाऱ्या माणसावर येऊन पडते. ही हुंडी जर एखाद्या माणसानें नाकारली तर, ज्याला पैसे वास्तविक मिळावयास हवेत, त्याला, जेथें ती नाकारली जाईल तेथील कायद्यानुसार त्या हुंडी नाकारणाऱ्या माणसावर फिर्याद करितां येते.

बेचनीय दस्तऐवज–मग ती हुंडी असो किंवा प्रामिसरी नोट असो–कांहीं तरी किमतीच्या मोबदला (Consideration) म्हणूनच करावा लागतो. 'बेचनीय दस्तऐवजांच्या कायद्याच्या' ४३ व्या कलमाप्रमाणें एखाद्या दस्तऐवजाच्या मुळाशीं जर हा किमतीचा मोबदला नसेल तर ज्यांच्यामध्यें हा दस्तऐवज होत असतो ते पैसे देण्याघेण्यास बिलकूल जबाबदार रहात नाहींत. उदाहरणार्थ, **अ**नें एक हुंडी काढली व ती **ब**नें किमतीच्या मोबदल्याशिवाय स्वीकारली, म्हणजे **अ**नें कोठलाही माल **ब**ला न पुरवितांच हुंडी काढली व **ब**नें ती स्वीकारली तर **अ**ला पैसे मागतां येत नाहींत व **ब**ला ते देण्याची जरूर नाहीं. पण आतां अशी कल्पना करा कीं, **अ**नें **ब**वर काढलेली हुंडी कांहीं माल देऊन **क**कडे पाठविली व **क** **ब**कडे ती हुंडी घेऊन गेला व **ब**नें तिचा स्वीकार केला; तर **क**ला **ब**कडून पैसे घेण्याचा अधिकार पोंचतो. मग **अ** व **ब** ह्यांच्यामध्यें किंमतीचा मोबदला नसला तरी चालेल. हा सांगितलेला मोबदला कायदेशीर रीतीनें मालाची खरेदीविक्री होऊनच व्हावयास पाहिजे. तसा तो नसेल तर हुंडीबद्दल ती काढणारास पैसे मिळावयाचे नाहींत.

हुंडी सचकारणें:—**अ**नें **ब**वर कांहीं माल देऊन हुंडी काढली व **ब**नें तिच्यावर सही करून ती स्वीकारली म्हणजे ती सचकारली गेली असें व्यापारी भाषेंत लोक म्हणतात. हें सचकारणें दोन प्रकारचें असतें. पहिला प्रकार

बिनशर्त सचकारण्याचा असतो व दुसरा प्रकार म्हणजे कांहीं शर्तींवर हुंड्या सच-कारण्याचा असतो. ज्या वेळीं एखादा व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्यावर हुंडी काढतो व तो व्यापारी ' सचकारली ' असे शब्द लिहून किंवा ते न लिहितांही त्या हुंडीवर आपली सही करतो त्या वेळीं ती हुंडी बिनशर्त स्वीकारली गेली असें मानण्यांत येतें. कधीं कधीं हुंडीच्या मागच्या बाजूला सुद्धां सही करून हुंडी बिनशर्त स्वीकारतां येते.

हुंडी स्वीकारतांना एखादा व्यापारी अटी घालूं लागला म्हणजे हुंडी काढ-णाऱ्या माणसाला त्या अटी नाकबूल असल्या तर तो त्या व्यापाऱ्याला तसें कळ-वून त्यावर कायदेशीर इलाज करूं शकतो. ह्या अटी अनेक प्रकारच्या असूं शक-तात. उदाहरणार्थ, हुंडी स्वीकारतांना एखादा व्यापारी ' मी ह्या हुंडीचे पैसे अमुक महिन्यांनीं देईन किंवा अमुक स्थळीं देईन किंवा हप्त्याहप्त्यांनीं देईन ' अशा अटी त्या हुंडीवर लिहूं शकतो.

एका व्यापाऱ्यानें दुसऱ्या व्यापाऱ्यावर हुंडी काढली असतां त्या व्यापा-ऱ्यानेंच—कधीं कधीं हुंडी अनेक व्यापाऱ्यांवर मिळून काढिलेली असते अशा वेळीं त्या व्यापाऱ्यांनीं किंवा त्यांच्यापैकीं कांहींनींच—सचकारली पाहिजे असा सामान्य नियम आहे; पण एखादे वेळीं हुंडीची मुदत भरण्यापूर्वीं ज्याच्यावर हुंडी काढिलेली असते तो ती हुंडी स्वीकारीत नाहीं किंवा त्याचें दिवाळें निघा-ल्यामुळें ज्याच्या हातांत ती हुंडी असते (holder of the Bill) तो त्या हुंडीवर ' ही हुंडी सचकारली गेली नाहीं ' असा तिच्यावर शेरा मारतो व ती ' नोटरी पब्लिक ' ह्या अधिकाऱ्याकडे नेऊन त्याच्याकडून दाखला घेतो. अशा प्रसंगीं दुसरा मनुष्य पुढें होतो व प्रथम हुंडी काढणाऱ्या माणसाची अब्रू संभाळण्याकरितां आपण ती हुंडी स्वीकारतो, मात्र ही हुंडी स्वीकारणारा मनुष्य ज्याच्या हातांत ती हुंडी अगोदरपासूनच असते त्याला कबूल असला पाहिजे व त्याला त्या हुंडीबद्दल पैसे कोठल्याही प्रकारानें देणें नसलें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तो तटस्थ असून सचोटीचा मनुष्य असला पाहिजे. एकदां ह्या गृहस्थानें ती हुंडी स्वीकारली व तिचे पैसे दिले म्हणजे तो त्या हुंडीचा पूर्ण मालक बनतो; व त्याला त्या हुंडीबद्दल ज्याच्यावर ती काढली असेल त्याच्या-कडून पैसे न मिळाल्यास प्रथम ज्यानें ती हुंडी काढली असेल किंवा अन्य तऱ्हेनें

जे कोणी इतर लोक तिच्या पैशाबद्दल जबाबदार असतील त्या माणसांवर तो गृहस्थ कायदेशीर इलाज करूं शकतो. मात्र त्या हुंडीचे पैसे न मिळण्यापूर्वी जे कायदेशीर संस्कार करावे लागतात ते त्यानें केलेच पाहिजेत.

मूळ हुंडी करणाऱ्याची अब्रू संभाळण्याकरितां एखाद्या गृहस्थानें एकदां ती हुंडी स्वीकाल्यावर ती बरोबर रीतीनें काढलेली नव्हती वगैरे सबबी पैसे द्यावयाचे वेळीं त्याला सांगतां येत नाहींत. तरीपण ही हुंडी स्वीकारणारा मनुष्य जर नादार झाला तर त्याच्या अब्रूकरितां तिसऱ्या माणसाला ती स्वीकारतां येते.

परदेशी हुंड्यांवर ' Case in need ' असे शब्द लिहिलेले असतात. त्या शब्दांचा असा अर्थ होतो कीं, परदेशांत एखाद्या व्यापाऱ्यावर जर हुंडी काढली गेली व ती जर त्यानें नाकारली तर ज्यानें ती तात्पुरती स्वीकारली असेल त्याची फसगत होऊं नये म्हणून हुंडी काढणाऱ्या व्यापाऱ्याचा मुनीम त्या देशांत ती स्वीकारतो. ह्या मुनीमाला Case in need असें नांव आहे. मुनीमानें ती हुंडी स्वीकारल्यावर ज्याच्या हातांत ती हुंडी यथाक्रम आली असेल तो तिची मुदत भरण्याची वाट पहातो व ती मुदत भरल्यावर ज्याच्यावर ती काढलेली असेल त्याजकडे ती हुंडी घेऊन जातो. पुनः त्यानें जर पैसे द्यावयाचे नाकारले तर त्या मुनीमाला पैसे द्यावे लागतात. तथापि त्या मुनीमाला कायदेशीर इलाज करुन हुंडी काढिलेल्या माणसाकडून पैसे चोपून घेतां येतात.

अशा रीतीनें नाकारलेल्या हुंड्या मुनीमाकडून स्वीकारण्याची पद्धत असल्यानें हुंडी काढणाऱ्या व्यापाऱ्याचा बराच खर्च किंवा त्रास चुकतो. कारण अशी जर व्यवस्था नसती तर हुंडी नाकारली गेल्यावर तात्पुरता सचकार करणाऱ्या माणसानें किंवा बँकेनें हुंडी काढणाऱ्या माणसाकडे परत पाठविली असती व त्यामुळें त्या माणसाला बँकेस किंवा त्या माणसास व्याज भरावें लागलें असतें; कदाचित् हुंडणावळीचा भाव बदलल्यानें त्याचें नुकसान झालें असतें व माल अडकवून राहिल्यानें नुकसान फार होऊन त्याचा वेळही खर्च झाला असता. ह्या सर्व आपत्ति आपल्या मुनीमाकडून आपल्या हुंड्या सचकारल्यानें व्यापाऱ्यास टाळतां येतात.

हुंडीच्या पाठीमागें शेरा वगैरे मारणें:—एखादी प्रॉमिसरी नोट किंवा व्यापारी हुंडी एखाद्या व्यापाऱ्यानें लिहून दिली व ज्याच्या नांवावर ती

दिलेली असेल त्यानें तिच्या पाठीवर किंवा तिच्यावर ती वेचतां यावी म्हणून आपली सही केली म्हणजे ती बाजारांत चालू शकते. हुंडीच्या पाठीमागें अनेक तऱ्हेनीं शेरा मारतां येतो. उदाहरणार्थ, हुंडीवर नुसती सही असणें हा एक प्रकार आहे. अशा वेळीं ज्याच्या हातांत ती हुंडी असेल त्यालाच तिचे पैसे मिळावयाचे असतात; पण प्रथम जरी हुंडीवर नुसती सही असली तरी ज्याच्या हातांत ती असेल (holder) त्याला तिच्या पाठीवर पूर्ण शेरा मारतां येतो व असा शेरा मारल्यावर ज्याच्या हातांत ती जाईल त्यालाच किंवा त्याच्यामुळें ज्याला पैसे मागयाचा अधिकार पोंचतो त्यालाच फक्त पूर्ण शेरा मारणाऱ्या माणसाकडून पैसे मागण्याचा हक्क प्राप्त होतो. शेरा मारण्याचा दुसरा प्रकार म्हणजे पूर्ण किंवा विशिष्ट शेरा मारणें. उदाहरणार्थ, '**लल्लुभाई दीपचंद**' ह्यांस किंवा ते सांगतील त्या माणसास पैसे देणें. सही '**लालचंद' वा**लचंद असा शेरा पूर्ण शेरा समजला जातो. तिसरा प्रकार म्हणजे अर्धवट शेऱ्याचा होय. ज्या वेळीं शेरा मारणारा गृहस्थ हुंडींत दिलेल्या रकमेच्या कांहीं भागांबद्दल जबाबदार रहातो त्या वेळीं हा तिसरा प्रकार दिसून येतो. वास्तविक कायद्याच्या दृष्टीनें अर्धवट रकमेबद्दल एखाद्या माणसानें हुंडीच्या पाठीमागें शेरा मारला तर ती हुंडी वेचनीय होतच नाहीं; तथापि हुंडींत दिलेल्या रकमेच्या कांहीं भागांची जर अगोदर फेड झाली असेल व तशा अर्थाचा शेरा जर त्या हुंडीवर मारला असेल तर बाकी राहिलेल्या भागांबद्दल ती हुंडी वेचनीय होऊं शकते.

चवथा प्रकार म्हणजे हुंडीवर अमक्यालाच पैसे द्यावे असा शेरा मारणें. ह्या शेऱ्याचा असा अर्थ होतो कीं, त्या माणसाव्यतिरिक्त इतर माणसांकडे ती हुंडी वेचनीय होऊं नये.

पांचवा प्रकार म्हणजे शेरा मारणारा गृहस्थ ती हुंडी घेणाऱ्या माणसाला स्पष्टपणें सांगतो कीं, ही हुंडी जर नाकारली गेली तर त्याबद्दल आपण जबाबदार नाहीं व असें म्हणून तो गृहस्थ त्या हुंडीवर शेरा मारतो.

सहावा प्रकार म्हणजे कांहीं अटींवर हुंडीवर शेरा मारणें हा होय.

प्रत्येक हुंडी जेव्हां एखादा गृहस्थ काढतो किंवा स्वीकारतो किंवा तिच्यावर शेरा मारतो तेव्हां तिच्यावर त्या माणसाची सही किंवा नेहमींची निशाणी असलीच पाहिजे. हुंडी ज्या वेळीं एखाद्या पेढीकडून (Partnership) काढ-

ण्यांत येते किंवा स्वीकारण्यांत येते किंवा तिच्यावर ती शेरा मारते, त्या वेळीं पेढीच्या कोठल्याही भागीदारानें किंवा पेढीचा तसा करार झाला असल्यास एका विशिष्ट भागिदारानेंच त्या हुंडीवर सही केली पाहिजे. सामान्यपणें ज्या वेळीं नेहमींच्या व्यवहारांत हुंड्या काढण्यांत किंवा स्वीकारण्यांत येतात त्या वेळीं पेढीच्या किंवा कंपनीच्या मॅनेजरला सही करतां येते. मात्र ' पेढी किंवा कंपनीकरितां ' असे शब्द लिहून मग त्यानें सही करावी.

मागें सांगितल्याप्रमाणें ज्या ठिकाणीं किंवा ज्या वेळीं किंवा ज्या प्रकारांनीं हुंडीबद्दल पैसे मिळतील असें त्यामध्यें लिहिलेलें असतें, त्याच ठिकाणीं, त्याच वेळीं जर हुंडी हजर केली तरच पैसे मिळण्याचा संभव असतो. एखादी हुंडी स्वीकारण्याकरितां किंवा पटविण्याकरितां आली असतांना तिचा स्वीकार ज्याच्यावर ती काढिलेली असेल किंवा जो स्वीकार करणार असेल त्याचा अधिकृत माणूस करूं शकतो किंवा त्याचे पैसे पटवूं शकतो. एखादे वेळीं हुंडी काढलेला मनुष्य मृत झाला तर त्याच्या कायदेशीर वारसदाराकडे ती नेली असतांना चालते.

कधीं कधीं ज्याच्यावर हुंडी काढिलेली असते तो किंवा ती स्वीकारणारा मनुष्य जाणूनबुजून ती हुंडी पटवूं देत नाहीं किंवा आपलें दुकान ऑफिसच्या कामाच्या वेळींच बंद ठेवतो किंवा ज्या ठिकाणीं पैसे देण्याचें ठरलें असेल, त्या ठिकाणीं आपणही रहात नाहीं व आपला प्रतिनिधीही पाठवीत नाहीं व ठिकाणाचा नामनिर्देश नसेल तर योग्य चवकशी करूनही त्याचा शोध लागत नाहीं. अशा वेळीं अशा माणसाकडे हुंडी हजर करण्याची जरूरी नसते व ती हुंडी नाकारली गेली समजूनच काय करणें तें करावें.

त्याचप्रमाणें ज्या माणसाला पैसे द्यावयाचे असतात, त्या माणसानें, हुंडी हजर केली जावो अथवा न जावो, मी तुमचे हुंडीबद्दलचे पैसे देईन असें कबूल केलें असेल किंवा हुंडीची मुदत संपल्यावर ती हजर केली नाहीं हें ठाऊक असून यानें हुंडीची कांहीं रक्कम दिली असेल किंवा सर्व किंवा थोडी तरी रक्कम देईन असें कबूल केलें असेल किंवा हुंडी हजर करण्यांत चूक झाल्यामुळें त्याला रक्कम देण्याच्या नाकारण्याची संधि आली असतांना तिचा फायदा घेण्याचें त्यानें नाकारलें असेल; पण शेवटीं त्यानें हुंडींत सांगितलेली रक्कम दिली नसेल तर अशा माणसाकडे हुंडी हजर करण्याचें कारण नाहीं व त्यानें ती नाकारली असें समजूनच आपण चालावें.

हुंडीच्या पैशाची फेडः—हुंडी ज्याच्यावर काढली जाते, त्याच्याकडून तिची फेड तीन तऱ्हांनीं होते. पहिली तऱ्हा म्हणजे त्या हुंडीवर जी रकम असेल तेवढी रकम देणें;मग ती रकम जरी तिऱ्हाइतानें हुंडी काढलेल्या माणसाबद्दल दिली तरी हरकत नाहीं. हुंडीमध्यें ज्या माणसाला पैसे मिळावे असें लिहिलें असेल मग त्या हुंडींत त्याचें नांव लिहिलेलें असो किंवा तो ज्याला पैसे देण्यास सांगेल त्याचें नांव असो किंवा हुंडी घेऊन येणाऱ्या माणसाला असो—त्यालाच पैसे दिले पाहिजेत. एखादे वेळीं हुंडीच्या मजकुरांत जर बराच महत्वाचा फेरफार केला असेल किंवा त्यावरील आडवी रेघ खरवडली असेल—पण हा फेरफार किंवा हें खरवडणें फारसें स्पष्ट नसेल व त्या हुंडीचे पैसे जर इमानेंइतबारें दिले असतील–तर त्या हुंडीच्या ऋणांतून तीं स्वीकारणारा मनुष्य मुक्त होतो. एखादे वेळीं चुकीनें पैसे भलत्या माणसास दिले गेले तर त्या माणसाकडून ते पैसे परत वसूल करतां येतात. ज्याच्यावर हुंडी काढली असेल त्यानें ती नाकारली तर त्या वेळेपासून त्या हुंडीच्या मागें शेरा मारणाऱ्या माणसाला व्याज द्यावें लागतें. एकदां हुंडीचे पैसे भरल्यावर ज्याच्यावर ती हुंडी काढलेली असेल त्याला ती हुंडी परत मिळाली पाहिजे व एखादे वेळीं ती जर हरवली गेली तर त्यापासून होणारें नुकसान त्याला भरून मिळालेंच पाहिजे.

हुंडीच्या कर्जांतून मुक्त होण्याचा दुसरा मार्ग म्हणजे ज्याच्या ताब्यांत ती असेल त्यानें ती पूर्वींच स्वीकारलेल्या किंवा शेरा मारलेल्या माणसाचें नांव त्या हुंडीवरून काढून टाकणें व अशा रीतीनें त्यांना मुक्त करणें हा होय. त्याचप्रमाणें एखाद्या गृहस्थाजवळ एक हुंडी आली व त्या हुंडीवर आणखी ४ माणसांचे शेरे असले व त्या गृहस्थानें चवथ्या माणसावर त्या हुंडीबद्दल फिर्याद केली व त्या चवथ्या माणसाच्या परवानगीशिवाय पूर्वींच्या तीन माणसांचे शेरे त्यानें खोडून टाकले तर त्याला त्या चवथ्या गृहस्थाकडून कांहींएक मिळणें शक्य नाहीं व तो चवथा गृहस्थ आपोआप कर्जमुक्त होतो.

हुंडीच्या कर्जांतून ऋणमुक्त होण्याचा तिसरा मार्ग म्हणजे ज्याच्यावर हुंडी काढली गेली असेल किंवा ज्यानें तिच्या पाठीमागें शेरा मारला असेल, त्याला सोडचिठ्ठी देणें किंवा रोख रकमेच्याऐवजीं दुसरा कांहीं माल वगैरे स्वीकारणें किंवा पूर्वींच्या हुंडींत फेरफार करून नवीन हुंडी करून घेणें हा होय. हा फेरफार अर्थातच महत्त्वाचा असून तो राजीखुषीनें जाणूनबुजून झालेला पाहिजे. तो फेर-

फार जर लबाडीनें किंवा नजरचुकीनें झाला असेल तर त्यामुळें पैसे देण्याची जबाबदारी टळत नाहीं. मात्र हा फेरफार नजरचुकीनें झालेला आहे व आकस्मिक स्वरूपाचा आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी ज्याला पैसे घ्यावयाचे असतात, त्याच्यावरच येऊन पडते. त्याचप्रमाणें हा फेरफार त्या हुंडीवर स्पष्टपणें दिसत असला पाहिजे. तो जर स्पष्ट दिसत नसेल व पैसे देणाऱ्यानें हुंडींत कांहीं फेरफार झालेच नाहींत अशा समजुतीनें पैसे दिले असले तर अर्थातच तो ऋणमुक्त होतो. हुंडींत जे फेरफार व्हावयाचे ते खालील स्वरूपाचे असले पाहिजेत. त्या हुंडींत सांगितलेल्या रकमेंत बदल होणें किंवा पूर्वीचा व्याजाचा दर बदलणें किंवा नवीन दर घालणें किंवा ज्या ठिकाणीं पैसे देण्याचें ठरलें असेल तें ठिकाण बदलणें किंवा हुंडीवर मारलेली आडवी रेघ नाहींशी करणें. हे फेरफार हुंडींत झाले म्हणजे मनुष्य ऋणमुक्त होतो.

एखादी हुंडी, स्वीकारणाऱ्या माणसाचे हातून जाऊन पुनः तिची मुदत भरावयाचे वेळीं नंतर त्याचे हातांत आली म्हणजे तिचें आयुष्य संपलें व तिच्यावर कोणाचा हक्क रहात नाहीं असें मानण्यास हरकत नाहीं.

हुंडी नाकारणें:—एखादा मनुष्य त्याच्यावर काढिलेली हुंडी दोन प्रकारांनीं नाकारतो. पहिला प्रकार म्हणजे तिचा स्वीकार न करणें व दुसरा प्रकार म्हणजे ती स्वीकारून सुद्धां तिचे पैसे न देणें. अशा रीतीनें हुंडी नाकारल्यावर तिची मुदत भरण्याची वाट न पहातांच कायद्याचे विधी करून त्या माणसावर कायदेशीर इलाज केले पाहिजेत. ज्याच्यावर हुंडी काढलेली असते तो जर त्या हुंडींत झालेले करार पाळण्यास असमर्थ असेल किंवा तो कांहीं अटीवर स्वीकारण्यास तयार असेल तर ती हुंडी नाकारली गेली असें समजून त्यानें काय करणें तें करावें.

हुंडी नाकारल्याबद्दल सूचनाः—हुंडी नाकारल्यावर ज्यानें प्रथम ती काढली असेल तिच्यावर पूर्वीच ज्या माणसाचे शेरे लिहिले गेले असतील त्यांना प्रथम सूचना केली पाहिजे. ही सूचना तोंडी असली तरी हरकत नाहीं; पण सुरक्षिततेच्या दृष्टीनें ती लेखी असलेली बरी. ही नोटीस ती हुंडी नाकारल्यावर नोटीस देणारा व घेणारा हे दोघे जर एकाच शहरीं असले तर त्याच दिवशीं दिली पाहिजे व ते जर निरनिराळ्या ठिकाणीं असले तर निदान हुंडी नाकारली

गेल्यावर दुसऱ्या दिवशीं तरी ती पाठविली गेली पाहिजे. एखादे वेळीं नोटीस योग्य रीतीनें पाठवून ती जर योग्य माणसांना पोष्टांत गहाळ होऊन मिळाली नाहीं तर ती नोटीस एवढ्याच कारणाकरितां रद्द मानण्यांत येत नाहीं. मुख्य मुद्दा एवढाच आहे कीं, हुंडी ज्यानें काढली असेल किंवा ज्यांचे शेरे अगोदर ह्या हुंडीवर लिहिले गेल्यामुळें ते पैसे देण्यास जबाबदार असतील त्यांना आपली हुंडी नाकारली गेली हें तावडतोब समजलें पाहिजे; म्हणजे त्यांना ज्याच्याजवळ प्रत्यक्ष ती हुंडी असेल त्याचें नुकसान होऊं नये ह्याबद्दल कांहीं तरी तजवीज करितां यावी. ही जी नोटीस हुंडी हातांत असलेल्या माणसानें द्यावयाची, ती देण्यांत हुंडी प्रथम काढणाऱ्या माणसाकडून किंवा तिच्यावर शेरे मारणाऱ्या लोकांकडून, पैसें मागण्याकरितां म्हणून नव्हे तर, त्यांना त्यांच्या जबाबदारीची नुसती जाणीव करून देण्याकरितां म्हणून द्यावयाची असते. तसेंच ही नोटीस वर सांगितलेल्या माणसांना त्यांच्या ऑफिसांत किंवा त्यांचें ऑफीस नसलें तर त्यांचे घरीं दिली पाहिजे. एखादे वेळीं ज्याला हुंडी नाकारली गेली अशाबद्दल नोटीस द्यावयाची, तो मेला असला, पण त्याच्या मृत्यूची बातमी ती नोटीस पाठविणाऱ्या माणसाला नसली तरी ती नोटीस योग्य रीतीनें पाठविली गेली असेंच मानावें.

कधीं कधीं हुंडी नाकारली गेली असतांना त्याबदलची सूचना देण्याचें कारण नसतें. उदाहरणार्थ—

(अ) जेव्हां ज्याला सूचना मिळावयास हवी तोच गृहस्थ आपणास ती न मिळाली तरी चालेल असें म्हणतो;

(आ) प्रथम हुंडी काढणाऱ्या इसमानें पैसे देण्याचें रद्द केल्यामुळें त्याच्यावर खर्चाचा बोजा घालावयाचा असेल;

(इ) ज्याच्यावर खर्च लादला असेल त्या माणसाचें नुकसान सूचना न मिळाल्यामुळें होण्याचा संभव नसेल;

(ई) ज्याला सूचना मिळावयास हवी त्याचा शोध करूनही पत्ता लागत नसेल, किंवा ज्यानें सूचना पाठवावयाची त्याला अपरिहार्य कारणामुळें ती पाठवितां येत नसेल;

(उ) हुंडी स्वीकारणारा हाच तो हुंडी काढणारा असतांना हुंडी काढणाऱ्या माणसांवर खर्चाचा बोजा लादावयाचा असेल;

(ऊ) प्रॉमिसरी नोट जर वेचनीय नसेल;

(ऋ) ज्यांना हुंडी नाकारल्याबद्दल सूचना मिळावयास पाहिजे त्यांनीं आपण होऊनच बिनशर्त, हुंडी नाकारली गेल्याचें कळल्यामुळें, तिचे पैसे देण्याचें कबूल केलें असेल;

अशा वेळीं ही सूचना देण्याची जरूर नसते.

आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, हुंडी नाकारली असतांना ज्याच्या हातांत ती हुंडी असते त्यानें हुंडी प्रथम काढणाऱ्या माणसाकडून किंवा तिच्यावर शेरे मारणाऱ्या लोकांकडून किंवा इतर माणसांकडून नुकसान किती भरून घ्यावें ? 'वेचनीय दस्तऐवजांच्या कायद्या'न्वयें असें ठरलें आहे कीं, नुकसानीदाखलची रकम द्यावयाची तिजमध्यें त्या रकमेवरील व्याज व हुंडी नाकारली गेली म्हणून 'नोटरी पब्लिक' ह्या अधिकाऱ्याकडे जाऊन दाखला घेण्यास लागणारा खर्च व व्यापारी शिरस्त्याप्रमाणें दंडादाखल शेंकडा कांहीं व्याजसारखी रकम ह्यांचा समावेश व्हावा. त्याचप्रमाणें ज्याच्या डोक्यावर खर्च बसावयाचा तो जर परदेशांत रहात असला तर नुकसानीची रकम ठरवितांना हुंडणावळीच्या भावाचाही अंतर्भाव व्हावा. ही नुकसानीची रकम हुंडी हातांत असलेल्या माणसानें तिच्यावर शेरा मारणाऱ्या माणसांपैकीं एकाकडून जर भरून घेतली असली तर त्यालाही मूळ हुंडी काढणाऱ्या माणसाकडून आपली नुकसानाची रकम वर सांगितलेल्या पद्धतीनें व शेंकडा ६ ह्या दरानें वसूल करून घेतां येते. आपली नुकसानीची रकम प्रत्यक्ष वसूल न करतां त्या माणसाला ज्याच्याकडून नुकसान भरून घ्यावयाचें त्याच्यावर दर्शनी हुंडीही काढितां येते व ती हुंडी जर त्यानें नाकारली तर पुनः पहिल्या मार्गानें त्याला आपली रकम वसूल करतां येते.

आतांपर्यंत आपण ज्या हुंड्यांचा विचार केला त्या सामान्यपणें इंग्रजीमध्यें लिहिल्या जातात व त्यांची व्यवस्था 'वेचनीय दस्तऐवजाच्या कायद्या'न्वयें होत असते; पण देशी भाषेंत काढल्या जाणाऱ्या हुंड्यांना तसा स्पष्ट उल्लेख नसेल तर हा कायदा लागू नसतो. प्रत्येक ठिकाणीं जसा प्रघात असतो त्याप्रमाणें त्या हुंड्यांची वासलात लागते. ह्या हुंड्या दोन प्रकारच्या असतात. एक शहाजोग हुंडी व दुसरी जोखमी हुंडी असे हे दोन प्रकार होत. पहिली हुंडी एक व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्यावर काढतो व त्याला एका तिऱ्हाईत शहाजोग म्हणजे संभावीत माणसाला योग्य चवकशी केल्यावर हुंडीचे पैसे देण्यास सांगतो. अर्थात् ज्याला पैसे

मिळावयाचे तो शहाजोग आहे किंवा नाहीं हें हुंडी काढणाऱ्यानें ठरवावयाचें नसून ज्याच्यावर ती काढली जाते त्याच्यावर ती जबाबदारी येऊन पडते व त्यानें ती पार पाडली म्हणजे त्याला हुंडी काढणाऱ्या व्यापाऱ्याकडून पैसे मागण्याचा हक्क होतो. अर्थात् ही हुंडी जर भलत्या माणसाला मिळाली तर त्या व्यापाऱ्याला शेंकडा सहा टक्के व्याज देऊन नुकसान भरून द्यावें लागतें. ह्या हुंडीमध्यें ज्याच्यावर ती काढिलेली असते किंवा ज्यानें त्या काढिलेल्या हुंडीबद्दल ती काढणाऱ्या माणसाजवळ पैसे अनामत ठेवलेले असतात त्याचें नांव असतें. सामान्यपणें ह्या हुंड्या थोड्या खर्चांत पैसे पाठविण्याचें साधन ह्या नात्यानें अस्तित्वांत आलेल्या असतात.

जोखमी हुंडी एक प्रकारचा विमा असते. माल विम्यांत व ह्या हुंडींत फरक इतकाच असतो कीं, त्याचे पैसे अगोदरच भरावे लागतात व जहाज न बुडतां सुरक्षितपणें येऊन पोंचलें तरच ते पैसे परत मिळतात. ह्या हुंडीचे बाबतींत तीन तऱ्हेचे लोक असतात. एक जहाजांत माल भरणारा मनुष्य, दुसरा हुंडीवाला किंवा जहाजाच्या विम्यांचा दलाल व तिसरा मालवाला किंवा माल स्वीकारणारा मनुष्य. माल भरणारा मनुष्य जहाजांतून माल आपल्या मुनीमाकडे पाठवितो व मालवाल्यावर हुंडी काढतो व ही हुंडी तेथल्या तेथेंच रोख रक्कम घेऊन हुंडीवाल्याला विकून टाकतो. हुंडीवाला ती हुंडी आपल्या मुनीमाकडे पाठवून देतो व तो मुनीम ती हुंडी मालवाल्याकडे नेऊन त्याच्यापासून पैसे वसूल करतो व नंतर त्याला माल देतो. एखादे वेळीं मालवाल्याला पैसे द्यावयाचे नसले किंवा हुंडी स्वीकारावयाची नसली तर हुंडीवाल्याला फक्त त्याचा माल घ्यावा लागतो व पैशाबद्दल मूळ हुंडी काढणाऱ्या माणसाशीं हुजत घालावी लागते. जहाजांतून येणाऱ्या मालाचें अजीबात नुकसान झालें तर तें सर्व नुकसान हुंडीवाल्यासच सोसावें लागतें. जर त्या मालाचें अर्धवट नुकसान झालें असेल तर हुंडीवाल्यालाच सर्व नुकसानीची भरपाई मिळाली पाहिजे. कधीं कधीं गलबतावरील मालाचें झालेलें नुकसान भरून काढण्यासाठीं हिस्सेरशीनें वर्गणी गोळा केली जाते. अशा वेळीं हुंडीवाल्याला त्याच्या हिश्शाप्रमाणें पैसे मिळतात.

चेक:—पतीचा चवथा प्रकार म्हणजे पेढीवर काढले जाणारे चेक हा होय. हल्लीं हिंदुस्थानांत पुष्कळ पेढ्या आहेत व पूर्वीप्रमाणें लोक आपले पैसे जवळ न

ठेवतां पेढ्यांजवळ ठेवतात व त्यांना चेकबुकें देत असतात. तेव्हां चेक ही काय चीज आहे हें पुष्कळांना ठाऊक आहे. चेकची व्याख्या 'बेचनीय दस्तऐवजांच्या कायद्या'मध्यें अशी केली आहे कीं, चेक ही, जिच्याबद्दल मागणी करतांच पैसे मिळतात अशी एखाद्या पेढीवर काढलेली हुंडी होय आतांपर्यंत आपण व्यापारी हुंड्यांचा विचार केला. पाश्चात्य देशांत हल्लीं चेक व हुंडी ह्यांचा सर्रास प्रचार चालू आहे. तरीपण चेकपेक्षां हुंडी (Bill of Exchage) कांहीं बाबतींत व्यापारीदृष्ट्या सरस असते. ठोक व्यापारी किंवा कारखानदार ह्यानें माल पुरविल्यावर त्याची अशी इच्छा असते कीं, आपणास तावडतोब पैसा मिळावा व त्या पैशाच्या जोरावर आपला धंदा जास्त वाढवावा; पण फुटकळ व्यापारी आपला विक्रीस ठेवलेला माल विकला जाईपर्यंत पैसा देण्यास कबूल नसतो. त्या दोघांची गरज भागविण्याचें सामर्थ्य व्यापारी हुंडींत असतें. कारण ठोक व्यापारी आपण विकलेल्या मालाची हुंडी काढतो व किरकोळ व्यापारी ती स्वीकारतो. ही हुंडी अर्थात्च मुदतीची असल्यामुळें तिचे पैसे मुदत भरल्यावर म्हणजे फुटकळ व्यापाऱ्यानें आपला माल विकल्यावर त्याला भरावयाचे असतात. तोंपर्यंत जो कोणी—मग तो दलाल असो किंवा पेढी असो—ती हुंडी विकत घेईल तो त्या घाऊक कारखानदाराला किंवा व्यापाऱ्याला त्याबद्दल पैसे देतो. अशा रीतीनें व्यापाराची वाढ होत असते. ह्याशिवाय हुंडीचे दुसरेही फायदे व्यापारीवर्गाला होत असतात. धनको आपल्या ऋणकोकडून जेव्हां हुंडी स्वीकारतो तेव्हां त्याच्याजवळ एक दस्तऐवज आयताच तयार असतो व त्यामुळें आपल्याला आपलें कर्ज केव्हां मिळेल हें त्याला निश्चितपणें समजतें. तसेंच आपण कर्ज दिल्याचा लेखी पुरावा त्याच्याजवळ रहातो व ती हुंडी मुदत भरल्यावर जर नाकारली गेली तर तिचे पैसे फिर्याद करून घेतां येतात.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, चेक ही एक प्रकारची हुंडीच आहे; पण जरा खोल विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, ह्या दोघांमध्यें कांहीं बाबतींत फरक आहे. पहिला फरक असा कीं, हुंडीचा स्वीकार केला गेल्याशिवाय तिचा वास्तविक स्वीकार करणारा मनुष्य जबाबदार रहात नाहीं; पण चेकचा स्वीकार पेढी कधींच करीत नाहीं व त्यामुळें एखादा मनुष्य तो चेक घेऊन पेढीकडे आला व पेढीनें तो नाकारला तर त्यामुळें होणाऱ्या नुकसानीबद्दल ती पेढी जबाबदार नसते. पेढीची जबाबदारी फक्त तिच्या गिऱ्हाइकाबद्दलच असते. दुसरा महत्त्वाचा फरक असा

आहे कीं, हुंडीची मुदत ज्या वेळीं भरते त्या वेळीं ती तिच्यावर लिहिलेली रक्कम हवी असेल तर हजर केलीच पाहिजे. तशी ती हजर न केली तर ती काढणारा व तिचा स्वीकार करणारा हे दोघे पैसे देण्याचे बाबतींत मुक्त होतात; पण चेक जरी उशीरां हजर केला तरी नुकसान होत नाहीं; मात्र असा उशीर झाल्यामुळें एखादे वेळीं जिच्यावर चेक काढिलेला असतो त्याच पेढीचें दिवाळें निघून तो काढणाऱ्या माणसाचें नुकसान होऊं नये.

तिसरा महत्त्वाचा फरक म्हणजे ज्याच्या हातांत प्रत्यक्ष हुंडी असते त्यानें ती हुंडी तिचे पैसे द्यावे लागणाऱ्या माणसाकडे नेली व ती त्या माणसाकडून नाकारली गेली तर त्याला प्रथम हुंडी काढणाऱ्या माणसाला ती हुंडी नाकारल्याची सूचना द्यावी लागते; पण चेकचे पैसे मिळाले नाहींत तरी त्याबद्दल नोटीस देण्याची गरज नसते. जवळ पैसा नाहीं एवढीच सूचना पुरेशी होते.

चेकची वर जी व्याख्या केलेली आहे, त्यावरून वाचकांचे लक्षांत येईलच कीं, एखादा दस्तऐवज चेक ह्या संज्ञेला पात्र होतांच त्यास खालील गोष्टींची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, चेक म्हटला म्हणजे तो पेढीच्या बाबतींत तरी बिनशर्त पाहिजे. उदाहरणार्थ, एखाद्या माणसानें एखाद्या पेढीवर चेक दिला व त्यांत त्या पेढीला असें सांगितलें कीं, चेक घेऊन येणाऱ्या माणसानें चेकबरोबर असलेली पैसे पोंचल्याची पावती योग्य तऱ्हेनें लिहून दिल्यावर मग त्याला पैसे मिळावे, तर हा चेक होऊं शकत नाहीं.

तसेंच प्रत्येक चेक लेखी असला पाहिजे. मग तो शाईनें लिहिला जावो, टाइपरायटरवर लिहिला जावो किंवा पेन्सिलीनें लिहिला जावो; पण होतां होईल तों चेक शाईनें किंवा टाइपरायटरवरच लिहिलेला असावा. कारण पेन्सिलीनें लिहिल्यास त्यांत खोडाखोडी होण्याचा बराच संभव असतो.

प्रत्येक चेक एका माणसानें दुसऱ्या माणसावर काढला पाहिजे व तो हुकुम अशा नात्यानें—मग हा हुकुम सौम्य भाषेंत असला तरी चालेल—काढला पाहिजे; म्हणजे चेक काढणारा व ज्याच्यावर चेक काढावयाचा ते दोन अलग व्यक्ती पाहिजेत.

प्रत्येक चेकमध्यें उल्लेख केलेली रक्कम मागणी केल्याबरोबर मिळाली पाहिजे, म्हणजे तो चेक दर्शनी असला पाहिजे. त्याचप्रमाणें प्रत्येक चेकाचे पैसे

त्याच्यावर ज्याचें नांव असेल त्याला किंवा तो सांगेल त्या माणसाला किंवा जो तो घेऊन येईल त्याला मिळाले पाहिजेत.

मागें एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, चेक हा हुंडीचाच प्रकार आहे. ज्याप्रमाणें हुंडी एका ठराविक पद्धतीनें काढण्यांत येते, त्याप्रमाणें चेकचाही एक ठरलेला प्रकार असतो.* ह्या प्रकाराचा आपण जर काळजीपूर्वक विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, एक चेक घेतला तर त्यांत तिघांचा संबंध येतो. चेकवर सही करून तो काढणारा हा एक इसम, ज्याच्यावर चेक लागू करावयाचा तो पेढीवाला किंवा पेढी हा दुसरा इसम व ज्याला किंवा तो सांगेल त्या माणसाला पैसे मिळावयाचे असतात तो पैसे घेणारा तिसरा मनुष्य अशा तीन व्यक्तींचा चेकशीं संबंध येतो.

आपण कोठलाही चेक घेतला तरी तो कायदेशीर मानला जाण्यास त्याच्यावर तो काढणाऱ्याची सही असलीच पाहिजे. ही सही बरोबर आहे किंवा नाहीं ह्याचा पडताळा पाहण्याकरितां पेढीवाल्यानें अनेक युक्त्या योजिल्या पाहिजेत व आपली खातरी करून घेतली पाहिजे. कारण माणसाचें अक्षर वारंवार बदलत असतें व खोटी सही असलेल्या चेकाचे पैसे दिल्याबद्दल पेढीसच कायद्यानें भुर्दंड भरावा लागतो. एवढेंच नव्हे तर पेढीच्या गिऱ्हाइकानें हलगर्जीपणानें आपलें चेकबुक वाटेल तेथें टाकलें व त्यांतील चेकवर त्याची सही करून दुसऱ्या एका बदमाष माणसानें तो चेक बँकेकडे पाठवून दिला, तर ती सही आपल्या गिऱ्हाईकाचीच आहे किंवा नाहीं हें ताडून पाहतां जर त्या बँकेनें पैसे दिले तर ती बँकच तोंडघशी पडते; पण एखादे वेळीं चेकवर खोटी सही होऊनही ज्याची सही बनावट असेल त्या पेढीच्या गिऱ्हाइकाच्या चेकवर असलेली सही बनावट आहे हें त्यास माहीत झाल्यावरही ती खोटी आहे असें म्हणण्याची त्याची इच्छा नसते, त्या वेळीं पेढीनें पैसे दिल्यास तिजवर कोठलाही दोष येत नाहीं. एखादा चेक पेढीच्या गिऱ्हाइकाकडून तिजकडे आला असतांना त्या चेकवर असलेल्या सहीबद्दल त्या पेढीला जर संशय आला तर तिनें तो चेक 'सही निराळी दिसते' असा शेरा मारून खुशाल परत करावा. पेढीच्या गिऱ्हाइकाला जर सही करतां येत नसेल तर त्यानें आपली निशाणी करावी; पण ती निशाणी पेढीच्यासमक्ष दुसऱ्या एखाद्या

* चेकचा नमुना पुढील पानावर दिलेला आहे तो पहा.

No. A42345

Payee ____________

Rs. ____________

Date ____________

No. A42346 Poona ____________ 192 .

Imperial Bank of India.

POONA BRANCH.

Pay to ________________________________ or bearer

Rupees

Rs.

माणसाला (हा मनुष्य पेढींतला नोकर नसलेला बरा) साक्षी ठेवून केलेली बरी. त्याचप्रमाणें पेढीचा गिऱ्हाईक आजारीपणांत चेकवर सही करूं शकला नाहीं तर एखाद्या डॉक्टरास साक्षी ठेवून दुसऱ्याकडून त्या चेकवर त्यानें सही करवून घ्यावी व पेढीनें आपली खात्री करून पैसे दिल्यास कसलीही हरकत नसते.

चेकवरील तारीख:--चेक बँकेवर ज्या दिवशीं काढला जातो, त्या दिवशीं त्यावर चुकून मागची किंवा पुढची तारीख पडण्याचा संभव असतो; तरी-पण एवढ्याच चुकीकरतां तो चेक गैरकायदा आहे असें कोणी मानीत नाहीं. तसेंच बँकेकडे एखादे वेळीं बिनतारखेचा चेक येतो. हा चेकसुद्धां कायदेशीर मानण्यास प्रत्यवाय नसतो. एखाद्या चेकवर आदितवारची तारीख असली तर त्या चेकचे पैसे बँकेनें सोमवारीं किंवा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास दुसरे दिवशीं द्यावे. तोच चेक जर बँकेकडे शनिवारीं आला तर ' पुढील तारखेचा चेक आहे ' असा त्याजवर शेरा मारून तो तिनें खुशाल परत करावा. एखादे वेळीं चेकवर पुढील तारीख असली व त्या चेकचे पैसे बँकेनें अगोदरच देऊन टाकले तर अशा वेळीं ज्यानें तो चेक बँकेवर काढला असेल त्याचें ह्या चुकीनें होणारें नुकसान बँकेनेंच सोसलें पाहिजे कारण ठरावीक मुदतीच्या अगोदर पैसे देण्यास ज्यानें चेक काढला त्याची परवानगी नव्हती, इतकेंच नव्हे तर ह्या पुढील तारखेच्या चेकाचे पैसे दिल्यामुळें एखाद्या बँकेजवळची शिल्लक संपली व त्याच वेळीं त्याच तारखेचे चेक वटविण्याकरितां बँकेकडे आले तर द्रव्याभावीं विनाकारण ते चेक तिला नाकारावे लागणार व लोकांची गैरसोय करावी लागणार. असो. अशा अनेक भानगडी उपस्थित होत असल्यानें बँकेनें पुढील तारखेच्या चेकांचे पैसे अगोदर देऊं नयेत.

कधीं कधीं एखाद्यानें बँकेवर चेक काढला व त्याची मुदत भरली तरी तो बँकेकडे आला नाहीं इतकेंच नव्हे तर भरल्यावर कित्येक महिने तो लोकांमध्यें प्रचारांत असला व नंतर तो पेढीकडे आला तर ह्या पेढीनें वर्ष सहा महिन्यांनंतर तो चेक आपणाकडे आला ह्या मुद्यावर तो नाकारावा. अशा रीतीनें चेक नाकारला गेला तरी प्रथम ज्यानें तो काढला असेल तोच मनुष्य ज्याच्या हातांत तो नाकारलेला चेक असेल त्या माणसाला, जबाबदार असतो व त्यानें पैसे देण्याचें नाकारलें तर त्याच्यावर फिर्याद करून त्या चेक हातीं असलेल्या माणसास आपले पैसे वसूल करून घेतां येतात. मात्र हातांत चेक असलेल्या माणसानें आपण चेक

योग्य वेळीं हजर केला, चेक नाकारला गेला ह्यामध्यें आपला कांहींएक दोष नाहीं हें सिद्ध केलें पाहिजे. तसें सिद्ध न झालें तर ज्यानें चेक काढला असेल तो चेक काढण्याचे वेळीं बँकेंत आपले पुरेसे पैसे होते हें सिद्ध केल्यावर जबाबदारींतून सुटतो व त्या चेक असलेल्या माणसाला पेढीशीं भांडावें लागतें.

चेकमधील रक्कमः--वाटेल त्या रकमेबद्दल, मग ती आणे किंवा पै का असेना, पेढीच्या गिऱ्हाइकाला तिच्यावर चेक काढतां येतो. ही रक्कम चेकमध्यें अक्षरीं व आंकड्यांत लिहिलेली पाहिजे. एकादे वेळीं अक्षरांत रक्कम एक लिहिलेली असली व आंकड्यांत निराळीच असली तर बँकेनें तो चेक खुशाल नाकारावा. चेकमध्यें रक्कम जर आंकड्यांत लिहिली नसली तरी चालेल; पण ती रक्कम अक्षरांत लिहिलीच पाहिजे. तशी ती न लिहिल्यानें बँकेनें चेक परत केला व ज्यानें तो प्रथम तिच्यावर काढला असेल त्यानें आपली सही न करतां जर अक्षरी रक्कम भरून पुनः तिच्याकडे पाठविला तर त्या बँकेनें पुनः तो चेक परत करण्यास हरकत नाहीं.

एखादे वेळीं चेकमध्यें लिहिलेल्या रकमेंत खोडाखोड करून दुसरी रक्कम लिहिली गेली तर हा फेरफार महत्त्वाचा समजून बँकेनें तो चेक नाकारावा; पण हा फेरफार जर महत्त्वाचा नसेल व खोडलेल्या पहिल्या रकमेपेक्षां मागाहून घातलेली रक्कम जर कमी असेल तर तो चेक न नाकारतां त्याचे पैसे देण्यास हरकत नाहीं. चेकमध्यें लिहिलेली रक्कम जर समजण्यासारखी असेल तर त्या चेकचे पैसे--ती रक्कम बिनचूक लिहिलेली नसली तरी--बँकेनें देण्यास हरकत नाहीं.

असो. सांगावयाचें तात्पर्य असें कीं, चेकमध्यें होणारे महत्त्वाचे फरक तो काढणाऱ्याच्या--मग तो एका व्यक्तीकडून काढला जावो किंवा अनेकांकडून काढला जावो--संमतीनेंच झाले पाहिजेत व त्यावर ते फेरफार करण्याची सही असली पाहिजे. हे महत्त्वाचे फेरफार चेकवरील तारखेच्या बाबतींत रकमेच्या बाबतींत किंवा ज्याला पैसे मिळावयाचे त्याच्या नांवाच्या बाबतींत, होऊं शकतात. असे फेरफार तो चेक काढणाऱ्याच्या संमतीनें जर झाले नसले व बँकेनें त्या चेकचे पैसे दुसऱ्या माणसास देऊन टाकले तर पेढीला नुकसानीबद्दल जबाबदार धरण्यांत येतें.

एखाद्या पेढीच्या गिऱ्हाइकानें एक चेक बँकेवर देण्याकरतां चेकबुकांतून फाडला; पण पुढें त्याचा बेत बदलून त्यानें तो आडवा फाडून टाकला, तर

अशा प्रसंगीं त्या चेकचे तुकडे जुळवून व चिकटवून तो एखाद्या माणसानें बँकेकडे आणून दिल्यास त्या चेकचे जोडलेले तुकडे दिसत असतानां तिनें तो नाकारला पाहिजे. पण तोच चेक जर बँकेकडे घेऊन येणाऱ्या माणसाकडे प्रथम फाडून मग चिकटवून आणून दिला व प्रथम चेक काढणारास ही गोष्ट ठाऊक असली तर बँकेनें त्या चेकचे पैसे देण्यास कांहीं हरकत नाहीं.

पेढीची सावधगिरीः—सर्वसामान्य नियम असा आहे कीं, पेढीनें आपल्या गिऱ्हाइकानें दिलेले चेक कधींही नाकारूं नयेत; कारण ते नाकारल्यानें त्या गिऱ्हाईकाची अब्रू जाते. तरीपण गिऱ्हाइकाचे पेढीजवळ ठेवलेले पैसे संपुष्टांत आले असले व तो गृहस्थ आपलें बँकेकडून किती येणें आहे ह्याचा विचार न करितां तिच्यावर चेक देतच सुटला तर अगाऊ तसें दोघांमध्यें ठरलें नसेल तर पेढीनें चेक नाकारले तरी हरकत नसते. कारण शिलकेपेक्षां जास्त रकमेचा चेक बँकेनें स्वीकारला व पुढेंमागें त्या गिऱ्हाइकाचें दिवाळें निघालें तर पेढीस जास्त दिलेल्या पैशाबद्दल कांहीं एक करतां येत नाहीं.

जमेच्या व नांवेच्या नोंदीचें बँक बूकः—प्रत्येक पेढीनें आपल्या गिऱ्हाइकाला एक चेकबुक किंवा पासबुक देऊन ठेवावें व आपले व गिऱ्हाईकाचे देण्याघेण्याचे जे व्यवहार नित्य होत असतील त्यांची नोंद त्यामध्यें करून ठेवावी; दर पंधरवड्यास ह्मणा किंवा महिन्यास ह्मणा, तें बँकबूक आपल्या गिऱ्हाइकाकडे पाठवून त्याच्याकडून तपासून घ्यावें व गिऱ्हाईकानेंही आपलें पासबूक नीट तपासून त्यांत जर कांहीं चुका असल्या तर त्याची बातमी ताबडतोब बँकेला द्यावी. एखादेवेळीं पेढीकडून गिऱ्हाइकाच्या नांवावर जमेकडील बजू जास्त दाखविली गेली व तिनें त्या चुकीची दुरुस्ती लवकर केली नाहीं तर त्या पेढीलाच भूर्दंड सोसावा लागतो. कारण आपली पत पेढीजवळ बरीच आहे असें समजून तें गिऱ्हाईक तिच्यावर चेक काढतें व तो चेक जर नाकारला गेला तर नाहक त्या गिऱ्हाईकाची अब्रू जाते; तेव्हां पेढीनें गिऱ्हाईकाचें पासबूक वारंवार तपाशीत जावें व त्यांत असलेल्या चुका तत्काल दुरुस्त कराव्या. कारण जितका जास्त वेळ त्या चुका त्या पासबुकांत राहून जातील तितका गिऱ्हाइकांकडून पैसे परत मिळण्याचा संभव कमी असतो. कांहीं कांहीं वेळीं बँकेच्या नजरचुकीनें गिऱ्हाइकाच्या नांवावर जमेकडे रकम मांडली जाते व ही पेढीची चूक कळल्यावरसुद्धां गिऱ्हाईक

जर लबाडीच्या बुद्धीनें पेढीच्या चुकीचा फायदा घेईल तर त्या पेढीला त्याच्याकडून पैसे परत मागतां येतात. त्याचप्रमाणें पेढीनें एखादी रक्कम जमेकडे न मांडल्याची चूक तिच्या गिऱ्हाइकानें तिच्या नजरेस आणली नाहीं म्हणून आपणाकडे जास्त आलेली रक्कम आपण त्या गिऱ्हाइकास देणार नाहीं, असें जर ती पेढी म्हणेल तर तें करणें बेकायदेशीर होईल.

ज्या ज्या वेळीं पेढी गिऱ्हाइकाला पासबुक देत असते त्या त्या वेळीं त्या पासबुकावर तारीख व नोंद करणाऱ्या कारकुनाची सही ह्या दोन गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत व प्रत्येक वेळीं तें पासबूक तपासलें गेलें पाहिजे.

चेकचे दोन प्रकार:—चेकचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत ज्याच्या हातीं तो चेक असतो त्याला पैसे मिळतात व दुसऱ्या प्रकारांत ह्या चेकांत नोंदलेल्या मनुष्यास व त्याच्याच वतीच्या दुसऱ्या मनुष्यास पैसे मिळतात. ह्यांनाच इंग्रजीमध्यें Bearer Cheque व Order Cheque अशा अनुक्रमें संज्ञा आहेत. पहिल्या प्रकारांत शेरा मारण्याची आवश्यकता नसते. पेढीकडे नुसता चेक आणून दिला व त्या चेकवर तारीख, सही व रक्कम बरोबर आहे अशी तिची खात्री पटली म्हणजे पैसे मिळण्यास अडचण पडत नाहीं; पण चेक जर एका ठराविक माणसास मिळावयाचा असला तर त्याचाच शेरा त्या चेकवर असल्याविना पैसे मिळत नाहींत.

एखादा चेक एक विशिष्ट माणूस सांगेल त्या माणसाच्या नांवावर काढला असला व त्याच्यावर शेरा मारणाराची सही व ज्याला पैसे मिळावयाचे त्याची सही ह्या भिन्न असल्या व अशा वेळीं जर आंधळेपणानें पेढीनें पैसे दिले तर अर्थातच ती पेढी जबाबदार राहील. तसेंच आपल्या ऑफिसाच्या वेळेनंतर एखाद्या पेढीनें पैसे दिले तरी पेढीच नुकसानीबद्दल जबाबदार राहते.

एखादे वेळीं ज्याला चेकचे पैसे मिळावयाचे तो मनुष्यच अस्तित्वांत नसला तर तो चेक जो मनुष्य घेऊन येईल त्याला पेढीनें पैसे देण्यास हरकत नाहीं. मात्र ज्यानें चेक तिच्यावर काढला असेल त्याची सही बरोबर आहे किंवा नाहीं हें पेढीनें पाहिलें पाहिजे.

तिरप्या किंवा उभ्या रेघा मारलेला चेक:—चेकवर तिरप्या किंवा उभ्या रेघा मारण्याचा हेतु असा असतो कीं, त्यामुळें पेढ्या व त्यांचे गिऱ्हा-

ईक त्यांना होणारा त्रास होतां होईल तेवढा चुकावा. चेकावर अशा रेघा मारल्या म्हणजे तो चेक दुसऱ्या पेढीच्या मध्यस्तीनेंच वटविला गेला पाहिजे असा अर्थ होतो. तो तसा वटविला गेला म्हणजे लबाड्या होण्याचा संभव कमी असतो व त्या झाल्याच तर त्या उघडकीस येण्याचा जास्त संभव असतो.

चेकवर दोन तऱ्हांनीं आडव्या किंवा उभ्या रेघा मारता येतात. पहिली तऱ्हा म्हणजे चेकवर 'आणि कंपनी' हे व ह्या अर्थाचे संक्षिप्त शब्द लिहून किंवा न लिहितां दोन समांतर रेघा मारणें व दुसरी तऱ्हा म्हणजे चेकवरच ज्या पेढीनें तो वटविण्याचा तिचें नांव लिहिणें व ' अवेचनीय ' असे शब्द वाटेल तर लिहिणें किंवा न लिहिणें अशा ह्या दोन तऱ्हा आहेत. एखादा चेक प्रथम तिरप्या किंवा उभ्या रेघा मारिलेला नसला तर ज्याच्या हातांत तो जाईल त्याला वर सांगितलेल्या दोन्ही तऱ्हांनीं त्याच्यावर रेघा मारतां येतात व ' वेचतां येण्यासारखा नव्हे ' असेही शब्द घालतां येतात. ज्या वेळीं चेकवर वटविणाऱ्या पेढीचें नांव लिहिलेलें असतें त्या वेळीं त्या चेकचे पैसे पेढीलाच मिळतात हें पहाण्याचें काम त्या पेढीचें असतें. चेकचे पैसे पेढीलाच न देतां जर एखाद्या मनुष्याला ती पेढी पैसे देईल तर चेक काढणाराचें होणारें नुकसान त्या पेढीला भरून द्यावें लागतें. ह्याच तत्त्वावर एखाद्या बँकेला आपल्या गिऱ्हाइकाबद्दल स्वतःची कांहीं एक हयगय किंवा लबाडी नसतांना तिरप्या उभ्या रेघा असलेल्या चेकचे पैसे मिळाले तर त्या गृहस्थाचा त्या चेकवर कायदेशीर हक्क नसूनही त्याला पैसे मिळाले म्हणून जर मूळ चेक काढणाराचें नुकसान झालें तर ती बँक जबाबदार नाहीं. एखाद्या चेकवर ओढलेल्या रेघा जर नाहींशा केलेल्या असल्या किंवा त्या स्पष्ट दिसत नसल्या आणि त्या चेकचे पैसे पेढीनें दिले तर पेढीवर कसलीही जबाबदारी येत नाहीं. एखादे वेळीं एखाद्या चेकवर एकाच पेढीच्या दोन शाखांचीं नांवें लिहून त्यावर तिरप्या किंवा उभ्या रेघा मारलेल्या असतात. अशा वेळीं त्या चेकवर एकाच बँकेचें नांव लिहिलेलें आहे असें समजलें जातें. एखाद्या चेकवर एकदां अमुकच बँकेला पैसे द्यावे असा उल्लेख केल्यावर त्याचे पैसे कोठल्याही इतर बँकेला घेतां येत नाहींत.

वर सांगितल्याप्रमाणें कधीं कधीं चेकवर ' बेचतां येण्यासारखा नाहीं ' असे शब्द लिहिलेले असतात. ह्याचा अर्थ कांहीं लोक असा करितात कीं, ज्याच्या-

जवळ तो चेक असतो त्यालाच फक्त पैसे मिळावयाचे व म्हणून तो चेक त्याला दुसऱ्याला बेचतां येत नाहीं; पण ही कल्पना चुकीची आहे. वर सांगितलेले शब्द लिहून तिरप्या किंवा उभ्या रेघा मारलेला चेक वाटेल तितक्या माणसांना बेचतां येतो व त्याच्यावर शेरे मारतां येतात. तर मग प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, हे शब्द चेकवर लिहिण्याचा उद्देश तरी काय? हे शब्द लिहिण्याचा हेतु एवढाच असतो कीं, बेचनीय दस्तऐवजांत असलेला विशेष फायदा हे शब्द असलेल्या चेकला मिळूं नये. हा विशेष फायदा म्हणजे चेक किंवा हुंडी अनेक लोकांचे हातून गेली असतांना शेवटीं ज्याच्या हातांत सरळ मार्गानें ती जाते त्याला, पूर्वीच्या एखाद्याला त्या चेक किंवा हुंडीबद्दल पैसे मिळण्याची जरी कांहीं कायदेशीर अडचण असली तरी, पैसे मिळावे. तेव्हां ज्या चेकवर वर सांगितलेले शब्द लिहिलेले असतात तो चेक शेवटीं ज्याच्या हातांत जाईल, त्याच्या पूर्वीच्या गृहस्थाचा त्या चेकवर जेवढा हक्क रहातो तेवढाच त्या शेवटल्या माणसाचा रहातो.

कधीं कधीं पेढ्या चेकवर ' ह्याचे पैसे खात्रीनें मिळतील ' असा शेरा मारतात. असा शेरा मारण्याचा हेतु चेक काढणाराचे आपणाजवळ पुरेसे पैसे आहेत व चेक नाकारला जाणार नाहीं असें लोकांना सुचवावयाचें. असा शेरा पेढीनें तो चेक काढणाऱ्याच्या सांगण्यावरून मारला तर अर्थातच त्या माणसाला चेकबद्दल पैसे बँकेकडून मिळालेच पाहिजेत; पण हा शेरा एका बँकेच्या सांगण्यावरून किंवा ज्याच्या हातांत तो आला असेल व ज्याला पैसे मिळवावयाचे त्याच्या सांगण्यावरून दुसऱ्या पेढीनें मारला तर एखादे वेळीं मोठी अडचण उत्पन्न होते. कारण एखादे वेळीं मूळ चेक काढणारा 'माझा चेक स्वीकारूं नका' असें त्या पेढीला लिहूं शकेल. तेव्हां मूळ चेक काढणाऱ्या माणसानें सांगितल्याशिवाय पेढीनें होतां होईल तों ' चेकचे पैसे मिळतील ' असा शेरा त्याच्यावर मारूं नये.

गिऱ्हाइकाचे चेक पेढीनें केव्हां नाकारावेत:—प्रथम पेढीच्या गिऱ्हाइकानें तिच्यावर चेक दिला असतांना मागून त्या चेकचे पैसे तो घेऊन येणारास देण्याचें, त्या गिऱ्हाइकाचें नुकसान न होतां, त्या पेढीस नाकारतां येतें. उदाहरणार्थ, त्या गिऱ्हाइकानेंच प्रथम चेक दिल्यावर मागाहून आपल्या पेढीस तोंडी किंवा लेखी निरोप पाठवून कळविलें कीं, अमुक अमुक चेक घेऊन येणाऱ्या माणसास त्या चेकचे पैसे देऊं नयेत, तर पेढीनें पैसे देण्याचें खुशाल नाकारावें.

मात्र गिऱ्हाइकानें चेकचे पैसे तो घेऊन येणाऱ्या माणसाच्या हातांत पडण्यापूर्वीच पेढीस ते न देण्याबद्दल कळविलें पाहिजे.

ज्या गिऱ्हाइकानें प्रथम चेक पेढीवर दिला असेल तो गिऱ्हाईकच मेल्याची सूचना त्या पेढीला मिळाली असेल तर तिनें चेक घेऊन येणाऱ्या माणसास पैसे देऊं नयेत; पण अशी सूचना मिळूनही त्या पेढीनें चेकचे पैसे दिले असल्यास ते पैसे तिला गिऱ्हाइकाच्या खात्यांत त्याच्या नावें मांडतां येत नाहींत, तर ते पैसे त्या मयत गिऱ्हाइकाच्या इस्टेटींतूनच तिनें घेतले पाहिजेत.

पण गिऱ्हाइकाच्या नांवावर त्याचा मुनीम पेढीवर चेक देत असला व त्या मुनीमाच्या मृत्यूची बातमी तिला मिळाली तर त्या पेढीला चेकचे पैसे नाकारतां येत नाहींत. तसेंच एखाद्या कंपनीच्या किंवा संस्थेच्या नांवावर चेक काढला असतांना त्या कंपनीचा किंवा संस्थेचा एखादा अधिकारी मेला एवढ्याच मुद्यावर पेढीला चेक परत करतां येत नाहीं. तसेंच एखाद्या फर्मचा म्हणजे सरकतीनें धंदा करणाऱ्या पेढीचा एखाद दुसरा सरकती मेला म्हणूनही तिला चेक नाकारणें शक्य नाहीं. कारण प्रत्येक सरकती हा सर्व इतर सरकत्यांचा मुनीम असा मानला जातो आणि एखादा सरकती मेल्यामुळें जरी सर्व फर्म पूर्वसंकेतानुरूप बुडत्ये, तरी ती पूर्ण नामशेष होईपर्यंत कांहीं वेळ तिच्या देण्याघेण्याबद्दल इतर सरकती जबाबदार असतातच.

पेढीच्या एखाद्या गिऱ्हाइकाचें जर दिवाळें निघालें किंवा त्यानें जाणूनबुजून आपलें दिवाळें काढलें तर त्या पेढीला त्यानें काढलेले चेक नाकारतां येतात. एखाद्या गृहस्थानें सावकारनात्यानें पेढीच्या एखाद्या गिऱ्हाइकाविरुद्ध नादारींत अर्ज करण्यास उत्तेजक असें त्या गिऱ्हाईकानें वर्तन केलें असतांना निदान तीन महिनेपर्यंत त्याचे चेक स्वीकारूं नयेत. कारण त्या मुदतींत केव्हांही तो सावकार नादारींत अर्ज करील. तसेंच एखाद्या फर्मचा एखादा सरकती दिवाळखोर निघाला तर त्याची दिवाळखोरी जाहिर होण्यापूर्वी त्यानें ज्या चेकवर सह्या केल्या असतील, त्यांवर इतर सरकत्यांच्या सह्या असतील तरच पेढीनें ते चेक स्वीकारावे. ज्या वेळीं सर्वच फर्मचें दिवाळें निघतें त्या वेळीं सर्वच भागीदार दिवाळखोर ठरतात व त्यांच्या खाजगी खात्यावर काढलेले चेक पेढीनें खुशाल नाकारावेत.

कधीं कधीं पेढीच्या गिऱ्हाइकांवर न्यायाच्या कचेरींत त्याला असलेल्या देण्याबद्दल फिर्याद होऊन त्याची सर्व इस्टेट जप्त झालेली असते व त्याची पेढी-

जवळ असलेली शिल्लक अन्यत्र खर्च करूं नये असा कोर्टाचा हुकूम सुटतो. अशा वेळीं पेढीनें त्या गिऱ्हाईचे चेक स्वीकारूं नयेत. त्या गिऱ्हाईकाची पेढीजवळ असलेली शिल्लक त्याला असलेलें कर्ज वारून उरण्याइतकी असेल; पण ही सर्व शिल्लक त्याचीच असेल असें कशावरून? तिचा कांहीं भाग लोकांची ठेव म्हणूनही असेल; व पेढीनें जर चेक स्वीकारून पैसे भरले तर सरकार जी रक्कम लोकांची ठेव म्हणून असेल तिला हात न लावतां बाकीची रक्कम जप्त करील व कोर्टाची नोटीस मिळाली असतांना ह्या शिलकीच्या जोरावर त्या पेढीनें चेक स्वीकारल्यामुळें जर कांहीं तूट पडेल तर तिला पदरचे पैसे भरण्यास सरकार भाग पाडील. तेव्हां पेढीनें शहाणपणानें अशा गिऱ्हाइकाचे चेक न स्वीकारलेले बर.

पेढीचा एखादा गिऱ्हाईक वेडा झाला आहे असें सरकारनें ठरविलें किंवा त्याचें डोकें फिरलें असल्याबद्दल तिची खात्री झाली तर तिनें त्याचे चेक स्वीकारूं नयेत. मात्र तो खरोखरच भ्रमिष्ट झाला आहे अशी त्या पेढीनें आपली खात्री करून घेतली पाहिजे. ह्या एकंदर कारणांस्तव पेढीनें आपल्या गिऱ्हाइकांचे चेक नाकारण्यास हरकत नाहीं.

प्रकरण ५ वें.

हुंडीवाल्यांच्या हुंड्यांच्या अदलाबदलीनें हिशेब चुकतें होण्याचें ठिकाण (Clearing House)

सुधारलेल्या देशांतील सांप्रतचे व्यापारी धोरणः—अर्वाचीन काळीं सुधारलेल्या देशांत असलेलें व्यापारी धोरण जर आपण पाहिलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, व्यापारी लोक व्यवहारामध्यें रोखीचा व्यवहार फारसा न करतां आपलें काम कागदावरच भागवीत असतात व हे कागद म्हणजे त्यांनीं काढिलेल्या हुंड्या होत. सामान्य लोकांची प्रवृत्तीसुद्धां ह्याच वळणावर जात असलेली आपणांस दिसून येईल. इंग्लंडमध्यें लोक आपले पैसे प्रथम एखाद्या बँकेंत ठेवतात व ज्या वेळीं त्यांना पैशाची जरूर लागते तेव्हां त्यांना रोख पैसे परत न

मिळतां ती बँक त्यांना एक बँक नोट देते. कधीं कधीं असेंही घडतें कीं, बँकेजवळ आपले पैसे ठेवणाऱ्या माणसाला दुसऱ्या एखाद्या माणसाला १०० रुपये द्यावयाचे असले म्हणजे तो बँकेचा धनको त्या माणसाला आपल्या बँकेवर एक १०० रुपयांचा चेक देतो व कर्मधर्मसंयोगानें तो मनुष्य जर त्याच बँकेचा ऋणको किंवा धनको असला तर ती बँक त्या माणसाच्या नांवावर त्या चेकमध्यें लिहिलेली रक्कम जमा किंवा खर्च म्हणून लिहिते व चेक देणाऱ्या माणसाच्या नांवें तेवढी रक्कम लिहून टाकते. आतां आपण अशी कल्पना करूं कीं, बँकेकडे चेक घेऊन येणाऱ्या माणसानें तिसऱ्या एका माणसाला, त्याला त्याचे पैसे द्यावयाचे आहेत म्हणून, त्याच बँकेवर एक चेक दिला आहे व तो चेकही १०० रुपयांचाच आहे. हे दोन्ही चेक त्या बँकेकडे एकाच वेळीं आले तर त्या बँकेला फारच सोयीचें होईल व प्रथम चेक घेऊन येणाऱ्या माणसाला त्याला बँकेकडून रोकड हवी असली तर त्या बँकेला कांहींएक देण्याची जरूर पडणार नाहीं.

हुंड्यांच्या अदलाबदलीनें कर्ज फेडण्याची पद्धतः—ह्यापुढें जाऊन आपण अशी कल्पना करूं कीं, एखाद्या शहरांत दोन पेढ्या आहेत व त्यांचे गिऱ्हाइक निरनिराळे आहेत. एका पेढीचे कांहीं गिऱ्हाईक व ठेवीवाले लोक त्या पेढीला चेक देतात व ह्या चेकांचे पैसे दुसऱ्या पेढीच्या गिऱ्हाइकांना व ठेवीवाल्या लोकांना मिळावयाचे आहेत. त्याचप्रमाणें त्या दुसऱ्या पेढीचे कांहीं गिऱ्हाईक तिच्यावर चेक देत असतात. हेतु असा कीं, ह्या चेकचे पैसे पहिल्या पेढीच्या गिऱ्हाइकांना मिळावे. ह्या व्यवहारांचा असा परिणाम होतो कीं, प्रत्येक पेढीकडे दुसऱ्या पेढीवर काढलेले चेक गोळा करण्याकरितां म्हणून येत असतात. असे चेक आले म्हणजे पेढ्या हिशोबाची बराबरी करून जर कांहीं देणें घेणें एकमेकांकडे राहिलें असेल तर त्याबद्दल रोकड देतात व घेतात व अशा रीतीनें आपला हिशोब चुकतां करितात. कधीं कधीं असेंही होतें कीं, चेकांची अदलाबदल झाल्यावर जी कमीजास्त बाकी पेढ्यांकडे राहते त्याबद्दल त्या पेढ्या रोख नाणें न देतां घेतां आपणांजवळ नुसता हिशोब ठेवतात व कांहीं दिवसांनीं अशी स्थिति प्राप्त होते कीं, त्यांना देणेंघेणें पूज्य होतें. कारण एखाद्या दिवशीं जर एखाद्या पेढीला दुसऱ्या पेढीचें देणें असलें तर दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या पेढीलाच पहिल्या पेढीचें देणें होऊन बसतें व अखेरीस दोन्ही पेढ्यांचें देणेंघेणें सारखें होतें. आतां आपण अशी कल्पना करू कीं, एखाद्या

मुंबईसारख्या मोठ्या शहरांत दोनच पेढ्यांचेऐवजीं पंधरा वीस पेढ्या आहेत. ह्या पेढ्यांचे गिऱ्हाईक अतिशय असल्यामुळें त्यांच्याकडे त्यांचे चेकही पुष्कळ येतात व हे चेक एकमेकांवर असल्यामुळें वर सांगितलेला प्रकार येथेंही घडत असतो. प्रत्येक दिवशीं प्रत्येक पेढीकडे इतर पेढ्यांवर दिले गेलेले चेक येत असतात व ह्यांपैकीं थोड्या चेकांची विल्हेवाट त्या पेढीमध्येंच जरी लागली (ज्या वेळीं चेक काढणारा व पैसे घेणारा हे दोघेही एकाच पेढीचे गिऱ्हाइक असतात त्या वेळीं ही विल्हेवाट होऊं शकते) तरी बऱ्याच चेकांचा निकाल इतक्या सुलभ रीतीनें होऊं शकत नाहीं म्हणून हे चेक वर सांगितलेल्या क्लिअरिंग हाऊसमध्यें पाठविण्यांत येतात.

हुंड्यांची अदलाबदल करून कर्ज फेडण्याकरितां असलेल्या पेढीवाल्यांच्या संस्था:—हल्लीं प्रत्येक सुधारलेल्या व्यापारी देशांत अशा तऱ्हेच्या हुंड्यांची अदलाबदल करून हिशेब चुकता करण्याकरितां पेढीवाल्यांच्या संस्था निर्माण झालेल्या असतात व त्यांचें मुख्य काम म्हणजे एकमेकांवर काढलेल्या हुंड्या किंवा चेक ह्यांची फिटंफाट करावयाची हें असतें. वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक पेढी दुसऱ्या पेढीवर काढलेल्या व आपणाजवळ आलेल्या हुंड्या व चेक ह्या संस्थेस पाठवून देते व आपणावर इतर पेढ्यांनीं काढिलेल्या हुंड्यांबद्दल पैसे चुकते करण्याविषयीं तिला तयार रहावें लागतें. सगळे चेक व हुंड्या एके ठिकाणीं आल्यावर प्रत्येक बँकेकडे जें येणें व देणें असेल त्याबद्दल रोकड देण्याघेण्याची तिची तयारी असली पाहिजे; पण प्रत्यक्ष व्यवहारांत पेढ्यांना रोकड देण्याचा क्वचितच प्रसंग येतो. इंग्लंडांत लंडन शहरांत जी पेढीवाल्यांची संस्था आहे तिजमध्यें प्रत्येक पेढीवर जी बाकी काढिली जाते तिची फेड बँक ऑफ इंग्लंडवर चेक देऊन ती पेढी करीत असते. कारण प्रत्येक पेढीचा ह्या मध्यवर्ति पेढीशीं पैशाचा संबंध असतो. ह्या बँक ऑफ इंग्लंडवर प्रत्येक पेढीचे दुसऱ्या पेढीवर काढलेले जे चेक येतात त्या चेकांची नोंद ही मोठी पेढी आपल्या वहीखात्यांत जमेस व नांवें ह्या बाजूंना करते व अशा तऱ्हेनें एका फार्दिंगच्या मदतीशिवाय सर्व कर्जाची फेड होत असते.

कधीं कधीं पेढ्यांच्या संस्थेंत प्रत्येक पेढीवर जी बाकी निघत असते तिची फेड करण्यास तिला न सांगतां तशीच ती व्याजाच्या बोलीनें फुगूं दिली जाते.

कारण ह्या संस्थेंतल्या पेढ्यांची अशी खात्री असते कीं, आज ज्या पेढीला दुसऱ्या पेढीचें देणें आहे, तीच पेढी कांहीं काळानें आपलें कर्ज फेडून दुसऱ्या पेढ्यांकडून पैसे मागील. वास्तविक पाहिलें तर अशी बाकी फुगवूं देणें चांगलें नाहीं. शास्त्रशुद्ध रीति म्हणजे प्रत्येक पेढीनें आपणावर असलेल्या बाकीबद्दल रोकड देऊनच ती पूज्य केली पाहिजे; पण बाकी फुगवूं देण्यांत आपणास रोकड अलग काढून ठेवण्यास भाग पडूं नये अशी पेढ्यांची इच्छा असते.

ह्या संस्थेच्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, देशांत पेढ्या ज्या मानानें आपला ठेवी स्वीकारण्याचा धंदा वाढवितात त्या मानानें ह्या संस्थेची वाढ बरोबरच होत असते. लंडन शहरीं अशा प्रकारची संस्था १७७५ सालीं स्थापन झालेली होती, ह्यावरून त्या वेळीं ठेवी स्वीकारण्याचा धंदा पेढ्या जोरानें करीत असल्या पाहिजेत हें अनुमान चुकीचें होणार नाहीं.

हल्लीं हिंदुस्थानांत कलकत्ता, मद्रास, मुंबई व कराची ह्या मुख्य शहरीं हुंड्यांची अदलाबदल करून पैसे चुकते करणाऱ्या संस्था आहेत. ह्या संस्थांचे सभासद म्हणजे इंपीरियल बँक, सराफी बँक, इंग्लिश बँका व देशी बँका ह्या होत. पण कोठल्याही बँकेला हक्कानें ह्या संस्थेचा सभासद होतां येत नाहीं. एखाद्या पेढीला ह्या संस्थेचा सभासद होण्याची इच्छा असेल तर तिनें प्रथम ह्या संस्थेकडे अर्ज केला पाहिजे व त्या अर्जावर संस्थेच्या पूर्वीच असलेल्या सभासदांची सही पाहिजे व बॅलट पद्धतीनें त्याचें नांव निवडून आलें पाहिजे. प्रत्येक इलाख्याचे ठिकाणीं तेथील इंपेरिअल बँक हीच मुख्य बँक म्हणजे हिशोब चुकती करणारी पेढी असते; व ह्या बँकेच्या हपीसांत प्रत्येक सभासद असलेल्या बँकेचा प्रतिनिधि येत असतो व तो आपल्याबरोबर दुसऱ्या बँकेवर काढलेले चेक घेऊन येतो. हे सर्व चेक एकत्र झाले म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें त्यांची व्यवस्था होऊन प्रत्येक बँकेवर जी बाकी निघेल तिजबद्दल ती इंपीरिअल बँकेवर चेक देते व बँक ऑफ इंग्लंड ज्या तऱ्हेनें आपल्या पेढ्यांचा हिशोब ठेवून कर्ज निकालांत काढते त्याचप्रमाणें इंपीरिअल बँक आपणाकडे आलेल्या चेकांची व्यवस्था लावते.

हिंदुस्थानांत प्रमुख शहरांत हुंड्यांच्या अदलाबदलीनें चुकते झालेल्या हिशोबांचे आं.डे दाखविणारें कोष्टक.

(आंकडे कोटी रुपयांचे समजावे.)

वर्ष.	कलकत्ता.	मुंबई.	मद्रास.	कराची	रंगून.	एकूण
१९०० ...	१३९	६१	१२	...	...	२१२
१९०५ ...	१७५	१०९	१६	३	...	३०३
१९१० ...	२२२	१६७	२१	७	४८	४६५
१९१५ ...	३२३	१६७	१९	१३	४१	५६३
१९१६ ...	४८०	२४१	२५	१५	४८	८०९
१९१७ ...	४७२	३३६	२३	२०	५०	९०१
१९१८ ...	७४४	५३४	२५	२४	६९	१,३९६
१९१९ ...	९०२	७५८	३०	२२	८८	१,८०२

प्रकरण ६ वें.

पेढ्यांचा ताळेबंद.

पेढीच्या ताळेबंदाच्या बाबी:—आपण जर एखाद्या पेढीचा ताळेबंद (Balance Sheet) घेतला तर आपणास असें आढळून येतें कीं, त्याला दोन बाजू असतात. त्या बाजू म्हणजे पेढीला लोकांचें असलेलें देणें दाखविणारी बाजू (Liability side) व लोकांकडून येणाऱ्या रकमा व स्वतःची रोकड दाखविणारी बाजू (Assets side) ह्या होत. ह्या ताळेबंदात खालीं लिहिलेल्या बाबी असतात.

ताळेबंद.

देणें दाखविणारी बाजू.	रु. आ. पै	घेणें दाखविणारी बाजू.	रु. आ. पै.
(१) भांडवल— संकल्पित, देऊं केलेलें, वसूल झालेलें.		(१) रोकड तिजोरींतील	
(२) गंगाजळी ठेव.		(२) इतर पेढ्यांजवळ ठेवलेली रोकड.	
(३) भागीदारांना प्रत्येक भागामागें वांटावयचा नफा.		(३) हुकमी किंवा सूचना केली असतांना थोड्या वेळांत मिळणारी रक्कम.	
(४) नफातोटा दर्शविणाऱ्या तक्त्यांत आढळून आलेली बाकी.		(४) सरकारी तारणरोखे, वसाहत सरकारांनीं काढिलेले तारणरोखे, म्युनिसिपालिटीचे कर्जरोखे वगैरे खरेदी करण्यांत गुंतविलेला पैसा.	
(५) चालू, अनामत खातें व इतर खातीं.		(५) इतर तऱ्हांनीं म्हणजे व्यापारी कंपनीचे भाग विकत घेण्यांत गुंतविलेला पैसा.	
(६) भलावण (Letter of Credit) वगैरे.		(६) मनोतीनें पैसे कापून वटविलेल्या हुंड्या.	
(७) गिऱ्हाइकांकरितां सचकारलेल्या हुंड्या.		(७) गिऱ्हाइकांना अगाऊ दिलेली रक्कम.	
(८) वटविलेल्या हुंड्यांवरील अनुपभुक्त मनोति.		(८) पेढ्यांनीं आपल्या गिऱ्हाइकांकरीतां हुंड्या सचकारल्याबद्दल व त्यांवर शेरे मारण्याबद्दल त्यांना मिळणारें पैसे वगैरे.	

पेढीचें भांडवल व तिचे प्रकारः—पेढी जेव्हां आपला धंदा सुरू करते तेव्हां तिला लागणारा पैसा तिच्या वसूल झालेल्या भांडवलांतून व लोकांनीं ठेव म्हणून ठेवलेल्या रकमेंतून मिळत असतो. पेढीचें सर्वच भांडवल कांहीं वसूल झालेलें नसतें. प्रथम जेव्हां एखादी पेढी काढण्याचें कांहीं लोक ठरवितात तेव्हां त्यांचें कांहीं अधिकृत भांडवल म्हणून असतें. ह्याच भांडवलाचा कांहीं भाग भागीदार लोकांनीं भागाचे रुपानें विकण्याकरितां काढला म्हणजे तें संकल्पित भांडवल होतें व ह्या भांडवलपैकीं जेवढा भाग प्रत्यक्ष वसूल झालेला असतो त्याला वसूल झालेलें भांडवल असें नांव मिळतें. अधिकृत भांडवलाचा कांहीं भाग राखीव (Reserve) भांडवल म्हणून काढून ठेवलेला असतो व त्याचा उपयोग निर्वाणीचे वेळीं करावयाचा असतो.

हल्लीं प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत अशी एक चाल पडून गेली आहे कीं, पेढी काढणाऱ्या कंपनीचें भांडवल अमूक रकमेपर्यंत वसूल झाल्याशिवाय व दरवर्षी होणाऱ्या नफ्यातून भांडवलाच्या शेंकडा अमुक प्रमाणांत ठराविक रकम काढून ठेऊं असें वचन दिल्याशिवाय तेथील सरकारनें त्या कंपनीस पेढीचे व्यवहार सुरू करूं देऊं नयेत. पेढ्यांजवळ नेहमीं लोकांच्या ठेवी येणार तेव्हां त्यांचें जर कांहीं कारणांनीं दिवाळें निघालें तर ठेवीवाल्यांचें नाहक नुकसान होऊं नये अशा बुद्धीनेंच ही अट घालण्यांत येत असते.

पेढीच्या व्यवहारास सुरवात झाली म्हणजे तिचें वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी आणि तिला असलेलें लोकांचें देणें ह्यांत काय प्रमाण असावें हें हल्लीं कायद्यानें ठरलेलें नाहीं. महायुद्धापूर्वीचा इंग्लंडमधील पेढ्यांचा इतिहास जर आपण पाहिला तर हें प्रमाण सरासरी शेंकडा दहा असें असे. हिंदुस्थानांत सराफी पेढ्या हें प्रमाण पाळीत नाहींत. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, हें प्रमाण कायद्यानें ठरविलें जावें किंवा नाहीं? १९१३ सालीं हिंदुस्थानांत पेढया बुडण्याचें असें एक कारण झालें कीं, त्यांनीं थोड्या भांडवलांवर व गंगाजळीवर बरीच रकम कर्ज म्हणून घेतली. पेढयांनींच शहाणपणा करून अनुभवसिद्ध असें प्रमाण ठेवण्याचें निश्चित करणें हा उत्तम मार्ग होय; कारण ठेवीवाल्याचें नुकसान पेढयांच्या लोभमूलक धोरणानें होऊं देणें हें त्यांस श्रेयस्कर नाहीं.

गंगाजळी व पेढीच्या मालमत्तेशीं तिचे असलेलें प्रमाणः- गंगाजळी ठेव (Rest or Reserve Fund) ही एक ताळेबंदांतील

डाविकडील बाजूतील महत्वाची बाब असते. ह्या ठेवीमध्यें भागीदारांस न वांटलेला नफा व भागीदारांनीं आपल्या भागांवर भरलेले हप्ते ह्यांचा अंतर्भाव होतो. ही ठेव अडचणीचे वेळीं पेढ्यांकडे लोकांची जोराची मागणी सुरू झाली असतांना ती पुरविण्याकरितां निर्माण झालेली असते. कधीं कधीं एखादे वेळीं पेढ्यांस नफा चांगल्या प्रमाणांत होत नाहीं. त्या वेळीं ह्या ठेवींतून भागीदारांना नफा वांटला जातो पुष्कळ पेढ्या आपली गंगाजळी ठेव पहिल्या प्रतीचे तारणरोखे खरेदी करण्यांत गुंतवितात. कांहीं पेढ्या ह्या गंगाजळीशिवाय अदृश्य (Secret) गंगाजळी काढून ठेवीत असतात व त्या गंगाजळीचा उल्लेख ताळेबंदांत येत नाहीं. अशी गुप्त गंगाजळी भागीदारांच्या दृष्टीनें इष्ट नसली तरी ठेवीवाले व इतर पेढीचे गिऱ्हाईक ह्यांच्या दृष्टीनें पेढीला ती असणें फायदेशीर आहे.

गंगाजळी (Rest) व पेढीची एकंदर मालमत्ता (Assets) ह्यांच्यामध्यें काय प्रमाण असावें हें सांगणें जरा कठीणच आहे. तरी पण अनुभवांतीं हें प्रमाण शेंकडा पांच असलें पाहिजे असें ठरलें आहे. कांहीं पेढ्या ह्याहूनही जास्त रक्कम काढून ठेवितात; तेंसुद्धां वाईट नाहीं. गंगाजळी जितकी जास्त तितका जास्त नफा पेढ्यांस आपल्या भागीदारांस वाटतां येतो व त्यामुळें पढ्यांनीं काढिलेल्या भागांची बाजारांत किंमतही चांगली असते. कांहीं लोकांच्या मतानें गंगाजळी शेंकडा ५ ह्या प्रमाणांत ठेवणें फारसें फायदेशीर नाहीं कारण ह्या गंगाजळीचा जन्म भागीदारांच्या भागांपासून झालेला असतो आणि तिचा फायदा मात्र भावी पिढीला होणार; म्हणजे ' एकः करोति अन्यः उपभुक्ते ' अशांतलाच हा प्रकार होणार.ही विचारसरणी फारशी शास्त्रशुद्ध नाहीं.ह्या लोकांचें म्हणणें असें कीं, एवढी रक्कम गंगाजळी म्हणून अडकवून न ठेवतां त्या रकमेचा निम्मा भाग तरी भागीदारांत नफा म्हणून रोकडरूपानें वांटून द्यावा किंवा तशी रोकड द्यावयाची नसेल तर त्यांच्या भागांची किंमत तेवढ्या रकमेनें वाढवावी; किंवा हेंही पसंत नसेल तर तेवढ्या किंमतीचे नवीन भाग निर्माण करावे. पण नीट विचार केला तर हे तिन्ही मार्ग अनिष्टच आहेत असें आपणांस आढळून येईल. पहिल्या मार्गाचा अवलंब केला तर आजपर्यंत जी रक्कम किफायतशीर रीतीनें पहिल्या प्रतीचे तारणरोखे खरेदी करण्यांत पेढ्या गुंतवीत होत्या, तिच्या अर्ध्या रकमेला त्यांना मुकावें लागणार. एखाद्या वर्षीं पेढ्यांना नफा कमी झाला तर त्यांना आपल्या भागीदारांना कमी नफा वांटावा लागणार व त्यामुळें बाजारांत शेअरची किंमत उतरूं लागणार

व एकंदरींत पेढ्यांच्या सांपत्तिक स्थितीविषयीं लोकांचें प्रतिकूल मत विनाकारण होत जाणार. ह्या सर्व अनर्थपरंपरेस कारण काय तर भागीदारांची थोड्याशा नफ्याची हांव हें होय. अशा भागीदारांस 'अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन्विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्' असें कालिदासाच्या भाषेंत म्हटल्यास फारशी चूक होणार नाहीं. पेढीजवळ जितकी गंगाजळी जास्त असते तितकी तिची सांपत्तिक स्थिति जास्त समाधानकारक आहे, असा लोकांचा ग्रह होतो व त्यामुळें पेढ्यांचें गिऱ्हाइक वाढत असतें. हा फायदा कांहीं ल्हानसहान नव्हे.

बाकी राहिलेल्या दोन प्रकारांविषयीं हेंच म्हणतां येईल.भागांची किंमत वाढविल्यानें प्रत्यक्ष फायदा कोणाचाच होत नाहीं.आपण अशी कल्पना करूं कीं,एखाद्या पेढीनें आपल्या गंगाजळी ठेवींतून रकम काढून भागीदारांच्या भागांची किंमत १० रुपयांनीं अधिक वाढविली म्हणजे त्यांची मूळ किंमत जर १० रुपये असेल तर ती किंमत आतां वीस रुपये झाली. ह्या भागांवर पूर्वीं पेढीला शेंकडा ५ टक्के नफा होत असे; पण आतां ह्या गंगाजळीची निम्मी रकम भागीदारांच्या भागांची किंमत वाढविण्या-कडे खर्च करण्यांत यावी असें धोरण पेढीनें ठरविलें तर असा परिणाम होईल कीं, भागांची किंमत दुप्पट झाल्यामुळें व नफा तितकाच द्यावयाचा असल्यामुळें प्रत्येक भागावर आतां शेंकडा अडीच टक्केच नफा मिळणार; म्हणजे अशा उद्योगामुळें नफ्याचें प्रमाण अर्थातच कमी होणार व त्यामुळें पेढीच्या भागांची किंमत विना-कारण कमी होऊन तिची पत कमी होणार हें उघड आहे. तेव्हां नफ्यातोट्याचें प्रमाण एकच राहून गंगाजळी कमी केल्यामुळें होणारी आपत्ति मात्र कायम राह-णार. बरें तिसरा मार्ग स्वीकारल्यानें तरी हीच आपत्ति येणार आहे, म्हणजे प्रत्यक्ष भांडवल न वाढतां नवीन भाग निर्माण केले आहेत असें दाखवून पेढीला अर्था-तच पूर्वींपेक्षां कमी नफा वांटावा लागणार व त्यामुळें लोकांची पेढीबद्दल चुकीची समजूत झाल्यानें विनाकारण शेअरची किंमत सट्टेबाजारांत उतरूं लागणार. असो. सांगावयाचें तात्पर्य म्हणजे पेढीनें आपली गंगाजळी तिच्या एकंदर मालमत्तेच्या मानानें शेंकडा पांच इतकी तरी किमान मर्यादा म्हणून ठेवावी हें श्रेयस्कर आहे.

गंगाजळीनंतर बाकीच्या बाबी म्हणजे नफातोटा दाखविणारा तक्ता, चालू व इतर खात्यांवरील ठेवी व वटविलेल्या हुंड्यांवरील अनुपभुक्त मनोती ह्यांचा आपण आतां विचार करूं.

नफ्यातोट्याच्या तक्त्यांत दाखविलेली शिल्लकः—ह्या शिलकीचा अर्थ दर सहा महिन्यांनीं होणारा परंतु न वांटला जाणारा अतएव पुढच्या सहा महिन्यांत दाखविला जाणारा नफा असा होतो. ह्या नफ्याचा उपयोग एखादे वर्षी जर नफा कमी वांटण्याचा प्रसंग आला तर तो मागच्या वर्षातल्याइतका नफा देण्यास्तव गंगाजळी जास्त वाढविण्यांत केला जातो.

पेढ्या देशांत निर्माण झाल्या म्हणजे त्यापासून अनेक तऱ्हेचे फायदे होतात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं; पण त्यांचे जे आद्यप्रवर्तक असतात त्यांचा मूळ हेतु स्वतःला कांहीं आर्थिक लाभ व्हावा हाच असतो. पेढ्यांना अनेक कारणांनीं व अनेक मार्गांनीं नफा होत असतो. त्यांचा कारकून, नोकर वगैरे ठेवण्यांत जो खर्च होत असतो तो, त्यांनीं लोकांवर आकारलेल्या कमिशनच्या रूपानें निघून जातो. प्रत्येक पेढी आपल्या गिऱ्हाइकांचे हिशोब चोख ठेवल्याबद्दल त्यांचे मौल्यवान जिन्नस सुरक्षित ठेवल्याबद्दल, त्यांचे लोकांकडून मिळणारें कर्ज वसूल करण्याबद्दल व त्यांच्या शिलकीहून जास्त रक्कम कर्जानें घेण्याबद्दल, हुंड्या पटविण्याबद्दल, रोखे व शेअर विकण्याबद्दल व विकत घेण्याबद्दल कांहीं कमिशन नेहमीं आकारीत असतें.

पण पेढ्यांना नफा मिळविण्याचा राजमार्ग म्हटला म्हणजे आपलें भांडवल व गंगाजळी म्हणून काढून ठेवलेली जादा रक्कम लोकांना व्याजीं देणें हा होय. कमिशन व व्याज ह्यांत थोडासा फरक आहे. पेढी लोकांची कामगिरी करून जेव्हां तिचा मोबदला मागते तेव्हां त्याला कमिशन ही संज्ञा आहे; पण आपल्याजवळचें भांडवल जेव्हां लोकांना उसनें म्हणून ती देत असते तेव्हां त्याबद्दल मागितलेल्या मोबदल्याला व्याज हें नांव आहे. पण पेढ्यांनीं आपल्याजवळच्या भांडवलावरच लोकांना कर्ज देण्याचें ठरविलें तर त्यांना किती रक्कम कर्जानें देतां येईल हा प्रश्नच आहे; म्हणून पेढ्यांना लोकांच्या ठेवी स्वीकाराव्या लागतात. ह्या ठेवी जर दीर्घकाल मुदतीच्या असल्या तर त्यांवर पेढ्यांना कांहीं व्याज द्यावें लागतें व त्या ठेवी जास्त व्याजानें गुंतवून त्यांना आपला नफा मिळवावा लागतो. त्याचप्रमाणें ठेवींची रक्कम जर बरीच मोठी असली व ती जर दीर्घकाल मुदतीची म्हणजे निदान एका वर्षाची असली तर पेढ्यांना ठेवीवर जास्त व्याज देणें परवडतें. पण पेढ्यांनीं एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवावी, ती ही कीं, 'अर्थोहि

कन्या परकीय एव ' हें जसें कालिदासानें शकुंतलेविषयीं म्हटलें आहे, तेंच ठेवीविषयीं म्हणतां येईल. कांहीं झालें तरी कालांतरानें लोकांस त्या परत केल्याच पाहिजेत. तेव्हां त्या दीर्घकाल मुदतीच्या कर्जांत कधींहि गुंतवूं न देणें हें पेढ्यांचें नेहमींचें धोरण पाहिजे. हा नियम पाळल्यावर पेढ्या जितक्या जास्त प्रमाणांत लोकांकडून घेतलेल्या ठेवी व्याजीं लावतील तितका जास्त नफा त्यांना निश्चयानें होणारा आहे हें लक्ष्यांत ठेवून त्यांनीं आपला व्यवहार वाढवावा.

पण हा व्यवहार वाढवितांना त्यांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपला धंदा जितक्या जास्त प्रमाणांत आपण वाढवावा तितका तो जास्त धोक्याचाही पण आहे. इतर धंद्यांच्या मानानें पेढीच्या धंद्याचा हा विशेष आहे कीं, त्या धंद्यांत नफ्याचें प्रमाण फारच कमी असून त्यांत धोक्याचा मात्र अतिशय संभव असतो. मागें सांगितल्याप्रमाणें पेढ्या चालविणाऱ्या मॅनेजरांना कोणास कर्ज किती द्यावें, हें समजणें अत्यंत आवश्यक आहे. ' न कळतां पद अग्निवरी पडे, न करि दाह असें न कधीं घडे' हें जसें वामन पंडितांनीं अग्नीविषयीं म्हटलें आहे, त्याचप्रमाणें पेढीच्या मॅनेजरनें लोकांस दिले जाणाऱ्या कर्जाची गोष्ट आहे. भलत्याच माणसाला कर्ज दिलें गेलें कीं, पेढीला पश्चात्ताप झाल्याशिवाय कधींही राहणार नाहीं. तेव्हां हा धोका लक्षांत घेऊनच पेढ्यांनीं आपला व्यवहार लोकांच्या ठेवी जास्त प्रमाणांत स्वीकारून व शहाणपणानें कर्ज देऊन वाढवावा.

पण पेढ्यांनीं कितीही शहाणपणानें लोकांस कर्जानें रकमा दिल्या तरी कांहीं कुळें नाठाळ निघणारच व त्यांना दिलेल्या रकमा बुडीत सदरांत त्या पेढ्यांना काढाव्या लागणारच. ह्या बुडीत कर्जामुळें होणारें नुकसान हें एकच वर्षीं होत असतें असें नाहीं. अनुभवानें मॅनेजर दर वर्षीं शहाणा होतच असतो व पेढीला बुडविणारीं नवीन नवीन संभावीत कुळें त्याला जास्त जास्त शहाणपण शिकवीतच असतात. तेव्हां पेढ्यांना एखादे वर्षीं बुडीत कर्जामुळें कमी नुकसान आलें म्हणून त्यांनीं हुरळून न जातां त्यांचा जो दरवर्षींचा अनुभव असतो, त्याप्रमाणें आपल्या नफ्यातोट्याच्या तक्त्यांत ठरलेलीच रक्कम बुडीत कर्जाकरितां त्यांनीं राखून ठेवावी. व शिलकेंत दाखवून मग तो तक्ता तयार करावा.एखादे वेळीं जास्त रक्कम बाजूला काढल्यानें भागीदारांना कमी नफा वाटला गेला तरी हरकत नाहीं. कारण त्यांत धोका व नुकसान हीं तरी नसतात व भागीदारांनाही तितकी सुरक्षितता वाटत असते.

प्रत्येक पेढीनें आपल्या नफ्यातोट्याचा तक्ता तयार करतांना कांहीं गोष्टींचा स्पष्टपणें उल्लेख केला पाहिजे. उदाहरणार्थ, त्या तक्त्यांत तिनें आपला व्यवहार करीत असतांना झालेला प्रत्यक्ष नफाच दाखवावा;त्याचप्रमाणें नफा दाखवीत असतांना तो ठोक नफा आहे किंवा निव्वळ आहे किंवा मध्यंतरीय (Interim) आहे ह्याचा निर्देश करावा.प्रत्येक बाब अगदीं लहान मुलाला समजेल अशा रीतीनें तिचा उल्लेख केला म्हणजे लोकांना पेढीबद्दल विश्वास वाटतो. ह्या नफ्यातोट्याच्या तक्त्यावरून पेढीनें एका वर्षांत किती निव्वळ नफा मिळविला व आपल्या भांडवलांत किती भर घातली हें जर वाचकांस त्यांचे दृष्टीनें कळलें नाहीं, तर तो तक्ता फुकटच होणार.

चालू, ठेवीचें व इतर खातीं:--ताळेबंदांत असलेल्या ह्या बाबींमध्यें पेढीला ह्या तीन खात्यांवर असलेल्या लोकांच्या कर्जाचा समावेश होतो व त्यांतच हुंडीची मुदत भरण्यापूर्वींच तिचे पैसे मागितले गेले असतांनाच पेढ्यांनीं कापून घेतलेली कसर व बुडीत कर्जापासून होणारें नुकसान भरून काढण्याकरितां अलग काढून ठेवलेली रक्कम ह्यांचाही समावेश होतो.

सर्क्युलर लेटर व भलावणसारखीं पत्रें:—ह्यानंतरची बाब म्हणजे (Letter of credit) ह्यासारखीं पत्रें हीं होत. हीं पत्रें म्हणजे पेढीच्या पतीचेच प्रकार होत.सर्क्युलर नोटा पेढ्यांनीं आपल्या प्रवाशांच्या सोयीकरतां काढिलेल्या असतात.ह्या नोटा त्यांच्याजवळ असल्या म्हणजे त्यांना प्रवासांत मोठमोठ्या रकमा बाळगण्याची फारशी जरूरी नसते. ह्या पत्रांत लिहिलेल्या रकमेपर्यंत प्रवाशांना वाटेंत पेढ्यांच्या शाखांपासून किंवा इतर पेढ्यांपासूनही पैसे मिळू शकतात. मात्र ह्या नोटा मुदतीच्या असल्यामुळें त्या मुदतींतच त्या पेढ्यांच्या शाखांकडे किंवा ज्यांचा नामनिर्देश त्यांत केलेला असेल त्यांच्याकडे प्रवाशांनीं उपयोग जर केला नाहीं तर ज्या पेढ्यांनीं प्रथम त्या दिल्या असतील त्यांना त्या नोटांत लिहिलेली रक्कम परत करावी लागते.

पेढ्या जेव्हां अशा नोटा प्रवासी लोकांना देतात तेव्हां त्या लोकांना आपली सही लिहून द्यावी लागते व ही सही असलेला कागद (Letter of Indication) त्या नोटेबरोबरच जोडलेला असतो. ज्या ज्या वेळीं प्रवासी लोक ह्या सर्क्युलर नोटा ठरलेल्या पेढयांकडे घेऊन जातात त्या नोटेवर त्या त्या वेळीं तें सही करतात.

ही सही व नोटेबरोबर जोडलेल्या कागदांतील सही ह्या जर विसंगत नसतील तरच त्या लोकांना त्या पेढ्यांकडून पैसे मिळण्याचा संभव असतो. ह्या नोटांचा विशेष असा आहे कीं, भलावणांप्रमाणें त्या अवेचनीय नसतात व त्यामुळें सही असलेला कागद प्रवाशांना जपून अलग ठेवावा लागतो. कारण सर्क्युलर नोटा व सही असलेला कागद म्हणजे निदर्शक पत्र हीं दोन्हीं जर हरवलीं गेलीं व ज्याला तीं पुढें सांपडतील त्यांनीं त्या निदर्शक पत्रांतल्या सहीप्रमाणें सही गिरवून एकाद्या ठरलेल्या पेढीकडे ती नोट नेली व त्यावर तशीच सही उठवून दिली तर त्या पेढीकडून त्या खोटी सही करणाऱ्यांना सहज पैसे घेतां येतात व प्रवाशांना वाटेंत पैसे मिळण्याची पंचाईत पडते.

भलावण म्हणजे एका पेढीनें आपल्या शाखेस एका विशिष्ट माणसास ठराविक रक्कम देण्याविषयीं दिलेला हुकूम असतो. ह्या भलावणी अनेक प्रकारच्या असतात. कधीं कधीं ह्या भलावणींच्या आधारावर त्यांत लिहिलेल्या माणसाला रोख रक्कम मिळते किंवा ज्या पेढयांवर त्या दिलेल्या असतात, त्यांच्यावर त्या माणसाला त्या भलावणींत लिहिलेल्या मुदतीच्या व रकमेच्या हुंड्या काढतां येतात. ह्या भलावणींतही दोन प्रकार आहेत. शर्तीच्या व बिनशर्तीच्या भलावणी असे हे दोन प्रकार आहेत. हुंड्या बिनशर्त स्वीकारल्या जातील असें वचन जेव्हां त्या पेढयांकडून देण्यांत येतें तेव्हां त्या बिनशर्त भलावणी असतात; पण ज्या वेळीं भलावणी घेऊन येणारा माणूस आपण माल पाठविला आहे, हें सिद्ध करून दाखविणारे कागद घेऊन येईल, तेव्हांच आपण त्या मालांवर काढलेल्या हुंड्या स्वीकारूं अशी अट पेढया घालीत असतात, त्या वेळीं त्या हुंड्या शर्तीच्या असतात.

ह्या भलावणी बेचनीच नसल्यामुळें त्यांमध्यें ज्याचें नांव लिहिलें असेल, त्याजकडून त्या जर गमावल्या गेल्या व भलत्याच माणसानें चोरून पेढयांकडून आणून त्यांबद्दल पैसे घेतले तर त्या पेढया तोंडघशी पडतात. ह्या भलावणी मुदतीच्या व विशिष्ट रकमेच्या किंमतीच्या असल्यामुळें तितक्या रकमेपर्यंत व तेवढया मुदतीच्या आंतच त्या पेढयांकडे रुजू केल्या पाहिजेत; तरच त्यांचे पैसे मिळूं शकतात. ह्या भलावणींचा मुख्य उपयोग म्हणजे परदेशच्या व्यापाऱ्यांकडून माल मागविणारा व्यापारी व तो पाठविणारा व्यापारी ह्यांना त्या फारच सोयीच्या

असतात. आपण अशी कल्पना करूं कीं, मुंबईचा एक व्यापारी विलायतेहून माल मागवितो ह्या विलायतेच्या व्यापाऱ्याला जर असें खात्रीनें समजलें कीं, आपण ज्याला माल पाठवीत आहों तो मनुष्य भला असून त्याची एखाद्या प्रसिद्ध पेढी-जवळ चांगली पत आहे व तो तिच्यावर आपणास भलावण देऊं शकतो, तर आपले पैसे मिळण्याबद्दल त्याचें मन पूर्णपणें निर्धास्त राहूं शकतें. ह्या भलावणीचा दुसरा उपयोग म्हटला म्हणजे एका देशाहून दुसऱ्या देशाकडे माल पाठविण्यास ह्या भलावणीची आर्थिक मदत होऊं शकते. आपण अशी कल्पना करूं कीं, लंडनच्या व्यापाऱ्यानें मुंबईच्या व्यापाऱ्याकडे कांहीं माल पाठविला आहे. अर्थातच तो ह्या मालाबद्दल मुंबईच्या व्यापाऱ्यावर हुंड्या काढील. ह्या हुंड्या त्याच्या हातांत आल्या व त्यानें जर एखाद्या पेढीला एक हमीपत्र (Letter of Credit) लिहून दिलें व त्यांत लिहिलेल्या अटींप्रमाणें आपण हुंड्या स्वीकारूं व त्यांचे पैसे चुकत करूं, अशी खात्री करून दिली व तें हमीपत्र जर लंडनच्या व्यापाऱ्यां-कडे त्या मुंबईच्या पेढीकडून आलें तर तो व्यापारी लंडन येथील एखाद्या पेढीस तें दाखवून मुंबईच्या व्यापाऱ्यांवर काढिलेल्या हुंड्यांचे पैसे सहजच त्या पेढीकडून तत्काल घेऊं शकेल. अशा रीतीनें ह्या हमीपत्राच्या (व हमीपत्र हें एक प्रकारचें भलावणच होय.) जोरावर व्यापारी लोक पेढ्यांच्या मदतीनें आपला व्यापार चालवीत असतात. विलायतेची पेढी तेथील व्यापाऱ्यांस पैसे देण्यापूर्वी त्याज-कडून माल रवाना केल्याची रसीद वगैरे कागद जवळ घेऊन मग त्यास पैसे देते व योग्य वेळीं मुंबईच्या व्यापाऱ्यानें हुंड्या नाकारल्या तर हे कागद दाखवून ती विलायतेची पेढी तेथील व्यापाऱ्याचा माल विकून आपले पैसे वसूल करते व जर तेवढ्या पैशांनीं आपलें नुकसान भरून आलें नाहीं तर त्या व्यापाऱ्यांवर सरकार-दरबार करते. अशा तऱ्हेचा उपयोग व्यापाऱ्यांस ह्या भलावणीपासून होत असतो.

गिऱ्हाइकाकरितां पेढीनें सचकारलेल्या हुंड्याः—ही एक बाब ताळेबंदाच्या डावीकडील बाजूला असते. वर सांगितलेंच आहे कीं, मुंबईच्या व्यापाऱ्यानें हमीपत्र लिहून दिल्यावर त्याच्यावर काढिलेल्या हुंड्या विलायतेची पेढी स्वीकारते पण ह्या व्यवहारांत माल पाठविणारा गृहस्थ हा विलायतेचा तरी आहे. कधीं कधीं चीन देशांतला व्यापारी अमेरिकेंतल्या व्यापाऱ्याकडे रेशीम किंवा चहा पाठवून त्याबद्दलच्या हुंड्या लंडनच्या पेढीवर काढतो व तिजकडून पैसे वसूल करून घेतो. हल्लीं सर्व सुधारलेल्या देशांतील व्यापारी लंडनमधील पेढ्यांवर हुंड्या काढून आपण पाठविलेल्या मालाचे पैसे वसूल करितात.

असो. सांगावयाचें तात्पर्य म्हणजे हल्लीं बहुतेक पेढ्यांच्या ताळेबंदांत ह्या स्वीकारल्या गेलेल्या हुंड्यांची बाब महत्वाची असते. ह्या हुंड्या जेव्हां पेढ्या माल बाहेर पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांकरतां स्वीकारतात तेव्हां त्या त्या व्यापाऱ्यांना रोख पैसे क्वचितच देतात. पेढीच्या पतीवरच त्यांना पैसे इतरत्र मिळत असतात. पण अशा रीतीनें आपल्या पतीचा उपयोग केल्याबद्दल पेढी त्यांजकडून थोडेसें कमिशन आकारीत असते व हें कमिशन पेढीच्या उत्पन्नाची एक महत्वाची बाब असते.

आतां राहिली शेवटली बाब. ती बाब म्हणजे वटविलेल्या हुंड्यांवरील अनुपभुक्त मनोती. मनोती म्हणजे हुंड्यांची मुदत भरण्यापूर्वी त्यांचे पैसे व्यापारी पेढीकडे मागण्यास आले असतांना त्यांवर राहिलेल्या मुदतीवर कापून घेतलेलें व्याज होय. ज्या वेळीं पेढ्या मनोतीनें व्याज कापून हुंड्या वटवितात तेव्हां त्यांना मिळणारें व्याज त्या आपल्या नफ्यातोटयाच्या तक्त्यांत जमा म्हणून दाखवितात. पण हें व्याज हुंड्यांची मुदत पुरी होईपर्यंत अर्थातच त्यांना मिळत नाहीं. आपण अशी कल्पना करूं कीं, पेढीकडे एक हुंडी आलेली आहे. व तिची मुदत तीन महिन्यांची आहे. ती हुंडी नोव्हेंबरमध्यें काढलेली असून तिची मुदत जान्युआरी-अखेर पुरी होणार आहे. ती मुदत भरण्यापूर्वींच त्या हुंडीचे पैसे नोव्हेंबरअखेर तो हुंडी काढणारा मनुष्य मागावयाला आल्यामुळें पेढीनें पुढच्या दोन महिन्यांचें व्याज कापून घेऊन त्या हुंडीचे पैसे चुकते केले. आतां पेढ्यांची अशी चाल असते कीं, त्या आपला ताळेबंद दर सहा महिन्यांनीं तयार करीत असतात. तेव्हां वर्षअखेर तयार होणाऱ्या ताळेबंदांत जानेवारी महिन्याचें मिळणारें व्याज नफ्यातोटयाच्या तक्त्यांत खर्चाच्या बाजूला (Debit side) घालून पुढल्या वर्षाकरितां होणाऱ्या ताळेबंदांत दाखविण्याची पेढ्यांची वहिवाट आहे. हें जें जानेवारी महिन्याचें व्याज पेढीला अजून मिळावयाचें असतें त्यालाच वटविलेल्या हुंड्यावरील अनुपभुक्त मनोती (Rebate on bills discounted) अशी संज्ञा आहे. डिसेंबरअखेर तयार होणाऱ्या ताळेबंदांत फक्त नोव्हेंबर व डिसेंबर ह्या दोन महिन्यांचेंच मनोतीनें मिळालेलें व्याज दाखविलें असते; ही अनुपभुक्त मनोती नेहमीं देणें दाखविणाऱ्या बाजूकडे दाखविलेली असते. कारण पेढ्यांच्या हातांत तें मनोतीनें मिळणारें व्याज अजून पडावयाचें असतें.

आतांपर्यंत आपण पेढीचें देणें दाखविणाऱ्या बाजूचा विचार केला. आतां तिची स्वतःची मालमिळकत व लोकांकडून येणारी रक्कम दाखविणाऱ्या बाजूचा आपण विचार करूं. ह्या बाजूस असलेली पहिली बाब म्हणजे पेढीजवळ असलेली किंवा सर्वांच्या विश्वासास पात्र झालेली बँक ऑफ् इंग्लंड किंवा मुंबईस स्थापन झालेल्या इंपेरीअल बँक सारख्या पेढीजवळ ठेवलेली किंवा थोड्या मुदतींत किंवा हुकमी मिळणारी रक्कम ही होय. पेढीकडे व्यापारी आणीबाणीचे वेळीं एकदम जोराची मागणी सुरू झाली असतांना तिची मदार ह्या रोकडीवरच असते. ह्या रोकडीचें प्रमाण पेढीला असलेल्या देण्याच्या मानानें काय असावें ह्याचा पूर्वीच विचार केलेला असल्यामुळें त्या मुद्याबद्दल जास्त चर्चा करण्याचें कारण नाहीं.

सरकारी रोखे वगैरेः—ह्यानंतरची बाब म्हणजे हिंदुस्थान सरकारचे किंवा त्याची हमी असलेले तारणरोखे व इंग्लिश सरकार आणि वसाहत सरकार ह्यांचे तारणरोखे विकत घेण्यांत गुंतविलेली रक्कम ही होय. ह्या राजमान्य तारणरोख्याशिवाय म्युनिसिपालिटया, रेल्वे कंपन्या ह्यांनीं काढिलेले कर्जरोखे विकत घेऊनहि पेढ्यांना आपली रक्कम गुंतवितां येते. वर सांगितलेल्या रोकडीप्रमाणेंच नेहमींच्या प्रसंगीं पेढ्यांना ह्या तारण व कर्जरोख्यांवर ते विकून भिस्त ठेवतां येतें; पण एखाद्या युद्ध सुरू होणाच्या किंवा व्यापारी संकटाचे वेळीं ह्या रोख्यांची किंमत खाडकन् उतरून पेढ्यांना त्यांनीं गुंतविलेल्या रकमेपेक्षां कमी रक्कम स्वीकारावी लागते. तेव्हां निर्वाणीचे वेळीं ह्या तारणरोख्यांवर पेढ्यांनीं फारशी भिस्त ठेवूं नये हें बरें.

मनोतीनें पैसे कापून वटविलेल्या हुंड्याः—व्यापाऱ्यांनीं काढिलेल्या हुंड्या स्वीकारणें, त्या वटविणें व त्यांत पैसे गुंतवून आपला नफा मिळविणें हा पेढ्यांचा हल्लींच्या व्यापारी युगांत नित्यांतला धंदा होऊन बसला आहे. प्रॉमिसरी नोटांसारखे सरकारी तारणरोखे विकत घेऊन त्यांत पैसे गुंतविण्यापेक्षां ह्या व्यापारी हुंड्यांत गुंतविणें पेढ्यांना जास्त फायदेशीर असतें; कारण पहिल्याची किंमत कांहीं कारणानें उतरूं शकते, पण हुंड्यांची किंमत कधींहि उतरत नाहीं व हुंड्याची योग्यता बाजारांत चलन म्हणून सरकारी तारणरोख्यांपेक्षां जास्त असते. शिवाय हुंड्यांची मुदत कमीजास्त असल्यामुळें पेढ्यांना आपल्या सोयीप्रमाणें पैसे गुंतवितां येतात, व जरूरच पडली म्हणजे त्या विकून लोकांची पैशाची मागणी पुरी करतां येते.

ह्यानंतरची बाब म्हणजे लोकांना दिलेल्या कर्जाची रकम ही होय. पण ह्याचा विचार पूर्वी इतका झाला आहे, कीं त्या विषयावर जास्त लिहिणें कंटाळवाणें होईल. म्हणून त्याबद्दल जास्त चर्चा येथें आम्हां आतां करीत नाहीं.

हुंड्या सचकारल्याबद्दल किंवा त्यांवर शेरे मारल्याबद्दल पेढ्यांना मिळणारें कमिशनः—ह्यानंतरची बाब म्हणजे पेढीनें हुंड्या सचकारल्याबद्दल किंवा त्यांवर शेरे मारल्याबद्दल गिऱ्हाइकांनीं त्या पेढीचें द्यावयाचें देणें ही होय. मागें पेढीच्या ताळेबंदांतील ' गिऱ्हाईकांचे नांवावर सचकारलेल्या हुंड्या ' ह्या बाबीचा विचार करीत असतांना आम्हीं असें म्हटलें होतें कीं, एखाद्या व्यापाऱ्यानें आपला माल परदेशीं पाठविला व तो माल मागविणाऱ्या माणसांवर काढलेली हुंडी त्यानें स्वीकारली व त्या हुंडीवर शेरा मारला व हमीपत्र लिहून दिलें, म्हणजे त्या हमीपत्राच्या जोरावर तो माल पाठविणारा व्यापारी ज्या ठिकाणचा असेल त्याच ठिकाणची पेढी त्याला त्या हुंडीचे पैसे देते. आतां ज्याअर्थीं हे पैसे ती पेढी रोख न देतां आपल्या काढिलेल्या नोटांचें किंवा अन्य रूपानें देतें, त्याअर्थीं तेवढ्या रकमेपुरती ती पेढी त्या माणसाला जबाबदार रहाते. पण ही जबाबदारी पेढीनें स्वीकारण्याचें कारण म्हणजे ज्या माणसाला माल पाठविलेला आहे तो हुंडीच्या पैशाबद्दल आपल्याला जबाबदार आहे अशी तिची खात्री असते हें होय. म्हणून ताळेबंदांत डाव्या बाजूला हुंड्या स्वीकारल्याबद्दल जितक्या रकमेची जिम्मेदारी देणें म्हणून पेढी दाखविते, तितकीच रक्कम घेणें म्हणून दुसऱ्या बाजूला तिनें दाखविलेली असते, व तीच ही बाब होय.

प्रकरण ७ वें

समवायिक भांडवलाच्या पेढीचा कारभार.

खाजगी पेढी व समवायिक भांडवलाची पेढी ह्यांत तुलना

खाजगी पेढी व समवायिक भांडवलाची पेढी ह्यांमध्यें भागीदारांची संख्या, भांडवलाचा चिरस्थायीपणा व पेढीची व्यवस्था पाहणाऱ्या अधिकारीवर्गाची रचना

ह्या बाबतींत फरक असतो. खाजगी पेढ्यांत भागीदारांची संख्या मर्यादित असते तशी दुसऱ्या प्रकारच्या पेढीमध्यें नसते. खाजगी पेढीमध्यें एखादा भागीदार मेला किंवा नादार झाला तर त्याचें भांडवल पेढींतून काढून घेतां येतें; पण समवायिक भांडवलाच्या पेढीमध्यें त्या माणसाचें भांडवल विभागलें जाऊन एकंदर भांडवल तसेंच राहतें. खाजगी पेढींत सर्वच भागीदार पेढीचा व्यवहार पाहूं शकतात; पण दुसऱ्या प्रकारच्या पेढीमध्यें तिची व्यवस्था डायरेक्टर लोकांचे हातीं असते. असो; ह्या ठिकाणीं आपणांस फक्त समवायिक भांडवलाच्या पेढीचाच विचार कर्तव्य आहे.

समवायिक भांडवलाच्या पेढ्यांचें भांडवलः—जितक्या पेढ्या समवायिक भांडवलाच्या असतात त्यांचें कांहीं भांडवल प्रत्यक्ष वसूल झालें असतें. असें कांहीं भांडवल प्रत्यक्ष वसूल झालें म्हणजे नवीन पेढीचा व्यवहार सुरू करणाऱ्या पेढीला लोकांना असें सिद्ध करून देतां येतें कीं, आपण खरोखरच हा व्यवहार सुरू करणार आहों. पेढीचें भांडवल मुळांतच कमी असलें तर पेढीचे भागीदार थोडे राहून डायरेक्टर लोकही थोडे राहतील, व त्यामुळें त्यांना चांगली व्यवस्थाही पाहणें कठीण जाईल. इतकेंच नव्हे तर पेढीला फारसें कामही करतां येणार नाहीं. उलटपक्षीं हेंच भांडवल जर अतिशय असेल तरीसुद्धां पेढीला नुकसान होण्याचा संभव आहे. कारण सर्वच भांडवल धंद्यांत गुंतवितां येत नसल्यामुळें जास्त व्याज मिळावें ह्या आशेनें डायरेक्टर लोक धाडसपणाच्या व्यवहारांत कांहीं भांडवल गुंतवूं लागतील किंवा सट्टेबाजीचा व्यवहार सुरू करतील. तसेंच बाजवीहून जास्त भांडवल उभारलें गेल्यामुळें व तें जादा भांडवल सट्टेबाजींत न गुंतविण्याचें ठरल्यामुळें पेढीस मुनाफा कमी द्यावा लागतो. कारण तें भांडवल रिकामें पडून राहिलेलें असतें. मुनाफा कमी मिळाल्यामुळें भागीदारांची निष्कारण निराशा होते व पेढीची पतही कमी होते. तेव्हां भांडवल फार कमीही असूं नये, फार जास्तही असूं नये. त्याचप्रमाणें पेढीच्या व्यवहारांत फार नफा झाल्यामुळें तो सर्वच नफा भागीदारांत वांटून देणें धोक्याचें असतें. कारण त्या भागीदारांना आपले भाग विकून नवीन पेढ्या काढण्याचा मोह उत्पन्न होतो; म्हणून धंद्यांत नफा जास्त झाला असतांना तो भांडवल वाढविण्यांतच खर्च करणें हें जास्त श्रेयस्कर आहे.

पेढीचें भांडवल व तिचें लोकांना असलेलें देणें ह्यांमध्यें काय प्रमाण असावें हें ठरविणें जरा कठीणच आहे. ज्या वेळीं एखादी पेढी आपणांस झालेल्या नफ्यांतून जास्त नफा भागीदारांस वांटून देतें त्या वेळीं आपण खास समजावें कीं, त्या पेढीचें भांडवल धंद्याला पुरेसें नाहीं. आपण सामान्यपणें असा नियम लक्षांत ठेवला पाहिजे कीं, पेढीचें जितकें भांडवल जास्त असतें तितकें नफा देण्याचें प्रमाण कमी असतें; म्हणून पेढीला लोकांच्या ठेवी वगैरे स्वीकारल्यानें त्यांचे जें देणें होत असतें, तें नेहमीं भांडवलापेक्षां जास्त असावयास पाहिजे. एखादे वेळीं जास्त भांडवल पेढीजवळ असल्यामुळें तिला जास्त नफाही द्यावा लागतो. ह्याचें असें कारण आहे कीं,ह्या जास्त भांडवलाच्या जोरावर पेढीला आपला धंदा मोठ्या प्रमाणांत वाढवितां येतो, लोकांत जास्त विश्वास उत्पन्न करतां येतो व त्यामुळें श्रीमंत व वजनदार लोकांच्या रकमा वापरतां येऊं लागतात.

एखाद्या पेढीचा व्यवहार सुरळीत चालला असतांना तिला जर आपलें भांडवल वाढविण्याचा प्रसंग पडला तर तिला तें भांडवल दोन प्रकारांनीं वाढवितां येतें. पहिला प्रकार म्हटला म्हणजे आपल्या भागांची संख्या वाढविणें व दुसरा प्रकार म्हणजे त्यांची किंमत वाढविणें. म्हणजे एखादा भाग पूर्वी १०० रुपयांचा असला तर तो आतां १२५ रुपयांचा करणें. हे दोन्ही मार्ग चांगले असून सोयीप्रमाणें पेढ्यांनीं दोघांपैकीं एक मार्ग स्वीकारावा. एखादी पेढी जेव्हां अस्तित्वामध्यें येते, तेव्हां किती भाग विकावयाला काढावयाचे हें पेढीचे डायरेक्टर ठरवितात व ती संख्या ठरल्यावर कांहीं विवक्षित संख्येपर्यंत भाग खपले म्हणजे पेढीच्या व्यवहारास सुरुवात होते. सर्वच भाग खपल्यावर मग पेढीनें धंदा सुरू करावा,असा सरकारनें जर नियम केला तर पेढीला आपल्या भागांची संख्या मुळापासूनच मर्यादित करावी लागेल व त्यामुळें धंद्याला चांगलें यश येणार नाहीं. शिवाय पुष्कळ लोक एखादी पेढी यशस्वी होते किंवा नाहीं हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय तिचे भाग घेण्याचें धाडस करीत नाहींत. अशा लोकांकरितां तरी निदान कांहीं भाग शिल्लक ठेवलेच पाहिजेत. मग त्यांनीं वाटेल तर आपल्या पेढीची भरभराट होत असल्यामुळें ते भाग जास्त किंमतीनें विकावे. त्याचप्रमाणें एकदा भाग विकले गेल्यावर त्या भागांची किंमत हप्त्याहप्त्यांनीं भागीदारांकडून मागून घेण्याची सवलत डायरेक्टर लोकांना असली पाहिजे आणि इंडियन कंपनी ॲक्टनें कंपनीचे भाग निदान तीन हप्त्यां-

पेक्षां कमी हप्त्यांनीं घेऊं नयेत असें ठरलें आहे. सर्वच रक्कम एकदम मागण्यांत यावी असा जर नियम करण्यांत आला तर एकंदर भागीदारांस सर्व रक्कम देणें जड जाईल व अडीअडचणीच्या वेळीं कांहीं भांडवल आपणांस हक्कानें गोळा करतां येईल, अशी डायरेक्टरांची खात्री असल्यानें पेढीला कांहीं आपत्ति आली असतांना तिला चटकन् सुरक्षितपणें पार पडून जाण्याचा फायदा असा नियम केल्यानें मिळणार नाहीं.

पेढीचे डायरेक्टर व त्यांचीं कर्तव्यें:—पेढ्यांची व्यवस्था भागीदारांनीं निवडून दिलेल्या डायरेक्टरांच्या हातांमध्यें असते व हे डायरेक्टर लोक भागीदार लोकांतूनच घेतलेले असतात व जे लोक अमुक एक संख्येपर्यंत पेढीचे भाग विकत घेतील तेच लोक डायरेक्टर होण्यास लायक आहेत असें ठरलेलें असतें; पण डायरेक्टर होण्यास नुसती भागांची संख्याच उपयोगी नसते. त्याला इतरही गुण अंगीं असावे लागतात. उदाहरणार्थ, प्रत्येक डायरेक्टर होऊं इच्छिणाऱ्या माणसानें लोकांचा विश्वास संपादन केला पाहिजे; तरच लोक आपले पैसे ह्या पेढीमध्यें ठेवतील. त्याचप्रमाणें त्याला पेढीच्या धंद्याची प्रत्यक्ष माहिती यथासांग पाहिजे. ही अट फारच महत्त्वाची आहे. ती बरोबर रीतीनें न पाळली गेल्यामुळें हिंदुस्थानांत १९१३ सालीं बऱ्याच पेढ्या नामशेष झाल्या. त्याचप्रमाणें पेढीचा डायरेक्टर हा सचोटीचा व निःपक्षपाती मनुष्य पाहिजे. ही अट सुद्धां फारच महत्त्वाची आहे. डायरेक्टरनें पेढीच्या भांडवलावर अनीतीनें कधींही व्यापार करूं नये किंवा पेढीची माहिती यथासांग असल्यामुळें त्यानें ज्यामुळें इतर भागीदारांचें नुकसान होण्याचा संभव आहे असा त्या माहितीचा कोठेंही उपयोग करूं नये. रोगी किंवा एखादें कुळ ज्याप्रमाणें विश्वासानें एखाद्या डॉक्टरला किंवा वकिलाला माहिती पुरवितें व त्या माहितीचा दुरुपयोग तो डॉक्टर किंवा वकील करणार नाहीं, अशी ज्याप्रमाणें त्या माणसाची अपेक्षा असते, त्याचप्रमाणें भागीदारांची डायरेक्टराबद्दल अपेक्षा असते.

पेढीचा डायरेक्टर हा ज्या भागांत ती पेढी असेल त्या भागांतील लोकांमध्यें वजनदार व प्रतिष्ठित मनुष्य पाहिजे. कारण तो तसा असला म्हणजे पेढीची मानमान्यता वाढून इतर लोकांची मदतही त्या पेढीला मिळूं लागते. त्याचप्रमाणें त्या डायरेक्टरची सांपत्तिक स्थितीही चांगल्या प्रकारची पाहिजे व प्रत्येक पेढीच्या

भागीदारांनीं असा कडक नियम केला पाहिजे कीं, कोणीही डायरेक्टरनें आपल्या नांवावर असलेल्या शिलकेहून जास्त रकमेचा चेक पेढीवर देतां कामा नये. आपण पेढोचे डायरेक्टर आहोंत, आपणास वाटेल तेवढी रक्कम पेढीकडे मागण्यास हक्क आहे, अशी भ्रामक कल्पना ह्या डायरेक्टरची होऊन बसली म्हणजे पेढीचे बाराच वाजले म्हणून समजावें.

पेढाच्या व्यवस्थापकमंडळांत एखाद्याची नेमणूक झाली म्हणजे त्याचें हें मुख्य काम आहे आहे कीं, त्यानें पेढीच्या व्यवहाराची खडानखडा माहिती करून घेतली पाहिजे, मंडळाच्या प्रत्येक सभेला हजर राहिलें पाहिजे व पेढीच्या व्यवहारांवर सूक्ष्म नजर ठेवली पाहिजे. नुसते डोळे मिटून सभेला हजर रहावयाचें व हजर रहाण्याबद्दल पेढीकडून पैसे उपटावयाचे व अंधळेपणानें डायरेक्टरांच्या मंडळांपैकीं जे एक दोन लटपटे डायरेक्टर असतील त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकून मुकाट्यानें सह्या करावयाच्या अशी जी स्थिति मुंबईच्या पेढयांमध्यें कांहीं डायरेक्टरांची दिसून आली ती स्थिति केव्हांही पेढीच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट नाहीं. तसेंच पेढीच्या व्यवस्थापकमंडळांत जे डायरेक्टर नेमावयाचे ते फार वृद्धही उपयोगी नाहींत व अगदीं तरणेबांडही उपयोगी नाहींत. फार म्हातारपणामुळें बुद्धीला मांद्य येतें व नवीन नवीन कल्पना व मार्ग पटत नाहींत. तारुण्यामुळें बुद्धि अनुभवशून्य व चंचल असते. तेव्हां डायरेक्टर लोक हे मध्यम वयाचे असलेले बरे हें उघड आहे.

डायरेक्टर लोकांनीं वर्षांतून निदान एकदा आपल्या पेढीच्या व तिच्या शाखांच्या हपीसांत जाऊन तेथें कामकाज चालेलें असतांना भेट द्यावी व तेथील रोकड, तारणरोखे व बाकीचे सर्व हिशोब तपासून पहावे. अशा भेटीपासून मुख्य पेढीचा व तिच्या सर्व गिन्हाइकांचा पुष्कळ फायदा होतो. पहिला फायदा म्हणजे आपले गिन्हाइक आहे तरी कोण, त्यांची सांपत्तिक स्थिति काय आहे व त्यांचे व्यवसाय कोणते आहेत ह्या सर्व महत्वाच्या बाबींची पेढीला माहिती होते व गिन्हाइकांनाहि आपले हिशोब डायरेक्टरांनीं पास केल्यामुळें आपली सांपत्तिक स्थिति त्यांची खात्री पटविण्यासारखी आहे हें समजून आल्यामुळें आनंदच वाटेल. दुसरा फायदा म्हणजे पेढीचे नोकर व डायरेक्टर ह्यांच्या प्रत्यक्ष भेटीनें एकमेकांस माहिती होऊन विचारविनिमय होतो व आपल्या नोकरांपैकीं कोण हुषार आहेत, कोण कामचुकार आहेत ह्या

बद्दल माहिती होऊन त्या नोकरांच्या अंगच्या गुणांचें चीज करण्यास डायरेक्टर लोकांस शक्य होतें. व नोकर लोकांनाहि आपण काळजीनें व हुशारीनें पेढीचें काम केल्यास आपल्या मेहनतीचें चीज होईल अशी खात्री असल्यानें दुप्पट उमेदीनें काम करावेंसें वाटतें; शिवाय जे चुकारतट्टू असतील त्यांच्यावर धाक बसून तेही आपले काम नीटपणें करूं लागतात.

कांहीं लोकांच्या मतानें डायरेक्टर लोकांच्या बोर्डांत नेहमीं नवीन नवीन ताज्या रक्ताच्या लोकांची भरती करावी व जुन्या लोकांना जाण्यास सांगावें किंवा दर वर्षी नवीन निवडणूक करून नवीन तरण्याबांड लोकांचा प्रवेश बोर्डांत करून घ्यावा. पण हें त्याचें करणें बरोबर होणार नाहीं. कारण अननुभवी माणसांच्या हातांत पेढ्यांचीं सुत्रें गेल्यानें नुकसान होणार. शिवाय पेढ्यांचे कांहीं डायरेक्टर वार्धक्यामुळें म्हणा, आजारीपणामुळें म्हणा किंवा अन्य कारणांनीं म्हणा जात असतातच; त्यांच्या जागीं नवीन लोक घेतले म्हणजे झालें. नवीन व जुन्या डायरेक्टरांची सरमेसळ झाली म्हणजे पेढीच्या कारभारांतला एकसूत्रीपणा नाहींसा होतो व त्यामुळें धोरण अनिश्चित राहून घोंटाळा उत्पन्न होतो म्हणून ही सूचना बरी नाहीं.

पेढीचा मॅनेजर व त्याचीं कर्तव्यें:—समवायिक भांडवलाच्या पेढ्यांमध्यें एक मॅनेजर नांवाचा मुख्य अधिकारी असतो. हा अधिकारी जर प्रामाणिक व सततोद्योगी असेल तरच पेढीचें काम बिनबोभाट चालेल. पेढीचे जे डायरेक्टर असतात त्यांच्यामध्यें व ह्या मॅनेजरमध्यें पूर्ण विश्वास व परस्पराविषयीं आदरबुद्धी पाहिजे. तसें नसेल तर त्या मॅनेजरला हौसेनें, उत्साहानें व खुल्या दिलानें डायरेक्टर लोकांशीं पेढीच्या व्यवहारांबद्दल चर्चा येणार नाहीं व पेढीचे जे भिन्हाईक असतील त्यांच्याशीं अधिकारयुक्त वाणीनें बोलतां येणार नाहीं.

पेढीचे डायरेक्टर व मॅनेजर ह्यांच्यामध्यें मोठा नाजूक संबंध असतो. मॅनेजर आपलं काम प्रामाणिकपणें करीत असतांना त्याला असं वाटत असतें कीं, आपण पूर्णपणें स्वतंत्र असून आपणावर कोणाचीही पहाणी असतां कामा नये. ती पहाणी जर आपण वर असेल व डायरेक्टर आपणास हुकुम करूं लागले तर आपणांवर त्यांचा विश्वास नाहीं असाच त्याचा अर्थ होतो. वास्तविक पाहिले असतां ही विचारसरणी बरोबर नाहीं. मनुष्यस्वभावच असा आहे कीं, आपण कोणाचे तावेदार आहों व आपणांस कोणी आपल्या कामाबद्दल जबाब विचार-

णार आहे अशी मनाची समजूत असल्याशिवाय मनुष्य नेटानें काम करीत नाहीं. तेव्हां डायरेक्टर लोकांची मॅनेजरच्या कामावर देखरेख असली व त्यांच्या दृष्टीनें एखादे वेळीं मॅनेजर चुकला असतांना जर त्यांनीं हुकूमवजा सूचना केल्या तर त्यामुळें मॅनेजरचें स्वातंत्र्य नष्टच झालें असें मानण्याचें कारण नाहीं. डायरेक्टर लोकांनींहि हें लक्षांत ठेवावें कीं, आपण पूर्ण विचारांतीं ज्याला एकदां मॅनेजर नेमलें त्याला त्याच्या कामांत पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवणें हेंच श्रेयस्कर आहे. त्याचप्रमाणें त्याची धार्मिक, सामाजिक व राजकीय मतें कशींहि असलीं तरी जोंपर्यंत कामांत तो चोख आहे तोंपर्यंत त्याला बोलण्याचें आपलें काम नाहीं; पण त्याची नित्याची राहणी त्याच्या पगाराच्या मानानें जर जास्त छानछोकीची व डामडौलाची असली तर त्याच्यावर त्यांनीं बारीक नजर ठेवली पाहिजे व तो मॅनेजर म्हणून जर पेढीच्या पैशाचा दुरुपयोग करीत असेल तर त्याला कामावरून तात्काळ दूर केलें पाहिजे. असो. सांगावयाचें तात्पर्य असें कीं, मॅनेजर व डायरेक्टर ह्यांच्यामध्यें पूर्ण विश्वास व सलोखा पाहिजे. पेढीचे डायरेक्टर पेढीसंबंधानें जे नियम करतात ते सर्वच मॅनेजर तैलबुद्धीचे नसतात म्हणून करीत असतात. तेव्हां एखाद्या चलाख बुद्धीच्या मॅनेजरास हे नियम जाचक असले तरी एकंदरींत पेढीच्या दृष्टीनें हे नियम मार्गदर्शक म्हणून असलेले बरे.

मॅनेजरचा संबंध नेहमीं तीन प्रकारच्या लोकांशीं येतो. हे तीन प्रकारचे लोक म्हटलें म्हणजे डायरेक्टर लोक, पेढीचे गिऱ्हाईक व पेढींतील इतर नोकर लोक हे होत. ह्या तिन्ही प्रकारच्या लोकांशीं त्याला निरनिराळ्या प्रकारांनीं वागावें लागतें. गिऱ्हाइकांशीं वागतांना त्यांच्याशीं पेढीच्या हिताच्या दृष्टीनें पण गोड शब्दांत बोललें पाहिजे. डायरेक्टर लोकांशीं स्पष्ट व सभ्य अशा शब्दांत त्यानें बोललें पाहिजे व नोकर लोकांशीं मनमिळाऊ व प्रेमळ वृत्तीनें आचरण केलें पाहिजे.

वाचकांस यावरून कळलेंच असेल कीं, मॅनेजरची जागा ही मोठ्या योग्यतेची, पगाराची व मानाची आहे. त्याचप्रमाणें ती जबाबदारीची असून बरीच धोक्याचीही आहे. अशा जागेवर जो मनुष्य नेमावयाचा तो त्या जागेला सर्वस्वीं लायक असाच असला पाहिजे. तो सर्व बाजूंनीं बघणारा, सरळ वृत्तीचा, खुल्या दिलाचा, पेढीच्या कार्यांत निष्णात, पोक्त, विचारी व कल्पनाबुद्धीचा

असून आपल्या धंद्यांत सर्वस्वीं निपुण असा असला पाहिजे, व त्यानें आपल्या धंद्याला सर्वस्वीं वाहून घेतलें पाहिजे. ह्याचा अर्थ असा करावयाचा नाहीं कीं, त्यानें फावल्या वेळांत इतर विषयांचा हौसेनें व्यासंग करूंच नये. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, अन्य रीतीनें जास्त पैसे मिळविण्याकरितां त्यानें इतर उद्योग करूं नयेत. मॅनेजरला जर सर्वांत महत्वाचा गुण संपादन करावयाचा असेल तर तो हा कीं, स्वतः लोकांशीं बेताबातानें व सावधपणानें वागून प्रत्येक प्रसंगीं कसें वागावयाचें हें चटकन् मनाशीं ठरवून त्याप्रमाणेंच त्यानें वागलें पाहिजे. हा गुण कांहीं एकदम अंगीं येत नाहीं. त्याचप्रमाणें तो प्रत्येकाच्या अंगीं उपजत असतोच असेंही म्हणतां येत नाहीं. तरीपण शक्य त्या उपायांनीं हा गुण संपादन करणें हें प्रत्येक मॅनेजरचें कर्तव्य आहे.

पेढीच्या मॅनेजरच्या अंगीं दुसरा महत्वाचा गुण म्हणजे पूर्ण सचोटी असणें हा होय. मॅनेजरच्या हातांतून लाखो रुपयांची उलाढाल नेहमीं होत असते व अनेक लोकांशीं त्याला पेढीचे व्यवहार करावे लागतात. तेव्हां हे व्यवहार व ही उलाढाल करीत असतांना आपण दिलेल्या पैशाचा उपयोग हे लोक शास्त्रशुद्ध धंद्यांतच करीत आहेत ही खातरी करून घेऊन मग त्यानें त्यांच्याशीं संबंध ठेवावा. त्याचप्रमाणें हे व्यवहार करीत असतांना आपलें मन निर्मळ ठेवूनच त्यानें लोकांशीं वागावें. अमका गृहस्थ मुसलमान आहे किंवा समाजसुधारक आहे किंवा नेमस्त पक्षाचा आहे असले वैयक्तिक विचार मनांत बाळगून मग लोकांस पैसे देणें ही चूक आहे. मॅनेजरला पेढीचे व्यवहार करतांना भगवद्गीतेंत म्हटल्या प्रमाणें ' विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ' ह्या तत्त्वाप्रमाणें शत्रुमित्र, सगेसोयरे ह्यांच्याशीं समदर्शी असलें पाहिजे. एखादा मित्र असून त्याची पत जर चांगली नसेल व एखादा वैरी असूनहि तो जर शुद्धशीलाचा असेल तर मित्राला बाजूला सारून पेढीचें हित साधण्याकरितां त्यानें शत्रूलाच रक्कम दिली पाहिजे. तात्पर्य, पेढीच्या व्यवहारांत मनोविकारांना बिलकूल थारा देण्यांत येऊं नये, कारण येथें पैशाचा प्रश्न आहे.

वर सांगितल्याप्रमाणें तिसरा गुण म्हणजे सावधपणा व जागरूकता हा होय. पेढीच्या गिऱ्हाइकांची सांपत्तिक परिस्थिति नेहमीं बदलत असते; तेव्हां त्यांचे हिशोब कशा प्रकारचे आहेत, ते हुंड्या कशा प्रकारच्या आणतात वगैरे

गोष्टींवर मॅनेजरची बारीक नजर पाहिजे; तशी नजर न ठेवतां तो वाटेल त्या माणसास कर्ज देत सुटला तर पेढीचें लवकरच दिवाळें निघेल. तात्पर्य, एक वेळ लोकांनीं त्याला फाजील दक्ष म्हटलं तरी पुरवेल; पण त्याचे अंगीं यत्किंचितही बेसावधपणा असतां कामा नये व पेढीचा पैसा म्हणजे आपलाच पैसा असें समजून त्यानें व्यवहार केला पाहिजे.

पेढीच्या शाखा व त्यांमुळें होणारे फायदे:—कांहीं समवायिक भांडवलाच्या पेढ्या आपला व्यवहार वाढवून इतर ठिकाणीं आपल्या शाखा उघडीत असतात. ह्या पेढ्यांचं मुख्य हपीस एखाद्या मुंबईसारख्या शहरामध्यें असतें व त्या पेढ्यांच्या शाखा निरनिराळ्या जिल्ह्यांच्या गांवीं असतात. प्रत्येक समवायिक भांडवलाच्या पेढीच्या अशा शाखा असल्या म्हणजे त्या पेढीला अनेक मार्गांनीं फायदा होत असतो. पहिला फायदा असा कीं, ह्या शाखा स्थापन झाल्यानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसा फार सुलभ रीतीनें व फार थोड्या वेळांत पाठवितां येतो; व त्यामुळें ह्या दोन ठिकाणीं व्यापाराची वाढ झपाट्यानें होते.

दुसरा फायदा असा कीं, ज्या ठिकाणीं एखादी स्वतंत्र पेढी, गांव लहान असल्यामुळें, चालणें शक्य नसतें, त्या ठिकाणीं ही शाखा स्थापन केली म्हणजे तिला खर्च कमी येत असल्यामुळें ती सहज चालूं शकते व तेथील लोकांना पेढी असण्यापासून होणारे फायदे मिळतात. लहान पेढी असली म्हणजे निराळें डायरेक्टरांचें मंडळ नको, तिला मोठ्या पगाराचा मॅनेजर नको व फारशी रोकड जवळ बाळगावयास नको. कारण प्रसंग पडला तर पेढीच्या मुख्य हपीसांतून हवी तेवढी रकम वाटेल तेव्हां त्या शाखेला मागवितां येते. अशा कारणांनीं लहान शाखेची पेढी असली म्हणजे तिला खर्च फारसा येत नाहीं व ती एखाद्या लहानशा जिल्ह्याच्या गांवांत चालूं शकते.

तिसरा फायदा म्हटला म्हणजे मुख्य पेढीचें भांडवल योग्य रीतीनें वांटलें जाणें सुलभ होतें. कांहीं पेढ्यांचें भांडवल त्यांच्या जरूरीपेक्षां जास्त असतें, म्हणजे जितकी रकम त्या पेढ्यांना कर्जामध्यें व मनोती कापून हुंड्या वटविण्यामध्यें गुंतवितां येते तिजपेक्षां जास्त रकमेचें भांडवल त्यांचेजवळ असतें; तसेंच कधीं कधीं कांहीं पेढ्यांजवळ त्यांना लागणाऱ्या भांडवलापेक्षां त्यांच्याजवळ जमलेलं भांडवल हें अपुरें असतें. अशावेळीं त्यांना आपला धंदा कमी प्रमाणांत

करावा लागतो. ह्या दोन प्रकारच्या पेढ्या एकाच ठिकाणीं आपला व्यवहार करीत असल्या व त्यांचा परस्परांशीं जर सलोख्याचा संबंध नसला तर दोघांचेंहि नुकसान होण्याचा संभव असतो. तेव्हां अशा प्रकारच्या पेढ्या असण्यापेक्षां एक मुख्य पेढी एखाद्या व्यापारी शहरांत असली व तिच्या शाखा सर्वत्र पसरलेल्या असल्या म्हणजे मुख्य पेढीला आपल्या शाखांना हवा तेवढा पैसा पुरवितां येतो व त्या शाखांजवळ जर जास्त रकम सांचली तर ती त्यांना मुख्य पेढीकडे पाठवितां येते. त्याचप्रमाणें लहान लहान स्वतंत्र पेढ्या असण्यापेक्षां एक मुख्य पेढी व तिच्या शाखा असणें ही पद्धत खर्चाच्या व व्यवस्था पाहण्याचे दृष्टीनें सोयीची असते. मुख्य पेढीच्या मॅनेजरला दर आठ दिवसांनीं एकदां भेट देवून ह्या शाखांवर उत्तम प्रकारें नजर ठेवतां येते; मात्र ही पद्धत यशस्वी होण्यास पेढीचें भांडवल जास्त प्रमाणांत वसूल झालें पाहिजे; त्याचप्रमाणें तें भांडवल नेहमीं खेळतें राहिलें पाहिजे व डायरेक्टरांची पहाणी व शिस्त जास्त कडक पाहिजेत. ह्याचें कारण असें कीं, लोकांचा विश्वास जर कांहीं कारणानें उडाला तर मुख्य पेढीवर व तिच्या शाखां-वर एकदम लोकांची मागणी सुरू व्हावयाची व अशा वेळीं खेळती व रोख रकम हातीं असणें आवश्यक असतें. त्याचप्रमाणें शिस्त जास्त कडक असण्याचें असें कारण आहे कीं, जितक्या मुख्य पेढीच्या शाखा जास्त, तितक्या त्या शाखांचे दुय्यम मॅनेजर जास्त असतात. हे सर्वच मॅनेजर कांहीं सारखे हुशार व व्यवहारदक्ष नसतात; त्यामुळें ह्या दुय्यम मॅनेजरांपैकीं एका दोघांनीं जरी थोडी हयगय केली तरी तिचा परिणाम सर्व पेढ्यांवर होण्याचा संभव असतो. कधीं कधीं प्रत्येक दुय्यम मॅनेजरला आपली पेढी इतर पेढ्यांहून अधिक काम करीत आहे हें दाखविण्या कर-तां जास्त रकम लोकांना कर्ज देण्यांत खर्च करावीशी वाटते व त्यामुळें तो जास्त भांडवलाची मागणी मुख्य पेढीकडे करीतच असतो व ती मागणी कष्टानें का होईना, मुख्य पेढीला पुरवावीच लागते. ह्याचा असा परिणाम होतो कीं, मुख्य पेढीजवळचें सर्व भांडवल खलास होऊन एखादे वेळीं लोकांची मागणी जोराची येऊं लागली म्हणजे मुख्य पेढीला दिवाळें काढावें लागतें. ह्याकरितां मुख्य पेढीच्या शाखांवर डायरेक्टर व मॅनेजर ह्यांची कडक नजर पाहिजे व ह्या शाखांनीं मुख्य पेढीनें घालून दिलेले शिस्तीचे नियम पाळलेच पाहिजेत.

पेढीच्या सहामाही सभा:—समवायिक भांडवलांच्या पेढ्यांनीं दर सहा महिन्यांनीं आपल्या सभा भरवून त्या सभांमध्यें ताळेबंद ठेऊन तो पास

करून घेतला पाहिजे. कांही लोकांचे मतानें ताळेबंद आपल्या भागीदारांस पेढ्यांनीं दाखवूं नये; कारण ताळेबंदावरून पेढीची खरी स्थिति भागीदारांस कळेलच ह्याची खात्री नसते. ताळेबंदांत असें लिहिलें असेल कीं, इतक्या किंमतीचे तारणरोखे पेढीजवळ आहेत; पण हे तारणरोखे खरोखरच उपलब्ध आहेत किंवा नुसते नांवाचेच आहेत हें ह्या ताळेबंदावरून कसें कळणार? दुसरें असें कीं, हा ताळेबंद प्रसिद्ध केल्यानें पेढीचे जे प्रतिस्पर्धी व शत्रु असतील त्यांना ह्या ताळेबंदावरून पेढीचे दोष सहज समजतील व ते लोक पेढीची नालस्ती करण्यास कधींहि चुकणार नाहींत. भागीदारांची सभा भरली असतांना कांहीं पेढीचे हितशत्रु डायरेक्टर लोकांस वाटेल ते आडवेतिडवे प्रश्न विचारून त्यांना भंडावून सोडतील व ह्या हितशत्रूंना उत्तरें देतां देतां डायरेक्टरांच्या नाकीं नव येतील व ज्या गोष्टी लोकांस न कळाव्या अशी पेढीच्या हिताच्या दृष्टीनें त्यांची इच्छा असते त्या गोष्टी त्या लोकांना कळून ती इच्छा निष्फळ होणार.

ह्या म्हणण्यांत तथ्य अगदींच नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं; पण एकंदर सारासार विचार केला तर पेढीच्या व भागीदारांच्या दृष्टीनें ताळेबंद त्यांना समजून त्यांच्याकडून पास झालाच पाहिजे. पेढीचे डायरेक्टर नेहमींच कांहीं देवमाणसें नसतात. त्यांनीं सहा महिन्यांत जे व्यवहार केले ते शास्त्रशुद्ध व पेढीच्या हिताच्या दृष्टीनें केले किंवा स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीनें केले हें भागीदारांनीं कळून घेतलेंच पाहिजे व ताळेबंद पास करतांना प्रत्येक बाबीची योग्य शहानिशा करून मग तो पास केला पाहिजे. आपण करूं तें प्रमाण आहे व आपणांस कोणी विचारणारा नाहीं अशी ह्या डायरेक्टरांची ठाम समजूत झाली म्हणजे पेढीच्या कारभारांत अंदाधुंदी झाल्यावांचून कधींहि राहणार नाहीं.

पेढीचे भागीदार व त्यांचीं कर्तव्यें:--पण ज्याप्रमाणें ताळेबंद छापून पेढ्यांची वस्तुस्थिति भागीदारांना कळविणें हें डायरेक्टर लोकांचें कर्तव्य आहे, तसेंच पेढ्यांविषयीं व डायरेक्टरांविषयीं भागीदार लोकांचें कांहीं कर्तव्य असतें व हें कर्तव्य बजावण्यास ते पुष्कळ वेळां विसरत असतात. एखाद्या माणसानें एखाद्या पेढीचे भाग विकत घेतले म्हणजे तो सर्वांशांनीं तिच्या सुख-दुःखाचा वांटेकरी होतो व त्याच्यावर त्यानें घेतलेल्या भागांच्या मानानें

आर्थिक जबाबदारी येऊन पडते. तेव्हां अशा भागीदारानें पेढीशीं शत्रुत्व करून तिच्या बारीकसारीक दोषांचें आविष्करण करून तिचा नाश करण्याचें पाप करूं नये. पुष्कळ वेळां 'अकारणाविष्कृतवैरदारुण' लोक कांहीं कंड्या पेढ्यांविरुद्ध उगीच उठवीत असतात; त्या तशाच खऱ्या मानून प्रत्येक वेळीं डायरेक्टर लोकांना प्रश्न विचारून त्यानें त्यांना भंडावून सोडूं नये. कांहीं वेळा अशा असतात कीं, त्या वेळीं एखाद्या संशयखोर भागीदाराच्या प्रश्नास उत्तर देणें म्हणजे पेढ्यांनीं आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखेंच असतें. उदाहरणार्थ, एखादे वेळीं पेढीचें बरेंच कर्ज बुडीत होत असतें, ह्याचें कारण एखाद्या धंद्यांत बूड आल्यामुळें त्या धंद्यांतल्या कांहीं हुंड्या नाकारल्या जाऊन पेढीचे पैसे बुडतात. अशा वेळीं किती किंमतीच्या व कोणच्या हुंड्या नाकारल्या जातात ह्याचा अंदाज डायरेक्टर लोकांना नसल्यामुळें ते कांहीं रकम कांहीं आंकडा न लिहितां बाजूला काढून ठेवतात; पण ह्या गोष्टीचा नामनिर्देशही करणें इष्ट नसतें. अशा वेळीं भागीदारानें जास्त खोल न शिरतां डायरेक्टर लोकांवर विश्वसून राहणेंच इष्ट असतें.

वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक भागीदारानें पेढीचें कल्याण तेंच आपलें कल्याण समजून तिच्या उत्कर्षाची वाढ करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पेढीचे भागीदार पुष्कळ आहेत, आपण एकट्यानेंच धडपड करून काय होणार असें न समजतां 'जलबिंदुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः' ह्या न्याय लक्षांत ठेवून त्यानें पेढीचे गिऱ्हाईक वाढविण्याचा प्रयत्न करावा, म्हणजे पर्यायानें आपलाच फायदा त्यानें केला असें होईल.

ज्यावेळीं व्यापारी आणीबाणीची वेळ येऊन पेढ्या बुडण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं भागीदारांवर मोठीच जबाबदारी येऊन पडते. भित्रे ठेवीवाले पेढी बुडणार अशा काल्पनिक किंवा कधीं कधीं खऱ्या भीतीनें भराभर आपल्या ठेवी मागण्याकरितां तिच्याकडे धांव घेतात. अशा वेळीं भागीदारानें आपलें सर्व सामर्थ्य एकवटून लोकांची भीति निराधार आहे अशी त्यांची खात्री करून दिली पाहिजे. इतकेंच नव्हे तर आपल्या पतीचा, नांवाचा व पैशाचा उपयोग करून पेढीची अब्रू संभाळण्याकरितां धांवून गेलें पाहिजे; पण वस्तुस्थिति अशी असते कीं, पेढीकडे ठेवीवाल्यांच्या ठेवी परत मागण्याची गर्दी होऊं लागली कीं, हेच भागीदार जास्त घाबरून आपले भाग विकावयास काढतात. अर्थातच हे भाग अशा

गडबडीच्या वेळीं विकावयास काढिले म्हणजे त्यांची किंमत उतरू लागते व अशी किंमत उतरूं लागली म्हणजे 'विनाशकाले विपरीतबुद्धिः' ह्या न्यायानें इतर घाबरट भागीदार आपले भाग जास्तच विकावयास काढतात व त्यामुळें त्यांची किंमत फारच उतरूं लागते. बरें, ह्या त्यांच्या घाबरटपणामुळें नुसतें त्या भागीदारांचेंच नुकसान झालें तर कोणी फिकीर करणार नाहीं; पण पाण्यांत बुडणारा माणूस ज्याप्रमाणें तारणाऱ्या माणसासकट बुडत असतो त्याप्रमाणें हे घाबरट भागीदार आपणांबरोबर पेढ्यांनाही बुडवितात व एक पेढी बुडाली म्हणजे दुसरी बुडूं लागून सर्वत्र पेढ्या बुडण्याची सांथ येते. बरें, ही सर्व आपत्ति कशा-मुळें येते ? तर दोरीस साप साप म्हणून बडविण्याच्या भागीदाराच्या प्रवृत्तीमुळें. तेव्हां भागीदाराच्या कानावर आपल्या पेढीबद्दल कांहीं अनिष्ट बातमी आली तर तात्काळ घाबरून न जातां पेढीच्या व्यवस्थापकाकडे जाऊन त्याला खाजगी रीतीनें विचारून आपली खात्री त्यानें करून घ्यावी. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भागीदार व डायरेक्टर ह्यांच्यामध्यें प्रेमभाव, विश्वास व ऐकमत्य पाहिजे. असें असेल तरच पेढीची भरभराट होईल.

पेढीला होणारा नफाः—दरवर्षीं किंवा दर सहामाही भागीदारांच्या ज्या सभा भरतात त्यांमध्यें डायरेक्टर लोकांनीं आपण नफा किती वांटणार व तो कोणत्या प्रकारानें वांटणार हें जाहीर करावें.

जो नफा होईल त्यापैकीं कांहीं भाग भागीदारांस त्यांनीं दिलेल्या भांड-वलावरील व्याज म्हणून त्यांना दिलाच पाहिजे; व बाकीचा भाग पेढीचें भांडवल वाढविण्यांत, भागीदारांना जादा नफा वांटून देऊन किंवा गंगाजळी ठेव म्हणून ठेवण्यांत आला पाहिजे. ही ठेव किती ठेवावी ह्याबद्दल निश्चित मत सांगणें कठिण आहे. ती ठेव पेढीच्या एकंदर व्यवहारावरच अवलंबून राहील.

कांहीं लोकांच्या मतानें गंगाजळी ठेव काढून ठेवणें चुकीचें आहे; कारण त्यांच्या मतानें हल्लींच्या भागीदारांचें नुकसान करून ह्या पद्धतीमुळें भावी भागी-दारांचा फायदा होणार. पण ही चुकीची कल्पना आहे. कारण ती गंगाजळी ठेव कोठल्या तरी रीतीनें विभागली जाईपर्यंत ज्या भागीदारांचे भाग विकले जात नाहींत त्या भागीदारांना त्या ठेवीचा भाग मिळतच असतो. बरें, त्या भागीदारांनीं त्या ठेवीची वांटणी व्हावयाच्याअगोदर जर आपले भाग विकलें

तर त्यांच्या भागांच्या किंमतीच्या रूपानें ह्या गंगाजळीच्या ठेवींतल्या त्यांच्या भागांची किंमत त्यांना मिळणारच आहे. कारण पेढीजवळ चांगली गंगाजळी ठेव आहे ही गोष्ट लोकांस ठाऊक असल्यानें पेढीच्या भागांची किंमत केव्हांही जास्त असते. तेव्हां गंगाजळी ठेव प्रत्येक पेढीनें ठेवावी हें बरें.

पण कांहीं झालें तरी पेढीची मुख्य मदार ह्या गंगाजळीवर नसून तिच्याजवळ असलेल्या थोड्या मुदतीच्या हुंड्यांवर असते व ह्या हुंड्या जे पेढ्यांचे नोकर स्वीकारतात ते जर प्रामाणिक, शहाणे व दूरदर्शी नसले तर नुसत्या गंगाजळीच्या जोरावर पेढ्यांचा निभाव लागणार नाहीं. पेढीचे गिऱ्हाईक कोण असावेत हें ह्या नोकरांनींच ठरवावयाचें असतें. तेव्हां ताळेबंद छापणारे व नफा जाहीर करणारे डायरेक्टर काय किंवा पेढीचा नित्याचा व्यवहार करणारे तिचे नोकर काय, ह्या दोघांनीं शास्त्रशुद्ध मार्गानींच व्यवहार करून व आपली सांपत्तिक स्थिति उत्तम ठेवूनच आपली पत वाढविली पाहिजे. पेढीचें मुख्य भांडवल म्हणजे तिची पत होय व ही पत एखाद्या कांचेप्रमाणें एकदां फुटली म्हणजे त्या पेढीला आपला गाशाच कायमचा गुंडाळला पाहिजे.

प्रकरण ८ वें

पेढ्यांचीं दिवाळीं.

पेढीचें दिवाळें निघण्याचीं सामान्य कारणें:—एखादी व्यक्ति असो किंवा व्यापारी संस्था असो, तिचें दिवाळें निघतें ह्याचीं कांहीं सामान्य कारणें असतात. उदाहरणार्थ, त्या व्यक्तीचें किंवा संस्थेचें भांडवल अपुरें असतें; किंवा एकच धंदा करणाऱ्या दोन व्यक्ति किंवा संस्था ह्यांच्यामध्यें विलक्षण चढाओढ झाली म्हणजे ही आपत्ति ओढवते कधीं कधीं त्या व्यक्तीला किंवा कधीं संस्थेला तिनें सुरू केलेल्या धंद्यांत अनुभव कमी असतो किंवा ती सट्टेबाजी सुरू करते किंवा तिचा निष्काळजीपणा, लबाडी किंवा गाफीलपणा धंदा चालत असतांना दिसून येतो; अथवा तो धंदा करण्यास लागणारी लायकीच त्या व्यक्तींत किंवा संस्थेंत नसते ह्या सर्व कारणांत हेंच शेवटलें कारण महत्त्वाचें असून शेंकडा तीस कंपन्या ह्याच

कारणानें बुडत असतात.भांडवलाचा अभाव हें वर सांगितलेल्या कारणाच्या खालोखाल महत्त्वाचें आहे व त्याच्या खालोखाल धंद्यांत पडणाऱ्या लोकांची लबाडी हें तिसरें कारण आहे. हिंदुस्थानांत कांहीं वर्षांपूर्वी पेढ्या बुडण्याची जी वावटळ आली होती त्या वेळीं हींच तीन कारणें प्रामुख्यानें दिसून येत होतीं. आतांपर्यंत दिवाळीं निघण्याच्या सर्व सामान्य कारणांचा उल्लेख आपण केला. आतां पेढ्या कां बुडतात ह्याचा सविस्तर विचार आपण करूं.

विशिष्ट कारणें:—पेढीवरील लोकांच्या विश्वासाचा अभाव:- पेढयांचीं जीं दिवाळीं निघतात त्यांचें मुख्य कारण असें दिसतें कीं, लोकांचा पेढ्यावरील विश्वास कांहीं कारणांनीं उडून जातो व ते लोक एकदम पेढ्यांकडे पैशाची मागणी करावयास लागले म्हणजे त्यांना कांहीं पैसा पुरवितां येत नाहीं च त्यामुळें त्यांना आपलें दुकान आवरावें लागतें; पण आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, लोकांचा विश्वास उडून कां जातो व ते पैशाची मागणी एकसमयावच्छेदें-करून पेढ्यांकडे कां करितात? ह्या प्रश्नाचें उत्तर समजण्यास आपणांस व्यापारी आणीबाणीची वेळ कां उत्पन्न होतें हें समजलें पाहिजे.

व्यापारी आणीबाणीची वेळ व ती येण्याचीं कारणें:—ही वेळ प्राप्त होण्याचीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं एक कारण असें आहे कीं, कांहीं कारणांनीं उद्योगधंदे व व्यापार ह्यांची एकदम वाढ होऊन नफ्याचें प्रमाण व शिल्लक पडणाऱ्या रकमेचें प्रमाण हीं जास्त होतात. ही वाढ प्रथम एकाच विशिष्ट धंद्यांत दिसून येते;पण पुढें पुढें मनुष्याची जिनसा विकत घेण्याची शक्ति वाढल्यामुळें सर्वच बाजूंनीं व्यापाराची व उद्योगधंद्याची वाढ होत असते व ह्या वाढीमुळें नवीन नवीन कंपन्या अस्तित्वांत येऊं लागतात.

अस्तित्वांत आलेल्या सर्वच कंपन्यांची स्थिति सांपत्तिकदृष्ट्या फारशी समाधानकारक असते असें नाहीं. ह्या कंपन्यांचे भाग भोळेभाबडे लोक नुसत्या नांवावर भुलून भराभर घेऊं लागतात. अशी मागणी सुरू झाल्यावर कांहीं धूर्त लोक सट्टेबाजी सुरू करूं लागतात व अशा भागांची किंमत भलतीकडे वाढूं लागते. एकदां ही सट्टेबाजी एकाच प्रकारच्या धंद्यांत सुरू झाली म्हणजे ती इतरत्रही सुरू होते व बाजारांत वस्तूंच्या किंमती चढूं लागतात व किंमती वाढल्यामुळें जिनसा हा जील प्रमाणांत उत्पन्न करण्याकडे व्यापारी वर्गाची प्रवृत्ति होऊं लागते.

अशी स्थिति प्राप्त झाली असतांना पेढयांनीं स्वस्थ बसणें शक्य नसतें. वर सांगितल्याप्रमाणें नवीन नवीन कंपन्या अस्तित्वांत येऊं लागल्या म्हणजे त्यांची खरी स्थिति काय आहे व त्या कोणत्या हेतूनें स्थापन झाल्या ह्याची चवकशी न करितां त्यांना ह्या पेढया पैसे पुरवूं लागतात. लोकांच्यापाशीं ह्या वेळीं पैसा जास्त असल्यामुळें ते ह्या पेढयांजवळ जास्त जास्त पैसा आणून देतात व ह्या पेढया त्या पैशाचा वाटेल तो उपयोग करीत असतात. हा पैसा लोकांजवळ जास्त झालेला असतो, ह्याचें कारण जिनसांची किंमत वाढणें एवढें एकच नसून एकाएकी सोन्याचांदीच्या खाणींचा जर शोध लागला तरीसुद्धां हा पैसा एकदम जास्त वाढेल.

हा व्यापारी भरभराटीचा डोलारा ढांसळून पडण्यास पुरेसें कारण म्हटलें म्हणजे ज्या पतीवर सर्व व्यापाराची उलाढाल होत असते त्या पतीला धक्का बसणें हें होय. एखादे वेळीं जर युद्धास आरंभ झाला किंवा एका सरकारची उचलबांगडी होऊन दुसऱ्या सरकारची स्थापना झाली व त्या सरकारनें आपली जबाबदारी न ओळखतां पूर्वीच्या सरकारास असलेलें लोकांचें देणें न देण्याचें जाहीर केलें तर लोकांमध्यें भयंकर अविश्वास उत्पन्न होतो व अशा वेळीं एखाद्या कंपनीचें किंवा पेढीचें एखाद्या देशांत जर दिवाळें निघालें तर त्याचा परिणाम त्याच देशांत होतो; एवढेंच नव्हे तर हल्लीं सर्व राष्ट्रें व्यापारी संबंधाच्या योगानें एकमेकांशीं निगडित झाल्यामुळें इतर राष्ट्रांवरही त्याचा परिणाम दृग्गोचर होऊं लागतो.

कधीं कधीं हा दिखाऊ डोलारा खालीं येण्यास देशांतील पेढयांजवळ असलेल्या शिलकेस ओहोटी लागणें हें कारणसुद्धां पुरेसें होतें. लोकांना आपल्या नोकरांना जास्त पगार द्यावा लागल्यामुळें जर जास्त रकमेची जरूर भासूं लागली व ती रक्कम जर पेढया आपल्या मुद्दाम राखून ठेवलेल्या शिलकींतून देऊं लागल्या तर लढाईसारख्या कारणांच्या योगानें ती शिल्लक अर्थातच रोडणार. कधीं कधीं निर्गत मालापेक्षां आयात माल जास्त झाल्यामुळें व्यापाऱ्यांना बाहेर जास्त पैसा पाठवावयाचा असतो. अशा वेळीं जर पैसा बाहेर जाऊं लागला तरीसुद्धां देशांतल्या पेढयांच्या शिलकेला धक्का बसणार व पेढयांची शिल्लक कमी झाली आहे असें लोकांना कळल्यावर ते त्यांकडे एकदम पैशाची मागणी सुरू करतील व त्यामुळें पेढयांवर संकट कोसळेल.

आतांपर्यंत उद्योगधंदा व व्यापार ह्यांची भयंकर वाढ, किंमती खूब वाढणें व नवीन कंपन्या स्थापन होणें हें व्यापारी आणीबाणीचें एक कारण आपण पाहिलें. ह्याशिवाय दुसरें कारण म्हटलें म्हणजे लोकांच्या गरजा पुरविण्याकरितां किती माल उत्पन्न करावयाचा ह्याबद्दल माल उत्पन्न करणाऱ्या व्यापारीवर्गाची चुकीची कल्पना हें होय. ज्या वेळीं मालाबद्दल मागणी व त्याचा पुरवठा ह्यांच्या-मधला समतोलपणा नाहींसा होतो त्या वेळीं वर सांगितलेली व्यापारी आणी-बाणीची वेळ उत्पन्न होते. ज्या वेळीं व्यापाराचा फारच उत्कर्ष होत असतो त्याच वेळीं व्यापाऱ्यांची दिशाभूल होते व ते जास्त माल, नफा होणार या खात्रीनें, उत्पन्न करूं लागतात. हल्लींच्या व्यापारीयुगांत भयंकर चढाओढ होत असल्यामुळें एकाद्या व्यापाऱ्याला एखादा माल उत्पन्न करण्यांत जास्त नफा होत आहे, हें दुसऱ्या व्यापाऱ्याला कळतांक्षणींच तो व्यापारी आपण तोच माल उत्पन्न करूं लागतो; पहिल्या व्यापाऱ्याची अशी कल्पना होत असते कीं, आपणांस एक विशिष्ट प्रका-रचा माल उत्पन्न करण्यांत जो नफा होत आहे तो तसाच बराच वेळ टिकेल; म्हणून तो आपल्यास झालेला नफा जास्त यंत्रसामग्री खरेदी करण्यांत फस्त करून टाकतो व नवीन माल उत्पन्न होऊं लागला म्हणजे त्यास असें आढळून येतें कीं, आपणांस प्रतिस्पर्धी उत्पन्न झाल्यामुळें पूर्वीसारखा नफा मिळणें शक्य नाहीं. बरें, नफा होत नाहीं म्हणून चटकन् यंत्रसामग्री वगैरे विकून पुनः पैसा दुसऱ्या किफा-यतशीर धंद्यांत घालणें हेंही शक्य नसतें. कधीं कधीं एक प्रकारचा माल उत्पन्न करतांना आपणांस जो नफा होत आहे तो तसाच पुढेंही होत जाईल, ह्या आशेनें एखादा व्यापारी तोच माल जास्त प्रमाणांत काढूं लागतो. त्याचा असा परिणाम होतो कीं, गरजेपेक्षां पुरवठा जास्त होऊं लागल्यामुळें किंमती अर्थातच उतरूं लागतात व नफ्याचें प्रमाणही कमी होत जातें. कधीं कधीं फॅशन बदलत चालल्या-मुळें पूर्वीं ज्या मालास विशेष मागणी होत असे त्या मालाला आतां कमी मागणी येऊं लागते व त्यामुळें तो माल उत्पन्न करणाऱ्या व्यापाऱ्याचें नुकसान होऊं लागतें. कधीं कधीं आपण जो माल उत्पन्न करीत आहोंत त्या मालावांचून गिऱ्हाइकाचें अडणारच व आपणास हल्लीं जो नफा होत आहे तो कमी तर होणें शक्य नाहींच; पण त्या मालाची किंमत थोडी जास्त जर वाढविली तर आपणांस नफा जास्तच होईल, ह्या समजुतीनें आपला माल जास्त प्रमाणांत काढण्याकरितां व्यापारी खटपटींत असतात. इतक्यांत तो माल महाग होत चालला आहे हें

पाहून त्या मालाऐवजीं दुसऱ्या वस्तूच्या उपयोगानें आपली गरज भागविण्याचा गिऱ्हाइकही प्रयत्न करतात; त्यामुळें त्या मालाला कोणी विचारीत नाहींसें होतें व त्यामुळें व्यापाऱ्यांची फसगत होते. सांगावयाचें तात्पर्य एवढेंच कीं, मालाचा पुरवठा व त्याची मागणी ह्याबद्दल व्यापाऱ्यांचे अंदाज पुष्कळ वेळां चुकतात. असे अंदाज चुकू लागले म्हणजे ह्या व्यापाऱ्यांचा माल तुंबू लागतो, त्या मालाची किंमत उतरूं लागते, नफ्याचें प्रमाण शून्यावर येऊं लागतें व ह्या व्यापाऱ्यांनीं एखादी जर कंपनी मूळचीच काढिलेली असली तर त्या कंपनीचे भाग फारच कमी किंमतीला जाऊं लागतात व लवकरच त्या कंपनीचें दिवाळें निघतें.

वरील विवेचनावरून वाचकांस कळलेंच असेल कीं, मालाच्या मागणीपेक्षां पुरवठा जास्त होऊं लागला म्हणजे व्यापारी आणीबाणीची वेळ प्राप्त होते; पण कांहीं लोकांचे —हे लोक म्हणजे समाजसत्तावादी लोक (Socialists) होत— मतानें मालाचा कमी खप होत असल्यामुळें ही आणीबाणीची वेळ येऊं शकते. ह्या लोकांचें मत असें आहे कीं, ज्यांचें उत्पन्न ठराविक असतें असे मध्यम स्थितींतले नोकर लोक व मजूर ह्यांना जवळ पैसे पुरेसे नसल्यामुळें व्यापाऱ्यांनीं उत्पन्न केलेला माल घेणें परवडत नाहीं. तेव्हां अशी स्थिति प्राप्त होते कीं, व्यापाऱ्यांना आपला माल जास्त खपविण्याची आवश्यकता असते व गिऱ्हाइकाला जवळ पैसे पुरेसे नसल्यामुळें तो माल घेण्याची पंचाईत होते आणि त्यामुळें मालाचा पुरवठा व त्याची मागणी ह्यांत अंतर जास्त जास्त वाढूं लागतें.

ही जी समाजशास्त्रज्ञांची विचारसरणी आहे ती सर्वस्वी निर्दोष नाहीं. कारण व्यापारांत डबघाईची वेळ प्राप्त होते ती कांहीं मजुरांना कमी मिळणाऱ्या मजूरीमुळें उत्पन्न होत नाहीं, तर प्रथम मजुरांची मजूरी वाढते, नंतर जिनसा विकत घेऊन त्यांचा उपभोग घेण्याची त्यांची शक्ति वाढते व त्यामुळें ही आणीबाणीची वेळ येते. कारण व्यापाऱ्यांना वाटतें कीं, आपला माल खपत असल्यामुळें तो जास्त उत्पन्न करावा व तो उत्पन्न होत असतांना पूर्वी सांगितलेल्या कारणामुळें मागणी कमी होऊन त्यांच्या मालाला कमी किंमत येते व त्यांचें नुकसान होतें. शिवाय हे समाजसत्तावादी लोक म्हणतात त्याप्रमाणें ह्यापुढें ह्या अडचणीच्या वेळा सारख्या येत राहतीलच असें नाहीं, व जरी त्या आल्या तरी सर्व देशांचें संघटण जास्त जास्त होत असल्यामुळें त्या वेळांची तीव्रता बरीच कमी होत जाईल.

वादाकरितां ह्या लोकांचें म्हणणें—कीं, मजूर लोकांना दिवसानुदिवस कमी वेतन मिळत आहे व हे लोक श्रीमंत कारखानदारांकडून लुबाडले जात आहेत–जरी कबूल केलें तरी मजूर लोकांनीं जरी जिनसा खरेदी केल्या नाहींत तरी हे श्रीमंत कारखानदार व इतर श्रीमान लोक त्या जिनसा–मग त्या नित्योपयोगी नसल्या तर हौशीच्या तरी असतील–खरेदी करणारच व त्यामुळें हा व्यापार फायदेशीर असल्यानें वाढणारच.

तथापि ह्या समाजसत्तावादी लोकांचें म्हणणें एका अर्थीं खरें म्हणतां येईल. ज्या वेळीं एखादा देश लढाईमुळें उध्वस्त झालेला असतो किंवा पिकें वाईट आल्यामुळें लोकांत त्राण नसतें त्या वेळीं लोकांना––मग ते श्रीमंत असोत किंवा गरीब असोत––आपल्या खर्चांत काटकसर करावीच लागते. अशा वेळीं लोकांना जिनसा विकत घेऊन त्यांचा उपभोग घेण्याची ताकद नसल्यामुळें ह्या व्यापारी आणीबाणीच्या वेळा उत्पन्न होतात.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, मागणीपेक्षां मालाचा जास्त पुरवठा होत असला म्हणजे ही संकटाची वेळ उत्पन्न होते; पण कधीं कधीं मालाला असलेल्या मागणीपेक्षां पुरवठाच कमी होत असल्यामुळें ह्या वेळा येऊं शकतील; पण ह्या वेळा कृषीप्रधान देशांत जास्त प्रमाणांत दिसून येतात. हिंदुस्थानसारख्या देशांत गहूं किंवा तांदूळ फारच थोडा उत्पन्न झाला किंवा कापसाचें पीक बुडालें तर शेतकरी लोक व सामान्य लोक बुडालेच म्हणून समजावें. जो देश उद्योगधंद्यांत बराच पुढें गेलेला आहे तेथें माल कमी पैदा झाल्यामुळें हे प्रसंग दिसून येत नाहींत.

आतां असा प्रश्न उपस्थित होईल कीं, ह्या व्यापारी आणीबाणीच्या वेळा व पेढ्यांची दिवाळीं ह्यांत परस्पर संबंध काय ? ह्याचें उत्तर सोपें आहे. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, ज्या वेळीं देशांत खूब पैसा असतो त्या वेळीं व्यापारी लोकांना नवीन नवीन धाडसाचीं कामें हातीं घेऊन नवीन नवीन कंपन्या स्थापन कराव्याशा वाटतात व त्या कंपन्यांचे भाग लोक घेत असतात. पेढयाही अशा कंपन्यांना कर्जाऊ पैसे देत असतात. ह्या वेळीं कंपनीच्या प्रॉस्पेक्टसमधील भपकेदार वर्णनाला भाळून लोक त्या कंपनीचे भाग विकत घेण्याविषयीं आतुर असतात व त्या भागांची किंमत भलतीकडे वाढूं लागते. म्हणून पुष्कळ सट्टेवाले लोक पेढयांकडून पैसे उसने काढून हे भाग विकत घेत असतात. मध्यंतरीं भ्रमाचा

भोंपळा फुटून लोक बुडूं लागले व पेढयांजवळील शिल्लक बरीच आटली असली म्हणजे त्यांचे नेहमींचे गिऱ्हाइक घाबरून जाऊन पैशाची मागणी यांच्याकडे करतात व एकदम मागणी आल्यामुळें ह्या पेढयांचें दिवाळें निघतें. अशा रीतीनें व्यापारी कंपन्या व लोक आणि पेढया ह्यांचा अन्योन्यसंबंध आहे.

असो; आतांपर्यंत पेढयांचीं दिवाळीं निघण्याचें जें कारण सांगण्यांत आलें त्याबद्दल एवढें तरी म्हणतां येईल कीं, हें कारण उत्पन्न करण्यांत पेढयांना प्रत्यक्ष जबाबदार धरतां येत नाहीं; पण पुढें आम्ही जीं कारणें सांगणार आहोंत त्यांबद्दल पेढयाच सर्वस्वीं जबाबदार आहेत. तीं कारणें कोणतीं ह्याचा आपण विस्तारानें विचार करूं.

पेढ्यांचे अशास्त्रीय कारभारः--पेढयांचीं दिवाळीं निघण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, त्यांचा कारभार व्यवस्थित व शास्त्रशुद्ध रीतीनें चाललेला नसतो. त्या कारभारांत अव्यवस्था फार असते.

पुष्कळ समवायिक भांडवलाच्या पेढयांची अशी वहिवाट असते कीं, इतर पेढयांचा कारभार आपणांकडे घेऊन त्यांचा स्वतःमध्यें अंतर्भाव करून घ्यावयाचा. कधीं कधीं अशा अंतर्भावामुळें पेढयांचें कल्याणही होतें. कारण पहिल्या पेढयांना त्या जेथें असतात तेथील लोकांची माहिती असते व त्यांचा जम बसलेला असतो. त्यामुळें त्यांच्या अनुभवाचा फायदा ह्या समवायिक भांडवलाच्या पेढयांना होत असतो; पण ही स्थिति जर मूळच्या पेढयांचा कारभार आंतबट्ट्याचा नसेल तरच टिकेल. पुष्कळ पेढयांची स्थिति तशी नसते, त्यामुळें त्यांचा अंतर्भाव करणें नवीन समवायिक भांडवलाच्या पेढयांना फायदेशीर होत नाहीं.

कांहीं पेढयांना सट्टेबाजींत गुंतलेल्या लोकांना मिति कापून घेऊन हुंड्या वटविण्याची व कर्ज देण्याची संवय असते. ह्याचा परिणाम काय होतो हें वर सांगण्यांत आलेलें आहे, तेव्हां त्याचें चर्वितचर्वण येथें नको. ही सट्टेबाजी कशी सुरू होते हें आपण पाहूं. एखादा व्यापारी धान्य विकत घेतो व तें धान्य आपल्या दलालाच्या स्वाधीन करून त्या धान्याबद्दल, बाजारभावापेक्षां कमी किंमत लावून त्या दलालावर हुंड्या काढतो. अर्थात् आपल्या दलालाचें नुकसान होणार नाहीं व झालेंच तर तें भरून निघेल, अशा धोरणानें तो ह्या हुंड्या काढीत असतो. ह्या हुंड्या तो एखाद्या पेढीकडे जाऊन तिजकडून वटवून घेऊन पैसे उत्पन्न करतो व

त्या पैशाच्या जोरावर पुनः धान्य घेतो. पुनः आपल्या गुमास्त्यावर पूर्वीप्रमाणेंच हुंड्या काढून पुनः पूर्वीप्रमाणेंच पेढीकडून तो वटवून घेतो. असा त्याचा व्यवहार सारखा चाललेला असतो. आतां त्याला जर असें वाटूं लागलें कीं, बाजारभाव चढणार आहे, तर तो आपल्या गुमास्त्याला धान्य विकूं देणार नाहीं व पहिल्या हुंड्यांची मुदत जर भरत आली तर पुनः त्या काढून वटवून त्यावर जे पैसे मिळतील त्या पैशांनीं पहिल्या हुंड्याबद्दल पैसे चुकते करील. अशा रीतीनें थोड्या भांडवलावर मोठ्या प्रमाणांत व्यापाऱ्यांना सट्टेबाजी करतां येते व ही सट्टेबाजी नुसत्या हुंड्यांवर चालली असते. ह्या हुंड्या जर मोठ्या किंमतीच्या असल्या व ह्या हुंड्याबद्दल पेढयांना जर पैसे मिळाले नाहींत तर सगळाच ग्रंथ आटपला. पेढयांनीं आपला व्यवहार करीत असतांना हें लक्षांत ठेवावें कीं, इमारतीचा सट्टा करणारे व रेल्वेसारख्या संस्थांत सट्टे करणारे लोक ह्यांच्याशीं व्यवहार फारसा न करणें हेंच श्रेयस्कर असतें.

आक्षेपार्ह पद्धतीनें ठेविलेले पेढीचे हिशेब:—कांहीं पेढ्यांचे हिशेब शास्त्रीय पद्धतीनें ठेवलेले नसतात. ही चूक अलीकडील पेढ्या करूं शकत नाहींत. कारण प्रत्येक पेढीला आपले हिशेब सरकारनें नेमलेल्या हिशेब-तपासनवीसाकडून पास करून घ्यावे लागतात. पण १९१३ सालीं हिंदुस्थानांत पुष्कळ पेढ्यांचे हिशेब लबाडीचे व भागीदारांना फसविण्याकरितां खोटेनाटेच बनविलेले असत.

प्रत्येक पेढीनें आपले हिशेब नेहमीं शास्त्रीय पद्धतीनें व चोख ठेवले पाहिजेत. कारण त्यामुळें पेढी व गिऱ्हाईक ह्यांच्यामध्यें व्यवहारांत बिनचूकपणा राहतो. एवढेंच नव्हे तर पेढीचे लोकांशीं जे व्यवहार होत असतात त्यांची योग्य रीतीनें वर्गवारी होऊन तिला आपला ताळेबंद दर आठवड्यास तयार करतां येऊन पेढीची खरी स्थिति काय आहे हें बिनचूक जाणतां येतें. हे ताळेबंद ज्याप्रमाणें डायरेक्टर लोकांना उपयोगी पडतात त्याचप्रमाणें पेढीच्या मॅनेजरलाही उपयोगी पडत असतात; कारण पेढीची सर्वांगीण स्थिति काय आहे ह्याचें सम्यग्ज्ञान जर त्या मॅनेजरला नसलें तर एखादा व्यवहार पेढीच्या हिताच्याच दृष्टीनें म्हणून करावयाला जावा व पेढीला चांगलीच ठोकर बसावी. तात्पर्य, पेढीचा ताळेबंद समोर असला म्हणजे पेढीची प्राप्ति किती, शिल्लक

किती, लोकांना कर्ज किती दिलें गेलें आहे, कोणत्या माणसाला त्याच्या पेढी-जवळ असलेल्या शिलकेपेक्षां किती रक्कम जास्त दिली गेली आहे वगैरे सर्व गोष्टी मॅनेजरला समजतात.

कांहीं पेढ्यांना अशी संवय असते कीं, दर सहा महिन्यांनीं नफातोटयाचा आढावा काढतांना तोटयाची बाजू हिशेबांत न घेतां नुसता नफाच तेवढा दाखवावयाचा. याचा परिणाम असा होतो कीं, डायरेक्टर लोकांना आपल्या पेढीची भरभराट होत आहे असें वाटून ते नफा वांटण्यास सुरुवात करतात किंवा तो नफा गंगाजळी ठेवीमध्यें घालून टाकतात. पण ही शुद्ध फसवणूक असते. कारण नुकसानीमुळें पेढीचे बरेच पैसे खर्च झालेले असतात. तेव्हां ताळेबंद करतांना नुकसानीची बाब न दाखविणें ही चूकच होय. त्याचप्रमाणें कांहीं पेढया आपण पुनः मिती कापून वटविलेल्या हुंड्या खातेवहीमध्यें नोंदात नाहींत. असें केल्यामुळें किती रकमेच्या हुंड्या वटविल्या गेल्या आहेत हें पेढयांना समजत नाहीं. पण हें कळणें पेढयांना फार अगत्याचें आहे; कारण इतर कारणांनीं पैशाची मागणी सुरू झाली असतांना ह्या हुंड्या जर नुकत्याच व्यापाऱ्याकडून परत आल्या तर पेढयांची मोठीच अडचण होते व पेढयांना लोकांना पैसे देणें थांबवावें लागतें.

पेढीनें न झेपतील इतक्या शाखा काढणें:—पुष्कळ पेढया आपल्या शाखा निरनिराळया ठिकाणीं स्थापीत असतात. अशा शाखा स्थापणें हें कांहीं वाईट नसतें; पण एवढें मात्र खरें आहे कीं, जितक्या शाखा जास्त, तितकी पेढयांवर जबाबदारीहि जास्त असते. ही जबाबदारी जर पेढयांनीं ओळखिली नाहीं तर त्यांच्यावर संकट केव्हां येईल हें सांगणें कठिण आहे. तेव्हां पेढया ज्या वेळीं आपल्या शाखा उघडीत असतात त्या वेळीं त्या शाखांनीं आपला व्यवहार ठराविक पद्धतीनेंच चालविला पाहिजे व मुख्य पेढीनें घालून दिलेले नियम बिनचूक पाळले पाहिजेत. अशी सक्ती त्या पेढयांनीं आपल्या शाखांवर केली पाहिजे. अशी सक्ती करणारा पेढीचा मुख्य अधिकारी हा पेढीच्या कामांत चांगला वाकबगार असला पाहिजे. त्याचप्रमाणें प्रत्येक शाखेची हिशेब ठेवण्याची पद्धत चोहोंकडे सारखीच असली पाहिजे. ह्या शाखांना मार्गदर्शक म्हणून कांहीं कायदे मुख्य पेढीच्या मॅनेजरनें करून दिले पाहिजेत व

कोणत्या गोष्टी आपल्या आखत्यारांत ठरवावयाच्या व कोणत्या गोष्टी डायरेक्टर लोकांकडे विचाराकरितां पाठवावयाच्या हें त्या मॅनेजरनें ठरविलें पाहिजे. त्याचप्रमाणें प्रत्येक शाखेनें एक साप्ताहिक रिपोर्ट मुख्य पेढीकडे पाठविलाच पाहिजे व प्रसंग पडल्यास एखादा मुद्दाम लिहिलेला रिपोर्ट ह्या शाखेकडून आला पाहिजे, अशीहि सक्ती मुख्य मॅनेजरनें केली पाहिजे. सर्व शाखांची तपासणी करण्याकरितां एक इन्स्पेक्टरची नेमणूक होणें इष्ट असतें. कारण असा मनुष्य नेमल्यानें शाखांच्या मॅनेजरांना कठीण प्रसंगीं योग्य सल्ला मिळतो; इतकेंच नव्हे तर शाखांची वाढ कशी करतां येईल हें त्या कामगाराला मॅनेजराशीं खल करून ठरवितां येतें.

पेढीजवळील अपुरी शिल्लकः—कांहीं पेढयांना कांहीं आकस्मिक अडचण आली असतांना पुरेशी शिल्लक न ठेवतां आल्यामुळें आपलें दिवाळें काढावें लागलें आहे. ह्यांचा कारभार निर्दोष पद्धतीनें चालत असतो; पण त्यांची चूक म्हटली म्हणजे अडचणीचे वेळीं उपयोगी पडणारी शिल्लक सरकारी रोख्यांसारख्या तारणरोख्यांत न गुंतविणें ही होय. प्रत्येक पेढीनें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, जितकें आपलें भांडवल असेल तितकाच आपला व्यवहार करावा. व जर आपला व्यवहार वाढवावयाचा असेल तर आपलें भांडवलही वाढविलें पाहिजे व अडचणीच्या वेळीं उपयोगी पडण्यासारखी शिल्लकही काढून ठेविली पाहिजे. पेढीचा व्यवहार नेहमीं अशा तऱ्हेनें चालला पाहिजे कीं, केव्हांहि आपला धंदा आटपतां घ्यावयास आपणांस प्रसंग आला तर लोकांचें यत्किंचितही नुकसान न होतां आपली तयारी पाहिजे.

पेढीच्या डायरेक्टरांचें व भागीदारांचें वर्तनः—पुष्कळ वेळां पेढया बुडविण्यास त्यांचे डायरेक्टर लोक व भागीदार हेच कारणीभूत होतात. पेढयांची अंतर्रचनाच अगोदर सदोष आहे. कारण पेढीची सर्व व्यवस्था पाहणारा मॅनेजर हा त्याच्याहून पेढीच्या धंद्यासंबंधीं लागणाऱ्या ज्ञानाच्या दृष्टीनें कमी असलेल्या डायरेक्टरांना जबाबदार असतो व हे डायरेक्टर त्यांच्याहून कमी ज्ञान असलेल्या भागीदारांना जबाबदार असतात. जोंपर्यंत हे भागीदार लोक पेढीच्या कारभारांत फारशी ढवळाढवळ करीत नाहींत, तोंपर्यंत पेढया सुरळीत चालतात. पण ही स्थिति जर बदलली तर पेढयांच्या कामांत घोंटाळा सुरू होतो.

कधीं कधीं भागीदारांना खूष करण्याकरितां डायरेक्टर लोक जास्त नफा किंवा बोनस देण्याचें जाहीर करतात व पेढीचा कारभार फारच फायदेशीर रीतीनें चालला आहे असें लोकांस भासवून भागांची किंमत बाजारांत वाढवून ठेवून जास्त भाग खपविण्याची खटपट हे लोक करीत असतात. पण खरी स्थिति अगदीं निराळीच असते व केव्हां तरी भ्रमाचा भोंपळा फुटतो. विशेषतः ज्या वेळीं समवायिक भांडवलाच्या दोन पेढया एकाच गांवांत आपला व्यवहार करीत असतात त्या वेळीं दुसऱ्या पेढीवर मात करण्याकरितां म्हणून खोटाच बडेजाव ह्या डायरेक्टरांना करावा लागतो व शेवटीं त्यांची फसगत होते.

कधीं कधीं डायरेक्टर लोक भागीदारांकडून होणारी निंदा टाळण्याकरितां अदूरदर्शीपणाचा मार्ग स्वीकारतात. पेढीलाच नेहमीं कांहीं नफा होतो असें नाहीं. ज्या वेळीं तोटा होतो त्या वेळीं तो तोटा भरून काढण्याकरितां जवळ असलेल्या शिलकेचा उपयोग डायरेक्टरांना करावा लागतो. अशा वेळीं भागीदार लोकांना घुस्सा येऊन ते डायरेक्टरांवर नाखूष होतात. ही नाखुषी टाळण्याकरितां डायरेक्टर खोटा नफा दाखवून भागीदारांच्या डोळ्यांत धूळ टाकीत असतात; पण ह्याचा परिणाम शेवटीं पेढयांना अहितकर होतो.

कधीं कधीं भागीदार लोक डायरेक्टर लोकांना काटकसर करण्याबद्दल नेहमीं बजावीत असतात. ह्याचा परिणाम असा होतो कीं, पेढीचे जे नोकर असतात त्यांना--मग तो सर्वांत श्रेष्ठ असलेला नोकर मॅनेजर का असेना--कमी पगार देण्याकडे डायरेक्टरांची प्रवृत्ति होते. ह्यामुळें पेढीचे नोकर अर्थातच असंतुष्ट बनतात व तिचें काम सुरळीत चालत नाहीं. त्याचप्रमाणें कधीं कधीं डायरेक्टर लोकांना त्यांच्या कामाबद्दल कांहीं मोबदला मिळत नसल्यामुळें तेही काम बरोबर करीत नाहींत. जगांत सर्वच लोक कांहीं निष्कामकर्ममार्गाचें आचरण करणारे नसल्यामुळें ह्या डायरेक्टर लोकांना त्यांनीं पेढीची नोकरी केल्याबद्दल त्यांच्या योग्यतेप्रमाणें कांहीं दिलेंच पाहिजे. तसें न दिलें तर पेढीचा व्यवहार हे लोक बरोबर पाहणार नाहींत हें उघड आहे.

असो. हीं वर सांगितलेलीं कारणें उत्पन्न झालीं म्हणजे पेढ्या डबघाईला येतात. पेढ्यांना जर दिवाळखोरी टाळावयाची असेल तर त्यांना वर सांगितलेले नियम पाळून दाखविलेल्या चुका टाळल्या पाहिजेत. कधीं कधीं वाईटांतून चांगलें

१०

निघतें, ह्या नियमाप्रमाणें दिवाळीं जेव्हां निघतात तेव्हां एकंदरींत राष्ट्राचा फायदाच होत असतो. कारण ह्या दिवाळ्यांमुळें वाईट कंपन्या किंवा पेढ्या नाहींशा होऊन शास्त्रीय पद्धतीनें चालणाऱ्या पेढ्याच तेवढ्या टिकतात. ज्या धंद्यांत नफा होत नाहीं अशा धंद्यांत लोक आपलें भांडवल न घालतां नवीन किफायतशीर धंद्यांत लोक तें भांडवल घालूं लागतात व मागणी व पुरवठा ह्यांत समतोलपणा पुनः दिसूं लागतो.

पेढ्यांचीं दिवाळीं निघणार अशा समजुतीमुळें उत्पन्न होणाऱ्या गडबडीचे वेळी पेढ्यांची स्थिति व त्यांनीं ठेवावयाचें धोरणः—आपलीं दिवाळीं निघणार अशा समजुतीनें जेव्हां लोकांत गडबड सुरू होते तेव्हां पेढ्यांनीं आपली पत वाढविली तर त्यांचा जसा फायदा होतो, तसा ती आंखडून धरण्यानें होत नाहीं. पेढीजवळ आपले पैसे ठेवणारे लोक हे तिच्याकडे तांतडीची पैशाची मागणी करतात. ह्याचें असें कारण असें आहे कीं, त्यांच्याकडे एक तर इतर लोक अशीच जोराची मागणी करतात, किंवा आपण जर प्रथम मागणी केली नाहीं तर आपल्या अगोदर दुसरा गृहस्थ मागणी करून तोच पैसे घेऊन बसेल व आपणांस कांहीं एक मिळणार नाहीं, असें त्यास भय असतें. तेव्हां ज्यांना पैसे द्यावयाचे असतात त्यांनाच जर कोठें इतरत्र पैसे मिळण्यासारखे असले तर ते आपल्या पेढीकडे फारशी मागणी करणार नाहींत किंवा त्यांच्याकडेच जर दुसऱ्यांनीं मागणी केली नाहीं तर ते त्या पेढीकडे आपले पैसे मागणार नाहींत व तिचें दिवाळें निघण्याचें भय राहणार नाहीं. तेव्हां दिवाळें निघण्याचे वेळीं जर परस्परांवरील विश्वास कायम असेल तर हें संकट ओढवणारच नाहीं. अशा वेळीं आपल्याजवळची गंगाजळी जवळ ठेवण्याचा पेढ्या जितका प्रयत्न करतात तितकी जास्त मागणी त्यांवर लोक करूं लागतात. इतकेंच नव्हे तर एखाद्या पेढीच्या ठेवी जर दुसऱ्या पेढीजवळ असल्या व त्या ठेवींची मागणी जर ती पेढी करूं लागली व दुसरी पेढी आपला हात आखडूं लागली तर तोच अनिष्ट परिणाम होऊं लागतो. कारण सर्वच पेढ्या आपणांकडे पैशाची मागणी होणार म्हणून ती पुरी करण्याकरितां जर जवळची गंगाजळी एकाच वेळीं वाढवूं लागल्या तर तें अशक्य होऊन, नको तें संकटच दत्त म्हणून पुढें उभें राहील. तेव्हां पेढ्यांनीं तरी हा गैरविश्वास टाकून देऊन लोकांत धैर्य उत्पन्न केलें पाहिजे व एकजुटीनें आपली पत वाढवून हें दिवाळखोरीचें संकट टाळलें पाहिजे.

हें संकट टाळण्यास एक राजमार्ग म्हणजे पेढ्यांनीं आपल्या बऱ्याच ठेवी दीर्घकाल मुदतीच्याच स्वीकाराव्या; म्हणजे सगळ्या ठेवीवाल्यांची एकदम मागणी सुरू होणार नाहीं व पेढयांना लोकांचे पैसे परत करणें सोपें जाईल. पेढीचें दिवाळें निघण्याचीं जीं अनेक कारणें आहेत, त्यांपैकीं एक कारण असें असतें कीं, बरेच ठेवीवाले लोक स्वभावानें भित्रे असतात. आपली ठेव बुडणार अशी त्यांची, निष्कारण का होईना, एकदां कल्पना झाली म्हणजे ते पेढीकडे धांव घेत सुटतात. अशा वेळीं मनुष्यानें आपल्या पैशाकरितां घाबरून जाणें हें अगदीं स्वाभाविक आहे, असें गृहीत धरून ठेवीवाले ठेवी मागण्यास आले असतांना बिलकूल न घाबरतां शांतपणानें पेढीच्या मॅनेजरनें ठेवीचे पैसे परत देण्यास प्रारंभ करावा; म्हणजे ठेवीवाल्या लोकांमध्यें असलेली भीति निराधार ठरून बाकीचे ठेवीवाले आपल्या ठेवी परत मागत नाहींत व पेढीवरचें संकट टळतें. वास्तविक म्हटलें म्हणजे ठेवीवाल्या लोकांनीं असा विचार करावा कीं, पेढी ही संस्था अत्यंत उपयोगी आहे व देशांतला व्यापार तिच्यामुळेंच वाढत असतो; पण ही गोष्ट पेढयांनीं व्यापाऱ्यांस पैसे दिले तरच शक्य आहे. नुसती रक्कम जवळ ठेवून देशाचें व्यापारी कल्याण होत नसतें. पेढया लोकांच्या ठेवी स्वीकारतांना त्या ठेवी एकाच वेळीं सर्व ठेवीवाले लोक परत मागणार नाहींत अशी त्यांची कल्पना असते. तेव्हां पेढीचें दिवाळें जर तिच्या गैरव्यवस्थेमुळें किंवा घोडचुकीमुळें निघत नसेल तर ठेवीवाल्या लोकांनीं आपलें डोकें शांत ठेवून नीट चवकशी करून मग आपले पैसे परत मागण्यास सुरुवात करावी. अशी शांत वृत्ति जर ठेवीवाल्यांनीं ठेवली तर पुष्कळ पेढीवाल्यांचीं दिवाळीं खास टळतील.

पेढयांनीं वर सांगितल्याप्रमाणें शांतपणानें ठेवी परत करण्याचें सुरू केल्या वर ज्यांच्या ठेवी परत करण्याबद्दल त्यांनीं पेढयांस अगाऊ सूचना द्यावी लागते व ज्यांच्या ठेवी ठराविक मुदतीच्या असतात अशा ठेवीवाल्यांनीं आपल्या ठेवी जर एकदम परत मागितल्या तर त्यांनीं त्यांना साफ नकारार्थी उत्तर द्यावें. अर्थात् हे लोक पेढयांवर जळफळतील, तिची सर्वत्र बदनामी करतील; पण ह्या निंदेस त्यांनीं भीक घालतां कामा नये व आपलें धोरण सोडतां कामा नये. पेढयांजवळ जर भरपूर पैसे असतील तर त्यांनीं नियतकालीन ठेवी तावडतोब परत कराव्यात; मात्र अगाऊ नोटीस न देतां पैसे मागितले असतांना कटमितीनें व्याज कापून मग रक्कम त्यांनीं परत करावी. ह्याचा परिणाम असा होईल कीं, लोकांत विश्वास उत्पन्न होऊन ते आपल्या

ठेवी परत मागणार नाहींत व इतर लोकांचेंही मन त्या परत न मागण्याबद्दल ते वळवितील.

सराफकट्ट्यावर व पेढीवर पैशाची मागणी ज्या वेळीं जोराची सुरू होते त्या वेळीं पेढीनें ठेवावयाचें धोरणः—सराफकट्ट्यावर जोराची पैशाची मागणी सुरू होते ह्याचा अर्थ असा होतो कीं, तिची मिती कापून घेऊन हुंड्या वटवितांना किंवा सरकारी रोख्यांवर कर्ज काढतांना पैसे मिळणें कठीण जातें. अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे हुंडणावळीचा दर प्रतिकूल होऊं लागतो व व्याजाचा दर वाढूं लागतो. हुंडणावळीचा दर प्रतिकूल होऊं लागला म्हणजे पेढ्यांना लोकांना कमी प्रमाणांत पैसे उसने देणें भाग पडतें व अशा रीतीनें पैसा दुर्मिळ होऊं लागला म्हणजे त्याची किंमत वाढते व व्याजाचा दर वाढूं लागतो.

आपण एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे कीं, ज्या वेळीं पेढीवर किंवा सराफकट्ट्यावर जोराची मागणी सुरू होते त्यावेळीं अगोदर सट्टेबाजी जोरांत सुरू झालेली असते. तेव्हां ती सट्टेबाजी सुरू होतांक्षणींच पेढीनें आपलें धोरण सावधगिरीनें ठेवलें तर पुढें फारशी अडचण तिला पडणार नाहीं. हें सावधगिरीचें धोरण म्हणजे ज्या वेळीं बाजारांत पैसा मुबलक असतो व इतर पेढ्या बेसावधपणें सट्टेबाजी चालू असतांना सढळ हातानें लोकांस पैसे उसने देत असतात त्या वेळीं ह्या पेढीनें धोक्याच्या हुंड्या किंवा तारणरोखे नाकारून बेताबातानें कर्ज देण्याचें धोरण ठेवावें; त्याचप्रमाणें ज्या कुळांची १०० नबरी खात्री नसते अशा कुळांकडून कर्जाची रक्कम परत मागून घ्यावी व जास्त मुदतीचें कर्ज देण्याच्या भानगडींत पडूं नये किंवा जे रोखे विकले असतांना पैसे मिळणें शक्य नाहीं किंवा पैशाची मागणी जोरांत सुरू झाल्यावर ज्याची किंमत उतरत नाहीं असे रोखे खरेदी करण्यांत तिनें आपले पैसे गुंतवूं नयेत. तात्पर्य सांगावयाचें एवढेंच कीं, आपली शिल्लक जास्त प्रमाणांत ठेवणें अशा प्रसंगीं सर्वथैव पेढीस इष्ट असतें.

पैशाची मागणी सराफकट्ट्यावर ज्या वेळीं जोरानें सुरू होऊं लागतें त्या वेळां पेढीजवळची शिल्लक तीन प्रकारांनीं कमी होऊं लागते. पेढीचे गिऱ्हाईक आपल्या ठेवी काढून घेऊं लागतात. कारण पेढी जें व्याज देत असते त्यापेक्षां

जास्त व्याज ह्या गिन्हाइकांना बाहेर मिळतें. हा एक प्रकार झाला. दुसरा प्रकार म्हटला म्हणजे ज्यांची पत फारशी नसते हेच लोक नव्हेत तर पेढीच्या दृष्टीनेंही ज्यांची पत शहाजोग आहे व जे चांगले श्रीमंत आहेत अशा प्रकारचे लोकसुद्धां पेढीकडे पैशाची मागणी करतात. तिसरा प्रकार म्हटला म्हणजे ज्यांचेजवळ पेढीनें काढिलेल्या नोटा असतात ते लोक नोटांबद्दल पैसे मागूं लागतात.

अशा वेळीं पेढीचे पैसे जर एखाद्या हुंडी दलालाकडे असले तर त्याच्या-कडून पैसे मागून घेण्याची जरूरी नाहीं; कारण ते पैसे वाटेल तेव्हां मिळण्या-सारखे असतात. जर त्या पेढीनें हुंडीबाजारामध्यें थोड्या मुदतीनें पैसे कर्जाऊ दिले असतील तर कर्जाची मुदत भरेल तेव्हां ती रक्कम त्या पेढीला मिळूं शकेल. हुंडीदलालाच्या हुंड्या मिती कापून घेऊन जर त्या पेढीनें वटविल्या असतील तर मुदत भरल्यावर त्याला पैसे मिळतील; पण नवीन हुंड्या तिनें वटवूं नयेत. इतकेंही करून जर त्या पेढीजवळ पुरेशी रोकड न जमेल तर तिनें सरकारी रोखे वगैरे विकून पैसा उत्पन्न करावा; पण नुकसानकारक कर्जाबद्दल मागणी करणें व आहेत त्या हुंड्या वटविण्याचें कमी करणें ह्या गोष्टी मात्र पेढीनें करूं नयेत. कारण कर्जाचे पैसे परत मिळत तर नाहींच; पण पेढीजवळ पैशाची तूट भासूं लागली आहे असा बभ्रा मात्र बाहेर होऊं लागतो.

पैशाची मागणी सुरू असतांना कांहीं लोक पेढीवाल्याकडे अशी विनंति करतात कीं, तुम्ही जर कांहीं रक्कम कर्जाऊ द्याल तर आपण आपलें पूर्वीच्या पेढीशीं असलेलें खातें बदलून तुमच्याकडे तें सुरू करूं. कांहीं भिऱ्या लोकांना त्यांच्या पूर्वीच्या पेढीनें पैसे कर्जाऊ द्यावयाचे नाकारल्यावर ते ताबडतोब ह्या नवीन पेढीकडे आपलें खातें घालण्याबद्दल अर्ज करितात. अशा वेळीं पेढीनें आपली शिल्लक बघून मोठ्या धोरणानें आपलें वर्तन ठेवावें. मात्र अशा वेळीं आपल्या जुन्या गिन्हाइकांना नाखूष करून दुसऱ्या पेढीच्या गिन्हाइकांना कर्जानें रकमा देण्याचें पाप ह्या पेढीनें करूं नये.

कधीं कधीं पैशाची मागणी जोराची सुरू असताना पेढीला असाहि अनु-भव येतो कीं, जे श्रीमंत व्यापारी आजपर्यंत बाजारांत पैसा विपुल असतांना आपल्या हुंड्या हुंडीदलालाकडून वटवून घेत होते तेच व्यापारी आतां पैशाची चणचण झाल्यामुळें व हुंडीदलाल पूर्वीप्रमाणें जास्त दरानें हुंड्या वटविण्याचें

नाकारूं लागल्यामुळें आपणाकडे येऊन हुंड्या वटविण्याची इच्छा करितात. पेढीला असें ठाऊक असतें कीं, अस्सल दर्जाच्या हुंड्या पैसा विपुल असतांना हुंडीदलालाकडे हे व्यापारी नेत असत व हलक्या दर्जाच्या हुंड्या मात्र आपणाकडे वटविण्यास आणीत असत. अशा वेळीं जर पेढीजवळ पैसा नसेल तर तिनें खुशाल ह्या हुंड्या वटविण्याचें नाकारावें; पण पैसा जर भरपूर असेल तर बाजारांतल्या चणचणीच्या वेळीं मागचा सूड उगविण्याच्या बुद्धीनें ह्या हुंड्या पेढीनें वटविण्याचें नाकारूं नये.

पैशाची मागणी जोराची सुरू असतांना ज्या पेढया लोकांना पूर्वीपासून त्यांच्या ठेवीबद्दल व्याज देत असतात त्या ठेवीबद्दल जास्त व्याज आतां ते लोक त्या पेढयांकडे मागत असतात. हें जास्त व्याज पेढयांनीं त्या लोकांना देणें कदाचित रास्त होईल. कारण पैशाची चणचण त्या वेळीं असते; पण प्रश्न असा उपस्थित होतो कीं, ह्या नवीन वाढलेल्या व्याजाच्या दरानें पेढयांनीं नवीन रकमा कर्ज म्हणून घ्याव्या काय? कारण ही चणचण जर अशीच वाढत गेली तर हेच लोक आपले पैसे काढून घेऊं लागतील किंवा जास्त व्याज मागूं लागतील. शिवाय पेढीनें आपला व्याजाचा दर वाढविला कीं, लोकांना असा खात्रीनें संशय येईल कीं, पेढीजवळची शिल्लक संपुष्टांत आलेली आहे व ह्याचा असा परिणाम होईल कीं, लोक आपले पैसे भराभर काढून घेतील.

आजपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, आणीबाणीची वेळ जाऊन पुनः स्थिरस्थावर झालें कीं, पैसा पुनः बाजारांत मुबलक होतो; पण ही आणीबाणीची वेळ केव्हां नाहींशी होते हें जर पेढयांना कळेल तर फार बहार होइल. पण तशी ती कळत नाहीं हीच मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

पेढीच्या कारभारांत सरकारनें संबंध ठेवावा काय:—हल्लींच्या युगांत सरकार इतकें प्रबळ झालें आहे कीं,प्रत्येक गोष्ट सरकारच्या मध्यस्तीशिवाय होत नाहीं. देशांत राजानें म्हणजे पर्यायानें सरकारनें तटस्थ राहून व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य देऊन स्वोन्नति करून घेण्याची मोकळीक द्यावी असें मत एके काळीं प्रचलित होतें; पण हल्लीं जर आपण जगांतील प्रत्येक राष्ट्राकडे नजर फेंकली तर आपणांस असें दिसून येईल कीं, सरकार हें परमेश्वरस्वरूपी व ' कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम् ' अशा थाटाचें बनलेलें आहे; तरीपण सरकारनें मनांत आणलेंच तर

त्याला प्रत्यक्ष ढवळाढवळ न करतां व्यक्तीला किंवा संस्थेला आपली वाढ करून घेतां येईल.

आर्थिक शास्त्रदृष्ट्या ह्या प्रश्नाचा जर आपण विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, पेढीचे व्यवहार करणें हा एक धंदा आहे व आपला असा अनुभव आहे कीं, ज्या धंद्यांत सरकार ढवळाढवळ करीत असते त्या धंद्याचा उत्कर्ष होत नसतो. अशा दृष्टीनें विचार केला तर पेढीच्या कारभारांत सरकारचा हात नसलेला बरा.

पेढ्या जेव्हां बाल्यावस्थेंत असतात तेव्हां सरकारनें आपली शिल्लक ठेवून त्यांच्याशीं फारसा संबंध ठेवूं नये व त्यांचे व्यवहार शास्त्रशुद्ध रीतीनें चालत नसल्यास त्यांच्याशीं त्यानें बिलकूल व्यवहार करूं नये. तथापि सरकारला आपली शिल्लक पेढ्यांजवळ ठेवावी असें वाटत असल्यास निदान एकाच पेढीजवळ ती ठेवून तिला नसतें महत्त्व देऊं नये; कारण अशी शिल्लक तिच्याजवळ ठेवल्यावर लोकही तिच्याजवळ आपले पैसे ठेवूं लागतील व इतर पेढ्यांना पुढें येण्याला वाव मिळणार नाहीं. शिवाय एकाच पेढीजवळ शिल्लक ठेवलेली असली व तिचे व्यवहार अशास्त्रीय पद्धतीनें चालत असले म्हणजे तिचें दिवाळें निघाल्यावर सरकारचें नाहक नुकसान होणार. तेव्हां आपली शिल्लक बऱ्याच पेढ्यांत ठेवलेली असली म्हणजे सरकारास जास्त सुरक्षितपणाचें वाटेल. पेढ्या जर वाईट असतील तर त्या बुडलेल्याच बऱ्या. त्यांना कर्ज वगैरे देऊन त्यांचें आयुष्य वाढविणें श्रेयस्कर नाहीं. वाईट पेढ्या बुडाल्या तर त्या कां बुडाल्या ह्याचीं कारणें शोधून काढून नवीन पेढ्या निर्माण होतील व त्या पूर्वीच्या चुका टाळतील. ज्या वेळीं पेढयांची वाढ झालेली असते व त्यांचे व्यवहार शुद्ध रीतीनें चाललेले असतात तेव्हां सरकारनें आपली शिल्लक त्यांना कर्ज म्हणून देण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें सरकारला कर्ज काढण्याचा प्रसंग आला असतांना एकाच पेढीकडून कर्ज काढणें बरें नसतें. कारण ती पेढी आपल्या दरानेंच त्याला कर्ज देईल व हा दर कदाचित् जबरही असूं शकेल. तेव्हां सरकारचा पेढ्यांशीं संबंध फारसा असूं नये व असलाच तर तो एकाच पेढीशीं असूं नये.

पेढयाचे बाबतींत सरकार वारंवार ढवळाढवळ करीत असल्यानेंच आजपर्यंत पेढीच्या व्यवहारांना अडथळाच आलेला आहे. ह्याचें कारण असें आहे

कीं, व्यापारी वर्ग व अधिकारी वर्ग ह्यांच्या द्रव्यविषयक कल्पना व ध्येय हीं नेहमीं भिन्न असतात. मूल जेव्हां अज्ञान असतें तेव्हां त्याच्या पालकानें प्रत्येक गोष्टींत सल्ला देऊन व प्रसंगविशेषीं ताडन करूनही त्याला शहाणें करण्याचा प्रयत्न करावा; पण तेंच मूल मोठें झाल्यावर व त्याला बरेंवाईट कळूं लागल्यावर बापानें "मित्रवत् आचरेत्" ह्याच मार्गाचा आश्रय करावा. त्याचप्रमाणें व्यापारी वर्गाला आपलें हिताहित उत्तम समजत असल्यामुळें त्याच्या भानगडींत सरकार जर न पडेल तर बरें होईल. पुष्कळदां व्यापार व उद्योगधंदा यांचे बाबतींत सरकारी अधिकारी अनभिज्ञ असल्यामुळें त्यांच्या कल्पना व हरहमेष व्यापारांत खेळलेल्या लोकांच्या कल्पना ह्यांत जमीनअस्मानचें अंतर असतें. शिवाय एखादा व्यापारी आपलें व्यापारी धोरण ठरवितांना कदाचित् चुकेल; पण ज्या वेळीं सर्व व्यापारी वर्गाचें एकमत होतें व सरकारचें मत निराळें असतें त्या वेळीं चुकतें कोणाचें हें सांगणें कठीण नाहीं. महायुद्ध संपल्यावर हिंदुस्थान सरकार जेव्हां विलायते-मधल्या स्टेट सेक्रेटरीवर उलट हुंड्या काढूं लागलें तेव्हां येथील सरकारचें हें करणें राष्ट्रविघातक आहे असें येथील व्यापारी वर्ग मुक्तकंठानें ओरडून सांगत होता. परंतु हिंदुस्थान सरकारला आपलें धोरण बदलावें असें वाटलें नाहीं. पण कालांतरानें सरकारला आपली चूक कबूल करावी लागली. तात्पर्य, पेढ्यांचे बाब-तींत सरकारचें पूर्ण ताटस्थ्याचें धोरण असणें श्रेयस्कर आहे. तथापि सर्वच पेढ्या कांहीं देवपेढ्या नसतात. प्रत्येक पेढी आपला व्यवहार जनहितदृष्टीनें चालवितें असें आमचें म्हणणें नाहीं व पेढ्यांचे व्यवहार क्रोडो रुपयांचे होत असल्यानें व एखादी पेढी चुकीच्या मार्गांनीं आपला व्यवहार पहात असली तर तिचें दिवाळें निघतें व हजारों लोकांचें नुकसान होण्याचा संभव असतो. म्हणून सरकारी नियंत्रण थोडेंबहुत असणें इष्टही आहे.

सरकार अनेक तऱ्हांनीं पेढीच्या व्यवहारांत हात घालूं शकतें. सरकारला जर अडचण पडली तर पेढ्यांकडून बळजबरीनें कर्ज काढण्याचा नेहमींचाच त्याचा रिवाज आहे. अशा रीतीनें सराफ बाजारांतून अधिकाराच्या जोरावर पैसा काढून घेण्यांत आला म्हणजे व्यापाराला साहजिकपणें हा पैसा अपुरा पडतो. तरी-पण हाच पैसा, इतर लोक ज्याप्रमाणें व्यापारी तत्त्वावर पेढ्यांकडून कर्ज काढितात त्याचप्रमाणें, सरकारनेंहि जर त्यांच्यापासून कर्ज म्हणून घेतला तर कोणासच तक्रार करण्यास जागा राहणार नाहीं. कारण हें कर्ज सरकार खजि

ऱ्यांत तूट पडल्यामुळें वाजवी कारणांकरितां घेत असतें. पण कर्ज काढावयाचें तें 'यावच्चंद्र दिवाकरौ' अशा तत्त्वावर काढावयाचें, किंवा तें तात्पुरतें असेल तर तें खूब मोठ्या प्रमाणांत काढावयाचें अशा धोरणानें जेव्हां सरकार पेढयांकडून कर्ज घेतें तेव्हां मात्र त्याचें करणें कधींहि न्याय्य होत नाहीं. सरकारला पैसा हवा असतो व पेढयांना जवळ पैसे पुरेसे नसल्यामुळें आपली नित्यांतली व सरकारची गरज भागविण्याकरितां नोटांचा प्रचार करावा लागतो. ह्या नोटा व्यापारी गरजा भागविण्याकरितां काढिलेल्या नसल्यामुळें देशांत फाजील प्रमाणांत खेळत असतात व त्या परत पेढयांकडे आल्या म्हणजे त्यांना लोकांना रोख नाणें देणें अशक्य होतें, व पेढयाही तें देण्याचें सरकारच्या परवानगीनें बंद करतात. ह्या फाजील प्रमाणांत काढिलेल्या नोटा कायदेशीर मानाव्या असें सरकारनें जाहीर केलें–व तसें तें आणीबाणीचे वेळीं जाहीरहि करीत असतें—म्हणजे व्यापारी लोकांना मूळचे झालेले करार पाळणें कठीण जातें. तथापि अशा प्रसंगीं ह्र प्रयत्नानें ह्या नोटांची किंमत पेढ्या फारशी उतरूं देत नाहींत हें त्यांना भूषणावह आहे.

सरकारनें पेढीकडून बळजबरीनें कर्ज काढल्याचीं उदाहरणें इंग्लंड, फ्रान्स, इटली वैगेरे देशांच्या इतिहासांत हवीं तेवढीं आढळून येतात. इंग्लंडमधील बँक तर १६९४ सालीं सरकारला एक मोठें कर्ज देऊनच जन्माला आली. नेपोलिअनशीं २५ वर्षे युद्ध चाललें असतांना इंग्लंडच्या मुत्सद्यांना अनेक वेळां ह्या पेढीकडे कर्ज काढण्याचा व त्यामुळें पेढीला जास्त नोटा काढण्याचा आणि लोक त्या नोटा घेऊन तिजकडे आले म्हणजे त्यांना रोख नाणें नाकरण्याचा प्रसंग आलेला आहे. फ्रान्सलाही असेच प्रसंग आलेले आहेत; पण बँक ऑफ् फ्रान्सच्या डायरेक्टरांनीं अनेक वेळां सरकारशीं झगडून त्यांनें मागितलेल्या रकमा त्याला देण्याचें टाळून आपली पत कायम ठेवली आहे. फ्रान्समध्यें हल्लीं बँक ऑफ् फ्रान्सच्या नोटांना जी किंमत आहे तिचें कारण हेंच होय. शिवाय ही पेढी सरकारी नसल्यानें तिचें फार कल्याण झालें आहे. फ्रँको–जर्मन युद्ध संपावयाचे वेळीं ती जर सरकारी असती तर जर्मन योद्धयांनीं ती केव्हांच जप्त केली असती; पण अर्वाचीन युद्धशास्त्रांतल्या नियमान्वयें ही पेढी खाजगी होती म्हणूनच जगली. प्रेसिडेंट थेर्स् नेहमीं असें म्हणत असे कीं 'फ्रान्सची पेढी सरकारी नव्हती म्हणूनच आम्ही जगलों.' कारण ज्या वेळीं फ्रेंच सरकारची व्यापारांत

बिलकूल पत राहिली नव्हती अशा वेळीं खाजगी लोकांच्या पतीवर नोटांची किंमत फारशी न उतरूं देतां फ्रेंच उद्योगधंदे व फ्रान्सचें उत्पन्न ह्यांची वाढ ह्या फ्रॉंको-जर्मन युद्धानंतर जर कोणीं केली असेल तर ह्या पेढीनेंच.'

आतांपर्यंत पेढयांकडून कर्ज काढून त्यांना नोटा प्रचारांत आणण्यास भाग पाडण्याच्या पद्धतीनें होणारे तोटे आपण पाहिले. पण ह्या प्रश्नाला चांगलीही बाजू आहे. सरकारला पैशाची गरज लागली असतांना त्यांनीं स्वतः नोटा काढाव्या किंवा पेढयांनीं नोटा काढाव्या असा प्रश्न आला असतांना पेढयांनींच त्या काढिलेल्या बऱ्या असा अनुभव आहे; कारण सरकारला ज्याप्रमाणें आपण काढिलेल्या नोटांबद्दल पैसे न देण्याचा मोह होतो, त्याप्रमाणें एक तर जवळ असलेल्या तारणरोख्यांतून किंवा इतर मालमत्तेंतून विकून पैसे उत्पन्न करितां येत असल्यामुळें व नोटांबद्दल पैसे नाकारण्याचा अधिकार नसल्यामुळें, पेढयांना तसें करतांच येत नाहीं व त्यामुळें लोकांना सरकारनें काढिलेल्या नोटांपेक्षां पेढयांनीं काढिलेल्या नोटाच जास्त पसंत पडतात असा कांहीं देशांतला अनुभव आहे.

ज्या वेळीं एखादी पेढी स्थापण्यांत येते त्या वेळीं तिला कांहीं विशिष्ट हक्क देतांना सरकार पैसे मागत असतें. असें पैसे मागणें हाही पेढयांच्या व्यवहारांत ढवळाढवळ करण्याचा एक प्रकार आहे. इंग्लंड, आस्ट्रिया, हंगेरी, रशिया किंवा जपान ह्या देशांतील प्रमुख पेढयांना राष्ट्रीय कर्जाची व्यवस्था पाहणें, तिजबद्दल बराच खर्च सोसणें व व्याज देणें या गोष्टी कराव्या लागतात. इतर देशांच्या पेढयांच्या मानानें बँक आफ् इंग्लंडच्या सरकारला आपणांस मिळालेल्या विशिष्ट हक्कांबद्दल हलके कर द्यावे लागतात, म्हणूनच त्या पेढीची भरभराट व स्थिरता विशेष आहे.

पेढीला आपले व्यवहार सुरू करूं देण्याबद्दल किंवा चालविण्याबद्दल कर देण्यास भाग पाडणें हें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें सर्वस्वीं श्रेयस्कर नाहीं. कारण हा पेढीवर बसलेला कर अप्रत्यक्षपणें लोकच देत असतात. हा कर लोकांना प्रत्यक्ष देणेंच जास्त परवडेल. कारण त्यामुळें खजिन्यांत जास्त पैसे येऊन लोकांना पुनः नित्य व्यवहारांत त्यांचा उपयोग करतां येईल. पेढ्या जेव्हां नोटा काढीत असतात तेव्हांसुद्धां त्यांना सरकारास कांहीं कर द्यावा लागतो. ज्या वेळीं कांहीं ठरा-

विक पेढ्यांनाच नोटा काढण्याचा मक्ता दिलेला असतो, त्या वेळीं सरकारनें थोडा कर वसूल केल्यास हरकत नाहीं. तरीपण एकंदरींत हा कर विनिमयसाधनावरच द्यावा लागल्यामुळें उद्योगधंद्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. भांडवल व उद्योगधंदे यांच्यावर कर बसविण्याची शास्त्रीय पद्धति म्हटली म्हणजे अशी असावी कीं, ह्या करामुळें भांडवलाच्या व उद्योगधंद्याच्या वाढीला प्रतिबंध कोठल्याही परिस्थितींत केव्हांही होतां कामा नये. सरकारला कर जर घ्यावयाचाच असेल तर उद्योगधंद्यांत पडलेल्या व्यापाऱ्याला त्याचा खर्चवेंच जाऊन राहणाऱ्या निव्वळ नफ्यांतूनच त्यानें घ्यावा; पण पेढ्यांचे बाबतींत कांहीं देशांतील सरकार हें तत्त्व अजीबात विसरतें. कांहीं देशांमध्यें भागीदारांना त्यांच्या भागांवर वेताचें व्याज दिल्यावर पेढ्यांना राहिलेल्या नफ्याचा अर्धा किंवा अर्ध्याहून जास्त नफा सरकार स्वतःच्या पदरांत टाकीत असतें. हा प्रकार म्हणजे निव्वळ जुलूम होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, हें सरकारचें धोरण कांहीं वाईट नाहीं. कारण भागीदारांस व्याज देऊन उरलेल्या नफ्याचा अर्धाअधिक भाग सरकार घेतें असें पेढ्यांना कळल्यावर लोकांकडून कर्जाऊ रकमांवर त्या जास्त व्याज घेणार नाहींत. कारण जास्त व्याज घेतलें तर त्यामुळें सरकारचा फुकटफाट फायदा होणार हें त्यांना माहित असतें; पण ह्या म्हणण्यांत फारसा अर्थ नाहीं. कारण सराफबाजारांत व्याजाचा दर खाजगी व समवायिक भांडवलवाल्यांच्या चढाओढीवर व मागणी व पुरवठा ह्या व्यापारी तत्त्वावर अवलंबून असतो. ज्या वेळीं देशांतून पैसा कांहीं कारणांनीं बाहेर जाऊं लागतो त्या वेळीं पेढयांना कटमितीचा दर वाढविलाच पाहिजे. मग सरकारचें नफा घेण्याचें प्रमाण कांहींही असो.

प्रकरण ९ वें

राष्ट्रांराष्ट्रांतील व्यापारी कर्जफेडीची पद्धत.

(Foreign Exchanges.)

आंतरराष्ट्रीय व्यापारी कर्जफेडः—प्रत्येक देशांत पेढ्या व्यापाऱ्यांनीं काढलेल्या हुंड्या कटमितीनें पैसे कापून घेऊन त्या अन्य देशच्या व्यापाऱ्यांना विकीत

असतात. हल्लीं हिंदुस्थानांत हा धंदा करणाऱ्या सराफी पेढ्या किती तरी आहेत. त्यांचें वर्णन पुढें करण्यांत येणारच आहे; पण त्यांच्या धंद्याचें महत्त्व योग्य रीतीनें आकलन करण्यास आपणांस त्यांच्या धंद्याची माहिती करून घेतली पाहिजे म्हणून हें प्रकरण आम्ही मुद्दाम लिहीत आहों.

हल्लीं प्रत्येक देशांत चालणारा व्यापार हा स्वराष्ट्रीय व परराष्ट्रीय अशा दोन प्रकारचा असतो. ज्या वेळीं व्यापार स्वदेशांतच चालला असतो त्या वेळीं जिनसांची किंमत फेडणें हें काम फारच सोपें असतें; कारण सर्व व्यवहार एकाच नाण्यांत होत असतो. पण परराष्ट्रीय व्यापाराची तशी गोष्ट नसते. सामान्यपणें आयात मालाची किंमत निर्गत मालाच्या किंमतीनें फिटून जाते; पण ही गोष्ट साध्य होण्यास आयात व निर्गत माल सारखाच किंमतीचा असला पाहिजे; तसा तो नसल्यास अर्थात्च त्या देशाला बाहेर सोनें पाठवावें लागेल किंवा निर्गत माल जास्त झाल्यास बाहेरून सोनें स्वीकारावें लागेल. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांनीं पाठविलेला माल जर त्यांनीं विलायतेच्या व्यापाऱ्यांकडून मागविलेल्या मालापेक्षां जास्त असेल तर त्यांना त्यांच्या मालाच्या किंमतीबद्दल रुपये, आणे, पैच मिळाले पाहिजेत. ह्याच्या उलट विलायतेच्या व्यापाऱ्यांना त्यांनीं पाठविलेल्या जास्त मालाबद्दल पौंड, शिलिंग, पेन्सच मिळाले पाहिजेत. अशा रीतीनें राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारी कर्जाची फेड वस्तूंच्या किंमतीच्या निरनिराळ्या देशांतील नाण्यांत रूपांतर होऊन मग होत असते.

हल्लीं एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राकडे आपला माल पाठविल्यावर तें राष्ट्र हुंडी काढीत असतें. ही हुंडी म्हणजे काय ह्याचें विवेचन मागें सविस्तर करण्यांत आलेलेंच आहे. येथें आम्हांस इतकेंच सांगणें आवश्यक दिसतें कीं, व्यापारी हुंडी म्हणजे एका माणसानें दुसऱ्या माणसास, तिसऱ्या माणसास पैसे देण्याबद्दल दिलेला लेखी हुकूमच होय. ह्या हुंड्यामुळेंच हल्लीं आंतरराष्ट्रीय व्यापार रोख पैशाच्या मदतीशिवाय मोठ्या प्रमाणांत चालत असतो. व्यापाऱ्यांनीं एकमेकांवर काढलेल्या हुंड्या गोळा करून विकणाऱ्या व त्यांवर नफा मिळविणाऱ्या पेढ्यांसारख्या संस्था किंवा दलाल सर्व देशांत सांपडतात व त्यामुळें व्यापाऱ्यांची सोय उत्तम तऱ्हेनें झालेली आपण पाहतों.

निरनिराळ्या राष्ट्रांतील नाण्यांच्या विनिमयाचा दरः—ह्या राष्ट्रांराष्ट्रांतील व्यापारी कर्जाच्या फेडीच्या पद्धतीपासून आपल्या देशांतील प्रचलित

नाण्यांची इतर देशांत काय किंमत आहे, स्वदेशांतून दुसऱ्या देशांत आपला पैसा पाठविण्यास किती खर्च येतो व आपणांस असलेलें दुसऱ्या देशाचें कर्ज किती किंमतीस फेडतां येईल ह्या सर्व गोष्टी सहज समजतात. एखाद्या विलायतेमधील माणसाला हिंदुस्थानांत आपले साव्हरीन पाठवावयाचे असले म्हणजे अर्थात्च त्याला ते साव्हरीन पाठविण्याचा कांहीं खर्च येणारच; इतकेंच नव्हे तर इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन देशांत एकच धातूचें नाणें प्रचलित नसल्यामुळें हिंदुस्थानांत जर चांदीचा भाव चढला असला तर त्या मानानें साव्हरिनची किंमतही उतरणार. ह्याचा अर्थ असा होतो कीं, राष्ट्रांराष्ट्रांतील व्यापारीकर्जफेडीचा दर ह्या सोन्या-चांदीच्या किंमतीवर व एका देशांतून दुसऱ्या देशांत पाठविण्यास लागणाऱ्या खर्चावर अवलंबून असतो. हल्लीं व्यापार आंतरराष्ट्रीय असल्यामुळें निरनिराळ्या देशांतील नाणीं एकत्र करून त्यांमध्यें शुद्ध सोनें किती असतें हें नक्की ठरलेलें असतें व नंतर त्या नाण्यांच्या विनिमयाचा दर ठरविलेला असतो. हल्लीं सरकारी कायद्यानें १ पौंडाची किंमत १० रुपये म्हणजे १ रुपया म्हणजे दोन शिलिंग असा दर ठरून गेलेला आहे; पण व्यवहारांत हें प्रमाण मुळींच आढळून येत नाहीं. तेव्हां निरनिराळ्या देशांतील नाण्यांच्या विनिमयाचा दर जर स्थिर रहावा असें वाटत असेल तर त्या देशांतील नाणें एकाच धातूचें असलें पाहिजे हें उघड आहे.

हा विनिमयाचा दर (Mint Par of Exchange) प्रत्यक्ष बाजारांत आढळून येणाऱ्या दराहून बऱ्हांशीं भिन्न असतो. विनिमयाचा दर हिशेबांत घेऊन प्रत्यक्ष सोनें एका देशांतून दुसऱ्या देशांत पाठविण्यास येणारा खर्च ठरविल्यावर मग हुंडणावळीचा दर ठरत असतो. पूर्वी सांगितल्याप्रमाणें हुंड्या विकत घेऊन पैसे पाठविण्यास येणारा खर्च जर रोख सोनें पाठवून येणाऱ्या खर्चापेक्षां जास्त असेल तर हुंड्या विकत घेण्याचे भानगडींत कोणी पडणार नाहीं हें स्पष्टच आहे.

हल्लीं दोन देशांतील व्यापारी एकमेकांचा माल खरेदीविक्री करतांना प्रत्यक्ष सोनें पाठवीत नाहींत. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आयातनिर्गत मालाची किंमत परस्पर फिटून जेवढें देणेंघेणें शिल्लक राहील तेवढेंच ह्या सोन्याच्या रूपानें फेडण्यांत येतें. हल्लीं बहुतेक देशांदेशांतील पैशाचे व्यवहार हुंड्या व चेक ह्यांचे मदतीनें होत असतात. एकाच देशांत एकच नाणें वापरणारे व्यापारी जेव्हां

आपसांत व्यवहार करीत असतात, तेव्हां नाणें किंवा चलनी नोटा ह्यांचा उपयोग करण्यास हरकत नाहीं; पण ज्या वेळीं दोन भिन्न देशांमध्यें व्यापारी उलाढाली होत असतात, त्या वेळीं हीं नाणीं किंवा प्रॉमिसरी नोटा व चेकसारखे पतीचे प्रकार फारसे उपयोगी पडत नाहींत. आयातनिर्गत मालाची किंमत परस्पर फिटून जी काय बाकी राहील ती सोन्याचांदीचे रूपानेंच पाठविली पाहिजे; पण प्रत्येक वर्षी निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपलें सोनें बाहेर पाठविणें म्हणजेसुद्धां बरेंच खर्चाचें काम आहे. तेव्हां हें सोनें बाहेर न पाठविण्याची खटपट प्रत्येक राष्ट्र करीत असतें. देशांतून सोनें बाहेर पाठविणें सर्वस्वीं बंद करणें कोठल्याही राष्ट्रास शक्य नाहीं; तथापि हल्लीं व्यापार आंतरराष्ट्रीय झालेला असल्यामुळें व एकमेकांवर हुंड्या काढण्याची पद्धत प्रचारांत येऊन त्या बेचनीय करतां येऊं लागल्यामुळें सोनें बाहेर जाऊं न देणें बरेंच शक्य कोटींतलें झालेलें आहे.

लंडनचें सर्व जगामध्यें असलेलें व्यापारी महत्त्वः––इंग्लंडचा व्यापार अतोनात वाढलेला असल्यामुळें व इंग्लंडमध्यें असलेल्या सोन्याच्या नाण्याची किंमत स्थिर व निश्चित असल्यामुळें हल्लीं लंडन शहरावर इतर राष्ट्रांतील व्यापारी किती तरी हुंड्या काढीत असतात. इतकेंच नव्हे तर चीन देशांतील व्यापाऱ्यांनीं ब्रेझिल येथील व्यापाऱ्यांकडून कांहीं माल मागविला तर ब्रेझिलच्या व्यापाऱ्यांना चीनच्या व्यापाऱ्यांवर हुंड्या काढण्यापेक्षां लंडन येथील व्यापाऱ्यांवरच हुंड्या काढणें परवडतें. लंडन शहराला एवढें महत्त्व येण्याचें मुख्य कारण असें दिसतें कीं, जगांतल्या कोठल्याही व्यापाऱ्याला आपली हुंडी घेऊन गेलें असतांना ह्याच ठिकाणीं हवें तेवढें सोनें मिळतें. जर्मनी, फ्रान्स वगैरे देशांकडे आपण नजर फेंकली असतांना आपणांस असें दिसून येईल कीं, तेथील साम्राज्यपेढ्या व सरकार देशांतील सोनें बाहेर पाठविण्याचा प्रसंग हरतऱ्हेनें टाळीत असतात. तेव्हां एकंदरीनें पाहतां लंडनमध्येंच सोन्याची खुली व्यापारी पेठ आहे. हल्लीं जगांतील सर्व व्यापाऱ्यांचा लंडनशीं संबंध येत असतो; त्यामुळें ज्या हुंड्यांचे पैसे लंडनमध्यें मिळतील अशा हुंड्या त्या शहरावर काढण्याची चाल पडलेली आहे. अशा तऱ्हेनें काढलेल्या हुंड्या जर शहाजोग असल्या तर कोठेंही व केव्हांही त्या स्वीकारल्या जातात व त्यांचा उपयोग आंतरराष्ट्रीय चलन म्हणून होत असतो. ह्या हुंड्या अतिशय मोठ्या प्रमाणांत काढल्या जात असल्यामुळें ज्या कोणाला इंग्लंडला पैसे पाठवावयाचे असतील तो ह्या हुंड्या विकत घेतो व हुंड्या

घेऊन येणाऱ्या माणसाला तावडतोब पौंड मिळतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सर्व जगांतील कर्जाची फेड या शहरीं होत असते. महायुद्धाचा असा एक परिणाम झालेला आहे कीं, लंडन शहरचें हें व्यापारी महत्त्व कांहींसें कमी होऊन न्यूयार्कला तें महत्त्व आलेलें आहे.

निरनिराळ्या देशांतील सोन्याचांदीच्या नाण्यांचा विनिमयाचा दरः—वर सांगितलेंच आहे कीं, दोन देशांतील नाण्यांचा दर हा त्या नाण्यांत असलेल्या सोन्याचांदीवर अवलंबून असतो. सर्व जगामध्यें एकाच किंमतीचें नाणें प्रचारांत असतें तर किती बरें झालें असतें? पण ही गोष्ट हल्लींतरी अशक्य कोटींतलीच आहे. स्वतःचें नाणें पाडणें व तें प्रचलित करणें हें सार्वभौमत्वनिदर्शक असें मानण्याचा परिपाठ पडल्यामुळें प्रत्येक स्वतंत्र देशाचें सरकार स्वतःचें नाणें सुरू करीत असतें. खुद्द हिंदुस्थानमध्येंच पूर्वी एकछत्री राज्यसत्तेच्या अभावीं कितीतरी नाणीं प्रचारांत होतीं. अशीं नाणीं प्रचारांत असल्यानें व तीं नाणीं ठराविक वजनाचीं नसल्यामुळें व्यापारास निष्कारण प्रतिबंध होतो ही गोष्ट त्या वेळचे लोकांस अज्ञात होती. असो. हल्लीं सुधारलेल्या देशांमध्यें जीं नाणीं प्रचारांत असतात त्यांचें वजन व त्यांत असलेल्या धातूचें प्रमाण हीं सर्व निश्चित असतात; पण व्यापारी व्यवहारांत ह्या नाण्यांवर असलेल्या किंमतीस कोणी विचारीत नाहीं. हिंदुस्थानांतला १ रुपया जरी ह्या देशांत १६ आणे किंमतीचा समजला जातो तरी अन्य देशांत त्या रुपयांत प्रत्यक्ष असलेल्या चांदीच्या किंमतीइतकीच त्याची किंमत समजली जाते. तात्पर्य, अन्य देशीचें नाणें अटवूनच त्याच्यांत जेवढी धातू निघेल तितकी त्या नाण्याची किंमत समजली जाते. दोन देशांत जर एकाच धातूचीं नाणीं पाडण्यांत आलीं व त्यांचें वजन व सफाई हीं जर परिपूर्ण असलीं तर एकमेकांची सापेक्ष किंमत सहज ठरवितां येते. ह्याच सापेक्ष किंमतीला दोन देशांतील नाण्यांचा विनिमयाचा दर अशी संज्ञा आहे. उदाहरणार्थ, फ्रान्स व इंग्लंड हे दोन देश घेतले तर ह्या दोन देशांत पाडलीं जाणारीं नाणीं एकाच धातूचीं म्हणजे सोन्याचीं असतात. आतां इंग्लंडमधील १ पौंडांत जितकें सोनें आपणांस सांपडतें तितकेंच सोनें हवें असल्यास फ्रान्समध्यें २५·२२१५ः फ्रँक आपणांस द्यावें लागतात; म्हणजे फ्रान्स व इंग्लंड ह्या दोन देशांतील नाण्यांचा विनिमयाचा दर २५·२२१५ः फ्रँक=१ पौंड किंवा जर्मनी व इंग्लंड हे दोन देश घेतले तर २०.४३ मार्क=१ पौंड असा दर होईल.

हा दर नेहमीं कायमच असतो अशांतला भाग नाहीं. कधीं कधीं एखाद्या देशाचीं नाणीं हिणकस बनूं लागतात. अशा वेळीं हा दर अर्थातच कायम राहणें शक्य नाहीं; म्हणून प्रत्येक देशांत हे दर व्यापारी नियतकालिकांत प्रसिद्ध होत असतात.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, हा विनिमयाचा दर निश्चित होण्यास दोन देशांतील नाणीं एकाच धातूचीं असावीं लागतात. तसा जर प्रकार नसेल तर विनिमयाचा दर ठरविणें कष्टदायक होईल. चीन व जर्मनी ह्या दोन देशांत अनुक्रमें भिन्न धातूचीं म्हणजे चांदीचीं व सोन्याचीं नाणीं आहेत. सोन्याच्या मानानें चांदीची किंमत नेहमीं बदलत असल्यानें ह्या दोन देशांतील नाण्यांचा विनिमयदर ठरविणें अशक्यप्राय होऊन बसतें. आपल्या हिंदुस्थानचें इंग्लंडशीं तुलना करतांना जरी उदाहरण घेतलें तरी आपणांस हाच अनुभव येतो. साव्हरिन व रुपया ह्या दोन नाण्यांचा विनिमयाचा दर निश्चित राहणें शक्य नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, इंग्लंडमध्यें सोन्याकरितां टांकसाळ खुली आहे. कोणीही माणूस सोनें घेऊन गेला असतांना त्याला नाणीं पाडून मिळतात. त्याचप्रमाणें पौंड हें नाणें सरकारी देणें देतांना अमर्याद प्रमाणांत स्वीकारण्यांत येतें; पण चांदीची स्थिति अशा प्रकारची नाहीं. एखादा इसम जर चांदी घेऊन टांकसाळेंत गेला तर त्याला सरकार शिलिंग व हाफ् क्राऊन पाडून देणार नाहीं. हीं नाणीं पाडण्याचा अधिकार सर्वस्वीं सरकारनें आपल्या हातांत ठेवलेला आहे. तसेंच सरकार लोकांना आपला कर ह्या चांदीच्या नाण्याचे रूपांत मर्यादित प्रमाणांतच देण्याची परवानगी देते. तेव्हां इंग्लंडमध्यें चांदीला सोन्याप्रमाणें महत्त्व नसून इतर जिनसांप्रमाणेंच तिची खुल्या बाजारांत खरेदीविक्री होत असते. सोनें व चांदी ह्या धातूंच्या किंमतींत कांहीं ठराविक नातें रहात नसल्यामुळें त्यांच्या नाण्यांचा विनिमयाचा दरही निश्चित रहाणें शक्य नाहीं.

आतां कोणी अशी शंका काढील कीं, हिंदुस्थानांत रुपया जरी प्रचारांत असला तरी सोन्याची मोहर तरी चालतें कीं नाहीं ? मग हें सोन्याचें नाणें सुरू असतांना हा देश व इंग्लंड ह्यामध्यें विनिमयदर असण्यास काय हरकत आहे ? ह्या प्रश्नाला उत्तर एवढेंच आहे कीं, मोहर हें नाणें हिंदुस्थानांत कायदेशीर मानण्यांत येत नाहीं. मोहर हा एक प्रकारचा सोन्याचा रुपयाच आहे. तेव्हां साव्हरिनप्रमाणें तिची किंमत निश्चित ठरलेली नाहीं. ही मोहर हिंदुस्थानांत फार दिवसांपासून आहे म्हणून ती प्रचारांत आहे व ठराविक खर्च घेऊन सरकार

लोकांच्या सोयीकरितां नवीन नवीन मोहरा पाडीत असते; पण सोन्याचें एक पदक ह्यापलीकडे त्याची फारशी योग्यता नाहीं.

कांहीं पारिभाषिक शब्द—चढता व उतरता दरः—मागें एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, सांप्रतकाळीं व्यापाराची प्रचंड उलाढाल रोख नाण्याचा उपयोग न होतां नुसत्या व्यापारी हुंड्यांवर होत असते. ह्या हुंड्या विकत घेणें किंवा विकणें हें हल्लीं पेढ्यांचें व दलालांचें प्रमुख कामच होऊन बसलेलें आहे. जिनसांच्या क्रयविक्रयाचा असा एक सामान्य नियम आहे कीं, जिन्नस विकत घेणारा तो जितक्या स्वस्त किंमतींत मिळेल तितक्या स्वस्त किंमतीला विकत घेत असतो. ह्याच्या उलट विकणारा गृहस्थ आपणांस त्या जिनसेची जितकी जास्त किंमत मिळेल तितकी मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. हाच नियम पेढ्या किंवा हुंड्यादलाल हुंड्या विकत घेतांना व विकतांना अमलांत आणीत असतात. ह्याच नियमाला इंग्रजी भाषेंत Buy High and Sell Low असें नांव आहे. ह्याचा अर्थ असा होतो कीं, एखाद्या मुंबईच्या व्यापाऱ्यानें विलायतेच्या व्यापाऱ्यावर पौंड, शिलिंग, पेन्सांत एखादी हुंडी काढली व ती हुंडी मुंबईच्याच दुसऱ्या व्यापाऱ्यानें विकत घेण्याचें मनांत आणलें तर त्याला हुंडणावळीचा दर वाढला असेल तेव्हांच ती हुंडी खरेदी करणें फायदेशीर होईल. कारण त्याला जास्त पौंड तेवढेच रुपये भरून मिळूं शकतील; पण उलटपक्षीं ती हुंडी विकणाऱ्या पहिल्या व्यापाऱ्याला तो जितका कमी असेल तितका फायदेशीरच आहे. कारण त्याच्या हुंडींत लिहिलेल्या पौंडांबद्दल हुंडणावळीचा दर कमी असल्यामुळें जास्त रुपये त्याला मिळूं शकतील.

अनुकूल व प्रतिकूल दरः—ह्या विषयावर पूर्वीं एकदां विवेचन आलेलेंच आहे. ह्याचा सामान्यपणें असा अर्थ होतो कीं, ज्या देशाला हुंडणावळीचा दर अनुकूल असतो, त्या देशामध्यें अन्य देशच्या व्यापाऱ्यांनीं आपला माल ह्या देशांत जास्त पाठविल्यामुळें व ह्या देशावर काढलेल्या हुंड्यांची किंमत अर्थातच उतरूं लागल्यामुळें त्यांना त्या हुंड्या विकणें परवडत नाहीं व ते ह्या देशांत सोनें पाठविणेंच जास्त पसंत करतात. ह्याच्या उलट ज्या वेळीं एखाद्या देशांत हुंडणावळीचा दर प्रतिकूल असतो त्या वेळीं त्या देशांत निर्गत मालापेक्षां आयात माल जास्त झालेला असतो व त्यामुळें आयात मालाच्या व्यापाऱ्यांना जास्त

हुंड्यांची गरज असते आणि निर्गत मालावर काढलेल्या हुंड्या अर्थातच कमी असल्यामुळें ह्या खरेदी करण्यांत चढाओढ सुरू होते व त्यांची किंमत चढूं लागते; पण ही किंमत जर जास्तच चढूं लागली तर आयात मालाच्या व्यापाऱ्यांना देशांतून सोनें बाहेर पाठवावें लागतें. तेव्हां देशाला हुंडणावळीचा दर अनुकूल असला म्हणजे देशांत सोनें बाहेरून येऊं लागतें व तोच दर ह्या देशाला प्रतिकूल होऊं लागला म्हणजे तें सोनें देशांतून बाहेर जाऊं लागतें.

हल्लीं बहुतेक व्यापारीराष्ट्रांत व्यापाऱ्यांनीं आपला माल पाठविल्यावर काढिलेल्या हुंड्या ते स्वतः बाहेरून माल मागविण्याऱ्या व्यापाऱ्यांना विकीत नाहींत. हें काम हल्लीं पेढ्या किंवा हुंड्यादलालाच करीत असतात. इंग्लंडनें तर ह्या कामांत फारच मोठी आघाडी मारलेली आहे. इंग्लंडचा पक्का माल सर्व राष्ट्रांत जात असतो व इतर राष्ट्रांच्यामानानें हा देश व्यापाराचे बाबतींत पुढें आहे. तसेंच कापूस वगैरेसारख्या कच्चा माल ह्या देशांत अतिशय प्रमाणांत येत असल्यामुळें इंग्लंडवर काढलेल्या हुंड्या सर्व जगांत लोकप्रिय असतात. शिवाय लंडनमध्यें सोन्याच्या निर्गतीला केव्हांही बंदी नसल्यामुळें ह्या शहरांवर नेहमीं हुंड्या काढण्यांत येतात व त्या हुंड्या विकत घेण्याचा धंदा करणाऱ्या संस्था, इतकेंच नव्हे तर आपल्या सचोटीची लोकांना खात्री पटविल्यामुळें प्रसिद्धीस आलेल्या अशा हुंड्या सचकारण्याचा धंदा करणाऱ्या संस्थाही, (Accepting Houses) इंग्लंडमध्यें बऱ्याच आहेत. हिंदुस्थामध्येंहि ह्या सराफी पेढ्या बऱ्याच आहेत व त्यांचें काम काय असतें ह्याची माहिती पुढें देण्यांत येणार आहे.

ह्या पेढ्यांचें व दलालांचें काम म्हणजे निर्गत मालाच्या व्यापाऱ्यांकडून हुंड्या विकत घेऊन आयात मालाच्या व्यापाऱ्यांना त्या विकणें हें असतें. ह्या पेढ्यांच्या शाखा इतर देशांत स्थापन केलेल्या असतात, आणि ह्या पेढ्या त्या शाखांवर हुंड्या काढतात किंवा त्यांनीं आपणांवर काढलेल्या हुंड्या स्वीकारतात. कधीं कधीं निर्गत मालाच्या व्यापाऱ्यांच्या हुंड्या जास्त असल्या तरी ह्या पेढ्या आयात मालाच्या व्यापाऱ्यांना नको असूनहि त्या हुंड्या विकत घेतच असतात. कारण ह्या देशांत त्यांची गरज नसली तरी दुसऱ्या कोठल्या तरी देशांत त्यांची गरज असणार; व तेथें त्या पाठविल्यावर त्यांबद्दल पैसे मिळणारच हें त्या

पेढ्यांना ठाऊक असतें. उलटपक्षीं निर्गत मालाचे व्यापाऱ्यांनीं जितक्या हुंड्या विकण्यास काढल्या असतील त्यांहून जास्त हुंड्यांची गरज जर आयात मालाचे व्यापाऱ्यांना असेल तर त्यांना जितक्या हुंड्या लागतील तितक्या हुंड्या त्या पेढ्या जास्त दर आकारून विकीत असतात व त्या हुंड्यांचे पैसे भरण्याकरितां त्या स्वतः रकमा पाठवीत असतात. कारण त्यांना असा पैसा बाहेर पाठविणें व आंत आणणें हें जास्त सोपें असतें; म्हणून त्यांचा तो धंदाच होऊन बसलेला आहे. कधीं कधीं ह्या पेढ्या निर्गत मालाच्या व्यापाऱ्यांनीं काढलेल्या फाजील हुंड्या उगीच घेऊन ठेवीत असतात. कारण व्यापारांत नेहमीं उलाढाल होत असल्यामुळें आयात मालाच्या व्यापाऱ्यांना जास्त हुंड्यांची गरज असली म्हणजे त्या वेळीं फायदेशीर रीतीनें त्या पेढ्यांना त्या हुंड्या विकतां येतात. केव्हा केंव्हां ह्या पेढ्या ह्या जास्त विकत घेतलेल्या हुंड्या इतर देशांत आपल्या शाखांकडे पाठवितात व त्या विकून त्यांचेजवळ ठेवण्यास त्यांना सांगतात. ज्या वेळीं देशांत पैसा विपुल असतो व त्यामुळें व्याजाचा दर उतरलेला असतो आणि परदेशांत त्याची टंचाई असते त्या वेळीं त्या पेढ्या निर्गत मालाच्या व्यापाऱ्यांनीं काढलेल्या हुंड्या भराभर विकत घेतात व त्या देशांत त्या हुंड्या पाठवून देतात व अशा रीतीनें बराच नफा त्या पेढया मिळवीत असतात.

अल्प व दीर्घ मुदतीचे दरः—मागें सांगितल्याप्रमाणें हुंडयांचे, दर्शनी व मुदतीच्या हुंडया, असे दोन प्रकार असतात. दुसऱ्या प्रकारच्या हुंडींत मुदत संपल्यावरच तिचे पैसे मिळावयाचे असल्यामुळें, दर्शनी हुंडी व मुदतीची हुंडी ह्यांच्या किंमतीमध्यें फरक पडत असतो. पहिली गोष्ट म्हणजे मुदतीच्या हुंडीवर व्याज आकारण्यांत येतें. एखादी हुंडी जर १०० रुपये किंमतीची असली व तिचे पैसे ६ महिन्यांनीं मिळावयाचे असले तर व्याजाचा दर दरसाल दर शेंकडा १२ टक्के असल्यास त्याला १०६ रुपये मिळूं शकतील. तेव्हां व्याज ही एक मुदतीच्या हुंडीच्या बाबतींत महत्त्वाची बाब मानलेली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे हुंडी जर परराष्ट्रीय असली तर तिच्यावर त्याला स्टँप लावावा लागतो व त्याबद्दल त्याला थोडा खर्चही येतो. तसेंच ताबडतोब पैसे न स्वीकारतां कांहीं मुदतीनें पैसे स्वीकारण्यास जेव्हां एखादा व्यापारी किंवा एखादी पेढी कबूल होते तेव्हां मुदतीनें पैसे देण्याचें कबूल करणाऱ्या माणसाची पत काय आहे हा एक महत्त्वाचा प्रश्न असतो. पैसे देणाऱ्या माणसाची जितकी जास्त पत तितकी

कमी भीति मुदतीनें पैसे स्वीकारणाऱ्या माणसाला असते; व तितके कमी पैसे तो त्या मुदतीच्या हुंडींत आकारीत असतो.

ह्या अल्प व दीर्घ मुदतीच्या दरासंबंधानें एक महत्वाचा नियम वाचकांनीं लक्षांत ठेवला पाहिजे, तो नियम असा. ज्या वेळीं एका देशचा व्यापारी दुसऱ्या देशावर हुंडी काढीत असतो व हुंडणावळीचा दर त्या दुसऱ्या देशच्या नाण्यांत दिलेला असतो, त्या वेळीं दीर्घ मुदतीचा दर नेहमीं अल्प मुदतीच्या दरापेक्षां जास्त असतो; ह्याच्याउलट ज्या वेळीं त्या हुंडीचा दर हुंडी काढणारा ज्या देशचा असेल त्या देशच्या नाण्यांत दिलेला असतो, त्या वेळीं दीर्घ मुदतीचा दर अल्प मुदतीच्या दरापेक्षां नेहमीं कमी असतो. आपण अशी कल्पना करूं कीं, मुंबईच्या एका व्यापाऱ्यानें लंडनच्या व्यापाऱ्यावर तेथील प्रचलित नाण्याच्या दरांत एक हुंडी काढिलेली आहे. ही हुंडी तीन महिन्यांच्या बोलीची असून तिचे पैसे लंडनमध्यें मिळावयाचे आहेत. ही हुंडी मुंबईच्या दुसऱ्या एका व्यापाऱ्यानें विकत घेऊन ती बँकेकडे पाठवून दिली. अशा वेळीं व्यापाऱ्याला तावडतोब जेवढे पौंड मिळतील त्यांपेक्षां तीन महिन्यांनीं त्याला जास्त पौंड मिळतील हें उघड आहे. कारण दर्शनी दरांत लंडनमधील बँकेचा व्याजाचा दर, स्टँपचा खर्च वगैरे मिळवून मग दीर्घ मुदतीचा दर बनत असतो. ह्याच्याउलट हुंडीचा दर मुंबई येथील प्रचलित नाण्यामध्यें म्हणजे रुपयांत दर्शविलेला असल्यामुळें व त्या हुंडीचे पैसे तो व्यापारी तावडतोब देत असल्यामुळें त्याला लंडन येथील दराप्रमाणेंच व्याज, स्टँपचा खर्च वगैरे कांहीं एक द्यावें लागणार नाहीं. म्हणून दर्शनी दर हा दीर्घ मुदतीच्या दरापेक्षां केव्हांही जास्तच राहील. असो; हाच नियम निराळ्या तऱ्हेनें मांडावयाचा असल्यास असा मांडतां येईल.

ज्या वेळीं हुंडणावळीचा दर परदेशांतील नाण्यांत दिलेला असतोः—

दीर्घ मुदतीचा दरः—दर्शनी दर + परदेशीय बँकेचा व्याजाचा दर + परदेशी स्टँपचा खर्च + मुदतीनें पैसे मिळावयाचे म्हणून असलेल्या धोक्याबद्दल कांहीं जादा रक्कम.

हुंडणावळीचा दर हुंडी काढणाऱ्या देशांतील नाण्याच्या दरांत दिला असतांनाः—

दीर्घ मुदतीचा दरः—दर्शनी दर—परदेशीय बँकेचा व्याजाचा दर—परदेशी स्टँपचा खर्च—धोक्याबद्दल रक्कम.

हुंडणावळीच्या दरांतील फरकः—आतां असा प्रश्न उपस्थित होतो कीं, हुंडणावळीच्या दरांत नेहमीं फरक कां पडावा? ह्या प्रश्नाचें उत्तर सोपें नाहीं. ह्या दरांत फरक पडण्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं, निरनिराळ्या देशांत प्रचारांत असलेलीं नाणीं एकाच प्रकारचीं नसतात. त्यांच्यांत असलेली धातू एकाच दर्जाची नसते. त्याचप्रमाणें प्रत्येक देशांत चलनी नोटा, बँक नोटा किंवा हुंडया ह्यांचेमोबदला नाणें तावडतोब मिळणें सारखेंच सुलभ नसतें.

दुसरें कारण म्हणजे दोन व्यापारीराष्ट्रांतील नुसतें अंतर हें होय. मुंबई व कलकत्ता ह्या दोन शहरांत एकच नाणें म्हणजे रुपया प्रचलित आहे. पण ह्या दोन शहरांत १२२३ मैलांचें अंतर असल्यामुळें कधीं व्यापारीपरिस्थिती-मुळें कलकत्त्यास रुपये दुर्मिळ झाले म्हणजे ह्या दरांत फरक पडूं लागतो. त्याच-प्रमाणें आस्ट्रेलिया व इंग्लंड ह्या दोन देशांत जरी सॉव्हरीनसारखें एकच नाणें प्रचारांत आहे तरी दोन देशांत हजारों मैलांचें अंतर असल्यामुळें दोन देशांतील हुंडणावळीच्या दरांत नेहमीं फरक पडत असतो. तिसरें कारण म्हणजे हुंडयांचा पुरवठा व मागणी हें होय. ह्याविषयीं चर्चा मागें एकदां आलेलीच आहे. आपला नेहमींचा अनुभव असा आहे कीं, बाजारांत ज्या मानानें मालाचा पुर-वठा व त्याला मागणी असेल त्या मानानें त्याची किंमत ठरत असते. हाच नियम व्यापारी हुंड्यांना लागू पडत असतो. कांहीं कारणांनीं हुंडयांचा पुरवठा कमी असला व त्यांची मागणी वाढूं लागली तर त्यांची किंमत वाढूं लागते; उलट पुरवठा जास्त होऊं लागून मागणी कमी होऊं लागली म्हणजे अर्थातच त्यांची किंमतहि उतरूं लागते आणि पुनः जर मागणी व पुरवठा ह्यांचें प्रमाण समतोल झालें तर त्याची किंमतही स्थिर होऊं लागते. येथें एका गोष्टीचा उल्लेख करणें जरूर आहे. ती गोष्ट ही कीं, हुंडणावळीचा दर हा दोन देशांतील व्यापारीनिमित्त काढल्या जाणाऱ्या हुंडयांची मागणी व पुर-वठा ह्यांच्यावरच अवलंबून नसतो तर एक देश व इतर सर्व देश ह्यांच्यामध्यें चालणाऱ्या व्यापारानिमित्त काढल्या जाणाऱ्या हुंडयांवरही तो अवलंबून असतो. अमेरिकेचा, इंग्लंडशीं होणारा व्यापार, नेहमीं दांडगा असतो; व त्यामुळें अमे-रिकेला इंग्लंडवर नेहमीं अधिक हुंडया काढाव्या लागतात. तथापि अमेरिकेला ब्राझिलकडून नेहमीं कच्चा माल अधिक प्रमाणांत मागावा लागत असल्यामुळें

ब्रेझिलला अमेरिकेवर हुंडया जास्त प्रमाणांत काढाव्या लागतात. उलटपक्षीं इंग्लंडचा माल ब्रेझिल देशांत अधिक येत असल्यामुळें त्या देशाला इंग्लंडनें काढलेल्या हुंडया अधिक प्रमाणांत स्वीकाराव्या लागतात. अशा तऱ्हेनें एक-मेकांवर काढलेल्या हुंडयांनीं आंतरराष्ट्रीय कर्जाची फेड झाल्यावर मग ज्या हुंडया शिल्लक राहतील त्यांच्यावरच दोन देशांतील हुंडणावळीचा दर अव-लंबून राहील.

आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, विशिष्ट प्रसंगीं हुंड्यांचा पुरवठा कमी जास्त कां होऊं लागतो ? एखाद्या देशांत जर व्यापार नेहमीं चालत असतो तर ह्या हुंड्या कमीजास्त कां होत असतात ? हा प्रश्न महत्वाचा आहे. ह्याचा सूक्ष्म-पणानें विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, एखाद्या देशाला दुसऱ्या देशांत पैसे पाठवावे लागतात, ह्याचें कारण त्या देशचा व्यापार हें होय. पहिल्या देशानें दुसऱ्या देशास कांहीं माल पाठविला म्हणजे तो देश माल स्वीकारणाऱ्या देशावर अर्थातच हुंडया काढतो. त्याचप्रमाणें कांहीं माल उलट दुसऱ्या देशाकडून पहिल्या देशाकडे पाठविला जातो व हुंडयाही काढल्या जातात. तेव्हां आयात व निर्गत ह्या दोन मालांपैकीं जर एक माल दुसऱ्याहून जास्त झाला तर ह्या व्यापारी हुंडया कमीजास्त होतात व हुंडणावळीचा दर कमीजास्त होत असतो.

आयातनिर्गत मालाशिवाय मालाची नेआण करण्याकरितां जहाजांस द्यावें लागणारें भाडें ही एक बाब हुंडया काढणाऱ्या बाबतींत असते. प्रत्येक राष्ट्राचा जलमार्गानें होणारा व्यापार थोडयाबहुत प्रमाणांत असतोच. हा व्यापार ज्या मालाचा होत असतो तो माल नेण्याबद्दल व आणण्याबद्दल त्या राष्ट्राला जें भाडें मिळतें तें भाडें मालाच्या रूपानें तें राष्ट्र माल पाठविणाऱ्या राष्ट्राकडून घेत असतें व हा माल पाठविल्यावर अर्थातच त्याबद्दल हुंडया पाठविल्या जातात. ह्या बाबतींत इंग्लंडचें उदाहरण घेण्यासारखें आहे. इंग्लंडचा आयात माल निर्गत मालापेक्षां नेहमीं जास्त असतो. ह्यावरून भोळेभाबडे लोकांची अशी कल्पना होते कीं, इंग्लंडला नेहमीं निर्गत मालापेक्षां जास्त असलेल्या आयात मालाबद्दल रोख रक्कम बाहेर पाठविणें ही अनिष्ट गोष्ट करावी लागत असली पाहिजे; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, इंग्लंडची आयात फुगण्याचें कारण जगांतील जल-

मार्गानें होणारा बराचसा व्यापार तेथील जहाजांतूनच होत असतो व त्या व्यापारामुळें मिळणारें भाडें हा देश इतर देशांपासून मालाचें रूपानें घेत असतो. तसेंच ह्या देशांत निर्गत मालापेक्षां आयात माल जास्त असण्याचीं अनेक कारणें आहेत; पण तीं सांगण्याचें येथें प्रयोजन नाहीं.

आतांपर्यंत एखाद्या देशावर हुंडया कमीजास्त प्रमाणांत कां काढल्या जातात ह्यांचीं दोन कारणें—आयातनिर्गत माल व जलमार्गांनीं स्वतःच्या जहाजांतून होणाऱ्या व्यापारापासून मिळणारें भाडें—आपण पाहिलीं. पण ह्या दोन कारणांशिवाय आणखीहि कारणें आहेत. प्रत्येक देश दुसऱ्या देशांत मोठें कर्ज काढीत असतो किंवा त्या देशांतील व्यापारी शेअर विकत घेऊन आपले पैसे पेरीत असतो. इंग्लंडच्या बाबतींत हा अनुभव विशेष येतो. फ्रान्स, जर्मनी-सारखीं राष्ट्रें ह्या देशांत नेहमीं कर्ज काढीत असतात व इंग्लंड हें कर्ज पुरवून शिवाय इतर राष्ट्रांत, विशेषतः हिंदुस्थानांत, आपलें पैसे पेरीत असतें. ह्या कर्जा-वरील व्याज व ह्या पेरलेल्या पैशावर होणारा नफा अर्थात्च पैशाच्या रूपानें न येतां मालाचे रूपानें देशांत येतो व व्याज देण्याच्या वेळींच हा माल पाठविला जात असल्यामुळें कांहीं ठराविक वेळींच ह्या हुंडया जास्त काढल्या जातात हें उघड आहे.

ह्यानंतर चवथें कारण म्हणजे देशांतील लोकांचे अन्य देशांतील प्रवास हें होय. भर्तृहरीनें एके ठिकाणीं असें विधान केलें आहे कीं, ' किं सुखम् ? अप्रवासगमनम् ' म्हणजे ह्याचा अर्थ असा कीं, सुख कोणतें ? तर प्रवास करण्याची इच्छा नसणें हें. पण ही समजूत हल्लीं चुकीची ठरलेली असून प्रवास करणें म्हणजे आपलें ज्ञान वाढविणें होय अशी लोकांची ठाम समजूत असल्यामुळें अर्वाचीन काळीं प्रत्येक देशांतले लोक इतर देश पाहण्याकरितां प्रवास करीत असतात. ह्या प्रवा-सास लागणाऱ्या खर्चाची तरतूद ते आपल्या देशांतल्या पेढ्यांजवळ बरीच रकम ठेवून व ज्या ज्या देशांत प्रवास करावयाचा असेल त्या त्या देशांतल्या पेढ्यांकडून पैसे मिळण्याची व्यवस्था करून करीत असतात. तेव्हां प्रत्येक देशांतील पेढ्यांना इतर देशांतील पेढ्यांजवळ आपली शिल्लक नेहमीं ठेवावी लागते व ती शिल्लक कमी होऊं लागतांच पुनः त्यांत भर टाकावी लागते. अशा रीतीनें पैशाची तरतूद केल्यावर पेढ्या प्रवास करूं इच्छिणाऱ्या गिऱ्हाइकांना पावत्या (Circular

notes) देत असतात. ह्या पावत्या दाखविल्या म्हणजे प्रवाशी लोकांना परदेशांतल्या पेढ्यांपासून सहज पैसे मिळतात. ह्याप्रमाणें त्या पावत्या नेहमीं परदेशांत खेळत असतात व इंग्लंडवर काढलेल्या इतर व्यापारी हुंड्यांप्रमाणें त्या विकत घेण्याची लोकांची तयारी असते. ह्या पावत्या म्हणजे एक प्रकारच्या हुंड्याच होत व ह्या जितक्या जास्त प्रमाणांत प्रवाशांकडून परदेशी पेढ्यांकडे दिल्या जातील तितकी त्यांची संख्या वाढून हुंडणावळीच्या दरावर परिणाम होत जाईल.

पांचवें कारण म्हणजे प्रत्येक देशांतले कांहीं लोक दुसऱ्या देशांत जास्त मजूरी किंवा पगार मिळेल ह्या आशेनें त्या देशांत नोकरीनिमित्त जात असतात. हिंदुस्थानांतून दर वर्षी अनेक अडचणींना न जुमानतां व वसाहतीतल्या स्वार्थ-लंपट सरकारच्या विरोधास न भितां लोक आफ्रिकेंत व इतरत्र जात असतात. त्याचप्रमाणें इंग्लंडमध्यें इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा पास होऊन किंवा दुसऱ्या कसल्या तरी वशिल्याच्या जोरावर लठ्ठ लठ्ठ पगारावर ह्या देशांत इंग्लिश लोक येऊन नोकरी करतात व त्यांची जी बचत होते ती व त्यांच्या नोकरीची मुदत संपल्यावर त्यानां द्यावी लागणारी पेन्शनची रकमही अर्थातच रोख नाण्याचें रूपानें न पाठवितां मालाचे रूपानें पाठविली जाते. हिंदुस्थानांतून दरवर्षी कित्येक कोटी रुपयांचा माल विलायतेमध्यें पाठविला जातो तो तरी ह्याच कारणामुळें होय.

असो; देशामध्यें निर्गतमालापेक्षां आयातमाल कमीजास्त होऊन त्यामुळें व्यापारी हुंड्या कमीजास्त कां काढल्या जातात ह्याचीं हीं कारणें आहेत. अशा तऱ्हेनें हुंड्या कमीजास्त झाल्या म्हणजे हुंडणावळीचा दरही कमीजास्त होत असतो.

चलनी नोटा व हुंडणावळीचा दरः—आतांपर्यंत जें विवेचन करण्यांत आलें त्यावरून हुंडणावळीचा दर ह्याचा संबंध निरनिराळ्या देशांतील प्रचलित असलेल्या नाण्याशीं किती असतो हें वाचकांस कळलेंच असेल. अमक्या अमक्या देशाच्या नाण्यांत अमुक किंमतीचें, वजनाचें व सफाईचें सोनें किंवा चांदी असतें असें सरकारनें जाहीर केलेलें असतें, म्हणूनच हुंडणावळीचा दर ठरत असतो. हें नाणें हीणकस झालें म्हणजे अर्थातच हा दरही गडबडूं लागतो. आतांपर्यंत हे नाणें धातूचें आहे असें आपण समजलों; पण नाणें कागदीही असूं

शकतें, हें वाचकांस नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. ह्या कागदी नाण्यास चलनी नोटा अशी संज्ञा आहे व ह्या नोटांचेही दोन प्रकार असतात हें पूर्वीं सांगण्यांत आलेलेंच आहे. हल्लीं जगांतील बहुतेक राष्ट्रें सुधारलेलीं असल्या-मुळें सोनें किंवा चांदी ह्यांचा शक्य तितका कमी उपयोग नाण्याच्या कामीं करून होतां होईल तों आपले व्यवहार कागदासारख्या वस्तुच्या नाण्यांवर भागवून घेण्याचा सर्वत्र प्रघात आहे; पण ह्या कागदी नोटांच्या मुळाशीं नोटांबद्दल नाणें देण्याची सरकारची धमक व लोकांचा विश्वास हीं दोन कारणें आहेत हें वाच-कांनीं नेहमीं लक्ष्यांत ठेवावें. हल्लीं नोटा व धातूचें नाणें ह्यांमध्यें काय शास्त्रशुद्ध प्रमाण असावें हें अनुभवानें ठरलेलें असतें. पण सांपत्तिक परिस्थिति अनुकूल नसली म्हणजे सरकारास बिनमोबदला नोटा (Inconvertible notes) फाजील प्रमाणांत सुरू करण्याचा मोह अनावर होतो. तशा त्या उतरूं लागल्या म्हणजे त्यांची किंमतही उतरूं लागते व त्यांची योग्यता हीणकस नाण्याबरोबर होऊं लागते. कधीं कधीं ह्या नोटांचा प्रचार फाजील प्रमाणांत सरकार जाणून बाजून करीत नाहीं. व्यापाराची चलती असली म्हणजे अर्थातच लोकांस जास्त नाण्याची गरज भासूं लागते व ती गरज भागविण्याकरितां सरकारास जास्त नोटा काढाव्या लागतात. पण चलनी नोटांतला मोठा दोष म्हणजे त्या वाटेल तेव्हां प्रचारांतून काढून घेतां घेत नाहींत. म्हणून व्यापाराची तेजी असतांना काढलेल्या नोटा त्याची मंदी झाली म्हणजे त्या काढून घेतां न येऊं लागल्या मुळें त्यांचा सरकारच्या इच्छेविरुद्ध सुळसुळाट होतो; पण ह्या नोटा फाजील प्रमाणांत जाणूनबुजून किंवा नकळत सुरूं केलेल्या असल्या तरी त्याचा अनिष्ट परिणाम व्हावयाचा तो होतोच. कधीं कधीं ह्या नोटांच्या प्रचाराचा अतिरेक देशांतील पेढ्याकडूनही होण्याचा संभव असतो. सरकारी नोटांप्रमाणें पेढयांनीं काढलेल्या नोटाही लोकांच्या विश्वासावर व त्यांच्या नाणें देण्याच्या ताकदीवर अवलंबून असतात ; पण पेढयांचा नादान-पणा लोकांच्या निदर्शनास यत्किंचितही आल्याबरोबर ह्या नोटाची किंमत भराभर उतरूं लागते व शेवटीं त्यांची किंमत कागदाच्या चिटोऱ्याइतकी होते. ह्याचा असा परिणाम होतो कीं, वस्तूंच्या किंमती भराभर उतरूं लागतात व त्यामुळें देशांतून माल बाहेर जाऊं लागतो व परदेशचा माल देशांत कमी प्रमाणांत येऊं लागतो. त्यामुळें जे लोक माल बाहेर पाठविणारे असतात—उदाहरणार्थ शेत-करी व खाणीचे मालक–त्यांची पोळी पिकते ; पण आयात मालाच्या व्यापा-

त्यांना, नोटांची किंमत उतरल्यामुळें, मागविलेल्या मालाबद्दल जास्त किंमत द्यावी लागते व तो माल विकतांना अर्थातच त्यांची किंमत वाढवावी लागते व गिऱ्हाइकांची प्रवृत्ति परदेशी माल न घेण्याकडे होते. नोटांची किंमत उतरूं लागणें हें ज्या लोकांनीं पुष्कळ दिवसांच्या उधारीवर व्यापाऱ्यास माल विकला असतो किंवा दीर्घकाल मुदतीचें कर्ज लोकांस दिलेलें असतें किंवा ज्या लोकांचे पगार बेताचे असतात अशा लोकांस फारच संकटाचें होतें. असो. एकंदरींत सांगावयाचा मुद्दा हा आहे कीं, नोटांची किंमत उतरल्यामुळें व्यापाराची घडी विस्कळित होणें, जिनसांच्या किंमती उतरणें, सट्टेबाजी सुरू होणें व शेवटीं दिवाळखोरी होणें हीं संकटें उत्पन्न होतात. अतएव योग्य प्रमाणांत सोन्याचांदीच्या नाण्यांचा संग्रह करून नोटा प्रचलित करणें हें प्रत्येक सुधारलेल्या सरकारचें कर्तव्य आहे. ही दक्षता सरकारनें दाखविली तर हुंडणावळीचा दर कायम राहतो व व्यापारास स्थैर्य येतें हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.

प्रकरण १० वें.

पेढीचा धंदा करणाऱ्या माणसास लागणारे आवश्यक गुण व माहिती.

नैतिक व बौद्धिक गुणांची आवश्यकता.—पेढीचा धंदा करणें ही गोष्ट कांहीं सोपी नाहीं. कोठलाही धंदा करावयाचा म्हणजे त्यास उपजत योग्यता असावी लागते. कवी ज्याप्रमाणें नियम पाठ करून बनत नाहीं, तर तो होण्यास कांहीं उपजत गुणच अंगीं असावे लागतात, त्याप्रमाणें यशस्वी पेढीवाला होण्यासही कांहीं गुण उपजत असावे लागतात. तथापि ज्याप्रमाणें उपजत कवीला सुद्धां विद्याभ्यास, सततोद्योग, भाषाप्रभुत्व वगैरे कष्टसाध्य गुण संपादावे लागतात, त्याचप्रमाणें पेढीवाल्याची गोष्ट आहे. हे गुण कोणते ते आतां आपण पाहूं.

ज्याला यशस्वी पेढीवाला व्हावयाचें आहे त्या माणसाला कांहीं नैतिक व बौद्धिक गुणांची फार जरूर असते. तो विलक्षण बुद्धिमान मनुष्य असला

पाहिजे अशांतला भाग नाहीं; पण तो चाणाक्ष असला पाहिजे, म्हणजे त्याला व्यवहारज्ञान पूर्णपणें असलें पाहिजे. कांहीं लोकांचें असें म्हणणें असतें कीं, पेढीचा धंदा करणाऱ्या माणसाला फारशी अक्कल किंवा ज्ञान नको; साधारण हिशोब ठेवतां आले व थोडीशी इतर सामान्य माहिती असली म्हणजे कोणीही पेढीच्या धंद्यांत वाकबदार होईल. शिक्षकाविषयींही पुष्कळ माणसांची अशीच कल्पना असते. ज्याला कोणाला इतर धंद्यांत कोठें वाव मिळत नाहीं त्यानें खुशाल हा धंदा पतकरावा. पण ह्या कल्पना सर्वस्वीं चुकीच्या आहेत. ह्या देशांत १९११ सालीं पेढयांचीं जीं दिवाळीं निघालीं त्यांचें एक कारण असें होतें कीं, ज्या लोकांनीं हा पेढयांचा धंदा सुरू केला होता त्यांपैकीं बहुतेक लोक ह्या धंद्यांत नवखे होते. तेव्हां आपण ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, चांगला पेढीवाळा होण्यास आपणामध्यें कांहीं खरोखरच दुर्मिळ व महत्वाचे बौद्धिक गुण पाहिजेत. हा धंदाच असा आहे कीं, तो जर चांगल्या तऱ्हेनें चालविला तर मनुष्यजातीचें त्यामुळें चांगलें कल्याण होईल.

बिनचूक निर्णय करण्याची शक्तिः—पेढीवाल्याच्या अंगीं दुसरा गुण म्हटला म्हणजे एखादा भानगडीचा प्रश्न उपस्थित झाला असतांना चटकन् मनाशीं बिनचूक निर्णय ठरवून त्याप्रमाणें वागण्याची त्याची तयारी पाहिजे. हा गुण अत्यंत महत्त्वाचा आहे. हल्लींचें युग व्यापारी असल्यामुळें पेढीवाल्यासमोर अनेक भानगडीचे प्रश्न उभे राहतात. सराफकट्टयावर लाखों रुपयांच्या उलाढाली होत असतात व कोणत्या प्रसंगीं पेढ्यांनीं व्याजाचा दर वाढवावा किंवा कमी करावा, कोणत्या धंद्यांत व्यापाऱ्यांना किती पैसे द्यावे व कोणत्या वेळीं कोणत्या धाडसाच्या उद्योगधंद्यांत पैसे गुंतवावे वगैरे हजारों प्रश्न उपस्थित होतात. युद्धाचे प्रसंगीं ज्याप्रमाणें सेनापतीला तावडतोब एक निश्चय ठरवून—व तोही चुकीचा नव्हे—त्याप्रमाणें वागावें लागतें, त्याचप्रमाणें पेढीवाल्यानेंही आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे. एकदां स्वतःशीं एखाद्या प्रश्नाच्या दोन्ही बाजूंचा सांगोपांग विचार केल्यावर मनाला जो निश्चय पटला असेल तो निश्चय तूं बदल असें ब्रह्मदेव समोर येऊन म्हणत असतांना त्या निश्चयालाच चिकटून राहणें, कोठलीही गोष्ट उतावळेपणानें किंवा हूडपणानें न करणें वगैरे गुण पेढीवाल्याचे अंगीं असावे लागतात.

आत्मज्ञानः—तिसरा गुण म्हटला म्हणजे प्रत्येक पेढीवाल्यानें स्वतः-विषयीं पूर्ण ज्ञान करून घेतलें पाहिजे. आपल्या स्वभावांत कोणतें गुण आहेत व कोणते दोष आहेत ह्याची त्याला सूक्ष्म माहिती पाहिजे. आपण जास्त उदार आहोंत किंवा कृपण आहोंत किंवा फाजील दक्ष आहोंत, एखादें नुकसान जर पेढीचें झालें असेल तर त्याबद्दल आपण आपल्या स्वतःच्या दोषामुळें कितपत जबाबदार आहोंत वगैरे सर्व बारीकसारीक गोष्टींची त्याला माहिती पाहिजे. बरें, त्याला जरी स्वतःचे दोष दिसत असले तरी त्यानें त्या अवगुणांची टिमकीहि वाजवितां कामा नये. कारण त्या अवगुणांचा फायदा त्याचे धूर्त गिऱ्हाईक घेतल्याशिवाय कधींही सोडणार नाहींत. ह्याकरितां भवभूतीनें मालतीमाधवांत कामंदकीविषयीं म्हटल्याप्रमाणें:—

बहिः सर्वाकारप्रगुणरमणीयं व्यवहरन् ।
पराभ्यूहस्थानान्यपि तनुतराणि स्थगयति ॥
जनो विद्वानेकः सकलमभिसंधाय कपटैः ।
तटस्थः स्वानर्थान्घटयति च मौनं च भजते ॥

प्रत्येक पेढीवाल्यानें ' सकलमभिसंधाय कपटैः ' हा तेवढा उपदेश बाजूला ठेवून आपलें वर्तन ठेवावें.

मनुष्यस्वभावाची पारखः—चवथा गुण म्हटला म्हणजे प्रत्येक पेढीवाल्याला माणसाची चांगली पारख पाहिजे. त्याला स्वतःचें ज्ञान असूनच भागत नाहीं, तर आपल्या हाताखालीं माणसें कोणत्या प्रकारचीं ठेवा-वयाचीं व प्रत्येक माणसाला त्याच्या अंगच्या गुणांची योग्य पारख करून कोणतें काम सोंपवून द्यावयाचें वगैरे अनेक गोष्टींची संपूर्ण माहिती त्यानें संपादन केली पाहिजे. कारण प्रत्येक माणसाचे अंगीं कांहीं तरी गुण असतोच. मात्र त्या गुणाचें चीज पेढीवाल्याला करतां आलें पाहिजे. ' अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौ-षधम् । अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥ हें तत्त्व पेढीवाल्यानें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

शिस्तीनें व लोकांवर विश्वास टाकून वागणेंः—पुष्कळ वेळां असें होतें कीं, समवायिक भांडवलाच्या पेढीमध्यें जो व्यवस्थापक असतो तो बारीक-सारीक कामेंसुद्धां आपल्याकडेच घेत असतो. ह्याचा असा परिणाम होतो कीं, मुख्य कामें बाजूला रहातात व इतर नित्यांतल्या गोष्टी करण्यांतच वेळ जाऊन

कामाचा बोजा फार पडल्यामुळें प्रकृतीवर वाईट परिणाम होतो. ह्याकरितां प्रत्येक पेढीवाल्यानें आपल्या वेळेचा उपयोग काटकसरीनें केला पाहिजे. पेढीचीं मुख्य सूत्रं आपल्या हातांत ठेवून दुय्यम कामांवर योग्य व हुषार माणसांची निवडणूक करून त्यांच्यावर नुसती नजर त्यानें ठेविली पाहिजे. कोठलेंही काम असो, एकदां तें आपल्या नोकरांवर सोंपाविलें असतां त्यांच्यावर विश्वास व जबाबदारी टाकल्यानें त्या नोकरांनाही काळजीपूर्वक काम करावेंसें वाटतें हा आपला अनुभव आहे. श्रीशिवाजीमहाराज व अकबर बादशहा ह्यांना आपल्या कामांत यश कां आलें व औरंगजेब बादशहा अपयशाचा मालक कां झाला, हें ज्यास ठाऊक आहे त्यास वरील विचारसरणी सहज पटेल. असो; अशा रीतीनें आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या लोकांवर कामें सोंपवून प्रत्येक पेढीवाल्यानें आपल्या वेळेचा काटकसरीनें उपयोग केला पाहिजे.

हा हेतु साधण्यास दुसरेही अन्य उपाय आहेत प्रत्येक पेढीवाल्यानें आपल्या कामांत नेहमीं शिस्त पाळली पाहिजे. दररोज ऑफिसामध्यें वेळेवर येणें, ठराविक पद्धतीनें काम करणें व ठराविक वेळीं ऑफिस सोडणें ह्या गोष्टी स्वतः नियमानें करीत गेलें असतांना पेढीवाल्यास प्रत्येक गोष्टीचा शांतपणानें विचार करण्याची, तिला निकालांत आणण्याची व थोड्या वेळांत पुष्कळ काम संथपणें करण्याची संवय लागते व हाताखालील माणसांस शिस्तीनें वागण्याची त्यास सक्ति करतां येतें.

पेढीवाल्यानें गिऱ्हाइकांशीं व्यवहार करितांना ठेवावयाचें धोरणः--आपल्या वेळेचा काटकसरीनें उपयोग करण्याकरितां प्रत्येक पेढीवाल्यानें आपणांकडे जे लोक भेटण्याकरितां येतील त्यांची मुलाखत थोड्या वेळांत आटपती घेतली पाहिजे. ज्या विषयाबद्दल एखाद्या गृहस्थाची मुलाखत घ्यावयाची त्याच विषयावर त्या माणसाशीं त्यानें थोडक्यांत बोललें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्या माणसाची मुलाखत घ्यावयाची असेल तो जर पेढीचें गिऱ्हाइक असेल तर त्याच्याशीं मुलाखत घेण्याची जागा अशी असावी कीं, त्या जागेंतून बाहेर जावयाला एक दार असावें व तें लोकांना जाण्यायेण्याला सोयीचें असावें. दुसरें दार असें असावें कीं, त्यांतून पेढीवाल्याला आंत जाऊन आपल्या हाताखालच्या नोकरांशीं बोलण्यास सोपें जावें. अशी व्यवस्था जरूर असण्याचें असें कारण आहे कीं,

जर एखादे वेळीं एखादा गृहस्थ मोठ्या किंमतीची हुंडी किंवा चेक घेऊन आला व त्या माणसाची बाजारांत पत काय आहे, त्याचा पेढीशीं व्यवहार किती व कसा आहे वगैरे गोष्टींची चवकशी त्या पेढीवाल्याला आपणाकडे आलेल्या माणसाच्या न कळत आपल्या कारकुनाशीं करावयाची असली तर त्याला खोलींत जाऊन ती करतां आली पाहिजे.

प्रत्येक पेढीवाल्यानें आपले जेवढे गिऱ्हाईक असतील त्यांची खडानखडा माहिती आपल्याजवळ मिळवून ठेविली पाहिजे. आपल्या गिऱ्हाइकांचें त्यांच्या धंद्यानुसार वर्गीकरण करून त्यांची यादी त्यानें आपल्याजवळ ठेवली पाहिजे. अशी यादी जवळ असली म्हणजे समाजाच्या कोणकोणत्या वर्गांमध्यें आपले गिऱ्हाईक आहेत व त्यांचा दर्जा काय आहे हें त्यास सहज समजेल. एखादी व्यापारी दृष्ट्या महत्वाची गोष्ट घडून आली असतानां तिचा परिणाम कोणत्या गिऱ्हाइकांवर घडेल व ह्या गिऱ्हाइकांनीं आपल्या हुंड्या मिति कापून वटविण्याकरितां आणल्या असतांना त्या वटवाव्यात किंवा नाहीं हें त्याला तावडतोब ठरवितां येईल.

ही वर सांगितलेली माहिती पेढीवाल्यानें मिळविल्यावर ती वर्णक्रमानुसार कार्डावर नोंदून तीं कार्डें कपाटांत जपून ठेवलीं पाहिजेत. जसजशी जास्त माहिती आपल्या गिऱ्हाइकांबद्दल मिळत जाईल तसतशी ती माहिती ह्या कार्डांत नमूद करून ठेवली असतां पेढीवाल्यास फार सोयीचें होईल. ही माहिती मिळविण्याचे अनेक मार्ग आहेत. एखादा इसम पेढीवाल्याकडे आपला व्यवहार जेव्हां प्रथमच सुरू करतो तेव्हां तो स्वतःच आपल्याबद्दल माहिती पुरवीत असतांना तिची नोंद पेढीवाल्यानें करावी व त्या माणसाला प्रथम पाहिल्यावर स्वतःचें जें मत बनेल तें नोंदून ठेवावें. हें मत नेहमींच बरोबर असेल असें निश्चयानें सांगतां येणार नाहीं. पण पेढीवाल्यानें मनुष्यस्वभावाचें जर सूक्ष्म अवलोकन केलें असेल तर आलेल्या माणसाच्या बोलण्याचालण्यावरून, त्याच्या पोषाकावरून व त्याच्या मुद्रेवरून पेढीवाल्याला त्याबद्दल बरेंच निर्णायक मत बनवितां येईल. पुढें पुढें जसजसे जास्त व्यवहार होत जातील व तो ज्या प्रकारच्या हुंड्या घेऊन येईल व इतर व्यापाऱ्यांकरितां स्वीकारील त्यांवरून त्या माणसाबद्दल बरीच माहिती मिळत जाईल व त्याची बाजारांत काय पत आहे ह्याचा अंदाज त्यास करतां येईल.

प्रत्येक पेढीवाल्यानें आपल्या मनाशीं कांहीं ठराविक तत्त्वें निश्चित करून त्यां तत्त्वांन्वयें आपला पेढीचा व्यवहार चालविला पाहिजे. एखाद्या माणसाला गहाणावर, वखारींत ठेवलेल्या मालाच्या पावतीवर, दस्तऐवजांवर, किंवा गलबतावरील बारदानाच्या यादीवर, कर्जाऊ रक्कम द्यावयाची किंवा नाहीं, किंवा व्यापाराला न शोभणाऱ्या अशा व्यवहारांनिमित्त काढिलेल्या हुंड्या वटवावयाच्या किंवा नाहींत, किंवा तीन महिन्यांहून जास्त मुदतीच्या हुंड्या स्वीकारावयाच्या किंवा नाहींत ह्या बाबतींत ठाम धोरण ठरवून प्रत्येक पेढीवाल्यानें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. असें धोरण एकदां निश्चित्त झाल्यावर एखादा गृहस्थ गहाणावर रक्कम कर्ज म्हणून मागण्यास आला असतांना आमची अशी पद्धत नाहीं असें उत्तर दिल्यानें गिऱ्हाइक गप्प बसते. पेढीवाल्यानें गिऱ्हाइकांशीं आपल्या ठरा-विक तत्त्वांबद्दल कधींहि चर्चा करूं नये. कारण पुष्कळ गिऱ्हाइकांना ती चर्चा कळणेंच शक्य नसतें व व्यर्थ कालातिपात होतो, आणि त्यांना पैशाची जरूर अस-ल्यामुळें अनुभवानें ठरलेलीं पेढीवाल्यांचीं तत्त्वें त्यांना पटतच नाहींत.

नवीन खातें सुरूं करतांना प्रत्येक पेढीनें फार काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. ज्या माणसाचें खातें सुरू करावयाचें त्या माणसाची हमी जर पेढीला परिचित असणारा मनुष्य देत असेल तरच त्याचें खातें सुरूं करण्यांत यावें. या खातें सुरू करणाऱ्या माणसाला पेढीच्या ओळखीचा मनुष्य जर मिळत नसेल तर त्यानें इतर प्रसिद्ध असलेल्या पेढ्यांचा हवाला दिला पाहिजे. त्याचप्रमाणें आपणांस कोणचा धंदा सुरू करावयाचा आहे. किती रकमेची जरूरी आहे, आपण कोणत्या प्रकारच्या हुंड्या वटवून घेण्याकरितां आणूं वगैरे सर्व माहिती त्यानें पेढीवाल्यास पुरविली पाहिजे. त्याप्रमाणें एखाद्या गृहस्थाचा व्यवहार एखाद्या पेढीशीं अगोदरपासूनच असतांना तो जर जास्त व्याज कापून मिळेल ह्या आशेनें दुसऱ्या पेढीशीं आपलें खातें सुरू करूं लागला तर ह्या दुसऱ्या पेढीनें चवकशी करून हें खातें सुरू करूं देऊं नये. कधीं कधीं कांहीं पेढ्या दुसऱ्या पेढीचीं गिऱ्हाइकें जास्त व्याजाची लालूच दाखवून फितवीत असतात किंवा आपल्या जागेहून फार दूर टिकाणीं राहणाऱ्या लोकांची खातीं सुरू करीत असतात. ह्या दोन्ही गोष्टी सर्वथैव अनिष्ट होत.

ज्या पेढीचें भांडवल बेताबाताचें आहे त्या पेढीनें मोठ्या रकमेचीं खातीं उघडून लहान तोंडीं मोठा घांस कधींहि घेऊं नये. पुष्कळ पेढ्या ह्या चुकीनें

आजपर्यंत बुडालेल्या आहेत. एकाच माणसाला जर मोठी रक्कम कर्जानें दिली तर त्या रकमेंतच पेढीचें बहुतेक सर्व भांडवल गडप व्हावयाचें व इतर गिऱ्हाइकांना आपला हात आंखडून रकमा देण्याचा प्रसंग यावयाचा. तेव्हां लहान भांडवलाच्या पेढीनें लहान लहान रकमाच देण्याची पद्धत ठेवावी. लहान पेढ्यांनीं मोठमोठ्या रकमा ठेवी म्हणून स्वीकारल्या व एकदां का त्या रकमा त्यांनीं कोठें तरी गुंतविल्या म्हणजे ठेव ठेवणारांनीं एकदम मागणी केल्यास त्या ठेवींची रक्कम परत करणें त्या लहान पेढीस फारच जड जाते; म्हणून लहान पेढीनें अंथरूण पाहून पाय पसरणें ही उत्तम गोष्ट आहे.

एखाद्या व्यापाऱ्यानें काढिलेली हुंडी एखाद्या पेढीकडे वटविण्याकरितां आली असतांना ही हुंडी आणणाऱ्या माणसाची दानत काय आहे, ह्याची रोकड बाकी आपणाकडे किती आहे, त्याला किती रक्कम मनोती कापून हवी आहे, ही रक्कम व त्याची शिल्लक असलेली रोकड ह्यांमध्यें काय प्रमाण आहे, ह्याच्या हुंड्या ज्यांच्यावर काढल्या असतात त्या लोकांकडून स्वीकारल्या जातात किंवा नाहीं, जे लोक ह्या हुंड्या स्वीकारतात त्या लोकांचे कोणत्या प्रकारचे उद्योगधंदे असतात वगैरे सर्व गोष्टी पेढीनें चवकशी करून माहीत करून घेतल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें एखादी हुंडी वटविण्याकरितां आली असतांना तिच्यावर खोट्या सह्या केलेल्या आहेत किंवा काय, हें नीट न्याहाळून किंवा शहानिशेकरतां इतर पेढीकडे पाठवून बघावें लागतें.

कधीं कधीं खोट्या सहीचे चेक पेढ्यांवर लोक पाठवीत असतात. ही आपत्ति टाळण्याकरितां पेढीवाल्यानें प्रत्येक चेकबुकमधल्या प्रत्येक चेकवर एक छापील नंबर टाकावा, व मॅनेजरनें आपली संक्षिप्त सही प्रत्येक चेकवर करावी. जेव्हां एखादें चेकबुक एखाद्या गृहस्थाला दिलें जातें, तेव्हां त्याच्या नांवाची नोंद पेढीच्या पुस्तकांत केली जावी. ज्या वेळीं चेक वटविण्याकरितां येतो त्या वेळीं त्या चेकवरील सही व आपल्या पुस्तकांत असलेली सही ह्यांची तुलना केली असतां तावडतोब खोटी सही पेढीवाल्यांस ओळखतां येते; त्याचप्रमाणें दस्तरोखे व बॉंड ह्यांच्या बाबतींतही खोट्या सह्या होऊन ते पेढीकडे येण्याचा संभव असतो; तेव्हां ह्या रोख्यांची कसून परीक्षा करून घ्यावी व ज्या वेळीं एखादा तिऱ्हाईत मनुष्य जामीनकीचें पत्र देण्यास तयार होतो त्या वेळीं ज्या माणसाकरितां हें

पत्र तो तिऱ्हाईत मनुष्य देत असतो त्या माणसाकडून पेढीवाल्यानें तें न घेतां एक दोन पेढींतल्या कारकुनांसमोर त्या तिऱ्हाईत माणसाची सही घेऊन मग तें त्या पेढीवाल्यानें घ्यावें म्हणजे घोंटाळा होणार नाहीं.

पेढीचें गिऱ्हाईक नादार होत आहे हें जाणण्याच्या कांहीं खुणाः—पेढीशीं व्यवहार करणाऱ्या माणसाचें दिवाळें निघण्याची वेळ जवळ येत चालली आहे किंवा त्याची सांपत्तिक स्थिति वाईट होत चालली आहे हें चटकन् ओळखण्याच्या कांहीं खुणा असतात. उदाहरणार्थ, तो गृहस्थ आपले हिशेब बरोबर ठेवीत नाहीं, किंवा तो कमी सचोटीच्या माणसांवर हुंड्या काढूं लागतो, किंवा त्यानें ज्या माणसांवर हुंड्या काढिलेल्या असतात त्यानें त्या नाकारल्या असतां ह्या माणसाची त्या हुंड्यांबद्दल पैसे देण्याची तयारी नसते, किंवा ज्या लोकांनीं ह्याच्यावर हुंड्या काढिल्या असतात त्या लोकांवरच तोही हुंड्या काढूं लागतो; तसेंच तो गृहस्थ आपल्या सावकारांना पैसे देण्याचें टाळूं लागतो किंवा ठरलेल्या मुदतीनंतर बरेच दिवसांनीं पैसे देऊं लागतो. पेढीजवळ जेवढी शिल्लक असेल तेवढया रकमेच्या जवळ जवळ त्यानें पेढीजवळून रक्कम नेलेली असते. अशा वेळीं हें आपलें कुळ बेभरंवशाचें आहे असें पेढीवाल्यानें खास समजावें.

कधीं कधीं दोन लोकांचे निरनिराळ्या पेढ्यांशीं व्यवहार ठेवलेले असतात व त्यांची चेकांची अदलाबदल करण्याची वहिवाट असते. हे लोक आपले चेक पेढ्यांकडे अशा वेळीं नेतात, कीं त्या पेढ्यांना त्याच दिवशीं त्या हुंडयांची अदलाबदल करून हिशेब चुकतां करतां येऊं नये. ह्याचा असा परिणाम होतो कीं, ह्या लोकांचे पेढीवरचे हिशेब त्यांना फायदेशीर असे दर्शनीं वाटतात. त्याच-प्रमाणें कांहीं लोक धंद्यांत बूड येऊं लागली म्हणजे खोट्या सहीच्या किंवा निखालस खोट्या हुंड्या विकावयाला काढतात. अशा वेळीं पेढीवाल्यास उत्तम मार्ग म्हटला म्हणजे ह्या हुंड्या स्वीकारणारा गृहस्थ कोण आहे व त्याची पत काय आहे ह्याची त्यानें पूर्ण चवकशी करावी व जो कोणी मनोती कापून हुंड्या वटविण्याकरितां आणील त्याची आपल्याजवळ रोकड किती आहे हें त्यानें तपासून पहावें. हुंडयांच्या मानानें त्याची शिल्लक जर बेताचीच असेल तर त्या गृहस्थाचा आंतबट्ट्याचा व्यवहार होत आहे असें त्यानें खुशाल समजावें.

एखादे वेळीं असें होतें कीं, एखादा पेढीवाला एखाद्या माणसास बरेच पैसे कर्जाऊ देत असतो व त्यास एकदम असें कळतें कीं, आपण त्या माणसावर ठेवलेला विश्वास अनाठायीं असून त्याची पत बाजारांत फारशी नाहीं. अशा वेळीं पेढीवाल्यानें सर्व रकमेची जर एकदम मागणी केली तर तो गृहस्थ कांखा वर करणार व त्या पेढीवाल्याचें नुकसान होणार. अशा वेळीं जरा शहाणपणानें व सावधपणेंच वागणें इष्ट असतें. तो गृहस्थ ज्या हुंड्या आणील त्यांपैकीं शहाजोग हुंडयाच पेढीवाल्यानें स्वीकाराव्या व कधीं कधीं त्या गृहस्थाकडून कर्जाऊ दिलेल्या रकमेचे हप्ते करून ते ठराविक मुदतींत देण्याचें कबूल करून घ्यावे किंवा मागच्या रकमेबद्दल योग्य तारण दिल्यास जास्त रक्कम कर्ज देऊं असें आमिष दाखवावें. अशा रीतीनें आपले पैसे वसूल करण्याचे पेढीवाल्याचे मार्ग असावेत; कधीं कधीं आपलें कुळ डबघाईस आलें आहे असें पाहून कांहीं पेढ्या जास्त रकमा कांहीं तारण वगैरे न मागतां त्याला देत असतात; अशा वेळीं तें कुळ व त्या पेढ्या दोघेहि बुडतात; तेव्हां हें धोरण बरें नव्हे.

प्रकरण ११ वें

पेढीच्या कारकुनानें संपादन करावयाचे गुण.

धिमेपणानें व मेहनतीनें काम करणें :— पेढीमध्यें काम करणाऱ्या कारकुनानें पेढींत शिरतांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपणास सुरवातीला पगार बेताचा मिळेल व आपणांस पुढें मिळणारी बढतीहि बेताबातानें होत जाईल. त्याचप्रमाणें आपल्या अंगीं कांहीं विशेष गुण असल्याशिवाय आपणांस जबाबदारीच्या जागा सहसा मिळणार नाहींत. तेव्हां पेढीमध्यें काम करणाऱ्या कारकुनाला जर इतर माणसांपेक्षां जास्त पगाराची व दर्जाची जागा हवी असेल तर त्यानें धिमेपणानें व मेहनतीनें काम करून आपली योग्यता इतरांच्या योग्यतेपेक्षां जास्त वाढविली पाहिजे. जो कारकून बरेंच काम एकहि चूक न करितां बिनबोभाट करील तोच यशस्वी कारकून समजला पाहिजे. पेढीमध्यें खालच्या जागेवर काम करणारे व नुकतेंच नेमलेले कारकून ह्यांना प्रथम

प्रथम कामाचा बराच ताण पडतो व तें काम झपाट्यानें उरकण्याचा मोह ह्या कारकुनांना होतो व त्यामुळें बऱ्याच चुका होण्याचा संभव असतो. कधीं कधीं काम थोडें का असेना, पण तें नीटनेटकें व लक्ष लावून करण्याची संवय नसल्यानें कारकुनाच्या हातून बऱ्याच चुका होतात. कधीं कधीं काम फार भानगडीचें नसल्यामुळें मनुष्य विशेष लक्ष घालून तें करीत नाहीं, त्यामुळेंहि चुक्या होण्याचा बराच संभव असतो. तेव्हां प्रत्येक कारकुनानें कोठलेंही काम करीत असतांना तें पूर्ण एकाग्रतेनें करण्याची संवय करावी व एक काम संपलें असतांना त्यांतून लक्ष काढून दुसऱ्या कामांत तें चटकन् व न गडबडतां घालण्याची शक्ति संपादन करावी.

सुवाच्य, गोंडस व काळजीपूर्वक लिहिणें:--प्रत्येक कारकुनाचें हस्ताक्षर सुवाच्य व गोंडस असलें पाहिजे. अगदीं उत्तम अक्षर लिहितां येणें हें थोड्याच लोकांस साधतें; पण सुवाच्य अक्षर लिहिणें हें सर्वांसच साध्य आहे. हल्लीं प्रत्येक ऑफिसांत टाइपरायटर सुरू करण्यांत आलेला आहे; तरीपण प्रत्येक पत्र कांहीं त्यावर लिहितां येत नाहीं, त्यामुळें बरींच पत्रें हातानें लिहिलीं जाणार; तेव्हां कारकुनांना चांगलें व सुवाच्य लिहितां येणें हें अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें पत्रें लिहितांना जर आंकडे मांडण्याची पाळी आली तर ते स्पष्ट निराळ्या कालममध्यें व एकाखालीं एक अशा व्यवस्थित पद्धतीनें लिहावे व एखादा आंकडा किंवा शब्द चुकून भलताच पडला तर तेथेंच खोडून किंवा गिचमीड करून तो बदलण्याचा प्रयत्न करूं नये किंवा त्या चुकलेल्या शब्दाच्या किंवा आंकड्याच्या डोक्यावर दुसरा लिहूं नये, तर त्या चुकलेल्या शब्दावर काट मारून नंतर दुसरा शुद्ध शब्द किंवा आंकडा लिहिण्याची पद्धत ठेवावी.

शक्ति व उमेद राखून काम करणें:--प्रत्येक कारकुनानें असें लक्षांत ठेवावें कीं, ठराविक मुदतीच्या आंत करावयाचें काम कितीही मोठें असो, तें करतांना कांहीं ठराविक मर्यादेपर्यंतच त्याला नेटानें तें काम करितां येईल व त्या मर्यादेनंतर त्याच नेटानें तो तें काम करूं म्हणेल तर त्याच्या हातून चुक्या झाल्याच पाहिजेत. तेव्हां ही स्थिति त्यानें टाळली पाहिजे. तसेंच हेंही त्यानें लक्षांत ठेवावें कीं, आपण आपल्या स्मरणशक्तीवर—मग ती कितीही चांगली असो—फारसें अवलंबून राहूं नये व एखादी गोष्ट अमक्या वेळीं झाली पाहिजे, अशी वरिष्ठांकडून त्याला सूचना आली कीं, तिची नोंद त्यानें

आपल्या डायरींत करून ठेविली पाहिजे. प्रत्येक क्षुद्र गोष्ट स्मरणांत ठेवण्याचा प्रयत्न केल्यानें स्मरणशक्तीस विनाकारण ताण पडून एखादे वेळीं फजिती होण्याचा प्रसंग येतो. कारण ती केव्हां दगा देते ह्याचा नेम नसतो.

पेढीच्या धंद्याची सशास्त्र माहिती करून घेणें:—खालच्या दर्जाच्या कारकुनानें आपल्यावर असलेल्या कारकुनाच्या कामाची नेहमीं माहिती करून घ्यावी. कारण तो वरचा मनुष्य रजेवर गेला किंवा मरण पावला तर त्याला तावडतोब त्या माणसाचें काम करतां आलें पाहिजे. पेढींत काम करणाऱ्या प्रत्येक कारकुनाला पेढीच्या धंद्याचें शास्त्रीय ज्ञान असलें पाहिजे व हें ज्ञान प्राप्त करून घेण्यास त्यानें इन्स्टिटयूट ऑफ् बँकर्स्‌सारख्या संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेस बसून पास झालें पाहिजे. हें ज्ञान पूर्णपणें प्राप्त करून घेतलें तर त्या कारकुनाला एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होऊन कोठलेंही जबाबदारीचें काम त्याला शांतपणानें करतां येईल व त्याचा लौकिक वाढून त्याला लवकर बढतीही मिळेल. एखाद्या कारकुनाची जेव्हां कॅशरच्या जागीं बढती होते तेव्हां त्यानें लोकांशीं असभ्यपणेंही वागूं नये किंवा तोंडपुजेपणानेंही वागूं नये. लोकांना सामान्यपणें पेढीच्या व्यवहाराची विशेष माहिती नसते ही जाणीव ठेवून कॅशरनें त्यांच्याशीं नेहमींच्या सभ्यपणानें वागावें.

गुप्त माहिती न फोडणें:—प्रत्येक कारकुनानें पेढीच्या व्यवहारासंबंधानें ऑफिसच्या बाहेर आळीमिळी गुपचेळीचें व्रत पूर्णपणें स्वीकारलें पाहिजे. पेढीचे व्यवहार नेहमीं लोकांच्या पैशासंबंधानें होत असल्यामुळें त्यांना त्या व्यवहारांबद्दल इतरत्र चर्चा होणें कधींही आवडत नाहीं. मनुष्य नेहमींच कांहीं सावधपणानें इतरांविषयीं बोलतांना रहात नाहीं; एखादे वेळीं चुकून कांहीं बोलल्यामुळें पेढीच्या गिऱ्हाइकांचें नुकसान होण्याचा संभव असतो. तेव्हां सांगावयाचा मुद्दा एवढाच आहे कीं, पेढीचें ऑफिस सोडल्यावर कान असून ऐकावयाचें नाहीं, डोळे असून पहावयाचें नाहीं व तोंड असून बोलावयाचें नाहीं हा नियम पेढीच्या गिऱ्हाइकाच्या व्यवहारांसंबंधानें प्रत्येक कारकुनानें अमलांत आणला पाहिजे.

शिस्त व व्यवस्थितपणा संभाळणें:—प्रत्येक कारकुनानें आपल्या काम करण्याच्या पद्धतींत एक प्रकारची शिस्त व व्यवस्थितपणा संभाळला पाहिजे, म्हणजे थोड्या वेळांत पुष्कळ काम बिनचूक रीतीनें त्याला करतां येतें. ज्या वेळीं

पेढीच्या कारकुनाला एकाच वेळीं अनेक कामें करण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं कोणचें काम सर्वांत महत्त्वाचें आहे व कोणतें काम केव्हां केलें पाहिजे, हें त्यानें ताबडतोब ठरविलें पाहिजे व त्याप्रमाणें तें काम पार पाडलें पाहिजे. त्याचप्रमाणें ऑफिसमध्यें वक्तशीर येणें हा नियम प्रत्येक कारकुनानें पाळलाच पाहिजे. अगदीं वेळेवर ऑफिसमध्यें न येतां पांच मिनिटें अगोदर आलें असतांना त्या कारकुनास थोडी विश्रांति घेऊन चांगल्या रीतीनें काम सुरू करतां येईल. ह्या सांगितलेल्या गोष्टी कोणास अगदीं क्षुल्लक वाटतील; पण क्षुल्लक म्हणूनच पुष्कळ लोक त्यांचेकडे दुर्लक्ष करितात व शेवटीं रडत बसतात. असो. शेवटीं ' स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ' हें भगवद्वाक्य लक्षांत ठेवून प्रवाहपतित असें जें आपलें काम तें उत्तम तऱ्हेनें करून दाखविणें हें आपलें कर्तव्य आहे असें प्रत्येक कारकुनानें समजावें.

पेढीच्या धंद्यांत शिरणाऱ्या नवीन इसमानें आपणासमोर ध्येय निश्चित ठेवून मग त्या धंद्यांत शिरावें. पुष्कळ वेळां मनुष्य एखाद्या धंद्यांत केवळ विधिवशात् शिरत असतो. कधीं कधीं पेढीचा धंदा म्हणजे अतिशय थोड्या वेळांत खूब श्रीमंत होण्याचा राजमार्ग होय अशा भ्रामक समजुतीनेंच कांहीं माणसें हा धंदा स्वीकारतात; पण ह्या समजुती जितक्या लवकर डोक्यांतून जातील तितक्या बऱ्या. कोठल्याही धंद्यांत मोठ्या प्रमाणांत एकदम पैसे मिळणें शक्य नसतें आणि तो जर तसा मिळाला—उदाहरणार्थ, सट्टेबाजीसारख्या धंद्यांत—तर जितक्या लवकर तो मिळतो, तितक्याच लवकर तो नाहींसाही पण होतो तेव्हां पेढीचा धंदा हा कांहीं सट्टेबाजीचा धंदा नव्हे. त्याचप्रमाणें तो सर्वस्वीं सुखमय धंदा असतो अशीही गोष्ट नाहीं तेव्हां ह्या धंद्यांत प्रवेश करितांना प्रत्येकानें आपली महत्वाकांक्षा मर्यादितच ठेविली पाहिजे. एकदां प्रवेश केल्यावर आपण आपल्या धंद्यांत चांगलें नांव मिळवूं अशी उमेद त्यानें बाळगिली पाहिजे. इतकेंच नव्हे तर तें नांव मिळविण्यास त्यानें आवश्यक लागणारें पेढीविषयक ज्ञान मिळवीत राहिलें पाहिजे. हें ज्ञान संपादन करण्याचे दोन मुख्य मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे पेढीच्या धंद्याच्या ज्या अनेक शाखा आहेत त्यांत स्वतः काम करून त्या शाखांची माहिती करून घेणें. कोठलीही गोष्ट पुस्तकांतून वाचण्यापेक्षां किंवा लोकांनीं करितांना पहाण्यापेक्षां स्वतः आपण स्वहस्तानें करणें हें केव्हांही श्रेयस्कर असतें. कारण ती गोष्ट करीत असतांना ज्या चुका होत असतात त्या चुक्याच आपणांस जास्त शहाणपण शिकवीत असतात. तेव्हां पेढीच्या निरनिराळ्या शाखांतील कामें स्वतः करून अनु-

भव मिळविणें हा एक मार्ग होय; पण प्रत्येक गोष्ट स्वतः करूं म्हटलें तर जगांत हल्लीं ज्ञानाची जी वाढ झाली आहे ती झालीच नसती; म्हणून लोकांनीं जे आपले अनुभव लिहून ठेवले असतील त्यांचाही उपयोग आपण अवश्य करून घेतला पाहिजे; म्हणजे पेढी ह्या विषयावर आजपर्यंत जे ग्रंथ झाले असतील त्यांचें वाचन, चिंतन व निदिध्यासन करणें ह्याही दुसऱ्या मार्गाचा अवलंब पेढीच्या धंद्यांत शिरणाऱ्या माणसानें केला पाहिजे. तेव्हां सांगावयाचा मुद्दा हा कीं, स्वतः अनुभव घेऊन व पुस्तकांचें वाचन करून व अशा तऱ्हेनें मिळालेल्या ज्ञानाचा वारंवार धंद्यांत उपयोग करून मनुष्यानें ह्या धंद्यांत पुढें येण्याची व आपल्या ज्ञानाचा समाजाला उपयोग करून देण्याची हांव करावी.

पेढीच्या धंद्यांत शिरणाऱ्या कारकुनांच्या तीन अवस्थाः-- पेढीच्या धंद्यांत प्रथम शिरल्यावर प्रत्येक माणसाला तीन अवस्थांतून जावें लागतें. पहिली अवस्था म्हणजे निरीक्षणाची होय. पेढींतल्या कारकुनाला प्रथम अगदीं सांगकाम्याप्रमाणें ऑफिसामध्यें काम करावें लागतें व हें काम काय आहे ह्याची तें काम करीत असतांना माहिती करून घ्यावी लागते. ह्या अवस्थेमध्यें असतांना आपण हें काम असें कां करितों, ह्याचें कारण त्याला जरी न कळलें तरी चालेल; पण त्यानें निरनिराळ्या खात्यांतील माहिती घेत राहिलें तरी त्याला फार फायदा होईल. ह्या अवस्थेनंतरची दुसरी अवस्था म्हणजे आतांपर्यंत मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करून निरनिराळ्या खात्यांतील कामें न कंटाळतां, न त्रासतां बारीकसारीक गोष्टींकडे पूर्ण लक्ष देऊन स्वतःच्या जबाबदारीवर पार पाडणें ही अवस्था होय. ही अवस्था जरा त्रासाचीच आहे ह्यांत शंका नाहीं; पण पुढें जर पेढीच्या मॅनेजरच्या जागेसारख्या जबाबदारीच्या जागेवर आरूढ होण्याची त्याची महत्वाकांक्षा असेल तर हे लोखंडाचे चणे खाल्ल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. ह्यानंतरची तिसरी अवस्था म्हणजे सर्व पेढीची व्यवस्था मॅनेजर ह्या नात्यानें पहाणें ही होय. असो; पेढींत शिरणाऱ्या माणसानें मनांत आणलें तर त्याला आपलें ज्ञान वाढवितां येऊन आपली स्थिति आर्थिकदृष्ट्या चांगली करतां येईल. आतां पेढीला प्रत्येक कारकून प्रतिगिलबर्ट बनेल असें आमचें म्हणणें नाहीं. 'नर करणी करे तो नरका नारायण हो जाय' असें म्हणण्यानें प्रत्येक मनुष्य प्रत्यक्ष नारायण होत नाहीं; तरीपण अशी उदात्त महत्वाकांक्षा मनांत धरणें जसें इष्ट आहे तसेंच आपण श्रेष्ठ पेढीवाले होऊं असें ध्येय प्रत्येक पेढींतल्या कारकुनानें ठेवणें जरूर आहे.

पेढीचा इतिहास

भाग दुसरा

प्रकरण १ लें.

प्राक्कालीन पेढ्या.

पेढीचा उगमः—पेढी ही संस्था जरी हल्लींच्या काळीं व्यापारीदृष्ट्या फार महत्वाची गणलेली आहे तरी तिचा उगम केव्हां झाला हें सांगणें बरेंच कठीण आहे. हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून काव्य, शास्त्र, तत्वज्ञान ह्या विषयांचा सांगोपांग खल झालेला आहे; पण इतिहासाविषयीं कोणींही विचार केलेला नाहीं. युरोपखंडांत फार प्राचीन काळापासून इतिहासाकडे लोकांचें लक्ष असून मोठमोठ्या शूर राजांचे व जुलमी लोकांचे वृत्तांत आपणांस वाचावयास मिळतात. पण उपयुक्त कलाकौशल्य किंवा चिरपरिणामकारी व्यापाराचीं निरनिराळीं अंगें ह्यांच्याबद्दल कोणींही फारसें लिहिलेलें नाहीं; विशेषतः पेढ्यांबद्दल हा अनुभव आपणांस दिसून येतो. ह्या दुर्लक्ष्यपणाचें असें एक कारण दिसतें कीं, पूर्वकाळीं पेढ्या फारशा असण्याचा संभव नव्हता; कारण त्या वेळीं राष्ट्राची उपजीविका कृषीवर चालत असे. ज्या वेळीं व्यापाराची वाढ विशेष प्रमाणांत होत असते त्याच वेळीं ह्या पेढ्यांची भरभराट होत असते. हिंदुस्थानाचा परराष्ट्रांशीं पूर्वी मोठ्या प्रमाणांत व्यापार चालत होता. तेव्हां ह्या देशांत पेढ्या असण्याचा संभव आहे; पण समवायिक भांडवलावर संस्था उभारणें व व्यापारी हुंड्या किंवा नोटा ह्यांचा उपयोग करणें ह्या नवीन तऱ्हा पूर्वींच्या पेढीवाल्यांस ठाऊक नसल्यामुळें त्या काळीं हिंदुस्थानांतसुद्धां पेढ्यांची फारशी वाढ झालेली

नव्हती. त्या काळीं वस्तुविनिमयसाधन म्हणजे सोन्याचांदीची धातू अशी ठाम समजूत असल्यामुळें व्यापारी लोक आपले व्यवहार ह्या सोन्याचांदीनेंच करीत असत; पण पुढें पुढें ह्या धातूंच्या लगडी जाऊन नाण्याचा प्रचार सुरू झाला व प्रत्येक देशाचें नाणें निरनिराळें असल्यामुळें व्यापारी लोकांना आपल्या व्यवहारांत तीं नाणीं स्वीकारावीं लागत व त्यांच्या देशांत आलेल्या व्यापारी लोकांना आपलीं नाणीं देऊन त्यांची नाणीं घ्यावीं लागत. नाण्यांची अदलाबदल करणें हा एक धंदा होऊन बसला होता किंवा इतर धंद्यांबरोबर व्यापारी लोक हाही धंदा करीत असत हें सांगणें शक्य नाहीं; पण एवढें मात्र खरें कीं, जे लोक आपलीं नाणीं व्यापाऱ्यांकडून बदलून घेत त्या व्यापाऱ्यांना कांहीं व्याज ह्या लोकांना द्यावें लागे. ज्याअर्थी हे आपलें नाणें बदलून घेणारे लोक व्यापाऱ्यांस कांहीं व्याज देत, त्याअर्थी ते लोकही दुसऱ्यास कर्जाऊ रकम देत असतांना कांहीं व्याज आकारीत असले पाहिजेत हें उघड आहे. ही स्थिति बॅबिलोनिया, इजिप्त वगैरे देशांत दिसून येत होती.

हिंदुस्थानांतील प्राचीन काळची सावकारी पद्धत:—नुसत्या हिंदुस्थानचाच विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, प्राचीन काळीं ह्या देशांत स्वतःच्या पायावर उभ्या राहणाऱ्या ग्रामसंस्था असत व ह्या संस्था विशेषतः खेडेगांवांत असल्यामुळें त्या शेतकऱ्यांना अडचणीच्या वेळीं कर्जानें रकमा देत असत; इतकेंच नव्हे तर शेतकऱ्यांना दुष्काळ वगैरे आपत्तींमुळें जर पैशाची मदत लागली तर ती पुरविणें राजाचें प्रधानकर्तव्य मानलें जाई. मोठमोठाल्या व्यापारी शहरांतही पतीवर मोठमोठे व्यवहार होत असत व लोकांना व्यापारानिमित्त नेहमीं कर्ज काढण्याचे प्रसंग येत. हें कर्ज काढावयाचें म्हणजे त्यावर व्याज द्यावें लागणारच. पण प्राचीनकाळीं जबर व्याज आकारण्याविरुद्ध स्मृतिकाराचा बराच कटाक्ष असे. मनूनें स्पष्ट म्हटलें आहे कीं, केवळ नफ्याच्या आशेनें व गरजवंताच्या गरजेचा फायदा घेऊन भलताच व्याजाचा दर आकारणें म्हणजे पापाचा धनीच होण्यासारखें आहे. आतां प्रश्न असा उद्भवतो कीं, व्याजाचा दर माफक म्हणजे काय? मनुष्याला कर्ज काढण्याचे अनेक प्रसंग असतात व हें कर्जही निरनिराळ्या कामांकरितां काढावें लागतें. तेव्हां सर्वच प्रसंगीं व सर्वच कामांकरितां लागणाऱ्या कर्जाबद्दल व्याजाचा दर एकच असणें शक्य नाहीं व इष्टही नाहीं. गांवांतल्यागांवांत खाजगी कामाकरितां

लागणाऱ्या कर्जावर आकारलेला व्याजाचा दर दूर ठिकाणीं व व्यापारीनिमित्त दिलेल्या पैशाबद्दल आकारलेल्या व्याजाच्या दराहून भिन्न असणें साहजिक आहे. त्याचप्रमाणें प्राचीनकाळीं माणसाची जात, त्याची समाजांत असलेली पत व कर्ज परत मिळण्याची मुदत ह्या गोष्टींवरही व्याजाचा दर बराच अवलंबून असे. एखादा कर्ज काढणारा मनुष्य ब्राह्मण असला तर त्याला स्वस्त दरानें म्हणजे दोन टक्यांनीं रकम मिळे; पण तोच जर खालच्या जातींतला असला तर तो दर जबर म्हणजे तीन, चार, पांच टक्केपर्यंत राही. ह्याचें कारण उच्च जातींतला मनुष्य सहसा लबाडी करणार नाहीं अशी त्यावेळची सर्वसामान्य समजूत असे. तसेंच कर्ज जर जास्त मुदतीचें असेल तर त्याबद्दल ऋणकोस जास्त व्याज द्यावें लागे. सामान्यपणें गहाण स्वीकारल्यावर दरसाल दर शेंकडा १५ टक्के हा दर माफक समजला जाई; पण धोक्याच्या व्यवहारांत–उदाहरणार्थ समुद्रावरून पाठविल्या जाणाऱ्या मालाकरितां काढलेल्या कर्जावर–२० टक्के घेण्याची मुभा लोकांस दिलेली असे. त्याचप्रमाणें बिनगहाणाच्या कर्जावर २४ टक्के आकारण्यास मनूची अनुज्ञा होती. प्रथम प्रथम ज्या वस्तूंचें कर्ज काढलें असेल त्या वस्तूंच्या रूपानेंच व्याज घेतलें जाई; पण पुढें पुढें हें व्याज द्रव्यरूपानें घेण्याची सवलत मिळूं लागली. प्राचीन काळीं कोणचें व्याज निषिद्ध असे ह्याचेंही प्रकार असत. उदाहरणार्थ, चक्रवाढ व्याज, कालवृद्धि (प्रत्येक महिन्यास अमुक व्याज इत्यादिक नियम नसून अमुक दिवशीं दिल्यास दुप्पट धन द्यावें अशा नियमानें घ्यावयाचें व्याज), कारितावृद्धि (म्हणजे धनकोच्या त्रासानें कबूल केलेलें व्याज), कायिका वृद्धि (व्याजाबद्दल शरीरानें मजूरी करून फेडावयाचें व्याज), हे सर्व निषिद्ध व्याजाचे प्रकार होत. एखाद्या सावकारानें दुसऱ्या इसमास कर्ज देतांना जामिनकी मागण्याचाही प्रघात त्याकाळीं असे व ही जामिनकी मुख्यत: दोन प्रकारची असे. ऋणकोला कर्ज देतांना सावकार कधीं हजरजामीन मागे, तर कधीं मालजामीन मागे. कर्ज न दिल्यास ऋणकोसच हजर करण्याची हमी घेणारा हा हजरजामीन समजला जाई व तसें न करितां द्रव्य देण्याची हमी घेणारास मालजामीन असें मानलें जाई. ह्यांनाच संस्कृतमध्यें ' दर्शनप्रतिभू ' व ' दानप्रतिभू ' अशा संज्ञा असत. पूर्वकाळीं व्यापाराचे बाबतींत इतकी सुधारणा झाली होती कीं, लोक विश्वासानें आपल्या ठेवी श्रीमंत लोकांकडे ठेवीत असत व ह्या ठेवींचा उपयोग अर्थातच व्यापारवृद्धीचे कामीं होत असला पाहिजे. अशा प्रकारची स्थिति पूर्वीं हिंदुस्थानांत होती.

ग्रीस व रोम येथील पेढ्या.—आपण जर ग्रीस व रोम ह्या सुधारलेल्या राष्ट्रांकडे वळलों तर आपणांस असें दिसून येईल कीं, ह्या राष्ट्रांमध्यें पेढीच्या व्यवहाराची वाढ थोडीबहुत झालेली असावी. आपण नुसतीं ग्रीस, रोम किंवा यहुदी राष्ट्रें घेतलीं तर आपणांस ही वाढ किती झाली होती ह्याची कल्पना करतां येणार नाहीं; पण तिन्ही राष्ट्रांचा जर एकदम विचार केला तर त्यावरून आपणास असें समजेल कीं, हल्लीं लोकांमध्यें जितकी पेढ्यांच्या मूलतत्त्वांची माहिती पसरलेली आहे तितकी माहिती त्या वेळींही झालेली होती. इतिहासाचा अभ्यास जर आपण काळजीपूर्वक केला तर आपणास असें दिसून येईल कीं, जीं जीं राष्ट्रें व्यापारी व औद्योगिक असतात व जेथें लोकांमध्यें परस्पर विश्वास उत्पन्न झालेला असतो त्या त्या राष्ट्रांत लोकांना पैशाची नेहमीं गरज भासूं लागते व ह्या सहज उत्पन्न होणाऱ्या गरजा भागविण्याकरितां पेढ्यांसारख्या संस्था निर्माण कराव्या लागतात व त्यांचे व्यवहार व्यापार बाल्यावस्थेंत असतांना इतके धोपट मार्गी असतात कीं, त्यांना लवकरच ठरावीक वळण मिळूं लागतें. तेव्हां ग्रीस व रोमसारख्या राष्ट्रांत हल्लींच्या काळांतल्या पेढीच्या मूलतत्त्वांच्या ज्ञानाइतकें ज्ञान त्या वेळीं लोकांमध्यें आढळल्यास आपणास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. ग्रीसमध्यें पेढीवाले लोकांच्या ठेवी व्याजानें घेऊन त्यांतील रकमा लोकांस अधिक व्याज घेऊन देत असत. त्याचप्रमाणें रोमन पेढीवाले लोकांकडून चालू खात्यावर पैसे स्वीकारून त्यांच्याकडून लेखी हुकूम आल्यावर ते पैसे परत करण्याची व्यवस्था करीत; पण एकदां पैसे घेतल्यावर पुनः लोकांनीं मागणी केली असतांना रोख पैसे न देतां आपल्या नोटा काढून त्यावर काम भागविण्याची कल्पना त्या वेळीं लोकांना आली नव्हती.

ग्रीस देशामध्यें पहिल्या पेढ्या म्हणजे डिल्फी, ऑलिंपिया अपोलो येथील देवळें असत. देऊळ म्हणजे सर्वांस पूज्य अशा देवाचें वसतिस्थान. अर्थात् ह्या ठिकाणीं जर कोणीं आपलें द्रव्य नेऊन ठेविलें तर तें द्रव्य चोरण्याची कोणाची छाती होणार नाहीं. ह्या कल्पनेनेंच त्या वेळच्या लोकांनींही देवळांना पेढ्या बनविण्याची कल्पना शोधून काढिली असावी. पण ह्या देवळांत आपलें जडजवाहीर आणून ठेवल्याबद्दल त्या देवळांतील पुजारी त्या लोकांस व्याज देत नसत; म्हणून खाजगी लोकांनीं काढिलेल्या पेढ्यांचें उच्चाटन ह्या देवळांमुळें होणें शक्य नव्हतें. अशा खासगी पेढ्या अथेन्स शहरीं बऱ्याच असत;

कारण त्या काळीं तें शहर व्यापाराचें केंद्र असे. ह्या शहरांतल्या लोकांना आपला पैसा व्यापारांत गुंतविणें फायदेशीर वाटे; पण या शहरच्याबाहेर आपला पैसा कर्जाऊ देण्याची त्यांना परवानगी नव्हती. अथीनियन लोक आपला व्याजाचा दर रक्कम कर्जाऊ देतांना ठरवीत असत; व ऋणको व धनको ह्यांमध्यें होणारा हा करार एखाद्या पेढीवाल्याजवळ किंवा दोन्ही पक्षांच्या ओळखीच्या एखाद्या माणसाकडे ठेविला जाई. त्यावेळीं अथीनियन लोक समुद्रावर व्यापार करणाऱ्या व जमीनीवर व्यापार करणाऱ्या लोकांना कर्ज देत असत. एखाद्या जलमार्गानें व्यापार करणाऱ्या माणसानें जर कर्ज काढलें तर त्याला आपला माल जामीन म्हणून ठेवावा लागे व ज्या मानानें हा समुद्रावरील व्यापार धोक्याचा व फायदेशीर असेल त्या मानानें सावकार आपल्या कुळाकडून शेंकडा तीस टक्केपर्यंत व्याज आकारीत असत. ज्या लोकांना अशा दर्यावर्दी व्यापाऱ्यांना पैसा देऊन आपला पैसा धोक्यांत घालण्याची इच्छा नसे ते लोक आपला पैसा पेढीवाल्यांस दरसाल दर शेंकडा १२ टक्क्यांनीं कर्ज म्हणून देत. पण कधीं कधीं हा व्याजाचा दर १६ टक्केपर्यंत जाई व कुळ जर गांवढळ असेल तर मदलाचा चतुर्थांश दर दिवशीं घेण्याची चाल असे.

व्यापारामुळें पैसा जास्त खेळूं लागतो व तो जास्त खेळूं लागला म्हणजे पेढीवाले निर्माण होतात. हीच स्थिति अथेन्समध्यें असे. एखादा मनुष्य व्यापारास परदेशीं जलमार्गानें निघाला किंवा एखाद्या माणसाजवळ खूब पैसा असला व तो जवळ ठेवणें त्याला धोक्याचें वाटूं लागलें तर तो इसम आपला पैसा ह्या पेढीवाल्याजवळ ठेव म्हणून ठेवी व ह्या ठेवीबद्दल त्याला कांहीं व्याज मिळत नसे; कधीं कधीं पेढीवाला त्याला थोडेंबहुत व्याजही देई. पैसा ठेवणाऱ्या गृहस्थाचा पेढीवाल्यावर पूर्ण विश्वास असल्यानें तो ठेवतांना साक्षीदाराची बिलकूल जरूर नसे व पेढीवालेहि आपली अब्रू कायम रहावी म्हणून सहसा लोकांस फसवीत नसत. एखाद्या माणसानें जर आपला पैसा परत मागितला व तो पैसा पेढीवाल्यास परत देतां आला नाहीं तर त्याचें दिवाळें निघून त्याला आपलें तोंड कोठें तरी लपवावें लागे किंवा आपल्याजवळ असलेली सर्व रक्कम बाहेर काढून देणेंकऱ्याचें देणें फेडावें लागे. त्या वेळीं पेढीवाले सोनें कसाला लावून व वजन करून इतर देशांच्या नाण्यांची अदलाबदलहि करीत असत. इतकेंच नव्हे तर समवायिक भांडवल जमवून एक पेढी काढून लोकांना कर्ज द्यावें व हा व्यवहार करतांना जें व्याज

मिळेल त्या व्याजावर सर्व अथेन्स शहराचा राज्यकारभार चालवून सर्व लोकांना सुखी करावें अशी योजना झेनोफेननें काढली होती. ही कल्पना जरी आचरट-पणाची असली तरी समवाईक भांडवलावर पेढी काढण्याची कल्पना त्यावेळीं लोकांना सुचली होती ही गोष्ट महत्वाची आहे.

ग्रीसनंतर रोमकडे आपण नजर फेकली म्हणजे आपणांस असें दिसून येईल कीं, या देशांतही पेढ्यांचा प्रचार झालेला होता. ग्रीसच्या मानानें रोमन राष्ट्र फारसें व्यापारी नसल्यामुळें ह्या शेतकीप्रधान देशांत पेढीवाल्याला फारसा मान नसे. तरीपण सरकार कर वसूल करण्याकरितां ज्या पेढीवाल्यांना नेमीत असे त्यांचा इतका मोठा दर्जा असे कीं, त्यांपैकीं कांहीं लोक कॉन्सलच्या* दर्जापर्यंत पोंचले होते. ह्या पेढीवाल्यांची काम करण्याची तऱ्हा हल्लींच्या पेढीवाल्यांच्या कामाच्या तऱ्हेप्रमाणेंच असे; म्हणजे सरकारनें किंवा श्रीमंत लोकांनीं आपला पैसा पेढीजवळ आणून ठेवावा व तिनें त्यांना त्या पैशाबद्दल चेक द्यावा. ग्रीस देशांमधील पेढ्यांप्रमाणें रोममधील पेढ्याही लोकांकडून हलक्या व्याजानें रकमा घेऊन जास्त व्याजानें कर्जाऊ देत व पर-राष्ट्रांतल्या नाण्यांची अदलाबदल करीत; इतकेंच नव्हे तर ह्या पेढ्या गरीबांना बिनव्याजानें किंवा थोड्या व्याजानें त्यांच्याकडून योग्य तारण घेऊन रकमा कर्ज म्हणून देत असत.

मध्ययुगीन युरोपांतल्या पेढ्याः—ग्रीस व रोम ह्या दोन राष्ट्रां-नंतर आपण जर युरोपखंडाकडे नजर फेंकली तर आपणांस असें दिसून येईल कीं, ज्यु लोक पेढीचा उपयोग करण्याचे बाबतींत ९ व्या शतकांत बरेच पुढें गेलेले होते. या वेळेचा इतिहास उपलब्ध नसल्या कारणानें ह्या धंद्यांत लोकांची किती प्रगति झाली हें ठरविणें शक्य नाहीं. पण हे लोक त्या वेळीं पेढीवाल्यांचीं सर्व कामें करीत असले पाहिजेत; कारण सावकारी धंदा ह्यांच्या पांचवीला पुजलेला असे. ह्यांची एक पेढी इटलीमध्यें लंबार्डी ह्या शहरीं असे. हें शहर पेढ्यांची जन्मभूमि म्हणून प्रसिद्ध आहे. युरोपमध्यें ह्या लोकांविषयीं ह्यांच्या

* पूर्वी रोममध्यें राजसत्ता नष्ट झाल्यावर सर्व देशाची लष्करी व मुलकी व्यवस्था ज्या लोकनियुक्त दोन अधिकाऱ्यांकडे असे त्यांना कॉन्सल अशी संज्ञा असे.

जवर व्याज आकारण्याच्या पद्धतीमुळें जनसमाजांत तीव्र द्वेष होता व ह्या लोकांचें उच्चाटण करण्याचा प्रत्येक राष्ट्र प्रयत्न करीत असे.

व्यापार व कलाकौशल्य ह्यांचें इटलीमध्यें पुनरुज्जीवन झाल्यामुळें जिनोवा, व्हेनिस व फ्लारेन्स ह्या संस्थानांत पेढ्यांची वाढ फार झपाट्यानें झाली. पहिली पेढी व्हेनिस येथें ११५७ सालीं स्थापन झाली व तिचें काम म्हणजे तेथील मुख्याधिकाऱ्याला कर्जानें चार टक्क्यांनीं रक्कम दिल्यावर लोकांच्या ठेवी स्वीकारणें किंवा चेक देणें वगैरे असे. पण ह्या पेढीनें आपलें खरेंखुरें काम, स्थापन झाल्या वेळेपासून २०० वर्षांनीं, करण्यास सुरवात केली. ही पेढी फ्रान्सनें व्हेनिसवर स्वारी केल्यावर १७९७ सालीं अस्तंगत झाली.

पण पेढीच्या धंद्याच्या कामांत खरी आघाडी फ्लारेन्सनें मारली. ह्या संस्थानांत कापड, रेशीम व लोंकर ह्यांचे कारखाने मोठ्या प्रमाणांत चालत व ह्या कारखान्यांच्या मालकांचे संबंध युरोपमधील इतर राष्ट्रांशीं विशेष प्रमाणांत येत असल्यामुळें ह्या संस्थानांतील लोकांनीं पेढीच्या धंद्याची विलक्षण वाढ करून युरोपमधील लोकांचे पेढ्यांचे बाबतींत गुरू म्हणून लौकिक संपादन केला. ह्या वेळीं पेढयांचा धंदा जरी खाजगी व्यक्तींकडे असे तरी प्रत्येक देशांत एखादी सार्वजनिक किंवा राष्ट्रीय पेढी असावी अशी प्रवृत्ति दृग्गोचर होत असे. ह्या पेढ्या व्यापारवृद्धी व सरकारास आर्थिक मदत ह्या दोन गोष्टी साध्य करण्याकरितां स्थापन झालेल्या असत.

१३४९ सालीं बारसीलोना ह्या शहरीं तेथील कापडाचे व्यापारी पेढीचें कामकाज पाहूं लागले. ह्या लोकांना पेढी सुरू करण्यापूर्वी अरागॉनच्या राजाला बरीच रक्कम जामीनादाखल भरावी लागली. १४०१ सालीं ह्याच शहरीं तेथील अधिकाऱ्यांनीं एका सार्वजनिक पेढीची स्थापना केली व हुंड्या वटविणें, पैशाची अदलाबदल करणें व ठेवी ठेवणें हीं कामें ती पेढी पाहूं लागली. ह्या वटविलेल्या हुंड्या केवळ शहरांतील व्यापाऱ्यांनीं काढिलेल्या असत असें नाहीं, तर बाहेरच्या लोकांसंबंधानेंहि त्या काढिलेल्या असत.

१०७७ सालीं जिनोआ येथें एक पेढी निघाली. हिचें अस्तित्व सरकारच्या कर्जाची व्यवस्था करणें व तें फेडण्याकरितां आर्थिक मदत करणें ह्या कामांकरितां होतें. ह्या पेढीची व्यवस्था आठ डायरेक्टरांकडे असे व ते डायरेक्टर

पेढीच्या भागीदारांनीं (Proprietors) निवडलेले असत. ह्या पेढीनें दिलेल्या कर्जाबद्दल तारण म्हणून तिजकडे तेथील सरकारनें कांहीं शहरें व मुलुख लावून दिलेले असत. ही पेढी १८०० सालीं बंद करण्यांत आली.

१६०९ सालीं आमस्टर्डॅम येथें एक पेढी स्थापन झाली व अर्वाचीन काळीं पेढ्या जीं कामें करितात, तीं कामें प्रथम सुरू करण्यास ह्या पेढीनें प्रारंभ केला ह्या वेळीं ह्या शहरीं जगांतील व्यापाराची उलाढाल होत असे व डच लोकांचें ह्या पेढीवर फार प्रेम असे; कारण त्यांचे मतानें त्यांचा त्या वेळचा उत्कर्ष ह्या पेढीवरच अवलंबून होता ह्या शहरांत व्यापार मोठ्या प्रमाणांत चालत असल्यामुळें इतर राष्ट्रांतील वापरलेलीं व हलकीं नाणीं येथें फार बोकाळलीं होतीं. हीं सर्व नाणीं स्वीकारून त्यांची खरी किंमत ठरवून ठराविक कसाचीं व वजनाचीं नवीन नाणीं पाडण्याचें काम ह्या पेढीनें सुरू केलें, व जितक्या हुंड्या हॉलंड देशावर काढलेल्या असतील तितक्या हुंड्या ह्या पेढीनें काढलेल्या नाण्यांनींच वटवावयाच्या असा कायदा झाल्यामुळें त्या हुंड्यांचें महत्त्व वाढलें. त्यामुळें प्रत्येक व्यापाऱ्याला आपणांवर काढलेल्या हुंड्या आपणांस वटविण्याससुलभ व्हावें म्हणून ह्या पेढीशीं व्यवहार ठेवणें भाग पडूं लागलें. अशा तऱ्हेनें ह्या पेढीचें महत्व वाढलें; इतकेंच नव्हे तर ह्या पेढीच्या नाण्याला शेंकडा १४ टक्के बटावा येऊं लागला व हा बटावा म्हणजे ॲम्स्टर्डाम येथील अस्सल नाणें व आसपासच्या संस्थानांतील वापरून झिजून हिणकस झालेलीं नाणीं ह्यांतील फरक असे. पुढें पुढें ह्या बटावा-(Agio) मुळें सट्टेबाजी सुरू झाल्यामुळें तिला आळा घालण्याकरितां ह्या पेढीनेंच आपलें सर्व नाणें शेंकडा पांच दरानें विकण्याचें व ४ दरानें विकत घेण्याचें ठरविलें. ह्या व इतर मार्गांनीं ह्या पेढीची फारच भरभराट झाली आणि युरोपमध्यें असलेल्या इतर पेढ्यांस ती आदर्शभूत होऊन बसली.

प्राचीन व अर्वाचीन पेढ्या अस्तित्वांत येण्याचीं भिन्न भिन्न कारणें:—आतांपर्यंतच्या पेढ्यांच्या इतिहासावरून वाचकांस कळलेंच असेल कीं, पेढ्यांचा जन्म मध्ययुगांत युरोपमध्यें सरकारला आर्थिक मदत करण्याकरितांच झाला. हल्लीं पेढ्या अस्तित्वांत येण्याचें कारण असें असतें कीं, लोकांजवळ त्यांना न लागणारा असा बराच पैसा शिल्लक असतो व तो पैसा सुरक्षित राहून त्यावर थोडेंबहुत व्याज मिळावें अशी त्यांची इच्छा असते. हा पैसा ठेव म्हणून स्वीकारण्याकरितां पेढ्या निर्माण होतात; पण ही हल्लीं अगदीं सोपी दिसणारी गोष्ट

पूर्वी लोकांना पटण्यासारखी नव्हती. पेढ्यांजवळ लोकांच्या ठेवी येण्यास पुष्कळ लोकांनीं कांहीं लोकांवर किंवा एका माणसावर विश्वास ठेवून आपला कष्टानें मिळविलेला पैसा त्यांचेजवळ आणून दिला पाहिजे; पण असा विश्वास एखाद्या संस्थेवर किंवा व्यक्तीवर ठेवणें हें जरी हल्लीं सोपें वाटत असलें तरी पूर्वी अशी वस्तुस्थिति नव्हती हें उघड आहे. असो; सांगावयाचें तात्पर्य, मध्ययुगीन युरोपीय पेढ्या सरकारला स्वतः कर्ज देऊन किंवा लोकांमध्यें सरकारी कर्ज उभारून पैसे पुरविण्याकरितां निर्माण झाल्या व तशा स्थापन झाल्यानंतरच त्यांचा उपयोग ठेवी ठेवणें, लोकांना व्यापारवृद्धीकरितां कर्ज देणें वगैरे गोष्टींकडे होऊं लागला. वर सांगितल्याप्रमाणें ॲम्स्टर्डाम, व्हेनिस, हॅम्बर्ग व न्यूरेंबर्ग येथील पेढ्या तर लोकांचीं हीणकस नाणीं स्वीकारून त्यांना खरीं नाणीं देण्याकरतांच जन्मास आलेल्या होत्या.

आतांपर्यंत युरोपखंडांतल्या मध्ययुगीन पेढ्या अस्तित्वांत येण्याचें एक प्रमुख कारण आपण पाहिलें; पण ह्याशिवाय दुसऱ्या एका कारणामुळें पेढ्या निर्माण होत असत. तें कारण म्हणजे एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं पैसा पाठविणें हें होय. एकाच पेढीच्या शाखा अनेक ठिकाणीं असल्या व ज्या ठिकाणचा पैसा दुसऱ्या ठिकाणीं जावयाचा त्या दोन्हीही ठिकाणीं जर त्या पेढीच्या शाखा असल्या तर तिला पैसा पाठविणें फारच सोपें जाईल. हल्लीं हिंदुस्थानांत पोष्टखातें लोकांचा पैसा एका ठिकाणाहून दुसरीकडे सहज पाठवीत असतें. कारण त्या पोष्टखात्याची शाखा प्रत्येक शहरीं असते. ज्या वेळीं देशांत व्यापाराची वाढ होत असते त्या वेळीं व्यापारी लोकांना नेहमीं पैसे पाठवावे लागतात. पूर्वी इटलीमध्यें व्यापार जोरांत चालत असल्यामुळें लोकांचे पैसे पाठविण्याचे काम ह्याच पेढ्या करीत असत.

प्रकरण २ रें.

इंग्लंडमधील पेढ्या.

थोडा पूर्वेतिहासः—इंग्लंडमध्यें १६९४ मध्यें बँक ऑफ् इंग्लंडची स्थापना होण्यापूर्वी म्हणजे मध्ययुगांत व अर्वाचीन काळच्या अगदीं प्रारंभीं

पेढ्यांचा कारभार प्रथम ज्यू लोक, नंतर इटालियन म्हणजे त्या वेळीं लंबार्ड ह्या नांवानें ओळखले जाणारे लोक व नंतर सोन्याचांदीचे व्यापार करणारे सुवर्णकार करीत असत. हे पेढीवाले लोक विशेषतः लंडनमध्यें रहात असत. कारण खेडे-गांवांत व लहान लहान शहरांत १८ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्यापूर्वी पेढीच्या धंद्याची वाढ फारशी झालेली नव्हती. सोनार लोकांचा नेहमीं सोन्याचांदीशीं व्यवहार असल्यामुळें इतर व्यापारी व सुखवस्तु लोक आपल्या मौल्यवान् जिनसा त्यांचेकडे ठेवीत असत. प्रथम प्रथम हे सुवर्णकार ह्या जोखमीबद्दल व्यापाऱ्यांकडून व्याज वगैरे घेत; पण पुढें पुढें तेच लोकांना व्याज देऊं लागले. सोनारांजवळ लोकांनीं जिन्नस ठेविला म्हणजे सोनार जी पावती देत तिचा उपयोग लोक नाण्याप्रमाणें करूं लागले. हळूं हळूं ह्या सोनाराच्या हातून पेढीचा धंदा जाऊन तो व्यापाऱ्यां-कडे कायमचा गेला.

बँक ऑफ इंग्लंडची प्रस्थापनाः--तिसऱ्या वुइल्यमच्या वेळीं १६९४ सालीं सरकारला आपण सुरू केलेली लढाई यशस्वी व्हावी म्हणून मदत करण्याच्या हेतूनें पार्लमेंटनें एक कायदा पास करून १० वर्षांकरितां ‘ The Governor and the Company of the Bank of England ’ ह्या नांवाची एक संस्था निर्माण केली. ह्या संस्थेनें तावडतोब १२ लाख पौंड सरकारला कर्ज म्हणून द्यावे व सरकारनें दर वर्षी खर्चादाखल म्हणून ४०० पौंड व शेंकडा ८ पौंड व्याज (हा त्या वेळीं व्याजाचा सर्वसामान्य दर होता) अशी रकम द्यावी असें दोघांत ठरलें. ह्या पेढीला पार्लमेंटनें दिलेल्या सनदेनुसार तिला हुंड्यांची खरेदी व विक्री करणें, नाणें व सोन्याचांदीच्या लगडी विकणें व विकत घेणें, माल गहाण ठेवून त्यावर पैसे कर्जानें देणें व जर हें कर्ज फिटलें नाहीं तर हा गहाण माल विकून टाकणें वगैरे अधिकार मिळाले. त्याचप्रमाणें १२ लाखांवर कर्ज काढूं नये किंवा वर सांगितलेल्या प्रकारांशिवाय अन्य मार्गांनीं माल घेणें किंवा विकणें, ह्या गोष्टी करूं नयेत असाही निर्बंध घालण्यांत आला. ह्या निर्बंधाचे मोबदला ह्या पेढीच्या प्रवर्तकांना कांहीं विशिष्ट हक्कही मिळाले. उदाहरणार्थ, ह्या पेढीची कर्जाची जबाब-दारी मर्यादित होती; म्हणजे प्रत्येक भागीदार आपण घेतलेल्या भागांबद्दलच पेढीनें काढिलेल्या कर्जाबद्दल जबाबदार असे. ह्या सवलतीचा असा फायदा झाला कीं, पुष्कळ व्यवहारदक्ष व्यापाऱ्यांना ह्या पेढीचे डायरेक्टर होण्याची इच्छा झाली. त्या वेळीं इंग्लंडमध्यें कोठल्याही कंपनीला अशी मर्यादित जबाबदारीची सवलत काय-

त्यानें दिलेली नव्हती. ह्या पेढीला सरकारची शिल्लकही वापरण्याची परवानगी मिळाली. ह्या सवलतीचा तर बँकेस फारच मोठा फायदा झाला. कारण सामान्यतः मनुष्याची प्रवृत्ति गीतेंत सांगितल्याप्रमाणें ' यद्यदाचरति श्रेष्ठ स्तत्तदेवेतरो जनः ' अशी असते. प्रत्येक देशात तेथील सरकाराहून जास्त श्रेष्ठ असें कोणीच नसतें. तेव्हां सरकारच ज्याअर्थी आपली शिल्लक ह्या बँकेजवळ ठेवतें त्याअर्थी आपली तुटपुंजी शिल्लक ह्या पेढींत ठेवण्यास बिलकूल हरकत नाहीं अशी लोकांची खात्री होत चालली व त्यामुळें पेढीची पत झपाट्यानें वाढत चालली. आपणांशिवाय इतर पेढ्यांनीं नोटा सुरू करूं नयेत असा पार्लमेंटचा कायदा असावा अशी ह्या पेढीची फार इच्छा होती; पण ती इच्छा सफल झाली नाहीं. तथापि ह्या पेढीच्या मुदतीस्तव तिची सनद चालू असतांना इतर संस्थांना पेढीचे विशिष्ट हक्क मिळूं नयेत असा १६९७ सालीं पार्लमेंटनें एक कायदा केला. तरीपण तो कायदा संदिग्ध असल्यामुळें इतर पेढ्या तो सहज मोडीत असत. म्हणून १७०८ सालीं नवीन कायदा होऊन असें स्पष्ट ठरलें कीं, इंग्लंडमध्यें ह्या पेढीव्यतिरिक्त इतर कोठल्याही सहांहून जास्त भागीदार असलेल्या संस्थेनें आपल्या हुंड्यांवर किंवा मागणी केल्यावर ज्यांचे पैसे मिळवावयाचे किंवा ज्या सहा महिन्यांच्या आंतील मुदतीच्या असतील अशा नोटांवर कर्ज काढूं नये. ह्या कायद्यानें फक्त हुंड्यांवर व नोटांवर कर्ज काढण्याचा खाजगी पेढ्यांचा हक्क नाहींसा झाला; पण नोटा काढणें वगैरे इतर नेहमींचे पेढीचे व्यवहार करण्याला त्यांना परवानगी होती; म्हणून बरेच दिवस ही पेढी व इतर पेढ्या ह्यांच्यांत मोठी चढाओढ होती. त्यामुळें ह्या पेढीचें मुख्य उत्पन्न म्हणजे सरकाला दिलेलें कर्ज आणि तिला असलेलें देणें म्हणजे सरकारची वापरलेली शिल्लक असें असे.

ही पेढी स्थापन करण्याचें श्रेय वुइल्यम पॅटरसन ह्या स्कॉटिश गृहस्थाला आहे. ह्यानें ही पेढी स्थापन करण्यापूर्वी इंग्लंडमध्यें वर सांगितल्याप्रमाणें पेढ्यांची व्यवस्था सोनरांकडे असे व हल्लींसुद्धां ज्या कांहीं अतिशय जुन्या खाजगी पेढ्या आढळून येतात त्यांचा उगम ह्या सोनारांच्या पेढ्यांपासूनच आहे.

बँक ऑफ् इंग्लंड पेढीचें भांडवल दहा दिवसांत उभें राहून तिला आरंभ चांगल्या प्रकारानें झाला व सरकारशीं संबंध असल्यामुळें पेढीची पत उत्तम तऱ्हेनें लोकांत निर्माण झाली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, पेढीनें जितक्या किंम-

तीचें कर्ज सरकारास दिलें होतें तितक्याच रकमेच्या नोटा पेढीनें सुरू केल्या व लोकांनीं त्या खुषीनें स्वीकारल्या. ह्या नोटांच्या मागच्या बाजूला नुसती सही केली म्हणजे त्या चालत असत व त्यांबद्दल नाणें केव्हां मिळावयाचें हें ती पेढी ठरवीत असे. तरीपण सरकारी चलन म्हणून जरी नसलें तरी खाजगी व्यवहारांत ह्या नोटा चालत असत व त्यांवर प्रथम व्याजही मिळत असे; पण दुसऱ्या वेळेला जेव्हां सरकारला कर्ज दिल्यावर नवीन नोटा काढण्यांत आल्या,त्या वेळीं हें व्याजही मिळेनासें झालें व १७०२ सालीं नोटा काढण्याचा पूर्ण मक्ता ह्या पेढीला मिळाला. ह्या पेढीची सनद तिच्यांत वारवार पार्लमेंट नवीन सुधारणा करून तिला देत असे व प्रत्येक वेळीं सरकारास नवीन कर्ज देऊन व पूर्वीं दिलेल्या कर्जाचा व्याजाचा दर कमी करून पेढीला ही सनद घ्यावी लागत असे. ह्या पेढीला अनेक प्रकारच्या प्रसंगांतून जावें लागलें व १७६७ पासून १८२१ पर्यंत ५४ वर्षांच्या अवधींत अनेकदां नोटांच्यामोबदला आपण रोकड देत नाहीं असें पार्लमेंटनें पास केलेल्या तात्पुरत्या कायद्याचे जोरावर लोकांना कळवावें लागलें. तथापि पेढीचा हा दोष नसे. कारण सरकार वारंवार ह्या पेढीकडे पैशाची मागणी करून तो पैसा युरोप खंडांतल्या दोस्त राष्ट्रांस पाठवीत असे म्हणून तिच्याकडे अर्थात्च एक फार्दिगही शिल्लक रहात नसे आणि लोकांनीं पैशाची मागणी केली म्हणजे तिला साहजिकच ती पुरी करतां येत नसे.

खासगी पेढ्या व १८२६ चा कायदा:—अठराव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या सुमारास खासगी पेढीवाल्यांची संख्या बरीच वाढलेली होती व हे लोक वाटेल त्या हलक्या किंमतीच्या नोटा काढून त्यांचा प्रसार करीत असत. अशा नोटा काढल्यानें कोणता दुष्परिणाम होतो ह्याची ते बिलकुल पर्वा करीत नसत. त्यावेळीं नेपोलियन बादशहाबरोबर युद्ध नुकतेंच संपलेलें होतें, व नोटा-बद्दल नाणें देऊं नये असें सरकारनें जाहीर केलेलें होतें. त्यामुळें खासगी पेढी-वाले आपणास मिळालेल्या सवलतींचा जास्तच दुरुपयोग करू लागले व आपले पैसे सट्टेबाजींत जास्तीच खर्च करू लागले. अर्थात ह्या पेढीवाल्यांचीं भराभर दिवाळीं निघूं लागलीं. अशा वेळीं हीं दिवाळीं कां निघतात ह्याबद्दल चवकशी सुरू झाली व लोकांना असें समजून चुकलें कीं, बऱ्याचशा पेढ्यांजवळ फारच थोडें, कधीं कधीं अगदीं शून्य, भांडवल असतें. त्यामुळें त्यांना आपल्या गिऱ्हाइकांचें देणें फेडतां येत नाहीं. तसेंच थोड्या किंमतीच्या नोटा काढण्याचा हक्क

त्यांना दिल्यामुळें त्या हक्काचा ते दुरुपयोग करीतात. तेव्हां असा हक्क देणें हें अनिश्चच आहे. नोटांचा उपयोग नाण्यासारखाच होत असल्यामुळें फाजील नाणीं प्रचारांत आणल्यानें जो दुष्परिणाम होतो तोच दुष्परिणाम त्या वेळींही होत असे.

हे दोष नाहींसे करण्याकरितां १८२६ सालीं एक कायदा सरकारनें केला व लंडनपासून ६५ मैलांहून जास्त अंतरावर अनियमित भागीदारांची संख्या असलेल्या पेढ्या स्थापन व्हाव्यात व बँक आफ इंग्लंडनें इंग्लंडमध्यें कोठेंही आपल्या शाखा स्थापन कराव्या असें ठरविलें. हा कायदा करण्यांत सरकारचा हेतु पेढ्यांची स्थापना शहरांत जास्त प्रमाणांत होऊन त्यांची सांपत्तिक स्थिति सुधारावी व लोकांना व्यापाराला लागणारें भांडवल जास्त प्रमाणांत मिळून देशांत उद्योगधंद्याची वाढ व्हावी असा होता. बँक आफ इंग्लंडचें तिला घातलेल्या सरकारी निर्बंधामुळें होणारें नुकसान कमी करून त्या पेढीचा फायदा लंडनपासून दूर असलेल्या शहरांतील लोकांनाही व्हावा हाही एक सरकारचा हेतु होता.

इंग्लंडमध्यें हा कायदा पास झाल्यावर दोन परिणाम दिसूं लागले. पहिला परिणाम म्हणजे बँक आफ इंग्लंडनें आपल्या शाखा उघडण्यास सुरवात केली व दुसरा परिणाम म्हणजे खाजगी पेढ्यांची संख्या बरीच कमी झाली. ही संख्या कमी होण्याचीं कारणें अनेक होतीं. कांहीं पेढ्या चढाओढीनें बुडाल्या, कांहीं पेढ्यांमध्यें बिलकूल राम नव्हता व बाकीच्या पेढ्यांचें पर्यवसान समवायिक भांडवलाच्या पेढ्यांमध्यें झालें. ज्या पेढ्या शिल्लक राहिल्या त्या म्हणजे कधींही न बुडणाऱ्या होत्या व त्यांचो व्यवहार करण्याची पद्धति पूर्वींच्या खासगी पेढयांच्या पद्धतीहून भिन्न स्वरुपाची होती असा कांहीं प्रकार नव्हता; पण त्यांची सांपत्तिक स्थिति पूर्वीच्या पेढयांच्या सांपत्तिक स्थितीपेक्षां जास्त चांगली होती. तसेंच तिचे भागीदारही (Proprietors) जास्त असत व त्यांपैकीं प्रत्येकाची जेवढी मालमत्ता असेल तिच्या किंमतीइतक्या पेढीच्या कर्जाबद्दल तो लोकांना जबाबदार असे.

ठेवी स्वीकारणाऱ्या पेढींचा प्रारंभः— १८३१ सालीं समवायिक भांडवलाच्या पेढीचा नवीनच प्रकार इंग्लंडमध्यें दिसूं लागला. हा प्रकार म्हणजे नोटा काढण्याचा उद्योग न करितां नुसत्या ठेवी स्वीकारण्याचा व्यवहार करणाऱ्य

पेढीचा होय. ह्या पेढीचा पुरस्कर्ता प्रसिद्ध पेढीशास्त्रज्ञ गिलवर्ट हा होय. ह्या गृहस्थानें "लंडन व वेस्टमिनिस्टर बँक" ह्या नांवाची पेढी खुद्द लंडन शहरांतच स्थापन केली; कारण त्याचें म्हणणें असें होतें कीं, अशी पेढी लंडनमध्येंच स्थापन करणें हें पार्लमेंटनें बँक ऑफ इंग्लंडनिमित्त पास केलेल्या कायद्याच्या नियमांविरूद्ध होत नाहीं. हें त्याचें म्हणणें पार्लमेंटलाही पसंत पडलें, व ही पेढी स्थापन झाल्यावर तिची फारच भरभराट झाली; कारण ती जमिनदार लोक व सरकारी अधिकारी लोक ह्यांच्याच फायद्याकरितां नव्हती, तर ती व्यापारीलोकांच्या वाढत्या व निरनिराळ्या गरजा पुरविण्याकडे जास्त लक्ष देऊं लागली; तसेंच हिचें संकल्पित भांडवल व वसूल झालेलें भांडवलही बरेंच होतें. हल्लीं इंग्लंडमध्यें समवाईक भांडवलाच्या पेढयांची वाढ फारच झपाट्यानें होत आहे. कारण लहानसहान पेढयांना ह्या पेढया सहज समाविष्ट करून घेत आहेत व व्यापारी लोकांच्या वाढत्या गरजा पुरवीत असल्यामुळें त्या फारच लोकप्रिय होत आहेत.

बँक ऑफ् इंग्लंडच्या नोटाः—१८२९ सालापर्यंत इंग्लंडमध्यें बँक आफ् इंग्लंडनें काढिलेल्या एक पौंडाच्या नोटा बऱ्याच असत. १८२५ सालीं व्यापारी आणीबाणीचे वेळीं नोटा फाजील प्रमाणांत काढण्यांत आल्यामुळें लोकांचा त्यांजवरील विश्वास उडाला व सरकारनें एक कायदा केल्यामुळें इंग्लंडमध्यें पांच पौंड किमतीहून कमी किंमतीच्या नोटा काढण्यांत येऊं नयेत असें ठरलें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, सोन्याच्या नाण्याचा जास्त प्रचार होऊन व्यापाराला स्थैर्य आलें; पण त्यामुळें नाणीं अनेक वेळां प्रचारांत येऊन तीं फार झिजलीं गेलीं व अजूनहि तीं सारखीं झिजत असल्यामुळें इंग्लिश मुत्सद्यांना त्यांबद्दल मोठी चिंता उत्पन्न झाली आहे.

१८३३ सालीं बँक आफ् इंग्लंडच्या नोटा कायदेशीर चलन म्हणून पेढीच्या हपीसाव्यतिरिक्त अन्यत्र स्वीकारल्या जाव्यात अशा अर्थाचा एक कायदा सरकारनें केला व त्या नोटांबद्दल सोनें मिळविण्याची व्यवस्था व्हावी असेंहि त्यानें ठरविलें.

१८४४ सालचा 'बँक चार्टर नांवाचा कायदा व त्याबद्दल दोन मतें:—पुढें १८४४ सालीं बँक चार्टर ॲक्ट' ह्या नांवाचा कायदा त्या वेळेचा इंग्लंडचा मुख्य प्रधान सर रॉबर्ट पील ह्यानें केला. हा कायदा

करण्याचें कारण असें झालें कीं, १४ वर्षांत व्यापारी आणीबाणीचे प्रसंग तीन वेळां येऊन गेले, व सरकारची अशी कल्पना झाली कीं, नोटांच्या फाजील प्रचारामुळें हे प्रसग उत्पन्न होतात. हा कायदा करण्यांत सरकारचे दोन हेतू होते. ते हेतू म्हणजे बँक आफ् इंग्लंडच्या नोटांबद्दल लोकांत बळकट विश्वास उत्पन्न करणें व इंग्लंड व वेल्स ह्या देशांतील नोटांची संख्या मर्यादित करणें हे होत.

हा कायदा जेव्हां पार्लमेंटसमोर चर्चेकरितां आला तेव्हां इंग्लंडमध्यें नोटा प्रचलित करण्याचे बाबतींत मोठीं रणें माजून राहिलीं होतीं. एका पक्षाचें मत असें होतें कीं, पेढीनें आपल्या नोटा प्रचलित करतांना देशांत सोनें किती किंमतीचें खेळत असेल हें पहावें व तितक्याच किंमतीच्या नोटा तिनें सुरू कराव्यात. या मताचा पुरस्कर्ता लॉर्ड ओव्हरस्टोन हा होता. ह्याचें मत असें होतें कीं, देशामध्यें दोन तऱ्हेचीं म्हणजे धातूचीं व कागदी अशीं नाणीं प्रचारांत असतात. धातूच्या नाण्याला अंगचीच किंमत असल्यामुळें त्याबद्दल लोकांना फारशी काळजी नसते. पण कागदी नाण्यांची गोष्ट तशी नाहीं. तें लोकांत जर प्रचलित व्हावयाचें असेल तर त्याबद्दल वाटेल तेव्हां आपणांस सोन्याचांदीच्या धातूचें नाणें मोबदला मिळूं शकेल अशी लोकांची खातरी झाली पाहिजे. अशी खात्री उत्पन्न होण्यास राजमार्ग म्हणजे उपरिनिर्दिष्ट धातू जितक्या किंमतीच्या असतील तितक्याच किंमतीच्या नोटा प्रचलित करण्यास पेढ्यांस सरकारनें परवानगी दिली पाहिजे.

दुसऱ्या पक्षाचें—ह्या पक्षाचा पुढारी लंडन व वेस्टमिनिस्टर बँकेचा मॅनेजर प्रसिद्ध गिलबर्ट हा होता—मत असें होतें कीं, देशांत नेहमीं खेळत असलेल्या सोन्याचांदीच्या किंमतीइतक्याच किंमतीच्या नोटा काढणें वेडेपणाचें होणार आहे. देशांत नेहमीं व्यापारी कामकाजाकरितां नाण्यांची गरज लोकांस असते व ही गरज जर पेढीनें काढलेल्या नोटांनीं भागविण्यांत आली तर लोकांची फार सोय होईल व ह्या नोटांबद्दल लोक नाणीं परत कधींहि मागणार नाहींत. मात्र पेढ्यांनीं एवढें लक्षांत ठेवावें कीं, सट्टेबाजीच्या स्वरूपाच्या धंद्यांत पडणाऱ्या लोकांच्या गरजा आपल्या नोटा काढून पुरविणें आपलें काम नाहीं.

वरील दोन्ही मतांत पूर्ण नसलें तरी अर्धवट सत्य आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं; पण आपलेंच मत सर्वस्वीं खरें आहे हें त्या मतांच्या पुरस्कर्त्यांचें मत निव्वळ हटवादीपणाचें होतें. पहिल्या मताचें समर्थन करणाऱ्या लोकांना ही साधी गोष्ट समजली नाहीं कीं, कागदी नोटा देशांतील धातूच्या चलनास पोषक अशा असतात; व व्यापार जोरांत असतांना त्या प्रचारांत आणणें व तो मंदीत असतांना त्या काढून घेणें हा जो लवचिकपणा त्यांचेमध्यें असतो तो लवचिकपणा देशांत जितकीं सोनेंचांदी असेल तितक्याच किंमतीच्या नोटा प्रचलित केल्यानें नाहींसा होईल. दुसऱ्या प्रकारच्या मतांत असा दोष होता कीं, पेढ्यांना कोणत्या नोटा शिष्टसंमत उद्योगधंद्याच्या गरजा भागविण्याकरितां वापरल्या जातात व कोणत्या नोटा सट्टेबाजीच्या धंद्यांतील लोक वापरतात हें समजूं शकतें असें ह्या दुसऱ्या मताचा अनुवाद करणाऱ्या लोकांना वाटतें; पण अशी कल्पना करणें खरोखरच चूक आहे फार काय सांगावें, देशांतील पेढ्यांना सट्टेबाजीच्या धंद्यांवर नजर ठेवून त्यांना आपल्या कह्यांत ठेवणें फारच कठीण जातें.

बँक चार्टर कायद्यांतील कलमें:—ह्या दोन्ही मतांतील हंसक्षीरन्यायानें ग्राह्यांश तेवढा घेऊन पीलनें आपला मसुदा तयार करून पार्लमेंटसमोर मांडला व तो मसुदा पास करून घेतला. ह्या कायद्यान्वयें असें ठरलें कीं, बँक आफ् इंग्लंडचीं सराफी खातें व हुंड्या किंवा नोटा काढणारें खातें अशीं दोन खातीं करून तीं अगदीं अलग करण्यांत यावीं. पहिल्या खात्यानें ठेवी स्वीकारणें, मनोती कापून घेऊन पैसे उसने देणें वगैरे नेहमींचे पेढीचे व्यवहार करावे व दुसऱ्या खात्यानें नोटा काढणें व लोकांनीं त्या परत आणल्यावर त्याबद्दल नाणीं देणें हा व्यवहार करावा. ह्या दुसऱ्या खात्यानें जितक्या नोटा काढिल्या असतील तितक्या नोटांबद्दल सरकारी तारणरोखे, नाणें किंवा लगडी ह्यांपैकीं कांहीं तरी तारण म्हणून जवळ ठेविलें पाहिजे आणि सरकारी रोखे १ कोटी ४० लक्ष पौंडांहून जास्त किंमतीचे असतां कामा नयेत; म्हणजे ह्या रकमेच्या किंमतीपर्यंत रोख नाणें काढून न ठेवतां बँक आफ् इंग्लंडनें नोटा काढल्या तरी हरकत नाहीं. पण ह्यानंतर एकाद्या माणसानें एका औंसामागें ३ पौंड १७ शि. ९ पेन्स ह्या दरानें सोन्याचें नाणें किंवा लगड आणून दिली तर ती स्वीकारून बँकेनें नोटा बाहेर काढाव्यात व त्यांची गरज जर लोकांस नसेल तर त्या नोटा सराफी खात्यांत ठेवून द्याव्यात. पूर्वी ज्या

पेढ्यांना नोटा काढण्याचा अधिकार असे त्यांना तितक्याच रकमेच्या नोटा काढण्यास हरकत नसावी; पण एखाद्या पेढीनें जर नोटा काढण्याचें बंद केलें तर बँक आफ् इंग्लंडनें ती पेढी जितक्या नोटा काढीत असे तिच्या दोन-तृतियांश-इतक्या किंमतीच्या नोटा काढाव्या व तितक्याच किंमतीचे सरकारी रोखे नोटा काढण्याच्या खात्यांत ठेवून द्यावे; त्याचप्रमाणें कोठल्याही पेढीला नोटा सुरू करण्याचा नवीन अधिकार देण्यांत येऊं नये. तात्पर्य, बँक आफ् इंग्लंडच्या नोटांव्यतिरिक्त इतर पेढ्यांच्या नोटा प्रचारांतून काढून घेणें व ठराविक प्रमाणांत बँक आफ् इंग्लंडनें आपल्या नोटा सुरू करणें ह्या दोन गोष्टी ह्या कायद्यानें साध्य झाल्या सर रॉबर्ट पीलनें केलेला कायदा अशा स्वरूपाचा होता.

ह्या कायद्यानें १ कोटी ४० लक्ष पौंड किंमतीच्या नोटांबद्दल रोख नाणें तारण म्हणून न ठेवतां सरकारी रोखे तारण ठेवले तरी चालतील अशी सवलत बँक ऑफ् इंग्लंडला देण्याचें असें कारण होतें कीं, सरकारच्या मतानें लोकांना एवढ्या किंमतीच्या नोटांची नेहमीं मोठमोठ्या रोखीच्या व्यवहारांत गरज असते व ह्या नोटांबद्दल लोक रोख नाण्याची मागणी फारशी करणार नाहींत. वर सांगितलेल्या किंमतीच्या रकमेहून जास्त नोटा बँकेला जर काढावयाच्या असल्या तर त्यांबद्दल रोख नाणें सराफी खात्यांत काढून ठेवलेंच पाहिजे असा निर्बंध घातला गेल्यामुळें नोटा काढणें ही गोष्ट एखाद्या यंत्राप्रमाणें साहाजिक होऊन बसलेली आहे. असो; हल्लीं इंग्लंडमध्यें नोटांचा प्रचार फार होऊं नये असें तेथील सरकारचें धोरण आहे. कोठल्याही पेढीला नवीन नोटा काढितां येत नाहींत व बँक आफ् इंग्लंडला कायद्याच्या मर्यादा संभाळूनच नवीन नोटा काढतां येतात; तेव्हां एकंदर परिणाम असा झाला आहे कीं, प्रचलित नोटांची संख्या मोठमोठ्या रोखीच्या व्यवहारांत लोकांच्या गरजा भागविण्याकरतांच असून बरीच मर्यादित झालेली आहे व लोकांची भिस्त बव्हंशीं साव्हरीनसारख्या नाण्यां-वरच आहे. बँक आफ् इंग्लंडची पांच पौंड किंमतीची सर्वांत कमी किंमतीची नोटसुद्धां मोठमोठ्या शहरांतच खेळती रहाते व तेथेंहि तिचा उपयोग मर्यादित प्रमाणांतच होत असतो. तेव्हां इंग्लंडमध्यें नोटांना फारसें महत्त्व नाहीं

बँक चार्टर कायद्यावर टीका:—हा कायदा जेव्हां पास करण्यांत आला तेव्हां त्याचा तात्पुरता परिणाम हितावह झाला; पण ह्या कायद्यावर

टीकेचा भडिमारही खूबच झाला. ह्या टीकाकारांचें मुख्य म्हणणें असें आहे कीं, ज्यावेळीं व्यापारांत गडबड होऊन लोकांचा विश्वास उडतो, त्यावेळीं ह्या बँकेला आपण प्रस्थापित केलेल्या पतीचा फायदा घेतां येत नाहीं. ज्या ज्या वेळीं असे आणीबाणीचे प्रसंग आलेले आहेत त्या त्या वेळीं सरकारला आपला कायदा परत घेऊन बँकेला तिच्या इच्छेप्रमाणें व सोयीप्रमाणें नोटा काढण्याची परवानगी घ्यावी लागली आहे. ह्या मुद्यांना चोख उत्तर ह्या कायद्याच्या पुरस्कर्त्यांजवळ नाहीं. त्यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं, हा कायदा पास होण्यापूर्वी नोटा जास्त झाल्यामुळें सट्टेबाजीचा जो सुकाळ होता तो आतां त्या कायद्यामुळें बराच कमी झाला आहे. असो; आतां किती जरी ह्या कायद्यावर टीका केली तरी व्यापार व हल्लींची विचारसरणी हीं ह्या कायद्यानें निश्चित केलीं आहेत व आपली चलनपद्धति सदोष किंवा निर्दोष आहे ह्याची शंकासुद्धां हल्लीं लोकांस शिवत नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें ह्या कायद्यानें जर एखादी गोष्ट साध्य केली असेल तर ती ही कीं, बँक आफ इंग्लंडची नोट आपणाजवळ असणें म्हणजे सोनेंच जवळ बाळगणें होय अशी लोकांची कल्पना होऊन बसलेली आहे व ती यथार्थही पण आहे. कारण ती नोट बँकेकडे नेली असतांना त्या बँकेनें आपल्या सराफखात्यांतून त्या नोटेच्या किंमतीचें सोनें काढून दिलेंच पाहिजे अशी कायद्याची सक्ती आहे. ह्या सक्तीचा असा परिणाम झाला आहे कीं, बँक आफ इंग्लंडच्या नोटा काढणाऱ्या खात्याला जास्त नोटा प्रचारांत आणून काय किंवा प्रचलित नोटा कमी करून काय कांहींसुद्धां फायदा होत नाहीं; कारण नोटा जास्त प्रचलित करावयाच्या असल्या तर त्यांबद्दल सोनें सराफखात्यांत जास्त काढून ठेविलें पाहिजे व त्या जर कमी करावयाच्या असतील तर तितकें सोनें उपरिनिर्दिष्ट खात्यांतून काढून घेतलें पाहिजे.

सराफखात्यांतसुद्धां ह्याच कायद्याच्या सक्तीमुळें नोटा कमीजास्त काढल्यानें फारसा फायदा होत नाहीं. त्या खात्याला सोनें किंवा नोटा जास्त प्रमाणांत प्रचारांत आणण्याची इच्छा झाली तर त्यानें तेवढ्या किंमतीच्या नोटा किंवा सोनें प्रचारांतून काढून घेतलेंच पाहिजे. ह्या सराफखात्याची शिल्लक इतर नेहमींच्या पेढीच्या शिलकेप्रमाणेंच सोन्याची व नोटांची (ह्या नोटा

म्हणजे सोनेंच होत) मिळून बनलेली असते, व ती शिल्लक जर कांहीं कारणांनीं कमी झाली तर आपणाजवळचे तारणरोखे विकून ह्या सराफखात्याला तिच्यांत भर घालावी लागते. तेव्हां नोटांमुळें ह्या खात्याला एक कवडीचाही फायदा होत नाहीं. त्या खात्याजवळ लोकांच्या ज्या कांहीं ठेवी असतील त्यामुळेंच काय तो फायदा त्याला होतो. नोटा काढणाऱ्या खात्याची उत्पन्नाची बाब म्हणजे सरकारला दिलेल्या कर्जावर व जवळ असलेल्या तारणरोख्यांवर (Securities) येणारें व्याज ही होय. पण ह्या व्याजाबद्दलही त्या खात्याला सरकारला बरेंच पैसे द्यावे लागतात. अतएव बँक आफ इंग्लंडच्या दृष्टीनें नोटा काढणाऱ्या खात्याची अवस्था ' किं तया क्रियते धेन्वा या न सूते न दुग्धदा ' ह्या श्लोकार्धांत वर्णिलेल्या गायीप्रमाणें झाली आहे.

वर सांगितलेंच आहे कीं, १८४४ च्या ' चार्स्टर ' कायद्यानें बँक आफ इंग्लंडचीं सराफखातें व नोटा काढणारें खातें अशीं अगदीं अलग खातीं करण्यांत आलीं. पण ज्या ज्या वेळीं व्यापारी आणीबाणीचे प्रसंग उद्भवले आहेत त्या त्या वेळीं सराफखात्यांत जे घोंटाळे झाले त्यांमुळें नोटा काढणाऱ्या खात्याची अतिशय तारंबळ उडून सरकारला आपला कायदा तात्पुरता तरी परत घ्यावा लागला आहे. ह्याचें कारण असं आहे कीं, लंडन शहर जगांमध्यें व्यापारी उलाढालीचें अत्यंत महत्वाचें ठिकाण असें मानलें गेलें आहे. ह्या शहरांत क्रोडो पौंडांच्या उलाढाली नेहमीं होत असतात व जगांतील प्रत्येक देशच्या व्यापाऱ्यांना आपल्या हुंड्या विकून ह्याच शहरांत सोन्याच्या नाण्याच्या रूपानें आपल्या मालाबद्दल पैसे मिळतात व हे पैसे देण्याकरितां ह्या शहरांतल्या पेढ्यांजवळ व हुंड्यादलालांजवळ जगांतील सोन्याचा बराच भाग असावा लागतो. एखादे वेळीं ह्या पेढ्यांजवळची शिल्लक संपुष्टांत आली व त्यांना बँक ऑफ् इंग्लंडजवळ सोन्याची मागणी करण्याचा प्रसंग आला म्हणजे त्या बँकेकडे जोराची मागणी सुरू होते. कारण ह्या पेढ्या व हे दलाल जवळ आपल्याजवळच्या शिलका ठेवी म्हणून तिच्याकडे ठेवीत असतात व तिच्याजवळ असलेली शिल्लक संपुष्टांत आली म्हणजे सरकारची परवानगी घेऊन ह्यापुढं लोकांना व पेढ्यांना आपण रोख सोनें न पुरवितां नोटाच देऊं असें त्या बँकेला जाहीर करावें लागतें. म्हणजे सराफखात्यांत शिल्लक नसल्याबद्दलच्या पापाचें प्रायश्चित नोटा काढणाऱ्या खात्याला भोगावें लागतें. कारण ज्या नोटांबद्दल तत्काळ तरी सोनें मिळावयाचें नाहीं, अशा नोटा त्या खात्याला लोकांत

प्रचलित कराव्या लागतात. आतां बँक ऑफ् इंग्लंडची पत इंग्लंडच्या सरकारच्या पतीइतकीच असल्यामुळें तिनें काढिलेल्या नोटा लोक आनंदानें स्वीकारतात ही गोष्ट अलाहिदा आहे; पण 'बँक चार्टर ॲक्ट' पास करून सरकारनें काय मिळविलें हा प्रश्न शिल्लक राहतोच.

बँक ऑफ इंग्लंडची गंगाजळी ठेवः— बँक ऑफ् इंग्लंडचा असा एक विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे कीं, ह्या बँकेंत लंडनमधील इतर पेढयांचीच नव्हे तर सर्व इंग्लंडांतील पेढयांची शिल्लक ठेवलेली असते. आयर्लंड, स्कॉटलंड ह्या देशांतील पेढयांना सुद्धां आपली गंगाजळी ठेव ह्या बँकेच्या तिजोरींत ठेवणें इष्ट वाटतें. आपल्या भागीदारांना फायदा व्हावा म्हणून जितक्या ठेवी आपल्याकडे आल्या असतील त्यांच्या शेंकडा साठ किंमतीच्या रकमा ही पेढी व्याजानें देते. इंग्लंड, स्कॉटलंड वगैरे देशांतल्या पेढयांची त्यांच्यावर ज्या मागण्या असतात त्या मानानें शेंकडा ६ च काय ती रोख शिल्लक असते. बाकी सगळा व्यवहार पतीवरच चालतो. ह्याचें एकच कारण आहे व तें कारण म्हटलें म्हणजे बँक ऑफ् इंग्लंडची पत हें होय. सर्व राष्ट्रांशीं ह्या पेढीचा व्यवहार असल्यामुळें तिला शेंकडा ३३ पासून ४७ ह्या प्रमाणांत रोकड ठेवतां आली म्हणजे तिचें काम भागतें; पण इतर पेढयांना इतकी जरूर नसल्यामुळें व कायद्यानेंही ही रोख रक्कम ठेवण्याची मर्यादा निश्चित न केल्यामुळें आपल्या नेहमींच्या अनुभवावरून त्या पेढ्या शेंकडा ६ ह्या प्रमाणांत रोकड ठेवीत असतात. बँक ऑफ इंग्लंडचा आपण जर इतिहास पाहिला तर आपणांस असें दिसून येईल कीं, सर्व राष्ट्रांतील शिल्लक ह्या एकाच बँकेजवळ ठेवणें व ही शिल्लक रोख नाण्यांत फारच थोडी ठेवणें, ही पद्धत कोणी जाणूनबुजून प्रचारांत आणलेली नाहीं व ती चुटकीसरशीं अस्तित्वांतही आलेली नाहीं. इतकेंच नव्हे तर ती जर आपण प्रत्यक्ष पाहिली नसती तर ती असणें शक्य तरी आहे किंवा नाहीं ह्याचा संशय आपणांस आला असता. असो; ज्या ज्या वेळीं आपल्याजवळ असलेली रोकड फारच कमी असते तेव्हां आपल्याजवळचा संग्रह वाढवावयाची ह्या बँकेची सोपी युक्ति म्हटली म्हणजे आपला कटमितीचा दर वाढविणें ही होय ह्याबद्दल पूर्वी* विवरण आलेलेंच आहे. तेव्हां येथें जास्त चर्चा करीत नाहीं. कधीं कधीं असें होतें कीं, बँक ऑफ् इंग्लंडनें आपला दर वाढवि-

* भाग १, प्रकरण २ इ—कटमितीचा दर—हें सदर पहा.

लेला असतो; पण इतर समवायिक भांडवलाच्या पेढ्या आपला दर न वाढविता लोकांस रकमा देत असतात. अशा वेळीं ही मध्यवर्ती पेढी बाजारांतील खेळतां पैसा स्वतः कर्जानें घेऊन त्या रकमेबद्दल तारण म्हणून इंग्लंडच्या राजानें हमी घेतलेलें व ३ टक्के व्याजाच्या दरानें जवळ ठेवून घेतलेलें कर्ज (Consols) लोकांस देतें. अशा रीतीनें बाजारांत पैशाची हकाक झाली म्हणजे परदेशाहून सोनें इंग्लंडांत येऊं लागतें; कारण ह्या बँकेनें दर वाढविलेला असतो.

बँक ऑफ इंग्लंडची घटनाः—ह्या मध्यवर्ती पेढीच्या इंग्लंडमध्यें असलेल्या मुख्य मुख्य व्यापारी शहरांमध्यें ११ शाखा आहेत. ह्या पेढीलाच मुख्यत्वेंकरून नोटा प्रचलित करण्याचा अधिकार मिळाला असल्यामुळें कांहीं ठराविक रक्कम ही पेढी सरकारला देत असते व कांहीं ठराविक नुकसानभरपाई मिळण्याच्या अटीवर राष्ट्रीय कर्जाची व्यवस्था हीच पेढी बघत असते. ह्याशिवाय इंग्लंडच्या सार्वभौम सरकारचा वसूल जवळ ठेवणें, सरकारनें द्यावयाच्या रकमेवर व्याज देणें वगैरे कामें ह्या पेढीला करावीं लागतात; पण इतकें जरी आहे तरी ही पेढी खाजगी असून तिची व्यवस्था भागीदारांनीं निवडलेल्या डायरेक्टरांकडून होत असते हें आपण विसरतां कामा नये.

हे डायरेक्टर चोवीस असून त्यांशिवाय एक गव्हर्नर व एक डेप्युटी गव्हर्नर असतो. हे डायरेक्टर जरी भागीदारांकडून निवडलेले असतात तरी वस्तुतः ते स्वतःच आपणांस निवडून घेतात. कायद्याप्रमाणें पाहिलें तर ह्या डायरेक्टरांपैकीं कांहीं लोक वर्षाअखेर आपली जागा सोडतात, एक वर्ष बाहेर रहातात व पुनः भागीदारांकडून (Proprietors) त्यांना स्वतःला निवडून घ्यावें लागतें; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, इतर डायरेक्टर लोकांची हरकत नसली तर तेच तेच डायरेक्टर वर्षाअखेर निवडले जातात. एखाद्या डायरेक्टरनें आपल्या जागेचा राजीनामा दिला किंवा तो दिवंगत झाला तर नवीन डायरेक्टरची निवड डायरेक्टर लोकांचें मंडळ फार काळजीपूर्वक करीत असतें. हा नवीन डायरेक्टर तरुण असावा असा संप्रदाय आहे. त्याचप्रमाणें तो स्वतः पेढीवाला (Banker) नसावा असाही नियम आहे. हा नियम फार जुन्या काळापासून प्रचारांत आहे व तो अस्तित्वांत असण्याचें कारण पूर्वीं पेढ्यांपेढ्यांमध्यें अतिशय चुरस व द्वेष असल्यामुळें बँक ऑफ् इंग्लंड आपल्या डायरेक्टरांच्या मंडळांत इतर पेढीवाल्यांचा समावेश करीत नसे. हल्लीं जे डायरेक्टर ह्या बँकेच्या

मंडळांत आहेत ते सर्व मोठमोठ्या धंद्यांत आपलें भांडवल मोठ्या प्रमाणांत गुंतविलेले अनुभविक व्यापारी आहेत. ह्यांना व्यापाराचा अनुभव चांगला असल्यामुळें, त्याचप्रमाणें इंग्लंडमधील व्यापाऱ्यांची वैयक्तिक माहिती असल्यामुळें व स्वतः ते शांत व गंभीर वृत्तीचे असल्यामुळें कोणास पैसे द्यावे, कोणत्या प्रकारच्या व्यापारी हुंड्या स्वीकाराव्या वगैरे बाबतींत बँकेला योग्य तो सल्ला त्यांना अधिकारयुक्त वाणीनें देतां येतो.

ह्या पेढीचे गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर असे दोन प्रमुख अधिकारी असतात. डेप्युटी डायरेक्टर हा अतिशय वृद्ध व अनुभविक डायरेक्टर असून गव्हर्नरनें आपली जागा खालीं केल्यावर त्याच्यापश्चात् त्याची त्या जागेवर नेमणूक होते. प्रत्येक डायरेक्टरला त्याची पाळी आली असतांना ह्या जागांवर काम करावें लागतें व ही पाळी डायरेक्टला प्रथम निवडून आल्यानंतर वीस वर्षांनीं येत असते. ह्या जागांवर काम करण्यास डायरेक्टर लोकांना शारीरिक व मानसिक शक्ति व उत्साह भरपूर असावे लागतात व प्रत्येक डायरेक्टरला ह्या जागांवर काम करावेंच लागतें, म्हणून डायरेक्टर प्रथमच निवडतांना तो तरूण कां असला पाहिजे ह्याचा वाचकांस सहजच उलगडा होईल.

आतां कोणास अशी साहजिकच शंका येईल कीं, हे तरणेबांड डायरेक्टर तितके अनुभविक नसल्यामुळें ह्यांच्या हातांत बँक ऑफ् इंग्लंडसारख्या पेढीची व्यवस्था देणें हें धाडसाचेंच नाहीं काय ? पण जरा विचार केला तर ही भीति निराधार आहे हें त्यांस दिसून येईल. कारण वर सांगितल्याप्रमाणें कांहीं डायरेक्टर लोकांना आपली जागा खालीं करावी लागते व शिष्टसंप्रदाय असा आहे कीं, अगदीं तरूण डायरेक्टरच तसें करतात. ज्या ज्या डायरेक्टर लोकांनीं आपल्या अमदानींत एकदां गव्हर्नरच्या जागेवर काम केलें आहे ते आपली जागा सोडीत नसल्यामुळें अशा लोकांच्या हातीं बँकेची व्यवस्था सोंपविण्यास कोठलीहीं हरकत नसते. ह्याच गव्हर्नरचें काम केलेल्या डायरेक्टर लोकांची एक अमर्याद अधिकार असलेली कायमची (Standing) व्यवस्थापक कमिटी असते व तिलाच कमिटी ऑफ् ट्रेझरी अशी संज्ञा आहे. ह्या पेढीचें मुख्य काम म्हणजे बँक ऑफ इंग्लंड व सरकार ह्यांच्यामध्यें होत असलेल्या व्यवहारांवर नजर ठेवणें हें असतें; पण ज्या मानानें गव्हर्नर स्वतंत्र वृत्तीचा मनुष्य असेल त्या मानानें ह्या कमिटीला

आपले अधिकार कमीजास्त चालवावे लागतात. तथापि इंग्लंडच्या सरकारामध्यें प्रधान मंडळाचें (Cabinet) जें महत्त्व आहे तेंच महत्त्व पेढीच्या व्यवहारांमध्यें ह्या कमिटीला असल्यामुळें तिला सत्ताही बरीच देण्यांत आलेली आहे. असो; सरते-शेवटीं एका मुद्याचा उल्लेख करून बँकेचा अंतर्गत कारभार पाहणाऱ्या व्यवस्थापक मंडळींचें वर्णन पुरें करूं. तो मुद्दा म्हणजे गव्हर्नर व डेप्युटी गव्हर्नर हे दर दोन वर्षांनीं बदलतात हा होय. हा नियम कितपत चांगला आहे, ह्याबद्दल तज्ज्ञांत बराच मतभेद आहे; पण ही व्यवस्था आतां तरी बदलणें शक्य नाहीं.

बँक आफ् इंग्लंडचीं गिऱ्हाइकें:—बँक आफ् इंग्लंडचें सर्वांत मोठें गिऱ्हाईक इंग्लडचें सरकार होय. ह्या सरकारचा ह्या पेढीशीं पैशाचा हिशोब फारसा मोठा नसतो. पण तो नेहमीं कमीजास्त होत असल्यामुळें बँकला मोठी अडचण येऊन पडते. उदाहरणार्थ ज्या वेळीं सरकारी कर वसूल होत असतो त्यावेळीं पेढी-जवळ रक्कम खूब फुगत जाते व ती वेळ संपून गेली म्हणजे त्या रकमेला झपाट्यानें ओहोटी लागते. तसेंच सरकारला जेव्हां लोकांना राष्ट्रीय कर्जावरील व्याजाच्या रूपानें व्याज द्यावें लागतें किंवा इतर कारणांनीं सरकारला तूट पडून पैसे लागतात त्या वेळीं ह्या बँकेला वाटेल तें करून पैसे द्यावे लागतात. कधीं कधीं नुकत्याच संपलेल्या महायुद्धासारख्या प्रसंगीं सरकारनें कर्ज काढलें किंवा त्याला रोकड हवी असली तर त्या कर्जाची व्यवस्था पाहणें व रोकड पुरविणें हीं कामें ह्या बँकेलाच करावीं लागतात.

सरकारच्या खालोखाल बँकेचें दुसरें गिऱ्हाईक म्हणजे इंग्लंडमधील समवायिक भांडवलाच्या पेढया, खाजगी पेढया व मनोतीनें पैसे कापून देणाऱ्या संस्था ह्या होत. ह्या सर्वांचे हिशेब ह्या बँकेजवळ असतात; व ह्या पेढयांनीं ठेवलेली रोकड बँकेच्या गंगाजळीचा महत्वाचा भाग मानला जातो. पर्यायानें सगळ्या देशाची गंगाजळी ह्या पेढीजवळ असते असें म्हणण्यास हरकत नाहीं व ह्या गंगाजळीची व्यवस्था पाहणें हें ह्या बँकेचें महत्वाचें काम होऊन बसतें. ह्या बँकेचे तिसरें गिऱ्हाईक म्हणजे हुंड्यादलाल होत; पण हे लोक अडीअडचणीच्या वेळीं ह्या बँकेकडे येत असतात. त्यांचा संबंध नेहमीं खाजगी पेढया किंवा समवायिक भांडवलाच्या पेढया ह्यांच्याशीं येतो; कारण बँक आफ् इंग्लंडच्या दरापेक्षां ह्या पेढीचा दर कमी असतो व पैसेही ह्या दलालांना ह्या पेढयांकडून लवकर

मिळतात. सामान्यपणें बँक आफ् इंग्लंड आपण स्वीकारलेल्या ठेवीवर व्याज देत नाहीं व पहिल्या प्रतीच्या हुंड्याच तेवढ्या स्वीकारते. म्हणून ह्या दलालांना ह्या पेढ्यांकडे पैशाकरितां जावें लागतें.

समवायिक भांडवलाच्या (Joint-stock) पेढ्याः— वर सांगितल्याप्रमाणें ह्यांचा जन्म व्यापाराच्या सोयीकरितां झालेला आहे. ह्यांचें काम म्हणजे व्यापारी, कारखानदार व सुखवस्तु गृहस्थ ह्यांच्या ठेवी स्वीकारणें, त्यांना कर्ज देणें, ठेवीवर व्याज देणें, व्यापारी हुंड्या विकणें, विकत घेणें व लोकांचें व्याज किंवा नफा गोळा करणें, लोकांच्या मूल्यवान वस्तू सुरक्षितपणें ठेवणें व सामान्यपणें मध्यमस्थितीच्या माणसाच्या सांपत्तिक गरजा पुरविणें अशा प्रकारचें असतें. कधीं कधीं ह्या पेढ्या, परदेशी पेढया व देशांत लहान लहान शहरांतील पेढया, म्युनिसिपालिट्या व इतर सार्वजनिक संस्था ह्यांचे दलाल म्हणून, काम करीत असतात.

ह्यांच्यामाल मिळकतींतील (Assests) मुख्य बाब म्हणजे आपल्या गिऱ्हाइकांना दिलेलें कर्ज, त्यांना अगाऊ दिलेली रक्कम आणि मनोतीनें कापून दिलेल्या हुंड्या ह्या होत. ह्या हुंड्या नेहमीं विदेशी लोकांनीं काढिलेल्या असतात व त्या हुंड्यांवर मागच्या बाजूला एखाद्या परदेशी पेढीची सही असते. सर्व जगामध्यें लंडन शहर सर्वांत मोठी व ह्या हुंड्यांना सोयस्कर अशी व्यापारी पेठ आहे; आणि ज्या अर्थी ह्या हुंड्या थोड्या मुदतीच्या असतात व त्यांची मुदत भरल्यावर त्यांबद्दल हटकून पैसे मिळतात त्याअर्थी ह्या हुंड्या विकत घेण्यांत पैसे घालणें पेढयांस फार फायदेशीर असतें.

ह्यानंतरची दुसरी बाब म्हणजे वाटेल तेव्हां किंवा थोड्या मुदतीनें मिळणारा पैसा ही होय. हा पैसा म्हणजे व्यापारी हुंड्या व सराफकट्टयावर नेहमीं धंदा करणाऱ्या दलालांना दिलेले अगाऊ पैसे ह्यांच्या तारणावर लंडनमधील मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविण्याचा धंदा करणाऱ्या संस्थांना दिलेला कर्जाऊ व वाटेल तेव्हां परत मिळणारा पैसा होय. मालमिळकतींतील तिसरी बाब म्हणजे जवळ असलेली रोकड (Cash in hand) व बँक आफ् इंग्लंडमध्यें ठेवलेली रक्कम होय. ही रक्कम जवळ असलेल्या रोकडीइतकीच खात्रीची व वाटेल तेव्हां मिळणारी अशी मानण्यांत येतें. कधीं कधीं सरकारी बाँड, वसा-

हत सरकारचे बाँड, म्युनिसिपालिटयांनीं काढलेले बाँड व ब्रिटिश कापारशनेच श्रेष्ठ प्रतीचे तारणरोखे हे ह्या पेढया घेऊन ठेवीत असतात.

ह्या पेढयांना असलेलें लोकांचें एकंदर कर्ज व त्यांचं भांडवल आणि त्यांची शिल्लक असलेली रक्कम ह्यांमध्यें काय प्रमाण असावें हें निश्चित ठरविणें कठीण आहे; तथापि सामान्यपणें हें प्रमाण शेंकडा दहा असें असतें असें मानण्यास हरकत नाहीं. आपल्या नेहमींच्या गरजा भागविण्याकरितां ह्या पेढयांची भिस्त जवळ असलेल्या रोकडीवर व बँक आफ् इंग्लंडमध्यें ठेवलेल्या रकमेवर असते. ही रक्कम जेव्हां अपुरी पडते तेव्हां पेढया प्रथम दलालांकडे आपल्या कर्जाच्या रकमेची मागणी करतात, नंतर त्यांच्याशीं पुनः मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटवितात किंवा सराफकट्टयांवरील तारणरोखे विकतात. अशा रीतीनें ह्या पेढ्यांचा व्यवहार चाललेला असतो.

खाजगी पेढ्याः—ह्या पेढ्या व वर सांगितलेल्या पेढ्या ह्यांच्या व्यवहारांत फारसा फरक नसतो; पण सामान्यपणें ह्या पेढ्या अभिजात सरदार लोक व अधिकारी लोक ह्यांच्या गरजांकडे विशिष्ट लक्ष पुरवितात. ह्या पेढ्यांनीं ह्या लोकांच्या घराण्यांना पिढ्यानुपिढ्या मदत केलेली आहे म्हणून त्यांना एक प्रकारचें वैशिष्ट्य व महत्त्व आलेलें आहे. ह्या पेढयांपैकीं बऱ्याच पेढया लहान लहान शहरांतल्या पेढ्यांशीं व्यवहार ठेवीत असतात. वर सांगितलेल्या पेढ्यांप्रमाणेंच ह्या पेढ्यांची शिल्लक बँक आफ् इंग्लंडजवळ ठेवलेली असते व पैशाची गरज लागली असतांना वाटेल तेव्हां परत मिळण्याच्या बोलीनें दिलेल्या कर्जावर, बँक आफ् इंग्लंडजवळ ठेवलेल्या शिलकेवर, पुनः मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविण्यावर व सराफकट्टयावरील तारणरोखे विकून येणाऱ्या पैशावर त्यांची मदार असते. हल्लीं इंग्लंडमध्यें खाजगी पेढयांचें महत्त्व कमी होत चाललें आहे. लोकांना नियमित जबाबदारी असलेल्या व समवायिक भांडवलाच्या पेढयांचे फायदे पटूं लागलेले आहेत व त्यामुळें नवीन खाजगी पेढ्या काढण्याच्या भानगडींत कोणी पडत नाहीं. इतकेंच नव्हे तर आहेत त्या खाजगी पेढयांचें समवायिक भांडवलाच्या पेढयांत परिवर्तन करण्याची प्रवृत्ति लोकांमध्यें दिसून येत आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

हुंडीदलाल व मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविणाऱ्या संस्थाः—ह्या संस्थांचा व लोकांचा संबंध हुंड्या विकणारे व्यापारी व परदेशी

पेढीवाले ह्यांच्यांशीं नेहमीं येत असतो. इंग्लंडमध्यें आयात माल खूब येत असतो. हा माल एक तर देशांतच खपतो किंवा पुनः अन्यदेशीं पाठविण्यांत येतो व अशा रीतीनें लंडनवर काढल्या जाणाऱ्या व्यापारी हुंड्यांची संख्या फार असते. इंग्लंडमध्यें येणाऱ्या आयात मालाच्या किंमतीचा हिशोब चुकता करण्याचा मार्ग म्हटला म्हणजे परदेशी व्यापाऱ्यांनीं तो माल विकत घेणाऱ्या इंग्लिश व्यापाऱ्यांवर काढिलेल्या हुंड्या विकणें हा होय. ह्या हुंड्या प्रथम परदेशी पेढयांकडून त्यांनीं लंडनमध्यें स्थापन केलेल्या आपल्या शाखांकडे येतात व त्या हुंड्यादलाल किंवा संस्था विकत घेतात व त्या पुनः विकून टाकतात. हा धंदा करण्याकरितां लागणारा पैसा वर सांगितलेल्या समवायिक भांडवलाच्या पेढया किंवा खाजगी पेढया पुरवीत असतात, म्हणून ह्या लोकांचें व संस्थांचें स्वतःचें भांडवल असें थोडेंच असतें.

परदेशी पेढ्यांच्या शाखाः—जगांतील सुधारलेल्या व व्यापारी राष्ट्राच्या ज्या पेढया असतात त्यांच्याही शाखा लंडनमध्यें असतात व ह्यांची संख्या अलीकडे फार वाढलेली आहे. ह्या शाखांचें काम मुख्य पेढयांनीं पाठविलेल्या हुंड्या स्वीकारून लंडनमध्यें त्या दलालांकडे विकावयास पाठविणें, सरकारी व इतर तारणरोखे विकत घेणें व विकणें वगैरे बाबतींत आपल्या गिऱ्हाइकांच्या हुकुमाची अमलबजावणी करणें, परदेशी हुंड्या गोळा करून त्या विकणें वगैरे स्वरूपाचें असतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानाकरितां ज्या सराफी पेढया असतील त्यांचें काम म्हणजे कौंसिल बिलें घेऊन तीं हिंदुस्थानांत पाठवून देणें हें होय.

स्कॉटलंडमधील पेढ्याः— ज्याप्रमाणें इंग्लंडमध्यें १७०९ पासून १८२६ पर्यंत पेढीचा व्यवहार करण्याचा मक्ता कांहीं ठराविक कंपन्याकडे असे तशी स्थीति स्कॉटलंडमध्यें नव्हती. ह्या देशांत कायद्याच्या नियंत्रणाशिवाय पेढयांची वाढ होण्यास खूब वाव सांपडल्यामुळें लोकांस निरनिराळे प्रयोग करण्यास संधी मिळाली. बँक ऑफ् स्काटलंडला १६९५ सालीं सनद मिळाली व एकवीस वर्षेंपर्यंत पूर्ण मक्त्याचे फायदे व वाटेल तितक्या नोटा काढण्याची सत्ता मिळाली. ज्यावेळीं ह्या मक्त्याची मुदत संपली त्यावेळीं जरी पुनः तो मक्ता मिळाला नाहीं तरी त्या पेढीनें आपलें काम तसेंच चालूं ठेवलें. ह्याच

वर्षी रॉयल बँक नांवाच्या पेढीला सनद मिळाली. ह्या पेढीला असें आढळून आलें कीं, बाजारपेठेंत नोटा कमी आहेत म्हणून तिनें आपल्या व्यापारांत न घातलेल्या भांडवलाचा उपयोग करण्याचें ठरवून एक नवीनच पद्धत सुरू केली. ती पद्धत म्हणजे पेढीवरून रोख पैसे उचलण्याची पत ही होय. ह्या पद्धतीनें पेढी एखाद्या माणसाला ठराविक मर्यादेपर्यंत कांहीं रक्कम उचलून देते व ती रक्कम वापरल्याबद्दल व्याजही आकारते. ही पद्धत व कटमितीची पद्धत ह्यांमध्यें फरक असा आहे कीं, पहिली पद्धत म्हणजे पैशाच्या सोयीकरतां तिसऱ्यानें हमी दिलेली हुंडीची पद्धतच होय. आपण अशी कल्पना करूं कीं, अनें बला कांहीं रक्कम दिलेली आहे; पण अचा बवर पूर्ण विश्वास नसल्यामुळें ज्याचा त्याचा पूर्ण विश्वास आहे अशा कवर ब हुंडी देतो व ती क स्वीकारतो; कारण कला बच्या शहाजोगपणाबद्दल पूर्ण खात्री आहे. अशा हुंडीला इंग्लिशमध्यें Accommodation Bill अशी संज्ञा आहे व ही हुंडी व पेढीवरून रोख पैसे उचलण्याची पत ह्या दोन्ही सारख्याच असतात; म्हणजे कांहीं व्यापारी व्यवहार झाल्यामुळें ह्या निर्माण होत नसतात. अतएव कर्ज घेणाऱ्या माणसा-शिवाय दुसऱ्या आणखी माणसाला पेढीला जामीन म्हणून रहावें लागतें. असे जामीन निदान दोन तरी असावे लागतात. पण असे जामीन एखाद्या माण-साला जर मिळाले व तो जर सचोटीचा हुशार व धाडसी असला तर त्याला धंद्याला लागणारी रक्कम पेढीकडून मिळून आपलें नशीब उघडतां येतें. कधीं कधीं धंदा जोरांत चालू असतांना एकदम पैशाची गरज भासूं लागते व तो पैसा न मिळाला तर धंदा बुडण्याचा संभव असतो. अशा वेळीं जर ही रक्कम कांहीं गहाण वगैरे न ठेवतां मिळाली तर त्याला आपला धंदा नेटानें चालवितां येतो. स्कॉटलंडमध्यें शेतकी व इतर लहान लहान धंदे सुधारण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं ही रोख पैसे उचलण्याच्या पतीची पद्धत हें एक कारण आहे. ह्या पद्धतीमुळें स्कॉटलंडमधील पेढ्यांचाही बराच फायदा झाला आहे; कारण अशा रीतीनें लोकांस पैसे उचलण्यास परवागी दिल्यानें त्यांना आपल्या नोटा सुलभतेनें सुरू करितां येतात व लोकांच्या ठेवींचाही फायदेशीर रीतीनें त्यांना उपयोग करून घेतां येतो. ह्या पद्धतीमुळें गरीब व मध्यम स्थितींतल्या लोकां-मध्यें काटकसर व उद्योगप्रियता ह्या गुणांची वाढ फारच झालेली आहे.

स्कॉटलंडमधील पेढींचा दुसरा असा विशेष आहे कीं, त्या पेढ्यांच्या शाखा सर्वत्र असतात. त्यामुळें देशांतील कोनाकोपऱ्यांतून ठेवी, त्यांच्यावर पेढ्या-

कडून व्याज मिळत असल्यामुळें, मुख्य पेढीकडे येत असतात व देशांतल्या ज्या भागांत भांडवल हवें असेल तेथें तें चटकन् व सहज पाठविण्यांत येऊन गरीब व श्रीमंत ह्या दोघांना सारख्याच अटीवर रकमा मिळूं शकतात. जगामध्यें कोठेंही आपण पाहिलें तर अगदीं गरीब माणसाच्या घरांत भांडवल पोंचविण्याची इतकी सुरेख व्यवस्था व गरीब व श्रीमंत ह्यांना सारखे लेखण्याची पद्धति आपणांस कोठेंही आढळून येणार नाहीं. ह्या देशांतील पेढयांचा तिसरा विशेष असा आहे कीं, तेथील पेढयांचे भागीदार बऱ्याच मोठ्या प्रमाणांत असतात. देशांतील सामान्य लोकांचीसुद्धां प्रवृत्ति आपला पैसा पेढयांचे भाग खरेदी करण्यांत गुंतविण्याकडे असते. ह्यावरून देशांत पेढीच्या उपयुक्ततेची कल्पना किती पसरली आहे व हिंदुस्थानदेश त्या मानानें किती मागसलेला आहे ह्याची वाचकांस कल्पना होईल.

नोटांचा प्रचार करणें:—ह्या बाबतींत **पीलनें** पास केलेला कायदा थोड्याबहुत फरकानें **स्कॉटलंडमध्यें**ही लागू आहे. प्रत्येक पेढीला २६,५६,३५० पौंड किमतीच्या नोटा काढतां येतात. ही रकम ठरण्याचें कारण असें होतें कीं, त्यावेळीं प्रत्येक पेढीजवळ ह्या किंमतीच्या नोटा व नाणें होतें. ह्या रकमेहून जास्त किंमतीच्या नोटा काढावयाच्या असतील तर त्याबद्दल जास्त नाणें तिला काढून ठेवावें लागतें; पण तें काढून ठेवल्यावर ह्या नाण्याचा इतरत्र उपयोग करण्याची सवलत प्रत्येक पेढीला देण्यांत आली.

स्कॉटलंडमध्यें एक पौंडाच्या किंमतीपासून नोटा प्रचलित आहेत. एकदां नोट काढली म्हणजे ती सरासरीनें १८ दिवस खेळत असते व सर्व नोटा वर्षांतून वीस वेळां पटविण्यांत येतात. **स्कॉटलंडमध्यें** पेढ्यांच्या नोटांबद्दल अनामत ठेवलेली रकम तारण म्हणून ठेवण्याची जरूरी भासलेली नाहीं. काढिलेल्या नोटांबद्दल भागीदारांची जबाबदारी अमर्याद असणें वगैरे पद्धतीमुळें दिवाळें निघालेल्या पेढीच्या नोटा लोक व पेढया त्याच किंमतीला स्वीकारतात व त्यामुळें त्या नोटांची किंमत उतरत नाहीं. इतकेंच नव्हे तर ह्या देशांत पेढयांचीं दिवाळीं सारीं तिनदांच निघालीं ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

सोन्याची काटकसर:—जरी **स्कॉटलंडमध्यें** सर्वत्र ठेवी स्वीकारण्यांत येतात व प्रत्येक शाखा कर्ज देऊं शकते तरी मुख्य पेढीनें काढिलेल्याच नोटा खालच्या पेढया वापरीत असतात व त्यामुळें एकाच ठिकाणीं सोनें ठेवलें

तरी चालतें. अशा तऱ्हेनें पेढयाचें जें आद्यतत्त्व कीं, अतिशय थोडया रोख नाण्यांत अतीशय पेढीचा व्यवहार करणें तें ह्या देशांत पूर्णपणें दिसून येतें. ह्या देशांत बहुतेक व्यवहार पतीवरच चालतो व रोकडीचें प्रमाणही सारें ५ टक्के आहे. असें जरी आहे तरी ह्या देशांतील पेढयांवर लोकांचा अतोनात विश्वास आहे. येथें एक गोष्ट सांगणें आवश्यक आहे कीं, ह्या देशांत बँक ऑफ इंग्लंडच्या नोटा कायदेशीर मानल्या जात नाहींत.

प्रकरण ३ रें.

फ्रान्समधल्या पेढ्या.

बँक ऑफ फ्रान्सची प्रस्थापनाः--फ्रान्समध्यें समवायिक भांडवलाच्या पेढ्यांचा इतिहास १८ व्या शतकाच्या आरंभीं **जॉन लॉ** ह्यानें आपले प्रयोग सुरू करण्याच्या वेळेपासून सुरू होतो. अर्वाचीन काळच्या पद्धतीवर स्थापन झालेली पहिली पेढी १७६८ सालची ' **ला कॅसेडी एस् कोन्** ' ही होय. ही पेढी फ्रेंच सरकारनेंच नष्ट केली. कारण आपणाशिवाय इतर कोणत्याही संस्थेनें नोटा काढूं नयेत असा सरकारचा आग्रह असे. ह्या पेढीच्यामागून त्याच नांवाची दुसरी पेढी दोन वर्षांनीं स्थापन झाली व १७९३ सालीं तिचा अवतार संपला. आणखीही बऱ्याच पेढ्या फ्रान्समध्यें स्थापन झाल्या; पण त्यामुळें सरकारची व व्यापारीवर्गाची सोय पूर्णपणें झाली नाहीं, म्हणून नेपोलियन बादशहाच्या प्रेरणेनें १८०० सालीं ' बँक ऑफ् फ्रान्स ' ही पेढी स्थापन झाली. ह्या पेढीचें संकलित भांडवल ३ कोटी फ्रँक (१० पेन्स=१ फ्रँक) होतें; पण इतकें भांडवल वसूल न झाल्यामुळें ह्या पेढीला आपणांमध्यें कॅसेटी **कोंट कुरँटस्** ह्या पेढीचा अंतर्भाव करून घ्यावा लागला.

ह्या पेढीचीं कामें म्हटलीं म्हणजे हुंड्या वगैरे वटविणें, (ह्या हुंड्यावर निदान तीन फ्रेंच नागरिकांच्या किंवा सांपत्तिक स्थिति व पत चांगली असलेल्या परदेशी व्यापाऱ्यांच्या सह्या असल्या पाहिजेत) खाजगी लोकांकरितां व सार्वजनिक संस्थांकरितां त्यांच्या देणेदारांकडून पैसे वसूल करणें व त्या पैशाच्या तार-

णावर त्यांना निर्धास्तपणें जितकें कर्ज देतां येईल तितकें देणें, त्यांच्या ठेवी स्वीकारणें, त्यांनीं काढलेल्या चेकाबद्दल पैसे देणें, दर्शनी व मुदतीच्या नोटा सुरू करणें व इतर धंद्यांत गुंतविण्याकरितां लागणारी रक्कम सांठविण्याकरितां एक खातें उघडणें (ह्या खात्यांत ५० फ्रँकहून जास्त असलेल्या रकमा निश्चित वेळीं परत करण्याच्या बोलीनें स्वीकारण्यांत याव्यात) हीं असत.

नेपोलियन बादशहानें ठरविलेली बँक ऑफ फ्रान्सची घटनाः- ह्या पेढीला प्रथम जरी राजाश्रय होता तरी फ्रान्समधील इतर पेढ्यांप्रमाणेंच हिचा दर्जा होता व तिला कसल्याही प्रकारचे विशिष्ट हक्क नव्हते. एवढेंच नव्हे तर ह्या पेढीचें स्वरूप इतकें साधें असावें कीं, हिचें अनुकरण करून इतर पेढ्या लोकांनीं काढाव्या अशी सरकारची अपेक्षा होती; पण १८०३ सालीं नेपोलियन बादशहानें आपलें धोरण बदलून ह्या पेढीलाच नोटा काढण्याचा हक्क दिला व त्यानें असें ठरविलें कीं, ह्या पेढीच्या नोटांव्यतिरिक्त इतर नोटा प्रचारांतून काढून घेतल्या जाव्या, पेढीचें भांडवल ४॥ कोटी फ्रँकपर्यंत वाढविलें जावें आणि नवीन पेढी कोठेंही सरकारी हुकुमाशिवाय काढण्यांत येऊं नये. ह्या सर्व धोरणाचा परिणाम असा झाला कीं, ह्या पेढीचें महत्त्व राष्ट्रांत फार वाढलें व ५०० फ्रँकपेक्षां कमी किंमतीच्या नोटा पॅरिसमध्यें काढल्या जाऊं नयेत असा जरी निर्बंध होता तरी ह्या पेढीच्या नोटा बऱ्याच मोठ्या प्रमाणांत खेळत्या राहिल्या. त्या वेळीं परिस्थिति अशी होती कीं, व्यापारी लोकांना कोठल्याही बँकेनें काढलेल्या नोटाच जास्त पसंत असत व नोटा काढण्याचा हक्क फक्त सरकारनें बँक ऑफ् फ्रान्सला दिला असल्यामुळें ह्या पेढीचें महत्त्व अर्थातच अतोनात वाढलें.

ह्या बँकेचा कारभार ' बोर्ड ऑफ् रीजन्ट्स ' व ' बोर्ड ऑफ् सेन्सार्स ह्यांच्याकडे सोंपविला होता. पहिल्या बोर्डांत १५ सभासद असून दुसऱ्या बोर्डांत तीन सभासद असत व हे सर्व सभासद दोनशें भागीदार नेमीत. ह्या दोन बोर्डांशिवाय एक मध्यवर्ति कमिटी नेमलेली असे व तिच्यामध्यें सेन्सॉर व रीजंट ह्यांनीं नेमलेले तीन सभासद असत. रीजंटची नेमणूक पांच वर्षांची असे व दरवर्षीं तीन रीजंट आपली जागा खालीं करीत असत. सेन्सॉर तीन वर्षेंपर्यंत काम करी व दर वर्षीं एक सेन्सार आपलें काम सोडी; पण ह्या लोकांना पुनः निवडून देण्यास हरकत नसे.

ह्या घटनेंत नेपोलियनच्या अमदानींत पुष्कळ वेळां फेरफार झाले. १८०६ सालीं नेपोलियनला असा अनुभव आला कीं, बँकेची व्यवस्था नीट नसून तिच्या कारभारांत अनेक घोंटाळे आहेत. ही अव्यवस्था नाहींशी व्हावी म्हणून त्या घटनेंत थोडे फेरफार करून तिच्यावर सरकारची जास्त कडक नजर राहील अशी व्यवस्था त्यानें केली. मध्यवर्ति कमिटी काढून टाकून तिच्या ठिकाणीं एक गव्हर्नर व दोन दुय्यम गव्हर्नर ह्यांची नेमणूक त्यानें स्वतः केली. गव्हर्नरला भागीदारांची सभा. जनरल कौन्सिल व इतर सर्व कमिटया ह्यांचा अध्यक्ष करून पेढीचे कारकून व इतर दुय्यम नोकर ह्यांना कामावर नेमणें, कामावरून काढून टाकणें व हुंड्या वटविणें ह्या बाबतींत सर्व अधिकार त्याला देण्यांत आले. त्याचप्रमाणें नेहमींच्या कामकाजाकरितां लागणारे नियम करणें व निरनिराळ्या भागांत (Provinces) शाखा स्थापन करणें ह्याही गोष्टी बँकेनें कराव्या असें त्यानें ठरविलें ह्या शाखा अर्थात्च सरकारची संमति घेऊन स्थापल्या जाव्या अशी व्यवस्था करण्यांत आली होती व ह्या नियमान्वयें लियान, लिलो व रुएन ह्या ठिकाणीं कांहीं शाखा स्थापनही झाल्या. पण त्या लवकरच नेपोलियन अधिकारभ्रष्ट झाल्यावर बंद करण्यांत आल्या व त्या वेळच्या सरकारनें रुएन्, नँटिस व बोर्डो ह्या ठिकाणीं स्वतंत्र पेढ्या स्थापन केल्या; पण पुढें हेंही धोरण सुटून स्वतंत्र पेढ्या स्थापन करणें व बँक ऑफ् फ्रान्सला आपल्या शाखा स्थापन करूं देणें असें मिश्र धोरण सुरू करण्यांत आलें. हें धोरण जरी व्यवस्थित रीतीनें व नेटानें अमलांत आलें असतें तरी पेढ्यांचे फायदे फ्रान्समध्यें सर्वत्र मिळून औद्योगिक वाढही देशांत जोरानें झाली असती; पण सरकारचें धोरण बिलकूल निश्चित नसल्यामुळें कधीं स्वतंत्र पेढ्या स्थापन होत, तर कधीं बँक ऑफ् फ्रान्स आपल्या लहरीप्रमाणें आपल्या शाखा स्थापन करी व ह्या शाखा स्थापन करण्यांत लोकांच्या सोयी गैरसोयी काय आहेत ह्याकडे तिचें बिलकूल लक्ष नसे.

वर जी नेपोलियन बादशहानें १८०८ सालीं निश्चित केलेली बँक ऑफ् फ्रान्सची घटना आम्हीं वर्णन केली आहे तिजवरून वाचकांस कळलेंच असेल कीं, ही पेढी जरी वस्तुतः खाजगी होती--कारण ह्या पेढीचें भांडवल व मालमत्ता खाजगी स्वरूपाची होती--तरी तिला आतां सरकारी स्वरूप येऊं लागलें. अशा प्रकारचे नियम असलेली पेढी जर दुसऱ्या एखाद्या देशांत असती व तेथील सरकार जर लोकच्छंदानुवर्ति असतें तर ही पेढी स्वतंत्र राहून सरकारचा संबंध त्या पेढीचें

हित चिंतण्यापुरतांच राहिला असता; पण नेपोलियनसारख्या स्वतंत्र अधिकारप्रिय माणसाच्या हाताखालीं ही पेढी केवळ सरकारच्या आर्थिक गरजा पुरविणारी संस्था होऊन बसली व हल्लींही तिचें हेंच स्वरूप कायम आहे.

बँक ऑफ फ्रान्सची १८०८ सालापासून १८४८ सालांपर्यंतची स्थितिः—नेपोलियनच्या हयातींत त्याच्या सत्तेच्या चढउताराबरोबर ह्या पेढीच्या उत्कर्षाचीही चढतीउतरती कमान होत असे. १८१० व १८१४ सालीं व्यापारी आणीबाणीच्या प्रसंगीं ह्या बँकेजवळ सरकारी नोटा जास्त व रोकड कमी असल्यामुळें तिला बऱ्याच लोकांना नोटांबद्दल नाणें देण्याचें बंद करावें लागलें १८१८ सालीं राष्ट्रीय कर्जाचे बाबतींत सरकारच्या कांहीं विवक्षित धोरणामुळें ह्या पेढीवर आणीबाणीचा प्रसंग गुजरला. सरकारला लोकांचा विश्वास संपादन करतां येईना, म्हणून त्यानें ह्या पेढीकडे राष्ट्रीय कर्जफेडीची व्यवस्था सोंपविली व त्या कर्जाला तारण म्हणून कांहीं कर व जरूरीच्याच वेळीं विकण्याकरितां म्हणून तारणरोखे देऊन ठेवले. अशा रीतीनें ह्या पेढीकडे राष्ट्रीय कर्जावर व्याज देण्याची व तें फेडण्याची जबाबदारी येऊन पडली.

नेपोलियन बादशहाच्या अमदानींत बँक ऑफ् फ्रान्सला एकंदरींत असा अनुभव आला कीं, प्रचलित सरकारशीं निकट संबंध असणें फारसें इष्ट नाहीं व आपलें भांडवल कमी केलें व आपल्या शाखा जर बंद केल्या तर आपला धंदा व्यवस्थितपणें चालण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं.हा अनुभव बँकेला आल्यावर तिनें त्या वेळच्या सरकारास वर सांगितलेल्या गोष्टी घडवून आणण्यास विनंति केली. सरकारनें पहिल्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून दुसऱ्या दोन गोष्टी घडवून आणण्यास संमति दिली आणि बँकेनें तावडतोब आपल्या शाखा बंद केल्या व आपलें भांडवल कमी केलें.

१८४८ सालीं फ्रान्समध्यें पुनः राज्यक्रांति झाली. त्यामुळें बँक ऑफ् फ्रान्सला नाणें देण्याचा प्रघात तहकूब करावा लागला व त्या वेळेच्या जुजबी सरकारनें तिच्या नोटा कायदेशीर चलन म्हणून वापरल्या जाव्यात असा ठराव केला; इतकेंच नव्हे तर फ्रान्सच्या इतर भागांत ज्या नऊ पेढया बँक ऑफ् फ्रान्सनें आपल्या शाखा बंद केल्यावर निर्माण झाल्या होत्या त्यांनाही हीच सवलत मिळाली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, देशांत ह्या पेढयांच्या नोटांचें

पेंवच फुटलें व नोटा सुरू करण्याचा मक्ता एका मध्यवर्ती पेढीकडे असणेंच किती श्रेयस्कर आहे हें सरकारला व लोकांना कळून चुकलें. सरकारनें एक कायदा करून हा मक्ता बँक ऑफ् फ्रान्सला देऊन टाकला व इतर पेढया ह्या पेढींतच तिच्या शाखा म्हणून अंतर्धान पावल्या.

ह्या राज्यक्रांतीचा दुसरा परिणाम असा झाला कीं, देशामध्यें हुंड्या वटविणाऱ्या बऱ्याच पेढयांचा उदय झाला. ह्या पेढयांना लागणारें भांडवल सरकार, म्युनिसिपालिट्या व सामान्य लोक ह्यांनीं प्रत्येकीं $\frac{1}{3}$ दिलें व त्यामुळें त्यांपैकीं बऱ्याच पेढ्या टिकून राहिल्या. ह्या पेढयांमुळें पेढीच्या व्यवहाराला फ्रान्समध्यें नवीनच वळण मिळालें. तें वळण म्हणजे नोटा काढण्याचा अधिकार न घेतां व्यापारी व औद्योगिक वर्गाच्या गरजा पुरविणें व हे लोक व बँक ऑफ् फ्रान्स ह्यांमध्यें मध्यस्थाचें काम करणें हें होय.

बँक ऑफ् फ्रान्सची १८४८ पासून आतांपर्यंतची स्थितिः— ह्या बँकेचें आरंभींचें भांडवल ३ कोटी फ्रँक होतें. हें भांडवल कमीजास्त होऊन १८५७ सालीं तें १८ कोटी २५ लक्ष फ्रँकवर येऊन ठेपलें व आतांपर्यंत तें तितकेंच आहे. १८०३ सालच्या कायद्यान्वयें ह्या पेढीला एक जादा फंड जमविणें भाग पडलें. शेंकडा सहा टक्क्यांहून जास्त नफा जो राहील तो शेंकडा पांच टक्क्यांनीं सरकारी रोखे विकत घेण्यांत गुंतवावा असें ह्या बँकेनें ठरविलें. मध्यंतरी ह्या कायद्यांत बरीच दुरुस्ती होऊन १८३१ सालीं ह्या फंडापैकीं कांहीं भाग भागीदारांना देण्यांत यावा असें ठरलें. बँकेची इमारत वगैरेंची जी किंमत असेल तिला पुरून उरणारी रक्कम अलग काढून मग ह्या फंडाची रक्कम १ कोट असावी असा ठराव १८३४ सालीं झाला व ह्या फंडांत सुमारें एक लाख शेअर विकून होणाऱ्या फायद्याची व सहा टक्क्यांपेक्षां जास्त असलेल्या कटमितीच्या दरानें होणाऱ्या फायद्याची भर घालावी असाहि एक कायदा १८५७ सालीं पास झाला.

मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविणें व अगाऊ रक्कम देणें ह्या बाबतींत असलेले कायदे पाळूनसुद्धां ह्या पेढीला नोटा प्रचारांत आणण्याच्या बाबतींत बरीच मोकळीक आहे; तथापि किती रकमेपर्यंत नोटा काढावयाच्या ह्याची जास्तींत जास्त मर्यादा कायद्यानें ठरून गेलेली आहे व ती मर्यादा १९१४ सालीं १२ कोट फ्रँकपर्यंत होती.

प्रथम प्रथम ज्या हुंड्यांवर सांपत्तिक दृष्ट्या उत्तम अशा तीन फ्रेंच लोकांच्या सह्या असतील त्याच हुंड्या वटविण्याची ह्या बँकेला परवानगी होती. पुढें १८०८ सालीं ह्या कायद्यांत थोडी सुधारणा झाली. ती अशी कीं, एखाद्या खऱ्याखुऱ्या व्यापारी व्यवहारांत उत्पन्न झलेल्या हुंडीवर दोनच सह्या असल्या तर तिसऱ्या सहीच्याऐवजीं बँकेच्या भांडवलाच्या किंवा सरकारनें हमी घेत-लेल्या शेंकडा पांच टक्के दराच्या कर्जाच्या जादा तारणावर (Collateral security) ती हुंडी बँकेनें वटविण्यास हरकत नाहीं. पुढं ह्या हुंड्यांच्या बाबतींत जे कायदे झालेले आहेत त्यांमुळें सह्यांच्याऐवजीं जादा तारण कोण कोणत्या वस्तू स्वीकारण्यास हरकत नाहीं, ह्यांची यादी वाढत गेली आहे. ह्या जादा तारणांवर हुंड्या वटवितां येतात, येवढेंच नव्हे तर पेढीला कर्जही देतां येतें. आरंभापासून ही बँक फ्रान्सच्या सरकारचें सावकार म्हणून आपला व्यवहार करीत आलेली आहे व वेळोवेळीं सरकारच्या निरनिराळ्या खात्यांकडून ठेवी स्वीकारून त्या सरकारला हव्या त्या वेळीं व ठिकाणीं त्या परत करीत आलेली आहे; इतकेंच नव्हे तर सरकारी नोटा वगैरे वटविणें, त्याला थोड्या मुदतीचें कर्ज देणें, राष्ट्रीय कर्जाची व्यवस्था पाहणें व धातूंच्या नाण्यांचा प्रसार करणें हीं कामें हीच पेढी करीत असते. सरकारकडून ह्या पेढीला जे विशिष्ट हक्क मिळाले आहेत त्यांबद्दल सरकारला पेढीकडून १८ कोटी फ्रँकचें कायमचें कर्ज बिन व्याजानें मिळालेलें आहे.

ह्या पेढीला जेव्हां जेव्हां शाखा स्थापन करण्याचा प्रसंग आला तेव्हां तेव्हां सरकारी आग्रहामुळेंच त्या स्थापन झालेल्या आहेत. १९१४ सालीं ह्या पेढीच्या १४२ शाखा, ७५ पुरवणीवजा हपीसें व ३६६ अडत्या होत्या. ह्या शाखांच्या व्यवहारांची दिशा बँकेच्या पॅरीसमध्यें मुख्य हपीसांत चालणाऱ्या व्यवहारांबरहुकूम असते. कारण ह्या शाखांमध्यें बँकेचेंच काम चालत असतें. अडत्या सामान्यपणें बँकेच्या शाखांनांच जोडलेल्या असतात व त्या ठिकाणीं हुंड्या वटविणें व अशींच इतर थोडीं कामें चालत असतात; पुरवणीवजा हपिसांमध्यें महिन्यांतून कांहीं ठराविक दिवशींच कांहीं ठराविक काम चालत असतें.

बँक ऑफ् फ्रान्सच्या शाखांमध्यें एखाद्या सामान्य पेढीचे नित्याचे सर्व व्यवहार जरी चालत नसले तरी फ्रेंच लोकांना त्या इतक्या उपयोगी वाटतात

कीं, ह्या बँकेनें आणखी जास्त शाखा इतरत्र उघडाव्या अशी त्यांची सारखी मागणी असते. ह्यावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, फ्रान्समध्यें पेढयांची वाढ फारच धिमेपणानें होत आहे. बँक ऑफ् फ्रान्स ही मध्यवर्ती पेढी असल्यामुळें तिला आपले पैसे नेहमीं खेळते ठेवावे लागतात आणि सरकारी कायद्यानें तिला तीन प्रतिष्ठित लोकांच्या सह्या असलेल्या हुंड्याच वटवितां येतात. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, ज्या ठिकाणीं पेढया मुळींच नसतील तेथील लोकांच्या हुंडया वगळल्या तर ह्या पेढीचें मुख्य काम म्हणजे इतर पेढया व पेढीवाले लोक ह्यांनीं आणून दिलेल्या हुंडयाच पुनः वटविणें एवढेंच असतें. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांची स्थिति अशा प्रकारची नाहीं. ह्या देशांत पेढयांना सवलती पुष्कळ असल्यामुळें मध्यवर्ती पेढीकडे ज्या हुंडया वटविण्याकरितां तीन सह्यांची जरूर लागते असल्या हुंडया वटविण्याचें काम— पेढया वगळल्या तर–इतरांकडून फारसें येतच नाहीं.

फ्रान्समध्यें बँकांची वाढ हळूंहळूं होत आहे ह्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण असें कीं, नोटा काढण्याचा मक्ता फक्त बँक ऑफ् फ्रान्सलाच आहे. फ्रेंच लोकांची स्वाभाविक आवड अशी आहे कीं, त्यांना नाणीं किंवा नोटा सारख्याच आवडतात. तेव्हां नोटा काढण्याचा अधिकार पेढयांना असल्याशिवाय त्यांची वाढ व्हावी कशी ? पेढयांचें भांडवल नेहमींच मर्यादित असणार व त्यांना आपले व्यवहार आपल्या पतीवरच वाढविणें जरूर असल्यामुळें नोटा सुरू करणें जरूर असतें. पण हा अधिकार नसल्यामुळें अर्थातच पेढयांची वाढ जोराची होऊं शकत नाहीं. १८४८ सालापर्यंत फ्रान्समध्यें पेढीचा धंदा कांहीं खाजगी संस्था स्वतः जमविलेल्या भांडवलांवर व कांहीं थोडया लोकांच्या ठेवीवर चालवीत असत. पण १८३० व १८४८ सालीं त्या वेळच्या सरकारच्या उलथापालथीमुळें ह्या खाजगी संस्थांचें मरण ओढवलें.

तिसऱ्या नेपोलियनच्या अमदानींत मनोतीनें पैसे कापून हुंड्या वटविणाऱ्या पेढयांची व ठेवी ठेऊन घेणाऱ्या पेढयांची बरीच वाढ झाली. तरीपण हल्लीं ठेवी स्वीकारणाऱ्या पेढयांचें महत्त्व फारसें राहिलें नाहीं. कारण हल्लीं फ्रान्समध्यें मोठमोठया पतपेढया (Credit Institutions) असून त्यांच्या शाखाही चोहोंकडे आहेत व त्यांनींच त्या ठेवी स्वीकारणाऱ्या पेढयांचें कार्यक्षेत्र व्यापून टाकलेलें आहे.

१८७० सालीं बँक ऑफ् फ्रान्सवर एक मोठीच जबाबदारी येऊन पडली. त्या वेळीं फ्रान्सनें जर्मनीशीं युद्ध पुकारलें होतें व लढाई जशी अंगलट येऊं लागली तसतसा लोकांचा धीर खचत चालला व त्यांची ह्या पेढीवर पैशाची जोराची मागणी सुरू झाली. युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी तिच्याजवळ तिच्या नोटांइतकीच रोकड होती व ही रोकड तिला जें रोखीचें देणें होतें तिच्या $\frac{2}{3}$ इतकी होती. तेव्हां ह्या पेढीची सांपत्तिक स्थिति किती समाधानकारक होती हें वाचकांस सहजच समजेल. नुसती लढाई सुरू झाल्याबरोबरच बरेच लोक पेढीकडे कर्ज मागूं लागले व त्यामुळें तिच्याजवळ असलेल्या नोटा व नाणीं लोकांच्या खाजगी तिजोरींत किंवा अन्य देशांत गडप होऊन बसलीं. ही स्थिति अशीच कांहीं दिवस टिकल्यावर सरकारला कायदा करून बँक ऑफ् फ्रान्सला नोटांबद्दल नाणीं न देण्याची व आपल्या नोटा कायदेशीर चलन म्हणून प्रचलित करण्याची परवानगी द्यावी लागली, इतकेंच नव्हे तर तिला जास्त नोटा काढण्याची परवानगी मिळाली. १८७० सालच्या आगस्टच्या चौदाव्या तारखेस ह्या नोटांची किंमत २४० कोटी फ्रँक होती. ह्याच वेळीं बँकेनें आपल्या नोटा २५ फ्रँक किंमतीच्या काढण्यास हरकत नाहीं अशी सवलतही तिला मिळाली.

ही लढाई चालली असतांना ह्या पेढीला सरकारलाही बरीच आर्थिक मदत द्यावी लागली. १८७१ सालीं ही मदत १४२ कोटी व ५० लाख फ्रँकपर्यंत जाऊन पोंचली. ह्याच वेळीं बँकेला लोकांना कटमितीनें व्याज कापून पैसेही द्यावे लागले. अर्थात् बँकेला सर्वस्वीं आपल्या नाण्यावरच अवलंबून राहणें शक्य नव्हतें म्हणून तिला जास्त नोटाही काढाव्या लागल्या व ही नोटांची संख्या कायद्यानें ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षां ८० कोटी फ्रँकनीं वाढलेली होती. ' ह्या नोटा सुरू करतांना बँकेला अर्थातच प्रचारांत असलेलें नाणें काढून घ्यावें लागलें. इतकी दक्षता ठेवूनसुद्धां बँकेच्या नोटांची किंमत थोडी उतरली होतीच. सरकारनें बँकेला आपण घेतलेलें कर्ज परत करण्यास सुरुवात केल्यामुळें तिलाही लोकांना रोख नाणें देणें शक्य झालें व पुनः नोटांची किंमत पूर्वपदावर आली; पण कांहीं वर्षे तरी ही स्थिति प्राप्त होणें शक्य नव्हतें. कारण फ्रेंच सरकारला बँकेचें कर्ज फेडण्यापूर्वी जर्मनीचें नुकसानभरपाईचें कर्ज फेडावयाचें होतें. हें कर्ज फेडावयाचें तर फ्रान्सच्या व्यापाराची बिघडलेली घटी नीट बसावयास पाहिजे होती व देशांत उद्योगधंदे वाढून फ्रेंच राष्ट्राची पत जगामध्यें वाढणें अगदीं जरूर होतें.

कारण अशी पत न वाढती तर त्या राष्ट्राला इतर देशांत राष्ट्रीय कर्ज उभारतां आलें नसतें. एवंच, बँक ऑफ् फ्रान्सला फ्रेंच सरकारकडून कर्जाचे पैसे मिळणें तर बाजूलाच राहिलें; पण देशांत द्रव्याभावी उद्योगधंदे बुडूं नयेत म्हणून त्यांची वाढ करण्याकरितां लोकांना भांडवल पुरविण्याची जबाबदारीही तिच्या अंगावर येऊन पडली. ही जबाबदारी पार पाडण्यास बँकेला जास्त प्रमाणांत लोकांना कर्जाऊ रकमा देणें, कटमितीनें व्याज कापून पैसे देणें व पांच फ्रँकपर्यंत किंमतीच्या नोटा सुरू करणें ह्या गोष्टी कराव्या लागल्या. ह्या कमी किंमतीच्या नोटा सुरू केल्यानें सर्व लहान मोठ्या शहरांत त्यांचा प्रचार झाला व देशांतील बरेंच नाणें प्रचारांतून निघून बँकेकडे परत आलें. ह्या सर्व क्लृप्त्या एकंदरींत सुफलदायी झाल्या ह्यांत शंका नाहीं. कारण बँकेला आपल्या भागीदारांना भरपूर नफा वांटता आला.

१८७२ सालीं फ्रेंच सरकारनें बँकेचें कर्ज फेडण्यास सुरुवात केली व बँकेनेंही लोकांना त्यांच्याकडून नोटा परत घेऊन नाणीं देण्यास सुरुवात केली. प्रथम २५ फ्रँकपर्यंत किंमतीच्या नोटा प्रचारांतून काढून टाकण्यास बँकेनें प्रारंभ केला व त्यामुळें लोकांत नाण्यांचा प्रचार बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होऊं लागला. १८७७ सालच्या अगदीं शेवटल्या तारखेस सरकारनें आपलें बहुतेक कर्ज फेडल्यावर १८७८ सालच्या आरंभीं बँकेलाही नाणं लोकांस देणें सुलभ झालें. हल्लीं जरी बँकेच्या नोटा कायदेशीर चलन म्हणून मानल्या जातात व कर्जफेडीच्या वेळीं स्वीकारल्या जातात तरी सरकारच्या किंवा बँकेच्या आग्रहास्तव कोठलीही नोट बँकेजवळ नाणें नाहीं म्हणून प्रचारांत नाहीं. शिवाय दुसरीही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, फ्रेंच लोकांना बँकेनें नाणें किंवा नोटा ह्यांपैकीं कोणतीही निवड करण्याची जेव्हां मुभा दिली तेव्हां लोक नोटा परत करून नाणें घेण्यास फारसे उत्सुक नाहींत असा तिला अनुभव आला. ह्याचें कारण बँकेच्या नोटा नाण्याप्रमाणें लेखणें व त्या वापरणें हें लोकांच्या अंगवळणीं पडलें होतें. हल्लीं अशी वस्तुस्थिति आहे कीं, लोक बँकेकडून फारशीं नाणीं मागत नसल्यामुळें तिच्याजवळ रोख नाणें भरपूर आहे व लोकांत नोटांचा प्रचार बराच असल्यामुळें, त्यांनाही त्या नाण्याची विशेषशी जरूर नाहीं. एवंच, देशांतलें बहुतेक नाणें हल्लीं बँक ऑफ् फ्रान्सच्या कह्यांत आहे व त्यामुळें तिजजवळ भरपूर शिल्लक असल्या-मुळें कोणीही किती जरी मागणी करण्यास आला तरी तिला फिकीर नसते.

ही भरपूर शिल्लकसुद्धां बहुतेक अंशीं सोन्याची आहे ही गोष्ट लक्षांत ठेवण्या-सारखी आहे. लोकांनीं मागणी केली असतांना त्यांना सोनें द्यावें किंवा चांदी द्यावी हें ठरविण्याचा अधिकार बँकेकडे आहे व सर्व जगांत, विशेषतः इंग्लंडमध्यें, सुवर्णाला मान आहे ही गोष्ट तिला पूर्णपणें अवगत असल्यामुळें बँकेचें धोरण आपल्याजवळची चांदी कमी करून होतां होईल तों सोन्याचा संग्रह वाढवावयाचा असें आहे. १९१३ सालीं म्हणजे महायुद्धाचे पूर्वीं ह्या पेढीजवळ ७० कोटी फ्रँकची चांदी होती व सोनें मात्र ३०० कोटी फ्रँकचें होतें. ह्यावरून वाचकांस कळून आलेंच असेल कीं, बँक ऑफ् फ्रान्सजवळ जेवढी रोकड शिल्लक असते तिच्या $\frac{४}{५}$ हून जास्तच पण कमी नव्हे इतकें सोनें राखून ठेवलेलें असतें.

वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, ह्या पेढीला लोकांनीं पैसे मागितले असतांना ते पैसे सोन्याचे रूपानें द्यावे किंवा चांदीचे रूपानें द्यावे हें ठरविण्याचा अधिकार आहे. हा अधिकार जर ह्या पेढीनें प्रत्येक वेळीं बिनमुर्वतीनें गाजविला तर व्यापारी वर्गाची व सामान्य लोकांची फार गैरसोय होईल, व लोकांना सोन्याची फारच निकड असली व अशा वेळीं बँकेनें त्यांना चांदीच देण्याचें ठरविलें तर त्यांच्यामध्यें मोठा असंतोष माजेल. अशा वेळीं ही पेढी जरा जास्त दर आकारून सोनें लोकांना देऊं लागते. पेढीच्या ह्या युक्तीविषयींचें विवेचन आम्हीं ' कटमितीचा दर ' ह्या सदराखालीं केलेलेंच आहे, तेव्हां त्याची द्विरुक्ति येथें करीत नाहीं. येथें आम्हांस एवढेंच सांगणें इष्ट दिसतें कीं, ह्या युक्तीमुळें देशांत सोनें रहाणें व बाहेरून तें आंत येणें वगैरे गोष्टींचा फायदा फ्रान्सला झाला आहे ह्यांत संशय नाहीं; पण बरेंच सोनें देशांत अडकून राहिल्यामुळें जगांतल्या इतर राष्ट्रांना ह्या सोन्याला मुकावें लागलें आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. ज्या ज्या वेळीं देशांत सोन्याची गरज असते त्या त्या वेळीं तें सोनें आणण्याचा सोपा मार्ग म्हटला म्हणजे कटमितीचा दर वाढविणें हा होय. लोकांना वरभावानें सोनें देणें व कटमितीचा दर वाढविणें ह्यांची तुलना केली असतांना दोघांचा परिणाम जरी एक होत असला तरी दुसऱ्या मार्गाचा अवलंब केला असतांना देशांमध्यें कटमितीचा दर नेहमीं चंचल व थोडासा जास्त असतो असा आपला लंडन व बर्लिन येथील अनुभव आहे. ह्या दोन व्यापारी शहरांत कटमितीचा जो दर आहे त्याच्यामानानें पॅरिस येथील दर कमी असून अधिक स्थिर आहे व त्यामुळें फ्रान्समधील धिम्या, उद्योगप्रिय व व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे जे वंशपरंपरागत जुने मार्ग

आहेत त्यांना चिकटून राहणाऱ्या लोकांना हा स्थिर दर बराच फायदेशीरही झालेला आहे; पण ह्या वरभाव आकारण्याच्या पद्धतीनें जगांतील व्यापारी देशांत लंडन, न्यूयार्क ह्या शहरांना जें महत्त्व आहे तें पॅरिसला नाहीं हें आपण विसरतां कामा नये.

हा विषय संपविण्यापूर्वी येथें एक गोष्ट नमूद केली पाहिजे. ती ही कीं, बँक ऑफ् इंग्लंडप्रमाणें ही बँकही खाजगी आहे व नेपोलियननें ह्या पेढीची जी घटना ठरविली होती तीच अजून कायम आहे. ही बँक सरकारी मालकीची करावी असा प्रश्न १८९७ सालीं निघाला होता; पण बँक सरकारी केली व फ्रान्सवर जर परचक्र आलें तर शत्रू ती सहज जप्त करील ह्या मुद्यावर ती खाजगी मालकीचीच ठेवावी असें ठरलें.

फ्रान्सच्या औद्योगिक इतिहासांत बँक ऑफ् फ्रान्सचें वर्तमानकालीन महत्त्व:—ह्या बँकेचें फ्रान्समध्यें अतिशय महत्त्व आहे. बँक ऑफ् इंग्लंडबद्दल इंग्लिश लोकांना जें महत्व वाटतें तेंच महत्व ह्या बँकेबद्दल फ्रेंच लोकांना वाटत असतें. ह्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण असें आहे कीं, ह्या बँकेनें अनेक व्यापारी पेढ्यांना जन्म दिला आहे. वर एकदां सांगण्यांत आलेलेंच आहे कीं, प्रत्येक व्यापारी हुंडीवर तीन सह्या असल्याखेरीज ह्या पेढीला ती वटवितां येतच नाहीं आणि वस्तुस्थिति अशी आहे कीं, व्यापारी लोकांनीं एकमेकांवर काढिलेल्या पुष्कळ हुंड्यांवर तीन जणांच्या सह्या मिळत नाहींत. तेव्हां ह्या हुंड्या वटविण्याचें काम करण्याकरितां पुष्कळ पेढ्यांची लोकांना जरूर असते. आणि ह्या पेढ्यांचा जन्म बँक ऑफ् फ्रान्सपासूनच असल्यामुळें लोकांना हिचें महत्व फार वाटतें. बँक ऑफ् फ्रान्सचा दुसरा विशेष म्हणजे ठेवींवर व्याज न देणें हा होय. लोकांची तर अशी अपेक्षा असते कीं, आपण काटकसर करून सांचविलेल्या पैशांवर व्याज पेढयांनीं द्यावें. ह्या दोन कारणांकरितां फ्रान्समध्यें व्यापारी पेढयांची फार जरूरी होती व ती जरूरी आतां नवीन नवीन पेढ्या स्थापन होऊन नाहींशी झालेली आहे. ह्या पेढ्यांना जरी लोकांची मदत असली तरी त्यांना बँक ऑफ् फ्रान्सची मदत आवश्यक आहे; कारण एक तर त्यांना नोटा काढण्याचा अधिकार नाहीं, व दुसरें असें कीं, लोकांनीं ठेवलेल्या रकमा पुरेशा नसल्यामुळें ह्या पेढ्यांना ह्या मध्यवर्ती पेढीकडे नेहमीं नित्याच्या खर्चाकरितां व आणीबाणीच्या वेळीं लागणाऱ्या पैशाकरितां

आर्थिक मदत मागावी लागते. ज्या हुंड्या बँक ऑफ् फ्रान्सला तीन सह्या नसल्यामुळें वटवितां येत नाहींत त्या हुंड्या आपली तिसरी सही देऊन ह्या पेढ्या तिजकडे आणून देतात व तिच्याकडून वटवून घेऊन पुनः आपण त्या वटवितात. अशा रीतीनें फ्रेंच लोक व बँक ऑफ् फ्रान्स ह्या दोघांना जोडणाऱ्या ह्या पेढ्या एक प्रकारची सांखळीच होत. बँक ऑफ् फ्रान्स ही हल्लीं पेढ्यांची पेढी बनली आहे व तिचे कायदे पाळून ज्या कोणाला तिची मदत हवी असेल त्याला ती सहज देऊं शकते; पण फ्रेंच लोकांचा हल्लीं असा अनुभव आहे कीं, पुष्कळ बाबतींत सोयीच्या व व्यापारी दृष्टीनें बँक ऑफ् फ्रान्सपेक्षां ह्या व्यापारी पेढ्याच अधिक उपयोगी आहेत. ह्या पेढीला इतकें महत्व येण्याचें तिसरें कारण म्हणजे तिला देशांतील सोन्यावर चांगली नजर ठेवतां येते. अशी नजर ठेवण्या-बद्दल तिला कायद्यानें अधिकार मिळाला आहे अशांतला भाग नाहीं; पण तिच्याकडे नोटा काढण्याचा मक्ता असल्यामुळें व ती पेढ्यांची पेढी असल्यामुळें तिला हें नजर ठेवण्याचें काम सहज रीतीनें करितां येतें. ज्या नोटांबद्दल पैशाची मागणी होते त्यांबद्दल बँकेनें लोकांना पैसे दिलेच पाहिजेत अशी कायद्याची सक्ती आहे व देशांतल्या पेढ्यांना हीच पेढी पैसे पुरवीत असल्यानें राष्ट्रांतील सर्व पैसा हिच्याच ताब्यांत असतो. ह्या कारणास्तव एखादे वेळीं कांहीं कारणांनीं देशांतलें सोनें बाहेर जाऊं लागलें तर तें न जाऊं देण्याची जबाबदारी ह्या पेढी-वरच पडते.

ह्या मध्यवर्ती पेढीशिवाय समवायिक भांडवलांच्या इतर चार पेढ्या असून शिवाय लहान लहान गांवांत पुष्कळ पेढ्या आहेत व त्यांच्या शाखाही अनेक आहेत. ह्या पेढ्या असल्यामुळेंच फ्रान्सची उद्योगधंद्याची व शेतीची वाढ फार झपाट्यानें झालेली आहे. इंग्लंडमध्यें पेढ्यांवर चेक पाठवून पैसे काढण्याची जशी व्यवस्था आहे तशी व्यवस्था येथें नाहीं; तरीपण लोक आपला व्यवहार पेढीच्या नोटांवरच करीत असतात.

प्रकरण ४ थें.

जर्मनींतल्या पेढ्या.

जर्मनींतील पेढ्यांच्या इतिहासाचे तीन भाग:— जर्मनीमधल्या पेढ्यांच्या इतिहासाचे स्थूलमानानें तीन भाग होतात. पहिला भाग १८४८ सालापर्यंतचा आहे. दुसरा भाग १८४८ सालापासून सुरू होऊन १८७० सालीं संपतो व तिसरा भाग १८७१ सालापासून आतांपर्यंतचा होय. ह्या तीन भागांचें आपण जरा विस्तारानें विवेचन करूं.

पहिला भाग–१८४८ पर्यंतचा काल:—जर्मनीमध्यें पेढीचे व्यवहार प्रथम व्यक्तींच्या व नियमबद्ध घटना नसलेल्या संस्थांच्या हातांत असत. ही स्थिति १७६५ सालापर्यंत टिकली. नंतर फ्रेडरिक धि ग्रेटनें बर्लिन शहरीं एक सरकारी पेढी स्थापन केली. ह्याच पेढीचें पर्यवसान प्रथम बँक आफ् प्रशिया व नंतर साम्राज्य पेढी (Imperial Bank) ह्यांमध्यें झालें.

१७७२ सालीं ह्याच बादशहानें एक भावी महत्वाची संस्था स्थापन केली व तिचें नांव " सीहँडलंग्स् सोझीटॅट् " असें ठेवलें. ही संस्था स्थापन करण्यांत त्या बादशहाचा हेतु " प्रशियाच्या निशाणाखालीं जलमार्गानें होणाऱ्या व्यापाराची वृद्धि करणें व स्पेनमध्यें व इतर देशांत किफायशीर रीतीनें व्यापाराची आयात व निर्गत करणें " असा होता. वास्तविक पाहिलें तर ह्या संस्थेमुळें प्रशियाच्या सरकाराला अनेक उद्योगधंदे व आपला वसूल वाढवितां आला व शेवटीं ह्या संस्थेकडे पेढीचे व्यवहार सोंपविण्यांत आले. प्रशियाच्या बँकेचें परिवर्तन साम्राज्य पेढीमध्यें झाल्यापासून ह्या संस्थेचा उपयोग प्रशियाचें सरकार व त्या सरकारच्या अमलाखालीं असलेल्या अनेक संस्था ह्यांना आर्थिक बाबतींत (Finance) फारच झालेला आहे.

फ्रेडरिक धि ग्रेटनें "लँड बँक" ह्या नवीनच पेढ्या स्थापन करून देशांतील शेतकीला जोराचें प्रोत्साहन दिलें. त्यावेळीं युरोपमध्यें मोठीं युद्धें झालीं होतीं. शेतकरी लोकांना त्राण नसून त्यांना पैशाची फार जरूर होती. बरें, लोकांकडून कर्ज काढावें तर सावकार भयंकर व्याज आकारीत असत. ह्या कारणास्तव ह्या बादशहानें असें जाहीर केलें कीं, जे लोक एक संस्था स्थापून व त्या संस्थेचे

सभासद बनून आपली सर्व जमीन आपणास मिळणाऱ्या कर्जाबद्दल जामीन म्हणून ठेवून एक जुटीनें जबाबदार रहातील त्यांना कर्ज देण्याकरितां पतपेढया स्थापन केलेल्या आहेत.

दुसरा भागः--१८४८ पासून १८७० चा कालः–१९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत जर्मनीच्या उद्योगधंद्यांची विलक्षण वाढ झाली. देशांतील लोखंड व कोळसा ह्यांची निपज वाढली होती व मोठ्या भांडवलाच्या समवायिक भांडवलाच्या पेढया चोहोंकडे स्थापन होत होत्या. अशा वेळीं पेढयांची वाढ होणें अगदीं साहजिक होतें. ह्या पेढयांचें मुख्य काम नाणें न ठेवतां नोटा काढण्याचें असे; पण बऱ्याच पेढयांनीं सट्टेबाजींत आपला पैसा उधळल्यामुळें व आपले कारभार अशास्त्रीय रीतीनें ठेवल्यामुळें लोकांची प्रवृत्ति कांहीं ठराविक मोठ्या पेढयांनांच नोटा काढण्याचा अधिकार असावा अशी होऊं लागली ह्या पेढयांशिवाय मनोतीनें पैसे कापून हुंडया वटविणाऱ्या पेढयांची वाढही जर्मनी-मध्यें ह्याच वेळीं झाली. ह्या पेढया नवीन नवीन उद्योगधंदे सुरू करणाऱ्या लोकांच्या गरजा विशेष रीतीनें पुरवीत असत. ह्या नवीन पेढया जरी जन्माला येत होत्या तरी खासगी पेढया ' धाता यथा पूर्वमकल्पयत ' ह्या तत्त्वावर आपला व्यवहार जुन्या वालबोधपद्धतीनेंच चालवीत असत. पण त्यांचा लोप लवकरच होऊं लागला होता.

तिसरा भाग—१८७० नंतरचा काल–' इम्पेरिअल बँक':— १८७५ सालीं ह्या पेढीची स्थापना झाली. ही पेढी नवीनच जन्माला आली अशांतली गोष्ट नव्हती; तर पूर्वींच्या बँक आफ् प्रशियाचें हें रूपांतर होतें. त्याच्यापूर्वीं जर्मन संयुक्त संस्थानांत पांच निरनिराळ्या चलनपद्धती होत्या. ह्याचा असा परिणाम झाला होता कीं, निरनिराळ्या सरकारनीं निरनिराळीं नाणीं व नोटा सुरु केल्या होत्या, निरनिराळ्या पेढयांनीं काढिलेल्या नोटांची किंमत उतरून गेली होती व चोहोंकडे ब्रह्मघोंटाळा उत्पन्न झालेला होता. ही घाण काढून टाकण्याकरितां एक मध्यवर्ती पेढी असावी अशी कल्पना निघून ही पेढी स्थापन झाली व त्यामुळें हल्लीं जर्मनीचा कल्पनातीत फायदा झालेला आहे. १८७५ च्या कायद्यानें असें ठरलें कीं, फेडरल कौन्सिलच्या शिफारशीनें कैसरनें डायरेक्टरांच्या मंडळाचे सभासद व एक अध्यक्ष तहाहयात म्हणून

नेमावें. ह्या पेढीचे अधिकारी लोक–जरी त्यांना पेढीकडून पगार मिळत असला तरी–सरकारी अधिकारी समजले जावेत व त्यांना पेढीचे भाग विकत घेण्याची परवानगी नसावी. ह्या पेढीचे भागीदार आपल्यापैकींच कांहीं लोकांना निवडून त्यांची एक मध्यवर्ती कमेटी बनवितें व ह्या कमेटीला सल्ला देण्याचा व पेढीची तपासणी करण्याचा अधिकार दिलेला असतो; पण ह्या कमेटीच्या सभासदांना पगार मिळत नाहीं. ह्या कमेटीच्या सभासदांनीं डायरेक्टर लोकांच्या इम्पेरिअल बोर्डमध्यें सल्ला देण्याकरितां म्हणून आपल्यापैकीं तीन लोक निवडून त्यांना ‘ बँक डायरेक्टरांच्या नजेरसमोर ’ पेढीचीं हिशेबपुस्तकें व इतर पुस्तकें पहाण्यास व त्यांवर आपणांकडे रिपोर्ट करण्यास अधिकार दिलेला असतो. वरील वर्णनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, ही पेढी पूर्णपणें साम्राज्यसरकारच्या ताब्यांत गेलेली आहे. माजी कैसर बादशहाला आपण नेमलेल्या चॅनसेलरच्यामार्फत ह्या पेढीवर पूर्ण नजर ठेवतां येत असे व ह्या पेढीला सरकाराकरितां लोकांकडून पैसे घेणें व त्यांना पैसे देणें, साम्राज्यसरकारच्या खजिन्याकरितां वसुलाचीं इतर कामें करणें, इतकेंच नव्हे तर पैशाच्या मोबदल्याशिवाय साम्राज्याच्या कित्येक संस्थानांच्या देण्याघेण्याची व्यवस्था पाहणें हीं कामें करावीं लागत. अशा प्रकारें ही पेढी बऱ्याच मोठ्या प्रमाणांत राष्ट्रीय स्वरूपाची बनलेली होती.

१८७५ सालाचा कायदा व त्याजबद्दलची चर्चा:—१८७५ सालीं जेव्हां ह्या राष्ट्रीय पेढीकरितां एक कायदा पास करण्यांत आला तेव्हां नोटा काढण्याचा अधिकार असलेल्या अशा **३२** स्वतंत्र पेढ्या **जर्मनसाम्राज्या**मध्यें हयात होत्या. त्यांपैकीं २४ पेढयांनीं आपला नोटा काढण्याचा हक्क गमावला आहे व तो हक्क ह्या राष्ट्रीय पेढीला मिळालेला आहे. खरें पाहिलें असतांना नोटा काढण्याचा हक्क ह्या एकाच पेढीला असावा अशी साम्राज्यसरकारची इच्छा होती. पण सॅक्सनी, बव्हेरिया, बेडन, वुर्टेनबर्ग येथील पेढयांनीं आपला पूर्वपरंपराप्राप्त हक्क अजूनहि कायम ठेविलेला आहे. १८९९ सालीं ह्या राष्ट्रीय पेढीची सनद पुनः सुरू करण्याचे वेळीं एक कायदा पास करून सरकारनें नोटा काढण्याचे बाबतींत ह्या पेढ्यांना नवीन निर्बंध घातले. ज्या वेळीं इम्पेरिअल बँकेचा दर शेंकडा ४ टक्केपर्यंत चढला असेल त्या वेळीं त्या दराहून कमी दरानें इतर पेढ्यांनीं कटमित्तीनें पैसे कापून हुंड्या वटवूं नयेत व ज्या वेळीं त्या पेढीचा

दर शेंकडा ४ हून कमी असेल त्या वेळीं तिच्या प्रचलित दराहून दरटक्की $\frac{3}{4}$ नें कमी असलेल्या दरानें इतर पेढ्यांनीं हुंड्या वटवूं नयेत; उदाहरणार्थ, इम्पेरिअल बँकेचा दर ४ टक्कयांहून कमी म्हणजे शेंकडा तीन टक्के असला तर इतर पेढ्यांनीं $2\frac{1}{4}$ ह्या कमी दरानें हुंड्या वटवूं नयेत अशा स्वरूपाचा हा कायदा होता. पण असा कायदा पास करून सरकारनें काय मिळविलें हें सांगणें कठीण आहे. हा कायदा पास करते वेळीं सरकारची अशी कल्पना होती कीं, इम्पेरिअल बँकेच्या दराच्या धोरणानें नोटा काढण्याचा हक्क असलेल्या इतर पेढ्यांना आपला हुंड्या वटविण्याचा दर ठरविण्यास सांगितलें म्हणजे त्या इम्पेरिअल बँकेला जर्मनींतला सराफबाजार सहज कह्यांत ठेवतां येईल; पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, जर्मनीमधला सराफकट्ट्यांतील कटमितीचा दर नोटा काढण्याचा अधिकार नसलेल्या पेढयांच्या धोरणावरच अवलंबून असतो.

जर्मनींतल्या बँक नोटाः--हल्लीं ह्या बँकेच्या नोटा कायदेशीर चलन म्हणून मान्य केल्या गेल्या आहेत. पूर्वीं १०० मार्कांच्या नोटांपेक्षां कमी किंमतीच्या नोटा काढल्या जाऊं नयेत असा निर्बंध असे; पण हल्लीं ५० किंवा २० मार्क किंमतीच्या नोटा निघाल्या आहेत. ह्या पेढीला कायद्यानें सोन्याच्या लगडीबद्दल नोटा व नोटांबद्दल सोनें द्यावें लागतें. ह्या पेढीच्या ठिकठिकाणीं व्यापाराच्या सोयीच्या दृष्टीनें शेंकडों शाखा स्थापन झालेल्या आहेत व व्याजाचा दर मुख्य बँकेंत व तिच्या शाखांमध्यें सारखाच असतो. मध्यवर्ती पेढी लोकांनीं आणलेल्या नोटांबद्दल रोख पैसे कोठेंही देऊं शकते. जर्मनीमध्यें असलेल्या बँकांनीं काढलेल्या नोटा व बँक आफ् इंग्लंडच्या नोटा ह्यांत असा फरक आहे कीं, पहिल्या प्रकारच्या नोटांबद्दल नाण्याचें किंवा भिति कापून घेऊन वटविलेल्या एखाद्या हुंडीचें विशेष प्रकारचें तारण नसतें. त्याचप्रमाणें जी पेढी ह्या नोटा काढते तिच्याजवळ तें नाणें व ती हुंडीहि नसते; इतकेंच नव्हे तर एखादा गृहस्थ ती हुंडी घेऊन आला तर पेढीचे इतर सावकार वगळून त्यालाच अगोदर पैसे मिळावे अशीहि कायद्याची सक्ती नाहीं. सामान्यपणें जर्मनीचा कायदा एवढेंच पहातो कीं, देशांतील पेढयांची सांपत्तिक स्थिति समाधानकारक आहे किंवा नाहीं? म्हणजे नोटा काढणें व त्या नोटांबद्दल नाणें ठेवणें हे व ह्यांसारखे पेढयांचे व्यवहार कायद्याबरहुकूम चालले आहेत किंवा नाहीं ? तेव्हां लोकांचा विश्वास नोटांवर असण्याचें कारण असें आहे कीं, त्याबद्दल नाणें केव्हांही मिळतें व

नोटा प्रचलित करणाऱ्या कोठल्याही पेढीकडे नेल्या असतांना त्या स्वीकारल्या जातात ही त्यांची खात्री असते. जर्मनीमध्यें जेवढया म्हणून नोटा काढणाऱ्या पेढया आहेत तेवढयांनीं दुसरीकडून आलेल्या नोटा आपल्या व्यवहारांत स्वीकारल्या पाहिजेत व मध्यवर्ती पेढीनें काढिलेल्या नोटांव्यतिरिक्त इतर नोटा वटविण्याकरितां म्हणून तात्वडतोब परत केल्या पाहिजेत किंवा ज्या पेढयांनीं त्या काढल्या असतील त्यांच्याकडे देण्याघेण्याचे व्यवहारांत पाठवून दिल्या पाहिजेत असा कायदा आहे.

जर्मनीमध्यें इंग्लंडच्या मानानें नोटांचा उपयोग जास्त प्रमाणांत होत असतो. तरीपण लोकांच्या ठेवीहि अलीकडे पेढयांकडे वाढत्या प्रमाणांत येत असतात. पूर्वीं ज्या समवायिक भांडवलाच्या पेढया, मोठमोठया कंपन्यांचे भाग विकून त्यांनीं काढलेले उद्योगधंदे वाढविण्याकरितां, निर्माण झालेल्या होत्या त्याच पेढया हल्लीं लोकांच्या ठेवी मोठया प्रमाणांत स्वीकारीत असतात. ह्या पेढ्या रीश् बँक म्हणजे साम्राज्य पेढी हिच्याजवळ शिल्लक ठेवीत नाहींत; पण पैशाची जर त्यांना जास्त जरूर लागली तर त्या पेढया तिच्याकडे हुंड्या पुनः वटविण्याकरितां आणतात. सर्व जर्मनसाम्राज्यांत ही एकच पेढी आहे कीं, जिच्यावर देशांतील सर्व पेढ्या पैशाच्या बाबतींत निःसंशय भिस्त ठेवूं शकतील. हा आपला लौकिक कायम रहावा म्हणून ह्या पेढीला आपल्याजवळ नाण्याच्या रूपानें भरपूर शिल्लक ठेवावी लागते. ही शिल्लक इतकी असली पाहिजे कीं, देशांतल्या पेढ्या व नोटा घेऊन येणारे लोक ह्यांच्या मागण्या त्या शिल्केच्या जोरावर राष्ट्रीय पेढीनें पुऱ्या केल्याच पाहिजेत. एखादे वेळीं ह्या पेढी जवळ जर शिल्लक कमी असली तर बँक आफ् इंग्लंडप्रमाणें ती आपला कट-मितीचा दर वाढवून आपला सुवर्णसंचय वाढविते.

इम्पेरिअल बँकेव्यतिरिक्त इतर पेढ्याः— व्यापारी महत्वाच्या दृष्टीनें ह्या साम्राज्य पेढीच्या खालोखाल नऊ व्यापारी पेढ्या जर्मनीमध्यें असून त्यांमुळें जर्मनीमधल्या उद्योगधंद्यांना फारच मदत झालेली आहे. ह्या नऊ पेढ्यांपैकीं पांच पेढ्या १८७० च्या सुमारास स्थापन झालेल्या होत्या व " डयुश बँक, " " कामर्थ अँड डिसकांटो बँक, " " ड्रेस्डनर बँक " व "नॅशनल बँक " अशा चार संस्था मागाहून स्थापन झाल्या. १८७०-७३ ह्या सालांत समवायिक भांडवलाच्या पेढ्या बऱ्याच स्थापन झाल्या; पण १८७३ सालीं एक

मोठी आणीबाणीची वेळ उपस्थित होऊन बऱ्याच पेढ्या रसातळाला गेल्या व पेढ्यांचे व्यवहार कांहीं ठराविक पेढ्यांकडेच असणें किती इष्ट आहे हें लोकांना कळून चुकलें; कारण आणीबाणीच्या वेळीं आपण संकटाला टक्कर देण्याला कसे समर्थ आहों हें कांहीं थोड्या पेढ्यांनाच लोकांच्या नजरेसमोर आणतां आलें. ह्या पेढ्यांचें मुख्य ठिकाण फ्रँकफर्ट हें होतें; पण त्यांनीं तें बदलून बर्लिन हें आपलें मुख्य ठिकाण केलें; त्यामुळें नुसत्या जर्मन साम्राज्यांतच नव्हें तर जर्मन वसाहती व परराष्ट्रें ह्यांमध्येंही आपल्या कार्याचें क्षेत्र वाढविण्यास त्यांना सोईस्कर झालेलें आहे. ह्या पेढ्यांच्या शाखा अनेक आहेत व आपल्या धोरणानें चालणाऱ्या पण दिसण्यांत स्वतंत्र अशा पुष्कळ पेढ्या ह्यांनीं स्थापन करून, पेढयां पेढयांमध्यें ऐक्य व सलोखा उत्पन्न करून व देशांतील उद्योगधंदे व व्यापार करणाऱ्या संस्थांशीं निकट संबंध ठेवून ह्यांनीं आपलें महत्व प्रस्थापित केलें आहे.

जमिनीच्या गहाणावर कर्ज देणाऱ्या पेढया व पतपेढयाः— वर सांगितलेल्या व्यापारी पेढयांशिवाय जर्मनीमध्यें जमीन गहाण घेऊन त्यावर कर्ज देणाऱ्या पेढया बऱ्याच स्थापन झालेल्या आहेत. ह्या पेढया व व्यापारी पेढया ह्यांचें कार्यक्षेत्र भिन्न आहे. ह्या पेढया विशेषेंकरून जमीनदार, शेतकरी अशांसारख्या लोकांकरितांच असतात. हया पेढ्या म्हणजे जमीनदार लोक व श्रीमंतलोक हयांना जोडणारे दुवेच होत. श्रीमंत लोकांकडून कर्जानें रक्कम घेऊन जमीनदारांना ती थोड्या जास्त व्याजानें देणें हें ह्यांचें काम असतें. हया पेढ्यांचा वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारच्या लोकांना फायदा होत असतो. श्रीमंत लोकांना जमीन गहाण ठेवून पैसे देण्याचा कंटाळा असतो म्हणून हया पेढ्या त्यांना आपण जिम्मेदार रहातात; व पेढ्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असल्यामुळें श्रीमंत लोकांनासुद्धां, थोड्या कमी व्याजानें का होईना, त्यांना पैसे देणें परवडतें. जमीनदार लोकांनाही ह्या पेढ्यांपासूनच कर्जानें पैसे घेणेंच फायदेशीर असतें; कारण ह्या पेढ्या त्यांना दीर्घकाल मुदतीचें कर्ज देऊं शकतात. ह्या कर्जावर व्याजाचा दरही माफक आकारला असतो; पुनः कर्जही हप्त्याहप्त्यानें फेडण्याची मुभा ह्या जमीनदारांना मिळते.

ह्या पेढ्यांशिवाय जर्मनीमध्यें पतपेढ्याही पुष्कळ आहेत. ह्या पतपेढ्यांमुळें ह्या देशांत गरीब लोकांचें कोटकल्याण झालेलें आहे. कारण एकटया दुकटया

गरीब माणसाला कर्ज न देतां सहकारी तत्त्वावर दहावीस माणसांनीं मिळून काढिलेल्या संस्थेला त्या पेढ्या कर्ज देतात.

सहकारी पेढ्यांचे दोन प्रकारः—ह्या सहकारी तत्त्वाला मूर्त स्वरूप देण्याचें श्रेय जर्मनीमधल्या **डॉक्टर स्कूल्झला** आहे. ह्या साहेबानें डेलिटझ् ह्या शहरीं सहकारी संस्था स्थापन केल्यावर जर्मनीमध्यें त्यांचा फैलाव सर्वत्र झाला. ह्या संस्थांमध्यें जितके सभासद असतात तितक्या लोकांची संस्थांनीं काढिलेल्या कर्जाबद्दल वैयक्तिक व सामुदायिक जबाबदारी असते. ह्या संस्था निर्माण होण्याचा मूळ हेतु साखर, धान्य, कॉफी, सिगारेट वगैरे जिनसा स्वस्त दरानें विकत घेतां याव्यात हा होता पुढें जिनसा उत्पन्न करणें, विकणें, आपापसांत काटकसरीची संवय व पत वाढविणें ह्याकरितां सहकारी संस्था निर्माण झाल्या.

प्रथम आपल्या सभासदांना कर्ज देण्याकरितां ह्या पेढ्या बाहेरून कर्ज काढीत; पण आतां त्यांची पत खूब वाढल्यामुळें लोकांच्या ठेवी इतक्या येऊं लागल्या आहेत कीं, त्यांचा विनियोग कसा करावा हाच मोठा प्रश्न त्यांचेसमोर येऊन पडलेला आहे.

आतांपर्यंत सहकारी पेढ्यांचा एक प्रकार आपण पाहिला. ह्या पेढ्या मुख्यत्वेंकरून कारागीरलोक व शहरांतले लहान व्यापारी ह्यांच्याकरितां स्थापन झाल्या होत्या; पण आम्ही आतां सहकारी पेढ्यांचा जो दुसरा प्रकार सांगणार आहोंत तो विशेषतः शेतकरी व लहान जमीनदार ह्यांचेकरतां स्थापन झालेला आहे. ह्या पेढ्या स्थापन करण्याचें श्रेय रॅफेसीनकडे आहे. जर्मनीमध्यें १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात शेतकऱ्यांची फारच हलाकीची स्थिति झाली होती. त्या स्थितीची कल्पना येण्यास हिंदुस्थानच्या शेतकऱ्यांची मूर्ति आपल्या डोळ्यां-समोर आणली म्हणजे पुरें आहे. प्रत्येक शेतकऱ्याला आपली शेती नीट रीतीनें चालविण्याकरितां भांडवल लागतें. हंगामाचे वेळीं बीं विकत घेणें, बैलाची जोडी घेणें, शेतांत वाढलेलें गवत कापणें वगैरेकरितां त्याला नेहमीं पैशाची जरूर भासते. बरें, एकदां सावकारचें कर्ज काढल्यावर तें वेळेवर फेडणें सर्वस्वीं पावसावर अवलंबून असतें व दुष्काळ पडला तर सावकारचें व्याज डोक्यावर चढत असते व त्या व्याजाच्या भारानें त्याची मान पुरती वांकून जाते. तेव्हां शेतकऱ्याच्या ह्या गरजा भागविण्याकरितां रॅफेसीननें ह्या सहकारी पेढ्या काढून शेतकरीवर्गाला कायमचें ऋणी करून ठेवलें आहे.

ह्या पेढ्यांचा विशेष असा आहे कीं, शेतकरी एखाद्या शेतकी संस्थेचा सभासद झाल्यामुळें त्याला एक प्रकारचा दर्जा असतो व त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असल्यामुळें त्याला किफायत व माफक व्याजाच्या दरानें रकमा मिळून त्याला आपली उन्नति करून घेतां येते. ह्याशिवाय ह्या पेढ्यांचे दुसरे विशेष म्हणजे देशांतील लहान भागांकरितांच ह्या स्थापन होतात व त्यामुळें त्यांचे जे सभासद असतात त्यांना एकमेकांची बारीक माहिती होऊन एकमेकांवर चांगला वचक बसतो; तसेंच ह्या पेढ्यांचे भागही लहान असतात व त्यांची गंगाजळी कायमची असून तिचे भाग पाडतां येत नाहींत. ह्या पेढ्यांचे सभासद सभासद ह्या नात्यानें संस्थेला कांहीं देत नाहींत व त्यांना कांहीं नफाही वाटला जात नाहीं व जो कांहीं नफा होईल तो सर्वसामान्य फंडांत समाविष्ट होतो. ह्या पेढ्यांकडून फक्त सभासदांनाच कर्ज मिळतें व तें फक्त उत्पादक धंद्यांत खर्च करण्याकरितांच मिळतें; त्याचप्रमाणें ह्या पेढ्यांचे जे अधिकारी लोक असतात त्यांना सेक्रेटरीव्यतिरिक्त पगार मिळत नाहीं. ह्या पेढ्यांच्या सभासदांची पेढीच्या कर्जाबद्दल अमर्याद जबाबदारी असते, म्हणजे प्रत्येक सभासदाला त्याबद्दल आपली सर्व इस्टेट अर्पण करण्याचा प्रसंग येतो. दर वर्षीं प्रत्येक सभासदाला किती कर्ज द्यावें, किती ठेवी लोकांकडून स्वीकाराव्या व संस्थेनें किती कर्ज काढावें हें सभासद एकदां ठरवितात व शेतकीला लागणारीं आऊतें व यंत्रें घेऊन तीं सभासदांना भाड्यानें देणें हें कामही ह्या पेढ्या करीत असतात.

जर्मनीमधील पेढ्यांची वर्तमानकालीन स्थितिः—आतांपर्यंत सांगितलेल्या निरनिराळ्या पेढ्यांमध्यें एक प्रकारची चढाओढच असते. कारण त्यांचें काम एकाच स्वरूपाचें असतें, म्हणजे ठेवी स्वीकारणें, हुंड्या वटविणें हीं कामें ह्या सर्व पेढ्या करीत असतात; तरीपण पेढ्यांचें कार्यक्षेत्र एकाच प्रकारचें नसतें. इंपीरियल बँकेचें मुख्य काम साम्राज्य सरकारचें सराफी काम करणें, रोख नाण्याची गंगाजळी पाहणें व चलनावर नजर ठेवून ती कह्यांत ठेवणें हें असतें. ठेवी स्वीकारणें, नोटा देणें व पैसे एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठविणें हीं कामें त्या पेढीनें गौण मानिलेलीं आहेत. बर्लिनमधील बँका औद्योगिक व व्यापारी वर्गांकरितांच मुख्यत्वेंकरून आहेत. अशा रीतीनें ध्येयावरून बँकांचें वर्गीकरण जर्मनीमध्यें सहज होऊं शकतें; पण ज्याप्रमाणें ' यथा नदीनां बहवोंबुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ' असें गीतेंत वर्णन आहे, त्याचप्रमाणें जर्मनीमधील सर्व

पेढयांचा संबंध इंपीरियल बँकेशीं येतो. कारण सर्व पेढ्यांना आपली शिल्लक ह्या पेढींत ठेवतां येते व वाटेल तितकें कर्ज तिजपासून घेतां येतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बँक ऑफ् इंग्लंड जी कामगिरी इंग्लंडच्या पेढ्यांकरितां करते तीच कामगिरी ही इंपीरियल बँक जर्मनीमध्यें इतर पेढ्यांकरितां करीत आहे. तथापि इंग्लंड व जर्मनीमधील पेढया ह्यांच्यामध्यें बराच फरक आहे. जर्मनीमध्यें प्रमुख पेढयांनीं इतरत्र आपल्या शाखा उघडल्या नाहींत व लहान लहान पेढयांचा आपल्यामध्यें अंतर्भावही करून घेतलेला नाहीं;तर त्या पेढयांचे भाग विकत घेऊन त्यांच्यावर आपली पहाणी त्यांनीं ठेवली आहे. ह्या पद्धतीचा असा परिणाम झाला आहे कीं, जर्मनींतल्या पेढयांना सर्व पेढया आपल्या तब्यांत ठेवतां येऊन त्यांना स्थानिक बाबतींत लोकांना किती पैसे द्यावे, त्यांच्या व्यापारी गरजा कशा भागवाव्या हें स्वानुभवावरून ठरविण्यास सवडतही देतां येते. जर्मनीमध्यें इंपीरियल बँकेची हिशेब ठेवण्याची जी पद्धत आहे तिच्यामुळें पेढयांचें काम करण्याच्या मार्गांत फारच सुधारणा झालेली आहे. ह्या राष्ट्रीय पेढीच्या जवळ जवळ ५०० शाखा आहेत; पण ह्या शाखा स्थापण्यांत तिला सरकारच्या कायद्याची बिलकूल मदत घ्यावी लागली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. फ्रान्सच्या मानानें जर्मनीमध्यें ह्या शाखांव्यतिरिक्त इतरही बऱ्याच पेढया स्थापन होऊन व्यापाराची वाढ विलक्षण झालेली आहे; व सांगण्याची मौज अशी कीं, ह्या पेढया १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या अखेरीसच स्थापन झाल्या आहेत. वर सांगितल्याप्रमाणें ह्या पेढया प्रथम नवीन उद्योग सुरू करणाऱ्या मोठमोठ्या कंपन्यांना त्यांचे भाग व तारणरोखे विकून भांडवल पुरविण्याकरितां जन्माला आल्या होत्या; पण हल्लीं हें काम त्या पूर्वींप्रमाणेंच करीत असून शिवाय लोकांना व्यापाराकरितां कर्ज देणें व त्यांच्या-ठेवी स्वीकारणें हीं कामेंसुद्धां त्याच करीत असतात. इंग्लंड वगैरे देशांत हीं कामें एकच पेढी करीत नाहीं; तरीपण जर्मनीमध्यें हा श्रमविभाग नसला तरी पेढयांचें सामर्थ्य कमी झालेलें नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

प्रकरण ५ वें

अमेरिकेंतील पेढयांचा इतिहास.

विषयोपन्यासः—अमेरिकेच्या इतिहासाला जेव्हां आरंभ झाला त्या वेळीं त्या देशांत औद्योगिक दृष्टीनें दोन गोष्टींची मोठी जरूरी भासत होती. त्या गोष्टी म्हणजे पुरेसें विनिमयसाधन व भांडवल होत. अमेरिकेंत अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत नाण्याचा पुरवठा परराष्ट्रांकडून व्यापाराच्या निमित्तानें होत असे व हें जें नाणें देशामध्यें येई त्यामुळेंच देशाचा राज्यकारभार चाले व लोकांना परदेशी माल घेणें सुलभ जाई; पण लोकांना नित्य व्यवहारांकरितां जितकें नाणें जरूर असे, तितकें नाणें अर्थात्च त्यांना मिळणें मुष्कील होई. ही झाली नाण्याची गोष्ट; पण उद्योगधंद्याला लागणाऱ्या भांडवलाची तर गोष्टच बोलावयास नको. लोकांना शेतकीला लागणारे बैल, आऊतें वगैरे खरेदी करण्यास सुद्धां पुरेसें भांडवल मिळणें दुरापास्त होतें. ह्या अडचणींतून मार्ग काढण्याचें वसाहतसरकारांनीं व लोकांनीं ठरविलें; पण अर्थशास्त्राची वाढ देशामध्यें त्या वेळीं फारशी झाली नसल्यानें भांडवल म्हणजे काय ह्याची यथार्थ कल्पना त्या वेळीं लोकांना नव्हती. भांडवल पैशाच्याच रूपानें राहूं शकतें अशी भ्रामक समजूत त्या वेळीं प्रचारांत असल्यानें विनिमयचलन म्हणून लागणारा पैसा व भांडवलाकरितां लागणारा पैसा ह्यांची लोकांस सारखीच गरज आहे असें समजून तो जास्त उत्पन्न करण्याकरितां सरकार व लोक ह्यांनीं जारीनें प्रयत्न सुरू केले व पैशाला लागणारी धातू जवळ नसल्यानें देशामध्यें पतीवर चालणाऱ्या नोटा सुरू केल्या. ह्या नोटांचा उपयोग वसाहतींचें सरकार आपला खर्च भागविण्यांत व लोकांना गहाणावर व जामीनावर कर्ज देण्यांत करीत असत. लोक व संस्था हेंच करीत. अशा रीतीनें सुरू झालेल्या नोटांचा प्रचार मर्यादितच असे व त्यांची किंमतही नेहमीं उतरत असे; तरीपण कांहींच चलन नसल्यापेक्षां ह्या किंमत उतरलेल्या नोटा बऱ्या असेंच लोकांना वाटत असे. नोटा काढून प्रचारांत आणण्याच्या हक्काबद्दल लोक व सरकार ह्यांना इतका अभिमान होता कीं, विलायतसरकारनें तो हक्क त्यांच्याकडून हिरावून घेण्याचा जेव्हां घाट घातला तेव्हां त्याला

त्यांनीं फार जोराचा विरोध केला. इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत जें मोठें सप्तवार्षिक युद्ध झालें व ज्या युद्धामुळें वसाहती सर्वस्वीं स्वतंत्र झाल्या त्या युद्धाचा खर्च ह्या नोटांनींच भागविण्यांत आला होता ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे.

नोटा काढण्याबद्दल लोकांना व सरकारला इतका जरी अभिमान होता तरी ह्या नोटा प्रचारांत असणें अर्थशास्त्रदृष्ट्या निषिद्ध आहे, कारण ह्या नोटांच्या मागें धातूच्या नाण्याचा जोर असल्याशिवाय त्यांची मूळ किंमत राहूं शकत नाहीं व वस्तूंच्या किंमती विनाकारण चढूं लागतात, ही गोष्ट शहाण्या लोकांस कळूं लागली होती. ह्यामुळें अमेरिकेची नवीन राज्यतंत्रपद्धति जेव्हां प्रचारांत आली तेव्हां वसाहतींतील संस्थानांनीं (States) ह्यापुढें नोटा काढूं नयेत व लोकांचें कर्ज नाण्यानेंच फिटलें जावें व हें नाणें सोन्याचांदीचें असावें असा स्पष्ट कायदा करण्यांत आला. इतकेंच नव्हे तर नाणीं पाडण्याचा अधिकार फक्त संयुक्त सरकारकडे असावा असाही निर्बंध घालण्यांत आला. तथापि नुसता कागदोपत्रीं कायदा करून धातूंच्या नाण्यांचा पुरवठा थोडाच होणार होता? लोकांना पैशाची तर फारच जरूरी होती व ती गरज भागविण्याकरितां संयुक्त सरकारला व संस्थानांच्या सरकारांना रोख पैशाऐवजीं हुंड्या काढण्याचा अधिकार असलेल्या पेढ्यांना सनदा देऊन त्या स्थापन कराव्या लागल्या. अमेरिकेंत अशी सनद मिळालेली पहिली पेढी १७८१ सालीं डिसेंबर महिन्याच्या ३१ तारखेस ' बँक ऑफ् नॉर्थ अमेरिका ह्या नांवानें स्थापन झाली.

अमेरिकेंतील १८ व्या शतकांतील पेढ्याः—अमेरिकेच्या मूळच्या वसाहतीमध्यें पेढ्यांविषयीं ज्या रूढ कल्पना होत्या त्या वसाहतवाल्यांनीं इंग्लंड व युरोपमधील इतर देश ह्यांमधील लोकांपासूनच उचललेल्या होत्या. त्या वेळची त्या लोकांची एखाद्या खाजगी पेढीबद्दलची कल्पना म्हटली म्हणजे वसाहतसरकारनें आपल्या पतीवरच काढिलेल्या नोटा किंवा चलनाचें साधन म्हणून काढिल्या जाणाऱ्या नोटा पुरविणारी एखादी पाती किंवा कंपनी अशी होती. त्या वेळीं लोकांची अशी कल्पना होती कीं, ह्या नोटांना जमीनीचें जर तारण किंवा आधार असेल तर त्या नोटांबद्दल रोख नाणें देण्याची जरूर भासणार नाहीं अशी लोकांची समजूत असल्याकारणानें एखादी पेढी काढण्यास जर कांहीं जरूर असेल तर ती भांडवलाची नसून विश्वासाची आहे अशा कल्पनेनें

पेढ्या स्थापन करून चलन म्हणून नोटा पुरविण्याची व्यवस्था झालेली होती. पण हे सर्व प्रयत्न त्या वेळच्या सरकारांनीं, त्या प्रयत्नांचे आर्थिक परिणाम काय होतात हें दिसूं लागण्यापूर्वींच, हाणून पाडले.

पुढें संयुक्त सरकारची स्थापना झाल्यावर अमेरिकेंत फिलाडेल्फिया, मॅसॅच्युसेट्स् व न्यु यॉर्क ह्या तीन ठिकाणीं तीन पेढ्या स्थापन झाल्या. ह्या पेढ्या अजूनहि हयात आहेत. ह्या तिन्ही पेढ्या, संयुक्त सरकारची घटना किंवा राज्यव्यवस्था अमलांत आल्यानंतरही, नोटा काढीतच असत व ह्यांपैकीं एक पेढी लोकांच्या ठेवी स्वीकारीत असे. ह्यांवरून असें सिद्ध होतें कीं, प्रथम प्रथम अमेरिकेंत पेढ्यांचा व्यवहार स्वतंत्र होता, म्हणजे त्याबद्दल सरकारी नियंत्रण नव्हतें. पुढें पुढें संस्थानांतील सरकारांनीं ह्या पेढ्यांना कायदे घालून दिले व हे कायदे म्हणजे त्या वेळच्या लोकमताचे निदर्शक होत. हे कायदे पेढ्यांनीं काढिलेल्या नोटांची काय किंमत असावी, पेढ्यांचें भांडवल व पेढ्यांचे व्यवहार ह्यांत काय प्रमाण असावें, पेढ्यांची स्थावर इस्टेट काय असावी व त्यांना मालाचा व रोख्यांचा व्यापार करण्याचा किती अधिकार असावा वगैरे प्रश्नासंबंधानें असत.

हॅमिल्टनची पेढी:--अमेरिकेची पहिली पद्धतशीर पेढी अलेक्झांडर हॅमिल्टन ह्यानें स्थापन केली. ह्या गृहस्थानें अमेरिकेचें नुकतेंच जें संयुक्त राष्ट्र बनलें होतें त्या राष्ट्रांतील लोकांचे हितसंबंध आर्थिक दृष्ट्या निगडित करण्याकरितां योजिलेल्या अनेक उपायांपैकीं हा एक उपाय होता. ही पेढी १७९१ सालीं स्थापन होऊन तिला वीस वर्षांपर्यंतची सनद मिळाली व इतर कोठल्याही पेढीला दुसरी सनद द्यावयाची नाहीं असें सरकारनें ठरविलें.

ही पेढी त्या वेळीं सर्व पेढ्यांत अग्रगण्य म्हणून मानली गेली होती. ही पेढी स्थापन करण्यांत अनेक हेतू होते. त्यावेळीं लोकांजवळ भांडवल नव्हतें व पुरेशीं नाणीं नव्हतीं. तीं पुरविणें व देशामध्यें सर्व लोकांस पटतील अशीं व सारख्याच किंमतीचीं नाणीं सुरू करणें हीं कामें अत्यंत महत्त्वाचीं होतीं. संयुक्तसरकारलासुद्धां निरनिराळ्या बंदरांत व इतर प्रमुख शहरांत गोळा केलेला वसूल सुरक्षितपणें ठेवण्याकरितां, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पैसे नेण्याकरितां व तात्पुरत्या गरजा भागविण्यास्तव कर्ज पुरविण्याकरितां एखादी संस्था

हवीच होती. हॅमिल्टन साहेबानें असें जोरानें सिद्ध केलें कीं, देशांत जर एखादी राष्ट्रीय पेढी स्थापन झाली तरच हीं कामें सुलभ रीतीनें होऊं शकतील. प्रथम प्रथम ह्या साहेबाच्या म्हणण्याला लोकांनीं फारच विरोध करण्याचें कारण असें होतें कीं, त्यांचे मतानें काँग्रेसला एखाद्या संस्थेला कुलपरवाना देऊन ती स्थापन करण्याचा अधिकारच नव्हता; पण अखेरीस त्या विरोधाचा कांहीं एक उपयोग न होतां हॅमिल्टनच्या मताप्रमाणें 'बँक ऑफ् युनायटेड स्टेटस्' ही पेढी स्थापन झाली.

ह्या पेढीला आपल्या कामांत चांगलेंच यश आलें व ती आपल्या भागीदारांना ८$\frac{3}{8}$ टक्के व्याज व आपल्या भांडवलाच्या शेंकडा ९ टक्के शिल्लक वांटूं शकली. ह्या पेढीचें मुख्य ठिकाण फिलाडेल्फिया येथें होतें व तिच्या सात शाखा इतरत्र होत्या. ह्या पेढीचें काम म्हटलें म्हणजे आयात मालाच्या व्यापाऱ्यांचे रोखे त्यांच्या मालावर जकात वसूल करण्याकरितां गोळा करून ते पैसे सरकारला खर्च न पडूं न देतां पाठविणें, व सरकारला योग्य दरानें कर्ज देणें वगैरे स्वरूपाचें असे. ह्या पेढीचें दुसरें काम म्हटलें म्हणजे व्यापारी पत कायम ठेऊन प्रचलित चलन आपल्या कह्यांत ठेवावयाचें हें होतें. ह्या पेढीची वीस वर्षांची मुदत संपल्यावर तिला पुनः एक सनद द्यावी अशी विनंति जेव्हां काँग्रेसमध्यें करण्यांत आली तेव्हां तिला फेडरॅलिस्टपक्षाचा व संस्थानांतील इतर पेढ्यांचा विरोध येऊन तिचा शेवट झाला.

१७९१ पासून १८११ सालापर्यंच्या संस्थानांतील पेढ्याः— ह्या काळांत अमेरिकेंतील संस्थानांत पुष्कळच पेढ्या स्थापन झाल्या. ह्यांपैकीं बहुतेक पेढ्या न्यु इंग्लंड, न्यु यॉर्क व पेनसिल्व्हेनिया येथेंच स्थापन झालेल्या होत्या. पण असें एकही संस्थान नव्हतें कीं, ज्यामध्यें एकही पेढी नव्हती. ज्या लोकांना 'बँक ऑफ् युनायटेड स्टेटस्' ह्या पेढीचा फायदा घेतां येत नव्हता त्यांना ह्या संस्थानांतील पेढ्यांचा बराच फायदा होत असे ह्या पेढ्यांचें इतकें प्रस्थ माजलें कीं, ज्या ज्या शहरांत वर सांगितलेल्या राष्ट्रीय पेढीच्या शाखा असत त्या शहरांतही ह्या स्थापन होऊन त्यांच्याशीं स्पर्धा करूं लागल्या. ह्या पेढया इतक्या झपाट्यानें वाढण्याचीं कारणें संस्थानांतील सरकारांची सक्रिय मदत व सट्टेबाजीच्या स्वरूपाचे व्यवहार करण्याकडे पेढयाचीं प्रवृत्ति हीं होत. ह्या पेढया

शेतकरी, कारखानदार व व्यापारी वगैरे लोकांना कायमचें भांडवल देत. वास्तविक पाहिलें तर असें भांडवल पुरविण्याची त्यांची लायकी नव्हती. हें भांडवल पुरविण्याकरितां ह्या पेढया नोटा काढूं लागल्या व नोटांना तारण दीर्घ काल मुदतीचे तारणरोखे (Investment securities) असत. हे तारणरोखे असे असत कीं, नुकत्याच सुरू केलेल्या किंवा होऊं घातलेल्या उद्योगधंद्याची खूब वाढ झाली व ते पुष्कळ दिवस टिकले तरच त्या तारणरोख्यांचे पैसे मिळावयाचे. नोटांबद्दल नाणें मागण्यास कोणी आला तर त्याला तें नाणें देतां यावें म्हणून ह्या पेढयांनीं कांहीं व्यवस्था करावयास हवी होती. पण तसें कांहीं एक न करतां दुरदूरच्या शहरांत नोटा सुरू करणें, जेथें लोकांना नोटा घेऊन येणं मुष्कील होईल, अशा ठिकाणीं आपलें ऑफीस ठेवणें, व कोणी नोटा आणून पैशाची मागणी केली असतांना तो देण्यांत अनेक अडथळे आणणें ह्या वाममार्गांचाच त्या अवलंब करूं लागल्या. जोंपर्यंत लोक पैसे मागावयाला येत नसत तोंपर्यंत ह्या पेढया सुरू करणारांची चांगली पोळी पिके. बरें, कोणी पैसे मागावयास आला तरी कांखा वर करावयाची त्यांची तयारी असे. अशा तऱ्हेची सुधारलेली भामटेगिरी ह्या पेढया करीत असत.

मॅडिसनची पेढीः--हॅमिल्टननें स्थापलेल्या पेढीनंतर दुसरी पेढी प्रेसिडेंट मॅडिसन ह्याच्या प्रोत्साहनानें स्थापित झाली. ही स्थापन होण्याचें कारण १८१२ सालच्या इंग्लंडशीं झालेल्या युद्धानंतर चलनपद्धतीमध्यें उत्पन्न झालेले घोंटाळे नाहींसे करणें हें होतें. प्रथम ह्या पेढीचें काम अव्यस्थितपणें चाललें होतें. पण १८१९ नंतर हा घोंटाळा नाहींसा होऊन पेढीची भरभराट होऊं लागली. हिला मिळालेली सनद ' बँक आफ् युनायटेड स्टेटस् ' ह्या पेढीला मिळालेल्या सनदेबरहुकूम होती. सरकारनें जो पैसा गोळा केला असेल किंवा जो सरकारच्या मालकीचा असेल तो पैसा ह्या पेढीजवळ किंवा तिच्या शाखांकडे ठेवावा अशी सवलत ह्या पेढीला मिळाली होती.

ही पेढी लवकरच राजकीय भांडणांत तिचा कांहीं एक अपराध नसतांना सांपडली व त्यामुळें तिचा अवतार संपला.

संस्थानांतील पेढयांची वाढ व त्यांचें वजनः—ह्या दुसऱ्या युनायटेड स्टेटस् बँकेच्या वेळेपासून यादवी युद्ध सुरू होण्याच्या वेळेपर्यंत

संस्थानांतील पेढयांची संख्या वाढतच होती; इतकेंच नव्हे तर प्रत्येक संस्थानांत त्यांचें अस्तित्व होतें. वर एकदां सांगण्यांत आलेंच आहे कीं, संस्थानांतील पेढयांचे व्यवहार लफंगी वृत्तीचे असत. पण ही स्थिति सुधारण्याचा नेटाचा प्रयत्न पेढया व सरकार आतां करूं लागलें व ह्या बाबतींत मॅसॅचुसेट्स् व न्यू यॉर्क ह्यांनीं पुढाकार घेतलेला होता. त्यावेळीं संस्थानांतील सरकारांनीं जे कायदे केले त्यांचें मुख्य धोरण असें होतें कीं, पेढ्यांनीं आपल्या भागीदारांकडून (Proprietors) आपले भाग विकले जात असतांना कांहीं तरी रोख रक्कम नाण्याच्या रूपानें घेतली पाहिजे. आजपर्यंतची वहिवाट अशी होती कीं, पेढ्यांच्या प्रोप्रायटर लोकांनीं आपल्या भागाच्या किंमतीबद्दल आपल्याजवळ असलेल्या नोटा द्याव्यात व आपल्याला जो नफा मिळेल त्यांतून व्याज द्यावें व अशा रीतीनें मुद्दल देण्याचा कधींही प्रसंग येऊं नये. ह्याचा असा परिणाम होई कीं, पेढ्यांजवळ सुरुवातीचे वेळीं एक पैही नसे व रोख पैशाकरितां त्यांना लोकांच्या ठेवींवर विसंबून रहावें लागे व त्या ठेवी तर प्रथम फारच थोड्या असत. अर्थातच पेढ्यांना आपले व्यवहार आपण काढलेल्या नोटांवर करावे लागत व त्या विनाकारण प्रचारांत येत.

ह्यानंतरच्या कायद्याचें दुसरें धोरण असें होतें कीं, पेढ्यांनीं अंथरूण पाहून पाय पसरले पाहिजेत, म्हणजे ज्या मानानें आपणाजवळ भांडवल जमलें असेल त्या मानानें त्यांनीं लोकांचें कर्ज काढलें पाहिजे. पेढ्यांचें सामान्य धोरण असें असावें कीं, जितकें भांडवल वसूल झालें असेल त्याच्या दुपटीहून जास्त कर्ज त्यांनीं अंगावर घेऊं नये. त्याचप्रमाणें आपण काढिलेल्या नोटांबद्दल जर नाणीं देतां आलीं नाहींत तर जितक्या नोटा काढिल्या असतील तितक्या नोटांवर शेंकडा २४ टक्के दरसाल पेढ्यांनीं सरकारास दिले पाहिजेत.

पण हा कायदा पेढ्यांनीं न पाळण्यास मुख्य अडचण अशी होती कीं, देशांत पुरेसें नाणें नसल्यामुळें देशांत लहान किंमतीच्या नोटा सुरू करणें भागच होतें; म्हणून सरकारालाही पेढ्यांना अशा लहान नोटा सुरू करण्यास परवानगी द्यावी लागली. पण ह्या सवलतीचा असा एक अनिष्ट परिणाम होऊं लागला कीं, जें नाणें कांहीं निमित्तानें देशांत आलें असतें व प्रचारांत राहिलें असतें तें आतां तसें राहीना; कारण ग्रेशॅमच्या नियमान्वयें कागदी भिकार नाणीं सोन्या चांदीच्या खऱ्या नाण्याला हांकून देऊं लागलीं व देशांत नोटांचा सुळसुळाट होऊन

त्यांची किंमत उतरूं लागली. ही स्थिति सुधारण्याकरितांच सफोक पेढीचा जन्म झाला.

ही सफोक पेढी काय होती हें सांगण्यापूर्वी एक गोष्ट सांगितली पाहिजे. ती ही कीं, पेढ्यांनीं आपल्या व्यवहारांत गुप्तपणा राखूं नये अशाविषयीं कायदे होऊं लागले. दर सहा महिन्यांनीं पेढीच्या व्यवहारांबद्दल एक रिपोर्ट संस्थानच्या गव्हर्नर इन् कौन्सिलकडे गेलाच पाहिजे, तो रिपोर्ट डायरेक्टर लोकांनीं शपथेवर लिहिला पाहिजे व त्यांनीं रिपोर्टमध्यें ठराविक मुद्यांवर माहिती पुरविली पाहिजे; तसेंच बँकेच्या व्यवहारांत डायरेक्टर लोकच जबाबदार आहेत व बँकेनें जर ठराविक मर्यादेच्याबाहेर कर्ज काढलें तर त्याबद्दल डायरेक्टर लोक वैयक्तिक दृष्ट्या जबाबदार आहेत अशा तऱ्हेचे हे कायदे होते. एकंदरींत ह्या कायद्यांचा असा परिणाम झाला कीं, पेढ्यांना व्यवस्थित वळण लागून त्यांचे व्यवहार शास्त्रशुद्ध पायावर होऊं लागले; लोकांचा पेढ्यांवर विश्वास जास्त प्रमाणांत बसूं लागला व उद्योगधंद्याची वाढ देशांत होऊं लागली.

सफोक पेढी-पद्धतः— १९ व्या शतकाच्या पूर्वार्धांत खेडेगांवांतील पेढयांनीं काढिलेल्या नोटा व्यापारी लोकांच्या दृष्टीनें त्याज्य ठरल्या गेल्या व शहरांतील पेढयांनीं काढिलेल्या नोटा सरस ठरून त्यांचाच स्वीकार लोक करूं लागले. ह्याचा परिणाम असा झाला कीं, खेड्यांतील पेढयांच्या नोटा परत पेढयांकडे येऊं लागल्या. ह्या नोटांवर बटवडाही फार पडूं लागला. तेव्हां ह्या नोटा विकून त्यापासून नफा मिळविण्याच्या हेतूनें बोस्टन येथें सफोक पेढी स्थापन झाली. ह्या पेढीनें अशी सूचना मांडली कीं, खेडयांतील पेढयांनीं जर पुरेसे पैसे दिले व आपल्या कायमच्या ठेवी आपल्याजवळ ठेवून दिल्या तर आपण ह्या नोटांबद्दल लोकांना पैसे देऊं. प्रथम प्रथम हें म्हणणें खेडयांतील पेढयांना फारसें रुचलें नाहीं; पण पुढें पुढें त्या सर्व पेढयांना ह्या सूचनेस आपली कबूली द्यावी लागली; कारण त्या पेढयांना असा अनुभव येऊं लागला कीं, स्वतः नोटांबद्दल पैसे परत देण्यापेक्षां बोस्टन येथें त्या पाठवून देणें हेंच जास्त फायदेशीर आहे; इतकेंच नव्हे तर ह्या सफोक पेढीमुळें आपल्या किंमत उतरलेल्या नोटा पुनः लोकांत मूळ किंमतीला प्रचलित होऊन आपली पत सर्वत्र वाढते. पुढें पुढें ह्या पेढीनें सर्व अमेरिकेंतील शहाजोग पेढयांच्या नोटा स्वीकारून त्यांची अदलाबदल करून हिशोब चुकता करण्याचें ठरविलें व दरवर्षी

क्रोडो रुपयांच्या किंमतीच्या नोटांची अदलाबदल होऊं लागली. ही पद्धत १८६५ सालापर्यंत टिकली व हिच्यानंतर राष्ट्रीय पेढीची पद्धत सुरू झाली. ह्या सफोक पद्धतीमुळें अमेरिकेंत व्यवस्था, शहाजोगपणा व जबाबदारी ह्या गोष्टींचें शिक्षण लोकांस मिळालें.

संरक्षणनिधि पद्धतिः—न्यूयॉर्क येथील पेढयांनीं पेढीच्या धंद्याच्या शाखांत दोन नवीन पद्धती सुरू करून भर घातलेली आहे. ह्या दोन पद्धती म्हणजे **संरक्षणनिधि** पद्धति व **फ्री बँक** पद्धति ह्या होत १९ साव्या शतकाच्या पूर्वार्धांत न्यू यार्कमध्यें पक्षभेदाचें फारच प्रस्थ माजलें होतें. संयुक्तता-वादी पक्षाचे (Federal) लोक प्रजासत्तावादी (Democrtic) लोकांच्या पेढयांना कधींही सनद देत नसत व प्रजासत्तावादी लोक संयुक्ततावादी पक्षाच्या लोकांनीं काढिलेल्या पेढया मंजूर करीत नसत. अशी अंदाधुंदी जेव्हां सुरू झाली तेव्हां कांहीं लोकांनीं ह्या पक्षांना धाब्यावर बसवून आपल्या पेढया स्थापन केल्या. पण त्या सनदेविरहित असल्यामुळें लवकरच बंद पाडण्यांत आल्या. पण अल्बनी येथील कायदेकानू करणाऱ्या सभेला लांच दिल्यावर त्या पुनः सुरू झाल्या. १८२८ सालीं ४० पेढया आपला व्यवहार चालवीत असून ह्यांपैकीं ३० पेढयांची मुदत भरत आली होती व त्यांनीं जंगजंग पछाडले तरी त्यांना पुनः सनदा मिळण्याची आशा नव्हती; कारण कायदेकानू करणाऱ्या सभेच्या मनांत ह्या पेढयांना सार्व-जनिक हिताच्या दृष्टीनें कांहीं निर्बंध घालणें इष्ट वाटलें अशा परिस्थितींत **फॉरमन** नांवाच्या एका गृहस्थानें तेथील सरकारला एक योजना सुचविली. ती अशी कीं, प्रत्येक पेढीनें दरवर्षीं ज्या पेढया बुडतील त्यांनीं केलेलें कर्ज फेडण्या-करितां निर्माण केलेल्या फंडास मदत म्हणून कांहीं तरी रक्कम द्यावी व ह्या फंडाची रक्कम ५ लाख डॉलरपर्यंत तरी जावी. ही सूचना सरकारास मान्य होऊन एक कायदा करण्यांत आला व त्या कायद्यान्वयें ज्या पेढीला सनद नवीन हवी असेल किंवा जुन्या सनदेची मुदत संपल्यामुळें नवीन सनद करून घ्यावयाची असेल, तिनें दर वर्षीं आपल्या भांडवलांतून शेंकडा एक टका 'पेढीफंडा'-करितां देत जावा व जितकें त्या पेढीचें भांडवल असेल त्याचे शेंकडा तीन टक्यांइतकी रक्कम होईपर्यंत हा वार्षिक कर त्या पेढीनें द्यावा. ह्या फंडाचा विनियोग बुडणाऱ्या पेढीनें केलेल्या कर्जांची (तिचें भांडवल वगळून) फेड करण्याकडेसच व्हावा. बुडणाऱ्या पेढीची मालमत्ता विकून आलेल्या पैशांतून

कर्ज फेडल्यावर जी रक्कम सरकारी कोर्टाच्या मतानें लोकांचें देणें म्हणून ठरेल ती रक्कम ह्या फंडांतून देण्यांत यावी व अशा रीतीनें फंडाची जितकी रक्कम कमी होईल ती फिरून पेढ्यांनीं भरून काढावी, व सरकारनें नेमलेल्या तीन कमिशनरांनीं दर वर्षी निदान तीन वेळां सर्व पेढयांची पाहणी करावी. हा कायदा पास करण्यांत सरकारचा हेतु असा होता कीं, एखादी पेढी जर बुडाली तर तिच्या कर्जाबद्दल प्रत्येक पेढीनें थोडेंबहुत प्रायश्चित सोसलें पाहिजे.

ही पद्धत अमलांत आल्यावर कांहीं पेढ्या १८३७ सालीं बुडाल्या. नंतर कायदेकौंसिलनें एक कायदा करून असें ठरविलें कीं, जितका फंड झाला असेल त्याच्या $\frac{2}{3}$ हून जास्त किंमतीच्या जर बुडालेल्या पेढ्यांच्या नोटा नसतील तर त्या नोटांबद्दल ह्या फंडांतून त्या घेऊन येणाऱ्या लोकांना डॉलर देण्यांत यावेत. असा कायदा झाल्यामुळें लोकांना पैसे मिळून त्या नोटांची किंमत उतरली नाहीं. १८४०-४२ सालीं पुनः अकरा पेढ्यांचीं दिवाळीं निघून त्या पेढयांच्या नोटा स्वीकारणारे लोक व ठेवीवाले ह्यांची एकदम मागणी होऊन फंडामध्यें असलेली रक्कम अपुरा पडली; तेव्हां १८४२ सालीं ह्यापुढें ह्या फंडाचा विनियोग लोकांना ठेवीचे पैसे देण्याच्या कामीं न करितां नोटांबद्दलच पैसे देण्याच्या कामीं करावा असें कायद्यानें ठरलें. पण हा कायदा उशीरा पास झाल्यामुळें त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं व फंडांतून लोकांना इतके डॉलर द्यावयाचे होते कीं, पुढें कित्येक वर्षेपर्यंत जरी हा फंड जमविण्यांत आला असता तरी तो अपुराच पडला असता. मध्यंतरीं सरकारचें पेढ्यासंबंधाचें धोरण अजीबात बदलून गेलें व ह्यापुढें कोठल्याही पेढीला विशेष सनद द्यावयाची नाहीं किंवा पूर्वी ती दिलेली असेल तर तिची मुदत वाढवावयाची नाहीं असें ठरलें; व ज्या अर्थी हा संरक्षणनिधि अशा सनदा असलेल्या पेढयांकरितांच होता त्याअर्थी ह्या धोरणानें निधी ठेवण्याची पद्धत नाहींशी होणार हें उघड होतें. ह्या फंडांतून लबाडीनें सुरू केलेल्या नोटांबद्दल नाणें व इतर जें कांहीं लोकांचें देणें होतें तें सर्व देऊन राहिलेली शिल्लक सरकारी खजिन्यांत ठेवण्यांत आली.

(२) ज्या पेढ्या बुडतील त्या पेढ्यांच्या नोटा जवळ ठेवणाऱ्या लोकांना इतरांपेक्षां अगोदर डॉलर मिळावयास हवे होते.

(३) ह्या निधीचा उपयोग नोटांबद्दल डॉलर देण्याच्या कामींच व्हावयास पाहिजे होता.

(४) एखाद्या पेढीचें दिवाळें निघाल्यावर ती नादारींत काढून तिची मालमत्ता विकून मग तिनें काढिलेल्या नोटांबद्दल डॉलर देण्याचा आरंभ करण्यापेक्षां जर तिचें दिवाळें निघण्याबरोबरच हे डॉलर देण्यांत आले असते तर त्या नोटांची किंमत उतरली नसती.

फ्री बँक किंवा रोखे अनामत ठेवण्याची पद्धतिः—१८३८सालापर्यंत **न्यू यॉर्क** संस्थानांत कोणालाही सनद काढल्याशिवाय पेढी काढतां येत नसे व संस्थानानें मुद्दाम कायदा केल्याशिवाय पेढ्यांना ही सनदही मिळणें शक्य नसे. ह्याचा परिणाम असा झाला कीं, कायदे करणाऱ्या सभेला लांचलुचपत दिल्याशिवाय नवीन पेढ्या काढणें अशक्य होऊन बसलें. लोकांची जेव्हां फारच ओरड सुरू झाली तेव्हां एक नवीन कायदा करण्यांत येऊन असें ठरलें कीं, एखाद्या व्यक्तीनें किंवा कांहीं व्यक्तींनीं मिळून सार्वजनिक रोखे, कर्जरोखे (Bonds) व गहाणखतें विकत घेऊन तीं आपण सुरू करणाऱ्या नोटांबद्दल तारण म्हणून जर ' कन्ट्रोलर ऑफ् दि स्टेट ' च्या ताब्यांत ठेवून दिलीं तर त्यांना पेढी काढण्याची परवानगी देण्यांत यावी. अशा पद्धतीनें सुरू केलेली एखादी पेढी जर बुडाली तर कन्ट्रोलरनें त्या पेढीनें ठेवलेले रोखे वगैरे विकून उत्पन्न होणाऱ्या पैशांतून नोटा घेऊन येणाऱ्या लोकांना पैसे देण्याची व्यवस्था करावी. स्वतः सरकारनें नोटांबद्दल पैसे देण्याची कोठलीही जबाबदारी घेऊं नये.

ही पद्धत सुरू झाल्यावर १८४० सालीं एक पेढी बुडाली व तिचे रोखे विकल्यावर एका डॉलराबद्दल (अदमासें २ रुपये ४ आणे ५ पै) ६६ सेंट (एक डॉलर=१०० सेंट) अशा प्रमाणांत पैसे वसूल झाले. पुनः १८३९ पासून १८४४ पर्यंत २६ पेढया बुडाल्यावर सरकारचे डोळे उघडून पूर्वींचा कायदा बदलण्यांत आला व अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें व न्यू यॉर्क संस्थान ह्यांनीं काढिलेले रोखेच नोटांबद्दल तारण म्हणून पेढयांनीं खरेदी करावे असा नियम करण्यांत आला. हा नियम करण्याचें असें कारण झालें कीं, पेढयांनीं विकत घेऊन ठेवलेलीं गहाणखतें, कर्जरोखे वगैरे विकण्याची ज्या वेळीं पाळी आली, त्या वेळीं पेढया बुडाल्यामुळें लोकांत गडबड उडाली असतांना ह्या रोख्यांची किंमत उतरूं लागली. कारण बऱ्याच पेढयांचे रोखे तितके खात्री पटविणारे नव्हते व त्यामुळें त्यांवरच अवलंबून राहणें सुरक्षित वाटेना. आजपर्यंत सरकारची अशी

समजूत होती कीं, पेढयांनीं काढिल्या जाणाऱ्या नोटांबद्दल तारण म्हणून कांहीं रोखे घेऊन ठेवलेले असले म्हणजे लोक कधींही त्यांबद्दल पैसे मागणार नाहींत व जरी यदाकदाचित् त्यांनीं ते मागितले तरी ते रोखे पूर्ण किंमतीला विकून वाटेल तेव्हां पैसे वसूल करतां येतील; पण ह्या कल्पना अनुभवानें चुकीच्या ठरल्या.

ह्या नियमाशिवाय इतरही कांहीं दुरुस्त्या ह्या कायद्यानें करण्यांत आल्या. उदाहरणार्थ, पेढीच्या भागीदारांनीं गुंतविलेल्या भांडवलाच्या व त्याशिवाय त्यांनीं घेतलेल्या भागांच्या किंमतीइतक्या कर्जाच्या रकमेबद्दल ते व्यक्तिशः जबाबदार आहेत. त्याचप्रमाणें पेढी नादारींत निघाली असतांना पेढीच्या नोटा घेऊन येणाऱ्या लोकांना अगोदर पैसे मिळावेत, ह्यापुढें कोठल्याही नव्या जुन्या पेढयांना आपला धंदा सुरू करण्यास किंवा आहे तो चालविण्यास नवीन सनदा मिळूं नयेत व लोकांनीं नोटा आणल्या असतांना त्यांना रोख नाणें मिळूं नये, असा कायदा कायदे करणाऱ्या सभेनें पास करूं नये अशी व्यवस्था करण्यांत आली.

आपण जर वर सांगितलेल्या न्यू यॉर्कमधील दोन प्रकारच्या पद्धतींची तुलना केली तर आपणांस असें दिसून येईल कीं,नोटा काढण्याच्या पद्धतींत जो लवचिक-पणा असावा लागतो, म्हणजे उद्योगधंद्यामध्यें निरनिराळ्या वेळीं नोटांची कमीजास्त लागणारी गरज त्या जास्त काढून किंवा कमी करून भागवावी लागते, त्या बाबतींत संरक्षणपद्धति हीच जास्त श्रेयस्कर होती. कारण ह्या लोकांना जास्त नोटा हव्यात म्हणून त्या सुरू करण्याकरितां ह्या पेढयांना जास्त भांडवल गुंतवून सराफबाजारांत जाऊन तारणरोखे विकत घेऊन कन्ट्रोलरकडे ठेवण्याची यातायात करण्याची जरूरी नसे. कारण जितक्या नोटा लोकांना हव्या असतील तेवढयाच व तत्काल त्यांना काढतां येत असत; पण फ्री बँक पद्धतीवर चालणाऱ्या पेढयांना प्रथम कन्ट्रोलरजवळ तारणरोखे ठेवून आपल्या नोटा विकत घ्याव्या लागत व मग तेवढयाच नोटा प्रचारांत आणतां येत असत. तेव्हां दोन्ही प्रकारच्या पेढयांना नोटा प्रचलित करण्याचे बाबतींत सारखेच अधिकार होते; पण संरक्षणपद्धतीवर चालणाऱ्या पेढयांना काडीचाही खर्च पडत नसे हें त्यांना फायदेशीर होतें. शिवाय फ्री बँक पद्धतीवर चालणाऱ्या पेढयांनीं काढिलेल्या नोटा जेव्हां त्यांचेकडे परत येत त्या वेळीं त्या नोटांवर व्याज येत नसल्यामुळें त्या नोटांत गुंतविलेलें भांडवल फुकट जाई. त्यामुळें ह्या पेढयांना लोकांना लागतील तेवढयाच नोटा काढाव्या

लागत व अडचणीची वेळ आली आणि नोटांवर काम भागवावें म्हणून ह्या पेढयांनीं जास्त नोटा काढण्याचें मनांत आणिलें तर तें त्यांना शक्य नव्हतें.

पण ही **फ्री** बँक पद्धति सम हक्कांच्या तत्त्वाशीं बरीच जुळती असल्यामुळें ह्या पद्धतीवर पेढ्या चालविल्या असतांना देशांत पैसा भरपूर उत्पन्न होईल अशी लोकांची कल्पना झाल्यामुळें ह्या पद्धतीचा प्रसार इतरत्र होऊं लागला व १६ संस्थानांनीं ती अमलांत आणली; पण ही पद्धति लवकरच अनिष्ट ठरली. कारण पेढयांना जे कर्जरोखे वैगेरे विकत घेण्याची सक्ति असे ते कर्जरोखे विश्वासार्ह नसल्यामुळें ते विकतांना त्यांची फारच कमी किंमत येऊं लागली. पुढें यादवीयुद्ध सुरू होऊन **नॅशनल बँक** नांवाचा कायदा पास करण्यांत आला व ह्यापूर्वीच्या सर्व पद्धतींना मूठमाती मिळाली.

नॅशनल बॅंकिंग पद्धतिः—ही राष्ट्रीय पेढीची पद्धति अमेरिकेंतल्या यादवी युद्धजन्य आर्थिक अडचणीमुळें जन्मास आलेली होती. यादवीयुद्ध सुरू झाल्यामुळें उत्तरेकडील व दक्षिणेकडील संस्थानें ह्यांच्यामध्यें असलेले व्यापारी व पेढीच्या व्यवहारांचे संबंध अजीबात तुटून गेले व बहुतेक संस्थानांतील लोकांना रोख नाणीं देण्याचें बंद झालें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, देशाची हुंडणावळीची पद्धत बरीच विस्कळीत झाली व चोहोंकडे नोटांचा सुळसुळाट झाला.

ह्या वेळीं संयुक्त सरकारच्या खजिन्याची फारच हलाखी झाली होती. लढाईमुळें खर्च अतोनात वाढला होता व दरवर्षी पडणारी तूट भरून काढून वाढत्या खर्चाची तोंडमिळवणी कशी करावी हा मोठाच प्रश्न सरकारपुढें येऊन पडला होता. ह्या अडचणींतून पार पडण्याकरितां १८६१ सालीं **चेस** नांवाच्या साहेबानें ह्या राष्ट्रीय पेढीपद्धतीची कल्पना काढली. ह्यानें आपल्या वार्षिक रिपोर्टमध्यें असें सुचविलें कीं, पेढ्यांनीं नोटांचा प्रसार करण्याचे वेळीं सरकारी रोखे विकत घेतलेच पाहिजेत व पुरेसें नाणें जवळ ठेवलें पाहिजे असा जर त्याना नियम घालून दिला तर सरकारी रोख्यांनां (Government Bonds) आपोआपच गिऱ्हाईक उत्पन्न होईल. **चेसची** कल्पना प्रथम सरकारास पसंत पडली नाहीं; पण दोन वेळां ती झिडकारल्यावर **कॉंग्रेसनें** १८६३ सालीं एक कायदा करून ती अमलांत आणली.

ह्या कायद्यान्वयें असें ठरलें कीं, पेढ्या स्थापन होतांना त्यांचें कमींत कमी भांडवल ५० हजार डॉलरचें असावें, ह्यांपैकीं निदान एकतृतियांश रक्कम सरकारी रोखे विकत घेण्यांत गुंतविली जावी, हे रोखे कंट्रोलर ऑफ करन्सीकडे ठेवल्यावर पेढ्यांनीं ३० कोटि डॉलर किंमतीच्या नोटा काढाव्या व त्या अमेरिकेंतील संस्थानें व इतर मुलूख ह्यांमध्यें लोकसंख्येच्या मानानें १५ कोटींपर्यंत व पेढीचें भांडवल व तिची सांपत्तिक स्थिति ह्यांकडे लक्ष देऊन बाकीच्या १५ कोटींपर्यंत प्रचलित केल्या जाव्या. प्रत्येक पेढीनें जास्तींत जास्त नोटा किती काढावयाच्या हें त्या पेढीच्या वसूल झालेल्या भांडवलावर अवलंबून रहावें. एकदां नोटा प्रचलित केल्यावर त्या सरकारला द्यावयाचा कर म्हणून आल्या असतांना केव्हांही त्यांच्याकडून त्या स्वीकारल्या जाव्या. मात्र आयात मालावर जकात वसूल करतांना सरकारनें त्या स्वीकारूं नयेत त्याचप्रमाण राष्ट्रीय कर्जावरील व्याजाव्यतिरिक्त इतर सरकारी देण्याकरितां म्हणून त्या स्वीकारल्या जाव्यात व सर्व पेढ्यांनीं त्या नोटा दर्शनी किंमतीपेक्षां जास्त किंमतीला कधींही घेऊं नयेत. लोक नाणें मागण्याकरितां बँकेनें काढिलेल्या नोटा तिजकडे आणूं लागल्यावर त्यांना तिनें नाणें दिलेंच पाहिजे. तसें ती पेढी न करील तर तिनें ठेवलेले सरकारी रोखे जप्त व्हावेत व त्यांबद्दल पैसे ट्रेझररनें नोटा आणणाऱ्या लोकांस द्यावे.

ह्या पेढ्यांना नेहमींच्या व्यापारी पेढीप्रमाणें आपले व्यवहार करण्याची परवानगी होती; पण त्यांना सरकारनें कांहीं अटीही घालून दिल्या होत्या. त्या अटी म्हणजे त्यांनीं जरूरीपेक्षां जास्त जमीन कधींही खरेदी करूं नये. त्यांनीं एखाद्या माणसास कर्जानें रक्कम दिल्यावर त्या रकमेचे मोबदला म्हणून जर ऋणकोची जमीन ताब्यांत आली तर हरकत नाहीं; पण मुद्दाम जमीन गहाण ठेवून किंवा ती खरेदी करून तिजवर धंदा करण्याची तिला परवानगी नव्हती. माणसाला किंवा संस्थेला कर्ज देतांना किंवा तिचें अगर त्याचें जें भांडवल वसूल झालें असेल, त्याच्या एकदशांशाहून जास्त (ह्या रकमेंत लोकांच्या हुंड्या स्वीकारल्यामुळें त्याला किंवा त्या संस्थेला जें देणें असेल तें समाविष्ट होत नाहीं. तें हिशोबांत घ्यावयाचें असलें तर त्याच्या किंवा त्या संस्थेच्या भांडवलाच्या $\frac{1}{५}$ हून जास्त) रक्कम कधींही पेढीनें कर्ज म्हणून त्या संस्थेस किंवा माणसास देऊं नये. तसेंच स्वतःच्या भांडवलाच्या तारणावरही तिनें कधींही कर्ज देऊं नये व स्वतः स्वतःच्या वसूल

झालेल्या भांडवलापेक्षां जास्त रक्कम कधींही कर्ज काढूं नये. त्याचप्रमाणें प्रत्येक पेढीनें स्वतः ठेवून घेतलेल्या ठेवींच्या, ज्यांच्याबद्दल नाणें दिलेलें नाहीं त्या नोटांच्या, किंमतीच्या शेंकडा २५ टक्के इतकी रक्कम रोकड ठेवली पाहिजे व कंट्रोलरला तिमाही रिपोर्ट सादर केले पाहिजेत व त्यानें नेमलेल्या माणसांना आपल्या कामाची तपासणी करूं दिली पाहिजे.

ह्या राष्ट्रीय पद्धतीला संस्थानांतील पेढ्यांनीं अर्थात्‌च जोराचा विरोध केला व सर्व दृष्टींनीं विचार करतां हा विरोध स्वाभाविकच होता. प्रथम प्रथम त्या ह्या कायद्याला अनुकूल होईनात; पण जेव्हां १८६५ सालीं संस्थानांतील पेढ्यांनीं काढिलेल्या नोटांवर शेंकडा १० टक्के कर दिला पाहिजे असा कायदा करण्यांत आला, तेव्हां ह्या पेढ्यांना त्या कायद्याला संमति देणें भागच पडलें. कारण ह्या राष्ट्रीय पेढीपद्धतीप्रमाणें आपला व्यवहार न करावा तर नोटांचा प्रचार करण्याचेंच सोडून दिलें पाहिजे, अशी स्थिति प्राप्त झाली.

ह्या नवीन राष्ट्रीय पेढीचे नियम संस्थानांतील पेढ्यांच्याच नियमांतून घेतले होते. ह्याचा असा परिणाम झाला कीं, संस्थानांतील पेढ्या व इतर मुलुखांतील पेढ्या ह्यांच्यामध्यें एकसूत्रीपणा आला. शिवाय ह्या पद्धतीनें कांहीं नवीन कल्पना प्रचारांत आल्या. त्या कल्पना म्हणजे ज्या नोटा काढण्यांत येतील त्या नोटांबद्दल सरकारची तत्कालिक जबाबदारी व प्रत्येक पेढीनें दुसऱ्या पेढीनें काढिलेल्या नोटा स्वीकारणें ह्या होत. वास्तविक सरकारची नोटा वटविण्याची तात्कालिक जबाबदारी ही कल्पना कांहीं नवीन नव्हती. कारण जितक्या नोटा काढिल्या असतील, तितक्यांना तारण म्हणजे सरकारी खजिन्यांत पेढ्यांनीं विकत घेऊन ठेवलेले अमेरिकेच्या सरकारचे बॉंड होत. असा जोंपर्यंत नियम आहे तोंपर्यंत ही जबाबदारी सरकारावर आपोआपच येते. कारण पेढ्यांजवळ लोकांनीं नोटांबद्दल मागणी केली असतां जर रोकडीची तूट पडली तर त्यांना सरकारनें पैसे पुरविलेच पाहिजेत.

अमेरिकेमधल्या वर्तमानकालीन राष्ट्रीय पेढ्याः— ट्रेझरी डिपार्टमेंटचे जे अधिकारी असतात त्यांच्यापैकीं मुख्य अधिकाऱ्याला कंट्रोलर ऑफ धि करन्सी अशी संज्ञा असून त्याच्याकडे राष्ट्रीय पेढ्यांसंबंधीं सर्व गोष्टी विचारार्थ येतात. राष्ट्रीय पेढी कोणाही पांचांहून कमी नसलेल्या लोकांना स्थापन करतां येते. मात्र ही पेढी स्थापन करण्यास कंट्रोलरकडे अर्ज करून त्याजकडून

त्या लोकांनीं सनद मिळविली पाहिजे. ही सनद एकदां मिळाल्यावर ती वीस वर्षेंपर्यंत चालते व कंट्रोलरच्या परवानगीनें ती पुनः मिळवितां येते. प्रत्येक पेढीनें आपल्या कामाचा आढावा काढून दर पांच वर्षांनीं कंट्रोलरकडे त्याचा रिपोर्ट पाठविलाच पाहिजे.

प्रत्येक राष्ट्रीय पेढीचें भांडवल २५ हजार डॉलरपेक्षां केव्हांही कमी असतां कामा नये. ह्याहून जास्त भांडवल असणें हें ज्या ठिकाणीं ती पेढी स्थापन झाली असेल त्या ठिकाणच्या लोकसंख्येवर अवलंबून राहील. ज्या शहरची लोकसंख्या ५० हजार असेल त्या शहरांत स्थापन होणाऱ्या राष्ट्रीय पेढीचें भांडवल निदान दोन लाख डॉलर पाहिजे. ह्या पेढ्यांना हुंड्या कटमिटीनें कापणें, कर्ज काढणें वगैरे नेहमींचे पेढीचे व्यवहार करण्याची परवानगी असून शिवाय ' राष्ट्रीय पेढ्यांच्या नोटा ' काढण्याचाही अधिकार आहे. ह्या नोटा कायदेशीर चलन म्हणून कोणी मानीत नाहींत. तथापि आयात मालावरील कर म्हणून नव्हे तर इतर कर देतांना कोणी जर ह्या नोटा दिल्या तर सरकार त्या स्वीकारतें. तसेंच एका राष्ट्रीय पेढीनें काढलेल्या नोटा दुसऱ्या राष्ट्रीय पेढीनें मूळ किंमतीलाच स्वीकारल्या पाहिजेत व आपल्या नोटांबद्दल कोणी नाणें मागितलें तर सरकारी नाणें त्या नोटांबद्दल त्या पेढीनें दिलेंच पाहिजे अशी कायद्याची सक्ति आहे. प्रत्येक राष्ट्रीय पेढीनें लोकांत खेळत असलेल्या नोटांबद्दल त्यांच्या किंमतीच्या शेंकडा ५ टक्के सरकारी खजिन्यांत आणून ठेवले पाहिजेत. ह्या रकमेबद्दल त्या पेढीस व्याज मिळत नाहीं; पण पेढीला ठेवाव्या लागणाऱ्या एकंदर गंगाजळीचा हा भाग समजला जातो व त्याचा विनियोग १ हजार डॉलर किंवा त्याच्या पटीच्या (Multiple) किंमतीच्या नोटांबद्दल नाणीं देण्याकडे होत असतो.

प्रत्येक पेढीला सरकारी नाण्यांत मध्यें कांहीं ठराविक गंगाजळी ठेवावी लागते. कॉंग्रेसनें ठरवून दिलेल्या शहरांत जर एखादी राष्ट्रीय पेढी असेल तर तिच्याजवळ असलेल्या ठेवी शेंकडा २५ इतकी रकम त्या पेढीला गंगाजळी म्हणून बाजूला काढून ठेवावी लागते; पण तीच पेढी जर ह्या ठराविक शहरांत नसून इतरत्र असेल तर तिला आपल्या ठेवींच्या शेंकडा १५ टक्के इतकीच रकम गंगाजळी म्हणून ठेवावी लागते.ज्या वेळीं राष्ट्रीय पेढीची प्राणप्रतिष्ठापना होते तेव्हां तिनें आपल्या भांडवलाच्या $\frac{१}{४}$ इतकी रकम अमेरिकेचे रोखे खरेदी करण्यांत खर्च केली

पाहिजे व हे रोखे अमेरिकेच्या सरकारच्या खजिन्यांत ठेवले पाहिजेत. असा नियम केल्यानें आतां राष्ट्रीय पेढ्यांच्या नोटांना बिलकूल धोका राहिलेला नाहीं. कारण एखादी पेढी जर बुडाली किंवा तिनें आपला व्यवहार जर आटपतां घेतला तर तिला आपल्याजवळ असलेली रोकड सरकारी खजिन्यांत आणून आपले सरकारी रोखे परत घेतां येतात किंवा सरकारचे पेढीचे रोखे विकून टाकून लोकांना त्यांनीं नोटा परत आणून दिल्यावर पैसे देऊन टाकतां येतात. सरकारनें पेढ्यांच्या नोटांसंबंधानें ठरविलेलें धोरण इंग्लंडमधील सरकारच्या बँक ऑफ इंग्लंडशीं असलेल्या धोरणासारखेंच आहे हें वरील विवेचनावरून वाचकांस कळलेंच असेल. कारण नोटा सुरक्षित असाव्या म्हणून पेढीच्या मालमत्तेचा कांहीं भाग तिनें तेवढयाच कामाकरितां अलग काढून ठेवावा हें तत्त्व दोन्हीकडे कायमच आहे. फरक इतकाच कीं, बँक ऑफ इंग्लंड हा भाग बहुतेक रोकडींत ठेवते व फारच थोडा भाग रोख्यांत ठेवते. अमेरिकेंतील राष्ट्रीय पेढया हा भाग बहुतेक रोख्यांत ठेवतात. ह्या रोख्यांवर त्या पेढयांना व्याज मिळतें व ह्या रोख्यांच्या तारणावर तितक्याच किंमतीच्या नोटा प्रचलित करण्याचा त्यांना अधिकार मिळतो. ह्या नोटांची किंमत जर उतरली तर कंट्रोलरला पेढयांकडून रोख्यांची किंमत पूर्ण करण्याकरितां जास्त रकम मागतां येते. ह्या पेढयांना आपल्या नोटा सुरू करण्याबद्दल सारा १॥ टक्केच कर द्यावा लागतो; पण संस्थानांतील पेढयांना दहा टक्के कर द्यावा लागतो. असा फरक ठेवण्याचें कारण संस्थानांतील पेढयांनीं राष्ट्रीय पेढीपद्धत उचलावी अशी सरकारची इच्छा होय.

ह्या राष्ट्रीय पेढीपद्धतीचा फायदा असा आहे कीं, अमेरिकेंत पेढयांचें एकीकरण सुलभ होऊं लागलें आहे. सर्वच राष्ट्रीय पेढयांच्या नोटा सारख्याच किंमतीच्या व सारख्याच स्वरूपाच्या असतात. कारण त्या नोटा अमेरिकेच्या सरकारनें ठराविक पद्धतीवर काढिलेल्या असतात. ह्या नोटांना सरकारी रोख्यांचा आश्रय असल्यामुळें त्यांची किंमत उतरत नाहीं व ह्या नोटा जवळ जवळ सरकारी नोटाच बनलेल्या आहेत. प्रत्येक पेढीनें किती नोटा काढाव्या हें जरी कायद्यानें ठरलें आहे तरी सगळ्या पेढया घेतल्या तर त्या सर्वांनीं मिळून किती किंमतीच्या नोटा काढाव्या ह्याबद्दल कांहीं मर्यादा सरकारनें घालून दिलेली नाहीं.

स्टेट बँक:—अमेरिकेमध्यें संस्थानांतील पेढया राष्ट्रीय पेढयांना प्रतिस्पर्धी म्हणून आपला व्यवहार करीत असतात; पण त्यांना चलनी नोटांवर कर

द्यावा लागत असल्यामुळें त्यांना त्या काढितां येत नाहींत. आपण जर दोघांत तुलना केली तर आपणांस असें दिसून येईल कीं, दोघांत बरेच महत्त्वाचे फरक आहेत.

वर सांगितल्याप्रमाणें संस्थांनीं पेढ्यांना १० टक्के कर द्यावा लागतो; पण ती अडचण ह्या राष्ट्रीय पेढ्यांना नाहीं. ह्या राष्ट्रीय पेढ्यांना शेंकडा २५ किंवा १५ टक्के रोकड शिल्लक म्हणून ठेवावी लागते; पण संस्थानांतील पेढ्यांना इतकी शिल्लक ठेवण्याची जरूर नाहीं. राष्ट्रीय पेढीचें भांडवल निदान २५ हजार डालर पाहिजे; पण संस्थानी पेढ्यांच्या भांडवलांची किमान मर्यादा ठरलेली नाहीं; राष्ट्रीय पेढीला स्थावर मिळकतीवर कर्ज काढण्याची जशी परवानगी नाहीं तसा नियम ह्या दुसऱ्या पेढ्यांना नाहीं. राष्ट्रीय पेढ्यांवर कंट्रोलर आफ् करन्सी ह्या अधिकाऱ्याची पहाणी असते; पण ह्या दुसऱ्या पेढ्यांवर एकच तऱ्हेची पहाणी नसते.

असो; ह्या संस्थानीं पेढ्यांची शिल्लक जरी रोकड नसली तरी ज्या संस्थानांत त्या असतात त्या संस्थानी सरकारच्या किंवा अमेरिकन सरकारच्या रोख्यांत ती असली तरी चालतें. ह्या वर सांगितलेल्या दोन प्रकारच्या पेढ्यांशिवाय ट्रस्ट कंपन्याही सवत म्हणून असतात. ह्यांचा जन्म प्रथम मृतमाणसांची मिळकत, अज्ञान मुलाची मिळकत, गहाण मिळकत ह्यांची व्यवस्था पाहण्याकरितां होता; पण ह्या कंपन्या आतां पेढीचा व्यवहार करून लोकांच्या वैयक्तिक ठेवी स्वीकारून पुनः त्या ठेवी ह्या राष्ट्रीय पेढ्यांकडे ठेवतात. अशा रीतीनें ठेवी ठेवणाऱ्यांकडून रकमा घेऊन दुय्यम तारणावर कर्ज काढून, हुंड्या विकत घेऊन पेढीचा व्यवहार ह्या कंपन्या करीत असतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आपल्याजवळ ठेवलेल्या रोकडीच्या शिलकीवर त्यांना व्याज मिळतें; पण मौज अशी कीं, त्यांच्याजवळ रोकड शिल्लक अशी फारच थोडी असते. अर्थात हा त्यांचा व्यवहार त्यांना व लोकांना घातक असाच झालेला आहे. म्हणून न्यू यॉर्कमध्यें एक कायदा होऊन ह्या कंपन्यांना एक ठराविक रकमेची रोकड ठेवावी लागते. हल्लीं अमेरिकेंत ज्या ठिकाणीं ह्या ट्रस्ट कंपन्यांची स्पर्धा फारच जोरांत आहे त्या ठिकाणीं तेथील पेढ्यांनीं, संस्थानांतील कायद्यांच्या मदतीनें आपल्या भागीदारांपैकीं कांहींच्या ट्रस्ट कंपन्या पुस्ती म्हणून काढिलेल्या आहेत; मात्र ह्या कंपन्यांची व्यवस्था व

अधिकारी निराळे असतात. ह्या ट्रस्ट कंपन्यांमुळें पहिल्या ट्रस्ट कंपन्यांचें महत्व कमी झालेलें आहे.

फेडरल रिझर्व पेढ्या व त्या निर्माण होण्याचीं कारणें.— आतांपर्यंत अमेरिकेंतील पेढ्यांच्या इतिहासाचें आपण पर्यालोचन केलें; त्यावरून आपणास असें दिसून येईल कीं, त्या पेढ्यांमध्यें बरेच दोष होते. उदाहरणार्थ, ह्या पेढ्यांचें कार्य अलग नसून त्यामुळें पेढ्यांमध्यें चुरस उत्पन्न झालेली असे. पेढ्या संस्थानांतल्या असोत, राष्ट्रीय असोत किंवा ट्रस्ट असोत, त्या सर्वांचीं कामें एकाच स्वरूपाचीं असल्यामुळें आपल्याकडे जास्त ठेवी याव्यात व आपलें गिऱ्हाईक जास्त वाढावें, म्हणून प्रत्येक पेढी अहमहमिकेनें आपला व्याजाचा दर वाढवी व आपणांस जाचक कायदे कसे मोडावे ह्याचा विचार करी. तसेंच कर्ज कोणास व किती द्यावें ह्याबद्दलही कांहीं कायदे असत व अनुभवानें उत्तम ठरलेलीं कांहीं तत्त्वें असत; पण अहमहमिकेच्या भरांत ह्या पेढ्या हीं तत्त्वें धाब्यावर बसवूं लागल्या. एखाद्या धंदेवाईक किंवा व्यापारी माणसाला कर्ज देतांना त्याला त्याच्या सांपत्तिक स्थितीवरून किती रकमेपर्यंत कर्ज देतां येईल ह्याची मर्यादा त्या पेढ्या त्या माणसांशीं ठरवीत असत व त्या मर्यादेच्याआंत तो धंदेवाला मनुष्य वारंवार आपल्या गरजेप्रमाणें त्या पेढ्यांपासून कर्ज काढीत असे. हें कर्ज काढतांना तो गृहस्थ सहा महिनेपर्यंत मुदत असलेली प्रॉमिसरी नोट त्या पेढ्यांना देई; पण आपण काढलेलें कर्ज अगोदर ठरलेल्या मर्यादेंत असल्यामुळें तें सहा महिन्यांच्या मुदतींत आपणास देण्यास पेढ्या भाग पाडतील अशी कल्पनाही त्या धंदेवाल्या माणसाला शिवत नसे व त्यामुळें त्या कर्जाचा विनियोग आपला धंदा वाढविण्यांत तो गृहस्थ खुशाल करीत असे. अशी सवलत मिळत असल्यामुळें पुष्कळ धंदेवालीं माणसें ह्या पेढ्यांकडे धांव घेत व एकंदरींत उद्योगधंद्यांची वाढ देशांत मोठ्या प्रमाणांत होई. पण ह्या सवलती-मुळें पेढ्या आपला जीव धोक्यांत न कळतच घालीत असत. पेढ्यांचा असा सर्वसामान्य व शिष्टसंमत नियम आहे कीं, त्यांनीं आपली रकम व्यापारांत खेळती राहील अशा तऱ्हेनें कर्ज देऊन गुंतवावी. ती रकम इमारती वगैरे बांधण्यास किंवा यंत्रें वगैरे घेण्यांत गुंतविली जाण्याकरितां त्यांनीं कधींही देऊं नये. हें तत्त्व त्या पेढ्या विसरूं लागल्या व आयत्या वेळीं त्यांना लोकांकडून पैसा परत न मिळाल्यामुळें त्या डबघाईस आल्या.

पण पेढ्या डबघाईस येण्यास एवढेंच कांहीं कारण नव्हतें. यादवी युद्धाचे वेळीं राष्ट्रीय पेढ्या स्थापन होत असतांना प्रत्येक पेढीनें सरकारी रोखे विकत घेऊन ते कंट्रोलरकडे ठेवले पाहिजेत असा एक कायदा पास झाल्याचें मागें सांगण्यांत आलेलें आहे. त्या कायद्यांत अनुक्रमानें बरेच फेरफार झाले; त्यापैकीं मुख्य फेरफार असा होता कीं, सरकारजवळ जर कांहीं कारणानें जास्त पैसे झाले तर त्यानें ते ह्या राष्ट्रीय पेढ्यांजवळ ठेवावे; मात्र त्या पेढ्यांनीं तारण म्हणून तेवढ्या रकमेचे सरकारी रोखे विकत घेतलेच पाहिजेत. आतां सरकारजवळ जास्त रकम सांचते ह्याचा अर्थ पेढ्यांजवळची शिल्लक कमी झालेली आहे असा होतो. कारण सरकार जो पैसा लोकांकडे मागणार तो पैसा तरी लोक पेढ्यांपासून घेऊनच त्यास देणार हें उघड आहे.

बरें, सरकारजवळ फाजील सांचलेली रकम शिल्लक कमी झालेल्या पेढ्यांकडेच परत येईल म्हणावें, तर तेंही खरें नसे. कारण ज्या पेढ्यांना सरकारी रोखे घेणें शक्य असे त्याच पेढ्यांकडे ही रकम सरकार देणार हें उघड होतें. पेढ्यांनीं आपण सरकारी रोखे विकत घेण्याकरितां रकम बाजूला काढून ठेवावी असा संकल्प केला तर सरकारजवळ यंदां रकम जास्त राहीलच अशी काय खात्री होती? तेव्हां सर्वच अनिश्चित असल्यामुळें पेढ्यांच्या व्यवहारांना थोडेंबहुत सट्ट्याचें स्वरूप येऊं लागलें.

ह्या वर सांगितलेल्या दोषांशिवाय अमेरिकेच्या पेढ्यांच्या व्यवहारांत इतरही कांहीं दोष होते. ह्या देशांत प्रत्येक राष्ट्रीय पेढीनें, ती जर कांहीं मुख्य ठराविक शहरांत नसेल तर, आपल्याजवळ असलेल्या ठेवींच्या $\frac{3}{20}$ इतकी रकम व ती मुख्य शहरांत असेल तर $\frac{1}{4}$ इतकी रकम बाजूला काढून ठेवलीच पाहिजे असा कायदा आहे. ह्या गंगाजळी रकमेपर्यंत प्रत्येक पेढी श्रेष्ठ प्रतीचे रोखे विकत घेऊन ठेवीत असे. संस्थानांतील पेढ्या ह्याच पद्धतीनें आपला व्यवहार करीत असत. ही गंगाजळी ठेव अडकून राहिल्यामुळें तिचा उपयोग उद्योगधंदा, शेतकी, व्यापार ह्यांच्या वृद्धीचे कामीं बिलकूल होत नसे; इतकेंच नव्हे तर आणीबाणीचे वेळींही तिचा फारसा उपयोग होत नसे; कारण लोकांची मागणी पुरी करीत असतांना ह्या गंगाजळीची कायद्यानें ठरलेली किमान मर्यादा झाली कीं, पेढ्यांना आपला हात आंखडता घ्यावा लागत असे.

पण ह्याहीपेक्षां महत्त्वाचा दोष म्हटला म्हणजे अमेरिकेच्या चलनपद्धतींत लवचीकपणा बिलकूल नसल्यामुळें पेढ्यांची मोठी फजिती उडते. अमेरिकेंत हल्लीं चलनाचे प्रकार म्हटले म्हणजे सोन्याचादीचीं नाणीं, आणि सरकारी व राष्ट्रीय पेढ्यांच्या नोटा ह्या होत. ह्या सर्वांत दिसून येणारा दोष म्हणजे व्यापाराच्या गरजा व सोयीप्रमाणें हे चलनाचे प्रकार कमीजास्त होत नसत. पेढ्यांनीं आपणाजवळ असलेल्या ठेवीचा कांहीं भाग गंगाजळी म्हणून ठेवलाच पाहिजे अशी पेढ्यांना सक्ती आहे व पेढ्यांकडे होणाऱ्या लोकांच्या पैशाच्या मागण्या नेहमीं अनिश्चित स्वरूपाच्या असत व ऋतुमानाप्रमाणें नेहमीं बदलत असत. ह्याचा परिणाम असा होई कीं, लोकांची मागणी पुरी करण्याकरितां किती रक्कम बाजूला काढून ठेवावी हें ठरविणें पेढ्यांना कठीण जाऊं लागलें व एखादे वेळीं पैसे कमी असल्यामुळें लोकांना नाहीं म्हणण्याची पाळी आली म्हणजे त्यांचीं दिवाळीं निघण्याची भीति असे. ज्या ज्या वेळीं व्यापारी आणीबाणीचे वेळीं पेढयांना बराच ताण पडे, त्या त्या वेळीं त्यांना असा अनुभव आला कीं, पेढयांपेढयांमध्यें बिलकूल सहकारिता नाहीं. प्रत्येक पेढी आपला बचाव करण्याकडेच आपलें लक्ष पुरवी व एकजुटीनें व्यापारी संकटांस तोंड देणें हें आपलें कर्तव्य आहे ह्याची त्यांना जाणीवही नसे. त्याचप्रमाणें १९१३ सालापूर्वी सरकारनें आपला पैसा पेढयांजवळ न ठेवतां स्वतंत्रपणें ठेवण्याची चाल असल्यामुळें कांहीं कांहीं प्रसंगीं पेढयांकडे एकदम पैशाची मागणी होई व ती मागणी त्यांना पुरवावी लागल्यामुळें तेवढा पैसा कांहीं वेळ अदृश्य होई. त्यामुळें पेढयांना आपला नित्य व्यवहार करणें अवघड जाई.

शेवटला दोष म्हटला म्हणजे अमेरिकेंतल्या पेढयांना परराष्ट्रांत आपल्या शाखा स्थापून आपल्या देशाचा परराष्ट्रीय व्यापार वाढविण्यास संधीच नव्हती; कारण अशा प्रकारच्या पेढया स्थापन करण्यास लागणारीं अनुकूल साधनें त्यांचेजवळ नव्हतीं.

फेडरल रिझर्व्ह नांवाचा कायदाः—हे सर्व दोष टाळण्याकरितां काँग्रेसनें १९१३ सालीं ' फेडरल रिझर्व ' नांवाचा एक कायदा केला. ह्या कायद्यानें असें ठरलें कीं, फेडरल रिझर्व्ह बँका स्थापन करण्यांत याव्या. ह्या पेढयांना असें नांव मिळण्याचें कारण त्या राष्ट्रीय पेढयांची गंगाजळी (Reserve)

आपणांजवळ ठेवितात हें होय. ह्यांची कमालीची मर्यादा १२ असावी; व किमान मर्यादा ८ असावी; व खजिना, शेतकी खातें व चलनी खातें ह्या, सेक्रेटरी जीं शहरें ठरवितील त्या शहरांत त्या पेढ्या स्थापन व्हाव्यात. अलास्का संस्थान वगळून बाकी सर्व संयुक्त संस्थानांची जिल्ह्यामध्यें अशी विभागणी व्हावी कीं, प्रत्येक जिल्ह्यांत फेडरल रिझर्व पेढी असलेलें एकेक शहर असावें व जितक्या पेढ्या असतील तितकेच जिल्हे असावेत. ह्या जिल्ह्यांत ज्या राष्ट्रीय पेढ्या असतील त्यांनीं ह्या फेडरल रिझर्व्ह पेढीला लागणारें भांडवल पुरविलेंच पाहिजे व प्रत्येक राष्ट्रीय पेढीनें आपलें भांडवल व जवळ असलेली जास्त शिल्लक ह्यांच्या शेंकडा ६ इतकी रक्कम ह्या भांडवलाकरितां दिली पाहिजे. ह्या जिल्ह्यांत ज्या संस्थानांतील पेढ्या किंवा ट्रस्ट कंपन्या असतील त्यांनाही त्याची इच्छा असेल तर ह्या भांडवलांत राष्ट्रीय पेढ्या जितकी रक्कम देतात तितकीच रक्कम देऊन भर घालण्याची परवानगी असावी व ह्या सर्व पेढ्यांना ' सभासद पेढ्या ' असें नांव द्यावें.

ह्या फेडरल पेढ्यांवर नजर ठेवण्याकरितां एक फेडरल रिझर्व्ह बोर्ड निर्माण करण्यांत यावें व त्या बोर्डांत सेक्रेटरी आफ् धि ट्रेझरी, कंट्रोलर आफ् धि करन्सी (हुद्याच्या नात्यानें) व प्रेसिडेंट आफ् युनायटेड स्टेट्स ह्यानें १० वर्षांकरितां निवडलेले पांच लोक इतकी मंडळी असावीत. ह्या निवडलेल्या पांच लोकांपैकीं निदान दोन लोक तरी पेढीशास्त्र किंवा जमाबंदी शास्त्र ह्यांत निपूण असावेत. ह्या बोर्डाचें काम फेडरल रिझर्व्ह बँकांवर पाहणी करणें, नोटा काढणें, कटमितीचा दर ठरविणें वगैरे बाबतींत पेढ्यांवर नियंत्रण ठेवणें हें असावें. प्रत्येक फेडरल रिझर्व्ह बँकेचें एक बोर्ड असावें व त्या बोर्डांत नऊ सभासद असावेत. ह्यां नवांपैकीं सहा सभासद ' सभासद पेढ्यांनीं निवडले असावेत व बाकीचे तीन फेडरल रिझर्व्ह बोर्डनें निवडलेले असावेत ह्या तिघांपैकीं एक फेडरल रिझर्व्ह एजंट असावा व त्यानें बोर्डाच्या चेअरमनचें काम करावें व दुसरा त्याच्या हाताखालीं असावा व त्यांच्या गैरहजेरींत त्यानें काम करावें. ह्या बोर्डाचें काम राष्ट्रीय पेढ्यांच्या डायरेक्टरांच्या कामाप्रमाणेंच असावें. अशा प्रकारचा हा कायदा होता. हा कायदा पास केल्यानें अमेरिकेंतील पेढ्यांना मध्यवर्ती पेढी नसूनही तिच्यापासून होणारे सर्व फायदे अनायासे मिळाले आहेत. ह्या कायद्याचा विशेष असा आहे कीं, एकाच वेळीं सरकारी पहाणी व सरकारी

तावा आणि लोकांची पेढीची व्यवस्था ह्यांचा सुंदर मिलाफ झालेला आपणांस दिसून येतो. कोणास कर्ज किती द्यावें ह्याबद्दलची व्यवस्था लोकांचे हातांत आहे व ह्या पेढ्यांवर अमेरिकेच्या प्रेसिडेंटनें नेमलेल्या फेडरल रिझर्व्ह बोर्डची मात्र पहाणी आहे.

फेडरल रिझर्व्ह कायद्यासंबंधानें सामान्य चर्चा व त्या कायद्याची अमलबजावणीः—'फेडरल रिझर्व्ह' कायद्यानें ज्या पेढ्या स्थापन केल्या आहेत त्या पेढ्या व युरोपमधील मध्यवर्ती पेढ्या ह्यांमध्यें बराच फरक आहे. मध्यवर्ती पेढ्यांवर सरकारचा तावा फारसा नसतो. त्याचप्रमाणें ह्या पेढ्यांप्रमाणें जरी फेडरल रिझर्व्ह कायद्यानें स्थापलेल्या पेढयांची द्रव्य उभारण्याचीं साधनें व त्यांचे अधिकार हे मोठ्या प्रमाणांत असले तरी दोघांमधला फरक असा आहे कीं, दुसऱ्या वर्गाच्या पेढ्यांना हे अधिकार व हीं साधनें सरकारी कायद्यानें प्राप्त होतात व पहिल्या वर्गांतील पेढयांना हे हळूहळू प्राप्त होत असतात. अमेरिकेंतल्या रिझर्व्ह पेढयांचा हा विशेष आहे कीं, देशामध्यें अगोदरच पेढयांची वाढ मोठ्या प्रमाणांत झालेली होती व मागाहून ह्या रिझर्व्ह पेढयांची स्थापना झालेली आहे. अर्थातच ह्या पेढया नवीन असल्यामुळें त्यांना सरकारी कायद्याची मदत घेऊन जास्त अधिकार द्यावे लागले.

रिझर्व्ह पेढयांची छाप जर देशांत पडावयास पाहिजे तर अगोदरपासून स्थापन झालेल्या पेढयांची अनुकूलता त्यांना असावयास पाहिजे हें उघड आहे. त्याचप्रमाणें ह्या पेढ्यांना लागणारें भांडवलही भरपूर हवें असल्यामुळें एक तर हें भांडवल सरकारनें पुरवावें आणि ह्या नवीन पेढया व जुन्या पेढया ह्यांच्यामध्यें चुरस उत्पन्न करावी; किंवा जुन्या पेढयांना आपल्या विश्वासांत घेऊन त्यांच्याकडून रिझर्व्ह पेढ्यांना लागणारें भांडवल पुरवावें. ह्या दोन मार्गांपैकीं सरकारनें दुसरा मार्ग पसंत केला आणि पूर्वीपासून चालत आलेल्या पेढयांना खुषीच्या सक्तीनें, तर कधीं कधीं उघड धमकी देऊन त्यांना 'सभासद पेढया' बनवून त्यांच्याकडून रिझर्व्ह पेढयांना लागणारें भांडवल पुरविलें. अशा रीतीनें सरकारनें देशांतील पेढयांची अनुकुलता ह्या नवीन पेढयांकरितां मिळविली.

पण फेडरल रिझर्व्ह कायदा सुरू करतांना खरी व्यावहारिक अडचण निराळीच होती. सर्व देशाची ८ किंवा १२ भागांत विभागणी करून त्या

विभागाचें एक मुख्य शहर ठरवावयाचें व तेथें एक रिझर्व्ह पेढी स्थापन करावयाची. हें काम कांहीं सोपें नव्हतें. शेवटीं बराच विचार करून सरकारनें बोस्टन, न्यु यॉर्क, फिलाडेल्फिआ, क्लिव्हलंड, रिचमंड, अटलांटा, शिकॅगो, सेंट, लुइ, मिनिआपोलिस, कन्सास सिटी, डल्लास, व सॅन् फ्रान्सिस्को हीं शहरें निश्चित करून ह्या ठिकाणीं रिझर्व्ह पेढया स्थापन केल्या.

आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, सरकारनें सर्व देशांची विभागणी करितांना आठ किंवा १२ हीच संख्या कां पसंत केली? ह्या नवीन रिझर्व्ह पेढयांची संख्या जर तीन किंवा चार असती तर सरकारला त्यांवर नजर ठेऊन थोड्या खर्चांत काम भागवितां आलें असतें. ह्या विधानांत थोडा सत्यांश आहे ही गोष्ट खरी; पण रिझर्व्ह पेढया जास्त प्रमाणांत असणेंच अमेरिकेस जास्त श्रेयस्कर होतें. कारण रिझर्व्ह पेढयांचा फायदा देशांतील सर्वच पेढयांना मिळणें इष्ट होतें. तेव्हां अमेरिकेसारख्या युरोपखंडाएवढया देशाला १२ पेढया म्हणजे फार आहेत अशांतला प्रकार नाहीं. पुढें मागें ही संख्या कमीजास्त करावीशी वाटली तर कॉंग्रेसच्या सल्ल्यानें ती करितां येण्यासारखी आहे.

असो; वर सांगितल्याप्रमाणें सर्व देशांची १२ विभागांत वांटणी केल्यावर प्रत्येक विभागांत जेवढया पेढया रिझर्व्ह पेढीचे सभासद होण्यास कबूल होत्या त्यांचें नांव मतदारांचे यादींत घालण्याकरितां त्यांचे तीन सारखे वर्ग निर्माण करण्यांत आले. ज्यांचें भांडवल व शिल्लक खूबच होती त्यांना पहिल्या वर्गांत समविष्ट करण्यांत आलें. ज्या पेढयांची शिल्लक व भांडवल मध्यम प्रतीचें होतें त्यांना दुसऱ्या वर्गांत दाखल केलें व बाकीच्या पेढयांना तिसऱ्या वर्गांत घालण्यांत आलें. ह्या तिन्ही वर्गांच्या पेढयांना त्या विभागांतील रिझर्व्ह पेढीकरितां प्रत्येक दोन डायरेक्टर नेमून देण्याचा अधिकार मिळाला. अशा तऱ्हेनें सर्व लहान थोर पेढयांना आपले प्रतिनिधी पाठविण्याची व्यवस्था ह्या कायद्यामुळें झालेली आहे.

रिझर्व्ह पेढयांचे डायरेक्टर निवडून दिल्यावर पुढचें काम म्हणजे फेडरल रिझर्व्ह बोर्डची नेमणूक हें होय. १९१४ सालीं हें बोर्ड निर्माण झाल्यावर त्या बोर्डाला रिझर्व्ह पेढयांचे ३ "गव्हर्नमेंट डायरेक्टर" निवडावे लागले. पहिले जे दोन डायरेक्टर निवडलेले होते त्यांपैकीं एक पेढीवाला व दुसरा व्यापार,

शेतकी किंवा दुसरा एखादा उद्योगधंदा ह्यांत निवडलेला असा असे. ह्या नवीन डायरेक्टरांचें काम मुख्यत्वेंकरून रिझर्व्ह पेढयांची व्यवस्था पाहणें हें होय. रिझर्व्ह पेढीच्या कामाची जबाबदारी मुख्यत्वेंकरून गव्हर्नर ऊर्फ पेढीचा मॅनेजर ह्याच्यावर पडते. पण पेढीचे सर्व व्यवहार तीन डायरेक्टरांपैकीं एकाचे मार्फत–ह्यालाच अध्यक्ष अशी संज्ञा आहे–होत असतात. हल्लीं अमेरिकेमध्यें रिझर्व्ह पेढयांचा एवढा बोलबाला होण्याचें कारण हे तीन डायरेक्टर व गव्हर्नर ह्या अधिकाऱ्यांची दक्षतापूर्वक पहाणी हेंच होय.

फेडरल रिझर्व्ह पेढयांना सल्लामसलत देण्याकरितां एक फेडरल ॲडव्हिजरी कौन्सिल नांवाचें मंडळ असतें. ह्या मंडळांत प्रत्येक फेडरल रिझर्व्ह डायरेक्टरांकडून एक एक सभासद नेमून दिलेला असतो. ह्या मंडळाचें काम नुसतें सल्ला देण्याचें असल्यामुळें व त्यांच्या बैठकी वर्षांतून फक्त चार वेळांच व्हावयाच्या असल्यामुळें ह्या मंडळाचें फारसें महत्व राहिलेलें नाहीं.

फेडरल रिझर्व्ह कायदा पास करतेवेळीं सरकारच्यापुढें असा एक प्रश्न होता कीं, दोन टक्क्याचे सरकारी रोखे व हे रोखे तारण असलेल्या राष्ट्रीय पेढयांच्या नोटा ह्यांची वाट कशी लावावयाची? हा प्रश्न सोडविण्यास सरकारास फार पंचाईत पडली. अखेरीस राष्ट्रीय पेढयांचें नुकसान न होतां त्यांच्या नोटा हळू हळू प्रचारांतून काढून घ्याव्या व त्याच वेळीं रिझर्व्ह पेढयांच्या गळ्यांतही ह्या लाखो डॉलर किंमतीच्या पण आतां निर्माल्यवत झालेल्या सरकारी रोख्यांचें लोंढणें पडूं नये म्हणून कांहीं व्यवस्था करण्यांत आली.

फेडरल रिझर्व्ह बोर्डाला हल्लीं ह्या रिझर्व्ह पेढयांना " सभासद " पेढयापासून दरवर्षी निदान अडीच कोटी डॉलर किंमतीचे सरकारी रोखे विकत घेण्यास भाग पाडतां येतें. देशांतील सर्व पेढयांचें असलेलें भांडवल व शिल्लक (Surplus) ह्यांच्या प्रत्येक पेढीच्या वांट्यांस आलेल्या भागाच्या किंमतीचे रोखे तिनें घेतलेच पाहिजेत असा कायदा आहे. ह्या रिझर्व्ह पेढयांना आपण सुरू केलेल्या नोटांबद्दल तारण म्हणून हे सरकारी तारणरोखे उपयोगांत आणण्याची परवानगी मिळाली; मात्र राष्ट्रीय पेढया ज्या अटींवर आपल्या नोटा सुरू करीत असत त्याच अटींवर (जितक्या किंमतीचें भांडवल असेल तितक्या किंमतीच्या नोटा असाव्या ही अट वगळून) ह्या रिझर्व्ह पेढ्यांनीं

आपल्या नोटा सुरू केलेल्या असाव्यात; तसेंच हे रोखे प्रचारांतून काढून घेण्याचें ठरल्यास त्या रोख्यांपैकीं निम्मे रोखे तीन टक्के व्याजाचे समजावे व बाकीचे निम्मे रोखे तीन टक्के व्याजाच्या खजिन्यावर काढिलेल्या नोटा (Treasury notes) मानल्या जाव्यात; मात्र ह्या नोटा व रोखे दरवर्षी तीन वर्षांपर्यंत पुनः पुनः सुरू केलेले असले पाहिजेत असें कायद्यानें ठरलें. आतां हे तीन टक्के व्याजाचे रोखे व नोटा जर सराफबाजारांत विकण्यासारख्या असल्या तर ह्या रोख्यांपैकीं बऱ्याच रोख्यांबद्दल सरकारास पैसे द्यावे लागतील; ह्याच्या उलट लोक पेढ्यांच्या नोटांबद्दल जर केव्हांही साशंक नसतील तर ह्या पेढयांजवळ असलेली नगदी रोकड अर्थातच वाढत जाईल व त्यामुळें फेडरल रिझर्व्ह पेढयांना लोकांमध्यें नोटा किती प्रचलित कराव्या ह्याचा अंदाज सहज करतां येईल.

फेडरल रिझर्व्ह कायद्याप्रमाणें काढण्यांत आलेल्या नोटांसंबंधानें प्रचलित असलेले सरकारी निर्बंध बरेच गुंतागुंतीचे आहेत; पण त्या सर्व निर्बंधांचें सामान्य धोरण एवढेंच कीं, त्या नोटा फाजील प्रमाणांत काढण्यांत येऊं नयेत आणि त्याचबरोबर त्या लोकांत सहज प्रचलित होऊन पेढयांनाही आपले व्यवहार रोख नाण्याशिवाय करतां यावेत. ह्या नोटांचा विशेष असा आहे कीं, त्यांबद्दल नाणें देण्याची जबाबदारी सरकार व रिझर्व्ह फेडरल पेढया ह्या दोघांवर पडते. ही जबाबदारी सरकारनें घेऊं नये असें पुष्कळ पेढीवाल्यांचें म्हणणें होतें; कारण त्यांच्या मतानें अशी जबाबदारी स्वीकारल्यानें सरकारला जास्त नोटा काढण्याचा मोह होईल व ज्याअर्थी अंशतः ह्या नोटांबद्दल नाणें देण्याची जबाबदारी ह्या रिझर्व्ह पेढयांवर येऊन पडते त्याअर्थी सरकारच्या चुकीचें प्रायश्चित ह्या पेढयांना विनाकरण भोगावें लागणार. पण पेढीवाल्यांची ही भीति निष्कारण होती; कारण सरकारी खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरितां नोटा काढण्याचा सरकारास बिलकूल अधिकार नाहीं. शिवाय नोटांबद्दलची ही जबाबदारी सरकारनें अंशतः घ्यावी असा लोकांचाच आग्रह होता म्हणून त्याला ती स्वीकारणें भागच पडलें.

नवीन नोटा किती काढावयाच्या हें सर्वस्वीं फेडरल रिझर्व्ह बोर्डाकडे आहे; पण ह्या प्रश्नाचा 'सूत उवाच' रिझर्व्ह पेढयांच्या डायरेक्टर लोकांकडूनच व्हावा लागतो. एखाद्या रिझर्व्ह पेढीलाच नवीन नोटा काढून प्रचलित करा-

व्यांशा वाटल्या तर तिनें डायरेक्टरांपैकीं एकाच्या-फेडरल रिझर्व्ह एजंटाच्या-मार्फत फेडरल बोर्डाकडे अर्ज करावा लागतो. व तो अर्ज फेंटाळणें किंवा अर्धवट किंवा पूर्णपणें स्वीकारणें हें सर्वस्वीं त्या बोर्डावर अवलंबून असतें.

ज्या ज्या वेळीं रिझर्व्ह बँकेला नोटा प्रचलित करावयाच्या असतील त्या त्या वेळीं अमेरिकेच्या सरकारच्या खाजिन्यांत शेंकडा पांच टक्के सोनें व स्वतः-जवळील ३५ टक्के मिळून ४० टक्के सोनें गंगाजळी म्हणून तिनें फेडरल रिझर्व्ह एजंटजवळ काढून ठेवावें व त्याशिवाय त्याच्याजवळ जितक्या किंमतीच्या नोटा सुरू केलेल्या असतील तितक्या किंमतीच्या सभासद पेढयाकरितां मनोतीनें पैसे कापून वटविलेल्या वचनचिठ्या, हुंड्या वगैरे (Commercial loans)* दुय्यम तारण म्हणून ठेवल्या पाहिजेत अशी कायद्याची सक्ती होती. पुढें १९१६ सालीं व्यापारी हुंड्या (Bills of Exchange)-त्या जर खुल्या हुंडीबाजारांत खरेदी केल्या असतील तर-दुय्यम तारण म्हणून स्वीकारण्यांत याव्यात अशी सवलत देण्यांत आली. त्यामुळें फेडरल रिझर्व्ह नोटा सभासद-पेढयांकरितां वटविल्या जाणाऱ्या हुंड्यांच्या किंमतीइतक्याच असाव्या असा निर्बंध आपोआपच नाहींसा झाला. प्रत्यक्ष प्रचारांत असलेल्या नोटा ह्या रिझर्व्ह पेढयांनीं तारण म्हणून जवळ ठेवलेल्या हुंड्या (Commercial loans) इतक्या किंमतीच्या आतां राहिल्या नाहींत. आपण सुरू केलेल्या नोटांकरितां ह्या हुंड्या रिझर्व्ह एजंटाकडे ठेवून दिल्यावर कोठल्याही रिझर्व्ह पेढीला त्या हुंड्या त्या एजंटाकडून परत घेतां येतात व त्या प्रचलित केलेल्या नोटांच्या किंमती-इतकें सोनें त्याच्याजवळ ठेवून नोटांबद्दल नाणें देण्याच्या जबाबदारींतून तिला सहज मुक्त होतां येतें. असा द्राविडी प्राणायाम करून रिझर्व्ह पेढयांनीं फेडरल रिझर्व्ह कायदा पास झाल्यापासून दोन वर्षांचे अवधींत वीस कोट डॉलर किंम-

* व्यापारी कर्ज (Commercial loans) ह्याची व्याख्या फेडरल रिझर्व्ह कायद्यांत अशी केली आहे:—ज्या वचनचिठ्या (Promissory notes), हुंड्या, अदलाबदल करतां येणाऱ्या (Bills of Exchange.) व मुदतीच्या हुंड्या, शेतकी, उद्योगधंदा, व्यापार ह्यांसारख्या धंद्यांमुळें काढिलेल्या असतात किंवा ज्या विकल्यावर त्यांचे पैसे अशाच कामाकरितां खर्च केले असतात किंवा करावयाचे असतात त्यांना व्यापारी कर्ज म्हणावें.

तीच्या नोटा प्रचलित केल्या होत्या व ह्या नोटा वर सांगितलेल्या हुंडयांच्या (Commercial loans) किंमतीपेक्षां जास्त किंमतीच्या असत. बहुतेक नोटांबद्दल रिझर्व्ह एजंटजवळ सोनें ठेवलेलें असें व त्यामुळें त्या निर्भय असत. बँक ऑफ् इंग्लंडमधील नोटा काढण्याच्या खात्यांत (Issue Department) ठेवलेल्या सोन्याप्रमाणें ह्या सोन्याचा संबंध अर्थातच रिझर्व्ह पेढयांनीं सराफीखात्यांत राखून ठेवलेल्या सोन्याशीं बिलकूल नसे. तथापि ज्या वेळीं ह्या रिझर्व्ह पेढयांजवळ शिल्लक असलेल्या (Outstanding) नोटांच्या किंमतीइतक्या हुंड्या (Commercial loans) असतील त्या वेळीं हें सोनें आपल्या सराफीखात्यांत आणून ठेवण्यास त्यांना हरकत नसे. हें सोनें रिझर्व्ह एजंटपासून आणण्याची सोपी युक्ती म्हणजे ह्या शिल्लक राहिलेल्या नोटा त्यांच्याकडे नेऊन देणें व त्यांच्या किंमतीइतकें सोनें परत घेणें ही होय. ह्या युक्तीचा असा परिणाम होई कीं, ज्या प्रचारांत असलेल्या नोटांबद्दल तारण म्हणून पूर्वी सोनें ठेऊन दिलेलें असे, त्या नोटांना आतां ह्या हुंड्या (Commercial loans) तारण म्हणून ठेवल्या जात. हा सर्व गुंतागुंतीचा मार्ग सोडून १९१७ सालीं एक कायदा करून नवीन सोपा मार्ग अवलंबिण्यांत आला आणि जितकें सोनें असेल (ह्या सोन्यामध्यें रिझर्व्ह एजंटजवळ गंगाजळी म्हणून ठेवलेल्या सोन्याचाही अंतर्भाव व्हावा) तितक्या किंमतीच्या फेडरल नोटा काढण्यांत याव्या असें ठरलें. ह्याचा असा परिणाम झाला कीं, रिझर्व्ह पेढयांवर नोटा म्हणजे लोकांच्या ठेवी समजून त्यांबद्दल त्यांनीं मागणी केली असतांना नाणें किंवा सोनें देण्याची जबाबदारी येऊन पडली. हल्लीं कायद्यानें नोटांच्या किंमतीचें शेंकडा ४० हें सोन्याचें प्रमाण गंगाजळी ठेव म्हणून ठरलेलें आहे. एकंदरींत हा नवीन कायदा पेढयांस फायदेशीर झालेला आहे. कारण आतां आपल्या सोयींप्रमाणें सोन्याची मर्यादा संभाळून त्यांना नोटा काढणें सुलभ झालें आहे.

फेडरल रिझर्व्ह पेढ्यांचें प्रधान कर्तव्यः--ह्या फेडरल रिझर्व्ह पेढया बँक ऑफ इंग्लंडप्रमाणें पेढयांच्या गुरुस्थानीं आहेत. वर सांगितल्याप्रमाणें त्यांना लागणारें भांडवल राष्ट्रीय पेढयांनींच पुरविलें आहे; म्हणून त्याच पेढया ह्या पेढयांचे भागीदार (स्टॉक-होल्डर) असतात आणि ह्या पेढयांचे देण्याघेण्याचे व्यवहार मुख्यतः त्या राष्ट्रीय पेढयांशीं होत असतात. ह्या रिव्हर्व पेढयांचें मुख्य

काम म्हटलें म्हणजे वर सांगितलेलीं ' व्यापारी कर्जें ' (ह्यांची लागू होण्याची मुदत तीन महिने असली पाहिजे) व ज्या कर्जाबद्दल तारण अमेरिकेच्या सरकारचे बाँड व नोटा असतात, अशीं कर्जें आपल्या सभासद झालेल्या पेढ्यांकरितां मनोतीनें पैसे कापून पुनः वटविणें हें होय. व्यापारी कर्ज म्हणजे काय ह्याची व्याख्या वर आलेलीच आहे. हें कर्ज हुंड्याच होत व त्या व्यापाऱ्यांनीं आपला माल दुसऱ्या व्यापाऱ्यांकडे पाठविल्यावर काढलेल्या असतात व त्या हुंड्यांचे पैसे तावडतोब मिळावे म्हणून पेढ्यांकडे मनोतीनें पैसे कापून वटविण्याकरितां आलेल्या असतात. ज्या वेळीं खुद्द पेढ्यांनाच पैशाची फार जरूर असते तेव्हां ह्या एकदां वटविलेल्या हुंड्या त्या लागू होण्याचे अगोदरच पुनः त्या पेढ्या वटवीत असतात. ही पद्धत अमेरिकेनें युरोप खंडांतील राष्ट्रांपासूनच उचलली आहे; पण रिझर्व्ह कायद्यानें रिझर्व्ह पेढ्यांनीं ह्या हुंड्या व्यापारी कामाकरितांच, जरूर लागली तर आपल्या सभासद पेढ्यांकरितां पुनः वटवाव्या असें ठरविलें आहे. त्यामुळें एखादी पेढी कांहीं कारणानें डबघाईस आली तर तिला आर्थिक मदत ह्या रिझर्व्ह पेढ्यांकडून वर सांगितलेल्या हुंड्या पुनः वटवून करतां येणार नाहीं.

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, रिझर्व्ह कायद्यानें घालून दिलेला हा निर्बंध फार शहाणपणाचा आहे. कारण व्यापारांत ज्या घडामोडी होत असतात त्यांकरिता काढलेलें कर्ज चटकन् वसूल करतां येतें; म्हणून जेवढ्या रकमेपर्यंत ह्या हुंड्या काढिलेल्या असतात तेवढ्या रकमेपर्यंतच ह्या हुंड्या पुनः वटविण्यास हरकत नाहीं. वस्तुतः ह्या विधानांत फारसा अर्थ आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणीबाणीचा प्रसंग आला असतांना कोठलेंही कर्ज, मग तें व्यापारी कामाकरितां काढिलेलें असो, वा नसो, चटकन् वसूल करणें कठिणच जातें. असो. एकंदरींत विचार केला असतांना कायद्यानें घालून दिलेला हा निर्बंध अमेरिकेला फायदेशीरच झाला आहे. कारण आपणांला हवें तेव्हां ह्या रिझर्व्ह पेढ्यांकडून कर्ज मिळूं शकेल असा व्यापारीवर्गाला विश्वास उत्पन्न झालेला आहे.

फेडरल रिझर्व्ह पेढ्यांचीं किरकोळ कामें:—आतांपर्यंत ह्या रिझर्व्ह पेढ्यांच्या मुख्य कामाचा विचार केला. ह्याशिवाय इतर कामेंहा ह्या पेढ्या करीत असतात. उदाहरणार्थ, सेक्रेटरी ऑफ ट्रेझरीच्या मर्जीप्रमाणें संयुक्त सरकाराकरितां पैसे सांठवून ठेवणें व खर्च करणें, सभासद पेढ्यांकरितां हुंडीवाल्यांच्या हुंड्या एकमेकांना देऊन पैशाचा हिशेब चुकता करणें, हीं कामें ह्या पेढ्या करीत

असतात. ह्या पेढ्यांना आपल्या जिल्ह्यांत किंवा विभागांत शाखा काढितां येतात व व्यापारी हुंड्या विकणें, विकत घेणें व गोळा करणें हीं कामें करण्याकरितां आपल्या अडत्या स्थापन करतां येतात. तसेंच संयुक्त सरकारचे बॉंड, निर-निराळ्या संस्थानांनीं काढिलेल्या नोटा व म्युनिसिपालिट्यांनीं काढलेल्या सहा महिने मुदतीच्या नोटा विकणें व विकत घेणें, हें एक काम ह्या पेढ्या करीत असतात. पण हें काम जरी ह्या पेढ्या करीत असल्या तरी त्यामुळें देशांतल्या सराफबाजारावर त्यांना आपला ताबा ठेवतां येत नाहीं. तथापि ह्या पेढ्या व्यापारी कामकाजामुळें उत्पन्न होणाऱ्या अदलाबद-लीच्या हुंड्यांचा व्यापार करीत असल्यामुळें त्यांना पुढेंमागें बरेंच कार्यक्षेत्र वाढ-वितां येण्यासारखें आहे; पण हें साध्य होण्यास अमेरिकेंत मुख्य अडचण ही आहे कीं, त्या देशांत व्यापारी हुंड्याच फारशा काढल्या जात नाहींत. ज्या व्यापारी लोकांना पेढ्यांपासून कर्ज हवें असतें ते लोक आपल्या नांवाची किंवा फार झालें तर ज्या व्यापाऱ्यांना त्यांनीं माल विकला असेल त्यांची व आपली सही असलेली प्रॉमिसरी नोट लिहून त्या पेढ्यांकडून तें कर्ज घेत असतात. तेव्हां फेडरल रिझर्व्ह कायदा पास करणाऱ्यांची इच्छा लोकांनीं प्रॉमिसरी नोटांपेक्षां व्यापारी हुंड्या जरी जास्त पसंत कराव्या अशी असली व त्या हुंड्यांकरितां जरी जास्त सवलतीचा कटमितीचा दर ठरविला असला तरी लोकांनीं हुंड्या काढ-ण्याची पद्धत सर्रास सुरू केल्याशिवाय रिझर्व्ह पेढ्यांचें कार्यक्षेत्र वाढणार नाहीं हें उघड आहे.

सिंहावलोकनः—आतांपर्यंत फेडरल रिझर्व्ह पेढ्यांचें जें आपण विवे-चन केलें त्याचें आतां सिंहावलोकन करूं. ह्या नवीन तऱ्हेच्या पेढ्यांच्या पद्ध-तीच्या मुळाशीं पत वाढविण्याकरितां लागणारी प्रबळ सत्ता कोठें तरी असली पाहिजे हें धोरण आहे. ह्या सत्तेचा दुरुपयोग न होतां तिच्यापासून शक्य तितके फायदे व्हावेत हें जर साध्य व्हावयाचें असेल तर ह्या रिझर्व्ह पेढ्यांची व्यवस्था चोख व शास्त्रशुद्ध असली पाहिजे हें उघड आहे. ह्या पद्धतींत रिझर्व्ह पेढ्यांच्या डायरे-क्टरांचें मंडळ व फेडरल रिझर्व्ह मंडळ ह्यांना पृथक् पृथक् कामें सोंपवून दिलीं असल्यामुळें फार उत्कृष्ट सोय झालेली आहे. रिझर्व्ह पेढ्यांच्या डायरेक्टरांकडे कोणाला किती व कसें कर्ज द्यावें व कटमितीचा दर काय असावा, ह्यांसारखीं पेढीचीं नित्यांतलीं कामें सोंपविलीं असतात व हीं कामें जर त्या डायरेक्टर

लोकांनीं दक्षतेनें केलीं तर फेडरल रिझर्व्ह बोर्डाला फारशी लुडबुड करावयास सांपडणार नाहीं. कारण ह्या बोर्डाकडे रिझर्व्ह पेढ्यांवर नजर ठेवण्याचेंच काम आहे. तेव्हां ह्या दोन बोर्डांत जर सलोखा व धोरणाची एकवाक्यता असेल तरच ही फेडरल रिझर्व्ह पद्धत देशास फायदेशीर होईल. हा कायदा पास झाल्यापासून ही नवीन पद्धत बरीच यशस्वी झाली आहे ह्यांत शंका नाहीं आणि ह्याचें कारण हिचीं मूलतत्त्वें दोषाई नाहींत व ह्या रिझर्व्ह पेढ्यांची व्यवस्था ज्यांच्याकडे आहे ते लोक पेढीशास्त्रांत निपुण आहेत हें होय असें आम्हांस वाटतें. ह्या रिझर्व्ह पेढयांचें महत्त्व जरी नेहमींच्या शांततेच्या वेळीं फारसें दिसून येत नाहीं, तरी अशा वेळींसुद्धां देशांतल्या लहान लहान पेढयांना त्यांची मदत चांगलीच होते; पण ज्या वेळीं देशांत व्यापारधंदा फारच जोरांत चालतो व नोटा काढणें पेढयांस जरूरीचें असतें त्या वेळीं ह्या रिझर्व्ह पेढया आपल्या उदाहरणानें इतर पेढयांना नेमस्तपणाचें उदाहरण घालून देत असतात. आणीबाणीचे वेळीं ह्या पेढयांचा देशांतील पेढयांस फारच उपयोग होत असतो. कारण त्या वेळीं त्यांना भरपूर पैसे पुरविणें व सर्व पेढयांमध्यें एकी उत्पन्न करून त्यांना एक ठराविक धोरण आंखून त्याप्रमाणें वागण्यास सांगणें ह्या गोष्टी ह्या पेढयाच करूं जाणे.

अशा तऱ्हेचा हा फेडरल रिझर्व्ह नांवाचा कायदा आहे. ह्या कायद्यानें अमेरिकेस कोणकोणते फायदे झालेले आहेत ते आपण आतां पाहूं.

फेडरल रिझर्व्ह पेढीच्या कायद्यानें झालेले फेरफारः—फेडरल रिझर्व्ह पेढीला व्यापारी हुंडी पुनः वटविण्याची सवलत दिल्यानें असा फायदा झाला आहे कीं, अमेरिकेंत ह्या हुंड्यांकरितां एक राजरोस व्यापारी पेठच उत्पन्न झाली आहे. ज्याअर्थीं ह्या हुंड्या घेऊन गेलें असतांना सभासदपेढयांना फेडरल रिझर्व्ह पेढीकडे त्यांबद्दल पैसे मिळविण्याची खातरी असते त्याअर्थीं ह्या सभासद पेढया आपल्या व्यापारी गिऱ्हाइकांकडून नेहमीं त्यांनीं काढिलेल्या हुंड्या विकत घेत असतात व अशा रीतीनें व्यापाराला आपोआपच उत्तेजन मिळत असतें. कारण ह्या हुंड्या काढल्यानें व्यापारी लोकांना गिऱ्हाइकांचे हातांत माल पडण्याचे पूर्वींच पैसे मिळतात व त्यांची चांगली सोय होते.

ह्या पेढयांना नोटा काढण्याची परवानगी मिळाल्यामुळें अमेरिकेंतल्या चलनपद्धतीमध्यें लवचिकपणाही आलेला आहे. ह्या नोटा व्यापारी हुंड्यांच्या

आधारावरच काढावयाच्या असतात; ट्रेझरी बिलासारख्या तारणावर नव्हे व त्यांची गरज संपल्यावर त्यांबद्दल नाणीं हवीं असतील तर तावडतोब त्या परत आणून दिल्या पाहिजेत. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, व्यापारी गरजेप्रमाणें त्या कमीजास्त होत असतात व त्यांचा चलनी नाण्याप्रमाणें उपयोग होत असतो.

ह्या कायद्यानें राष्ट्रीय पेढ्यांनीं करावयाचीं कामें व संस्थानी पेढ्यांनीं करावयाचीं कामें ह्यांत होत असलेला झगडा नाहींसा केला आहे. राष्ट्रीय पेढ्यांना स्थावर मिळकतीच्या तारणावर कर्ज देण्यास व कांहीं दस्तऐवज बजावण्याची परवानगी मिळाल्यामुळें व संस्थानी पेढ्यांना व ट्रस्ट संस्थांनाही* फेडरल रिझर्व्ह पद्धतीनें चालणाऱ्या पेढ्यांच्या यादींत प्रवेश करून घेण्याची परवानगी असल्यामुळें पेढ्यांचे एकंदर व्यवहार सुरळीत चालले आहेत.

वर सांगितलेंच आहे कीं, फेडरल रिझर्व्ह पेढ्या ह्या पेढ्यांच्या गुरुस्थानीं आहेत, म्हणजे त्या पेढ्यांनाही मदत करणाऱ्या पेढ्या आहेत. राष्ट्रीय व इतर (Country Banks) पेढ्यांनीं ह्या पेढ्यांचे सभासद पेढ्या बनून आपल्या जवळच्या ठेवींपैकीं कांहीं ठेवी त्यांचेजवळ ठेवावयाच्या असतात. हल्लीं अमेरिकेंत १९१३ सालच्या कायद्यान्वयें पेढ्यांचे तीन वर्ग करण्यांत आलेले आहेत व पहिल्या वर्गातल्या न्युयार्क, शिकॅगो व सेंट लुइ येथील सेंट्रल रिझर्व्ह सिटी बँकांना शेंकडा १८ टक्के ह्या प्रमाणांत गंगाजळी ठेवावी लागते. ह्या मानानें दुसऱ्या वर्गातल्या फेडरल रिझर्व्ह सिटी बँकांना १५ टक्के व कंट्री बँकांना शेंकडा १२ टक्के ह्या प्रमाणांत ती ठेवावी लागते. रिझर्व्ह पेढ्या आतां ह्या वर सांगितलेल्या पेढ्यांच्या पेढ्या असल्यामुळें व त्यांना ह्या पेढ्यांना अडचणीचे वेळीं पैसा पुरवावा लागत असल्यामुळें त्या पेढ्या आपणांजवळ शेंकडा ३५ टक्के ह्या प्रमाणांत आपली गंगाजळी ठेवतात. हें प्रमाण कांहीं फारसें मोठें नाहीं; पण फेडरल रिझर्व्ह कायद्याचा हाच फायदा आहे कीं, पेढ्यांना फारशी रक्कम गंगाजळीमध्यें अडकावून ठेवण्याची जरूर आतां राहिली नाहीं. पूर्वी राष्ट्रीय पेढ्या ज्या वेळीं स्वतंत्र असत त्या

* अमेरिकेमध्यें कापड, मातीचें तेल ह्यांसारखे जिन्नस उत्पन्न करून आपण ठरवूं त्या भावानें विकण्याकरितां मोठमोठ्या कंपन्या एकत्र करून त्यांचे व्यापारी संघ बनलेले असतात व त्यांना ' ट्रस्ट ' अशी संज्ञा आहे.

वेळीं त्यांना लोकांची रोख नाण्याची मागणी पुरी करण्याकरितां आपल्याजवळ जास्त रक्कम शिल्लक ठेवावी लागे; पण आतां फेडरल रिझर्व्ह पेढयांत सत्ता एकवटल्यामुळें व लोकांच्या मागण्या पुऱ्या करण्याची धमक (सरकारी मदतीच्या जोरावर नवीन नोटा काढून) त्यांना असल्यामुळें राष्ट्रीय पेढयांना थोड्या शिलकेनें आपलें काम भागविणें आतां सोपें झालें आहे.

अमेरिकेंतील पेढयांचा विशेषः–असो. अमेरिकेंतील पेढयांचें प्रकरण पुरें करण्यापूर्वी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. ती गोष्ट म्हणजे येथील पेढया स्वतंत्र असून इंग्लंडप्रमाणें कांहीं मुख्य पेढया व त्यांच्या भिन्न भिन्न शाखा निरनिराळ्या शहरीं असणें ही चाल येथें नाहीं. ह्याचें कारण हा देश लोकसत्ताप्रधान असून कांहीं थोड्या मोठ्या प्रमाणांत व्यवहार करणाऱ्या संस्थांमध्यें सर्व सत्ता एकवटणें हें ह्या देशांतील लोकांस रुचत नाहीं. त्यामुळें पेढयांनीं आपल्या शाखा स्थापण्यास कायद्याचे अनेक निर्बंध आहेत. पण पेढया अशा एकमेकांपासून स्वतंत्र असल्यामुळें देशांत चढाओढीनें लोकांना पेढयांनीं शक्य तितक्या सवलती दिलेल्या आहेत व त्यामुळें व्यापारवृद्धीला फारच मदत झालेली आहे.

प्रकरण ६ वें

हिंदुस्थानांतील पेढ्या

हिंदुस्थानांतील पेढ्यांचें वर्गीकरणः—हिंदुस्थानांतील चलनपद्धतीमुळें उत्पन्न झालेले दोष दूर होण्यास उत्तम मार्ग म्हणजे सुव्यवस्थित पेढ्यांची संस्थापना हा होय. ह्या पेढ्या (मध्यवर्ती व शाखा) सर्वत्र स्थापन झाल्या म्हणजे आपले पैसे पुरून ठेवणें किंवा दागिन्यांत खर्च करणें ह्या लोकांच्या प्रवृत्तीला आळा बसवून नवीन नवीन धंद्यांना लागणारें भांडवल उत्पन्न होऊन देशांतील संपत्ति खूब वाढेल.

हिंदुस्थानांतील प्रचलित पेढ्यांचे **इम्पीरिअल बँक, एक्सेंज बँक** (सराफी पेढ्या) समवायिक भांडवलाच्या पेढ्या, संचयोत्तेजक पेढ्या (Savings

Banks) सहकारी पेढ्या (Co-operative Societies) व एतद्देशीय सराफांच्या पेढ्या असे भाग करतां येतील. ह्यांशिवाय कृषीवलोत्तेजक पेढ्या, औद्योगिक पेढ्या वगैरेही पेढ्या आहेत; पण त्यांचा समावेश समवायिक भांडवलाच्या पेढ्यांमध्यें करतां येण्यासारखा आहे.

ह्या पेढ्यांचें हें वर्गीकरण केलेलें पाहून कोणाचीहि अशी स्वाभाविक कल्पना होईल कीं, ह्या निरनिराळ्या पेढ्या कांहीं ठराविक पद्धतीनेंच आपला व्यवहार करीत असतात. ही कल्पना कांहीं सर्वस्वीं खोटी नाहीं. इम्पेरिअल बँकेजवळ सरकारी शिल्लक रहात असल्यामुळें व तिच्यावर सरकारची कडक पाहणी असल्यामुळें तिच्या व्यवहारांना फारसा धोका नसतो. सराफी पेढ्या मुख्यत्वेंकरून परराष्ट्रीय व्यापाराला आर्थिक मदत देण्याचें काम करीत असतात. हिंदी समवायिक भांडवलाच्या पेढ्या लोकांच्या ठेवी स्वीकारून निरनिराळ्या प्रकारचें पेढीचें काम करीत असतात. सहकारी पेढ्यांचें ध्येय तर स्पष्टच आहे. अशी जरी वस्तुस्थिति असली तरी ह्या पेढ्या इतर कामें बिलकूल करीतच नाहींत अशी गोष्ट नाहीं. उदाहरणार्थ, सराफी पेढ्या आपला नेहमींचा धंदा करून लोकांच्या ठेवी स्वीकारीत असतात व देशांतल्या व्यापारालाही आर्थिक मदत देतात. तेव्हां पेढ्यापेढ्यांमध्यें चढाओढ सुरू असतांना त्या आपलें कार्यक्षेत्र सर्व बाजूंनीं वाढविण्याची खटपट करतील हें उघड आहे. ही परिस्थिति प्राप्त झाल्यावर वर दिलेलें वर्गीकरण व्यर्थ ठरेल हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणांत व्यवहार करणाऱ्या पेढ्यांपैकीं बहुतेक पेढ्या युरोपिअन लोकांच्या हातांत आहेत. ह्या पेढ्या पुष्कळ अंशांनीं आपला कारभार विलायतेंतील पेढ्यांच्या धर्तीवर चालवीत असतात. हल्लीं नुकतीच सुरू झालेली इम्पेरिअल पेढी ही पूर्वींच्या प्रेसिडेन्सी बँका एकत्र होऊन निर्माण झालेली आहे. प्रेसिडेन्सी बँका हल्लीं अस्तित्वांत नसल्यामुळें त्यांचा इतिहास देण्याचें आतां कारण नाहीं, म्हणून इम्पेरिअल बँकेचाच आपण विचार करूं. पण तो विचार करण्यापूर्वी प्रत्येक देशांत एखादी मध्यवर्ती पेढी असावी किंवा नसावी ह्याचा तात्विक दृष्ट्या विचार करणें आवश्यक आहे.

मध्यवर्ती पेढीपासून (Central or Imperial Bank) **होणारे नफेतोटेः**—पेढ्या दोन प्रकारच्या असूं शकतात. एक प्रकार म्हणजे

ज्या पेढ्यांचीं सूत्रें सर्वस्वीं सरकारच्या धोरणानें हलत असतात त्या पेढ्यांचा होय. दुसरा प्रकार म्हणजे ज्या पेढ्यांचा कारभार पुष्कळ अंशांनीं त्यांच्या डायरेक्टरांच्या हातांत असतो त्या पेढ्यांचा होय. ह्याच दोन प्रकारांना इंग्लिशमध्यें Centralised व Decentralised banks अशी संज्ञा आहे. मध्यवर्ती पेढ्यांपासून जसे फायदे, तसे तोटेही आहेत. ह्या पेढ्यांचा मुख्य फायदा म्हणजे व्यापारी आणीबाणीचे वेळीं त्या लोकांना पैशाची मदत करून त्या प्रसंगाची तीव्रता कमी करतात हा होय. सांपत्तिक दृष्ट्या हा मोठाच फायदा आहे ह्यांत शंका नाहीं. व्यापारी आणीबाणीची वेळ येण्याचे प्रसंगीं व्यापारी वर्ग घाबरून जाण्याचें कारण आपणांस कोणी कर्ज देणार नाहीं ही त्यांची कल्पना होय. हें कर्जहि रोख नाण्याच्या रूपानें व्यापाऱ्यांना पाहिजे असतें अशांतला भाग नाहीं. अशा वेळीं पेढ्या जर पुढें सरसावल्या व त्यांनीं मदत करण्याचें नुसतें आशीर्वचन दिलें तरीसुद्धां ह्या आणीबाणीची तीव्रता बरीच कमी होईल; तेव्हां राष्ट्रीयदृष्ट्या हें महत्वाचें काम ह्या मध्यवर्ती पेढ्या करीत असतात. मध्यवर्ती पेढीला लोकांशीं असलेल्या स्वतःच्या कर्तव्याची जाणीव असते व अशा पेढीवर जर सरकारचा व लोकांचा योग्य तऱ्हेनें दाब असला तर संकटाचे वेळीं स्वतःच्या शिलकेंतून रोकड देणें किंवा स्वतः कर्ज देणें व इतर खाजगी पेढ्यांना आर्थिक मदत करणें हीं कामें करून त्यांना राष्ट्राचें व्यापारी दृष्ट्या कल्याण करतां येतें. बँक ऑफ् इंग्लंड आजपर्यंत हीच कामगिरी करीत आलेली आहे, व व्यापारी संकटाचे वेळीं व्यापाऱ्यांना मुक्तहस्तानें पैसे देत आली आहे. आतां अशा वेळीं ही मध्यवर्ती पेढी व इंग्लंडमधील पेढ्या आपला कटमितीचा दर वाढवितात ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. पण दर वाढवून का होईना, आपणांस पैसा मिळूं शकतो असें लोकांस आश्वासन मिळतें ही गोष्ट कांहीं कमी महत्वाची नाहीं.

राष्ट्रांमधल्या इतर पेढ्यांपेक्षां मध्यवर्ती पेढीलाच व्यापारी आणीबाणीचे वेळीं तोंड देण्याचें जास्त सामर्थ्य असतें ह्याचें कारण असें आहे कीं, तिला बराच वेळ पैशाचे जोरावर टिकाव धरतां येतो. शिवाय अशा प्रसंगीं धाडस करून पुष्कळ लोकांना व व्यापारी संस्थांना–मग ह्यांपैकीं कांहीं सांपत्तिक दृष्ट्या खालावलेल्या का असेनात–कर्जानें रकम देणें हें काम सामान्य पेढ्यांपेक्षां मध्यवर्ती पेढ्याच करूं जाणोत. १८९० सालीं बारिंग पेढीला लोकांचे पैसे देणें कांहीं वेळ बंद करण्याचा प्रसंग आला. ही वेळ अशी होती कीं, इंग्लंडमध्यें सर्वच

पेढयांना जबरदस्त धक्का बसण्याचा संभव होता; पण सर्व लोकांच्या विश्वासास पात्र झालेली बँक ऑफ् इंग्लंड पुढें सरसावली व पेढीला जें देणें होतें त्याला जिम्मेदार राहून लोकांत पुनः विश्वास उत्पन्न करून व्यापार व उद्योगधंद्यांवर आलेलें संकट तिनें टाळलें. असो. धिटाईनें व मुक्तहस्तानें लोकांस कर्ज देऊन व्यापारी संकट टाळणें हा फायदा मध्यवर्ती पेढयांपासून होत असतो.

ह्याशिवाय इतर बरेच फायदे ह्या पेढयांपासून होत असतात. उदाहरणार्थ, सरकारचा वसूल झालेला पैसा ह्या मध्यवर्ती पेढींत सुरक्षितपणें ठेवतां येतो. एखाद्या युद्धाच्या वगैरे प्रसंगीं आपलें सर्व आर्थिक बल एकवटून सरकारला वाटेल तेवढी मदत ह्या पेढीला करितां येते. महायुद्धाचे वेळीं बँक ऑफ् इंग्लंडची ही कामगिरी सर्वविश्रुतच आहे.

पण हे सर्व फायदे देशाला जर हवे असतील तर ह्या पेढयांची अंतर्व्यवस्था कशी असावी ह्या महत्त्वाच्या मुद्याकडे लोकांनीं लक्ष दिलें पाहिजे. ह्या पेढयांची व्यवस्था ज्यांचे हातांत असते ते लोक अनुभवी, दक्ष व केवळ पेढयांचें कल्याण करणारेच पाहिजेत. ह्या पेढयांचा संबंध नेहमीं सरकारशीं व व्यापारी वर्गाशीं येणार व दोन्हीहि ह्या पेढयांकडे पैशाची जोराची मागणी करणार. अशा वेळीं ह्या पेढयांनीं नेटानें जुनी परंपरा न सोडतां आपला कारभार चालविला पाहिजे व सरकारी व व्यापारी वर्गाच्या धाकदपटशहास भीक घालतां कामा नये. व्यापारी आणीबाणीचे वेळीं ह्या पेढयांनीं आर्थिक मदत करणें हें ह्या पेढयांचें कामच आहे; पण जे व्यापारी सट्टेबाजी करून, निष्कारण किंमती वाढवून आपला जीव धोक्यांत घालतात अशा लोकांना मदत करण्याचें ह्या पेढयांचें काम नाहीं. तात्पर्य, शांतपणें विचार करणारे, स्वतंत्रबुद्धीचे व व्यापारी वर्गाशीं संबंध ठेऊन पुनः अलिप्त अशीं माणसें ह्या पेढयांच्या व्यवस्थापकांत असतील तरच ह्या पेढयांचा राष्ट्रास फायदा होतो.

पण कांहीं झालें तरी लोकांमध्यें पेढ्यांचे व्यवहार वाढविण्यास ह्या पेढ्या उपयोगी पडत नाहींत व त्यामुळें लोकांजवळ जो पैसा असतो त्याचा उत्तम उपयोग होऊन व्यापार व उद्योगधंदा ह्यांची वाढ चांगली होत नाहीं. हें काम आपसांत स्पर्धा असलेल्या व नफ्याच्या आशेनें काम करणाऱ्या खाजगी पेढ्या जितक्या उत्साहानें करतात तितक्या उत्साहानें मध्यवर्ती पेढ्यांच्या हातून तें होणें

शक्य नाहीं; कारण खाजगी पेढ्या आपलें काम लोकांस सुलभ रीतीनें वाढवूं शकतात. जर्मनी व फ्रान्स ह्या देशांत रीश बँक व बँक ऑफ् फ्रान्स ह्यांनीं जरी आपल्या शाखा सर्वत्र स्थापन करून आपलें कार्यक्षेत्र वाढविलें आहे तरी कांहीं झालें तरी त्या पेढया पेढ्यांच्याही गुरूस्थानीं आहेत व लोकांच्या गरजा काय आहेत, त्यांना पैसा कशाकरतां हवा आहे व त्यांचा कशा रीतीनें धंदा चालला आहे वगैरे माहितीकरतां त्यांना आपल्या शाखांवर व इतर खाजगी पेढ्यांवरच अवलंबून राहावें लागतें.

हिंदुस्थानांतील मध्यवर्ती पेढीः—हिंदुस्थानांत एक मध्यवर्ती किंवा सरकारनियंत्रित पेढी असावी असा विचार फार दिवसांपासून लोकांसमोर व सरकारसमोर होता. ही पेढी बँक ऑफ् फ्रान्सप्रमाणें किंवा जर्मनीमधील रीश बँकेच्या धर्तीवर असावी अशी पुष्कळ दिवसांची लोकांची मागणी होती. ह्या देशांत नोटा काढण्याचा मक्ता सर्वस्वीं सरकारकडे आहे. त्यामुळें येथील सरकारला, जीं कामें इतर देशांत पेढ्या करीत असतात, तीं कामें स्वतःलाच करावीं लागतात. उदाहरणार्थ, सरकार आपला नेहमींच्या कामाकरितां लागणारा व विशिष्ट कामाकरितां लागणारा पैसा ज्यांत ठेवला असतो तो खजिना ठिकठिकाणीं ठेवित असतें; त्याचप्रमाणें निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या प्रांतांत उत्पन्न झालेल्या वस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेण्याकरितां लोकांना पैसे पुरविणें, चलनी नोटांकरितां काढून ठेवलेला निधि व सुवर्णनिधि हे अलग काढून ठेवणें, स्टेट सेक्रेटरीनें काढिलेल्या हुंड्यांबद्दल रुपये देणें व आपण स्टेट सेक्रेटरीवर उलट हुंड्या काढणें, हिंदुस्तानांत व विलायतेंत कर्ज काढून म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्ड वगैरेंना कर्ज देणें वगैरे कामें सरकारलाच करावीं लागतात. आपला ताबा व नजर ठेवून सरकारनें हीं कामें जर एखाद्या स्वतंत्र मध्यवर्ती पेढीवर सोंपविलीं तर सरकारचा बराच त्रास चुकेल हें उघड आहे.

अशा बुद्धीनें ही पेढी काढण्याचा विचार पुष्कळ दिवसांपासून चालू होता. ह्या विषयाची चर्चा चेंबरलेन कमिशन बसलें असतां जोरानें झाली. ह्या कमिशनवर काम करणारे गृहस्थ कीन्ससाहेब ह्यांनीं एक खलिता लिहून ह्या विषयाचें सांगोपांग विवरण केलें. ह्या गृहस्थाचें म्हणणें असें होतें कीं, ही पेढी स्थापन केली असतां सरकारास व व्यापारी वर्गास फार फायदा होणार आहे, तो असा. ही

पेढी एकदां सुरू झाली म्हणजे स्वतंत्र खजिने ठेवण्याची जरूरी भासणार नाहीं. कारण खजिन्याचें काम ही पेढी करीलच. अशी पेढी नाहीं म्हणून सरकारला सराफबाजारांतून नेहमीं पैसा काढून न्यावा लागत असतो; तसेंच ही पेढी सुरू झाली असतां विलायतेंत सराफबाजारांत जो पैसा थोड्या मुदतीच्या बोलीनें ठेवावा लागतो तो तसा ठेवावा लागणार नाहीं व ज्या वेळीं व्यापारी परिस्थितीमुळें नोटा जास्त प्रमाणांत प्रसार करण्याची गरज असेल त्या वेळीं ह्या पेढीला अधिक सुलभतेनें हें काम करतां येईल व त्यामुळें देशांत व्यापारी तेजीमंदीचे वेळीं कटसितीच्या दरांत चढउतार फारसे होणार नाहींत. तसेंच हल्लीं चलनी नाण्याचे प्रश्न, शिलक्‍ा ठेवणें, कर्ज काढणें वगैरे बाबी सरकारनें नेमलेल्या व अर्थशास्त्रविषयाला साधारण अपरिचित अशा अधिकाऱ्यांकडे असतात. ह्या बाबी जर ह्या पेढीकडे सोंपविल्या तर त्यांचा शास्त्रीयरीत्या खल होऊन लोकांची टीका सरकारला बरीच टाळतां येईल. तसेंच ही पेढी स्थापन झाली असतांना हिच्या शाखा चोहोंकडे काढण्यांत आल्या म्हणजे हिंदुस्तानांतील पेढयांची वाढ फार चांगल्या प्रमाणांत होईल व त्यामुळें देशाचा व्यापारही चांगला वाढेल.

वर जे आपण ह्या मध्यवर्ती पेढी स्थापन झाल्यापासून होणारे फायदे पाहिले त्यांच्याउलट कांहीं लोक असेंहि म्हणतात कीं, ह्या पेढीपासून कांहीं तोटेहि होतात. ह्या लोकांचें असें म्हणणें आहे कीं, ह्या पेढीमुळें स्टेट सेक्रेटरीची जबाबदारी वाढून त्यांच्यावर पार्लमेंटच्या सभासदांच्या टीकेचा जास्त भडिमार होईल. हिंदुस्थान देश इतका मोठा आहे व येथील चालीरीती इतक्या भिन्न आहेत कीं, येथें एक मध्यवर्ती पेढी कामच करूं शकणार नाहीं. शिवाय हिंदुस्थानांतील लोकांना पेढी चालविण्याचें फारसें ज्ञान नसल्यामुळें ह्या पेढीला पुरेसे डायरेक्टरही मिळणार नाहींत. ही पेढी काढणें म्हणजे मुंबई व कलकत्ता येथील पेढ्यांच्या पोटावर पायच देण्यासारखें आहे; त्यामुळें त्यांना ही पेढी काढणें शक्य होणार नाहीं व ही पेढी काढली तर सराफी पेढ्यांच्या बाबतींत अन्याय केल्यासारखें होईल. ह्या विरोधी लोकांच्या विचारसरणींत बरेच दोष आहेत. एकंदरींत पाहिलें असतां हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीला अशी पेढी असणें जरूर होतें व अशी पेढी १९२१ सालीं कायद्यानें अस्तित्वांत आली.

आतां असा प्रश्न येतो कीं, ही जी पेढी स्थापन झालेली आहे तिजमुळें हिंदुस्थानचें किती कल्याण होणार आहे? ही पेढी सर्व देशाची (स्टेट बँक)

न बनतां जर तीन प्रेसिडेन्सी बँका एकत्र केल्यामुळें नुसती मध्यवर्ती पेढीच तयार झाली तर ह्या पेढीच्या व्यवस्थापक मंडळामध्यें युरोपियन लोकांचाच जास्त भरणा होऊन हिंदी लोकांना व्यापार-उत्तेजनाच्या बाबतींत फारसा फायदा न होतां युरोपियन लोकांना वाटेल तेवढा पैसा वापरावयास सांपडून त्यांचा उद्योगधंदा खूबच वाढेल. ही भीति कांहीं निराधार नाहीं; पण ह्याला उत्तर एवढेंच देतां येईल कीं, " चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः " ह्या न्यायानें आपण आपला प्रवेश करून घेतला पाहिजे व लोकमताचे जोरावर ही मध्यवर्ती पेढी युरोपियन लोकांच्या फायद्याकरतां उपयोगी होणार नाहीं अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे. नुसता ह्या मध्यवर्ती पेढीवर आपण जर बहिष्कार टाकला तर आपण आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखें होईल. असो. हल्लीं स्टेट सेक्रेटरीनें ह्या बँकेच्या घटनेला संमति दिली आहे. ती घटना अशी. ह्या पेढीला एक मुख्य बोर्ड असावें व त्या बोर्डांत सर्व पेढयांचे प्रतिनिधी असावे व एक सरकारतर्फे कन्ट्रोलर ऑफ करन्सी हा अधिकारी ह्या पेढीमध्यें असावा. नेहमींची व्यवस्था पाहण्याकरितां एक लहानसें कार्यकारी मंडळ असावें व त्यांत तीन किंवा चार सभासद असून त्यांपैकीं एक कन्ट्रोलर ऑफ् करन्सी असावा व त्याला ह्या बोर्डाला कोठलीहि एखादी बाब—ती जर सरकारच्या आर्थिक धोरणाला किंवा शिलकीच्या धोरणा संबंधानें (Balances) विघातक असेल तर—पुढें विचाराकरतां न आणण्याचें सांगण्याचा अधिकार असावा. त्याचप्रमाणें हल्लीं हयात असलेल्या पेढ्यांनीं जास्ती भांडवल उभारून प्रत्येक जिल्ह्यांत एकेक पेढी उभारावी. हे जिल्हे कोणते असावेत हें सरकार व पेढ्या ह्यांनीं मिळून ठरवावें.

इंपीरिअल बँक नांवाचा कायदा:—सन १९२० सालीं सप्टेंबर महिन्यांत हिंदुस्थान सरकारनें एक कायदा करून इंपेरिअल बँक निर्माण केली व प्रेसिडेन्सी बँकेचे जे पूर्वीं भागीदार असतील किंवा त्या पेढीचा स्टॉक ज्या गृहस्थांजवळ असेल किंवा जे कोणी नवीन भागीदार होऊं इच्छितील ते सर्व ह्या नवीन पेढीचे घटकावयव समजावे आणि ह्या पेढीचें भांडवल ११ कोटि २५ लक्ष रुपयांचें असून प्रत्येक भाग ५०० रुपयांचा असावा व प्रत्येक भागीदाराची जबाबदारी त्यानें आपल्या भागांवर जितकी रक्कम अजून द्यावयाची असेल तेवढ्यापुरतीच असावी असें ठरविलें. ह्या पेढीचें स्वरूप आतां बदल्यामुळें तिला आतां सरकारशीं विशेष संबंध ठेवावा लागणार आहे व त्यामुळें सेक्रेटरी ऑफ स्टेट

ह्याच्याशीं ठराव करून हिंदुस्थान सरकाराकरितां ह्या पेढीला पेढीचा धंदा व सरकारचे पैसे, सोन्याचांदीच्या लगडी व तारणरोखे, देणें, स्वीकारणें, गोळा करणें व पाठविणें हीं कामें करावीं लागणार आहेत. एवढेंच नव्हे तर हिंदुस्थान सरकार वेळोवेळीं जीं कामें सोंपवील तीं कामेंही तिला करावीं लागतील. ही पेढी स्थापन झाल्यापासून पांच वर्षांच्या आंत तिला निदान १०० शाखा तरी निरनिराळ्या ठिकाणीं स्थापन कराव्या लागतील व प्रेसिडेन्सी बँकांच्या पूर्वीच्या शाखा किंवा अडत्या कायम ठेवाव्या लागतील किंवा कमी कराव्या लागतील. त्याचप्रमाणें सरकारच्या परवानगीनें एखादी कंपनीच्या कायद्यान्वयें नोंदली गेलेली पेढीही तिला अंतर्भूत करून घेतां येते.

ह्या पेढीचीं मुख्य ऑफिसें मुंबई, मद्रास व कलकत्ता ह्या तीन ठिकाणीं व सोयीप्रमाणें इतर ठिकाणींही असावींत व एक ऑफीस लंडनमध्यें असावें असें ठरलें आहे. ह्या पेढीचा कारभार गव्हर्नरांच्या मध्यवर्ति मंडळाकडे असावा व ह्या मंडळाशिवाय कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या ठिकाणींही व इतरत्र स्थानिक मंडळें नेमण्यांत यावीं व त्यांनीं आपल्या इलाख्यांतलें पेढीचें काम पहावें. स्थानिक मंडळांत पूर्वींच्या प्रेसिडेन्सी बँकांचेच डायरेक्टर असून पूर्वीचेच प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट व सेक्रेटरी ह्यांनीं आपलीं कामें पहावींत. मध्यवर्ति मंडळांत स्थानिक मंडळाचे प्रेसिडेंट, व्हाईस प्रेसिडेंट, सेक्रेटरी, कन्ट्रोलर ऑफ करन्सी किंवा सरकारनें नेमलेला दुसरा एखादा अधिकारी असे एकाच वर्षाकरितां नेमलेले चार लोक व शिवाय मध्यवर्ति मंडळाच्या शिफारशीवरून सरकारनें नेमलेले दोन मॅनेजिंग गव्हर्नर इतके लोक असावेत. मात्र कन्ट्रोलर ऑफ करन्सी, स्थानिकमंडळाचे सेक्रेटरी व एखादें नवीन स्थानिकमंडळ नेमलें गेल्यास त्यांच्यातर्फे असलेले लोक ह्यांना मध्यवर्ति मंडळाचे सभेंत मत देण्याचा अधिकार नसावा.

इंपीरिअल बँकेनें करावयाचीं कामें:—येथें आम्हीं ह्या पेढीचीं प्रमुख कामेंच सांगणार आहों.

(१) लोकांना शहाजोग तारणांवर कर्ज देणें व त्यांना पेढीवरून अमुक मर्यादेपर्यंत रोख पैसे उचलूं देणें.

(हीं तारणें अनेक प्रकारचीं आहेत. उदाहरणार्थ, पार्लमेंट किंवा हिंदुस्थान सरकार ह्यांनीं ज्या तारणरोख्यांत किंवा स्टॉक व फंड खरेदी करण्यांत पैसा

गुंतविण्यास परवानगी दिली असेल ते तारणरोखे किंवा प्रांतिक सरकार व सिलोनचें सरकार ह्यांचे तारणरोखे; तसेंच सरकारी मदत असलेल्या रेल्वे कंपनीचे तारणरोखे किंवा इंपीरिअल बँकेजवळ तारण म्हणून ठेवलेला माल किंवा ज्याला पैसे मिळावयाचे त्याची सही असलेल्या हुंड्या व प्रॉमिसरी नोटा; त्याचप्रमाणें मर्यादित जबाबदारी असलेल्या कंपन्यांचे पैसे वसूल झालेले शेअर व कर्जरोखे (Debentures) हीं सर्व शहाजोग तारणें मानलेलीं जाहेत. मात्र मध्यवर्ति मंडळानें स्टेट सेक्रेटरीला कर्ज देतांना कोठल्याही तारणाची जरूर नाहीं.

(२) इंपीरिअल बँकेनें वर सांगितलेल्या तारणांवर कर्ज दिलें असतांना तें जर वेळेवर फिटलें नाहीं, तर ते तारणादाखल असलेले रोखे वगैरे विकून पैसे वसूल करणें.

(३) कोर्ट ऑफ् वार्ड्स ह्यांना त्याच्याजवळ असलेल्या मालमत्तेच्या तारणांवर सरकारच्या परवानगीनें सहा महिन्यांच्या बोलीनें कर्ज देणें.

(५) हिंदुस्थान व सिलोन ह्या देशांत हुंड्या काढणें, सचकारणें, मनोतीनें पैसे कापून वटविणें, विकणें, विकत घेणें वगैरे कामें करणें व हिंदुस्थान सरकारच्या परवानगीनें त्याला पसंत असलेल्या पेढ्यांकरितां किंवा त्यांचेपासून ज्या हुंड्यांचे पसे हिंदुस्थानच्या बाहेर मिळावयाचे असतील अशा हुंड्यांची खरेदीविकी करणें.

(५) नाणें पाडलेलें किंवा न पाडलेलें सोनें किंवा चांदी खरेदी करणें व लोकांच्या मूल्यवान जिनसा, रोखे वगैरे संभाळणें.

(६) लोकांकडून गरज पडेल तेव्हां हिंदुस्थानांत व विलायतेमध्यें कर्ज काढणें.

इम्पेरिअल बँकेला निषिद्ध असलेलीं कामें:—आतांपर्यंत ह्या पेढीला कोणतीं कामें करतां येतात ह्याचा विचार आपण केला. आतां ह्या पेढीला निषिद्ध असलेल्या कामांचा विचार आपणांस करावयाचा आहे.

(१) ह्या पेढीनें सहा महिन्यांहून जास्त मुदतीच्या बोलीनें किंवा खुद्द पेढीच्याच भागांवर, स्टॉकवर किंवा कोर्ट ऑफ् वॉर्डच्या ताब्यांत असलेल्या इस्टेटीव्यतिरिक्त इतर कोठल्याहि गहाणावर किंवा स्थावर मिळकतीवर किंवा त्या मिळकतीच्या कागदपत्रांवर कधींही कर्ज देऊं नये.

(२) वर सांगितलेल्या शहाजोग तारणाव्यतिरिक्त इतर कोठल्याहि तारणांवर कोठल्याहि व्यक्तीकरितां किंवा सरकती पेढीकरतां ठराविक रकमेहून जास्त रकमेच्या हुंड्या मनोतीनें पैसे कापून वटवू नयेत किंवा त्या व्यक्तीला व तिला ठराविक रकमेहून जास्त रक्कम कर्जानें देऊं नये.

(३) ज्या बेचनीय दस्तऐवजांचे पैसे देण्यास एकमेकांशीं धंद्यांत (Partnership) व पेढ्यांत (Firms) संबंध नसलेल्या अशा निदान दोन व्यक्ति वैयक्तिक जबाबदारी घेण्यास तयार नसतील अशा दस्ताऐवजावर पेढीनें पैसे देऊ नयेत, किंवा तो दस्तऐवज खरेदी करूं नये, किंवा त्याचे पैसे मनोती कापून देऊं नयेत , किंवा कोणालाही त्या दस्तऐवजावर रोख पैसे देऊं नयेत; त्याचप्रमाणें त्या दस्तऐवजाची मुदत सहा महिन्यांहून जास्त असली तर तो दस्तऐवज निषिद्ध तारण म्हणून समजावा.

(एखाद्या माणसाचें ह्या पेढीशीं जर खातें असलें तर त्याला ठराविक रकमेपर्यंत शिलकीहून जास्त रक्कम कर्च काढण्यास हरकत नसावी.)

अशा प्रकारचा इम्पेरिअल बँक नांवाचा कायदा आहे. हा कायदा पास होऊन इम्पेरिअल बँक स्थापन होऊन तिच्या शाखाही अनेक ठिकाणीं स्थापन झालेल्या आहेत. ह्या पेढीमुळें हिंदुस्थानचें किती कल्याण होईल, येथील उद्योगधंद्यांना कितपत उठाव मिळेल व ती लोकांच्या विश्वासास किती पात्र होईल, ह्या गोष्टींचा निकाल भावी कालावरच सोंपविणें श्रेयस्कर होईल.

सराफी पेढ्या (Exchange Banks) :—आतांपर्यंत आपण इम्पेरिअल बँकेच्या संस्थापनेचा इतिहास पाहिला. पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे कीं, ह्या पेढ्यांना परदेशीय हुंड्यांचा व्यवहार करतां येत नाहीं; किंवा विलायतेमध्यें पैसा गोळा करतां येत नाहीं. हीं कामें ह्या सराफी पेढ्या करीत असतात. खरें पाहिलें असतांना सरकारी व्याख्येप्रमाणें ज्या पेढीचें मुख्य हपीस हिंदुस्थानच्या बाहेर इतर देशांत आहे त्या पेढीलाच सराफी पेढी हें नांव देतां येईल. इंम्पेरिअल बँकेला जें काम हातीं घेतां येत नाहीं तें काम मुख्यत्वेंकरून हातीं घेणाऱ्या पेढ्या सराफी पेढ्या होत अशी सोयीची सराफी पेढीची व्याख्या आपणास करतां येईल व त्यामुळें ह्या सराफी पेढ्यांना सवत होऊं पाहणाऱ्या हिंदी समवायिक भांडवल असलेल्या पेढ्यांचा अंतर्भाव त्यांच्यामध्यें करण्याची

गरज पडणार नाहीं. कारण ह्या देशी पेढया परराष्ट्रीय व्यापाराला आर्थिक मदत करीत नाहींत व त्यांच्या शाखाही हिंदुस्थानाबाहेर नाहींत. तेव्हां दोन्ही व्याख्या एकत्र केल्यावर सराफी पेढयांची व्याख्या म्हणजे ज्या पेढयांना इंपेरियल बँकेला निषिद्ध असलेलीं कामें करतां येतात व ज्यांच्या मुख्य कचेऱ्या हिंदुस्थानच्या बाहेर असतात त्या सराफी पेढया होत अशी करतां येईल.

सराफी पेढयांचे दोन वर्ग करतां येतील. पहिल्या वर्गांत आपला बहुतेक व्यवहार हिंदुस्थानांतच करणाऱ्या सराफी पेढयांचा होतो. ह्या पेढया पांच असून त्यांचीं नांवें चार्टर्ड बँक आफ् इंडिया, ऑस्ट्रेलिया व चायना; नॅशनल बँक ऑफ् इंडिया; मर्कंटाईल बँक आफ् इंडिया; ईस्टर्न बँक व कॉक्स आणि कंपनीची बँक अशीं आहेत. दुसऱ्या वर्गांत आशिया खंडांत व्यवहार करणाऱ्या पेढयांच्या हिंदुस्थानांतील शाखा आहेत. ह्या पांच असून त्यांचीं नांवें हांगकांग आणि शांघाई बँकिंग कार्पोरेशन; इंटरनॅशनल बँकिंग कार्पोरेशन; योकोहामा स्पेशी बँक; कंटोर नॅशनल डी एस्कॉंट डी पॅरिस व रुसो एशिआटिक बँक अशीं आहेत.

सराफी पेढ्यांचीं कामें–लोकांच्या ठेवी स्वीकारून हिंदुस्थानांतील मालाच्या आयात निर्गतीस आर्थिक मदत करणें:–ह्या पेढया फार दिवसांपासून येथें काम करीत आहेत. सुमारें ६५ वर्षांपूर्वीपासून त्यांची स्थापना ह्या देशांत झाली असून येथील व परदेशांतील ठेवी घेणें व ह्या ठेवींतून ह्या देशांतील परराष्ट्राशीं होणाऱ्या व्यापाराला पैसा पुरविणें हें ह्या पेढ्यांचें काम आहे. अशा दृष्टीनें विचार केला तर ह्या पेढया म्हणजे हिंदुस्थानांतील इम्पेरिअल बँक व इतर बँक ह्यांना पुरवणीवजा होत. ह्या पेढयांचें काम म्हणजे सराफी व सावकारी (Banking) धंदा करणें हें होय. सराफी धंद्याच्या योगानें ह्या पेढयांना आयात निर्गत मालाच्या व्यापाराला आर्थिक मदत करतां येते. हल्लीं सुधारलेल्या देशांत व्यापारी लोक आपला माल परदेशीं पाठवून आपल्या ओळखीच्या पेढयांवर हुंड्या काढीत असतात ही गोष्ट वाचकांस ठाऊकच आहे. ह्या निर्गत मालावर काढिलेल्या हुंड्या दोन प्रकारच्या असतात. कांहीं हुंड्या अशा असतात कीं, ज्यांच्यावर त्या काढिल्या जातात त्यांनीं त्या पत्करल्यावर त्यांचे पैसे मनोतीनें कापून तत्काल मिळतांत. दुसऱ्या हुंड्या अशा असतात कीं, त्यांचे

पैसे मुदत भरल्यावरच मिळावयाचे असतात. ह्या दोन्ही प्रकारच्या हुंड्या ह्या सराफी पेढ्या विकत घेतात व पहिल्या प्रकारच्या हुंड्या आपल्या लंडनमधील मुख्य हपिसांत मिती कापून घेऊन वटवितात; इतकेंच नव्हे तर त्याच हुंड्या इंग्लंडमधील किंवा स्कॉटलंडमधील समवायिक भांडवलाच्या पेढ्या, हुंड्या दलाल आणि पैशाची बाजारांत ज्या वेळीं फारच चणचण असते त्या वेळी बँक आफ् इंग्लंड ह्यांजकडे नेऊन पुनः त्या वटवितात. ह्याचा असा अर्थ होतो कीं, हिंदुस्थानांतून जो माल बाहेर जातो त्याला लागणारा पैसा ह्या सराफी पेढयांना विलायतेमधील पेढ्या— हिंदुस्थानांतील लोक नव्हेत–पुरवीत असतात. व्यापारी दृष्ट्या ही स्थिति फार समाधानकारक आहे असें म्हणतां येत नाहीं. ह्याचें कारण पुढें वाचकांस कळेलच.

ही आर्थिक मदत करण्याचा मार्ग–आयातनिर्गत मालावरील हुंड्यांची खरेदीः—ही झाली हिंदुस्थानाच्या निर्गत मालाची स्थिति; पण आयात मालाला होणारी आर्थिक मदत मुख्यतः ह्या सराफी पेढयांकडूनच होत असते. विलायतेचे व्यापारी आपला माल हिंदुस्थानांत पाठवून येथील व्यापाऱ्यांवर वर सांगितलेल्या दोन प्रकारच्या हुंड्या काढीत असतात. ह्या हुंड्या अर्थातच पौंडात काढिलेल्या असतात व त्या हुंड्यांवर–त्या काढलेल्या दिवसापासून त्यांचे पैसे मिळेपर्यंत–व्याज चालूं असतें. ह्या हुंड्या मात्र सराफी पेढ्या पुनः वटवीत नाहींत, तर विलायतेमधील व्यापाऱ्यांना त्या पेढ्या आपणावळ असलेल्या पैशांतूनच पैसे पुरवीत असतात. म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें आयात मालाला लागणारा पैसा निर्गत मालाला लागणाऱ्या पैशाप्रमाणें विलायतेमधील पेढयांवर अवलंबून राहत नाहीं, तर सराफी पेढयांच्या भांडवलावर व त्यांच्या जवळ असलेल्या ठेवींवरच बव्हंशीं अवलंबून असतो. सराफी पेढ्या हिंदुस्थानांत जेव्हां निर्गत मालावरील हुंड्या विकत घेतात व त्या हुंड्या विलायतेमध्यें पाठवितात तेव्हां त्यांचा पैसा हिंदुस्थानांतून विलायतेकडे जाऊं लागतो. पण आयात मालावर काढलेल्या हुंड्यांबद्दल जेव्हां त्या विलायतेंत तेथील व्यापाऱ्यांना पैसे देतात तेव्हां त्यांचा पैसा पुनः हिंदुस्थानाकडे येऊं लागतो.

पण ज्याअर्थी हिंदुस्थानचा निर्गत माल हा सामान्यपणें आयात मालापेक्षां जास्त असतो त्याअर्थी आयात मालावर विलायती व्यापाऱ्यांनीं काढिलेल्या हुंड्या ह्या नेहमींच कमी पडतात. ही तूट भरून काढण्याकरितां सराफी पेढयांना

स्टेट सेक्रेटरीनें हिंदुस्थानसरकारावर काढिलेल्या हुंड्या किंवा ज्या हुंड्यांबद्दल हिंदुस्थानांत तारेनें पैसे मिळत असतात अशा हुंड्या विकत घ्याव्या लागतात व अशा तऱ्हेनें आपला पैसा हिंदस्थानांत ह्या पेढ्या परत आणीत असतात. स्टेट सेक्रेटरीनें काढिलेल्या हुंड्या म्हणजे काय, त्या कशाकरितां काढिल्या जातात वगैरे गोष्टींचें विवेचन आम्ही येथें करीत नाहीं. कारण ह्या विषयींची सविस्तर चर्चा आमच्या " भारतीय चलन पद्धति " ह्या पुस्तकांत आलेलीच आहे.

ह्या पेढयांनीं स्टेट सेक्रेटरीनें काढिलेल्या हुंडया किती विकत घ्यावयाच्या हें आयातनिर्गत मालामधील फरकावर व ह्या पेढ्या हिंदुस्थानांत आपला व्यवहार किती जास्त वाढवितात ह्यावर अवलंबून राहील. तारेच्या हुंडया विकण्याची पद्धत स्टेट सेक्रेटरीनें सुरू केल्यानें ह्या पेढयांना फार सोयीचें झालेलें आहे. ह्या पेढयांना येथील व्यापाऱ्यांनीं काढिलेल्या हुंडया विकत घेणें हें एकंदरींत फायदेशीर आहे असें आढळून आल्यामुळें हिंदुस्थानांतील सरकारकडून ताबडतोब उसने पैसे घेऊन त्या हुंडया त्यांना विकत घेतां येतात; व विलायतेंत तेथील व्यापाऱ्यांनीं त्या स्वीकारल्यावर, ह्या पेढयांना जर स्टेट सेक्रेटरीनें काढिलेल्या हुंडया आणखी विकत घेण्याकरितां पैसे हवे असतील तर, त्या हुंडया मिती कापून वटवितां येतात व अशा रीतीनें पैसे उत्पन्न झाल्यावर पुनः स्टेट सेक्रेटरीच्या हुंडया विकत घेऊन त्या हिंदुस्थानांत पाठवून त्यांचे पैसे येथील व्यापाऱ्यांकडून म्हणजे पर्यायानें हिंदुस्थानसरकारकडून वसूल करतां येतात.

आयातनिर्गत मालावरील हुंड्यांच्या खरेदीव्यतिरिक्त आर्थिक मदत देण्याचे इतर मार्गः—पण आयात माल कमी येत असल्यामुळें व निर्गत माल जास्त असल्यामुळें निर्गत माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांच्या सगळ्याच हुंड्या विकत घेण्यास जी पैशाची तूट पडते ती भरून काढण्यास स्टेट सेक्रेटरीनें हिंदुस्थान सरकारवर काढिलेल्या हुंड्यावरच सराफी पेढ्या सर्वस्वीं अवलंबून रहात नाहींत; कारण ह्या पेढयांची जोराची मागणी पाहून कधीं कधीं स्टेट सेक्रेटरी आपल्या हुंड्यांचा दर वाढवितो. अशा वेळीं ह्या हुंड्या विकत घेणें अर्थातच सराफी पेढ्यांना परवडत नाहीं. म्हणून ह्या पेढ्या हिंदुस्थानांत सान्व्हरिन पाठवितात. कारण हे सान्व्हरिन हिंदुस्तान सरकारच्या खजिन्यांत नेऊन दिले असतां एका सान्व्हरिनास ठराविक रुपये ह्या पेढ्यांना मिळूं शकतात. ह्याचा असा परिणाम होतो कीं, स्टेट सेक्रेटरीला आपला दर फारसा वाढवितां

येत नाहीं. कधीं कधीं ह्या सराफी पेढ्या वर सांगितलेली तूट भरून काढण्याकरितां हिंदुस्थानांत सोन्याचांदीच्या लगडी आणीत असतात. अनादि काळापासून ह्या देशांत दागदागिन्याकरितां म्हणा किंवा भांडी वगैरेकरितां म्हणा, सोन्याचांदीची लोकांना गरज आहे. ही गरज भागविण्याकरितां देशांत ह्या धातू आणणें म्हणजे एक प्रकारचा मालच देशांत आणणें होय व अशी मालाची आयात वाढवून हिंदुस्थानानें इतर राष्ट्रांना माल पाठविल्यामुळें त्यांचेकडून मिळणारे पैसे कमी कमी करणेंच होय. महायुद्धाचे वेळीं सोन्याचांदीला हिंदुस्थानांत येण्यास बंदी झालेली होती. पण युद्ध संपल्यावर ही बंदी लवकरच काढून टाकण्यांत आली. असो, अशा रीतीनें स्टेट सेक्रेटरीनें काढिलेल्या हुंड्या विकत घेऊन किंवा सॉव्हरीन पाठवून किंवा सोन्याचांदीच्या लगड्या पाठवून ह्या पेढ्या आपला व्यवहार करीत असतात.

हा व्यवहार जर वाचकांस बरोबर समजला असेल तर व्यापाऱ्यांच्या गरजा भागविण्याकरितां मी आपल्या हुंड्या विकावयास काढतों असें जें स्टेट सेक्रेटरी म्हणत असतो त्याचा अर्थ काय होतो हें त्यांना बरोबर समजेल. जर त्यानें ह्या तारेच्या हुंड्या विकण्याचें बंद केलें किंवा ह्या सराफी पेढ्यांना, रोख साव्हरीन पाठवूनच, आपल्याजवळ हिंदुस्थानांत पैसा जमविण्यास भाग पाडलें तर ह्याचा असा परिणाम होईल कीं, व्यर्थ कालातिपात होऊन हिंदुस्थानांत मिति कापून हुंड्या वटविण्यास फार खर्च होईल; म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें असल्यास हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांना आपला माल बाहेर पाठविल्यावर त्याबद्दल पैसे मिळण्यास बराच त्रास पडेल. उलट पक्षीं ज्या वेळीं हिंदुस्थानांत दुष्काळ पडेल व त्यामुळें निर्गत माल कमी होत जाईल त्या वेळीं मिति कापून वटविल्या जाणाऱ्या हुंड्यांबद्दल मागणी कमी होत जाईल व लंडनमधील सराफी पेढ्यांना स्टेट सेक्रेटरीच्या हुंड्या विकत घेण्याची जरूरी कमी भासेल.

सराफी पेढ्यांच्या व्यवहारांच्या पद्धतीवर चर्चा:—ह्या पेढ्या वर सांगितल्याप्रमाणें स्टेट सेक्रेटरीच्या हुंड्या विकत घेऊन हिंदुस्थानांतील व्यापाराला आर्थिक मदत करीत असतात; पण ही जी आर्थिक मदत होत असते ती लंडनमध्यें थोड्या मुदतीनें—कायमच्या नव्हे—लोकांच्या ठेवीच्या रूपानें कर्जानें काढिलेल्या रकमेच्या जोरावर होत असते ही गोष्ट फारशी सुरक्षितपणाची नाहीं. कारण ह्या पेढ्यांकडे जर लंडनमधील ठेवीवाल्यांनी एकदम मागणी केली व हिंदुस्थानांत व्यापाऱ्यांस दिलेला पैसा परत न मिळाल्या-

मुळें जर त्या पेढयांना विलायतेमध्यें तो पाठवितां आला नाहीं तर मोठीच आपत्ति उत्पन्न होणार हें उघड आहे. ही आपत्ति जर टाळावयाची असेल तर त्याला एकच मार्ग आहे. तो मार्ग म्हटला म्हणजे ज्या वेळीं थोडया मुदतीच्या बोलीनें ह्या पेढया कर्ज काढीत असतात त्या वेळीं हें कर्ज त्यांच्या मालमत्तेच्या किंमतीहून जास्त नसावें. हें कर्ज ह्या पेढ्या जर लंडन येथें काढीत असतील तर त्यांची जी मालमत्ता असेल तिच्या किंमतीइतकेंच कर्ज त्यांनीं तेथें काढावें व हिंदुस्थानांत जर ह्या पेढयांनीं थोडया मुदतीचें कर्ज काढलें तर येथील खेळत्या मालमत्तेच्या किंमतीहून तें जास्त नसावें.

ह्या सराफी पेढ्यांना आपल्याजवळ पुरेशी गंगाजळी रोकड न ठेवतां लोकांच्या ठेवी मोठ्या प्रमाणांत ठेवण्याची संवय आहे. ह्याच संवयीचें अनुकरण इतर पेढयांनीं केलें तर देशांतील पेढ्यांना एकंदरींत अनिष्ट वळण लागणार आहे. सराफी पेढयांचे फंड बहुतेक व्यापारी हुंडयांत गडप झालेले असतात व ह्या सराफी पेढया आपले ताळेबंद छापतांना आपल्या दीर्घकालमुदतीच्या ठेवी किती व खेळत्या (current) ठेवी किती ह्याचा उल्लेख करीत नाहींत; ह्यामुळें ह्या सराफी पेढयांची सांपत्तिक स्थिति काय आहे ह्याची यथार्थ कल्पना आपणांस करतां येत नाहीं. ह्या पेढया आपला सराफी धंदा करून शिवाय सावकारी धंदाही मोठ्या प्रमाणांत करीत असतात. ह्यामुळें इंम्पेरिअल बँक व हिंदी समवायिक भांडवलांच्या पेढया आणि ह्या सराफी पेढया ह्यांच्यामध्यें मोठी चढाओढ असते. ह्या सराफी पेढयांचे ठेवी स्वीकारण्याचे दर इम्पेरिअल बँकेच्या दरांपेक्षां जास्त सवलतीचे असल्यामुळें लोक आपल्या ठेवी--मग त्या चालू खात्यावर असोत किंवा दीर्घकाल मुदतीच्या असोत-ह्या सराफी पेढयांकडेच ठेवीत असतात. त्यामुळें त्यांच्या ठेवी अलीकडे बऱ्याच वाढल्या आहेत व त्यामुळें ह्या सराफी पेढयांनीं लोकांना कर्ज देण्यांत, कटमितीनें हुंडया वटविण्यांत किंवा शिलकेपेक्षां जास्त रक्कम (Overdraft) कर्जानें देण्यांत इतर बँकांशीं अहमहमिका करितां येते. तथापि ह्या सराफी पेढयांचा सराफी धंदा हंगामाच्या वेळीं जोरांत सुरू झाला म्हणजे अर्थातच सावकारी धंद्याकडे त्यांना दुर्लक्ष करावें लागतें व त्यामुळें इतर पेढ्यांशीं त्यांना पूर्णपणें चढाओढ करतां येत नाहीं; अशी स्थिति असूनहि त्यांच्या कामाचा व्याप हल्लीं इतका वाढला आहे कीं, त्यांनीं आपल्या ४८ शाखा इतर ठिकाणीं स्थापन केलेल्या आहेत व १९१९ सालीं त्यांच्या हिंदुस्थानांतील ठेवी ७ कोटी पौंडांवर गेलेल्या होत्या.

सराफी पेढ्यांचें प्रत्येक सालअखेर असलेलें भांडवल, गंगाजळी व नगदी शिल्लक दाखविणारा तक्ता.

(आंकडे पौंडांत असून ते दशलक्षांचे घेतले आहेत)

वर्ष.	पेढ्यांची संख्या.	भांडवल व गंगाजळी.	हिंदुस्थानांतील ठेवी.	हिंदुस्थानांतील नगदी शिल्लक.
१८७०	३	२·२	·७	·६
१८८०	४	३·१	३·०	१·८
१८९०	५	८·१	७·५	३·५
१९००	८	१५·८	१०·५	२·४
१९०५	१०	२२·४	१७·०	३·८
१९०६	१०	२४·३	१८·१	५·१
१९०७	१०	२६·०	१[illegible]·२	५·६
१९०८	१०	२५·९	१९·५	३·८
१९०९	१०	३०·२	२०·३	४·२
१९१०	११	३४·३	२[illegible]·८	४·४
१९११	१२	३५·६	२८·२	४·६
१९१२	१२	३७·६	२९·५	[illegible]·१
१९१३	१२	३७·८	३१·०	५·९
१९१४	११अ	३७·०	३०·१	८·४
१९१५	११	३६·८	३३·५	७·६
१९१६	१० आ	३७·९	३८·०	१०·१
१९१७	९ इ	३२·७	५३·२	३३·७
१९१८	१० ई	३९·४	६१·९	१५·२
१९१९	११ उ	५३·१	७४·४	३०·०

(अ) ह्यांत 'ड्रश ऑशियाटीक बँक' आलेली नाहीं. कारण ही बँक लढाईच्या सुरवातीस नादारींत गेली.

(आ) ह्यांत ' दिल्ली अँड लंडन बँक आलेली नाहीं. कारणह्या बँकेचा अलायन्स बँक ऑफ सिम्ला ह्यांत समावेश झाला (अलायन्स बँक समवायिक भांडवलाच्या पेढीच्या तक्त्यांत दाखल केलेली आहे).

(इ) ह्यांत ' रुसो एशियाटीक बँक ' धरलेली नाही.

(ई) 'बेवान बँकेनें आपली शाखा हिंदुस्थानांत उघडली आहे म्हणून तिचा समावेश ह्यांत केलेला आहे.

(उ) ह्यांत सुमोटेमो बँकेचा समावेश केला आहे कारण तिची शाखा हिंदुस्थानांत आहे.

समवायिक भांडवलाच्या पेढयाः—आतांपर्यंत आपण दोन प्रकारच्या पेढ्यांचा विचार केला. आतां तिसऱ्या प्रकारच्या पेढ्यांचा विचार करावयाचा. पहिल्या दोन प्रकारच्या पेढ्या सर्वस्वीं परकीय लोकांच्या ताब्यांत आहेत; पण ह्या तिसऱ्या प्रकारच्या पेढ्यांपैकीं कांहीं पेढया एतद्देशीय लोकांनीं चालविलेल्या आहेत. ह्या देशी पेढया ह्या देशांत नवीनच सुरू झाल्यामुळें व पूर्वीच्या युरोपिअन बँकांना त्यांचा मत्सर वाटूं लागल्यामुळें प्रथम प्रथम अनुभवाच्या अभावीं ह्या पेढ्यांना बराच त्रास सोसावा लागला व १९१३ सालीं ह्या पेढयांपैकीं कांहीं पेढयांचें दिवाळें निघालें. अर्थात लोकांच्या मनाला मोठा धक्का बसून कांहीं वेळ त्यांचा विश्वास ह्या देशी पेढयांवरून अजीबात उडाला. पण कालांतरानें ही स्थिति बदलून हल्लीं देशी पेढयांचा जम बसत चालला आहे व ह्या पेढया अनुभवानें शहाण्या झाल्या आहेत.

ह्या देशी पेढया अस्तित्वांत येण्याचें मुख्य कारण १९०५ सालापासून वंगभंगामुळें उत्पन्न झालेली स्वदेशी चळवळ होय. प्रचलित सरकारी शिक्षणपद्धति सदोष आहे; तिजमुळें राष्ट्रांतील तरुणपिढी निःसत्व होऊन परावलंबी होते व सरकारी नोकरी, वकिली व डॉक्टरी ह्या अनुत्पादक धंद्यांशिवाय इतर धंदे चालविण्यास लागणारें ज्ञान देण्यास ती अगदीं कुचकामाची आहे असा अनुभव आल्यावर देशांतील उद्योगधंदे उर्जितावस्थेला आणले पाहिजेत असा लोकांस अनुभव येऊं लागला; व धंदे जर उन्नतावस्थेला आणावयाचे तर त्याकरितां भांडवल पाहिजे व तें पुरविण्याकरितां स्वदेशी पेढयांची फार जरूर आहे असें लोकांस वाटल्यावरून पेढया अस्तित्वांत आल्या आणि मध्यम स्थितींतल्या लोकांनीं स्वदेशभक्तीच्या उत्साहांत आपले संचित पैसे ह्या पेढयांमध्यें ठेवले व त्या पेढयांचा खूब उत्कर्ष झाला.

ह्या पेढयांनीं ठेवीवर ६ टक्के व्याज देण्याचा ठराव केला व पुष्कळ व्यापाऱ्यांना उद्योगधंद्याच्या वृद्धीकरितां म्हणून पैशाची मदतही केली; पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. ह्या पेढयांचें लवकच दिवाळें निघालें. त्या वेळचा इतिहास जर आपण पाहिला तर आपणांस असें दिसून येईल कीं, १९०६ पासून १९१० सालापर्यंत ४७६ पेढया स्थापन झालेल्या होत्या. यावरून स्वदेशीची लाट किती मोठ्या प्रमाणांत त्यावेळीं आलेली होती हें आपणांस समजून येईल.

अगदीं पहिली स्वदेशी पेढी म्हणजे १८८१ सालची ' औध कमार्शियल बँक ' ही होय. त्यानंतर कांहीं लहान लहान पेढया स्थापन झालेल्या होत्या. १८९४ सालीं ' पंजाब नॅशनल बँक ' स्थापन झाली व ह्या दोन्ही पेढया आपला व्यवहार आजपर्यंत बिनबोभाट करीत आहेत. १९०१ सालीं पीपल्स बँक ऑफ इंडिया स्थापन झाली व ती इतकी लोकप्रिय झाली होती कीं, उत्तर हिंदुस्थानांत निरनिराळ्या ठिकाणीं सुमारें १०० शाखा तिनें स्थापन केलेल्या होत्या; पण तिला आपला व्यवहार १९१३ सालीं आटपतां घ्यावा लागला. १९०४ सालीं अमृतसर बँक स्थापन झाली व तिचेंहि दिवाळें १९१३ सालीं निघालें. १९०५ पासून १९१४ सालपर्यंत ज्या पेढया स्थापन झाल्या त्यांत प्रमुख अशा ८ पेढया होत्या. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—बँक ऑफ इंडिया, इंडियन स्पेसी बँक, बंगाल नॅशनल बँक, इंडियन बँक ऑफ मद्रास, बाँबे मर्चंट बँक, क्रेडिट बँक ऑफ् इंडिया, काठेवाड अँड अमदाबाद बँकिंग कॉर्पोरेशन व सेंट्रल बँक ऑफ् इंडिया.

समवायिक भांडवलाच्या पेढयांचीं दिवाळीं व त्यांचीं खरीं कारणें:—ह्या ४७६ पेढयांपैकीं लहान मोठ्या मिळून २४ पेढयांचें दिवाळें १९१३ सालीं निघालें. एकंदर संख्येच्या मानानें २४ ही संख्या कांहीं फारशी नाहीं. पण आमचे हितशत्रु अंग्लो-इंडियन पत्रकार ह्यांनीं त्यावेळीं पराचा कावळा करून पेढया चालविण्याच्या बाबतींत हिंदु लोकांच्या नालायकीची टिमकी सर्व जगभर वाजविली; पण खरें पाहिलें तर हिंदु लोकांची इतकी नालस्ती करण्याचें वास्तविक त्यांना कारण नव्हतें. युरोप व अमेरिका ह्या खंडांत ज्या पेढया स्थापन झाल्या त्या सर्वच टिकल्या व हिंदुस्थानांतील तेवढया सर्व पेढया बुडाल्या असें थोडेंच आहे ? जगांतील पेढयांचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर प्रत्येक देशांत कांहींना कांहीं कारणांनीं पेढया बुडाल्या आहेत. सुधारणेचें माहेरघर जें इंग्लंड त्यामध्यें सुद्धां १९ व्या शतकांत १० वर्षांच्या ठराविक मुदतीनें अनेक वेळां पेढया बुडाल्या आहेत. बँक ऑफ् इंग्लंडसारखी भरभक्कम पायावर स्थापन झालेली पेढी १८१९ पासून १८७० पर्यंत अनेकदा अगदीं बुडण्याच्या पंथाला आलेली होती. जगांतल्या सर्व पेढयांमध्यें अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या संस्थेची ही स्थिति. मग इतर पेढयांची गोष्ट तर बोलावयास नको. १७९९ पासून १८१८ सालापर्यंत इंग्लंडमध्यें सुमारें १०० पेढयांनीं राम म्हटला. १८३९

सालीं २९ पेढयांनीं दिवाळें काढलें व त्यांपैकीं १७ पेढयांनीं एक फार्दिंगही नफा म्हणून आपल्या भागीदारांस दिलेला नव्हता. १८६२ ते १८६५ सालांत ३०० पेढया स्थापन झाल्या व थोड्याच कालांत ह्यांपैकीं २७० पेढयांनीं आपला गाशा गुंडाळला. अगदीं अलीकडे १८९० सालीं 'बारिंग ब्रदर्स' ची प्रसिद्ध पेढी—ही पेढी इतकी श्रीमंत होती कीं, हिनें १८३९ सालीं खुद्द बँक ऑफ् इंग्लंडला अडचणीचे वेळीं पैशाची मदत केलेली होती—नादारींत निघाली. खुद्द हिंदुस्थानांतही 'हिंदुस्थान बँक' नांवाच्या पेढीनें १८३२ सालीं दिवाळें काढलें. हिच्यावर लोकांचा व सरकारचाही इतका विश्वास बसला होता कीं, तिच्या ४० ते ५० लाख किंमतीच्या नोटा कलकत्त्याच्या सरकारी ऑफिसांत व खुद्द सरकारी खजिन्यांतही स्वीकारल्या जात.

ह्या बँकेशिवाय १८२९ ते १८३३ सालांमध्यें स्थापन झालेल्या पेढया, १८३८ सालीं 'युनिअन बँक' नांवाची स्थापन झालेली पेढी व १८६८ सालीं प्रस्थापित झालेली बँक ऑफ् बाँबे ही पेढी ह्या सर्व नामशेष झाल्या. ह्या पेढयांची व्यवस्था सर्वस्वीं इंग्लिश लोकांच्या ताब्यांत होती. असें असून त्या बुडाल्या, ह्यावरून इंग्लिश लोक पेढयांचा धंदा करण्यास नालायक आहेत असें जर कोणीं विधान केलें तर त्याला हेच इंग्लिश लोक वेड्याच्या इस्पितळांत पाठवितील. ज्या वेळीं देशी पेढया बुडाल्या त्याच वेळीं बँक ऑफ् बर्मा, मद्रासची अर्बुथनॉट कंपनी व बँक ऑफ् अप्पर इंडिया ह्या पेढयासुद्धां रसातळास गेल्या.

असो. स्वदेशी पेढया कां बुडाल्या ह्याचा जर आपण विचार केला, तर आपणांस असें दिसून येईल कीं, बऱ्याचशा पेढया आपणांजवळ फारच थोडी—म्हणजे शेंकडा २० ह्या प्रमाणांत—रोकड ठेवीत असत. ह्या पेढयांचें अधिकृत भांडवल खूबच असे; पण त्यांपैकीं लोकांनीं भाग विकत घेऊन देऊं केलेलें भांडवल शेंकडा ६० या प्रमाणांत असे व प्रत्यक्ष वसूल झालेलें भांडवल तर सुमारें शेंकडा १५ ह्या प्रमाणांत असे. त्या वेळच्या कांहीं दिवाळें निघालेल्या पेढयांच्या भांडवलाचे आंकडे जर आपण पाहिले तर आपणांस असें दिसेल कीं, मुंबईच्या बाँबे बँकिंग कंपनीचें वसूल झालेलें भांडवल १ लाख रुपये, गंगाजळी पूज्य व लोकांच्या ठेवी १५ लाखांच्या होत्या. इंडियन स्पेसी बँकेचे ७५ लाख वसूल झालेलें भांडवल,१५ लाख गंगाजळी रोकड व ठेवी २७० लाखांच्या होत्या. लाहो-

रच्या पीपल्स बँकेची तर ह्याहून मनोरंजक हकीकत आहे. तिचें वसूल झालेलें भांडवल १३ लाख होतें, तिची गंगाजळी रोकड सारी दोन लाख रुपये व लोकांच्या ठेवी तरे १२६ लाख रुपयांच्या होत्या. ह्यावरून आपणास सहज कल्पना करतां येईल कीं, ह्या पेढयांना आपल्या धंद्याच्या मूलभूत तत्त्वांचें ज्ञान यथातथाच होतें.

पण पेढयांच्या डायरेक्टरांचें अज्ञान एवढेंच जर त्यांच्या दिवाळीं निघण्याचें कारण असतें तर एक वेळ तें अज्ञान क्षम्य झालें असतें; कारण समवायिक भांडवलाच्या पद्धतीवर पेढीचा धंदा करणें व तोही ह्या व्यापारी युगांत करणें ही गोष्ट हिंदी लोकांना नवीनच होती. पण पेढया बुडण्यास दुसरें कारण असें झालें कीं, कांहीं पेढयांचे हिशोब नीट ठेवलेले नव्हते. पेढयांच्या मॅनेजरांनीं पैशाची भयंकर अफरातफर केलेली होती. हिशोब सफशेल खोटे ठेवलेले होते व लोकांचा निढळाच्या घामानें मिळविलेला पैसा ह्या संभावित चोरांनीं स्वतःच्या जबाबदारीवर काढिलेल्या व स्वतःला किफायतशीर अशा धंद्यांत खर्च करून हवा तसा उधळला होता. ह्या लोकांनीं लोकांना योग्य तारणाशिवाय पैसे दिलेले होते व आपली पेढी भरभराटीत आहे हें दाखविण्याकरितां पेढीच्या भांडवलांतूनच हे लोक भागीदारांना भरभक्कम नफा वांटीत असत. जोंपर्यंत लोकांचा ह्या पेढयांवर विश्वास होता तोंपर्यंत ह्यांची पोळी चांगली पिकली; पण एकदां भ्रमाचा भोंपळा फुटल्यावर ह्यांच्या पापाचा घडा भरून शेवटीं ह्यांना बिनभाडयाचें घर पहावें लागलें.

पण दिवाळीं निघालेल्या सर्वच पेढयांचे डायरेक्टर व मॅनेजर लफंगे नव्हते. पुष्कळ डायरेक्टर लोक व मॅनेजर ह्यांनीं मोठी ढोबळ चूक अशी केली कीं, मोतीं व चांदी ह्यांची खरेदीविक्री करणें ह्यासारख्या सट्टेबाजीच्या स्वरूपाच्या धंद्यांत इतर भागीदारांना न कळवितां आपले पैसे त्यांनीं पेरले. इंडियन स्पेसी बँकेचा फजीतवाडा उडण्याचें कारण चुनीलाल सैरय्यानीं बँकेचा पैसा हिंदुस्थान सरकारला आपण सांगू त्या दरानें चांदी विकतां यावी म्हणून जगांतील इतर भागांतील चांदी खरेदी करण्यांत खर्च केला हें होय. कांहीं कांहीं पेढयांचें धोरणच चुकलें. त्यांनीं लोकांच्या ठेवी थोडया मुदतीनें घेऊन व्यापारी लोकांना मात्र दीर्घकालमुदतीचें कर्ज दिलें व हें कर्ज बऱ्याच मोठ्या प्रमाणांत एकाच धंद्यांत खर्च करण्याकरितां त्यांनीं त्या व्यापाऱ्यांना दिलें. कधीं कधीं हें कर्ज

देतांना ज्यांना कर्ज द्यावयाचें ते जरी विश्वासार्ह नसले तरी ते डायरेक्टर लोकांच्या वशिल्याचे असल्यामुळें ते खरोखरच कर्ज देण्यास लायक होते किंवा नाहीं याचा विचार त्यांच्याकडून करण्यांत आला नव्हता.

पण ह्या सर्वांत महत्वाचें कारण म्हणजे पेढीचे डायरेक्टर हे बहुतांशीं नालायक लोक असत. ह्या मंडळींना पेढया म्हणजे काय, त्यांची व्यवस्था कशी पहावयाची, कोणास किती व कशा प्रकारचें कर्ज द्यावयाचें हें कांहीं ठाऊक नव्हतें. असे पेढीव्यवहारज्ञानशून्य लोक ज्या पेढयांमध्यें काम करीत असतील त्यांचा बोजवारा उडण्यास फारसा वेळ नको होता.

पण अशी जरी स्थिति होती तरी बऱ्याच पेढयांची दिवाळखोरी टळली असती. प्रथम एक गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, १३ पेढया अवघ्या दीड महिन्यांत बुडाल्या. ह्याचा अर्थ असा होतो कीं, त्या वेळीं पेढया बुडण्याची सांथच आलेली होती. कांहीं पेढया त्यांचा फारसा अपराध नसतांना केवळ लोकांचा पेढयांवरील सर्वसामान्य विश्वास उडाल्यामुळेंच अस्तंगत झाल्या. शिवाय ह्या सांथीच्या वेळीं प्रेसिडेन्सी बँकांनीं व सरकारनें जर सहानुभूतीचें धोरण ठेवून पैशाची मदत केली असती तर बऱ्याच पेढया बचावल्या असत्या. ह्या बाबतींत पंजाबमध्यें नेमलेल्या ‘प्रांतिक औद्योगिक कमेटी’चें मत नमूद करण्यासारखें आहे. कमेटी आपल्या रिपोर्टमध्यें म्हणते:—

“एकंदर सर्व गोष्टींचा विचार करतां सामान्यपणें पेढयांच्या दिवाळीचीं खालील दोन कारणें असूं शकतील:—

(१) नवीन कोठलाही धंदा सुरू करतांना कंपनीच्या व्यवस्थेंत जे दोष दिसून येतात व कंपनीच्या नोकरांत जें अज्ञान दिसून येतें तशाच प्रकारचे दोष व अज्ञान ह्या पेढयांत दिसून येत होते.

(२) सरकारी मदत असलेल्या प्रॉव्हिन्शिअल बँकांनीं करावयाच्या मदतीचा अभाव.”

असो. कधीं कधीं वाइटांतून चांगलेंही निघत असतें, ह्या न्यायानें स्वदेशी पेढ्यांचीं दिवाळीं निघाल्यावर लोकांची व सरकारची दृष्टी थोड्याबहुत प्रमाणानें हिंदुस्थानांतील पेढ्यांची स्थिति सुधारण्याकडे वळली. लोकांना ह्या वेळीं समजून

हिंदी समाईक भांडवलांच्या पेढ्यांचें सालअखेर असलेलें भांडवल, गंगाजळी, ठेवी व नगदी शिल्लक दाखविणारा तक्ता.

(अ) ५ किंवा ५ लक्षांहून अधिक भांडवल असलेल्या पेढया.

पर्ष.	पेढयांची संख्या	वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी.	ठेवी	नगदी शिल्लक.
		रु. लक्ष		
१८७०	२	११·६	१३ ९	५·१
१८८०	३	२१·१	६३·४	१६·६
१८९०	५	५१·१	२७०·८	५५·८
१९००	९	१२७·७	८०८·५	११९·०
१९०५	९	१६२·४	११९८·९	१७३·५
१९०६	१०	१९०·३	११५५·५	१४९·५
१९०७	२०	२९२·९	१४००·३	१९४·४
१९०८	१४	३०८·८	१६२६·१	२४७·१
१९०९	१५	३५४·१	२०४९·१	२७९·१
१९१०	१६	३७६ २	२५६५ ८	२८०·२
१९११	१८	४१२·१	२५२९·१	३६२·०
१९१२	१८	४२६·२	२७२६·०	४००·१
१९१३	१८	३६४·३	२२५९·२	४०० २
१९१४	१७	३९३·३	१७१०·६	३५३·२
१९१५	२०	४३८·०	१७८७·३	३९९·४
१९१६	२०	४६१·०	२४७१·०	६०३·५
१९१७	१८	४६६·७	३११७ ०	७६४·८
१९१८	१९	६०२	४०५९·०	९३९·०
१९१९	१८	७६३	५८९९·०	१२१७·०

(आ) १ लक्षापासून ५ लक्ष भांडवल असलेल्या पेढया.

१९१३	२३	५०·	३५१·१	२४·९
१९१४	२५	५५·२	१२६·५	२८·०
१९१५	२५	५५·१	९१·४	२०·०
१९१६	२८	६३·३	१०१·२	१६·८
१९१७	२५	५४·४	९०·२	२०·४
१९१८	२८		१५५·०	३७·०
१९१९	२९		२८८·०	५४·०

चुकलें कीं, आपण देशभक्तीच्या भरांत भलभलत्या लोकांवर अंधविश्वास टाकला ही आपण घोडचूक केली. पेढया जेव्हां निघत असतात तेव्हां त्यांचें अधिकृत भांडवल व लोकांनीं घेतलेलें (Subscribed) भांडवल ह्यांच्यामध्यें शास्त्रशुद्ध म्हणून ठरलेलें प्रमाण पेढया पाळतात किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे ही गोष्ट लोकांना कळून चुकली; त्याचप्रमाणें प्रत्येक पेढीनें ठराविक प्रमाणांत आपणांजवळ रोकड व खेळती मालमत्ता (Floating Assets) ठेवलीच पाहिजे, ह्या गोष्टींचें महत्व लोकांस व पेढयांसही कळून चुकलें. प्रेसिडेन्सी बँकांजवळ शेंकडा ३३ ह्या प्रमाणांत ठेवीबद्दल गंगाजळी रोकड असते व सराफी हुंड्या शेंकडा २० हें प्रमाण पाळतात हें लक्ष्यांत ठेवून देशी समवायिक भांडवलाच्या पेढया आपल्याजवळची गंगाजळी वाढवूं लागल्या आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. हल्लीं हिंदुस्थानाची अशी स्थिति आहे कीं, येथील उद्योगधंदे बाल्यावस्थेंत आहेत व पुष्कळ धाडशी, प्रामाणिक व हुशार लोकांना नवीन धंदे काढण्यास पैसे नाहींत; त्यामुळें ह्या लोकांचें आयुष्य फुकट जात आहे. अशा वेळीं देशांत नवीन पेढया निघून लोकांना जर आपल्याजवळ राखून ठेवलेल्या पैशाचा योग्य उपयोग करतां आला व पेढ्या जर शास्त्रीय पद्धतीनें व अनुभवशीर माणसांच्या साहाय्यानें आपले पैसे गुंतवून आपला व्यवहार करूं लागल्या तर ह्या देशाचें किती तरी कल्याण होईल.

संचयोत्तेजक पेढ्याः—ह्या पेढ्या मुख्यतः मध्यम स्थितींतील लोक व गरीब लोक ह्यांकरितां स्थापन केलेल्या आहेत. जे लोक श्रीमंत असतात किंवा ज्यांना आपल्या पैशाला जास्त व्याज मिळावें असें वाटत असतें ते लोक कंपन्यांचे शेअर विकत घेण्यांत किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धनोत्पादक धंद्यांत आपले पैसे घालतात. पण ज्या लोकांना आपणास फारसें व्याज मिळू नये असें वाटतें किंवा आपल्या पैशाला बिलकूल धोका असू नये अशी इच्छा असते त्या लोकांच्या सोयीकरतां ह्या पेढया निर्माण झालेल्या आहेत. १८३३ सालीं जेव्हां कांहीं व्यापारी पेढ्या बुडाल्या तेव्हां लोकांच्या सोयीकरितां सरकारनें आपण होऊनच संचयोत्तेजक पेढया काढल्या. ह्या पेढया बराच कालपर्यंत प्रेसिडेन्सी बँकांच्या ताब्यांत होत्या; पण पुढें सरकारनें ह्या पेढया पोस्टहपीसकडे दिल्या. १८८२ सालीं जिल्ह्याच्यां खजिन्यांत लोकांचे जे पैसे होते ते ह्या पोस्टांतल्या पेढयांत ठेवण्यांत आले व १८९६ सालीं प्रेसिडेन्सी बँकांतल्या रकमा ह्या पोष्टांतल्या पेढयांत ठेवून देण्यांत आल्या ह्याचा परिणाम असा झाला कीं, लोक आपल्या ठेवी ह्या पेढ्यांत इतक्या ठेऊं लागले, कीं, सरकारला ह्या ठेवी नको म्हणण्याची पाळी आली.

ह्या पेढयांत ठेवलेले लोकांचे पैसे सरकार कायमचा फंड नसलेल्या कर्जाचा भाग समजत असतें. सरकार हें एक बडें सावकार आहे व तें नेहमीं कर्जानें पैसे देत असतें. ज्यावेळीं लोकांना आपल्या ठेवी परत हव्या असतात त्यावेळीं त्या, सरकार आपल्या नेहमींच्या शिलकीतून, देतें. १८९४ सालीं सरकारनें लढाई सुरू झाल्यामुळें ठेवी ठेवणारांस ठेवींची मर्यादा वाढवून व वारबाँडसारखे रोखे काढून कांहीं सवलती दिल्या, त्यामुळें ठेवींची संख्या २३ कोट रुपयांपर्यंत गेली.

ह्या ठेवी वाढण्याचें दुसरें असें एक कारण होतें कीं, कांहीं स्वदेशी पेढयांचें दिवाळें निघाल्यामुळें लोकांनीं जिवंत राहिलेल्या पेढयांतून आपले पैसे काढून ते ह्या पोस्टांत ठेवले.

ह्या पोस्टाच्या पेढ्या जरी लोकांच्या ठेवी स्वीकारतात तरी इम्पेरिअल बँकेनेंही आपल्या संचयोत्तेजक पेढया सुरू केलेल्या आहेत. सहकारी पेढयांमध्यें-सुद्धां पुष्कळ लोकांच्या ठेवी येत असतात. अशा प्रतिकूल परिस्थितींतही ह्या संचयोत्तेजक पेढयांना बरेंच काम करतां येईल.

आपला अनुभव असा आहे कीं, ह्या पोस्टाच्या पेढ्यांमध्यें साधारणपणें मध्यम स्थितींतले सुशिक्षित पण धाडसशून्य लोक आपले पैसे ठेवीत असतात; पण पुष्कळ लोकांची अशी प्रवृत्ति असते कीं, आपला पैसा गहाणावर जमिनी घेण्यांत गुंतवावा. प्रायशः जे लोक शहरापासून दूर रहातात त्यांना आपल्याजवळ जर पैसे असतील तर ते अशा रीतीनें जमिनींत गुंतविणें अधिक इष्ट वाटतें. तेव्हां हिंदुस्थानांत जर **लँड मॉर्टगेज बँका** स्थापन होतील तर फार बरें होईल.

सहकारी पतपेढ्या.

सहकार्य म्हणजे काय ?:—कोठलीहि गोष्ट एकटयानेंच करण्याचें ठरविलें तर माणसाला जितका त्रास पडेल तितका त्रास ती गोष्ट दहा लोकांनीं मिळून केली तर पडणार नाहीं ही गोष्ट प्रत्येकास पटण्यासारखी आहे. ' दसकी लकडी एकका बोजा ' ही म्हण हेंच तत्त्व आपणांस सुचविते. जगांत प्रवळ असलेल्या लोकांनीं दुर्बळ लोकांस पीडा देण्यास सुरुवात केली असतांना आत्मरक्षणाचा राजमान्य मार्ग म्हणजे ' संहतिः कार्यसाधिका ' ह्या तत्त्वाचा व्यवहारांत उपयोग करून दुर्बळांनीं आपलें बळ वाढवून समर्थ होणें हा होय. हल्लींचें युग औद्योगिक स्वरूपाचें आहे व सर्व जगांत संपत्तीची वांटणी विषमतेनें झालेली असल्यामुळें व्यापारी, धनिक व भांडवलवाले लोक ह्यांच्या ताब्यांत गरीब पोटार्थी मजूरवर्गाला जावें लागतें. पण सहकार्य हें नुसत्या गरीब मजुरांच्याच कल्याणाकरितां आहे असें नाहीं. जेथें प्रबळ लोक-मग ते शारीरिक, मानसिक व आर्थिक साधनांमुळें प्रबळ झालेले असोत–आपल्या सामर्थ्यानें गरीबगुरीबांस छळीत असतात, तेथें ह्या सहकार्याच्या जोरावर दीन लोकांस आपली उन्नति करून घेतां येते. व्यापारी लोक जिनसांच्या किंमती हव्या तशा वाढवून सामान्य लोकांना लुबाडून जर आपला तळीराम गार करूं लागले तर सहकारी तत्त्वानेंच लोकांना व्यापारी वर्गाशीं टक्कर देऊन स्वस्त किंमतीला ते जिन्नस मिळूं शकतील. गरीब शेतकरी लोकांना जमीन नांगरल्यावर बीं पेरण्यास पैसा नसतो. ह्या अडचणीचा फायदा घेऊन महाजन (सावकार) लोक भयंकर दर आकारून त्यांना पैसे देतात. हेच महाजन प्रत्यक्ष पैसे न देतां जर त्या शेतकऱ्यांना बीं पुरवूं लागले तर त्यांना वाटेल त्या दरानें व वाटेल त्या हलक्या दर्जाचें बीं देतां येतें व शेतकऱ्यांना तें बीं मुकाटयानें घ्यावें लागतें. पण ह्याच शेतकरी लोकांनीं एकत्र जमून सरकारी तत्त्वावर तें बीं

खरेदी करण्याचें ठरविलें तर आतां पारडें फिरून त्यांना ते सांगतील त्या भावानें व इष्ट त्या दर्जाचेंच बीं सावकारांकडून घेतां येईल.

सहकारी पद्धतीचीं मूलतत्त्वें:—आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकांस कळलेंच असेल कीं, दुर्बल लोक—मग ते शेतकरी असोत, कारागीर असोत किंवा मजूर असोत—त्यांनीं आपल्या संस्था सहकारी तत्त्वांवर स्थापन करून आपली शक्ति वाढविली पाहिजे. ह्या संस्थांचें मुख्य ध्येय म्हणजे त्या लोकसत्ताक स्वरूपाच्या असल्या पाहिजेत. संस्थांचे जे सभासद होऊं इच्छितील त्या सर्वांमध्यें उच्च-नीच भाव असतां कामा नये. आपण कशाकरितां एकत्र जमत आहों, आपणांस काय करावयाचें आहे व आपणांस बिनधोकपणें किती जबावदारी घेतां येईल वगैरे बाबतींत त्यांना पूर्णपणें स्वातंत्र्य असलें पाहिजे. सारांश, लोकसत्तेचें खरेंखुरें स्वरूप ह्या संस्थांमध्यें दिसून आलें पाहिजे. राजनीतीशास्त्रामध्यें राज्यपद्धतीसंबंधानें सांगितलेल्या प्रकारांत लोकसत्ताकपद्धति सर्वांत श्रेष्ठ आहे असें आपण पाहतों. व हल्लीं सुधारलेल्या सर्व राष्ट्रांमध्यें ह्याच पद्धतीचा स्वीकार करण्यांत आलेला आहे पण खरी लोकसत्ता कोठेंच आढळून येत नाहीं. कारण हल्लीं देशाची मर्यादा मोठी असल्यामुळें सर्व लोकांना राज्य करणें शक्य नाहीं; अतएव प्रतिनिधींच्याद्वारें लोक स्वतःवर राज्य करीत असतात. पण जी गोष्ट सर्व देशाला शक्य नाहीं ती ह्या सहकारी तत्त्वावर स्थापन झालेल्या संस्थांना सुलभ आहे म्हणून ह्या संस्थांना स्वातंत्र्य असणें जरूर आहे.

सहकारी तत्त्वाचें दुसरें मुख्य अंग म्हणजे समाजसेवा हें होय. ह्या संस्था निर्माण करण्यांत मुख्य हेतु संस्थेच्या सभासदांनीं परस्परांच्या उपयोगी पडून उन्नति करून घेणें हा होय. हल्लींचें युग संघशक्तीचें आहे. अशा वेळीं एखादी सहकारी संस्था स्थापन करतांना आपण त्यापासून कांहीं नफा मिळवून श्रीमंत होऊं अशी अपेक्षा संस्थेच्या सभासदांची केव्हांही असतां कामा नये. नफाच मिळवावयाचा तर त्याकरितां व्यापारी पेढ्या आहेतच. आपल्या अडचणींचा फायदा घेऊन सावकार आपणांस दिलेल्या कर्जावर जबर व्याज आकारून आपल्या उन्नतीच्या आड येतात म्हणून तर ह्या संस्थांचा जन्म असतो. तेव्हां नफा मिळविण्याचें ध्येय ह्या संस्थांनीं आपल्या डोळ्यांसमोर कधींहि ठेवूं नये हा उत्तम मार्ग होय.

सहकारी तत्त्वाचें तिसरें अंग म्हणजे सभासदांची सर्व मदार त्यांच्या पतीवर पाहिजे. ह्या सभासदांना लोकांकडून कर्ज घेतांना त्यांच्याजवळ असलेल्या स्थावरजंगम मिळकतीचा उपयोग तारण म्हणून करण्याचा प्रसंग कधींही येतां कामा नये. त्यांची वैयक्तिक पत हेंच त्यांचें भांडवल समजून लोकांनीं त्यांना कर्ज दिलें पाहिजे. एखादा गृहस्थ चांगला घरचा श्रीमंत असूनही त्याची बाजारांत पत बिलकूल नसेल. ह्याच्याउलट एखादा मनुष्य अगदीं गरीब असूनही त्याची पत चांगली असूं शकेल. तेव्हां सहकारी संस्था निर्माण करितांना सज्जन अब्रूदार व नेकीच्या माणसांचीच निवड करण्यांत आली पाहिजे. ह्या लोकांना नेहमीं कर्ज घेण्याचा प्रसंग येणार व तें कर्ज योग्य वेळी फेडणें हें आपलें आद्यकर्तव्य आहे असें प्रत्येक सभासदानें मानलें पाहिजे. अशी कल्पना सभासद, संभावीत असल्याशिवाय, होणें केव्हांही शक्य नाहीं.

चवथें अंग म्हणजे सहकारी संस्था ही नेहमीं छोटेखानी असली पाहिजे. तिचे सभासद किती असावेत हें सांगणें कठीण आहे; तथापि स्थूलमानानें त्यांची संख्या लहान असावी असें म्हणतां येईल. आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, ही संख्या लहान कां असावी? ह्याचें कारण संस्थेचें अस्तित्व व चिरकालित्वच ह्या लहान संख्येवर अवलंबून आहे संस्थेचे सभासद थोडे असले म्हणजे त्यांना एकमेकांवर नजर ठेवतां येते. संस्थेला मिळालेल्या कर्जाबद्दल सर्व सभासदांवर वैयक्तिक व सामुदायिक जबाबदारी येऊन पडते, म्हणून आपणांस मिळालेल्या कर्जाचा विनियोग सभासद कसा करितात हें सर्वांना समजलेंच पाहिजे. आणि ह्याकरितां सभासदांची संख्या १० हून कमी व १०० हून जास्त असणें इष्ट नाहीं हें उघड आहे.

पांचवें अंग म्हणजे संस्थेचा कारभार खुला व सर्वांना कळेल अशा पद्धतीचा पाहिजे. तिच्या कारभारांत लांचलुचपत, लांडीलबाडी किंवा गुप्तपणा कधींही असतां कामा नये. असें असेल तरच लोकांचा ह्या पेढ्यांवर विश्वास बसेल व नवीन नवीन संस्था स्थापन होतील. कोणत्या सभासदाला किती कर्ज द्यावयाचें हें सर्वांच्या संमतीनें ठरून तें सार्वजनिक ठिकाणीं छापून प्रसिद्ध केलें तरी हरकत नाहीं.

सहकारी तत्त्वाचें सहावें अंग म्हणजे ह्या तत्त्वानुसार चालणाऱ्या संस्थांनीं कधींही सरकारची मदत घेण्याची अपेक्षा करूं नये. सरकारची मदत घेतल्यानें

एकंदरींत सहकारी संस्थांचें नुकसानच झालें आहे हें आपणांस युरोपखंडांतील सहकारी पतपेढयांच्या अनुभवावरून स्पष्टपणें दिसून येईल. सरकारची मदत घेत त्यानें पेढ्यांचा स्वावलंबी बाणा नाहींसा होतो व त्यामुळें त्यांचें वैशिष्ट्यच नाहींसें होतें. मनुष्यामध्यें मर्दपणा समाजप्रीति व एकमेकांविषयीं बंधुभाव उत्पन्न करून बौद्धिकदृष्ट्या, नैतिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या उन्नति करून घेणें ह्या गोष्टी सरकार-वर अवलंबून राहिल्यानें शक्य नाहींत. शिवाय सहकारी संस्थांचें ध्येय नैतिक स्वरूपाचें असल्यानें सरकारची मदत घेतल्यानें त्यांना विशिष्ट प्रकारच्या राजकार-णांत इच्छा नसतांनाही पडावें लागतें व त्यामुळें कांहीं लोकांची तरी अप्रीति त्यांना स्वीकारावी लागते व विनाकारण कार्यहानि होते.

पण सहकारी संस्थांना सरकारची मदत पैशाशिवाय अन्य तऱ्हेनेंही घेतां येते. ह्या संस्थांनीं आपल्या सभासदांस कर्ज दिल्यावर तें कर्ज वेळेवर फिटलें नाहीं किंवा बुडण्याचा संभव दिसूं लागला तर सरकारी कायद्यांची मदत घेऊन त्यांना आपलें कर्ज फेडून घेतां येतें; पण अशी मदत घेण्याचा प्रसंग त्यांच्यांवर येणें हेंसुद्धां अनिष्टच आहे. हे प्रसंग टाळावयाचा उत्तम मार्ग म्हणजे सहकारी संस्थांनीं आपले सभासद निवडतांना फार काळजी घेतली पाहिजे आणि कर्ज देतांना फार चिकित्सा करून मग तें दिलें पाहिजे. तात्पर्य, कर्जानिमित्त सरकार-दरबार करण्याचें काम पडूंच नये, अशी परिस्थिति सहकारी संस्थांनीं आपल्या चोख, सचोटीच्या व दक्ष कारभारानें उत्पन्न केली पाहिजे.

सहकारी पतपेढ्यांचा प्रारंभः—हिंदुस्थान देश कृषीप्रधान आहे व येथील कृषीही नेहमीं पावसावर अवलंबून असते. दर वर्षीं योग्य वेळीं भरपूर पाऊस सर्व देशभर पडतोच असें कधीं घडत नाहीं. म्हणून हिंदुस्थानांत कोठें ना कोठें तरी दुष्काळ पडत असतो. हा दुष्काळ कृषीप्रधान देशाला जितका जाणवतो तितका उद्योगप्रधान देशाला तो भासत नाहीं. हल्लीं सरकारचें आर्थिक धोरण देशांतील उद्योगधंद्यांच्या वाढीस फारसें अनुकूल नाहीं. तेव्हां हा देश बराच काल-पर्यंत शेतकीवरच अवलंबून रहाणार हें उघड आहे. हिंदुस्थानचा शेतकरी हा जात्या कष्टाळू, मेहनती व काटकसरी आहे; पण त्याचें जीवित सर्वस्वीं पावसावर अवलंबून असल्यामुळें त्याला आपल्या जमिनीपासून पोटभर अन्न व नेसावयास वस्त्र मिळण्याची पंचाईत पडते व लग्नकार्यासाठीं किंवा सरकार देणें योग्य वेळीं देण्या-

साठीं त्याला नेहमीं पैशाची गरज पडते. अशा वेळीं त्याला एखादा सावकार पहावा लागतो.एकदां हा सावकार घरांत शिरला म्हणजे त्या शेतकऱ्याला हळू हळू आपलें घरदार विकून सर्वस्वीं त्याच्या ताब्यांत जावें लागतें. ही हीन स्थिति सरकारच्या लक्षांत लवकरच येऊन ती नाहींशी करण्याचे उपायही योजण्यांत येऊं लागले. हे उपाय म्हणजे शेतकऱ्याला तगाई रकमा देणें, शेतकऱ्यांना दिले जाणाऱ्या कर्जा-बद्दल व शेती सुधारण्याबद्दल कायदे करणें व शेतकऱ्याला कर्ज फिटेनासें झालें म्हणजे त्याची जमीन होतां होईल तों सावकारानें जप्त करूं नये, अशाविषयीं कायदे करणें वगैरे होत; पण हे सर्व उपाय जुजबी असून त्यांच्यामुळें शेतकऱ्यांची खरी स्थिति सुधारणें शक्य नव्हतें. कारण पावसाच्या अनिश्चितपणामुळें दुष्काळाची पुनरावृत्ति वारंवार होत असे व त्यामुळें शेतकऱ्याला नेहमीं नेहमीं सावकाराचे पाय धरण्याचा प्रसंग येई. आपण तगाई रकमांचेंच उदाहरण घेऊं. ह्या रकमांचा विनियोग शेतकऱ्यानें आपली शेती सुधारण्याकरितां विहीर खणणें, उत्तम बीं खरेदी करणें, नवीन नवीन सुधारलेलीं आऊतें वगैरे विकत घेणें ह्यांकडे करावा अशा हेतूनें सरकार त्याला पैसे देई व त्या रकमेवर शेंकडा तीनपासून सव्वासहा टक्के व्याज आकारी; पण एकंदरींत पहातां ह्या उपायानें शेतकऱ्याचें फारसें कल्याण झालें नाहीं. कारण दिलेल्या रकमा आपणास सव्याज हप्त्याहप्त्यांनीं परत मिळाल्याच पाहिजेत अशी सरकारची कडक सक्ति असे व ही सक्ति शेत-कऱ्यास पैसे देणें अशक्य होण्याचे वेळींच होत असल्यामुळें पुनः सावकाराकडे त्याला जावें लागे व भीक नको पण कुत्रा आवर अशी त्याची स्थिति होई. तेव्हां तगाई रकमा देण्याची पद्धत फारशी लोकप्रिय झाली नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं. शिवाय कर्ज काढल्यानें शेतकऱ्याचे स्वावलंबन, आत्मविश्वास, काटकसर करून संसार करण्याची संवय हे गुण थोडेच वाढणार आहेत ?

१९०४ व १९१२ सालचे सहकारी पतपेढ्यांचे कायदे:--हे सर्व उपाय थकल्यावर अमेरिका व युरोपसारख्या देशांतल्या पेढ्यांचे धर्तीवर हिंदुस्थानांतही शेतकी पेढ्या स्थापन व्हाव्यात व त्यांनीं खेडेगांवांतील सावकाराचें शेतकऱ्यांस कर्ज देण्याचें काम अंगावर घेऊन शहाजोग कुळासच सौम्य अटीवर हलक्या व्याजानें कर्ज द्यावें अशी सूचना हिंदुस्थानसरकारनें स्टेट सेक्रेटरीस केली; पण त्यानें ती फेटाळून लावली. तरीपण ह्या गोष्टीची चर्चा लोकांत व सरकारांत चालूच होती. मध्यंतरी १९०० सालीं सर्व हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ

पडल्यावर सरकारनें नेमलेल्या कमिशननें जर्मनीमध्यें स्थापन झालेल्या रॅफीसन पेढयांच्या धर्तीवर येथेंही पेढया स्थापन व्हाव्यात असें सुचविलें व अशाच तऱ्हेची सूचना मद्रासचे सर फ्रेडरिक निकोलसन ह्यांनीं मोठ्या परिश्रमानें तयार केलेल्या रिपोर्टामध्यें केल्यावर १९०४ सालीं को-आपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीज् नांवाचा कायदा सरकारनें पास केला.

शेतकऱ्याची स्थिति सुधारण्याकरितां प्रयोगादाखलच ह्या कायद्याचा उपयोग व्हावा अशी सरकारची इच्छा होती. सरकारी मदतीवरच नवीन स्थापन होणाऱ्या पतपेढया अवलंबून राहव्यात हें त्याला इष्ट नव्हतें. त्याचप्रमाणें त्यांना सरकारचें बिलकूल नियंत्रण नसावें हेंही धोरण चांगलें नव्हतें; म्हणन ह्या कायद्यानें ह्या पेढयांना प्रारंभीं कांहीं अटींवर पैशाची मदत देण्याचें सरकारनें ठरविलें व ह्या पेढयांचा प्रसार लोकांमध्यें करण्याकरितां रजिस्ट्रारची नेमणूक प्रत्येक प्रांताकरितां करण्यांत आली व पतपेढयांना कांहीं सवलती देण्यांत आल्या. तात्पर्य, हा कायदा करण्यांत हिंदुस्थानांत सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्थांची भरभराट व्हावी, शेतकऱ्यांची पत वाढून त्यांना थोड्या व्याजांत कर्ज मिळून स्वोन्नति करून घेतां यावी एवढाच आपला उदात्त हेतू आहे असें सरकारनें जाहीर केलें. ह्या संस्था उद्योगधंद्याच्या वाढीकरितां नव्हे तर शेतकऱ्यांची पत वाढविण्याकरितां निर्माण झाल्या व शहरांतल्या संस्था व खेडेगांवांतील संस्था असे दोन भाग करण्यांत आले. खेड्यांतील संस्थांच्या सभासदांची जबाबदारी अनियमित असावी व शहरांतील संस्थांनीं कोणती जबाबदारी स्वीकारावी ह्याबद्दल त्यांना स्वातंत्र्य देण्यांत आलें. ह्या संस्थांचें कार्यक्षेत्र मर्यादित ठेवून त्यांना कर्ज काढण्याचा अधिकार देण्यांत आला. हें कर्ज संस्थेनें आपल्या सभासदांस त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर किंवा स्थावर मालमत्तेवरच द्यावें असा निर्बंध घालण्यांत आला; त्याचप्रमाणें दर वर्षीं सरकारी हिशेबनिसांनीं संस्थेचे हिशेब तपासलेच पाहिजेत अशी सक्ति करण्यांत आली.

तथापि हा कायदा अपुरा आहे असें लवकरच सरकारच्या प्रत्ययास आलें. लहान लहान विणकामासारख्या धंदा करणाऱ्या माणसांच्या सहकारी संस्थांची तरतूद न करणें, बिनसरकारी लोकांना संस्थांवर नजर ठेवण्याची संधी न देणें, ज्या संस्थांची जबाबदारी अमर्यादित असे त्यांना मिळालेला नफा सभासदांमध्यें वांटण्याची परवानगी न देणें वगैरे दोष नाहींसे करण्याकरितां १९१२ सालीं

नवीन कायदा सहकारी पेढयांकरितां करण्यांत आला. ह्या कायद्यानें बऱ्याच सुधारणा अमलांत आल्या. उदाहरणार्थ, सहकारी पतपेढ्यांना मदत करण्याकरितां निर्माण झालेल्या मध्यवर्ती पेढ्यांचें अस्तित्व कबूल करण्यांत आलें व सहकारी पेढयांची वाढ करण्याकरितां अधिक सवलती देण्यांत आल्या. ज्या संस्थांना पैसे न देतां जिन्नस तयार करण्याकरितां लागणारा कच्चा माल पुरवितां येईल अशा संस्था कायदेशीर मानल्या गेल्या. त्याचप्रमाणें खेडेगांवांतील संस्था व शहतील संस्था हा कृत्रिम भेद काढून टाकण्यांत आला व त्याच्याजागीं मर्यादित व अमर्यादित जबाबदारीच्या संस्था असा भेद स्वीकारण्यांत आला. त्याचप्रमाण संस्था नोंदणें व तिचे हिशेब तपासणें ह्या बाबतींत नियम ढिले करण्यांत आले.

सहकारी पतपेढीची घटणाः—शेतकऱ्यांच्या उन्नतीकरितां स्थापन झालेल्या सहकारी पतपेढीमध्यें खेडेगांवांतील रहिवाशी सभासद म्हणून नोंदलेले असतात. ह्या संस्थेच्या भांडवलाचे जर भाग काढलेले असले तर प्रत्येक सभासद कांहीं ठराविक भाग विकत घेतो. ह्या संस्थेच्या सर्व सभासदांची एक सामान्य सभा असते व तिच्या हातांत सर्व सत्ता एकवटलेली असते. ह्या सभेचें काम म्हणजे वार्षिक सभेचे वेळीं प्रबंधकारिणी सभा (Managing Committee) बोलावणें, वैयक्तिक सभासदाला व प्रबंधकारिणी सभेला किती कर्ज देतां येईल तें ठरविणें, वाईट वागणुकीबद्दल एखाद्या सभासदाचें नांव पटावरून काढणें व व्याजाचा दर ठरविणें अशा प्रकारचें असतें. ह्या प्रबंधकारिणी सभेंत पांचपासून नऊ सभासद असून ते सर्व निवडलेले असतात. ह्या सभेचें काम म्हणजे नवीन सभासद प्रविष्ट करून घेणें, लोकांच्या ठेवी स्वीकारणें, बाहेरून कर्ज आणणें, सभासदांना कर्ज देणें वगैरे होय. सभेचें नेहमींचें काम करण्याकरितां एक सेक्रेटरी असतो.

सहकारी पतपेढीजवळ सभासदांनीं घेतलेल्या भांडवलाचे पैसे जमतात; पण पेढीची मुख्य भिस्त लोकांनीं आणून दिलेल्या ठेवीवर असते. ह्या ठेवी कधीं कधीं सभासदांच्याही असतात. तरीपण एवढ्या रकमेनें पेढीचें काम भागत नाहीं, म्हणून तिला सरकाराकडून किंवा मध्यवर्ती पेढ्यांकडून कर्ज घ्यावें लागतें. सरकारचें कर्ज पतपेढ्यांनीं घेणें हें तिच्या आयतत्त्वाविरुद्ध आहे, म्हणून मध्यवर्ती पेढयाच हें कर्ज पुरवीत असतात. पेढयांजवळ पैसे जमा

होण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे त्यांची गंगाजळी ही एक होय. ही गंगाजळी म्हणजे सहकारी पेढ्यांना मिळालेला पण सभासदांत न वांटलेला नफा होय.

१९१४ सालचा मॅकलॅगन कमेटीचा रिपोर्ट:--१९१४ सालचा कायदा अमलांत येण्याबरोबर सहकारी पतपेढ्यांवर एकंदरींत इष्टच परिणाम घडून आले. एकंदर सहकारी पेढ्यांची संख्या १४,८८१ व सभासदांची संख्या ६,९५,९९८ होऊन त्यांचें खेळतें भांडवल ७,४५,३१,७२५ रुपयांचें झालें. जिन्नस पैदास करणें, जनावरांचा विमा उतरणें, दूध पुरविणें, कच्चें सूत, रेशीम, खत विकत घेणें वगैरे कामांकरितां सहकारी संस्था निर्माण होऊं लागल्या. मध्यवर्ती संस्थांची वाढही झपाट्यानें होऊन लोकांचा विश्वास त्यांच्यावर बसत चालला व लोक आपल्या ठेवी जास्त प्रमाणांत ह्या पेढ्यांकडे ठेवूं लागले. अशा स्थितींत हिंदुस्थानांत सहकारी पेढ्यांची वाढ किती आहे, पुढें कोणत्या धोरणांवर ह्या पेढ्यांचें काम चाललें पाहिजे व हल्लींच्या पद्धतींत कोणत्या सुधारणा झाल्या पाहिजेत ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्याकरितां, त्याचप्रमाणें मध्यवर्ती व प्रांतीय (Provincial) पेढ्यांची घटणा व त्यांचें कामकाज, निरनिराळ्या सहकारी संस्थामधील आर्थिक संबंध, त्यांचे हिशेब तपासणें, त्यांची पाहणी करणें व त्यांची व्यवस्था, त्यांच्या गंगाजळीचा उपयोग व तिचा उल्लेख वार्षिक हिशोब तयार करतांना कसा करावयाचा ह्याबद्दल सूचना करण्याकरितां मॅकलॅगनच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. ह्या कमेटीनें सादर केलेला रिपोर्ट महत्त्वाचा आहे. ज्यांना ह्या विषयाची विशेष आस्था असेल त्यांनीं हा रिपोर्ट मूळांतच अवश्य वाचावा.

सहकारी पेढ्यांचे निरनिराळे प्रकारः—हल्लीं हिंदुस्थानांत निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी तत्त्वावर चाललेल्या पेढ्या आहेत; पण १९०४ सालीं फक्त पतपेढ्याच स्थापन व्हाव्या अशी सरकारची इच्छा होती. कारण त्या वेळीं त्याला असें वाटलें कीं, येथील लोक शेतकीवर अवलंबून असून ते अशिक्षित व मागसलेले आहेत. अशा लोकांमध्यें सहकारी तत्त्वाच प्रचार करावयाचा असेल तर सर्वांस ज्यांच्या कामाची पद्धत सहज कळेल अशाच पेढ्या सुरू केलेल्या बऱ्या. अशा पेढ्या पतपेढ्याच होत. ह्या पतपेढ्या लोकांच्या पचनीं पडल्यावर लवकरच ज्या पेढ्यांमध्यें रोख पैसे देण्याघेण्याचे व्यवहार न होतां कच्चें सूत किंवा धान्याचें बीं विकणें, विकत घेणें अशा प्रकारचे व्यवहार होतात अशा संस्था निर्माण होऊं लागल्या. असो; हल्लीं सहकारी पेढ्यांचे खालीं दिल्याप्रमाणें प्रकार करतां येतील.

सहकारी पेढ्या.

- ज्यांमध्यें निव्वळ पैशाचे देवघेवीचे व्यवहार होतात (Credit Societies.)
  - शेतकीला उत्तेजक
    - १ प्राथमिक संस्था.
    - २ मध्यवर्ती पेढ्या.
    - ३ प्रांतिक पेढ्या.
  - शेतकीशिवाय इतर धंद्यांना उपयोगी
    - १ मध्यम स्थितींतल्या व शहरांतील लोकांकरितां कर्ज देणाऱ्या पेढ्या.
    - २ नोकर लोकांना उपयोगी संस्था.
    - ३ गिरणींतले मजूर, भंगी कसाई वगैरे लोकांकरितां कर्ज देणाऱ्या पेढ्या.
- ज्यांमध्यें असे व्यवहार होत नाहींत (Non Credit Societies)
  - शेतकीविषयक.
    - १ कच्चा माल विकण्याकरितां किंवा विकत घेण्याकरितां
    - २ माल उत्पन्न करण्याकरितां
    - ३ उत्पन्न झालेला माल विकण्याकरितां.
    - ४ गुराचा विमा उतरण्या करितां.
    - ५ इतर कामांकरितां.
  - शेतकीशिवाय इतर धंद्यांचे उपयोगी.
    - तसेच पांच प्रकार.

ह्या प्रकारांपैकीं ज्यांमध्यें पैशाचे व्यवहार होत नाहींत तो प्रकार घेतला तर त्यांतही शेतकीला उपयोगी व इतर धंद्यांचे उपयोगी असे भेद केलेले दिसून येतील. ह्यांपैकीं शेतकीला उपयोगी असलेल्या सहकारी पेढयांचे पुनः पांच भाग केलेले आहेत. ह्यांपैकीं उत्पन्न झालेला माल विकणाऱ्या व जनावरांचा विमा उतरणाऱ्या संस्था विशेष महत्त्वाच्या आहेत. ब्रह्मदेशांत उत्पन्न झालेला माल उदाहरणार्थ, तांदुळ, भुईमूग वगैरे विकण्याकरितां सहकारी पेढया स्थापन झालेल्या आहेत व त्यामुळें शेतकऱ्यांचें कल्याण झालेलें आहे. कारण ह्या संस्थांमुळें सभासद झालेल्या शेतकऱ्यांना दलालांच्या मदतीशिवाय रंगून येथील ठोक मालाच्या व्यापाऱ्यांस आपला माल विकतां येतो. इतकेंच नव्हे तर ह्या दलालांना मिळणारा नफा कमी झाल्यामुळें गिऱ्हाइकांसही स्वस्त दरानें माल मिळतो. एकंदरींत ह्या पेढयांचें अनुकरण इतरत्र होणें इष्ट आहे. त्याचप्रमाणें गुरांचा विमा उतरणाऱ्या संस्थाही उपयुक्त असून त्यांचाही प्रसार ह्या कृषिप्रधान देशांत आवश्यक आहे.

शेतकीव्यतिरिक्त इतर धंद्यांना उत्तेजन देणाऱ्या संस्थाही हल्लीं चांगली कामगिरी करीत आहेत. कोष्टयांकरितां सूत व रेशीम विकत घेणें, त्यांनीं बनविलेलें कापड विकून देणें, सुतारांकरितां लांकूड विकत घेणें, व त्यांच्याकरितां लागणारी यंत्रसामग्री खरेदी करणें, इमारती बांधणें, त्याचप्रमाणें नित्य लागणाऱ्या वस्तूंची खरेदीविक्री करण्याकरितां को–आपरेटिव्ह स्टोअर स्थापन करणें ह्या कामांकरितां ह्या संस्थांचा उपयोग होतो. मात्र कधीं कधीं ह्या को–आपरेटिव्ह स्टोअर संस्थांना सभासदांना माल स्वस्त कसा विकतां येईल ह्या मुद्याची हयगय करून नफा जास्त कसा होईल इकडेच जास्त लक्ष्य देण्याचा मोह होतो. तसें न होऊं देण्याबद्दल रजिस्ट्रारनें काळजी घ्यावी.

आतांपर्यंत ज्या पेढ्यांमध्यें पैशाचा व्यवहार होत नाहीं त्यांच्याविषयीं आपण विचार केला. आतां ज्यांमध्यें असा व्यवहार होतो त्या पेढ्यांचा विचार आपणांस कर्तव्य आहे. ह्या पेढ्यांचेही पुनः दोन भाग आपण केलेले आहेत, त्यांपैकीं दुसऱ्या भागाचा प्रथम विचार करूं. ह्या प्रकारांत तीन वर्ग समाविष्ट होतात. ते वर्ग म्हणजे मध्यम स्थितींतील व शहरांतील लोकांकरितां कर्ज देणाऱ्या पेढ्या, नोकर लोकांना उपयोगी पडणाऱ्या संस्था व गिरणींतील मजूर,

भंगी, कसाई वगैरे लोकांना कर्ज देणाऱ्या संस्था होत. ह्या संस्थांची संख्या १९१४ सालीं ६०० पर्यंत गेलेली होती. ह्या संस्थांच्या सभासदांची जबाबदारी मर्यादित असावी किंवा अमर्यादित असावी हा वादग्रस्त प्रश्न आहे; तथापि मॅक-लॅगन कमिटीनें असा अभिप्राय दिला कीं, ज्या वेळीं ज्यांना कर्ज द्यावयाचें त्यांची सांपत्तिक स्थिति चांगली असते व सभासदांना कांहीं परिस्थितीमुळें एक-मेकांची पूर्ण माहिती नसते आणि संस्थेनें काढिलेले भाग विकले जाऊन तिच्या-जवळ धंद्याला लागणारें भांडवल पुरेसें असतें त्यावेळीं ही जबाबदारी मर्यादित स्वरूपाची असल्यास हरकत नाहीं. इतर वेळीं ही जबाबदारी अमर्यादितच पाहिजे. मध्यम स्थितींतील व नगरवासी लोकांकरितां काढलेल्या संस्था खरोखर पाहिलें तर सहकारी तत्त्वावर काढिलेल्या नसून समवायिक भांडवलाच्या पेढ्या कशा चालवाव्यात हें शिक्षण देण्याकरितांच काढलेल्या असतात. तेव्हां साह-जिकच ह्या पेढ्यांना व्यापारी स्वरूप येऊन सट्टेबाजीच्या धंद्यांत वगैरे पैसे घालून जास्त नफा मिळवावा ह्या हेतूनें ह्या पेढ्यांचे शेअर घेण्यांत येतात; म्हणून ह्या पेढ्यांना पैशाची मदत सरकार किंवा मध्यवर्ती पेढ्या ह्यांचेकडून बेता-बेताचीच मिळाली पाहिजे हें उघड आहे.

नोकर लोकांकरितां काढल्या जाणाऱ्या पेढ्यांचें धोरण त्या लोकांत काट-कसर व कांहीं तरी रक्कम दर महिना शिल्लक टाकणें ह्या सद्गुणांची वाढ कर-ण्याकडे असेल व त्यांना माफक दरानें कर्जानें रक्कम मिळेल तरच त्या उपयोगी आहेत. ह्या संस्था चालवितांना चालकांस मुख्य अडचण अशी येते कीं, नोक-रांच्या बदल्या निरनिराळ्या ठिकाणीं होतात व सर्व नोकरांचा दर्जा सारखा नस-ल्यानें एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें वाजवीहून जास्त रकम मागितली म्हणजे त्याला संतुष्ट करण्याकरितां संस्थेचा नियम मोडावा लागतो व शेवटीं तिचें नुकसान होतें. तेव्हां ही अडचण टाळून संस्थेला काम करितां आलें तर तिच्यापासून नोकरांचें कल्याण होण्याचा संभव आहे.

तिसऱ्या प्रकारच्या संस्थांविषयीं सामान्यपणें असा अनुभव आहे कीं, त्या स्थापन झाल्यावर त्यांना योग्य ती आर्थिक मदत व सल्ला मिळाला तर त्या आपलें काम चांगल्या रीतीनें करतात; कारण ह्या संस्थेचे सभासद सामान्यपणें स्वभावानें गरीब व समजूतदार असून त्यांना नियमित वेळीं कर्ज परत करण्याची इच्छा असते. अशा लोकांमध्यें सहकारी तत्त्वाचा प्रसार करणें फार अग-त्याचें आहे.

आतांपर्यंत शेतकीव्यतिरिक्त इतर धंद्यांना उपयोगी अशा संस्थांचा विचार आम्हीं केला. आतां शेतकीला उपयोगी अशा संस्थांचा, उदाहरणार्थ, प्राथमिक पतपेढ्या, मध्यवर्ती पेढ्या व प्रांतिक पेढ्या ह्यांचा विचार आपणांस करावयाचा आहे.

प्राथमिक पतपेढ्या—ह्यांचें महत्त्व शेतकऱ्याचे दृष्टीनें फार आहे. ज्याप्रमाणें एखाद्या देशांतील विश्वविद्यालयाचा ज्ञानप्रसाराचे कामीं उपयोग होण्यास व लोकांना साक्षर करण्यास प्राथमिक शिक्षणाच्या शाळा असणें अगदीं जरूर आहे, त्याचप्रमाणें सहकारी तत्त्वाचा लोकांस पूर्ण फायदा होण्यास प्राथमिक पतपेढ्यांचा प्रचार समाजांत व विशेषत: खेडेगांवांत खूब झाला पाहिजे; इतकेंच नव्हें तर ह्या पेढ्या ज्या उमेदीनें किंवा नेकीनें आपलें काम करतील त्यावरच पुढची इमारत उभारली जाणार आहे. ह्या पेढ्या यशस्वी रीतीनें चालण्यास त्या पूर्ण सहकारी तत्त्वावर चालून—नफ्याच्या दृष्टीनें नव्हे—त्यांच्यावर मध्यवर्ती पेढ्या व रजिस्ट्रार ह्यांची दक्षतेची पाहणी पाहिजे; त्याचप्रमाणें त्यांचे व्यवहारही चोख व व्यवहाराला धरून असले पाहिजेत. ह्या गोष्टी साध्य होण्यास ह्या पतपेढ्यांची घटणा व व्यवस्था शास्त्रशुद्ध पायावर रचलेली पाहिजे. त्या जेथें स्थापन होतील तेथें त्यांचें कार्यक्षेत्र आटपशीर असलें तरच सभासदांना एकमेकांची पूर्णपणें माहिती करून घेऊन त्यांवर नजर ठेवतां येईल. होतां होईल तों एका पतपेढीला ५०० लोकांच्या वस्तीचें एक खेडेगांव पुरें असतें. ह्या पेढ्यांत सभासद किती असावेत हें ठरविणें कठिण आहे; पण स्थूलमानानें एवढें म्हणतां येईल कीं, वर सांगितलेला एकमेकांवर नजर ठेवण्याचा हेतु साध्य होण्यास सभासदांची संख्या सुरुवातीस १० हून जास्त नसलेली बरी व ही संख्या पेढीची भरभराट झाल्यास १०० च्या आंत असावी जर्मनिमध्यें ही संख्या ९४ पर्यंत असते. हे सभासद होतां होईल तों एकाच धंद्याचे व जातीचे असले तर बरें; कारण त्यामुळें सलोखा वाढून पेढ्यांचें काम सुरळीत चालतें.

पतपेढ्या व्यवस्थित रीतीनें चालण्यास त्यांच्या सहकारी तत्त्वांची चांगली माहिती पाहिजे. तीं तत्त्वें म्हणजे सहकारी पेढ्यांचा हेतु सभसदांना साध्य होण्यास सभासदांस कोणत्या गोष्टी अवश्य माहीत पाहिजेत, सभासद कशा शीलाचे असावेत, त्यांना मिळालेलें कर्ज त्यांना केव्हां व कां फेडलें पाहिजे, त्यांचे अधिकार काय ह्यांसंबंधानें होत. असें ज्ञान पेढीच्या सभा-

सदांस एकदां असलें म्हणजे पेढीला फारसा धोका असत नाहीं. असो. ह्या पतपेढ्यांसंबंधानें बरेंच लिहितां येईल; पण हा आपला मुख्य विषय नव्हे.

मध्यवर्ती पेढ्या—मागें आपण पाहिलेंच आहे कीं, ह्या पेढ्या प्रस्थापित करण्याचा सरकारचा हेतु १९०४ सालीं नव्हता. पण पुढें लवकरच सरकारास असें कळून आलें कीं शेतकरी वर्गाच्या हिताकरतां काढलेल्या पतपेढ्या त्यांना लागणारें सर्वच भांडवल कांहीं उभारूं शकणार नाहींत; त्यांना बाहेरून मदत ही घ्यावी लागणारच. अशा परिस्थितींत शहरांतील मोठ्या पेढ्या ह्या पेढ्यांना मदत करूं लागल्या व ह्या सर्व पेढ्या हळूहळू एक होऊं लागल्या. १९१२ सालीं नवीन कायद्यान्वयें मध्यवर्ती पेढ्या मुद्दाम स्थापन होऊन त्यांमध्यें प्राथमिक पेढ्यांचे प्रतिनिधी घेण्यांत आले. कधीं कधीं ह्या मध्यवर्ती पेढ्या एखाद्या जिल्ह्यापुरत्याच किंवा त्याच्याही भागापुरत्याच असून त्यांना पैशाची मदत लागल्यास प्रांतिक पेढ्याकडे त्यांना धांव घ्यावी लागते.

कधीं कधीं मध्यवर्ती पेढ्या व प्राथमिक पेढ्या ह्यांना जोडणाऱ्या हमी घेणाऱ्या पेढ्या ' (Guaranteeing Unions) असतात. ह्या पेढ्या मद्रास, ब्रह्मदेश व मुंबई ह्या प्रांतांत बऱ्याच आहेत. ब्रह्मदेशांत प्रत्येक 'युनियन'मध्यें पांच पासून पसतीस पर्यंत प्राथमिक पेढ्या असतात व ह्या सर्व पेढ्यांचे प्रतिनिधीच ह्या युनिअनची व्यवस्था पाहतात. ही युनिअन एक संस्था म्हणून नोंदली जाते व तिची जबाबदारी मर्यादित स्वरूपाची असते. ती व्यक्तींना कर्ज न देतां पेढ्यांना देत असल्यामुळें तिला फारसा धोका नसतो. ह्या पेढीला खरें पाहिलें असतांना पेढी ही संज्ञा निरर्थक आहे, कारण तिला प्रत्यक्ष पैशाचा व्यवहार करावयाचा नसतो. ह्या संस्थेचें खरें काम म्हटलें म्हणजे तिच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांत होणाऱ्या सहकारी चळवळीवर नजर ठेऊन ती वाढविणें व निरनिराळ्या प्राथमिक पेढ्या व मध्यवर्ती पेढ्या ह्यांच्यामध्यें मध्यस्थाचें काम करणें हें होय. प्राथमिक पेढ्यांची व्यक्तिशः किती रकमेपर्यंत पत आहे हें ठरवून त्यांच्याबद्दल तेवढ्या रकमेची हमी मध्यवर्ती पेढ्यांना द्यावयाची म्हणून हमी घेणाऱ्या पेढ्या अशी संज्ञा त्यांना प्राप्त झाली आहे. मॅकलॅगन कमेटीनें अशा पेढ्या सर्वत्र असाव्यात अशी आग्रहाची सूचना सरकारास केली होती.

मध्यवर्ती पेढयांचें काम पतपेढयांच्या फंडाचा आढावा काढणें व त्यांना भांडवल पुरविणें हें असतें. ह्या पेढयांची घटना जर आपण पाहिली तर त्यावरून आपणांस त्यांचे तीन भाग करतां येतील. कांहीं मध्यवर्ती पेढयांचे सभासद भाग विकत घेणाऱ्या व्यक्ती असतात; कांहींचे सभासद प्राथमिक पेढया असतात व कांहींमध्यें व्यक्ती व पतपेढया ह्या दोघांचाही अंतर्भाव होतो. पहिल्या प्रकारच्या पेढया म्हणजे समवायिक भांडवलाच्या पेढ्याच होत. ह्या पेढ्यांनीं सहकारी पेढ्यांव्यतिरिक्त इतरांस कर्ज न दिलें व पेढीचे इतर व्यवहार न केले तर त्या नोंदण्यास कांहीं हरकत नाहीं. एकंदरींत विचार करितांना दुसऱ्याच प्रकारच्या पेढ्या सहकारी तत्त्वाचे दृष्टीनें श्रेयस्कर आहेत.

मध्यवर्ती पेढ्या व प्राथमिक पेढ्या ह्यांमधील संबंधः— प्राथमिक पेढ्यांना कर्ज पुरविण्याचें काम ह्या पेढ्यांचें असल्यामुळें त्यांच्यावर ह्या मध्यवर्ती पेढ्यांची पहाणी असली पाहिजे हें उघड आहे. सरकारची पाहणी असावी किंवा नाहीं ह्याचा तात्विक दृष्ट्या विचार केला तर ती नसलेलीच बरी असें कोणीही म्हणेल. पण हा प्रश्न बाजूला ठेवला तरी मध्यवर्ती पेढ्यांची पहाणी किती कडक असावी हा प्रश्न उपस्थित होतोच. ही पाहणी कडक ठेवली तर पतपेढ्यांना अगदीं जखडल्यासारखें वाटून लोकांमध्यें सहकारी तत्त्वाचा, स्वावलंबनाचा व काटकसरीचा उपदेश करणें अवघड जाईल. पतपेढ्या आपल्या सभासदांस जेव्हां कर्ज देतात तेव्हां त्यांची लायकी पाहूनच त्या देत असतात. असें कर्ज मिळाल्यावर एखाद्या सभासदाला जर असें कळलें कीं, आपल्या सचोटीबद्दल वर असलेल्या मध्यवर्ती पेढीला शंका आहे, तर त्याला आपला अपमान झाला असें वाटेल. आपल्या सभासदांबद्दल पतपेढ्यांना जितकी माहिती असते तितकी त्रयस्थ लोकांना नसते हें तत्त्व मध्यवर्ती पेढीनें लक्षांत ठेवावें व पतपेढ्यांवर तिनें विश्वास ठेवावा हेंच युक्त आहे.

असो; देशामध्यें मध्यवर्ती पेढी असल्यानें फार फायदा होतो असा अनुभव आहे. मध्यम स्थितींतील लोकांना आपल्याजवळ असलेली फालतु रक्कम ह्या पेढीजवळ ठेवतां येऊन देशांतील शेतकीला व उद्योगधंद्यांना सहज मदत करतां येते. समवायिक भांडवलाच्या पेढ्या बुडण्याचा संभव असतो. कारण त्या आपले पैसे धोका असलेल्या धंद्यांत कधीं कधीं पेरतात; पण सहकारी पेढ्यांना दिलेला पैसा बुडण्याचा संभव नसतो; म्हणून मध्यम स्थितींतले लोक आपले पैसे ह्याच

पेढ्यांत ठेवण्याचें ठरवितात. हल्लीं जगांतील सर्व राष्ट्रांत व्यापार, उद्योगधंदा व शेतकी ह्यांचे बाबतींत जर्मनीचा एवढा बोलबोला असण्याचें कारण त्या देशांत लहान लहान उद्योगधंद्यांना लागणारी मदत ह्यां सहकारी पतपेढ्यांकडून होते हें होय.

प्रांतिक पेढ्याः—मध्यवर्ती पेढ्या सामान्यपणें जिल्हा किंवा त्याहून लहान भागाकरितां असल्यामुळें त्यांच्याजवळ असलेलें भांडवल सामान्यतः अपुरें पडतें. ही तूट भरून काढण्याकरितां प्रांतिक पेढ्यांची आवश्यकता भासूं लागते. सर्व देशभर सहकार्याची चळवळ चालू ठेवण्यास प्रत्येक खेडेगांवांत निदान एक प्राथमिक व नंतर पुष्कळ प्राथमिक पेढ्या मिळून एक संघ, व ह्या संघावर एक मध्यवर्ती पेढी व अशा मध्यवर्ती पेढ्यांवर एक प्रांतिक पेढी असावी व सर्व हिंदुस्थानाकरितां एक साम्राज्यपेढी असावी. प्रांतिक पेढी असल्यानें प्राथमिक पेढ्यांवर पाहणी करणें व त्यांचे हिशेब तपासणें हीं कामें मध्यवर्ती पेढ्या किंवा रजिस्ट्रार ह्यांचेकडून होत असलीं तरी पैशाची तूट पडल्यास तिलाच सहज पैसे पुरवितां येतात; कारण मोठमोठ्या श्रीमंत लोकांचे पैसे ह्या पेढीकडे ठेवींचे रूपानें येऊं शकतात. ह्या प्रांतिक पेढीकडे मध्यवर्ती पेढ्यांवर ताबा असणें आवश्यक आहे. नाहींतर प्राथमिक पतपेढ्या व प्रांतिक पेढ्या यांचा अन्योन्यसंबंध सुटण्याचा संभव असतो. तसेंच मध्यवर्ती पेढ्यांनीं आपापसांत देण्याघेण्याचा व्यवहार करूं नये व करावयाचाच तर ह्या प्रांतिक पेढीमार्फतच करावा असाहि नियम असणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें प्रांतिक पेढीनें प्राथमिक पेढ्यांशीं मध्यवर्ती पेढीमार्फतच संबंध ठेवावा असा नियम असणें इष्ट आहे.

प्रांतिक पेढीच्या रचनेबद्दल मॅकलेगन कमेटीच्या सूचनाः— हिंदुस्थानांत प्रत्येक प्रमुख प्रांतांत अशी एक प्रांतिक पेढी असावी व ती स्थापन झाल्यावर तिच्या व्यवस्थापकमंडळांत प्राथमिक संस्था व मध्यवर्ती पेढ्या ह्यांचे प्रतिनिधि असावेत व त्यांचेंच बहुमत सामान्य सभेंत होईल इतकी त्या प्रतिनिधींची संख्या असावी. मात्र प्रांतिक पेढीच्या डायरेक्टरांच्या मंडळांत ह्या वर सांगितलेल्या पेढ्यांच्या प्रतिनिधींना आपला अधिकार चालवितां येऊं नये; कारण डायरेक्टर लोक म्हणजे पेढीच्या धंद्यांत निष्णात असावे लागतात आणि सहकारी पेढ्यांतर्फें आलेले प्रतिनिधी तसे असतीलच अशी खातरी देतां येत

नाहीं. प्रांतांतील सर्व मध्यवर्ती पेढ्या ह्या प्रांतिक पेढीलाच जोडलेल्या असाव्या व मध्यवर्ती पेढ्यांना प्राथमिक पेढ्या जोडलेल्या असाव्या. एखाद्या जिल्ह्यांत मध्यवर्ती पेढी नसलीच तर प्रांतिक पेढीनें प्राथमिक पेढीलाच कर्ज द्यावें; एरवीं तशी पेढी असून जर प्राथमिक पेढी आपणांस जोडून घेत नसली तर तिला तिनें कर्ज देऊं नये. मध्यवर्ती पेढीनें प्रांतिक पेढीचे नियम झुगारून दिले किंवा तिचा कारभार वाईट रीतीनें चालत असला तर प्रांतिक पेढीनें जाहीर रीतीनें तिच्याशीं असलेला संबंध तोडावा व तिनें खरेदी केलेले शेअर रद्द करावे किंवा त्यांचे घेतलेले पैसे परत करावेत. प्रांतिक पेढ्यांनीं होतां होईल तों दीर्घकाल मुदतीच्या ठेवी स्वीकाराव्या; कारण ह्या पेढ्यांना मध्यवर्ती पेढ्यांना पैसे उसने द्यावयाचे असल्यामुळें थोड्या मुदतीच्या ठेवी स्वीकारल्यानें कर्ज देणें परवडणार नाहीं. शिवाय ह्या मध्यवर्ती पेढ्यांनाहि प्राथमिक पतपेढ्यांना कर्ज द्यावयाचें असतें, तेव्हां दीर्घकालपर्यंत लोक आपल्या ठेवी मागणार नाहींत तरच हे पैसे खालपर्यंत पेरणें शक्य आहे. ज्या ठेवी बिनमुदतीच्या असतील त्यांकरितां शेंकडा ७५ इतकी शिल्लक काढून ठेवण्यांत यावी. प्रांतिक पेढ्यांना सेव्हिंग बँक खातें उघडण्याचे बाबतींत कोठलीहि आडकाठी नसावी.

प्रांतिक पेढीनें गिऱ्हाइकांना आपल्या शिलकेहून जास्त रोख रक्कम उचण्याची फारशी सवलत देऊं नये; इतकेंच नव्हे तर आपल्याजवळ भरभक्कम गंगाजळी ठेवून व जे तारणरोखे चटकन् विकतां येतील असेच रोखे जवळ ठेवून तिनें आपला व्यवहार करावा. त्याचप्रमाणें पुढच्या तीन महिन्यांत लोकांच्या ठेवीनिमित्त होणाऱ्या मागण्या पुऱ्या करण्यास पुरेसा व मध्यवर्ती पेढ्यांना तेवढ्याच मुदतींत लागणारा व देण्याचें कबूल केलेला इतका पैसा तिनें जवळ ठेवावा व फार तर मध्यवर्ती पेढ्यांना लागणाऱ्या रकमेबद्दल जास्त व्याजही आकारावें प्रांतिक पेढीनें पेढीचे इतर धंदे करण्यांत आपले पैसे कधींही गुंतवूं नयेत. एखादे वेळीं जवळ शिल्लक जास्त झाल्यास ती थोड्या मुदतीच्या बोलीनें इतर पेढ्यांत ठेवण्यास तिला हरकत नसावी. तसेंच तिला आपल्याजवळ जास्त असलेली रक्कम दुसऱ्या प्रांतिक पेढीस तिची सांपत्तिक स्थिति व पत चांगली नसेल तर खुशाल देण्याचें नाकारावें. ज्याप्रमाणें मध्यवर्ती पेढ्या आपले आंकडे व तक्ते भरून पाठवितात त्याप्रमाणें ह्या पेढ्यांनींहि ते सरकारकडे पाठवावे व मध्यवर्ती पेढ्यांचे तक्ते रजिस्ट्रारकडून त्यांना मिळावे. वर्षाअखेर तयार होणारे ताळेबंद व रिपोर्ट ह्या पेढयांनीं आपल्या भागीदारांस व ठेवीवाल्यांस पुरवावेत.

अशा प्रकारच्या सुचना मॅकलॅगन कमेटीनें सरकारास केल्या होत्या.

सहकारी पतपेढीच्या चळवळीचे हिंदुस्थानावर झालेले परिणाम:—ही चळवळ सुरू झाल्यापासून सर्व दृष्टींनीं विचार करतां एकंदरींत हिंदुस्थानचें कल्याण झालेलें आहे ह्यांत संशय नाहीं. या जगांत आजपर्यंत जे महात्मे झाले व ज्यांनीं आपल्या आचारांविचारांनीं पृथ्वीतलावरील लोकांवर अनंत उपकार करून ठेवले आहेत अशांपैकींच रॅफेसीन हा गृहस्थ होऊन गेला. युरोपखंडांत जीं राष्ट्रें प्रमुख मानलेलीं आहेत त्यांमध्यें सहकारी पतपेढयांसंबंधानें विचार करतांना जर्मनीचा उल्लेख प्रथमच करावा लागेल. विशेषतः शिक्षणाचे बाबतींत जर्मनीला नवीन विचार, नवीन कल्पना, नवीन पद्धती ह्यांबाबतींत सर्व राष्ट्रांचे गुरू मानण्यास हरकत नाहीं. तीच स्थिति शेतकीच्या बाबतींत आहे. शेतकरीवर्गाची विपन्नावस्था पाहून ह्या गृहस्थास कळवळा येऊन त्यानें सहकारी चळवळ सुरू केली व अप्रत्यक्षपणें सगळ्या जर्मन राष्ट्राला आपलें कायमचें ऋणी करून ठेवलें. तीच स्थिति आज हिंदुस्थानची आहे. ज्या ज्या लोकांत ह्या चळवळीचा प्रसार झाला त्या त्या लोकांत ह्या चळवळीचा पहिला परिणाम असा झाला कीं, त्यांना स्वावलंबनाचे धडे मिळाले व आपल्या पेढीचा कारभार कसा पहावा हें त्यांना समजलें. त्याचप्रमाणें ज्या लोकांना समाजसेवा करण्याची इच्छा असून ती कशी करावी हें समजत नव्हतें, त्यांना ह्या चळवळीनें नवीनच संधी आणून दिली. हिंदुस्थानांत असे पुष्कळ सुखवस्तु व सुशिक्षित लोक असतात कीं, त्यांना देशसेवा करण्याची इच्छा असते; बरें, प्रचलित राजकारणांत पडावें तर तितकें धैर्य नाहीं. अशा लोकांना ही चळवळ फार सोयीची आहे; कारण "नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता" माणसाचें श्रेय ह्या चळवळींत पडणाऱ्या इसमास मिळतें. ह्याचें कारण ही चळवळ राज्यकर्ते व लोक ह्यांना सारखीच प्रिय आहे हें होय.

ह्या चळवळीचा दुसरा परिणाम म्हणजे लोकांमध्यें उच्च ध्येयांचा प्रसार झपाट्यानें होत आहे व त्यांना योग्य वेळीं पैशाची मदत मिळाल्यामुळें त्यांना आपली स्थिति सुधारून आत्मविश्वासाची जाणींव होत आहे. शेतकऱ्यांची स्थिति सुधारल्यामुळें त्यांना शेतकीमध्यें सुधारणा करण्याची संधी प्राप्त झाली आहे. पूर्वीप्रमाणें त्यांना लागणारा पैसा आतां सावकारांकडून जबर व्याजानें घ्यावा न लागल्यामुळें उत्तम बीं व उत्तम शेतीचीं आऊतें खरेदी करणें शक्य झालें आहे व सरकारदेणें देण्याकरितां वाटेल त्या भावानें शेतांत उत्पन्न झालेला माल विक-

ण्याचीहि त्यांना जरूर राहिली नाहीं. असो. एकंदरींत शेतकरीवर्गाचें कल्याण ह्या चळवळीनें फार झालें आहे ह्यांत शंका नाहीं.

ह्या चळवळीचा तिसरा फायदा म्हटला म्हणजे सहकारी पेढीचे सभासदांना आपले खटले लवादपद्धतीनें सोडवून घेतां येऊं लागले आहेत. इंग्लिश न्यायपद्धतीचे काय काय तोटे आहेत हें सांगण्याचें हें स्थळ नव्हे व त्याची फारशी आवश्यकताही नाहीं. हल्लींचें न्यायपद्धतीचें काम इतकें खर्चाचें, दिरंगाईचें, घोटाळ्याचें व संदिग्ध स्वरूपाचें आहे कीं, न्यायकचेरींत जाऊन आपल्या खटल्याचा निकाल करून घेण्यापेक्षां नुकसान पतकरून कोर्टाची पायरी न चढलेलेंच बरें, असें कोणालाही वाटेल. अशा परिस्थितींत शेतकरी लोकांनीं ह्या सहकारी पेढीचे सभासद होऊन आपसांत तंट्याचा निकाल करून घेतला तर तो त्यांच्या फायद्याचा होईल व तसा तो होतही आहे. त्यामुळें लोकांमध्यें लवादपद्धतीनें न्याय मिळविण्याच्या प्रवृत्तीचा प्रसार होत आहे.

ह्या चळवळीचा चवथा फायदा म्हणजे कांटकसरीनें राहणें हा होय. शेतकरी सावकारापासून फक्त शेतकीच्याच कामाकरितां कर्ज काढतो असें नाहीं. त्याला आपल्या मुलांमुलींच्या लग्नाकरितां व इतरही प्रसंगीं पैशाची जरूर असते. अशा प्रसंगीं लागणारा बराच खर्च अनवश्यक असतो; पण तो टाळण्यास शेतकरी सामाजिक चालीरीती व आनंदाचे प्रसंगीं पैसा जास्त खर्च करण्याची हौस ह्यांसारख्या कारणांनीं तयार नसतो; शिवाय हे पैसे खर्च करण्यास त्यास सावकारांकडून बिनबोभाट मिळतातही. पण सहकारी पतपेढीकडून कर्ज घेतल्यावर व इतर सभासदांची नजर त्यांच्या सामुदायिक व वैयक्तिक जबाबदारीमुळें त्याच्यावर असल्यावर त्याला काटकरीनें पैसे खर्च करणें भाग पडतें. शिवाय थोड्या व्याजांत नवीन कर्ज हवें असल्यास मागचें कर्ज वेळेवर फेडून आपली पत प्रत्येक कर्ज काढणाऱ्या सभासदाला वाढवावी लागते; व तशी पत वाढविणें काटकसरीनें संसार चालवून वेळेवर कर्जाचा हप्ता भरल्यानेंच शक्य असतें.

ह्या चळवळीचा पांचवा फायदा म्हणजे सहकार्य करावयाचें असल्यामुळें पतपेढ्यांच्या सभासदांमध्यें बंधुत्वाचें नातें सुरू होतें. एकमेकांचे स्वभाव, मतें व चालीरीती ह्यांची माहिती होते, विचारविनिमय होतो व त्यामुळें देवाणघेवाण होऊन सर्व संस्थेकरितां काम करण्याची हौस वाढते. एखाद्या खेडेगांवांत

कांहीं कारणांनीं मतभेद होऊन भिन्न तट झाले असले व दोन्ही पक्षांतले लोक तेथें स्थापन झालेल्या पतपेढीचे सभासद असल म्हणजे त्यांना आपले वैरभाव पेढीकरितां काम करावयाचे असल्यास ते विसरावे लागतात. पतपेढीचे सभासद सामान्यतर्गें " समानशीलव्यसनेषु सख्यम् " ह्या तत्त्वानुसार एकाच जातीचे व धंद्याचे असतात; पण अन्य जातीचे व अन्य धंद्याचे लोक त्या पतपेढींत असूं नयेत असें कांहीं शास्त्र नाहीं व तसे ते असतातही. तेव्हां निरनिराळया जातींचे लोक एके ठिकाणीं काम करण्यास आले असतांना हिंदुस्थानच्या हाडींमांसीं खिळलेला जातिभेदाचा रोग सहकारी तत्त्वाचें औषध मिळाल्यामुळें कांहीं तरी मागें हटलाच पाहिजे व त्यामुळें समाजाचें व पर्यायानें देशाचें कल्याण झालेंच पाहिजे.

ह्या चळवळीचा सहावा फायदा म्हणजे पतीवर काम करण्याची नवीनच पद्धत सुरू झालेली आहे. प्रत्येक माणसाला ह्या जगांत कर्ज काढण्याचा प्रसंग येतो व त्याची पत लोकांत चांगली असली म्हणजे त्याला स्वस्त व्याजानें हवी तेवढी रकम मिळते; पण सर्वांनाच अशी लायकी असणें शक्य नाहीं. गरीबीमुळें, मागील कर्जाच्या भारामुळें व सावकाराच्या अक्षम्य लोभामुळें गरजू मनुष्याला कर्ज काढलेल्या रकमेवर जबर व्याज द्यावें लागतें. पण पेढयांचे सभासद होऊन त्याच माणसाला आपली पत चांगलीच वाढवितां येऊन सावकाराची पैसे परत न मिळविण्याची भीति कमी करतां येते. शिवाय कर्ज देणारा गृहस्थ आतां सावकारीच्या धंद्यावर पोट भरणारा राहिलेला नसल्यामुळें (कारण कर्ज देण्याचें काम फार व्याजाची हांव नसलेल्या मध्यवर्ती व प्रांतिक पेढयांकडे असते) थोड्या व्याजावर आपल्या गरजेपुरती रकम त्याला सहज मिळते.

अशा प्रकारचे अनेक फायदे ह्या चळवळीपासून हिंदुस्थानच्या लोकांस होत आहेत.

हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचा झपाट्यानें प्रचार होण्याचीं कारणें:—ही चळवळ हिंदुस्थानांत लोकप्रिय होण्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण असें आहे कीं, लोकांमध्यें शिक्षणाबद्दल आस्था वाढत आहे. आपली सांप्रतची स्थिति हीन आहे ती सुधारली पाहिजे ह्याची जाणीव खेडगांवांतसुद्धां होत आहे. ती स्थिति सुधारण्यास लोकांमध्यें शिक्षणप्रसार होणें आवश्यक आहे हेंही पण त्यांना समजत आहे. अशी शिक्षणलालसा लोकांमध्यें झाल्यावर व ती तृप्त होण्याचीं साधनें हळू हळू उपलब्ध होत असल्यावर साहजि-

कच एखाद्या खेडेगांवांत पतपेढी स्थापन झाली व तिचे फायदे दृग्गोचर होऊं लागले म्हणजे इतर लोक नवीन नवीन पेढ्या स्थापन करूं लागतात व सहकारी तत्त्वाचा प्रचार होत जातो. सार्वत्रिक व प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न हिंदुस्थानांत समाधानकारक रीतीनें सुटला म्हणजे ह्या चळवळीला जोराचा उठाव मिळेल हें उघड आहे.

दुसरें कारण असें कीं, ह्या चळवळीचीं मूलभूत तत्त्वें हिंदुस्थानांतील लोकांना अगदीं नवीनच आहेत अशांतला भाग नाहीं. फार प्राचीन काळापासून ह्या देशांत ग्रामसंस्था अस्तित्वांत असत व इंग्रजी राज्याचा अंमल सुरू झाल्यावरच त्यांचें महत्व कमी होत चाललें ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. अफगाण राज्य किंवा मोंगल राज्य, कितीही जुलमी असो, त्या राज्यामुळें ग्रामसंस्थांना बिलकूल धक्का बसलेला नाहीं ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. हल्लींही ह्या संस्था अगदीं गतप्राणच आहेत अशांतला प्रकार नाहीं. तेव्हां स्वराज्याचें बाळकडू लोकांस फार जुन्या काळापासून असल्यामुळें लोकप्रतिनिधीतत्त्वावर चाललेली ही चळवळ लोकांत सहज परत चालली ह्यांत नवल नाहीं. ग्रामपंचायतीचें प्रधान अंग पंचांमार्फत खटले तोडून घेणें हेंही हल्लीं ह्या चळवळीचें एक अंग आहेच. शिवाय सर्व खेडेगांवचा कारभार पंचांच्या सल्ल्यानें चालविणें व सहकारी पतपेढ्यांचा कारभार सभासदांमार्फत चालणें ह्यांतही बरेंच साम्य आहे. असो; एकंदरींत ग्रामपंचायतसारख्या संस्थेमुळें ह्या चळवळीचा प्रसार जोरांत झाला ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

तिसरें कारण म्हणजे ह्या चळवळीचीं तत्त्वें इतकीं सोपीं व बुद्धीस पटणारीं आहेत कीं, त्या तत्त्वांचा प्रचार लोकांमध्यें सहज होतो. सामान्यपणें प्रत्येकाला स्वार्थ नीटपणें समजत असल्यामुळें पतपेढ्यांपासून आपला फायदा होतो, आपणांस स्वावलंबी बनतां येतें, योग्य काळीं पैशाची मदत मिळाल्यामुळें आपली कष्टमय स्थिति सुधारता येते, समाजांत आपला दर्जा, आपली पत व आपली अब्रू वाढवितां येते व आपलें उत्पन्न वाढवितां येऊन आपली जीवितयात्रा सुखानें पार पाडतां येते. ह्या गोष्टी लोकांस सहज दिसून येतात. शिवाय हिंदुस्थानची स्थितिच अशी होती कीं, शेतकरीवर्गाला कोणी तारणारा हवा होता. हल्लीं दिवसानुदिवस महागाई होत चालली आहे, शेतकऱ्याला पुरेसें अन्नवस्त्र नाहीं, जवळ असलेली थोडीबहुत शिल्लक दारू, ताडी वगैरे मादक पेयें पिण्यांत खर्च होते वगैरे कारणांमुळें खेडेगांवांतील शेतकरी व विणकाम व इतर धंदे करणारे ह्या लोकांना

अशा प्रकारची चळवळ एक प्रकारची स्वर्गीय देणगीच वाटली असल्यास नवल नाहीं. तेव्हां ही चळवळ जोरानें वाढण्यास अनुकूल परिस्थिति हेंसुद्धां एक महत्त्वाचें कारण आहे.

असो; हा विषय अदमासाबाहेर बराच लांबला. ह्या विषयावर एक स्वतंत्र ग्रंथच होईल इतकें ह्याचें महत्त्व आहे; तथापि येथें स्थूलमानानें मुख्य मुख्य मुद्यांचें आम्हीं दिग्दर्शन केलेलें आहे. आतां ह्या चळवळींत कोणत्या सुधारणा करणें इष्ट आहे ह्याबद्दल थोड्या सूचना करून सहकारी पेढ्यांचा विषय पुरा करूं.

सहकारी पेढ्यांची भावी दिशाः—आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकांस कळलेंच असेल कीं, हिंदुस्थानांत ह्या चळवळीचा प्रसार जोरानें होत आहे. मॅक्लेगन कमिटीनें आपल्या रिपोर्टांत म्हटल्याप्रमाणें १९१४ सालीं १४,३१७ सहकारी पेढ्या स्थापन झालेल्या होत्या व १९२० सालीं ही संख्या मध्यवर्ति पेढ्या धरून ४०,७७२ पर्यंत गेली असून हल्लीं ही पेढ्यांची संख्या सारखी वाढत आहे. त्याचप्रमाणें सहकारी पेढ्यांच्या सभासदांची संख्याही १९१७–१८ सालीं १५,२१,१४८ पर्यंत जाऊन पेढ्यांचें भांडवलही शेअरविक्री, सरकार व प्रांतिक व मध्यवर्ति पेढ्या ह्यांपासून घेतलेलें कर्ज व सभासदांच्या ठेवी ह्यांमुळें सारखं वाढत आहे.

ही सर्व स्थिति एकंदरीनें विचार करतां समाधानकारक आहे ह्यांत संशय नाहीं; पण अजून आपणांस किती काम करावयाचें आहे, ह्याचा विचार केला म्हणजे छाती दडपूनच जाते. हिंदुस्थानच्या लोकसंख्येच्या मानानें देशांत शेतकरी वर्ग शेंकडा ८० ह्या प्रमाणांत आहे आणि सहकारी पतपेढ्यांच्या सभासदांची संख्या १९१९–२० सालीं ११¾ लाखांवर फारशी गेली नाहीं. तेव्हां ह्या देशांत सहकारी चळवळ पसरण्याला अद्याप किती तरी वाव आहे. तसेंच सहकारी चळवळीचें कार्यक्षेत्र शेतकी, मध्यम स्थितींतले नोकर लोक, विणकरी वगैरे धंदेवाले लोक ह्यांना मदत करण्यापुरतेंच आहे; पण युरोप, अमेरिका वगैरे खंडांत ह्या चळवळीनें सर्वत्र आपली छाप बसविलेली दिसते शेतकऱ्यांस हरतऱ्हेची मदत शेतकीच्या बाबतींत करणें, त्यांना बीं, नांगर, खत वगैरे जिन्नस पुरविणें, त्यांनीं उत्पन्न केलेला माल एकदम खरेदी करणें, त्यांना संसारांतल्या रोजच्या जिनसा पुरविणें, पाटबंधाऱ्याचीं कामें हातीं घेणें, मोठमोठ्या शहरांत व साधारण प्रतीच्या व मध्यम वस्तीच्या खेडेगांवांत सहकारी तत्त्वांवर घरें बांधणें, मोठमोठीं दुकानें

उघडणें वगैरे अनेक कामें सहकारी संस्थाच करीत असतात. हिंदुस्थानांतही अशाच दृष्टीनें चळवळीस सुरुवात केली तर देशाचें कल्याण होईल ह्यांत शंका नाहीं.

पण चळवळ कल्पनेप्रमाणें झपाट्यानें प्रसार न पावण्यास खरें कारण म्हणजे लोकांचें अज्ञान व अनक्षरत्व हें होय. हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति विचित्र असल्यामुळें ह्या देशाचे १३० कोटि उत्पन्नांपैकीं ६५ कोट रुपये सरकारच्या लष्करी व आरमारी खात्यावर विनाकारण उधळले जात आहेत. हा खर्च अवाढव्य व लोकांना न झेंपणारा आहे असें खुद्द सरकारलाच वाटत आहे; पण तो कमी करा असें म्हणतांच सरकारला तें म्हणणें पसंत पडत नाहीं. शिक्षण हा विषय लोकांच्या हातांत येऊनही दिवाणांना ह्या बाबतींत द्रव्याभावीं सक्तीच्या व प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवितां येत नाहीं. ह्याचें कारण जगांत कोठेंही नाहीं अशी खर्चाची राज्यपद्धति हें होय. असो. येथें आपणांस प्रचलित राजकारणांत शिरण्याचें कारण नाहीं; पण लोकांना साक्षर केल्याशिवाय ही चळवळ अधिक लोकप्रिय होणार नाहीं हें उघड आहे.

शेंकडा ९५ लोकांस नुसती अक्षरओळखसुद्धां नसल्यानें ह्या चळवळीस कसा विरोध होत आहे हें सहकारी पेढ्यांचें कामकाज चाललेलें पाहिलें असतांना सहज कळेल. साधे हिशेब ठेवणें हें काम करण्याससुद्धां लायक मनुष्य साधारण खेडेगांवांत मिळत नाहीं. बरें, तसा एखादा मनुष्य सांपडला म्हणजे तो इतर अशिक्षित लोकांवर चटकन् कुरघोडी करतो; तरीपण एका गोष्टीचा उल्लेख येथें आनंदानें करणें अवश्य आहे ती गोष्ट म्हणजे जेथें जेथें सहकारी चळवळींचा प्रचार होतो तेथें तेथें सामान्य शिक्षण आपणांस असावें अशी जाणीव सभासदांमध्यें उत्पन्न होते. आपण शिकलेसवरलेले असलों म्हणजे आपणांस पतपेढ्यांचा फायदा जास्त घेतां येईल व आपला दर्जा आपणांस वाढवितां येईल म्हणून पुष्कळ सभासदांची इच्छा लिहिण्यावाचण्याकडे होत आहे. सहकारी चळवळ ही शिक्षणप्रसाराचें अत्यंत महत्त्वाचें काम करीत आहे ह्यांत शंका नाहीं. हल्लीं सहकारी पतपेढ्या आपल्या लोकांच्या शिक्षणाकरितां आपल्या जादा शिलकेंतून शेंकडा १० टक्के खर्चून शाळा, वाचनालयें वगैरे बांधीत असतात व अशा रीतीनें सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न थोडाबहुत सुटत आहे ह्यांत शंका नाहीं.

वरील विवेचनावरून वाचकांस कळलेंच असेल कीं, सहकारी चळवळीला उठाव मिळण्यास लोकांत शिक्षणप्रसार झाला पाहिजे. हें शिक्षण कसें असावें ह्याबद्दल सविस्तर चर्चा करण्याचें हें स्थल नाहीं. येथें एवढें सांगणें आवश्यक आहे कीं, तें शिक्षण खेडेगांवांतील लोकांच्या आवश्यक गरजा भागविणारें असावें व त्या शिक्षणाबरोबर सहकारी चळवळीचीं मूलतत्त्वेंही शिकविण्यांत यावींत व त्याचबरोबर त्या चळवळीचें व्यावहारिक ज्ञानही देण्यांत यावें. हें व्यावहारिक ज्ञान देण्याचा सोपा मार्ग म्हणजे साधारण जाणत्या मुलांना सहकारी पतपेढ्यांच्या सभांना घेऊन जावयाचें व तेथें चालणाऱ्या कामाची त्यांना माहिती करून द्यावयाची. हिंदुस्थानांत शेतकीचें महत्त्व अतिशय असल्यामुळें तिच्या वाढीला पोषक म्हणूनच सहकारी पेढ्या स्थापन व्हायात व प्रत्येक गांवांत शेतकीला उपयोगी अशा जनावरांची उत्तम निगा राखण्याचें ज्ञान देण्याकरितां संस्था असाव्यात व ह्या संस्था अमेरिकेंत कोंबडीं, वांसरें, डुकरें ह्यांची जोपासना करण्याकरितां स्थापन झालेल्या ' डेमॉन्स्ट्रेशन क्लब ' सारख्या संस्थांच्या धर्तीवर असाव्या.

सहकारी चळवळीच्या प्रसाराला अडथळा करणारें दुसरें कारण म्हणजे सहकारी पेढ्यांवर चांगली पाहणी करणारे अधिकारी फारच कमी आहेत. प्राथमिक पेढ्या आपलें काम जितकें चांगलें त्यांनीं करावयास पाहिजे तितकें करीत नाहींत. ह्याचें कारण त्यांना अद्यापि ह्या चळवळीची यथासांग माहिती झालेली नाहीं. आपल्या सभासदांना कर्ज देतांना ह्या पेढ्या चुका करीत असतात. बरें; मध्यवर्ति पेढ्यांनीं हें काम पहावें, तर तें त्यांचें काम नव्हे. ह्याकरितांच हमी घेण्याऱ्या पेढ्यांचा जन्म झालेला आहे. ह्या पेढ्या (Guaranteeing Unions) अजून बऱ्याच कमी प्रमाणांत आहेत. वास्तविक पाहिलें तर खरी पाहणी लोकांचीच पाहिजे. जर्मनीमध्यें स्कूल्स, डेलिश किंवा रॅफेनसीन ह्यांनीं स्थापन केलेल्या पेढ्यांचें मुख्य धोरण सरकारी मदत काडीचीही न घेतां स्वतःच्या हिंमतीवर ही चळवळ चालवावयाची असें आहे. हिंदुस्थानांत ही चळवळ सुरू करावयाचें श्रेय सरकारास असल्यामुळें त्याच्यावरच ही पाहणी करण्याची जबाबदारी येऊन पडलेली आहे. दिवसानुदिवस आपला नोकरवर्ग वाढविणें त्याला भाग पडत आहे, व त्यामुळें जास्त जास्त पैसा ह्या चळवळीवर खर्च होत आहे. इतकेंही करून पुनः अधिकाऱ्यांची तूट भासतच आहे. तेव्हां सर्वांत उत्तम मार्ग म्हणजे लोकांनीं आपण पुढें होऊनच हें काम हातीं घेतलें पाहिजे; पण ही गोष्ट साध्य होण्यास लोकांत शिक्षण वाढलें पाहिजे. ह्यावरून शिक्षणाचें महत्त्व किती आहे हें वाचकांस कळून येईल.

सरकारची पहाणी पतपेढयांवर असल्यानें असा एक वाईट परिणाम होतो कीं, लोकांची–व हिंदुस्थानांत असे अज्ञानी लोकच फार आहेत—ही चळवळ सरकारची आहे अशी समजूत होऊन पतपेढ्यांनीं दिलेलें कर्ज परत न केलें किंवा दिरंगाईनें केलें तरी चालेल असें त्यांस वाटावयास लागतें. सरकारजवळ मुबलक पैसा असल्यानें तो कर्ज देतांना विशेष खबरदारी घ्यावी किंवा तें कर्ज घेतल्यावर त्याचा सांगितलेल्या कामाकडेच उपयोग करावा अशी त्यांची कल्पनाच होत नाहीं. सरकारचा संबंध असल्यानें दुसरा महत्वाचा तोटा म्हणजे रजिस्ट्रार लोक वारंवार बदलत असल्यानें सहकारी चळवळीचें धोरणहि स्थिर रहात नाहीं. एका रजिस्ट्रारला वाटतें कीं, पतपेढयांच्या सभासदांकडून सक्तीनें ठेवी घ्याव्यात किंवा त्यांची संख्या मर्यादित करावी तर त्यांच्या जागीं येणाऱ्या दुसऱ्या रजिस्ट्रारचें मत अगदीं उलट असून तो आपलें निराळेंच धोरण ठरवितो. ह्या कारणाकरितां लोकांचीच पतपेढ्यांवर पहाणी करणें अधिकार इष्ट आहे. सरकारचा संबंध जितका कमी तितका सहकारी तत्त्वांचा मूळ हेतु साध्य होण्याचा संभव जास्त. हें तत्त्व जरी कबूल केलें नाहीं तरी हिंदुस्थानांत सरकारी संबंध अजीबात तोडणें शक्य नाहीं. कोठलीही सहकारी संस्था अस्तित्वांत येण्यास ती नोंदली गेल्याशिवाय कायदेशीर मानली जात नाहीं व ही संस्था नोंदण्याचें काम को-आपरेटिव्ह सोसायटीज ह्या कायद्यानें रजिस्टरकडेच सोंपविलें आहे. तेव्हां रजिस्ट्रारनें हें काम करून सामान्यपणें पतपेढ्या आपलें काम कसें करितात, लोकांच्या ठेवींचा विनियोग नीट तऱ्हेनें होऊन त्या सुरक्षित आहेत किंवा नाहींत व त्यांचे हिशोब व्यवस्थित ठेवले आहेत किंवा नाहींत ह्या बाबतींत त्यांच्यावर नजर ठेवावी आणि एखाद्या सहकारी पेढीचा कारभार बरोबर रीतीनें होत नसल्यास तिला दोन तीन वेळां समज देऊनसुद्धां ती आपलें वर्तन सुधारीत नसेल तर तिचें नांव पटावरून काढून टाकावें. तात्पर्य, सरकारचा संबंध पेढ्यांवर पाहणी करण्यापुरतांच असावा व लोकांनींच ह्या पेढ्यांचें कामकाज पाहून त्यांचा प्रसार करावा हा उत्तम मार्ग होय.

सरतेशेवटीं एका मुद्याचा विचार करून आपण हें प्रकरण पुरें करूं. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, शेतकीच्या उत्तेजनार्थ स्थापन झालेल्या पेढ्यांचे प्राथमिक पेढ्या, मध्यवर्ती पेढ्या व प्रांतिक पेढ्या असे तीन वर्ग केलेले आहेत. त्या तीन प्रकारच्या पेढया प्रत्येक प्रांतापुरत्याच आहेत व सहकारी चळवळीचा जोरांत प्रचार झाल्यावर पतपेढयांना लागणारें भांडवल मध्यवर्ती व प्रांतिक

पेढयांना पुरविणें शक्य होणार नाहीं, तेव्हां सर्व प्रांतांची गरज भागविण्याकरितां एक भारतवर्षीय पेढी नुकतीच स्थापन झालेल्या इम्पेरिअल बँकेच्या धर्तीवर स्थापन होणें जरूर आहे अशी पेढी स्थापन झाल्यानें मोठमोठ्या लोकांना आपले पैसे ठेवी म्हणून ठेवणें सोपें जाईल व प्राथमिक पेढयांना लागणारा पैसा सहजच उत्पन्न होईल. इतकेंच नव्हे तर एका प्रांतांत प्रांतिक पेढीजवळ वाजवीपेक्षां जास्त पैसा शिल्लक झाला तर तो पैसा त्या पेढीकडून काढून दुसऱ्या प्रांतांतील प्राथमिक पेढयांना पुरविणेंही ह्या पेढीला शक्य होईल.

हल्लीं प्राथमिक पेढयांना लागणारा पैसा, मध्यवर्ती पेढयांनीं दिलेलें कर्ज, सभासदांच्या ठेवी वगैरे मार्गांनीं वसूल होतो. मध्यवर्ती पेढयांचें भांडवल त्यांनीं विकावयास काढिलेले भाग, लोकांच्या ठेवी व सरकारनें दिलेलें कर्ज ह्यामुळें उत्पन्न होतें व प्रांतिक पेढयांचें भांडवलही ह्याच मार्गांनीं निर्माण झालेलें असतें. पण सहकारी चळवळीला मध्यवर्ती व प्रांतिक पेढयांचे भाग श्रीमंत लोकांनीं विकत घेऊन त्यांनीं आपला संबंध ठेवावा ही गोष्ट फारशी अनुकूल नाहीं. तेव्हां मध्यवर्ती व प्रांतिक पेढयांचे भाग प्राथमिक पेढयांच्या सभासदांनींच विकत घेऊन त्यांनींच त्या पेढया आपल्या ताब्यांत घ्याव्या हें श्रेयस्कर आहे. हल्लीं प्राथमिक पेढयांचें काम वाढत असल्यानें व त्यांना मध्यवर्ती पेढ्यांकडून माफक दरानें कर्ज मिळत असल्यामुळें त्यांना बराच नफा होऊन तो गंगाजळींत (Reserve) समाविष्ट होऊन ती बरीच फुगत आहे. गंगाजळीच्या जोरावर हल्लीं मध्यवर्ती व प्रांतिक पेढयांचे जे बाहेरचे भागीदार असतील त्यांचे सर्व भाग विकत घेऊन त्यांचा संबंध तोडणें अगदीं शक्य आहे. तेव्हां ह्यापुढें ह्या पेढया प्राथमिक संस्थांच्या सभासदांच्या सर्वस्वीं ताब्यांत जाणेंच सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीनें श्रेयस्कर आहे.

असो. सहकारी चळवळीचा प्रसार मोठ्या प्रमाणांत करीत असतांना लोकांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवावी तीही कीं, ह्या चळवळीचा जन्म इतर व्यापारी पेढयांप्रमाणें मोठा प्रमाणांत नफा मिळवून लोकांनीं श्रीमंत होण्याकरितां नाहीं. सहकार्याची चळवळ प्रथम विपन्नावस्थेंत असलेल्या शेतकरी वर्गाच्या उन्नतीकरतां जर्मनीमध्यें प्रादुर्भुत झाली. लोकांचें शील वाढविणें, त्यांची मानसिक दुर्बलता घालविणें, संघशक्तीचें महत्व समजून देणें व लोकांना अप्रत्यक्षपणें स्वतःच्या देशाचा कारभार पहाण्यास शिकविणें ह्या उदात्त हेतूंनींच सहकारी पतपेढया स्थापन झाल्या व तशाच तत्त्वावर त्या चालविण्यांत आल्या तर देशाचें कल्याण होईल हें उघड आहे.

अखिल भारतीय पतपेढ्यांच्या सभासदांची वाढ दाखविणारें कोष्टक.

	१९०६—१०	१९१०—१५	१९१५—१६	१९१६—१७	१९१७—१८	१९१८—१९	१९१९—२०
मध्यवर्ती पेढ्या (प्रांतिक व जिल्हानिहाय मध्यवर्ती पेढ्या व बँकिंग युनिअन धरून.) ...	१९८७	२३६७७	४७७०६	७६,१०५	९१,४९४	१,०७,०१७	१,२७,०२६
पहाणी करणाऱ्या व हमी घेणाऱ्या युनिअन.			५६०७	८२७०	९९९७	१३,७०६	१७,२७४
कृषीवलोत्तेजक (जनावरांचा विमा उतरणाऱ्या संस्था धरून.)	१०७६६३	४१९०९६	७१६८५८*	७,८४,२५२	८,५७,६०७	९,७८,२१६	११,८१,७१८
शेतकीव्यतिरिक्त इतर धंद्यांना उत्तेजन देणाऱ्या पेढ्या.	५४२६७	८९१५७	१,४८,१९५	१,७६,७०६	२,०४,१५७	२,६१,६५५	३,३९,४३०
शेवटल्या दोन प्रकारच्या प्राथमिक पेढ्यांच्या सभासदांची एकंदर संख्या	१,६१,९१०	५,४८,२५३	८,६५,०५३	९,६०,९६०	१०,६१,७६४	१२,३५,८९१	१५,२१,१४८

* ह्यांत जनावरांचा विमा उतरणाऱ्या पेढ्यांच्या सभासदांचा समावेश होत नाहीं.

ह्यांत मुंबई व संयुक्तप्रांत येथील जनावरांचा विमा उतरणाऱ्या पेढ्यांच्या सभासदांचा समावेश होत नाहीं.

अखिल भारतीय सहकारी पतपेढ्यांचे खेळत्याभांडवलाचे आंकडे दाखविणारें कोष्टक २ रें.

(आंकडे हजारांचे आहेत.)

	१९०६—१०	१९१०—१५	१९१५—१६	१९१६—१७	१९१७—१८	१९१८—१९	१९१९—२०
भागांची विक्री होऊन वसूल झालेलें भांडवल ...	१,३१९	८,४८७	१७,७७०	२१,२२३	२४,५४,८०५	२८,४२३	३४,००९
सालअखेर सभासदांकडून घेतलेलें कर्ज व ठेवी.	१,४१२	८,८२८	६,७३७	७,९०१	८,९४१	१,०८९५	१३,७०२
सालअखेर पेढ्यांकडून घेतलेलें कर्ज व ठेवी. ...	१,३५९	१९,३४२	२,६२०	३,२३०	४,४८६	६,१७६	७,३९८
सालअखेर प्रांतिक व मध्यवर्ती पेढ्यांकडून घेतलेले कर्ज व ठेवी. ...	...	...	१३,१२८	४०,१७२	४७,७३७	५७,८९३	७३,०९४
सरकारकडून सालअखेर घेतलेलें कर्ज. ...	५८६	१,७८७	१,५९९	१,७२५	२,३२७	३,४०:	३,७३८
सालअखेर सभासद नसलेल्या लोकांकडून व इतर मार्गानीं घेतलेलें कर्ज व ठेवी	१,९६९	१४,१९८	३३,५३३	३८,८३७	४४,४८०	५३,६९२	६४,१७८
गंगाजळी व इतर फंड.	१६७	२५००	७,८८०	९२०४	११,५७,००५	१५,०२२	१७,८८०
एकंदर ..	६,८१२	५४,८४२	१,०३,२६७	१,२२,२९२	१,४१,०९४	१,७५,५१४	२,१४,०७१

ह्यांत प्रांतिक व मध्यवर्ती पेढ्यांनीं दिलेल्या कर्जाचा समावेश होतो.

अखिल भारतीय सहकारी पेढ्यांची वाढ दाखविणारें कोष्टक.

	१९०६—१०	१९१०—१५	१९१५—१६	१९१६—१७	१९१७—१८	१९१८—१९	१९१९—२०
मध्यवर्ती (प्रांतिक व जिल्हानिहाय व बँकिंग युनियन धरून) ...	१७	२३१	२४४	२६९	२८२	३३३	४६०
पहाणी करणाऱ्या व हमी घेणाऱ्या संस्था			३६२	४९६	५९२	७४८	९९४
कृषीवलोत्तेजक पेढ्या (जनावरांचा विमा उतरणाऱ्या पेढ्या धरून) ...	१७१३	१०८९१	१६०५०	२१०६२	२४१४०	२९३८७	३६७१६
शेतकीव्यतिरिक्त धंद्यांना उत्तेजन देणाऱ्या. ...	१९६	६६४	१०१९	१२०९	१४५१	१९७१	२६६२
एकंदर ...	१९२६	११७८६	१९६७५	२३०३६	२६४६५	३२४३९	४०७७२

एतद्देशीय सराफलोकांच्या पेढ्या.

आतांपर्यंत आपण ज्या पेढयांचा विचार केला त्या एकाच माणसानें चालविलेल्या नाहींत. त्यांचा विशेष म्हणजे त्या पुष्कळ लोकांच्या भांडवलांवर स्थापन झालेल्या आहेत; पण आतां आम्ही ज्या पेढयांचा नामनिर्देश करणार आहोंत त्या पेढया निवळ खाजगी स्वरूपाच्या आहेत. हिंदुस्थान देशाचा व्यापार जगांतील इतर राष्ट्रांशीं फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे व हिंदुस्थान देश मूळचाच इतका मोठा आहे कीं, त्याचा एकेक प्रांत युरोपांतील एकेक देशाएवढा आहे. तेव्हां त्या देशाचा इतर राष्ट्रांशीं किंवा देशांतील एका भागाचा दुसऱ्या भागाशीं जेव्हां व्यापार चालत असे, तेव्हां व्यापाऱ्यांनीं एकमेकांवर हुंडी काढण्याचा प्रघात असलाच पाहिजे. ह्या हुंडया पुष्कळ वेळां सराफ किंवा पेढीवाले काढीत असत. ह्या पेढीवाल्याचें काम म्हणजे पैशाची वटावणी करणें, एका गांवाहून दुसऱ्या गांवाच्या लोकांना भलावण (Letter of credit) देणें, कधींकाळीं राजेलोकांना कर्जानें पैसे देणें हें असे. मराठेशाहींत रास्ते, किबे वगैरे प्रसिद्ध सावकारांनीं वेळोंवेळीं पेशवे वगैरेंना मदत केलेली आपण इतिहासांत वाचतों. ह्या सावकारांचें महत्व मोंगल बादशहा व ईस्ट इंडिया कंपनी ह्यांच्या अमदानींत फार होतें. उदाहरणार्थ, जगतशेट व उमीचंद ह्यांना लार्ड क्लाइव्हला कसें खूष ठेवावें लागलें हें इतिहासज्ञांस सांगावयास नको. ह्या सावकारांना राजकारणांत इतकें महत्व येण्याचें कारण पूर्वी लोक आपले कर सामान्यपणें धान्याचे रूपानें देत व सरकारला आपल्या कांहीं नोकरांना व लष्कराचा खर्च चालवितांना रोख नाण्याची जरूरी लागे व अर्थातच हे सावकार धान्याचे पैसे करून ते सरकारास पुरविण्याचें काम करीत असत. एकदां एका गृहस्थानें हें काम हातीं घेतलें म्हणले त्याच्याच वंशांत तें कायमचें जाई व अशा रीतीनें त्या घराण्याला पैशाच्या जोरावर सरकारांत व राजकारणांत महत्व मिळे. १८५७ सालीं जेव्हां शिपायांचें बंड झालें तेव्हां बंगालच्या सरकाराला बन्सीलाल अमीचंद ह्यानें पैशाची बरीच मदत केली होती असा उल्लेख सांपडतो. असो. हल्लींसुद्धां हिंदुस्थानाच्या सराफबाजारांत-विशेषतः लहान लहान व्यापारी, मध्यम स्थितींतले लोक व शेतकरी लोक ह्यांना-पैसे उसने देण्याकरितां ह्या सराफलोकांचें अस्तित्व आढळून येतें. इम्पेरियल

बँक व देशांतील छोटे व्यापारी ह्यांचा संबंध येणें जवळ जवळ अशक्य असल्या-मुळें ह्या सराफांची दोघांनाही जरूर लागते व हे सराफ म्हणजे इम्पेरियल बँक व व्यापारी लोक ह्यांना जोडणारे उत्कृष्ट जुवे होत. हे सराफ लोक व्यापारी असतात व सराफीहि असतात. हे लोक आपल्याच धंद्यांतील लोकांवर हुंड्या काढतात व हे लोक सचोटीचे असल्यामुळें ह्या हुंड्या स्वीकारल्या जात नाहींत असें क्वचितच घडतें. वर आम्हीं सांगितलेंच आहे कीं, ह्या सावकार लोकांचें महत्व सरकारदरबारीं फार असे. पण हल्लीं सर्वच परिस्थिति बदलल्यामुळें ह्या लोकांना हल्लीं सामान्य लोकांशींच संबंध ठेवावा लागतो. ह्या लोकांची बाजारांत पत चांगली असल्यामुळें त्यांच्या हुंड्या चोहोंकडे चालतात. हुंडी हा शब्द फारशी भाषेंतील " हिंद्वीअर हिंदु " ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. पूर्वीं आपल्या देशांत हुंडीची पद्धत असून कौटिल्याच्या अर्थशास्त्र ह्या नांवाच्या पुस्तकामध्यें हुंडी ह्या अर्थीं आदेश असा शब्द आलेला आहे. असो. हल्लीं मोठमोठ्या शहरांतील सावकार आपले गुमास्ते निरनिराळ्या ठिकाणीं ठेवून त्यांच्यावर हुंड्या काढीत असतात व रोख नाणें न पाठवितां या हुंडीच्याद्वारें पैशाचे व्यवहार करीत असतात. ह्या हुंड्यांवर कांहीं मनोती व दलालीही आकारण्यांत येतात व ही दलाली आकरणारे दलाल लाखों रुपये मिळवीत असतात. तेव्हां हुंड्यांचा प्रचार केवढ्या मोठ्या प्रमाणांत चालत असेल ह्याची वाचकांस कल्पना होईल. हुंड्यांची मुदत फार तर ५१ दिवसपर्यंत असते, म्हणजे एकदां हुंडी काढल्यावर तिचे पैसे कधीं अकराव्या दिवशीं तर कधीं एकविसाव्या किंवा एके चाळीसाव्या किंवा एकावन्नाव्या दिवशीं मिळूं शकतात. कांहीं हुंड्या दर्शनी असतात व तिचे पैसे ती हातीं पडल्यावर द्यावे लागतात.

एतद्देशीय खाजगी पेढीवाले व वर्तमानकालीन समवायिक भांडवलांवर पेढीचा धंदा करणाऱ्या कंपन्या ह्यांत सामान्यपणें मुख्य फरक असा आहे कीं, खाजगी पेढीवाले फारसा ठेवी लोकांकडून स्वीकारीत नाहींत व पाश्चात्य देशांतील पेढ्यांप्रमाणें आपल्या नोटा काढून प्रचलित करीत नाहींत; म्हणजे ह्याचा असा अर्थ होतो कीं, ह्या पेढीवाल्यांच्या व्यवहारांच्या मुळाशीं फारशी पत नाहीं, तर नुसती व्यापारी सोयीच्या दृष्टीनें पैशांची देवघेव असते. ह्याचा असा परिणाम झाला आहे कीं, खेडेगांवांतील व्याजाचा दर व शहरांतील व्याजाचा दर ह्यांत बराच फरक असून त्यामुळें लोकांची गैरसोय झालेली आहे.

एतद्देशीय सराफ लोकांचा मुख्य उपयोग देशांतल्या व्यापाराला हल्लीं फार होत असतो. शेतकरी लोकांना आर्थिक मदत हेच करीत असतात; त्याचप्रमाणें खेडेगांवांतून मोठमोठ्या शहरांतील बाजारांत किंवा बंदरांवर धान्य वगैरे माल पोंचविणें व अन्य देशांतून आलेला कपडा, लोखंडसारखा माल देशांतल्या लहान गांवामध्यें नेणें हीं कामें हेच लोक करीत असतात. पण हे लोक युरोपिअन लोकांच्या हुंड्या क्वचितच मनोतीनें वटवितात व परराष्ट्रीय हुंड्या तर ते कधींच विकत घेत नाहींत. तसेंच सरकारी तारणरोख्यांवर किंवा अशाच तऱ्हेच्या इतर रोख्यांवर ते कधींच कर्ज देत नाहींत. जरूरीचे वेळीं हे लोक आपल्या मुनीमांना रुपये देऊन हंगामाचे वेळीं रेल्वेनें निरनिळ्या ठिकाणीं पाठवितात, किंवा ज्या खजिन्यांत खर्चाला लागणाऱ्या रकमेपेक्षां जास्त शिल्लक ठेवलेली असते त्या खजिन्यावर काढलेल्या हुंड्या विकत घेतात. कधीं कधीं हे लोक व्यापारी लोकांनीं काढिलेल्या हुंड्या जास्त प्रमाणांत विकत घेतात व त्यांना पैशाची जरूर लागली म्हणजे ते इंम्पेरिअल बँकेकडे जातात व त्यांच्या शहाजोग-पणाबद्दल त्या बँकेची खातरी असल्यामुळें ती बँक त्यांना खुषीनें मदत करते.

हे लोक देशांतल्याच नाण्याच्या अदलाबदलीचा धंदा हल्लीं फारसा करीत नाहींत; पण पूर्वीं हा धंदा महत्वाचा मानला जाई व पोतदार नांवाचे लहान प्रमाणांत सराफी धंदा करणारे लोक हा उद्योग करीत असत. तथापि हल्लीं त्याचें महत्व बरेंच कमी झालें आहे. वर्तमानकालीं गहाणावर कर्ज देणें, अडतीचा धंदा करणें, धान्य, ताग, कापूस वगैरे जिनसांचे सट्टे करणें व सोन्याचांदीवर लोकांना कर्ज देणें हे ह्या लोकांचे नेहमीचे धंदे आहेत.

इंपेरिअल बँकेचा दर व हुंडीचा दर:—बाजारांत जेव्हां पैशाची फारच अडचण असते तेव्हां उत्कृष्ट हुंड्यांचा दर व बँकांचा दर जवळ जवळ सार-खाच असतो; पण ज्या वेळीं हा दर शेंकडा ८ हून जास्त असतो त्या वेळीं सराफ लोक कर्ज काढण्याचें बंद ठेवतात. सरकारी तारणरोख्यांवर दिलेल्या कर्जा-वर आकारलेला व्याजाचा दर म्हणजे इंपेरिअल बँकेचा दर व इतर तारणरोख्यां-वर दिलेल्या कर्जाचा व्याजाचा दर ह्यांमध्यें फरक राहतो. कारण सराफ लोक नेहमीं पैशाची चणचण असली म्हणजे इंपेरिअल बँकेपेक्षां जास्त दर आकार-तात. एखादे वेळीं बाजारांत पैसा नसल्यामुळें बँकेचा दर जरी थोडासा वाढला

तरी सराफ लोकांना त्याची पर्वा नसते. सामान्यपणें कलकत्त्यांत तरी निदान बँकेच्या दराहून हुंड्यांचा दर शेंकडा दोन किंवा तीन टक्क्यांनीं जास्त असतो व मुंबईत चढाओढ जास्त असल्यामुळें $1\frac{1}{2}$ टक्क्यांनीं तो जास्त असतो. ह्या दोन दरांतील फरक हा ह्या सराफ लोकांचा फायदा असतो. ज्या वेळीं बाजारमंदी असते व पैसा विपुल असतो त्या वेळीं हेच सराफ लोक बँकेच्या दरापेक्षां आपला दर ज्या मानानें हुंड्या मिती कापून वटवावयाच्या असतील त्या मानानें कमी करतात. एकंदरींत इंपेरिअल बँकेचा दर कांहीं असो, बाजारांत ज्या मानानें पैसा खेळत असेल त्या मानानें हुंड्यांचा दर सराफ लोक ठरवीत असतात व बँकेचा दर हा हिंदुस्थानचा निर्गत माल परदेशीं पाठविण्यास व येथील उद्योग-धंद्यास लागणाऱ्या कच्चया मालाचा पुरवठा करण्यास लागणाऱ्या पैशाच्या मागणी-वर अवलंबून असतो. ज्या वेळीं ती पेढी इंपेरिअल बँकेला पैशाची जास्त गरज असते त्या वेळीं जास्त व्याज देऊं करून लोकांकडून थोड्या मुदतीच्या ठेवी स्वीकारते व आपला दरहीं वाढविते व ज्या वेळीं तिला गरज नसते त्या वेळीं अर्थात्च एतदेशीय सराफ लोकांचे व्यवहार व समवायिक भांडवलांच्या पेढ्यांचे व्यवहार ह्यांचे जसे निकट संबंध यावयास पाहिजेत तसे अद्याप येत नाहींत ही खेदाची गोष्ट आहे. ह्याचें कारण सराफ लोकांना समवायिक भांडवलाच्या पेढ्यांची वाढ होणें अनिष्ट वाटतें. त्यांना अशी भीति वाटते कीं, ह्या पेढ्या जास्त झाल्या म्हणजे आपल्या धंद्याला उतरती कळा लागेल. वस्तुतः ही भीति निरा-धार आहे. कारण ह्या देशांत देशी पेढ्यांच्या वाढीला पुष्कळ जागा आहे विशेषतः ह्या कृषीप्रधान देशांत कृषीवलोत्तेजक पेढ्या खेडेगांवांत स्थापन झाल्या म्हणजे फारच सोयीचें होईल. कारण एका ठिकाणाहून दुसरीकडे पैसे पाठविणें, आपले पैसे ठेव म्हणून ठेवणें व मिति कापून हुंड्या वटविणें हीं कामें त्यांना ह्या पेढ्यांकडून करून घेतां येतील.

उपसंहार.

आतांपर्यंत आपण हिंदुस्थानांतील पेढ्यांच्या वाढीचा इतिहास पाहिला. ह्यावरून आपणांस असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या मानानें येथें पेढ्यांच्या वाढीस विलक्षण वाव आहे. ह्या देशांत पेढ्यांची वाढ जोरांत न होण्याचीं कारणें मुख्यतः लोकांचें अज्ञान व शहरापासून दूर गांवांत राहिल्यामुळें व्यापारविषयक अनास्था व लोकांची जगप्रसिद्ध गरिबी हीं होत. हीं कारणें जरी खरीं असलीं तरी हिंदुस्थानचे लोक आपल्या ठेवी जास्त प्रमाणांत पेढयांत अनामत म्हणून ठेवीत आहेत ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

हिंदुस्थानांत १९१३ सालीं जी पेढया बुडण्याची सांथ आली तिजमुळें येथील पेढयांमध्यें कोणत्या सुधारणा झाल्या पाहिजेत हें सरकारला व लोकांना चांगलें समजून आलें. हिंदुस्थानांत हल्लीं पेढयांवर सरकारची चांगली असावी तशी पाहणी नाहीं. पुष्कळ लोक पेढी ह्याचा अर्थ आपल्या फायद्याकरितां फिरवून नवीन पेढया काढीत असतात. ह्या देशांत पेढया सुधारावयाच्या असतील तर चांगले शिकलेले व या धंद्याला वाहून घेतलेलेच लोक पाहिजेत. 'येरे गबाळाचें काम नव्हे.' पाश्चिमात्य देशांत पेढी हा विषय व्यवस्थित रीतीनें सशास्त्रीय पद्धतीनें शिकविला जातो व जे लोक 'पेढीवाल्यांच्या सभेच्या' परीक्षेला उतरतील त्याच लोकांना पेढयांच्या डायरेक्टरमध्यें घेण्यांत येतें तशी स्थिति येथें नाहीं. ह्या देशांत एखादा गृहस्थ धनवान् असला व त्याचें लोकांत चांगलें वजन असलें म्हणजे त्याला जरी पेढी कशाशीं खातात हें ठाऊक नसलें, तरी तो एखाद्या पेढीचा डायरेक्टर सहज बनतो. ही गोष्ट सर्वथैव अनिष्ट आहे. ही आपत्ति जर टाळावयाची असेल तर प्रत्येक पेढी निर्माण होत असतांना त्या पेढीमध्यें शिरणारे डायरेक्टर हे तज्ज्ञच असले पाहिजेत अशी व्यवस्था झाली पाहिजे. त्याचप्रमाणें हल्लीं असलेल्या शिक्षणसंस्था, महाविद्यालयें ह्यांनीं पेढी हा विषय इतर व्यापारी विषयांबरोबर व्यवस्थित रीतीनें शिकविला पाहिजे व विश्वविद्यालयांनीं तज्ज्ञ परिक्षक नेमून विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन जे उत्तीर्ण होतील अशाच लोकांना पेढयांनीं नोकरीस ठेवलें पाहिजे. हिंदी समवायिक भांडवलाच्या पेढयांसंबंधांनीं सरकारी नियंत्रण जरा कडकच पाहिजे. कारण त्यांचा उदय ह्या देशांत नवीनच

होत आहे. पेढी हा शब्द ज्या संस्था हा धंदा शास्त्रशुद्ध रीतीनें करीत असतील त्यांनाच लाविला पाहिजे. आपला व्यवहार सुरू करण्यापूर्वी किमान मर्यादेपर्यंत कांहीं भांडवल काढून ठेवलें पाहिजे व कर्ज देतांना व मिति कापून हुंड्या वटवितांना त्यांना कांहीं नियम पाळले पाहिजेत. अशी सक्ति केल्याशिवाय ह्या कधींही सुधारावयाच्या नाहींत. हल्लीं कांहीं पेढयांची प्रवृत्ति जमिना किंवा ज्यांची खात्री नाहीं असे तारणरोखे खरेदी करण्याकडे असते, त्यामुळें एखादे वेळीं लोकांची मागणी जोरानें सुरू झाली म्हणजे तावडतोब त्या जमिनी व ते तारणरोखे विकून पैसे उभे करणें कठीण जातें, म्हणून कांहीं ठराविक रकम शिल्लक म्हणून प्रत्येक पेढीनें ठेवलीच पाहिजे असा एक नियम होणें फार अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें पेढयांचे शेअर किती असावे व एकाच माणसाला किती कर्ज द्यावें ह्याबद्दलही कांहीं निश्चित धोरण ठरलें पाहिजे.

ह्यांहून सर्वांत महत्त्वाची सुधारणा म्हटली म्हणजे पेढयांनीं आपले हिशेबाचे तक्ते सालअखेर न छापतां दर महिन्यास तरी निदान छापले पाहिजेत. ह्याहूनसुद्धां दर आठवड्यास हे तक्ते इंपेरिअल बँकेच्या पद्धतीप्रमाणें छापले गेले तरी हवे आहेत. आपली सांपत्तिक स्थिति लोकांसमोर राहणार आहे व आपण लोकमताला जबाबदार आहोंत ही जाणीव पेढयांना असली म्हणजे त्या आपला व्यवहार शास्त्रशुद्ध रीतीनें साहजिकच करतील हें उघड आहे. पेढयांचा आत्मा म्हणजे लोकांचा अढळ विश्वास हा होय. हा विश्वास कायम रहावा असें जर पेढयांस वाटत असेल तर त्यांनीं आपला व्यवहार आरशाप्रमाणें स्वच्छ ठेवून खुला ठेवावा व आपली काय स्थिति आहे ह्याचें सम्यग् ज्ञान लोकांस वेळोवेळीं देत जावें व लोकांस आपल्या विश्वासांत घ्यावें.

पेढयांवर सरकारचें नियंत्रण असावें किंवा नसावें ह्या मुद्याची चर्चा पूर्वी एकदां आली असल्यामुळें पुनः त्याचें चर्वितचर्वण येथें करीत नाहीं.

हा उपसंहार संपविण्यापूर्वी आणखी एक दोन सूचना करणें अगत्याचेंआहे. वर सांगितल्याप्रमाणें ह्या देशांत पेढयांची वाढ न होण्याचें कारण लोकांचें अज्ञान हें होय. हें कारण जरी खरें असलें तरी लोकसंख्येच्या मानानें ह्या देशांत पुरेशा पेढया नाहींत ही गोष्ट आपणांस विसरून चालावयाची नाहीं. येथील लोक जरी शेतकीच्या धंद्याला वाहिलेले असले तरी त्यांच्याजवळ जी थोडी फार शिल्लक असते तिचा विनियोग किफायतशीर रीतीनें करण्याची संधी जर त्यांना मिळाली तर तिचा ते हटकून फायदा घेतील. ह्या देशाची लोकसंख्या हिशोबांत घेतली व त्या मानानें येथें असलेल्या पेढयांची संख्या पाहिली व ह्या स्थितीची इंग्लंड, अमेरिका व

जर्मनीसारख्या सुधारलेल्या राष्ट्रांतील स्थितीची तुलना केली तर आपणांस आपल्या मागासलेल्या स्थितीची यथार्थ कल्पना सहज करतां येईल. हिंदुस्थान देश कितीहि गरीब असला तरी येथील लोकांजवळ, परदेशच्या व्यापारी लोकांशीं घडून येणाऱ्या व्यापारीसंबंधामुळें, कांहीं तरी द्रव्यसंचय होत असतोच. तो द्रव्य-संचय जमिनींत पुरला न जावा, किंवा दागदागिने व सोन्याचांदीचीं भांडीं वगैरे करण्यांत खर्च न व्हावा अशी जर आपली इच्छा असेल तर मुंबई, मद्रास व कलकत्ता ह्या शहरांत असलेल्या पेढयांच्या शाखा जिल्ह्याच्या व तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं स्थापन झाल्या पाहिजेत.

हल्लीं हिंदुस्थानांत जर्मनीसारख्या देशांत असलेल्या औद्योगिक पेढी-सारख्या एखाद्या पेढीची फार जरूर आहे. कोठलाही उद्योगधंदा सुरू करण्याचें मनांत आणलें तर ' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ' ह्या न्यायानें प्रथम भांडवल भरपूर पाहिजे. हें भांडवल कांहीं स्वर्गांतून उतरत नाहीं; तर लोक जे पैसे सांठवीत असतात तेच पैसे गोळा करून त्यांचा उपयोग उद्योगधंद्यांकडे भांडवल पुरविण्याचे कामीं झाला पाहिजे. हल्लीं हिंदुस्थानांतल्या लहान लहान शहरांकडे आपण जर नजर फेंकली तर आपणांस असें दिसून येईल कीं, ह्या शहरांत लोकां-जवळ–विशेषतः मारवाडी लोक व महाजन लोक ह्यांच्याजवळ–बरेंच भांडवल असतें; पण हें भांडवल ते लोक पेढयांजवळ ठेवीत नाहींत; कारण एक तर देशांत पेढया फारश्या नाहींत; व दुसरें कारण म्हणजे लोकांत अज्ञान असल्या-मुळें त्यांचा, जेथें पेढया असतात तेथें, त्या पेढयांवर विश्वास नाहीं. तेव्हां एखाद्या शेतकऱ्याला किंवा एखादा धंदा काढूं इच्छिणाऱ्या माणसाला जर भांडवल हवें असलें तर त्याला ह्या महाजन लोकांचे पाय धरावे लागतात व लोक त्या माणसास पैसे देत असतांना भयंकर व्याज आकारीत असतात. असो.

ह्या लहान लहान शहरांतसुद्धां लोकांजवळ इतकें भांडवल असतें कीं, हींच लहान शहरें जर युरोपखंडांत किंवा अमेरिकेंत असतीं तर तेथें मध्यवर्ती पेढीच्या शाखांना पुरेसें काम सहजच झालें असतें. हें भांडवल एकत्र गोळा करून, लोकांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन जर देशांत लहान लहान औद्योगिक पेढया स्थापन केल्या व एक मुख्य औद्योगिक पेढी जर प्रस्थापित झाली तर येथील धंद्यांना उत्तम तऱ्हेनें उत्तेजन देण्यांत येईल. हिंदुस्थान देश कृषीप्रधान आहे व येथें सर्व तऱ्हेचा कच्चा माल पैदा होत असतो. त्याचप्रमाणें येथें कोळसाही मुबलक प्रमाणांत सांपडतो. इतकी साधनसामग्री अनुकूल असतांना व देशांत मजूरी इतर देशांच्या मानानें स्वस्त असतांना औद्योगिक बाबतींत हा देश

मागसलेला असण्याचें कारण आमच्या मतें असें दिसतें कीं, लहान प्रमाणांत व मोठ्या प्रमाणांत धंदे काढणाऱ्या लोकांस भांडवल पुरविणाऱ्या पेढीचा अभाव ह्या देशांत आहे. अशी पेढी स्थापन झाली म्हणजे ती नवीन निघणाऱ्या धंद्यानांच उपयोगी पडेल असें नाहीं; तर चिरप्रस्थापित व भरभराटीत असलेल्या धंद्यांनासुद्धां एखाद्या आणीबाणीच्या वेळीं ही पेढी आर्थिक मदत देवून त्यांच्यावरचें संकट दूर करील.

कदाचित् कांहीं लोकांना असें वाटेल कीं, ह्या औद्योगिक पेढ्या स्थापन झाल्यानंतर पूर्वींपासून असलेल्या व्यापारी पेढ्यांना ह्या सवत होऊन बसतील. पण नीट विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, ही भीति निर्मूल आहे. एक तर ह्या अवाढव्य देशांत पेढ्या जितक्या वाढतील तितक्या हव्याच आहेत. शिवाय 'गतयो भिन्न पथाहि देहिनां' हें जसें कालिदासानें माणसांविषयीं म्हटलें आहे, तसें ह्या पेढ्यांविषयीं म्हणतां येईल. व्यापारी पेढ्या व औद्योगिक पेढ्या ह्यांचीं ध्येयें व मार्ग निरनिराळे आहेत. ह्या देशांतली इम्पेरिअल बँक जरी घेतली तरी तिचेहि व्यवहार कायद्यानें ठरलेले आहेत व ही बँक व औद्योगिक पेढ्या ह्यांच्यामध्यें चढाओढ होणें शक्यच नाहीं.

हल्लीं जर्मनीमध्यें ज्या पद्धतीनें औद्योगिक पेढया आपली कामगिरी करीत आहेत त्याच पद्धतीचा अवलंब येथें स्थापन होणाऱ्या पेढीनें केला पाहिजे. जर्मनींतल्या औद्योगिक पेढयांचा विशेष असा आहे कीं, त्यांच्या रोखीच्या व्यवहाराच्या मानानें त्यांचें वसूल झालेल्या भांडवलाचें प्रमाण जास्त असतें त्याचप्रमाणें चालू असलेल्या उद्योगधंद्यांना व व्यापाराची आर्थिक मदत देण्याची व नवीन उद्योगधंदा स्थापन करणाऱ्या कंपन्याचे भाग विकत घेऊन त्यांचे लाट पुनः विकण्याची त्यांची नेहमीं तयारी असते. एकदां अशी द्रव्याची मदत केल्यावर त्या कंपनीच्या व्यवस्थापकांमध्यें आपले डायरेक्टर नेमून त्यांच्या व्यवहारांवर ह्या पेढयांना चांगल्या तऱ्हेनें व्यवस्था ठेवितां येते. इतकेंच नव्हे तर बऱ्याचशा औद्योगिक कंपन्यांशीं ह्या पेढयांचा संबंध असल्यानें त्या एकमेकांना व पर्यायानें पेढयांनाही मदत करूं शकतात ही मदत नुसती आर्थिकच नसते, तर एखादा नवीन धंदा जर एखाद्या औद्योदिक कंपनीला काढावयाचा असला तर तिला त्या धंद्यांत पडलेल्या इतर कंपन्यांना व ह्या पेढयांना सल्लामसलत विचारतां येते. ह्या औद्योदिक पेढयांना मदत करण्याकरितां त्यांच्या पाठीमागें जर्मनीची रीश् बँक व साम्राज्य सरकार असतें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, ह्या ज्या पेढ्या स्थापन होणार त्यांना सरकारनें मदत करावयाची किंवा नाहीं व करावयाची असलीच तर ती कशा प्रकारची असावी. तात्त्विकदृष्ट्या विचार केला तर सरकारचा पैसा हा पर्यायानें लोकांचा पैसा असल्यामुळें ह्या पेढ्यांना सरकारी मदत घेण्यास हरकत नाहीं व ज्या ठिकाणीं लोक व सरकार ह्यांचे हितसंबंध एकच असतात तेथें हा प्रश्नच उद्भवत नाहीं; पण जेथें लोकमताचा दाब सरकारवर नसतो किंवा जेथें लोक व सरकार ह्यांच्यामध्यें जित व जेते असा संबंध असतो, त्या ठिकाणीं औद्योगिक पेढ्यांनीं सरकारची मदत घेणें म्हणजे आपलें स्वातंत्र्य गमावणेंच होय. कारण एकदां सरकारी मदत घेतली व सरकारी दृष्टिकोण व लोकांचा दृष्टिकोण निरनिराळे असले म्हणजे खऱ्या जनहिताच्या दृष्टीनें उद्योगधंद्यांची वाढ होऊं शकत नाहीं. असो. हा प्रश्न बाजूला ठेरला व एकदां मदत द्यावयाची असें धोरण निश्चित झालें तर ही मदत कशा प्रकारची होऊं शकते तें आतां आपण पाहूं सरकारला एकाद्या औद्योगिक पेढीला (१) तिचे भाग विकत घेऊन किंवा (२) भाग विकत न घेतां कांहीं विव-क्षित अटींवर किंवा ठराविक मुदतीपर्यंत ठराविक किमान व्याज देण्याचें कबूल करून किंवा (३) पेढीच्या भांडवलाच्या मानानें विवक्षित प्रमाणांत बिन व्याजानें कांहीं रकम अनामत ठेवून किंवा (४) पेढी जो नफा वांटील त्याच्या-वर प्राप्तीचा कर माफ करून किंवा पेढीला कर्ज देऊन वगैरे उपायांनीं मदत करतां येते. ह्या आर्थिक मदतीशिवाय पेढ्यांना योग्य तो सल्ला देऊनही सरकारला मदत देतां येते.

असो. वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, हिंदु-स्थानांत औद्योगिक पेढ्यांच्या वाढीस खूब वाव आहे. हल्लीं टाटा कंपनीची अशा प्रकारची एक पेढी अस्तित्वांत आहे; पण तिचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. कारण ह्या पेढीला सरकारी स्वरूप येत चाललेलें आहे. ह्या पेढीच्या डायरेक्टर लोकांत व व्यवस्थापकांत युरोपियन लोकांचें प्रस्थ फार वाढत चाललें आहे. तेव्हां हिंदी लोकांच्या औद्योगिक गरजा काय आहेत इकडे लक्ष न पुर-वितांच ह्या पेढीचे व्यवहार चालले आहेत.

हल्लीं हिंदुस्थानांत टाटांनीं स्थापिलेल्या 'इंडस्ट्रियल' बँकेचें भांडवल बारा कोटींचें आहे. ह्या पेढीचें मुख्य काम म्हणजे वर्तमानकालीन व नवीन होऊं घातलेल्या उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देऊन त्यांची वाढ करणें हें आहे; पण त्याशिवाय नेहमींचा पेढीचा व्यवहार करणें, हुंड्यांची अदलाबदल करणें हीं कामेंही ही पेढी करीत असते. अशा रीतीनें दोन्ही कामांची सरभेसळ करणें

कितपत सुरक्षितपणाचें आहे हा प्रश्नच आहे. अशी भेसळ न करावी तर पेढीचें कार्यक्षेत्र फारच मर्यादित होतें व त्यामुळें तिला फारसा फायदाही होणार नाहीं. बरें, अशी भेसळ न करावी तर पेढीच्या ज्या थोड्या मुदतीच्या ठेवी असतात त्या गुंतून जाण्याची भीति असते. तेव्हां उद्योगधंद्यांकरितां लागणारें भांडवल पेढीच्या थोड्या मुदतीच्या ठेवींतून द्यावयाचें नाहीं असा कायद्यानें जर कडक निर्बंध केला तर औद्योगिक पेढ्यांनीं वर सांगितलेलीं दोन्हीं प्रकारचीं कामें अंगावर घेतलीं तरी हरकत नाहीं.

पण हिंदुस्थानांत औद्योगिक पेढ्यांप्रमाणें कृषीवलोत्तेजक पेढ्यांचीही फार आवश्यकता आहे. असें अनेक वेळां सांगण्यांत आलेलेंच आहे कीं, हा देश कृषी-प्रधान आहे. तेव्हां शेतकऱ्यांच्या सोयीकरितां अशा पेढ्या स्थापन होणें फार जरूर आहे. हल्लीं सहकारी पेढ्यांची वाढ देशांत झपाट्यानें होत असल्यामुळें शेतकरी स्थिति बरीच सुधारत आहे ह्याबद्दल शंका नाहीं. तेव्हां कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, शेतकीला पोषक अशा नवीन पेढ्या स्थापन करण्याची जरूरी नाहीं. दुसरें असें कीं, ह्या पेढ्या कर्ज देतांना शेतकऱ्यांकडून त्यांची जमीन गहाण म्हणून मागणार आणि शेतकरी लोकांनीं घेतलेलें कर्ज मुदतींत न फिटलें तर त्यांना आपल्या प्राणाहून प्रिय अशा जमिनीला मुकावें लागणार. बरें, पेढीच्या दृष्टीनें विचार केला तरी जमिनीचें गहाण फारसें सोयीचें नसतें. कारण प्रसंग पडला असतांना ही जमीन चटकन् विकतां येत नाहीं.

ह्या म्हणण्यांत अगदीं तथ्य नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं तथापि देशांत कृषीवलोत्तेजक पेढ्या असणें कांहीं वाईट नाहीं. हिंदुस्थान देश एवढा अवाढव्य आहे कीं, येथें असलेल्या सहकारी पेढ्यांनाच अजून किती तरी काम करण्यासारखें आहे. हें काम करण्याचें ह्या पेढ्यांनीं जर मनांत आणलें तर एकंदरींत शेतकरीवर्गाचें कल्याणच होणार आहे. हल्लीं फ्रान्स व जर्मनी ह्या देशांत अशा प्रकारच्या पेढ्या काम करीत आहेत. ह्यांचें काम श्रीमंत लोकांकडून पैसे गोळा करून तें शेतकरी लोकांना कर्जानें देण्याचें असतें. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, जमिनीचें गहाण सावकाराच्या दृष्टीनें फारसें श्रेयस्कर नसतें; पण ह्या पेढ्या स्थापन झाल्यानें ही अडचणही दूर झालेली आहे. ह्या पेढ्यांचें वर्णन जर्मनींतील पेढ्यांचा इतिहास सांगतांना आलेलेंच आहे. तेव्हां त्याची द्विरुक्ति येथें करीत नाहीं. असो. अशा पेढ्या स्थापन होणें सर्वस्वीं इष्ट व श्रेयस्कर आहे, ही गोष्ट मात्र आपण विसरतां कामा नये.

समाप्त